Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level

Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal

ISSN: 2230-9578 September - 2025 Volume-17 Issue-9(IV)



Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



ISSN: 2230-9578
September - 2025
Volume-17 Issue-9(IV)

Please Get in Touch
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Journal of Research and Development

A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal

Volume-17, Issue-9(IV) | September 2025
Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
Dr. Ramesh V. Bhole
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

Disclaimer

The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.

© All rights reserved with the Editors.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

JOURNAL PARTICULARS

Name of Journal	JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT
Frequency	Monthly : Jan to Dec (12 issues per year)
ISSN	2230-9578
Publisher	Dr. Ramesh V. Bhole
Chief Editor	Dr. Ramesh V. Bhole
Copy right	Journal of Research and Development
Starting Year	January 2010
Subject	Multi-Disciplinary
Review Process	Double Blind Peer
Language	English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages.
Publication Format	Print
Access	OPEN ACCESS
License	Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
Phone No.	+91 93256 65856, +91-8888454089
Email	jrdrvb.org@gmail.com
Journal Website	https://jrdrvb.org
Registered office Address	'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India
Admin. Office Address	'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India
Printing	**Amitsons Digital Copiers** 106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR

Dr. Ramesh V. Bhole
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

ASSOCIATE EDITORS

Prof. (Dr.) Madan Mohan Goel
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

Dr. Praveen G. Saptarshi
Visiting Faculty
Salisbury University, United States

MANAGING EDITOR

Dr. Santosh P. Mane
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

EDITORIAL BOARD

BABALOLA, Ayodele Samuel Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian	**Dr. Lal Mervin Dharmasiri** Senior Professor and Chair Head of Geography University of Kelaniya, Sri Lanka.	**Vijayanand Selvaraj** Data Strategist and Artificial Intelligence Lead Information Technology (IT), Houston,Texas, USA
Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine.	**Prof. A.G. Amarasinghe** Senior Lecturer Grade University of Kelaniya, Sri Lanka.	**Dr. Gyanaranjan Sahoo** Extension Scientist Orissa University of Agriculture & Technology, Orissa India
Dr. RVS Praveen Director Digital Engineering and Assurance, USA	**Dr. Ranjan Kalita** Principal Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam	**Dr. S. C. Advitot** Principal CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot
Dr. Kulkarni Swanand Gajanan Associate Professor, Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur-	**Dr. Anurag Shrivastava** Professor & Post Doctoral, Lincoln University College (LUC) Petaling Jaya, Malaysia, Malyasia	**Prof. (Dr.) F. M. Nadaf** Principal, Government College Borda Margao Goa (Autonomous), India
Dr. Tushti Sharma Royal School of Languages, The Assam Royal Global University, Guwahati, Assam	**Dr. Sandeep Rout** Faculty of Agriculture, Sri Sri University, Cuttack, Odisha	**Dr. Daneshwar. R. Pandey** Assistant Professor, Head Of Department S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat

PUBLISHER

Dr. Ramesh V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon

Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September - 2025

Sr. No.	CONTENTS	Page No.
1	जैन धर्माचा भारतीय संविधानावर पडलेला प्रभाव **सुरज विजय चौगुले**	1-4
2	भारतीय संविधान निर्मितीमधील स्त्रियांचे योगदान - स्त्रीवादी इतिहासांच्या परिपेक्ष्यातून केलेला चिकित्सक अभ्यास **प्रा. डॉ. दिपक सुर्यवंशी, प्रा. आर.के.कांबळे.**	5-9
3	आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान : काळाची गरज **विश्रांती जांबीवंत चव्हाण**	10-16
4	एकनाथी भागवतातील समता **केतकी मराठे वझे**	17-21
5	भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार आणि सोशल मीडिया : आव्हाने व उपाययोजना **डॉ. अरूण पेंटावार**	22-29
6	मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणी व आवश्यकता **डॉ. धर्मवीर शाहू क्षीरसागर**	30-39
7	तंत्रज्ञान, डिजिटल हक्क आणि भारतीय संविधान: नवीन आव्हाने आणि संरक्षणाची धोरणे **डॉ. नामदेव शामराव आडनाईक**	40-43
8	भारतातील संसदीय लोकशाही: आव्हाने आणि सुधारणा **डॉ. मारुती चांगदेव हजारे**	44-50
9	भारतीय संविधान निर्मिती ऐतिहासिक आढावा : चिकित्सक अभ्यास **डॉ. रामेश्वर विक्रम सपकाळ**	51-54
10	भारतीय संविधान आणि राज्य विधानसभांमधील महिलांचे प्रतिनिधित्व: ७५ वर्षांचे चिंतन आणि भविष्यातील धोरणे **डॉ. संदीप विलासराव घोडके, प्रविण बाजीराव साळुंके**	55-63
11	भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची पार्श्वभूमी **डॉ. रमेश जगन्नाथ निकम**	64-67
12	भारत्तीय संविधान व दलित साहित्यचर्चा **प्रा. डॉ. आर. डी. कांबळे**	68-70
13	दलित साहित्य आणि संविधान: संविधान, हक्क व अस्तित्व **प्रा. डॉ. के. एम. लोखंडे**	71-78
14	मानवाधिकार आणि भारतीय संविधान **डॉ. दिनकर संतुकराव कळंबे**	79-82
15	भारतीय लोकशाहीचा घसरता आलेख- कारणांचा मागोवा **प्रा. नकुल पोपट खवले**	83-87
16	मराठी साहित्य: समता न्याय आणि स्वातंत्र्याची संकल्पना **प्रा डॉ. दया अतुल जेठे**	88-91
17	चंद्रकांत जाधव लिखित 'ढगाआडचा चंद्र' मधील जीवनचरित्र **डॉ. भक्ती गोविंद महाजन**	92-96
18	दलित साहित्य और संविधान: संविधान, अधिकार और अस्तित्व **किशोरी सुरेश टोणपे**	97-99
19	मराठी नाट्यपरंपरेतील समता, न्याय आणि स्वातंत्र्याची तात्विक मांडणी **प्रा. सुचिता यल्लाप्पा कांबळे**	100-104

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September - 2025

20	भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची पार्श्वभूमी **प्रा. आर. आर. सोनवणे**	**105-107**
21	मराठी दलित कवितेतील संविधानिक मूल्ये **अमोल देशमुख**	**108-112**
22	मानसिक आरोग्य आणि भारतीय संविधान **अमोल विलास भंडारी**	**113-117**
23	भारतीय संविधानातील मूल्य: धर्मनिरपेक्षता **प्रा. डॉ. प्रदीप जगताप**	**118-123**
24	न्यायिक पुनर्विलोकन आणि लोकशाही संतुलन **प्रा. बळवंतराव कुंडलिक जाधव**	**124-127**
25	भारतीय राज्य घटनेच्या निर्मितीचा इतिहास **सुधाकर वाल्मिक पवार**	**128-130**
26	भारतीय शेती आणि संविधान: ग्रामीण विकासासाठी आर्थिक धोरणे **श्री. गणेश आप्पासो कुरले**	**131-137**
27	संत साहित्य ते आधुनिक साहित्य: समता, न्याय आणि स्वातंत्र्याची संकल्पना **श्री. दऱ्याप्पा किसन गोडसे**	**138-141**
28	भारतीय राज्यघटनेची 75 वर्षे डिजिटल माध्यमे:भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य **श्री. विठ्ठल बिरु एडके**	**142-148**
29	भारतीय संघराज्यामधील नवे प्रवाह आणि समस्या **संतोष सुरेश पाटील**	**149-152**
30	भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास **डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर**	**153-159**
31	भारतीय निवडणूक आयोग : तत्व आणि व्यवहार **डॉ. शेषनारायण वडवे**	**160-163**
32	मातृभाषेतील शिक्षणाचा प्रश्न घटनात्मक आणि सांस्कृतिक चिंतन **रूपाली सावगावे**	**164-168**
33	'ययाती' समतेचा तत्त्वचिंतनात्मक शोध **अस्मिता अशोक पायनाईक, डॉ. निशा भंडारे**	**169-172**
34	भारतीय संविधानाची ७५ वर्षे आणि मूलभूत हक्क **करणसिंह राजेंद्र पाटील**	**173-176**
35	मानसिक आरोग्याला चालना देण्यात भारतीय संविधानाची भूमिका **डॉ. समीर पाचोरे, डॉ.सौ.विजयमाला चौगुले**	**177-182**
36	भारतीय संविधान आणि 73 वी घटनादुरुस्ती: एक अभिमानाचा प्रवास **अभिमान अरुण ढाणे, डॉ. प्रदीप जगताप**	**183-184**
37	भारतीय संविधान आणि मानव अधिकार **डॉ. कमलाकर शरद इंगळे**	**185-188**
38	मानवी मूल्ये आणि वंचित समुदायाचे मानसिक आरोग्य **डॉ. चैत्रा राजाज्ञा**	**189-192**
39	NEP 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य: गरजा आव्हाने व संधी **आरती प्रमोद क्षीरसागर, डॉ. शिवाजी बापू पाटील**	**193-197**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September - 2025

40	21 वी सदीं की हिंदी कविता में अभिव्यक्त संवैधानिक मूल्य (सामाजिक समता के परिप्रेक्ष्य में) **डॉ. सागर रघुनाथ कांबळे**	198-202
41	जन-जन के मन का दस्तावेज़: संविधान **प्रा.सविता दिनकर आहेर**	203-205
42	भारतीय संविधान के 75वर्ष और स्त्री अस्मिता (उदय प्रकाश लिखित कविता 'औरते' के विशेष संदर्भ में) **प्रो.डॉ.सरोज पाटील**	206-209
43	भारतीय संविधान: बहुभाषिकता के आईने में **डॉ. चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर सोनेराव**	210-213
44	राजेश जोशी की कविताओं में संवैधानिक मूल्यों का प्रभाव **डॉ. नितीन विठ्ठल पाटील**	214-217
45	विदेशी साहित्यकार तेजेंद्र शर्मा के कथा साहित्य में चित्रित संवैधानिक मूल्य ('संदिग्ध' और 'कब्र का मुनाफ़ा' कहानी के संदर्भ में) **कविता तुकाराम चानकने**	218-220
46	भारत बांगलादेश संबंध: फराक्का जलवाटप करारवाद **डॉ. संजय सागरू सपकाळ**	221-224
47	21 वी सदीं की हिंदी कविता में अभिव्यक्त संवैधानिक मूल्य (एकता के परिप्रेक्ष्य में) **डॉ. कृष्णात आनंदराव पाटील**	225-230
48	कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन विकास आणि आव्हाने: एक भौगोलिक अभ्यास **डॉ. राजेंद्र लक्ष्मण कोळी, प्रो. डॉ. टी. जी. घाटगे**	231-235
49	मराठी साहित्यात वारकरी संप्रदायातील स्त्री संतांचे योगदान **डॉ. निता र. तोरणे**	236-239
50	भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क **वंदना अरुण सातपुते**	240-244
51	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विषयक विचारांची समकालीन प्रस्तुतता **डॉ. विकास मोहन सरनाईक**	245-249
52	भारतीय संविधानाची ७५ वर्षे : चिंतन, सुधारणा आणि भावी दिशा **डॉ. विजय जालिंदर देठे**	250 -253
53	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय संविधानातील भूमिका **डॉ. साखरे दत्तात्रय यशवंत**	254-257
54	हंसा मेहता यांचे भारतीय संविधान निर्मितीतील कार्य : एक अभ्यास **कु. सुशांत शंकर कदम**	258-262
55	संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील समता आणि संविधानातील समानता : एक अभ्यास **सोनाली संभाजी पाटील**	263-268
56	आधुनिक हिंदी नाटक और संवैधानिक मूल्य **डॉ. प्रतिभा आनंदराव जावळे**	269-271
57	मराठी संतांच्या रचनेतील सार्वभौमत्व: संविधानातील सार्वत्रिक मूल्यांचा आध्यात्मिक पाया **डॉ. संदीप रंगनाथ तापकीर**	272-276
58	संत साहित्य व भक्ती चळवळीविषयी भिन्न विचारप्रवाह **सहा. प्रा. नील जनार्धन नागभिडे**	277-280

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September - 2025

59	भारतीय संविधानातील आर्थिक न्याय:- सिंहावलोकन **प्रा. बर्वे सिद्धार्थ भागाजी**	281- 284
60	भारतीय संविधानाची 75 वर्षे आणि मानवी अधिकारांच्या नजरेतून विमुक्त भटक्या जमातीच्या अधिकारांचे रक्षण, विशेष महिलांच्या बाबतीत **डॉ. दिलीप हरसिंग राठोड, श्रीमती वैशाली गुलाबराव सावंत**	285-290
61	भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क **डॉ. राहूल दत्ता मांडणीकर, दत्तात्रय वसंत पाटील**	291-293
62	संविधानिक मूल्ये आणि मराठी नाटक **नितीन गणपती खांडेकर**	294-298
63	वारकरी संत साहित्य : लोकशाहीच्या बळकटीसाठी महत्त्वाचे **डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील**	299-302
64	दलित साहित्य आणि संविधानः संविधान हक्क आणि अस्तित्व **प्रा. यादव धोंडू मोरे**	303-305
65	जूठन आत्मकथा में चित्रित सामाजिक संवेदना **शितल सचिन खैरमोडे**	306-308
66	भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क **डॉ. प्रा. विद्याताई निवासराव जगताप**	309-311
67	भारतीय राज्यघटनेचा सरनामा व आजचे वास्तव **डॉ. एन. एल. गायकवाड**	312-315
68	महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास (२०१४-२०२४) **मोसिम राजअहमद पठाण**	316-320
69	भारतीय निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि उत्तरदायित्व; प्रत्यक्ष व्यवहार व आजचे वास्तव **प्रा. डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर**	321-336
70	भारताच्या संविधान निर्मिती प्रक्रियेवर महात्मा फूले, शाहू महाराज आणि महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव **श्री. प्रकाश हणमंत देवकर**	337-338
71	संविधान के 75 साल भारतीय साहित्य में संवैधानिक विमर्श **श्रीमती. विजया माणिक पाटील**	339-341
72	भारतीय संविधानातील लिंग समानतेची ७५ वर्षे: प्रावधानांचे यश, आव्हाने आणि भविष्यातील दिशा **डॉ. संदीप विलासराव घोडके**	342-352

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

जैन धर्माचा भारतीय संविधानावर पडलेला प्रभाव

सुरज विजय चौगुले
संशोधक विद्यार्थी, पीएच.डी. इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
Email: suraj25chougule@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170901
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 1-4
Sept. 2025

Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

या संशोधन लेखात जैन धर्माचा भारतीय संविधानावर पडलेला प्रभाव स्पष्ट करण्यात आला आहे. भारतीय संविधान हे फक्त कायद्याचा दस्तऐवज नसून मानवी मूल्यांवर आधारित जीवनपद्धतीचा आराखडा आहे, ज्यावर प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा गहिरा प्रभाव आहे. विशेषतः जैन धर्मातील अहिंसा, अनेकांतवाद, अपरिग्रह, समता आणि सहिष्णुता या तत्त्वांचा भारतीय राज्यघटनेच्या रचनेवर अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष परिणाम झालेला आहे. संविधान निर्मितीत सहभागी झालेल्या जैन नेत्यांचे योगदान, संविधानातील जैन प्रतीके, तसेच संविधानाच्या विविध कलमांमध्ये प्रतिबिंबित झालेली जैन मूल्ये या सर्वांचा या संशोधनात सखोल आढावा घेतला आहे. या तत्त्वज्ञानामुळे भारतीय समाज अधिक सहिष्णू, सर्वसमावेशक व नैतिक बनला असून, लोकशाही, बंधुता व समानतेची मुळे अधिक दृढ झाली आहेत.

मुख्यशब्द: *जैन धर्म, भारतीय संविधान, अहिंसा, अनेकांतवाद, अपरिग्रह, समता, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, बंधुता.*

प्रस्तावना

कोणत्याही देशाची राज्यघटना हा त्या देशाचा सर्वोच्च कायदा असतो. एखाद्या देशाची वाटचाल कशी व्हावी त्या राष्ट्रात कोणत्या प्रकारचे शासन अस्तित्वात असावे, कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांचे परस्पर संबंध कसे असावेत, त्या देशातील नागरिकांना कोणते मुलभूत हक्क-अधिकार आहेत व त्या अधिकारांचे संरक्षण कशा प्रकारे केले जाईल या सर्वाचा निर्देश राज्यघटनेमध्ये असतो. भारतीय संविधान हे भारताच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे अधिष्ठान आहे. हे भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे व सविस्तर लिखित संविधान मानले जाते. भारतीय संविधानाची निर्मिती ही एक ऐतिहासिक प्रक्रिया होती. विविध तत्त्वज्ञान, विचारधारा व सामाजिक परंपरांनी संविधानाच्या घडणीत मोलाचा वाटा उचलला. काही तज्ञ मंडळी भारतीय संविधांनाचा इतर जगातील प्रमुख संविधानाशी तौलनिक अभ्यास करून इंग्लंड, फ्रान्स, जपान,अमेरिका, द.आफ्रिका, कॅनडा इ. देशातील राज्यघटनेतून कोणती तत्त्वे-कायदे भारतीय राज्यघटनेमध्ये घेतली आहेत याचा उहापोह करतात. पण भारतीय राज्यघटना म्हणजे जगातील इतर संविधानामधून केलेली उसनवारी आहे असे नाही तसेच ती पाश्चिमात्याचे अंधानुकरण ही नाही.

भारतीय संविधानातील ज्या तरतुदी आहेत त्यावर प्राचीन भारतीय तत्वज्ञान, संस्कृती, धर्म याचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. यात जैन धर्माने दिलेल्या अहिंसा, अनेकांतवाद, अपरिग्रह व समतेच्या तत्त्वांचा अप्रत्यक्ष प्रभाव होता. त्याचबरोबर संविधान सभेत जैन समाजातील थोर नेत्यांनीही थेट सहभाग नोंदवला.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सुरज विजय चौगुले, संशोधक विद्यार्थी, पीएच.डी. इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

How to cite this article:
चौगुले, . सुरज . विजय . (2025). जैन धर्माचा भारतीय संविधानावर पडलेला प्रभाव. Journal of Research & Development, 17(9(IV)), 1–4. https://doi.org/10.5281/zenodo.17697281

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17697281
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

त्यामुळे संविधानाच्या मूल्यरचनेत जैन समाजाचे योगदान अधिक ठळकपणे जाणवते. म्हणूनच सदर शोध पेपरची मांडणी करण्यात आलेली आहे.

संशोधन पद्धती

सदरच्या संशोधन पेपरसाठी पारंपरिक ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

उद्दिष्टे

१. भारतीय राज्यघटनेवरती जैन धर्माचा पडलेला प्रभाव स्पष्ट करता येईल.
२. भारतीय संविधान निर्मितीतील जैन व्यक्तींच्या सहभागावरती प्रकाश टाकता येईल.
३. जैन धर्मातील तत्त्वज्ञानाचा भारतीय राज्यघटनेतील कोणत्या कलमामध्ये ते प्रतिबिंबित झाले आहे ते सांगता येईल.
४. भारतीय राज्यघटनेची मुळे प्राचीन भारतामधील उदयास आलेला तत्त्वज्ञानातच कशी रुजलेली आहेत हे सांगता येईल.

संविधान निर्मितीतील जैन व्यक्तीमत्त्वे

भारतीय संविधानाची निर्मिती ही एक ऐतिहासिक प्रक्रिया होती, ज्यामध्ये विविध विचारधारा आणि समाजघटकांच्या प्रतिनिधींनी आपले योगदान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संविधानाचे मुख्य शिल्पकार म्हणून व्यापक मान्यता मिळाली आहे, जी त्यांच्या अद्वितीय पात्रतेचे आणि सामाजिक न्यायासाठी केलेल्या संघर्षाचे प्रतीक आहे. मात्र, हेही तितकेच सत्य आहे की संविधान निर्मितीत जैन समाजातील विद्वानांची भूमिकाही अत्यंत महत्त्वपूर्ण होती.

संविधान सभेत २९९ सदस्य होते, त्यापैकी ६ सदस्य जैन समाजाचे होते. या विद्वानांनी सखोल विचारविनिमय, चर्चासत्रे व आपले अमूल्य सुचवलेले मुद्दे यांच्या द्वारे संविधान निर्मिती प्रक्रियेत आपला ठसा उमटवला. संविधान सभेत जैन समाजातून सहभागी झालेल्या प्रमुख विद्वानांमध्ये रतनलाल मालवीय (मध्य प्रदेश), अजित प्रसाद जैन (उत्तर प्रदेश), कुसुमकांत जैन (मध्य प्रदेश), भवानी अर्जुन खीमजी (गुजरात), बलवंतसिंह मेहता (राजस्थान) आणि चिमनभाई शाह (सौराष्ट्र, गुजरात) यांची नावे उल्लेखनीय आहेत. त्यांचा सहभाग केवळ सांकेतिक नव्हता, तर त्यांनी संविधानातील धारांचे व मूलभूत तत्त्वांचे निर्माण प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले.

संविधानाच्या हस्तलिखित प्रतिकृतीतील जैन संस्कृतीची प्रतिके

संविधानामध्ये जैन संस्कृतीची झलक स्पष्टपणे दिसते. संविधानाच्या हस्तलिखित आवृत्तीच्या पृष्ठ क्रमांक ६३ वर भगवान महावीर यांचे चित्र अंकित आहे, जे त्यांच्या अहिंसा आणि सत्याच्या आदर्शांचे प्रतीक आहे. संविधानाच्या प्रथम पृष्ठावर मोहेंजोदडोतील बैलाची शिक्कामोर्तब आकृती देण्यात आली आहे, जी प्राचीन भारतीय संस्कृतीचे प्रतीक मानली जाते. महात्मा गांधींच्या दांडी मार्चाच्या चित्रात सरलादेवी साराभाई यांसारख्या जैन महिलांचे नेतृत्व दाखवण्यात आले आहे, ज्यातून स्वातंत्र्य संग्रामात महिलांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित होते.

भारतीय संविधान आणि जैन तत्त्वज्ञान

भारतीय संविधानात समाविष्ट झालेली अनेक तत्त्वे ही भारतीय तत्त्वज्ञानाच्या दीर्घ परंपरेतील योगदान आहेत. त्यात जैन धर्माने दिलेला अहिंसा, समता, सहिष्णुता व अनेकांतवाद यांचा खोलवर प्रभाव जाणवतो. त्यामुळे भारतीय संविधान केवळ कायद्याचा दस्तऐवज न राहता मानवी मूल्यांवर आधारित जीवनपद्धतीचा आराखडा ठरतो.

अहिंसा

जैन धर्माच्या मुख्य तत्त्वामध्ये अहिंसा हे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे भारतीय राज्यघटनेतील मानव अधिकार ,शांतता आणि अहिंसेचा आग्रह यांना आधार मिळालेला दिसून येतो. संविधानाच्या प्रस्तावनेत शांतता, न्याय आणि बंधुता यांचा उल्लेख आहे. जैन धर्माच्या अहिंसेच्या तत्त्वाशी हे मूल्य घट्ट जोडलेले आहे. मूलभूत कर्तव्यांमध्ये (अनुच्छेद ५१ अ) प्राणी व पर्यावरणाविषयी करुणा ठेवण्याची अपेक्षा केली आहे, जी जैन परंपरेतील अहिंसेची प्रत्यक्ष झलक आहे.

समता

भारतीय संविधानात धर्मनिरपेक्षता व सामाजिक समता यांना महत्त्व दिलेले आहे. भारतीय संविधानाने अनुच्छेद १४ ते १८ अंतर्गत समानतेचा अधिकार व अस्पृश्यता निर्मूलनाचा निर्णय घेतला, जो जैन तत्त्वज्ञानाच्या समतेच्या विचाराशी सुसंगत आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

अनेकांतवाद व सहिष्णुता

जैन धर्मातील अनेकांतवाद व स्याद्वाद या संकल्पना विविध मतांना स्थान देतात. संविधानाने धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करून सर्व धर्मांना समान दर्जा दिला आहे. ही जैन सहिष्णुतेचीच आधुनिक आवृत्ती आहे.

पर्यावरण संरक्षण व जीवसृष्टीविषयी करुणा

जैन धर्मात अगदी सूक्ष्म जीवापासून ते संपूर्ण विश्वाशी अहिंसात्मक नाते मानले गेले आहे. संविधानातील अनुच्छेद ४८ अ व ५१ अ (g) मध्ये पर्यावरण, वने व वन्यजीव संरक्षणाचा उल्लेख आहे, ज्याला जैन विचारांचा अप्रत्यक्ष प्रभाव मानता येतो.

अल्पसंख्याक हक्क

जैन धर्म हा भारतातील प्राचीन धर्मांपैकी एक आहे. त्याची लोकसंख्या इतर धर्माच्या तुलनेत कमी आहे म्हणून २००६ साली या धर्माला अल्पसंख्याकाचा दर्जा मिळाला. संविधानाने अनुच्छेद २९ व ३० अंतर्गत अल्पसंख्याकांच्या सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांचे संरक्षण केले आहे. यामुळे भारतीय लोकशाहीतील विविधतेला सुरक्षितता मिळाली आहे.

जैन धर्माचा उदय एक वैचारिक जागृती होती. वैदिक कर्मकांडाविरुद्धची प्रतिक्रिया होती. त्याचाच भाग म्हणून जैन धर्माने जातीव्यवस्थेवरती आणि सामाजिक विषमतेवर प्रश्न उपस्थित केला व समानतेचा संदेश दिला. ज्याचा परिणाम भारतीय राज्यघटनेत सर्व भारतीयांना समान न्याय आणि समान अधिकार यासाठी करण्यात आलेल्या कलमात दिसतो. भारतीय संविधान म्हणजे स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी भाग घेतला त्यांच्या आशा-आकांक्षा व ध्येयपूर्ती यांचे प्रतिबिंब आहे. त्याच अनुषंगाने महात्मा गांधी यांच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब सुद्धा आपल्याला भारतीय संविधानामध्ये पडलेले दिसते. महात्मा गांधीजींनी आपल्या तत्त्वज्ञानात सत्य, अहिंसा, सत्याग्रह, अस्पृश्यता निवारण, सार्वभौमत्व इत्यादी महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. त्याचे प्रतिबिंब राज्यघटनेमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या पडलेले दिसते. इथे हेच सांगायचे आहे की सत्य, अहिंसा, जातीभेद निवारण, सामाजिकता एकता, समानता इ. तत्वे ही इ.स.पू. ६ व्या शतकात उदयास आलेल्या जैन धर्मामध्ये होते. किंबहुना जैन धर्माची उभारणीच अहिंसा या तत्त्वावर झालेली दिसते. जैन धर्म तत्त्वज्ञाने जातीव्यवस्थेविरुद्ध ठाम भूमिका घेऊन प्रत्येक घटकाला समान मान्यता दिली. ज्याचा भारतीय संविधान निर्माण करताना आदर करण्यात आलेला दिसतो. तसेच जैन तत्वज्ञानानुसार प्रत्येक व्यक्तीला प्रामाणिकपणे आपली विश्वास प्रणाली पाळण्याचा अधिकार आहे. यामुळे भारतीय राज्यघटनेत धार्मिक स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य यांना प्राधान्य देण्यात आलेले आहे.

जैन धर्मातील अपरिग्रह आणि संयम यातून प्रजा व राज्यकर्त्यासाठी नैतिक शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचा विचार सरकारी धोरणामध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे भारतीय संविधानात आर्थिक आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने पावले उचललेली गेली आहेत. जैन तत्त्वज्ञानात अंतर्भूत झालेल्या राज्याचा मानवीय, नैतिक आणि शांतीप्रिय आधार भारतीय संविधानाच्या विचारसरणीमध्ये अधोरेखित झाला आहे. राज्यकर्त्यांनी धर्म आणि कर्मकांडाच्या वर्चस्वातून बाहेर येऊन लोककल्याणाची नीती अवलंबावी हा जैन धर्माचा संदेश सुद्धा भारताचा संविधान विचारसरणीत सापडतो. अनेकांतवाद हे जैन धर्माचे प्रमुख तत्त्वज्ञान आहे. हे तत्त्वज्ञान धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती आणि सामाजिक दृष्टिकोनात विविधता असल्यानंतरही त्याचा आदर करण्यास शिकवते. लोक विविध मताचा आदर करायला शिकून समाजात सहिष्णुता व समजूतदारपणा वाढण्यास मदत होते. समाजात समरसता व ऐक्य वाढते. थोडक्यात जैन धर्मातील अनेकांतवादाचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेमध्ये पडलेले आहे. त्यामुळे भारतीय समाज अधिक सहिष्णू, सर्वसमावेशक व समृद्ध बनला आहे. सामाजिक समरसतेसाठी आधारभूत ठरले आहे. त्यामुळेच आजच्या १४० कोटी भारतीय जनता गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहे.

जैन धर्माने जातीव्यवस्थेचा कडाडून विरोध केला आणि सर्व व्यक्तींमध्ये समता, लोकशाही,बंधुता व सार्वभौमत्व या तत्त्वांना अग्रक्रम दिला. आज हीच तत्त्वे आपल्या भारतीय राज्यघटनेची मूलभूत तत्वे-पाया बनलेले आहेत. जैन धर्माने अहिंसेला प्राधान्य दिल्याने भारतीय समाजामध्ये सहिष्णुता, भूतदया, परोपकार इ. मुल्यांची वाढ झाली. ही मुल्येच भारतीय राज्यघटनेत परिवर्तीत झालेली आहेत. जैन धर्माने जातीभेदाला, उच्च-निच्चतेला कडाडून विरोध करून अस्पृश्यता निवारण्याला अप्रत्यक्षरीत्या दुजोरा दिला. भारतीय संविधान कलम १८ मध्ये अस्पृश्ता कोणालाही व कोठेही पाळता येणार नाही. हे उद्धृत केले आहे. यावरून जैन धर्माचा राज्यघटनेवरील प्रभाव दिसून येतो. जैन धर्मातील 'अपरिग्रह' या तत्वाने भारतीय समाजातील आर्थिक संपत्तीचा समतोल वापर व सामाजिक दानधर्म यावर भर दिला आहे. यामुळे समाजात संपत्तीचे समिश्रण होताना ती अधिक समान रीतीने विभागणे शक्य झाले आहे.

जैन धर्माने सत्य, अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय व ब्रह्मचर्य या मूलभूत नैतिक मूल्यांची शिकवण दिली आहे. जी समाजामध्ये नैतिक सहभावना वाढविण्यास व भेदभाव कमी करण्यास मदत करते. अशा मूल्यांची रुजवन भारतीय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संविधानात निर्माण करताना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने झालेली आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये समता, बंधूता, लोकशाही, सामाजिक आणि आर्थिक न्याय, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, वैचारिक दृष्टिकोन, सार्वभौमत्व, समाजवाद धर्मनिरपेक्ष मूल्ये परावर्धीत होत असताना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने जैन धर्माचा प्रभाव पडलेला आहे हे ठामपणे साधार सांगता येते.

निष्कर्ष

१. जैन धर्मातील तत्त्वज्ञानाचा भारतीय संविधानावर व्यापक प्रभाव पडलेला आहे.
२. भारतीय संविधान निर्मितीतील जैन व्यक्तींच्या सहभाग स्पष्टपणे दिसून येतो.
३. जैन धर्माने भारतीय समाजात समजूतदारपणा, सहिष्णुता व नैतिकतेचा आधार प्रदान केलेला दिसतो.
४. अहिंसा हे जैन धर्माचे मुख्य तत्त्व आहे. महात्मा गांधीनी आपल्या तत्त्वज्ञानात ते वापरले. त्यानंतर त्याचे प्रतिबिंब प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या भारतीय संविधानात पडलेले दिसते.
५. जैन धर्माने जातीव्यवस्थेला कडाडून विरोध करून समता, बंधूता, लोकशाही समाजात स्थापन केली. तीच मूल्ये भारतीय संविधानाची मूलाधार बनली आहेत.

संदर्भ साधने

1. Ambedkar, B. R. – The Constitution of India.
2. Sangave, Vilas A. – Jaina Community: A Social Survey, Bombay: Popular Prakashan,
3. 1980.
4. Encyclopedia of Jainism, “Status of Contemporary Jain Community” (संविधानसभेतील ६ जैन
5. सदस्य), शिक्षणमंत्रालयाचे प्रकाशन
6. पाटील, डॉ. वसंतराव – जैन धर्म व तत्त्वज्ञान, कोल्हापूर : फडके प्रकाशन, १९८५.
7. जैन, जगदीशचंद्र – जैन धर्माचा इतिहास, दिल्ली : भारतीय विद्या प्रकाशन, १९९२.
8. साठे, डॉ. निरंजन – भारतीय राज्यघटनेची ५० वर्षे
9. भारतीय दैनिक सामना, “संविधान निर्माण में जैन समाज का योगदान : एक प्रेरणादायक अध्याय” (२० डिसेंबर
10. २०२४(

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधान निर्मितीमधील स्त्रियांचे योगदान - स्त्रीवादी इतिहासांच्या परिपेक्ष्यातून केलेला चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. दिपक सुर्यवंशी[1], प्रा. आर.के.कांबळे[2]
[1]इतिहास विभागप्रमुख सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड
[2]इतिहास विभाग जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर

Manuscript ID:
JRD -2025-170902
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 5-9
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय संविधानाच्या निर्मितीत महिलांचे योगदान हे अत्यंत मोलाचे असूनही, इतिहासलेखनात त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. प्रस्तुत शोधप्रबंधात स्त्रीवादी दृष्टिकोनातून भारतीय संविधान सभेतील १५ महिला सदस्यांचे कार्य, विचार आणि योगदान यांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. या महिलांनी संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेत समानता, स्वातंत्र्य, न्याय, आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांच्या दृढ स्थापनेसाठी कार्य केले. त्यांच्या भाषणांमधून आणि सुचनांमधून स्त्रीशक्ती, सामाजिक न्याय, आणि समतेचा विचार प्रकट होतो. संविधान सभेतील महिलांचे योगदान हे केवळ महिलांच्या हक्कांसाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतीय समाजाच्या लोकशाही आणि समतेच्या मूल्यांसाठीही मार्गदर्शक ठरले आहे. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व द्वितीयक स्रोतांचा वापर करून त्यांच्या योगदानाचे विवेचन केले आहे.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, स्त्रीवादी इतिहास, महिला सक्षमीकरण, समता, न्याय, संविधान सभा, महिला सदस्य, सामाजिक परिवर्तन, स्वातंत्र्य, लोकशाही मूल्ये.*

प्रस्तावना

आजपर्यंतच्या मानवी समाजाच्या विकासामध्ये समाजाचा निम्मा भाग असणाऱ्या स्त्रियांची भूमिका ही महत्त्वाची आहे. मात्र जेव्हा आपण इतिहासाचा आढावा घेतो. तेव्हा स्त्रियांचा उल्लेख किंवा त्यांची कामगिरी यावरती अत्यंत त्रोटक पद्धतीने लेखन केलेले दिसते. थोडक्यात इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहातून स्त्रियांना कमी स्थान देण्यात आल्याचे दिसते. स्त्रीवादी चळवळीपुढे इतिहासाकडे पाहण्याचा स्त्रीवादी दृष्टीकोन पूढे आला. आणि त्यातूनच भारतात स्त्रीवादी इतिहासलेखन परंपरा उदयास आली. स्त्रीवाद ही एक सामाजिक व राजकीय विचार प्रणाली आहे. जी स्त्री स्वातंत्र्याचा व समतेचा आग्रह धरते. मानवी समाजात पुरुषांचे वर्चस्व व स्त्रियांचे दुय्यमत्व-दास्यत्व अस्तित्वात येण्याची कारणमीमांसा करते.

फक्त स्त्री पुरुष समानता इतकेच स्त्रीवादास अभिप्रेत नसून सर्वच थरातील स्त्री-अधिकारांचा पाठपुरावा स्त्रिवाद करतो. हे स्त्रीवादाचे ध्येय आहे. स्त्रीवाद हा समाज इतिहास, राजकारण, संस्कृती, अर्थव्यवस्था, धर्म, जाती, वर्णव्यवस्था यांच्याकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन देखील आहे. काळाच्या ओघात आणि वैचारीक बदलांच्या प्रभावाने स्त्रियाच्या इतिहासलेखनाचा टप्प्याटप्याने विकास होऊन स्त्रिवादी इतिहासलेखनाची परंपरा उदयास आली.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. डॉ. दिपक सुर्यवंशी, इतिहास विभागप्रमुख सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड.

How to cite this article:
सुर्यवंशी, . दिपक ., & कांबळे, . आर . के . (2025). भारतीय संविधान निर्मितीमधील स्त्रियांचे योगदान - स्त्रीवादी इतिहासांच्या परिपेक्ष्यातून केलेला चिकित्सक अभ्यास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 5–9. https://doi.org/10.5281/zenodo.17697438

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17697438
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

या विकासातील तिसरा टप्पा म्हणजे स्त्रियांच्या योगदानाचे इतिहासलेखन होय. यामध्ये भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी मोठ्याप्रमाणात भाग घेतला होता. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय व सामाजिक चळवळीत देखील स्त्रियांचा सहभाग मोठा होता.

या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील स्त्रियांच्या सहभागाचा व योगदानाचा इतिहास स्त्रिवादाच्याा या तिस-या टप्यामध्ये लिहिण्यात आलेला दिसतो. आजपर्यंतचा इतिहास हा पुरुषकेंद्रीत लिहीला गेल्यामुळे स्त्रीयांचे योगदान दुर्लक्षित राहिल्याचे दिसते. इतिहास पुरुषकेंद्रीत असल्याने व इतिहास संशोधनाचा दृष्टीकोन देखील पुरुषकेंद्रीत असल्याने मुख्यप्रवाही इतिहासातून पुरुषांचे अनुभव, विचार आणि वृत्ती यांना वेगळे काढून तपासण्याचा प्रयत्न मुख्यप्रवाही इतिहासाने केले नाही. त्यामुळे स्त्रीयांच्या योगदानाची मांडणी ही पुरुषकेंद्रीत दृष्टीकोनाने केली गेली. त्यामुळे स्त्रीयांच्या योगदानावर म्हणावा तितका प्रकाश पडला नाही. भारतीय संविधान सभेत २८९एकूण सभासद होते. त्यापैकी २७४ पुरुष सभासद तर १५ महिला सभासद होत्या. आज महिला सबलीकरण, सक्षमीकरण, महिलांचा राजकारणातील सहभाग, महिलांचे आर्थिक स्वावलंबन अशा अनेक विषयावर सतत चर्चा सुरु असतात. या सर्वच विषयांची पायाभरणी संविधान सभेतील या १५ महिलांच्या योगदानातून झालेली दिसून येते. भारतीय संविधान निर्मितीमध्ये महिलांचा सहभाग हा अतिशय महत्वाचा होता. सर्वसामान्य नागरिकांना यांची माहिती नाही. भारतीय राज्यघटनेचा अर्थ समजावून सांगणारी अनेक पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. पण त्या पुस्तकामधून, ग्रंथामधून, आपल्या घटना समितीत महिलाही होत्या. आणि त्यांनी सुद्धा महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. यांची सविस्तर माहिती मिळत नाही. म्हणून सदरच्या शोधपेपरची मांडणी केली आहे.

संशोधन पद्धती - प्रस्तूत शोध पेपर लेखनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरली आहे. त्यानुसार प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

उद्दिष्ट्ये

- भारतीय संविधान निर्मितीमधील महिलांचे योगदान पुढे आणणे.
- आधुनिक काळात महिलांच्या विषयक हक्क, अधिकार आरक्षण, सबलीकरण, सक्षमीकरण, इ. चर्चील्या जाणा-या बाबींची पायाभरणी या १५ महिलांनी आपल्या कर्तृत्वाने कशी केली यांचा अभ्यास करणे.
- या महिलांनी घटनासभेत मांडलेले मुद्दे, विविध कलमावरील त्यांची मते, कशी उपयुक्त होती हे समजावून घेणे.
- या १५ महिलांचे राज्यघटना निर्मितीमधील योगदान स्त्रीवादी दृष्टीकोनातून अभ्यासने.

संविधान सभेतील महिला -

अम्मु स्वामीनाथन, दाक्षायणी वेलायुधन, बेगम ऐजाज रसूल, दुर्गाबाई देशमुख, हंसाबेन मेहता, कमला चौधरी, लिला रॉय, मालती चौधरी, पुर्णिमा बॅनर्जी, राजकुमारी अमृत कौर, रेणूका रॉय, सरोजिनी नायडू, सुचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडीत, ॲनी मस्कारेहास.

भारतीय संविधाान सभेतील फक्त १५ महिला ही संख्या जरी कमी वाटत असली तर समकालीन कारणाचा शोध घेतल्यास त्याची कारणे आपल्या लक्षात येतात. बालविवाह, स्त्रिशिक्षणाचा अभाव, समाजातील स्त्रीयांचे स्थान इ. गोष्टीमुळे फार कमी संख्येने स्त्रीया सार्वजनिक जीवनात भाग घेत असतं. महात्मा गांधीजीच्या जागृतीमुळे हजारो स्त्रीया सार्वजनिक जीवनात सक्रिय झाल्या. घटना समितीमधील बेगम एजाज रसूल सोडल्या तर सर्व स्त्रीया या महात्मा गांधीजीच्या विचारांनी प्रभावित झालेल्या होत्या.

✦ **दुर्गाबाई देशमुख -** मद्रास प्रांतामधून त्यांची घटना समितीवर निवड साली होती. मसुदा समितीच्या कार्यकारणीमध्ये त्या एकमेव स्त्री सदस्य होत्या. निराधार मुलं आणि युवक यांचं संरक्षण व विविध प्रकारच्या शोषणातून मुक्ती याबाबतच्या तरतूदी राज्यघटनेत सामाविष्ट करण्याबाबत त्याा आग्रही होत्या. वनचर प्राणी आणि पक्षी यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र्य संवैधानिक कायदे असावेत ही सुचना त्यांनी केली. त्यांच्या सुचनेचा प्रभाव ४२ व्या घटनादरुस्तीनंतर कलम ३९ फ मध्ये दिसून येतो. राज्यपालची निवड थेट निवडणूक पद्धतीने झाली तर या निवडीचे राजकारण होईल म्हणून राज्यपालाची निवड ही राष्ट्रपतीने करावी तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश हे स्वतंत्र्य भारताचे नागरीक असावेत. या बाबीं त्यांच्या सुचनेनुसार संविधानात नमुद केल्या गेल्या. संविधानाच्या संरक्षणाची अंतिम जबाबदारी ही सर्वोच्च न्यायालयाची असावी असे त्यांचे मत होते. राष्ट्रभाषेतबाबतच्या दृष्टीकोन देखील सर्वसमावेशक होता.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

✦ **रेणुका रे -** पश्चिम बंगाल प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून यांची निवड झाली होती. शिक्षणामध्ये धर्मनिरपेक्षता असावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. कलम १६ सध्याचे २८ च्या निर्मितीवेळी चर्चेत भाग घेताना त्यांनी शिक्षण क्षेत्रात शासनमान्य अनुदानित संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण घेण्याची सक्ती नसावी अशी सुचना मांडली गेली व ती मान्य ही केली गेली. शिक्षणावरील खर्चासाठी ठराविक रकमेची तरतूद करावी अशी सुचना त्यांनी केली. दुहेरी नागरीकत्वाला मात्र त्यांचा विरोध होता. देशाची एकता व अखंडता अबाधीत ठेवायची असेल तर एकेरी नागरीकत्वाचा स्वीकार करावा. असे त्यांचे म्हणणे होते.

✦ **हंसाबेन मेहता-** त्या मुंबई प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून भारतीय संविधान सभेतमध्ये निवडून आल्या होत्या. मुलभूत अधिकार उपसमिती सल्लागार समिती आणि राष्ट्रध्वज समितीच्या त्या सदस्य होत्या. १९४८ मध्ये त्यांनी भारतीय स्त्रीयांचे अधिकार व कर्तव्य यासंबंधी मसुदा तयार केला होता. या मसुदेचा प्रभाव युनो मानावधिकार जाहिरनाम्यावर पडलेला दिसून येतो. समान नागरी कायदा हा मुलभूत अधिकाराचाच अविभाज्य भाग असावा. अशी मागणी त्यांनी घटना समितीमध्ये केली होती. त्यांनी स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाला नेहमीच अग्रक्रम दिला. तर त्यांनी स्पष्टपणे महिला आरक्षणाचा विरोध केला.

✦ **दक्षयानी वेलूयुदन-** कोचीन मतदारसंघातून घटनासमितीमध्ये त्यांची निवड झालेली होती. या घटना समितीमधील एकमेव दलित स्त्री सदस्य होत्या. त्यांनी नेहमीच समतेचे विचार मांडले. संविधाननिर्मिती बरोबरच समाज परिवर्तनाचे कार्य व्हावे असे त्यांचे मत होते. राज्यघटनेचा मसुदा तयार झाल्यानंतर तो स्वातंत्र्य भारताच्या जनतेसमोर मांडावा अशी सुचना त्यांनी घटना समितीला केली. सशक्त केंद्रसत्ता आणि दुर्बल राज्य अशा संघराज्याच्या त्या विरोधी होत्या. राज्यांचे राज्यपाल केंद्राकडून नेमणूक करण्याच्या प्रस्तावाबाबातही त्यांनी आपले वेगळे मत मांडले.

✦ **बेगम ऐजाज रसूल -** या घटनासमितीमधील एकमेव व प्रथम मुस्लीम स्त्री सदस्य होत्या. अल्पसंख्याक अधिकार समितीच्या सदस्य होत्या. मुस्लीमांना धर्माच्या आधारावर संसदेवर राखीव जागा असू नयेत यासाठी त्यांनी आग्रह धरला. महिला गटापैकी संविधाना सभेत सर्वात जास्त त्यांची भाषणे झाली होती. राज्याने मुस्लमांनाना समान नागरी अधिकार दिले पाहिजे. हे अधिकार त्यांना मिळाले तर त्यांच्यातील विभक्त पणा दूर होईल. असे त्यांचे मत होते.

✦ **पुर्णिमा बॅनर्जी -** संयुक्त प्रांतातून घटनासमितीमध्ये निवडून आलेल्या होत्या. शिक्षण आणि रोजगार या दोन्ही गोष्टी मुलभूत अधिकारात सामाविष्ट असाव्यात याबाबात त्या आग्रही होत्या. त्यांनी धर्मनिरपेक्षतेला महत्त्व दिले होते. राज्यसभेची भूमिका व उपयोगिता याबाबत त्या अधिक सजग होत्या. संविधान स्वीकृतीच्या वेळी केलेल्या भाषणात देशातील सार्वजनकि उद्योग धंद्यावर सरकारचे पूर्ण नियंत्रण असावे, या क्षेत्राचे खाजगीकरण होऊ नये अशी मते मांडलेली दिसतात. आजच्या काळात ती मते तंतोतंत लागू पडतात.

✦ **राजकुमारी अमृत कौर -** या सी.पी. आणि बेरर प्रांतामधून घटना सभेवर निवडून आलेल्या होत्या. राज्यघटनासमिती स्थापित अर्थ आणि कर्मचारी तसेच राष्ट्रध्वज समितीच्या त्या सदस्य होत्या. आपला राष्ट्रध्वज फक्त खादी कापडाचा व हाताने विणलेल्या सुताचाच असावा हा त्याचा आग्रह संविधान सभेने मान्य केला होता. विभक्त मतदारसंघ पद्धतीला त्याचा विरोध होता. सर्वांना मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे. यासाठी त्या आग्रही राहिल्या. देवदासी व सतीप्रथा,बुरखा पद्धती, बालविवाह या पद्धती बंद व्हाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केला. सामाजिक सुधारणेसाठी राज्याचा हस्तक्षेप आवश्यक आहे. हे त्यांनी सांगितले.

✦ **अम्मु स्वामीनाथन -** या मद्रास प्रांतामधून संविधान सभेवर निवडून आलेल्या होत्या. २४ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेत केलेल्या भाषणातून महिलांना समान अधिकार मिळावेत अशी आग्रही मागणी केली. मुलभूत अधिकाराच्या कलमावर झालेल्या चर्चासत्रात त्यांनी सक्रीय भाग घेतला. त्यांनी आपल्या भाषणामध्ये राज्यघटना प्रत्यक्ष जीवनात उतरली पाहिले हा मुद्दा मांडताना त्यांनी आपण मनाने निश्चय केला पाहिजे की, राज्यघटना जगण्याचा दस्त ऐवज होईल. भारतातील सर्व नागरीकांना त्यांचा लाभ होईल. समानतेची संकल्पना केवळ कागदावर न राहता भारतीय जनतेत प्रत्यक्षात उतरवली पाहिजे. असे प्रतिपादन केले आहे.

✦ **लिला रॉय -** या बंगाल प्रांतातून संविधान सभेवर निवडून आलेल्या होत्या. राज्यघटना मसुदा कमिटीमध्ये त्यांची नेमणूक झालेली होती.

✦ **सरोजिनी नायडू -** भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्या महत्त्वाच्या नेत्या होत्या. संविधान सभेत त्या बिहार प्रांतातून निवडून आलेल्या होत्या. राष्ट्रध्वज समितीच्या त्या सदस्य होत्या. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जात, धर्म, स्त्री-पुरुष याआधारे देशाचे प्रतिनिधीत्व निवडले जावू नये.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

✦ **मालती चौधरी -** या उत्तरप्रदेश प्रांतातून घटना समितीवर आलेल्या होत्या. स्त्रीयामधील अंधश्रद्धा त्यामुळे होणारा त्रास यामधून त्यांची सुटका व्हावी. यासाठी सामाजिक सुधारणेचे कायदे व्हावेत यासाठी त्या आग्रही होत्या. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सुद्धा त्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

✦ **डॉ. विजयालक्ष्मी पंडित -** युनायटेड प्रांतामधून त्या घटनासमितीवर निवडून आलेल्या होत्या. संविधान सभेसमोर केलेल्या भाषणात वसाहतवादातून मुक्त होवू इच्छिणाऱ्या अनेक देशातील जनतेसमोर भारतीय संविधान प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केलेला होता.

✦ **सुचेता कृपलानी -** सुचेता कृपलानी या स्वातंत्र्य भारतातील उत्तरप्रदेशच्या पहिल्या मुख्यमंत्री होत्या. त्यांनी घटनासमितीमधील राष्ट्रध्वज समितीमध्ये आपले योगदान दिले.

✦ **कमला चौधरी -** त्यांनी घटनासमितीमधील राष्ट्रध्वज समितीमध्ये आपले योगदान दिले.

✦ **ऍॅनी मास्कारेहास -** या केरळमधील पहिल्या महिला खासदार होत्या. त्यांनी राष्ट्रध्वज समितीमध्ये आपले मोलाचे योगदान दिले.

या १५ महिलांची समान वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

- या सर्व महिला उच्चविद्याविभूषीत होत्या.
- या सर्व महिलांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये सहभाग घेतलेला होता.
- या सर्व महिलांनी कारावास भोगला होता
- या सर्व महिलांवर महात्मा गांधीजीच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता.
- घटना निर्मिती कायद्याचे संपूर्ण ज्ञान या सर्व महिलाकडे होते.
- राजकारणात राहून ही महिलांचे शिक्षण त्यांचे प्रश्न, महिलावर अन्याय करणाऱ्या सामाजिक रुढीविरुद्ध या सर्व महिलांनी आवाज उठवलेला दिसतो.
- वरील सर्व महिलांनी स्वातंत्र्यप्राप्तीचे राजकारण केले. सत्ता प्राप्तीच्या राजकारणात त्यांना फारसा रस नव्हता.
- आपआपल्या क्षेत्रातील अत्यंत कर्तृत्वान अशा या महिला होत्या.

Times of India या लेखामध्ये सुद्धा घटना निर्मितीमध्ये महिलांच्या योगदानाबद्दल माहिती आलेली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की बहुसंख्य नागरीकांना हे माहित नसते की संविधान निर्मितीत महिलांचे योगदान राहीले आहे तसेच या महिलांना संविधानाच्या कलमांच्या चर्चेमध्ये सुद्धा भाग घेतलेला होता. न्यायमुर्ती चंद्रचुड म्हणतात की, राज्यघटना निर्मितीत महिलांचे जे लक्षणीय योगदान राहीले आहे. त्यावर प्रकाश टाकण्यात आलेला नाही. त्यांचे योगदान अमुल्य आहे. तत्कालीन काळात स्त्रियांना ज्या सामाजिक परिस्थितीमध्ये राहावे लागत होते. त्या स्थितीत राज्यघटनेच्या कलमाद्वारे कोणता बदल करता येईल यांच्या मौलीक सुचना या महिलांनी केलेल्या आहेत.

भारतीय राज्यघटना निर्मितीचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तर आहेतच. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्यांच्याबरोबर, के. एम. मुन्शी, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर इ. अनेकांचे योगदानाविषयी बऱ्याच ग्रंथामधून उल्लेख आलेले आहेत. शाळा- महाविद्यालयामधून त्यांच्या योगदानाविषयी शिकविले जाते. परंतू घटना निर्मितीमधील उपरोक्त १५ महिलांच्या योगदानाबद्दल सविस्तर माहिती आपल्याला मिळत नाही. किंवा शाळा-महाविद्यालयातून शिकविली जात नाही. या महिलांचे योगदान समाजापुढे येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. न्यायमुर्ती चंद्रचुड यांनी सन २०१८ साली आपल्या निकाल पत्रात "संविधान निर्मिती माता" असा उल्लेख केलेला आहे. ग्रॅनविले ऑस्टिन यांनी Indias constitution: cornerstone of a nations. या आपल्या पुस्तकात भारताच्या संविधान निर्मितीचे पिता व माता यांनी राज्यघटनेत राष्ट्राचे आदर्श आणि संस्कार यांचा समावेश केला. आणि हे आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी एक पद्धती मांडली, असे म्हटले आहे. यावरुन आपल्याला घटनानिर्मितीमधील महिलांचे योगदान किती महत्त्वाचे होते हे कळून येते.

Time of India या वृत्तपत्रात म्हटल्याप्रमाणे न्या. चंद्रचुड यांना हे सांगायचे आहे की भारतीय संविधान निर्मितीत महिला सदस्यांचे योगदान न पुसले जाणारे आहे त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही संविधान निर्मितीचे सर्व श्रेय फक्त पुरुष वर्गाला देऊन चालणार नाही याचा दुसरा अर्थ असाही होतो की, लिंग समानता हा आपल्या संविधानाचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. संविधान निर्मिती प्रक्रियेत आपल्याला लिंगसमानता दिसते. राज्यघटनेवर भाष्य करताना व राज्यघटनेमधील विविध कलमांचा अर्थ लावताना हा विषय महत्त्वाचा ठरतो. या १५ महिलांचे घटना निर्मितीमध्ये कोणते योगदान आहे. हे सांगणारे 'Selected speeches of women

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

memebers of the constitutions assembley (Rajyasabha Secretariat - Publications) या पुस्तकामधून आपल्याला या महिलांनी मांडलेली मते लक्षात येतात. या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये वी.के. अग्नीहोत्री यांनी म्हटल्याप्रमाणे या महिलांचा गांधीजीच्या मार्गावर पूर्ण विश्वास होता. इंग्रजांच्या राज्यामुळे झालेल्या हानीसंबंधी त्या जागरुक होत्या. त्याचवेळी स्वातंत्र्यामध्ये महिलांना उपलब्ध होणाऱ्या संधीबाबतही जागरुक होत्या. संविधानात महिलांना समान अधिकार प्राप्त झाले आहेत. याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केलेला आहे. वेठबिगारी, मानवी व्यापार, देवदासी प्रथा यासंबंधी त्यांनी संविधान सभेत आवाज उठविलेला दिसतो. धार्मिक अल्पसंख्याकाच्या हक्काविषयीदेखील त्या जागरुक होत्या. मुलांचे शिक्षण तसेच मुलांच्या शोषणाविरुद्ध ही त्या ठामपणे उभारल्या.

मुलभूत अधिकार व राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यांच्या चर्चेमध्ये या महिलांनी सक्रीय सहभाग घेतला. राज्यसंस्था व कायदा यांची निर्मिती होत असताना समाजातील सर्व घटकांचे स्वातंत्र्य आणि सक्षमीकरण यासाठी या महिला उभ्या राहिलेल्या दिसतात. संविधान सभा ही देशाचा सर्वोच्च कायदा करणारी सभा होती देशाच्या सर्वोच्च कायदा निर्माण करणे हे फार अवघड काम आहे. संविधान सभेत कायदेशीर भाषेत बोलावे लागते. यासाठी कायदा समाजव्यवस्था यांचे उत्तम ज्ञान असावे लागते. संविधान सभेतील या १५ महिलाकडे हे सर्व गुण होते. आज महिला सक्षमीकरण, महिलांचा राजकारणातील सहभाग, ३३% महिला आरक्षण, महिलांचे आर्थिक स्वावलंबन असे अनेक विषय सद्यस्थितीत चर्चिले जातात. या सर्व विषयांची पायाभरणी संविधान सभेतील या महिलांच्या योगदानातून झालेली आहे. हे मात्र ठामपणे सांगता येते.

समारोप - अशारीतीने आपल्याला विविध प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ साधनांच्या आधारे भारतीय घटना निर्मितीमधील महिलांचे योगदान स्पष्टपणे मांडता येते.

निष्कर्ष - सदर शोध पेपर संशोधनातून पुढील काही निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

- ❖ भारतीय संविधान निर्मितीमध्ये उपरोक्त उल्लेखित १५ महिलांनी सक्रिय योगदान दिलेले आहे. हे साधार सांगता येते.
- ❖ घटना समितीमध्ये अप्रत्यक्षपणे निवडून आलेल्या या महिलांनी आपापल्या प्रांताचे तर प्रतिनिधीत्व केलेच पण त्याचबरोबर त्यांनी संपूर्ण भारतीय महिलांच्या हक्काविषयी, सामाजिक वाईट चालीरिती विरुद्ध सुद्धा आवाज उठविला.
- ❖ या सर्व महिला महात्मा गांधीजीच्या विचारांनी प्रेरीत झालेल्या होत्या.
- ❖ या सर्वच्या सर्व १५ महिला उच्चविद्याविभूषित व कायद्याचे सर्वांगीण ज्ञान असणाऱ्या होत्या.
- ❖ या १५ महिलांमध्ये सर्व जाती-धर्मांच्या महिलांचा समावेश होता.

संदर्भ साधने:

1. Selected speeches of women members of the constitutions assembly - Rajyasabha secretarate publication.
2. Times of India वृत्तपत्र.
3. ग्रॅनविले ऑस्टीन - India constitution - Cornerstone of a nation.
4. तळवलकर गोविंद - सत्तांतर १९४७ खंड १ ते ३ मौज प्रकाशन मुंबई.
5. गर्गे स.मा., कुलकर्णी अ.रा. - भारतीय राज्यघटनेचा इतिहास.
6. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र विशेष.
7. राज्यघटनेचे अर्धशतक - नरेंद्र चपळगावकर, मौज प्रकाशन गृह.
8. भारताच्या राज्यघटनेची ५० वर्षे - डॉ. सत्यरंजन साठे. कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान : काळाची गरज

विश्रांती जांबीवंत चव्हाण
(जयसिंगपूर, कॉलेज जयसिंगपूर) अर्थशास्त्र विभाग
Email: vishrantichavan1992@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170903
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 10-16
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवारा :

पूर्वीच्या काळात येणारी संकटे ही बहुतांश नैसर्गिक असल्यामुळे मानवाने प्रगतीला जसजशी सुरुवात केली तस तशी संकटे वाढू लागली. मानवाने आपली प्रगती करताना निसर्गाच्या व्यवस्थेत ढवळाढवळ करायला सुरुवात केली. त्यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यामध्ये गुंतागुंत अधिकच वाढत गेली. वाढती लोकसंख्या आणि प्रगती करताना सर्वांच्या मार्गात आलेल्या अडथळयामुळे निसर्ग निर्मित आणि मानवनिर्मित अशी दुहेरी संकटे निर्माण झाली.नैसर्गिक आपत्ती आणि मानवनिर्मित आपत्ती हे दोन आपत्तीचे प्रकार आहेत.नैसर्गिक घडामोडीतून घडणाऱ्या आपत्ती ह्या नैसर्गिक असतात मानवाच्या विशिष्ट कृत्यातून घडणाऱ्या आपत्ती हा मानवनिर्मित असतात.महापूर वाळू- वादळ, हिमवृष्टी, धुळ वादळ, चक्रीवादळ, भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी,भूस्कलन, वीज कोसळणे, धुके पडणे, उष्ण व शीतलहर, दुष्काळ,संसर्गजन्य रोग, कीड व उल्कापात ह्या नैसर्गिक आपत्ती आहेत.

मानवनिर्मित आपत्तीमध्ये अपघात आग,वनवा,दरोडा, वायूगळती,तेलगळती, कारखाना व खाणीतील विस्फोट, युद्ध, चेंगराचेंगरी,अनुस्फोट जैविक अस्त्रांचा स्फोट, बॉम्बस्फोट,इमारत कोसळणे, हत्या दहशतवाद, गुन्हेगारी, अनुभट्टीतील किरणोत्सर्ग, माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित गुन्हेगारी आणि त्यामधून उद्भवणारे संकटे आदींचा यामध्ये समावेश करता येईल आपत्तीचे परिणाम हे मानवी जीवनावर दुरगामी असतात. आपत्तीमुळे जीवित वित्तीय नुकसान होते. आपत्तीमुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होते. आपत्तीमुळे मानवी जीवनात अडथळे निर्माण होतात. कोरोनासारख्या आपत्ती मानवी जीवन तर उध्वस्त करतातच सोबत अर्थव्यवस्थेवर देखील परिणाम करतात नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीवर जर काही प्रमाणात मात करायची असेल,तिची तीव्रता कमी करायचे असेल तर मानवाला आपत्तीचे व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.वाढत्या लोकसंख्येची घनता ही प्रदेशाच्या परिस्थितीत बिघाड घडविण्यास मानव कारणीभूत ठरला आहे. भूकंप,नद्या, येणारे पूर यामुळे होणारी जीवित हानी ही लोकसंख्येच्या घनतेमुळे मोठे असते. विकासाच्या मागोमाग आपत्तीचा धोका अधिकाधीक दिसत आहे.मानवी जीवनामध्ये आपत्ती हा एक अविभाज्य घटक झाला आहे.तो अटळ आहे. मात्र ती ओढू नये यासाठी प्रत्येकाने सावधगिरी बाळवली पाहिजे.आपत्ती जर ओढवली तर तिचा प्रतिकार करणे हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे.आपत्तीची तीव्रता कमी करता येते. आपत्ती निवारण ही कोणा एकाची जबाबदारी नसते.सरकार,शासन,यंत्रणेतील सर्व घटक, उद्योगपती, विविध व्यवसायिक, विविध सामाजिक संस्था, नैसर्गिक संस्था,विविध समूह, आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या सर्व टप्प्यातील सर्व क्रियांमध्ये सामान्य माणसाचा संपूर्ण सक्रिय सहभाग असणे महत्त्वाचे आहे. आपत्तीच्या काळात कोणती ना कोणती तरी जबाबदारी ही प्रत्येकाला किंवा समूहाला द्यावीच लागते. तरच आपण आपत्तीचे निराकरण यशस्वीपणे करू शकतो.

मुख्यशब्द: *आपत्ती व्यवस्थापन, भौगोलिक स्थान, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्ती, पूर्वतयारी, पुनर्वसन, पर्यावरणीय संतुलन, शाश्वत विकास, आपत्ती निवारण, जनजागृती.*

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
विश्रांती जांबीवंत चव्हाण , (जयसिंगपूर, कॉलेज जयसिंगपूर) अर्थशास्त्र विभाग

How to cite this article:
चव्हाण, . विश्रांती . जांबीवंत . (2025). आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान: काळाची गरज. Journal of Research & Development, 17(9(IV)), 10–16. https://doi.org/10.5281/zenodo.17708071

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17708071
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

प्रस्तावना :

महाराष्ट्रात गेला काही वर्षात आलेल्या आपत्तीचा एकूण आढावा घेतल्यास असे सहजपणे लक्षात येते की, येणाऱ्या आपत्तीची तीव्रता वाढलीआहे. विविध प्रकारच्या आपत्तीची वारंवारता ही वाढलेली आहे. आपत्तींना समोर जाण्यासाठी आपली पूर्वतयारी नसल्याने आजपर्यंत राज्यात जीवित व वित्तहानी झालेली आहे. हे नुकसान वित्तीय जीवित तसेच निसर्गाचा ऱ्हास करणारे असल्याने त्यातून सावरून पुन्हा नव्याने जनजीवन मूळ पदावर आणि अत्यंत कष्टकारक, खर्चिक व वेळ घेणारे आहे हे सिद्ध झाले आहे. भारतासारख्या विकसनशील देशात होणारे नुकसान मोठे आहे त्यातून सावरून जनजीवन मूळ पदावर आणण्यासाठी शासन व समाज या दोन्ही घटकांचा कस लागतो.होणारे नुकसान सहन करण्याची ताकद आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये नसल्याने त्याचे दुरोगामी परिणाम भारतीय जनतेला भोगावे लागतात.त्यामध्ये वाढणारे महागाई तसेच झालेले नुकसान भरून काढण्यासाठी करावी लागणारी विविध करांमधील वाढ, जनसुविधा,पुनर्वसन यामुळे सरकारी तिजोरीवर पडणारा भार हा शेवटी सामान्य जनतेलाच कर रूपाने सोसावा लागतो व त्याचा परिणाम समाजाच्या सर्व स्तरावरील घटकावर होतो. हे सर्व टाळण्यासाठी आपत्तीचे पूर्वनियोजन करणे व यासाठी समाजाच्या सर्व घटकांनी तसेच शासनाने आपत्तीला सामोरे जाण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. आपत्तीचा धोका ओळखणे तो आपत्तीत रूपांतरित होऊ नये याकरिता सर्व स्तरावरून आवश्यक किती काळजी घेणे आपत्तीत होणारे नुकसान कमी करण्यासाठी योग्य ती पावले उचलणे आपत्तीचे व्यवस्थापन करणे होय. हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तीचा राज्याला नियमित सामना करावा लागतो. तसेच मानवनिर्मित आपत्तीमुळे ही प्रशासनावर ताण पडतो. या सर्व बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र राज्यातील आपत्ती प्रवण क्षेत्रात वाढ होत आहे यामध्ये भूकंप, पुर, चक्रीवादळ,दुष्काळ,भूस्खलन, साथिचे रोग, रस्ते,अपघात, आग, औद्योगिक आणि रासायनिक धोके, वायूगळती इत्यादी आपत्तीचा समावेश होतो. यात 2001 पासून अरबी समुद्रातील वादळामध्ये सुमारे 52% इतकी वाढ नोंदवलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या किनारी भागाला धोका वाढला आहे. तसेच विदर्भ मध्य महाराष्ट्र यासारख्या विविध भागात उष्णतेच्या लाटेचा धोका जास्त असतो.तसेच राज्यातील अनेक जिल्ह्यांना पुराचा अथवा महापुराचा सामना करावा लागतो.आपत्ती विषयक या घटना दिवसेंदिवस वाढत जात आहे. त्यामुळे आपत्तीची पूर्वतयारी करणे.आपत्ती व्यवस्थापन करणे आपत्तीप्रवण क्षेत्रातील धोके कमी करणे. प्रतिसाद पुनर्बांधणी प्रशिक्षण याबाबत व्यवस्थापन करणे नियोजन करणे आवश्यक आहे. आपत्तीचे बदलणारे स्वरूप उदाहरणार्थ covid-19 संपूर्ण जनमानसावर आर्थिक सामाजिक आरोग्यविषयक परिणाम लक्षात घेता येतात. आपत्तीचे व्यवस्थापन व नियंत्रण ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी विविध क्षेत्रातील संबंधित प्रशिक्षित मनुष्यबळाची नजीकच्या काळात मोठी गरज भासणार असून त्यासाठी सरकारतर्फे आपत्ती व्यवस्थापन विषयक विविध प्रशिक्षण शिबिरामध्ये अधिक जनजागृती करण्याचे काम सुरू आहे. ज्या अंतर्गत आपल्याला अधिकाधिक तरुण आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षित व माहिती असणारे मनुष्य निर्माण होईल त्यामुळे आपत्तीला प्रतिसाद देणे व उपाययोजना करणे शक्य होणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे -

प्रस्तुत शोधनिबंध पुढील उद्दिष्टांनी लिहिण्यात आला आहे.

1) आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व जाणून घेणे.
2) आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान: यातील उद्देश समजावून घेणे.
3) आपत्ती व्यवस्थापनाचे प्रकार अभ्यासणे.
4) आपत्ती व्यवस्थापनाचे परिणाम जाणून घेणे.
5) आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान: उपाययोजना समजावून घेणे.

अभ्यास पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंध करण्यासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे ही सामग्री आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान या संदर्भातील विविध पुस्तके, मासिके, वृत्तपत्रांमधील लेख, इंटरनेट इत्यादीचा वापर करून माहिती गोळा केली आहे.

आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व :

आपत्ती ही अचानक घडणारी, आपत्तीजनक आणि दुर्दैवी घटना आहे जी मानवी जीवनाचे तसेच मालमत्तेचे मोठे नुकसान, विनाश आणि विध्वंस आणते आणि आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या विशिष्ट क्षेत्रात चालू असलेल्या विकास प्रकल्पांनाही अडथळा आणते. आपत्तीची व्याख्या अनेक प्रकारे केली गेली आहे; जागतिक आरोग्य संघटनेने आपत्तीची व्याख्या अशी केली आहे की नुकसान, पर्यावरणीय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

व्यत्यय, मानवी जीवनाचे नुकसान, आरोग्य आणि आरोग्य सेवांचा बिघाड अशा कोणत्याही अचानक घडणाऱ्या घटना, ज्या प्रभावित समुदाय किंवा क्षेत्राबाहेरून असाधारण प्रतिसाद मिळावा यासाठी पुरेशा प्रमाणात घडतात. नैसर्गिक किंवा मोठ्या मानवनिर्मित आपत्तीच्या बाबतीत टिकून राहण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन खूप महत्वाचे आहे आणि अचानक होणाऱ्या आपत्तीचा परिणाम कमी करण्यासाठी आपत्तीच्या सर्व मानवतावादी पैलूंना तोंड देण्यासाठी संसाधने आणि जबाबदाऱ्यांचे संघटन आणि व्यवस्थापन म्हणून त्याची व्याख्या करता येते, विशेषतः तयारी, प्रतिसाद आणि पुनर्प्राप्ती आपत्तींमुळे होणारे नुकसान हे अगणित असते आणि ते भौगोलिक स्थान, हवामान आणि पृथ्वीच्या पृष्ठभागाचा प्रकार/असुरक्षेच्या प्रमाणात बदलते. कधीकधी अशा आपत्ती येऊ शकतात जिथे मानवी जीवितहानी होत नाही आणि कधीकधी त्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान देखील होऊ शकते. याचा परिणाम प्रभावित क्षेत्राच्या मानसिक, सामाजिक-आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थितीवर होतो. मानवी क्रियाकलापांमुळे किंवा काही नैसर्गिक बदलांमुळे आपत्ती उद्भवू शकते. आपत्ती या अशा घटना आहेत ज्या बहुतेक वेळा अप्रत्याशित असतात. कोणत्याही सरकार, राज्य किंवा समुदायासाठी आगाऊ तयारी करून आपत्तींचे व्यवस्थापन करणे महत्वाचे आहे. सरकार कायदे करते, संसाधनांचे वाटप करते आणि तर्कसंगत नियोजन आणि शाश्वत विकास करते. आपत्ती व्यवस्थापन आणि नियोजन हा सरकारी कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेतला पाहिजे. आपत्ती अशा घटना आहेत ज्यांचा मानवांवर आणि पर्यावरणावर मोठा परिणाम होतो. आपत्ती अपरिहार्य आहेत, त्या रोखण्यासाठी आपण काहीही करू शकत नाही परंतु आपत्तीची तयारी फक्त आपल्या हातात आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी सरकारी हस्तक्षेप आणि योग्य नियोजन तसेच निधीची आवश्यकता असते. या आपत्ती नेहमीच अप्रत्याशित असतात असे नाही. पूर दऱ्या आणि पूरक्षेत्रात होतात, अस्थिर आणि कमी पाऊस असलेल्या भागात दुष्काळ पडतो आणि तेल गळती शिपिंग लेनमध्ये होते. ही भविष्यवाणी आपत्तींचे नियोजन करण्यासाठी, रोखण्यासाठी आणि त्यांचा परिणाम कमी करण्यासाठी संधी प्रदान करते. आपत्ती अपरिहार्य आहेत जरी त्या केव्हा आणि कुठे येतील हे आपल्याला नेहमीच माहित नसते. परंतु तयारी, लवकर इशारा आणि जलद, निर्णायक प्रतिसाद देऊन त्यांचे सर्वात वाईट परिणाम अंशतः किंवा पूर्णपणे रोखले जाऊ शकतात.

आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान: उद्देश

आपत्ती व्यवस्थापनाचा उद्देश आपत्तींच्या घटना कमी करणे आणि ज्या टाळता येत नाहीत त्यांचा परिणाम कमी करणे आहे. सरकारी श्वेतपत्रिका आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा आपत्ती व्यवस्थापनात स्थानिक प्राधिकरणे तसेच प्रांतीय आणि राष्ट्रीय सरकारची भूमिका परिभाषित करतो. आपत्ती येताच आपत्ती व्यवस्थापन दल कृतीत उतरतात आणि मदत, बचाव आणि पुनर्वसन प्रक्रियेत मदत करतात. हे प्रशिक्षित व्यक्ती असतात आणि त्यांना आपत्ती किंवा नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी कामगिरी करण्यासाठी व्यापक प्रशिक्षण दिले जाते आणि ते जीवितहानी कमी करण्यासाठी आणि स्थानिकांना सामान्य जीवनात परत येण्यास मदत करण्यासाठी एक संघ म्हणून काम करतात. आपत्तीपूर्व व्यवस्थापन आपत्ती कालन व्यवस्थापन आणि आपत्ती नंतरचे व्यवस्थापन हे आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्वाचे तीन टप्पे आहेत. आज विज्ञानाने मोठी प्रगती केली आहे अवकाशात सोडलेल्या उपग्रहांमुळे संभाव्य आपत्तीच्या भागांमध्ये धोक्याची पूर्व सूचना देण्यात येते.त्यामुळे आपत्ती कोसळल्यावर कमीत कमी नुकसान होते. उदाहरणार्थ द्यायचे झाल्यास वादळ येणार असल्याने मासेमारांनाही मासेमारांसाठी समुद्रात जाऊ नये तसे समुद्र घाटावर राहणाऱ्या नागरिकांना मान करण्यात येते. त्यामुळे आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात हे ठरविता येते. आपत्ती निवारणासाठी सुयोग्य संघटन निर्माण करण्यात येते आपत्कालीन व्यवस्थापन हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्त्वाचा टप्पा आहे. यामध्ये बचाव आणि शोधा मार्ग आहे. यामध्ये आपत्ती पीडितांना त्या आपत्तीमधून सोडवण्यासाठी मदत केली जाते यासाठी असलेल्या आपत्ती व्यवस्थापन दलाकडून आपत्तीग्रस्तांना त्वरित प्रतिसाद देण्यात येतो त्याचे पुनर्वसन करण्यासाठी काम करण्यात येते शासन प्रशासन यंत्रणेच्या जोडीने आपत्तीपूर्व आपत्ती दरम्यान आणि आपत्ती पक्षात कोण कोणती कामे करावीत याचे नियोजन करते केंद्र सरकार, राज्य सरकार, आणि जिल्हा पातळीवरील जिल्हा प्रशासनाचे स्वतंत्र यंत्रणा काम करीत असते प्रत्येक पातळीवर प्राधिकरणाचे अधिकार,कार्यक्षमता,आणि जबाबदारी निश्चित केला जातात त्यांचे अधिकाराने जबाबदाऱ्या देखील निश्चित केल्या जातात. अधिकाऱ्यांनी जबाबदाऱ्याच्या काटेकोरपणे विभागणी झालेली असते. मंत्री आणि सचिव यांच्या पातळीवर निर्णय घेतले जातात. त्याची अंमलबजावणी अधिकाऱ्यापासून ते अखेरच्या पातळीवरील शासन यंत्रणेला जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करावे लागते निसर्गनिर्मित आपत्ती टाळता येणार नाही परंतु मानवनिर्मित आपत्ती टाळणे तिची तीव्रता कमी करणे व त्यापासून होणारा होण्याचे प्रमाण नक्कीच कमी करणे शक्य आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि अवकाशात सोडलेल्या उपग्रहांमुळे आता सुनामी, वादळे, गारपीट,अतिवृष्टीचा अंदाज घेणे शक्य झाले आहे. पूर्व अंदाज घेऊन लोकांना त्याविषयी आधीच कल्पना देता येते प्रशासन यंत्रणा कार्यक्षमतेने काम करीत असताना आणि लोकांनी अति उत्साही न होता योग्य संयम दाखवून प्रशासनाला प्रतिसाद दिला तर आपत्तीवर मात करणे शक्य आहे. आपत्ती निवारण व्यवस्थापनात जनतेशी योग्य प्रकारे संवाद

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

साधून त्यांच्या मनातील भीती नाहीशी करणे हे नियंत्रण आणि कार्यक्षम अंमलबजावणीत महत्त्वाचे आहे संपर्क यंत्रणेची भूमिका ही महत्त्वाची असते आपत्ती व्यवस्थापन ही आज काळाची गरज झाली आहे आपत्ती असलेला प्रसंग निवारण्यासाठी सर्वाधिक गरज असते ती साधनसामग्रीची आपत्तीतून लोकांचा बचाव व त्यानंतर त्यांच्या पुनर्वसन करण्यासाठी विविध प्रकारची साधने संबंध आवश्यक असते कोणत्या प्रकारची किती साधन संपली हवी व ती तात्काळ कोठून मिळवता येईल याबाबतची माहिती यंत्रणा कक्षा जवळ असावी नसली तर त्यांना तात्काळ कुठे मिळवता येईल याबाबतची माहिती नियंत्रण कक्षा जवळ असली पाहिजे जसे होणाऱ्या व्यक्तीची स्पर्श मित्रांची बिछायत केंद्र सेवाभावी संस्था दानशूर व्यक्तींची रुग्णवाहिकाच्या आणि डॉक्टरची अद्यावत यादी आणि त्यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध असले पाहिजे आपत्ती सोडलेल्या लोकांचे लवकरात लवकर स्थलांतर करून त्यांना सुरक्षित त्या ठिकाणी आणून व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीची रीतसर नोंद घेतली पाहिजे आपत्तीतून बाहेर पडण्यासाठी व पुनर्वसनासाठी करावयाच्या गोष्टी या वेगवेगळ्या परिस्थितीनुसार असतात आपत्ती लहान मोठी असली तरी तिच्या नियंत्रणासाठी कितीही पूर्वतयारी केली तरीही आपत्तीच्या प्रसंगी ती कमीच असते अचानक आलेल्या आपत्तींना तोंड देण्यासाठी तिथे असलेले नागरिकत शासकीय यंत्रणेला मदतीसाठी सर्वप्रथम धावून जातात आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी दाखवलेली एकजूट महत्वाची असते आपत्ती बाबतपुर व तयारी आपत्तीची सामना करणे व आपत्ती नंतरचे पुनर्वसन याबाबत लोकशिक्षण देणे आवश्यक आहे म्हणजेच पुरेशी पूर्व सूचना देणे आवश्यक आहे आपत्ती व्यवस्थापनेच्या वेळी गोंधळाची स्थिती इ जितकी कमी असेल तितके च प्रमाण कमी असते तितकी परिस्थिती ही लवकर पूर्ववत होण्यास मदत होते. यावर आपत्ती निवारणाचे यश अवलंबून आहे.

आपत्ती व्यवस्थापनाचे प्रकार :

आपत्ती अपरिहार्य असतात; असा कोणताही देश नाही जो आपत्तीपासून सुरक्षित आहे, जरी आपत्तीची असुरक्षितता वेगवेगळी असते. सामान्यतः, आपत्ती दोन प्रकारच्या असतात - नैसर्गिक आपत्ती आणि मानवनिर्मित आपत्ती. आपत्तीमुळे झालेल्या विध्वंस आणि तीव्रतेनुसार, या आपत्तींचे वर्गीकरण मोठ्या/लहान नैसर्गिक आपत्ती आणि मोठ्या/लहान मानवनिर्मित आपत्तींमध्ये केले जाते. काही आपत्ती खाली सूचीबद्ध आहेत:

नैसर्गिक आपत्ती :

नैसर्गिक आपत्ती सामान्यतः अप्रत्याशित प्रकारच्या आपत्ती असतात आणि त्यामुळे होणारा विनाश आपत्तींच्या तीव्रतेवर अवलंबून असतो. या आपत्तींमध्ये पूर, चक्रीवादळे, भूकंप आणि ज्वालामुखीचा उद्रेक यांचा समावेश आहे ज्यांचा मानवी आरोग्यावर तात्काळ परिणाम होऊ शकतो, तसेच दुय्यम परिणामांमुळे पुरामुळे होणारे मृत्यू आणि त्रास, भूस्खलन, भूकंपामुळे आग, त्सुनामीमुळे होणारे व्यापक पूर आणि टायफूनमुळे फेरी बुडणे यांचा समावेश आहे. या आपत्तींचे मुख्य कारण म्हणजे हवामानातील बदल तसेच पृथ्वीच्या आतील हालचाली जसे की टेक्टोनिक प्लेट्स किंवा लावा हलवणे. तीव्रतेनुसार तसेच झालेल्या विनाशावर अवलंबून हे वर्गीकृत केले जाऊ शकते.

i) प्रमुख नैसर्गिक आपत्ती: प्रमुख नैसर्गिक आपत्तींमध्ये उच्च-तीव्रतेचा भूकंप, पूर, चक्रीवादळ, अचानक पूर, काही मोठे भूस्खलन आणि दुष्काळ यांचा समावेश होतो. या आपत्तींमुळे सामान्यतः मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होते आणि त्यामुळे अनेक लोक त्यांच्या निवाऱ्यातून विस्थापित होतात. साधारणपणे , या आपत्तींमुळे विकास प्रकल्पांना तसेच विशिष्ट क्षेत्रातील पायाभूत सुविधांना मोठा धोका निर्माण होतो . या आपत्तींविरुद्ध तयारी प्राधान्य यादीत सर्वात वर असावी.

ii) किरकोळ नैसर्गिक आपत्ती: थंडीची लाट, सामान्य जीवन विस्कळीत करणारा मुसळधार पाऊस, उष्णतेची लाट, वादळ, चिखल, काही किरकोळ भूस्खलन आणि कमी तीव्रतेचे भूकंप ही किरकोळ नैसर्गिक आपत्तींची प्रकरणे कमी असू शकतात. या आपत्तींमुळे मानवी जीवनाचे तसेच मालमत्तेचे फारसे नुकसान होत नाही. जरी काळजी घेतली नाही तर त्या मानवांसाठी घातक ठरू शकतात. सामान्यतः समुदाय पातळीवर आपत्ती तयारीची फारशी गरज नसते परंतु या प्रकारच्या आपत्तीसाठी या आपत्तींविरुद्ध वैयक्तिक तयारी आणि जागरूकता आवश्यक असते. उदाहरणार्थ, उष्णतेच्या लाटेसाठी किंवा समुदाय पातळीवर शीतलहरीसाठी आपत्ती तयारी असू शकत नाही ; तीव्र थंडी आणि उष्णतेच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे ही आपली स्वतःची जबाबदारी आहे.

मानवनिर्मित आपत्ती :

ही सामान्यतः मानवी क्रियाकलाप आणि मानवी निष्काळजीपणामुळे घडणारी आपत्ती असते आणि त्यामुळे जीवित आणि मालमत्तेचे खूप नुकसान होऊ शकते. कधीकधी ही खरोखरच प्राणघातक असते आणि कधीकधी ही आपत्कालीन परिस्थितीची एक छोटीशी घटना असू शकते आणि वैयक्तिक पातळीवर ती हाताळता येते . बहुतेक वेळा , ही मानवी निष्काळजीपणामुळे घडते आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

म्हणूनच बहुतेक वेळा अंदाजे नसलेली असते, तथापि , युद्धे, हल्ले इत्यादी घटना अंदाजे नसलेल्या आपत्ती असतात. या आपत्तींमुळे होणारे नुकसान या आपत्तींच्या तीव्रतेवर अवलंबून असते. त्यांचे वर्गीकरण असे करता येते:

i) मोठी मानवनिर्मित आपत्ती: काही मोठ्या मानवनिर्मित आपत्तींमध्ये जंगलातील आगी, युद्धे, अणुहल्ला, मोठी आग, औद्योगिक अपघात तसेच इमारत कोसळणे किंवा बांधकाम ठिकाणी अपघात होणे यांचा समावेश असू शकतो ज्यामुळे खूप नुकसान होते. साधारणपणे , औद्योगिक अपघात, आगी आणि बांधकाम अपघात यासारख्या मानवी निष्काळजीपणामुळे होणाऱ्या घटना अप्रत्याशित असतात आणि त्यामुळे जीवित आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान होते. गेल्या काही वर्षांत औद्योगिक आगीच्या काही मोठ्या घटना घडल्या आहेत ज्यामुळे अनेक कामगारांचा मृत्यू झाला आहे आणि साहित्य आणि यंत्रसामग्रीचे मोठे नुकसान झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीत बाहेर काढण्यासाठी आपत्कालीन तयारी ठेवण्याचा सल्ला दिला जातो आणि औद्योगिक युनिट्सनी देखील सतर्क राहावे आणि सर्व सुरक्षा उपकरणे तसेच अग्निशामक यंत्रे आणि आपत्कालीन अलार्म सारखी उपकरणे प्लांटमध्ये बसवावीत.

ii) किरकोळ मानवनिर्मित आपत्ती: रेल्वे किंवा रस्ते अपघात, किरकोळ घरांना आग लागणे, अन्नातून विषबाधा होणे, किरकोळ औद्योगिक अपघात, लुटमारीच्या घटना, दहशतवादी हल्ले किंवा दुकानांना आग लागणे इत्यादी काही घटना ज्या बहुतेकदा वैयक्तिक निष्काळजीपणामुळे घडतात त्यांना किरकोळ मानवनिर्मित अपघात म्हणतात. अशा घटनांमध्ये मालमत्तेचे नुकसान होऊन मोठ्या प्रमाणात जीवितहानी होत नाही हे स्पष्ट आहे. वैयक्तिक जागरूकता आणि सावधगिरी तुम्हाला अशा घटना टाळण्यास तसेच अशा आपत्तींमध्ये सुरक्षित राहण्यास मदत करू शकते. म्हणून अशा घटना टाळण्यासाठी सावधगिरी बाळगण्याचा आणि सतर्क राहण्याचा सल्ला दिला जातो.

आपत्ती व्यवस्थापनाचे परिणाम :

आपत्ती म्हणजे अचानक घडणारी आपत्ती ज्यामुळे सामान्य मार्गात व्यत्यय येतो आणि आपत्तीच्या तीव्रतेनुसार बरेच नुकसान होते. सामान्यतः, संबंधित भागात आपत्तीचे खालील परिणाम होतात:

- आपत्ती व्यवस्थापना मुळे सामान्य दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत होते.
- आपत्ती व्यवस्थापना मुळे जीवित आणि मालमत्तेचे खूप नुकसान होते.
- नैसर्गिक आपत्तीमुळे शेती आणि पशुधनाचेही नुकसान होते.
- आपत्तींमुळे विकास प्रकल्पांना प्रतिकूल प्रकारे अडथळा येतो.
- आपत्तीमुळे अत्याधुनिक सुविधा आणि पायाभूत सुविधांचा नाश होतो.
- त्याचा आपत्कालीन यंत्रणांवर नकारात्मक परिणाम होतो.
- आपत्तीच्या तीव्रतेनुसार आणि तीव्रतेनुसार पूर, निवारा, आरोग्य इत्यादी सामान्य गरजा आणि प्रक्रिया प्रभावित होतात आणि बिघडतात.

आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान : उपाययोजना

मानवाच्या जीवनावर निसर्गाचा नेहमीच मोठा प्रभाव राहिला आहे. पूर, भूकंप, दुष्काळ, चक्रीवादळ, भूस्खलन अशा नैसर्गिक आपत्तीमुळे समाजाचे मोठे नुकसान होते. आधुनिक काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण व पर्यावरणीय असमतोल यामुळे या आपत्तींचे प्रमाण अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थानाशी संबंधित उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.आपत्ती व्यवस्थापन म्हणजे आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीची तीव्रता कमी करणे, आपत्तीच्या वेळी तात्काळ मदत करणे व आपत्तीनंतर पुनर्वसनाची कामे करणे, यांचा एकत्रित विचार होय. यामध्ये प्रतिबंध, पूर्वतयारी, प्रतिसाद व पुनर्वसन या चार टप्प्यांचा समावेश होतो.

आपत्ती व्यवस्थापनावरील उपाययोजना :

i) पूर्वतयारी (Preparedness)

- शालेय व सामाजिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे.
- आपत्तीबाबत जनजागृती करणे.
- आपत्कालीन साधनसामग्री व बचाव पथके तयार ठेवणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

ii) प्रतिबंधात्मक उपाय (Prevention)

- पूर टाळण्यासाठी नदी व नाले स्वच्छ ठेवणे.
- वृक्षतोड टाळून पर्यावरण संवर्धन करणे.
- भूकंप प्रवण भागात भूकंपरोधी बांधकाम करणे.

iii) प्रतिसाद (Response)

- आपत्तीच्या वेळी तात्काळ बचाव कार्य करणे.
- आपत्कालीन संपर्क जाळे मजबूत करणे.
- जखमींना प्रथमोपचार व वैद्यकीय मदत पुरवणे.

iv) पुनर्वसन (Rehabilitation)

- विस्थापितांना सुरक्षित निवारा, अन्न व औषधे उपलब्ध करून देणे.
- नुकसानग्रस्त क्षेत्रांचे पुनर्निर्माण करणे.
- पीडितांना आर्थिक मदत व मानसिक आधार देणे.

भौगोलिक स्थानाशी निगडित उपाययोजना :

i) भूकंप प्रवण क्षेत्र

- भूकंपरोधी इमारती व पायाभूत सुविधा उभारणे.
- भूकंपमापन केंद्रे स्थापन करणे.

ii) पूर प्रवण क्षेत्र

- धरणे व बंधारे उभारणे.
- पावसाचे पाणी साठवणूक करून जलव्यवस्थापन करणे.

iii) दुष्काळ प्रवण क्षेत्र

- पाणलोट विकास व जलसंधारण प्रकल्प राबवणे.
- ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करणे.

iv) चक्रीवादळ प्रवण किनारी भाग

- सुरक्षित निवारा केंद्रे व मजबूत घरे बांधणे.
- हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार स्थलांतराची व्यवस्था करणे.

v) भूस्खलन प्रवण डोंगराळ भाग

- झाडांची तोड थांबवून वनसंपदा वाढवणे.
- उतारांवर टेरेसिंग व मजबुतीकरण करणे.

निष्कर्ष :

आपत्ती व्यवस्थापन व भौगोलिक स्थान हे परस्परांशी घट्ट निगडित घटक आहेत. कोणत्याही प्रदेशातील आपत्तींचा स्वरूप व तीव्रता ही त्या प्रदेशाच्या भौगोलिक स्थितीवर अवलंबून असते. भूकंपप्रवण क्षेत्रे, पूरप्रवण नदीखोरे, समुद्रकिनारी वसलेली गावे, डोंगराळ प्रदेश, दुष्काळी भाग या ठिकाणी नैसर्गिक आपत्तींचा धोका अधिक असतो. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन करताना स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून पूर्वतयारी, जनजागृती व योग्य उपाययोजना करणे आवश्यक ठरते.

भौगोलिक माहिती प्रणाली (GIS), नकाशे, हवामान अंदाज, उपग्रह तंत्रज्ञान यांचा वापर करून आपत्ती पूर्वसूचना व नियोजन अधिक प्रभावी करता येते. आपत्ती निवारणासाठी शासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिक यांचे समन्वित प्रयत्न अत्यावश्यक आहेत.

म्हणूनच असे म्हणता येईल की, भौगोलिक स्थान लक्षात घेऊन केलेले शास्त्रशुद्ध आपत्ती व्यवस्थापन हेच शाश्वत विकास, मानवी सुरक्षिता आणि पर्यावरण संरक्षणासाठी सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे.आपत्ती ही पूर्णतः टाळता येत नाही, परंतु योग्य उपाययोजना व व्यवस्थापनाद्वारे तिचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात कमी करता येतात. भौगोलिक स्थानाचा अभ्यास करून त्यानुसार उपाययोजना

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

राबविणे ही आजची गरज आहे. शासन, स्थानिक संस्था व नागरिक यांच्या संयुक्त सहभागातूनच “आपत्तीमुक्त आणि सुरक्षित समाज” घडविता येईल.

संदर्भ :

1) https.//sthairya.com/disaster-management-need-of-time/
2) https://cdnbbsr.s3waas.gov.in.
3) http://www.esakal.com.
4) http://indiabudget.nic.in

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

एकनाथी भागवतातील समता

केतकी मराठे वझे
शणै गोंयबाब भाशा व साहित्य महाशाळा, गोवा विद्यापीठ
Email: ketakimarathe64@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170904
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 17-21
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय संतसाहित्यातील एकनाथी भागवत हे संत एकनाथांचे अद्वितीय वाङ्मयीन योगदान आहे. या ग्रंथात त्यांनी भागवत पुराणातील एकादशस्कंधावर आधारित भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि समतेचा सशक्त संदेश दिला आहे. एकनाथ महाराजांनी मराठी भाषेतून भागवताचे भाष्य करून समाजातील सर्व घटकांसाठी आध्यात्मिक विचार सुलभ केले. त्यांच्या एकनाथी भागवतात भाषिक, जातीय, धार्मिक, आणि सामाजिक भेदाभेदांवर प्रखर प्रहार करत सर्वांमध्ये असलेल्या दैवी एकत्वाची जाणीव करून दिली आहे. त्यांनी समता, एकात्मता आणि सार्वभौमत्व या मूल्यांना अधोरेखित करत 'सर्वांभूती ईश्वर' या तत्त्वज्ञानाची स्थापना केली. त्यांच्या शिकवणीमधून समाजोद्धार, सहिष्णुता, आणि मानवतेचा खरा अर्थ स्पष्ट होतो. एकनाथ महाराजांनी सांगितलेली समतेची संकल्पना आजच्या सामाजिक आणि जागतिक परिस्थितीतही तितकीच प्रासंगिक आणि प्रेरणादायी ठरते.

मुख्यशब्द: *एकनाथी भागवत, संत एकनाथ, समता, एकात्मता, भक्तीमार्ग, वारकरी संप्रदाय, मानवता, आध्यात्मिकता, समाजोद्धार, सार्वभौमत्व.*

प्रस्तावना

उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणाम् ।
वर्ष तद् भारतं नाम भारती यत्र सन्ततिः ।।१।। (२.३.१)

वरील श्लोकाचा अर्थ असा आहे, समुद्राच्या उत्तरेला तर हिमालयाच्या दक्षिणेला जो देश आहे त्याला भारत असे म्हटले जाते, तर या भूभागावर राहणाऱ्या नागरिकांना भारतीय असे संबोधले जाते. हा श्लोक विष्णू पुराणातील द्वितीय स्कंधातील, तीसऱ्या अध्यायातील, पहिलाच श्लोक आहे. अशा या भारत देशाचा पाया हा अध्यात्म, तत्वज्ञान, शौर्य यासारख्या मुल्यांच्या आधारावर आजतागायत टिकून आहे. अनेकतेतून एकता दर्शविणारा हा भूप्रदेश आहे. अशा या भूप्रदेशात मानवीमूल्ये ही संस्काररूपाने अगदी खोलवर रूजलेली आपल्याला पहावयास मिळतात. विविध धर्म, जाती, संस्कृती, प्रथा, परंपरा, भाषा, अन्न, पेहराव अशा विविधतेने नटलेला असूनही आजही यामधील समता अबाधित आहे. भारतावर झालेली आक्रमणे, आलेल्या राजवटी आणि सध्याच्या काळातील आतंकवाद असेल या सर्वांना पूरूनउरतही अबाधित आहे, शाश्वत आहे ती म्हणजे भारतीयांमधील समता, एकात्मता.

शांतता, समता, बंधूता या मूलमंत्राचा महात्मा गांधीजींनी प्रसार केला असाल तरिही ही मूल्ये भारतीय जीवनशैलीचा, अविभाज्य भाग होतीच. भारतीय आध्यात्मामधून ही एकात्मतेची, समतेची बीजे रोवलेली होतीच आणि या बीजांची पाळेमुळे प्रत्येक भारतीयाच्या मनात खोलवर रूजलेली आहेत. या मुल्यांची रूजवण करण्यासाठी माध्यम ठरली ती म्हणजे आपली पुराणे. या पुराणांमधून द्वैत ते अद्वैताचा प्रवास हा समतेचा, एकात्मतेचा आहे असे म्हट्ल्यास वावगे ठरणार नाही. वैदिक काळात ही पुराणे संस्कृत भाषेत उपलब्ध होती. त्या पुराणांतील हे ज्ञान भारतवर्षातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे यासाठी विविध भागातील संतांनी, पंडितांनी भारतीतील विविध प्रदेशातील प्रादेशिक भाषांमध्ये यांवर टीका रचल्या आणि हे

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
केतकी मराठे वझे, शणै गोंयबाब भाशा व साहित्य महाशाळा, गोवा विद्यापीठ

How to cite this article:
वझे, . केतकी . मराठे . (2025). एकनाथी भागवतातील समता. Journal of Research & Development, 17(9(IV)), 17–21. https://doi.org/10.5281/zenodo.17708211

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17708211
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले. पुढील शोधनिबंधामधून संतकवी एकनाथ यांनी रचलेल्या एकनाथी भागवतामधून समतेचा, एकात्मतेचा भाव कसा दिसून
येतो यावर विवेचन करण्यात येणार आहे.

विषय प्रवेश

संतकृपा झाली। इमारत फळा आली।
ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिले देवालया।
नामा तयाच किंकर। तेणे केला हा विस्तार।
जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।
तुका झालासे कळस ।भजन करा सावकाश।
बहिणा फडकती ध्वजा। निरूपण केले बोजा।।

हा संत बहिणाबाईंचा अभंग, भागवत संप्रदायातील संतांच्या साहित्यिक योगदानाचे वर्णन करणारा आहे. यामध्ये संत बहिणाबाई म्हणतात त्याप्रमाणे संत एकनाथांनी एकनाथी भागवताच्या रूपाने या वारकरी संप्रदायाच्या इमारतीला मानवी मूल्ये, तत्त्वज्ञान, आध्यात्माची जोड असलेला भक्कम असा खांब दिला आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथादी संतांनी पुराणे, उपपुराणे, रामायण, महाभारतासारख्या महाकाव्यातील जीवन विषयक तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना समजावे यासाठी मराठी भाषेच्या आधारे, विविध टीकांची निर्मिती केली आणि भारतीय जीवनविषयक तत्त्वज्ञानाशी सर्वसामान्यांची ओळख करून देली. याच अनुषंगाने एकनाथांच्या एकनाथी भागताचेही योगदान फार महत्त्वाचे आहे. श्रीमद् भागत पुराण या मूळ संस्कृत भाषेतील पुराणातील एकादशस्कंधावर एकनाथ महाराजांनी मराठी भाषेमधून ३१ अध्यायांची ओवीबद्ध टीका लिहीली आहे. भागवत पुराणातील एकादश स्कंधातील श्लोकांची संख्या १४६७ येवढी असून त्यावर एकनाथांनी मराठी भाषेमधून१८,७९८ येवढी श्लोक संख्या असलेली ओवीबद्द टीका निर्माण केली आणि तत्कालीन समाजातील रंजलेल्या, गांजलेल्यांना जीवनविषयक दृष्टिकोन दिला.

एकनाथांनी त्यांच्या एकनाथी भागवतातून एकात्मता भाव पदोपदी दर्शविला आहे. या शोधनिबंधात समता असा विषय मांडत असताना एकात्मता आणि समता या दोन्हीही शब्दांचा शब्दशः अर्थ पाहता एकात्मता म्हणजे-एकी, तादात्म्य असा अर्थ वा.गो. आपटे यांच्या विस्तारित शब्दरत्नाकर या शब्दकोशात आढळतो, तसेच याच कोशात समता या शब्दाचा अर्थ सारखेपणा, एकरूपता, बरोबरी असा नोंदविण्यात आला आहे. वा.गो आपटे यांच्या शब्दरत्नाकर या शब्दकोशात देण्यात आलेल्या समता आणि एकात्मता या दोनही शब्दांचे अर्थ पाहता या शब्दांमध्ये वेगळेपणा जाणवत नाही आणि म्हणूनच या शोधनिबंधातील एकनाथी भागवतातील समता म्हणजेच एकात्मता या अर्थाने घेण्यात आला आहे.

भागवत पुराणातील एकादशस्कंधावर मराठी भाषेमध्ये एकनाथांनी टीका रचली, तीच टीका म्हणजे एकनाथी भागवत. 'एकनाथी भागवत' हा वारकरी संप्रदायात एक आधारभूत ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाची रचना इ.स १५७० ते इ.स. १५७३ या काळात झाली. एकतीस अध्यायात विभागण्यात आलेल्या ग्रंथात सर्वांभूती समानता आणि भागवत् भाव हेच खरे सार आहे. एकनाथांनी भक्तीच्या माध्यमातून परमार्थाची प्राप्ती करून आपल्या गुरूंच्या आदेशावरून या ग्रथांची निर्मिती केली आहे. एकनाथांनी पैठण येथे असताना या ग्रंथाचे पाच अध्याय लिहीले. भागवत ग्रंथाचा हा प्राकृत अवतार पाहून काशी क्षेत्रातील पंडितांना राग आला आणि त्यानी एकनाथांना काशीक्षेत्री बोलाविले आणि तिथेच एकनाथांनी मणिकर्णिकेच्या घाटावर ३१ अध्यायांची ही मराठी भाषेतील टीका पूर्ण केली. ही टीका पूर्ण झाल्यावर काशी क्षेत्रातील ज्ञातींसमोर मांडली गेली, त्याचे प्रखर असे परिक्षण झाल्यावर काशीतील सर्व विद्वानांनी त्याला पसंती दर्शविली आणि या ग्रंथाची पालखीमधून मिरवणूक काढण्यात आली असेही संदर्भ आढळतात. मूळ भागवतावरील श्रधरी टीकेच्या आधारे एकनाथांनी या टीकेची रचना केली.

एकनाथांनी भागवतावर टीका लिहिण्यास प्रारंभ केला त्यावेळी मराठी भाषेतून भागवतावर टीका लिहीली जात असल्यामुळे त्याला संस्कृत विद्वानांनी प्रखर निषेध केला अशावेळी एकनाथांनी म्हटले की "संस्कृत वाणी देवें केली। तरी प्राकृत काय चोरापासोनी जाली?" असा परखड सवाल एकनाथांनी संस्कृत ज्ञातींना विचारला होता. या प्रश्नामधूनच एकनाथांनी सर्वच भाषांना समान आदर असला पाहीजे असा सूर दर्शविला आहे. त्यांच्या या विधानावरून संस्कृत भाषेच्या श्रेष्ठत्त्वाचा बाळगलेला अहंकार आणि मराठी भाषेला कमी लेखणाऱ्या पंडितांच्या गैरसमजावर त्यांनी प्रखर टीका केली. सर्वसामान्यांच्या भाषेतून संस्कृत भाषेतील ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचावेयासाठी एकनाथ महाराजांनी प्राकृतभाषेत रचना करण्यास सुरूवात केली. एकूणच एकनाथांनी या विधानाच्या माध्यमातून भाषेसंबंधीची एकात्मता, समता दृष्टीस येते.

भागवत पुराणाच्या एकादशस्कंधावर मराठीमध्ये मोजक्याच कवींनी मराठीमध्ये टीका लिहिल्या आहेत. यात एकादशस्कंधावर आधारित सर्वात प्राचीन टीका ही 'कवीश्वर भास्करभट्ट बोरीकर' यांची असून ती इ.सनाच्या तेराव्या शतकातील आहे. कालानुसार दुसरी टीका ही 'एकनाथांची' आहे ज्याचा काळ शालिवाहन शक १४९५ आहे. त्यानंतर तीसरी टीका 'शिवनाथ स्वामी' यांची शके १५५४ ते १६११ मधील आहे. चौथी टीका 'सिद्ध कवी' यांची असून तिचा काळ शके १६९६ हा आहे. पाचवी एकादशस्कंधावरी टीका ही १७०० ते १८१० या काळातील असून त्याची निर्मिती 'ज्योतीपंत महाभागवत' यांनी केली आहे. या नंतर 'मयूरपंडित' म्हणजेच मोरोपंत यांनी संपूर्ण भागवताचा मंत्रभागवत या ग्रंथात अनुवाद केला आहे आणि हा काळ म्हणजे शके १७०३ ते

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

१७०७ मंत्रभागवत या ग्रंथात मोरोपंतांनी एकादशस्कंधावर ६४९ आर्या लिहिलेल्या आहेत. या सर्व टीका पाहता एकनाथांची 'एकनाथी भागवत' ही एकादशस्कंधावरील ही एकमेव स्वतंत्र व स्वयंपूर्ण टीका आहे असे म्हणणेच योग्य ठरेल.

एकनाथांनी भागवताच्या एकादशस्कंधावर आधारित एकनाथी भागवत या ग्रंथाच्या आरंभी गणपती, सरस्वती, श्रीकृष्ण, दत्तात्रेय, गुरू जनार्दनस्वामी, ज्ञानदेवादी संत, व्यास, वाल्मिकी, शंकराचार्य, भानुदास यांना वंदन करून श्रीकृष्ण व उद्धव या गुरूशिष्यांमध्ये झालेली मंत्रोपदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी या टीकेची निर्मिती केली. या टीकेमध्ये भक्ती, ज्ञान, वैराग्य, सत्संग, सच्चरित्र, गुरूसेवा यांच्या बरोबरीनेच सृष्टीची निर्मिती, प्रलय, मानवी व्यवहार इत्यादींने निरूपण एकनाथांनी सर्वसामान्यांच्या भाषेत केले आहे. कर्मयोगाबद्दल त्यांनी भाष्य केले आहेच परंतु एकनाथ महाराजांचा कल हा भक्तीमार्गावर स्थिरावलेला दिसून येतो. संत एकनाथ त्यांच्या आध्यात्मिक प्रवासात अद्वैताच्या पातळीवर पोहोचले होते तसेच त्यांना निर्गुणाचा ध्यास लागला होता, असे असतानाही आध्यात्माच्या नावाखाली कर्मकांड, अंधश्रद्धा यांच्या जंजाळात अडकलेल्या सर्वसामान्यांना जागृत करण्यासाठी सगुणोपासनेचा पुरस्कारही एकनाथ महाराज करताना आढळतात. एकनाथी भागवताच्या माध्यमातून प्रपंचात राहूनही परमार्थ साध्य करता येतो हेही त्यांनी सिद्ध केले आहे. भक्ती हाच खरा ज्ञानाचा व उद्धाराचा मार्ग आहे त्याच प्रमाणे या टीकेतील अध्यायांमधून विविध दृष्टांतांच्या माध्यमातून सर्वांभूती इश्वर हे तत्वज्ञान मांडत असताना समाजातील भेदाभेद, असमानता यांच्यावर भाष्य करत समतेचा आणि एकात्मतेचा पुरस्कार केला आहे. पुढील काही उदाहरणांच्या माध्यमातून एकनाथी भागवतामधून समतेचा संदेश देणाऱ्या काही ओव्यांचा विचार करण्यात आला आहे. या टीकेच्या पहिल्या अध्यायाची सुरूवात ही भाषेविषयी असलेल्या विषमतेसंबंधी टीका करण्यातलआहे. ते असे म्हणताता,

संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी। मा प्राकृतीं काय उणीवी।
नवीं, जुनीं म्हणावी। केसेनि केवीं सुवर्णसूमने।। १२३।।
त्याच प्रमाणे
जें पाविजे संस्कृत अर्थें। तेचि लाभे प्राकृतें।
तरी न मनावया येथें। विषमचि ते कायी।।१२५।।

संस्कृत भाषेमधून जे समजते, तेंच मराठी भाषेनेही कळते मग ही मराठी भाषा न मानण्याजोगी अडचण काय आहे असाही सवाल एकनाथ महाराजांनी काशीतील ज्ञातींना विचारला आहे. ह्या ओव्या आजही तेवढ्याच समर्पक वाटतात. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात विविध प्रांतांमध्ये विविध भाषा बोलल्या जाताता. प्रत्येक भाषेचे असे एक सौंदर्य आहे, तीचे असे महत्त्व आहे. भाषिक वादापेक्षा भाव हा केंद्रस्थानी असणे अपेक्षित आहे असा विचार या ओवीमधून उद्धृत होतो.

श्रीमद् भागवत पुराणाचे वाचन, श्रवण ही केवळ समाजातील विशिष्ट लोकांपुरतेच मर्यादित नाही देवाच्या मुखावाटे आलेला संदेश हा सर्वांसाठी आहे त्यामुळे केवळ संस्कृतच नव्हे तर शक्य तेवढ्या मानवी भाषांमधून हे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचले जावे हाच एकनाथ महाराजांचा समतेच्या संदर्भात दृष्टीकोन असलेला दिसून येतो. एकनाथी भागवतामधून एकात्मतेचा संदेश देताना एकनाथ महाराज म्हणताता की स्वतःमधील मीपणा जेव्हा गळून पडेल आणि आपण स्वतःच्याही पलिकडे जाऊन विचार करायला लागू तेव्हाच एकात्मतेचा भाव अंगिकारता येतो. जातीभेद, लिंगभेद, प्रांतभेद जाऊन आत्मभान जागृत झाले तरच समता हे मूल्य मानवीजीवनात रूजते असे तत्वज्ञान देणाऱ्या ओव्या पुढीलप्रमाणे आहे.

'रसना' जें जें काही चाखें। ते ते तुझेनि स्वादमुखे।
बुद्धी जाणपणे तोखे। तेही अतिनिकें वेदकत्त्व तुझे।।८।।
मन मनपणे अतिचपळ। तेंही तुझेंचि अंगिकबळ।
विवका विवेकु प्रबळ। अतिसोज्वळ तुझेनि।।९।।
वाचा जें जें काही वदे। तें वाचिकत्त्व तुझेनि शब्दें।
बोधु जेणें उद्बोधे। तो तुझेनि प्रबोधें प्रबोधु।।१०।।
जागृती जागे तुझेनि हरिखें। स्वप्न स्वप्ना तुझेनि देखे
सुषुप्ती सुखाने जेणें सुखें। पुर्ण संतोखे तुझेनि।।११।।

चौथ्या अध्यायाच्या या वरील ओवींमध्ये एकनाथ महाराज आत्मभानाच्या अनुभूति विषयी बोलतात तर याच अध्यायाच्या सोळाव्या ओवीत एकनाथ महाराज म्हणतात,

एका एकू जनार्दनीं। की जनार्दनु एकपणीं।
इथे पृथकें नामांची लेणीं। लेऊनि एकपणी मिरविसी तूं।।१६।।

आधिच्या काही ओव्यांमधून आत्मभानाविषयी सांगताना एकनाथ महाराज एकात्मतेकडे वळताना दिसतात.याच अध्यायाच्या सोळाव्या ओवीत त्यांनी अद्वैतवाद स्पष्ट केला शोधनिबंधाच्या अनुषंगाने या ओविचा विचार केल्यास समानता एकात्मता यांचा विचार करता स्वतःच्या देशात आपण वावरत असताना जात, धर्म यांची आवरणे घेऊन वावरतो, मात्र परदेशात जेव्हा जातो तेव्हा ही सारी वलये दूर सरून जातात आणि राहते ते भारतीयत्व आणि जेव्हा आपण वैश्विक स्थरावर विचार करतो तेव्हा हे सर्वच दूर सरून जाते आणि राहते ती मानवता आणि हा गुणधर्म एकात्मतेचेच द्योतक आहे.

मानवी मूल्ये आणि अध्यात्म यांची सांगड घालण्यासाठी एकनाथांनी एकनाथी भागवतामध्ये विविध दृष्टांतांचा आधार घेतला आहे. हे दृष्टांत सांगताना एकनाथांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे दिलेली आहेत. ही उदाहरणे केवळ एकनाथांच्याच काळाला समर्पक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

नाहीत तर ती कालातीत अशी आहेत. ईश्वर हा सर्वांठाई आहे, ईश्वर जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेले तत्वज्ञान हे भेदाभेदाच्याही पलिकडील आहे, आणि याचे उत्तम उदाहरण पुढील ओवीमधून दिसून येते.

पव्हणियाहूनि पायऊतारा। भागवतमार्ग अतिरोपटा।
तो मार्ग दावावया पुरा। हांकारी स्त्रीक्षुद्रां पंचाध्यायी।।६५।।

या ओवीमधून नामस्मरणाला, भगवंताला जाणून घेण्यासाठी कोणतेही बंधन लागू पडत नाही. जात, धर्म, पंथ, लिंग, प्रांत यांची कोणतीही बंधने आध्यात्मामध्ये लागू पडत नाही. भेदाभेद टाळून एकता, एकात्मता, समानता आशी विविध शब्दातून अभिप्रेत असलेला एकच सूर उमटतो तो म्हणजे सर्व समान आहेत, सर्व एक आहेत आणि सर्वांमध्ये भगवंताचा अंश आहे, अशा अनेक ओव्यांमधून एकनांथांनी आध्यात्माबरोबर एकात्मतेचाही संदेश या भागवतामधून दिला आहे. अशावेळी एकनाथ म्हणतात

मीतुपणेवीण सहजस्थिती। तुझी असो अभेद-भक्ती
हेंची मागणे पुढत पुढती । संताप्रती सर्वदा।।

एकनाथी भागवताचा अभ्यास करत असताना असे जाणवते की संत एकनाथांची भागवत धर्मासंबंधीची संकल्पना ही समाजोपकारक होती. आध्यात्माच्या आणि सर्वांभूती इश्वर या भागवद् भावाच्या पायावर जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद, प्रांतभेद, भाषाभेद याला विरोध करत समतेचा पुरस्कार एकनाथांनी केलेला दिसून येतो. समाजातील दुर्गुण, दुष्टपणा, दंभ, ढोंग, विषमता, स्वार्थ, द्वेष, मत्सर इत्यादी रिपूंवर एकनाथांनी कडक टीका करून, जाती, वर्ण, विद्या निर्विशेष मानवी समता आणि सहृदयता इत्यादी समाजिक गुणांचाही त्यांनी पुरस्कार केला. भागवत धर्म आणि वारकरी संप्रदाय यांचे कार्य हे समाजपराङ्मुख नसून समाजोद्धाराचे आहे हेही त्यांच्या एकनाथी भागवत या ग्रंथामधून दिसून येते. त्यामुळे त्यांचे एकनाथी भागवत असो वा त्याच्या इतर साहित्यनिर्मिती असो त्यांचे हे कार्य हे समाजोद्धारासाठीच होते. "एकनाथ महाराज हे महाराष्ट्रीतील उदारमतवादाचे व नेमस्त संप्रदायाचे जनक होत. त्यांचा जीवनक्रम म्हणजे समन्वयवादाचा एक उत्कृष्ट आदर्श आहे" असे विधान प्रा. दमोदर कुलकर्णी यांनी त्याच्या 'एकनाथी भागवताचा विवेचक अभ्यास' या प्रबंधात मांडले आहे. एकनाथी भागवताचा अभ्यास करत असताना आणि त्यातील विविध दृष्टांतांचे वाचन करत असताना असे जाणवते ती एकनाथ महाराजांची वर्णाश्रमधर्मा विषयी आस्था होती परंतू माणसा माणसातील विषमतेचा त्यांनी पूर्णपणे निषेध केला आहे. माणसाने त्याला दिलेले कर्म हे चोख करावे अशी त्याची धारणा होती हे एकनाथांच्या भागवतातमध्ये अनेक प्रसंगांमधून दिसून येते. माणूस हा समाजशील प्राणी आहे, त्याचे समाजला देणे लागते, त्यामुळे समाजोद्धारासाठी त्याने योगदान दिलेच पाहिजे असे नाथांचे मत होते या संबंधी त्यांनी दिलेले उदाहरण म्हणजे, शरीराच्या हिताच्या दृष्टीने सर्वच अवयव महत्त्वाचे सारखेच असतात कोणताही एखादा अवयव निकामी झाल्यास कोणत्याही कार्याची गती मंदावते त्याच प्रमाणे माणसाने त्याला दिलेले कार्य उत्तमप्रतीने बजावले पाहिजे तरच समाज उत्तम होतो, सुदृढ होतो. समाज अस म्हणत असताना आपल्या देशाच्या बाबतीतही हाच निकष लागू पडतो देशाचा नागरिक म्हणून येणाऱ्या जबाबदाऱ्या या प्रत्येकाने जबाबदारीने पार पाडल्या तरच देश, समाज प्रगती करू शकेल. भागवतावर केलेल्या टीकेमधून जो उपदेश केला आहे त्यामधून कोणत्याही प्रकारची निरसता दिसून येते नाही तर त्यामध्ये उत्कटता दिसून येते.

भारतीय समाजात आज वर्णव्यवस्था कालबह्य होत चालली आहे तरिही वर्गव्यवस्था उदयाला येऊ लागली आहे. एकाबाजूला समानतेचा घोष होत असतानाही व्यावहारिक जगात मात्र अजूनही विषमता पहावयास मिळते. एकनाथ महाराजांनी सांगितलेल्या सर्वांभूती इश्वर हे तत्वज्ञान हे केवळ एका विशिष्ट काळापुरतेच मर्यादित नव्हेत तर ते आताही तेवढेच समर्पक आहे. आजच्या घडीला आवश्यकता आहे ती म्हणजे भावनिक समतेची, प्रेमाची, सहकार्याची याच गोष्टी आजच्या काळात दुर्मिळ होत चालल्या आहेत. एकनाथ महाराजांनी सांगितलेल्या टीकेत त्यांना अपेक्षीत असलेल्या समानतेमध्ये निम्नस्थरावर वर आणणे असे अभिप्रेत आहे, मात्र सध्याच्या समाजात मात्र वर सरलेल्याचे पाय खेचण्याची वृत्ती बळावत चालली आहे. एकाअर्थी एकनाथी भागवत दिसून येणारी समानता, एकात्मता ही आजच्या समाजाच्या उद्धारासाठीच आहे असे मला वाटते. भाषिक भेदा विषयी एकनाथा महाराजांनी त्यांच्या काळात भाष्य केले असले तरिही आपण आजही या भाषिक संघर्षाचे साक्षिदार आहोत, त्यामुळे इ.स १५व्या शतकापुरतेच ही टीका मर्यादित राहत नाही तर त्याची प्रस्तुता आजही जाणवतेच.

एकनाथी भागवत हा ग्रंथ म्हणजे संतसाहित्यातील एक महत्त्वाचे वाङ्मयीन कार्य आहे. ज्ञानेश्वरी प्रमाणेच एकनाथी भागवत या ग्रंथानेही भेदाभेदाच्या सर्व रेषा पुसून टाकत त्रिकालबाधीत असे जे तत्वज्ञान होते हे सर्वांपर्यंत पोहचवातच समतेचे बीज रोवले आहे. एकनाथांनी भागवत ग्रंथावर मराठी भाषेत टीका रचूनच समता, एकात्मता, ही मानवी मूल्ये अध्यात्माच्या आधारे सर्वसामान्यांच्या मनात रूजवली आहेत.

समारोप

संत एकनाथांनी एकनाथी भागवतातून समता, एकात्मता आणि सार्वभौमत्त्वाचा सशक्त पुरस्कार केला आहे. भाषेतील भेद, जातीधर्मातील विषमता लिंगभेद यांवर प्रहार करूव सर्वांमध्ये दडलेल्या दैवी अंशाची जाणीव करून दिली. भक्तीमार्ग हाच खऱ्या ज्ञानाता व उद्धाराचा मार्ग असल्याचे सांगून, प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालणारी ही टीका सर्वसमान्यांसाठी जीवन मार्गदर्शक ठरली. एकनाथांचे हे विचार आजही तेवढेत कालसुसंगत वाटतात. जागतिक पातळीवर उद्भवणाऱ्या, धर्मांधता, असमानता, भेदाभेद

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

यांच्या समस्यांसमोर एकनाथांचे *'समतेचे तत्वज्ञान'* हेच खरे उपाय आहे. म्हणूनच, *एकनाथी भागवत* हा ग्रंथ केवळ वारकरी संप्रदायापुरता मर्यादित न राहता सर्व मानवजातीसाठी मार्गदर्शक ठरतो.

संदर्भग्रंथ सूची

1. पणशीकर, वासूदेव लक्ष्मणशास्त्री. निर्णयसागर छापखाना, मुंबई, १९२५.
2. आपटो, वा.गो. विस्तारित शब्दारत्नाकर. वरदा प्रकाशन.
3. कुलकर्णी, दमोदर. एकनाथी भागवताचा विवेचक अभ्यास. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८१.
4. खानोलकर,गंगाधर, मराठी वाङ्मयकोश, खंड-१.महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७७.
5. तुळपुळे, शं.गो. पाच संतकवि, पुणे,१९६२.
6. फाटक, न.र. श्री एकनाथः वाङ्मय आणि कार्य, मुंबई, १९५०.
7. एकनाथी भागवत - एकनाथी भागवत - sant sahitya - charitra mahiti abhang gatha granth rachana - संत एकनाथ - eknathi bhagwat

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार आणि सोशल मीडिया : आव्हाने व उपाययोजना

डॉ. अरूण पेंटावार
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख
सुंदरराव सोळके महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड.
Email: arunpentawar@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170905
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 22-29
Sept. 2025

सारांश

सोशल मीडिया हे आजच्या युगातील अभिव्यक्ती, संवाद व माहितीचे प्रभावी व्यासपीठ आहे. भारतीय राज्यघटनेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य)अनु. १९(१)(अ)), गोपनीयतेचा अधिकार (अनु. २१), समानतेचा अधिकार (अनु. १४, १५) आणि माहितीचा अधिकार या मूलभूत अधिकारांशी सोशल मीडियाचा त्याचा थेट संबंध आहे. मात्र, खोटी माहिती, द्वेषयुक्त भाषण, सायबर गुन्हेगारी, गोपनीयतेचा भंग आणि सरकारी नियंत्रण ही प्रमुख आव्हाने आहेत. यावर उपाय म्हणून नागरिकांची डिजिटल साक्षरता, प्रभावी कायदेशीर चौकट, डेटा संरक्षण आणि जबाबदार नागरिकत्व आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे सोशल मीडिया हे लोकशाही व मूलभूत अधिकार बळकट करणारे साधन आहे, परंतु त्याचा संतुलित वापरानेच सोशल मीडिया लोकशाही व मूलभूत अधिकारांना बळकटी देऊ शकते.

मुख्यशब्द: सोशल मीडिया, मूलभूत अधिकार, भारतीय राज्यघटना.

Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

प्रस्तावना

२१ व्या शतकात माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे सोशल मीडियाचा प्रभाव मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. फेसबुक, एक्स (ट्विटर), इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सॲप यांसारखी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स ही केवळ संवादाची साधने न राहता, मतप्रदर्शन, जनजागृती, आणि सामाजिक चळवळींची प्रेरणा बनली आहेत. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य, गोपनीयतेचा हक्क, आणि माहितीचा अधिकार दिला आहे. मात्र, या अधिकारांचा वापर डिजिटल माध्यमांवर करताना नवीन समस्या व आव्हाने समोर येऊ लागली आहेत – जसे की फेक न्यूज, द्वेषपूर्ण भाषण, ऑनलाइन छळ, गोपनीयतेचा भंग, आणि सरकार किंवा कंपन्यांकडून सेन्सॉरशिप. या पार्श्वभूमीवर, सोशल मीडिया आणि मूलभूत अधिकार यांचा परस्पर संबंध समजून घेणे आवश्यक आहे. हे फक्त व्यक्तिस्वातंत्र्याचाच नव्हे तर लोकशाहीच्या आरोग्याचा आणि जबाबदारीने माहिती वापरण्याच्या संस्कृतीचा भाग आहे. यामुळे, या विषयाचा सखोल अभ्यास करणे आणि त्यावर जनजागृती करणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात सोशल मीडिया हे संवादाचं सर्वात प्रभावी साधन ठरलं आहे. फेसबुक, ट्विटर (एक्स), इन्स्टाग्राम, युट्युब यांसारख्या माध्यमांद्वारे व्यक्तीला स्वतःचे विचार मांडण्याची, माहिती मिळवण्याची आणि इतरांशी संवाद साधण्याची संधी मिळते. भारतीय राज्यघटना नागरिकांना काही मूलभूत अधिकार प्रदान करते. या अधिकारांचा सोशल मीडिया वापराशी थेट संबंध येतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. अरूण पेंटावार, सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख सुंदरराव सोळके महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड.

How to cite this article:
पेंटावार, . अरूण . (2025). भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार आणि सोशल मीडिया: आव्हाने व उपाययोजना. Journal of Research & Development, 17(9(IV)), 22–29.
https://doi.org/10.5281/zenodo.17708286

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17708286

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

अभिव्यक्ती स्वातंत्र्य, गोपनीयतेचा अधिकार, समानतेचा अधिकार आणि माहितीचा अधिकार या संदर्भात सोशल मीडिया महत्त्वपूर्ण ठरतो. २१ व्या शतकात सोशल मीडिया हे केवळ मनोरंजनाचे नाही, तर व्यक्त होण्याचे, विचार मांडण्याचे व माहिती मिळवण्याचे प्रभावी माध्यम बनले आहे. मात्र, या माध्यमाचा वापर करताना भारतीय नागरिकांचे मूलभूत अधिकार (Fundamental Rights) कसे सुरक्षित ठेवायचे, हे एक महत्त्वाचं आव्हान आहे. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून सोशल मीडिया आणि भारतीय राज्याघटनेतील मुलभूत अधिकार यातील परस्पर संबंध यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. सोशल मीडियामुळे व्यक्तीच्या मुलभूत अधिकारांपुढे निर्माण झालेली आव्हाने यावर चर्चा करून काही उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

शोधनिबंधाची उद्दिष्टे

1. सोशल मीडिया आणि भारतीय राज्याघटनेतील मुलभूत अधिकार यातील परस्पर संबंध अभ्यास करणे.
2. सोशल मिडीयामुळे निर्माण झालेल्या मुलभूत अधिकारापुढील आव्हानांचा अभ्यास करणे.
3. सोशल मिडीयामुळे निर्माण झालेल्या मुलभूत अधिकारापुढील आव्हानांवर उपाययोजना सुचविणे.

संशोधन पध्दती व स्त्रोत

प्रस्तुत शोधनिबंधलेखनासाठी निरीक्षण,विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. तथ्यसंकलनासाठी व्दितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून यात प्रामख्याने भारतीय संविधान, संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, मासिके, वर्तमान पत्रे व विविध वेबसाईटवरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

विषयाची व्याप्ती किंवा मर्यादा

आधुनिकीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या या युगामध्ये सोशल मीडिया चे महत्व वाढत आहे व तसेच या विषयाची व्याप्ती व अभ्यासक्षेत्र वाढत आहे. सोशल मीडियाच्या वाढत्या प्रसारामुळे नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर सकारात्मक आणि नकारात्मक प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे या विषयाचा विस्तार लक्षात घेता अभ्यासकाने फक्त सोशल मीडियाचा मुलभूत अधिकारांपुढे निर्माण झालेल्या आव्हानांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यात आलेला आहे.

संशोधन पूर्वसाहित्याचा आढावा

भारतात सोशल मीडिया हा अभिव्यक्ती, माहिती-प्रवाह आणि नागरी सहभागाचे प्रमुख व्यासपीठ बनला आहे. त्यामुळे भाग III मधील अधिकार—विशेषतः अभिव्यक्ती स्वातंत्र्य (Art. 19(1) (a)), जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्य/गोपनीयता (Art. 21), समानतेचा अधिकार (Art. 14)—यांच्या व्याप्तीचा डिजिटल संदर्भात सतत पुनर्विचार होतो. न्यायालयीन निर्णया-बरोबरच IT Act 2000, IT Rules 2021 (सुधारणा 2022/2023) आणि Digital Personal Data Protection Act, 2023 (DPDP) यांसारखी विधीमंडळीची चौकट या साहित्याचा मुख्य केंद्रबिंदू आहे.

IT Rules 2021 आणि (2022/2023 सुधारणा) ने मध्यस्थ (intermediaries)/सोशल मीडिया मध्यस्थांवर “due diligence”, grievance redressal, traceability (मोठ्या प्लॅटफॉर्मसाठी), फ्लॅगिंग-टेकडाउन यांसारख्या कर्तव्यांचा बोजा वाढवला. या नियमांविरोधातील विविध याचिका 2024 मध्ये Delhi HC कडे हस्तांतरित केल्या गेल्या; WhatsApp-Traceability वादात एंड-टू-एंड एनक्रिप्शन विरुद्ध “उत्पत्ती-शोध (first originator)” या संघर्षावर मोठे लेखन झाले आहे.

उपलब्ध संशोधन साहित्याच्या आढावावरून हे स्पष्ट होते की, भारतीय न्यायालये अभिव्यक्ती स्वातंत्र्य/ गोपनीयता / समावेशन यांना डिजिटल संदर्भात अर्थ देत नागरिकांसाठी अनेक निर्णय दिलेले आहेत. तर कार्यपालिका-विधिमंडळ ऑनलाइन हानी/भ्रामक माहिती/सुरक्षा यांसाठी कडक चौकट घडवू पाहत आहेत. पुढे नागरिकांच्या अधिकारांची पारदर्शकता, अनुपातबद्धता, डेटा-हक्कांची अंमलबजावणी, आणि एन्क्रिप्शन-सुसंगत नियमन या चार घटकांवर अधिक सखोल, डेटा-आधारित संशोधनाची गरज आहे.

सोशल मीडिया आणि भारतीय राज्याघटनेतील मुलभूत अधिकार यातील परस्पर संबंध

भारतीय राज्यघटना नागरिकांना काही मूलभूत अधिकार प्रदान करते. या अधिकारांचा थेट संबंध सोशल मीडियाशी येतो कारण सोशल मीडिया हे आजच्या युगातील संवाद, माहिती आणि अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम आहे.

१. अभिव्यक्ती स्वातंत्र्य (अनुच्छेद १९(१)(अ))

सोशल मीडिया प्रत्येकाला आपले विचार मुक्तपणे मांडण्याची संधी देते. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे प्रत्यक्ष व्यासपीठ आहे. मात्र, खोटी माहिती, द्वेषयुक्त भाषण यामुळे याच अधिकाराचा गैरवापरही होतो. *Shreya Singhal v. Union of India (2015)* या खटल्यात

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

न्यायालयाने ऑनलाइन अभिव्यक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. सोशल मीडियावर नागरिक आपले विचार, मत, टीका मोकळेपणाने मांडू शकतात. लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणून याची भूमिका वाढली आहे.

२. गोपनीयतेचा अधिकार (अनुच्छेद २१)

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती गोळा करतात. *K.S. Puttaswamy v. Union of India (2017)* या निकालानंतर गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत ठरला. त्यामुळे सोशल मीडिया कंपन्यांनी डेटा संरक्षणाच्या दृष्टीने जबाबदार भूमिका बजावणे आवश्यक आहे. सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर होत असल्याने डेटा गोपनीयता धोक्यात येते. सुप्रीम कोर्टाने 2017 मध्ये हा हक्क मूलभूत मानला आहे.

३. समानतेचा अधिकार (अनुच्छेद १४, १५)

सोशल मीडिया सर्वांना समान व्यासपीठ उपलब्ध करून देतो. परंतु जात, धर्म, लिंग या आधारावर होणारे ट्रोलिंग किंवा भेदभाव समानतेच्या अधिकाराला बाधक ठरतात.

४. माहितीचा अधिकार

सोशल मीडिया माहिती सहज उपलब्ध करून देतो. यामुळे लोकशाहीतील पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढते. परंतु चुकीची किंवा अपूर्ण माहिती लोकशाही प्रक्रियेवर विपरीत परिणाम करते. अनेक सरकारी व सार्वजनिक माहिती सोशल मीडियावर उपलब्ध होऊ लागली आहे. नागरिक अधिक सजग व जागरूक होत आहेत.

वरील प्रमाणे सोशल मीडिया आणि राज्यघटनेतील मूलभूत अधिकार यामध्ये थेट परस्पर संबंध आहे. सोशल मीडिया हे या अधिकारांना बळकटी देणारं प्रभावी साधन आहे, मात्र जबाबदार वापर, कायदेशीर चौकट आणि डिजिटल साक्षरता यांच्या साहाय्यानेच ते लोकशाहीच्या हितासाठी उपयुक्त ठरू शकते.

सोशल मिडीया आणि मुलभूत अधिकारापुढील आव्हाने

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मिडीया हे समाजजीवनाचा अविभाज्य भाग झाले आहे. संवाद, माहितीची देवाणघेवाण, लोकशाही प्रक्रियेत सहभाग, तसेच विचार मांडण्यासाठीचे मुक्त व्यासपीठ म्हणून त्याची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. नागरिकांना मुलभूत अधिकार म्हणून मिळालेली अभिव्यक्ती स्वातंत्र्य, गोपनीयतेचा हक्क, समानतेचा हक्क या हक्कांच्या अंमलबजावणीत सोशल मिडीयाचे स्थान अत्यंत प्रभावी आहे. मात्र, जिथे नागरिकांच्या हक्कांचे रक्षण अपेक्षित आहे, तिथेच सोशल मिडीयामुळे अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत.

खोटी माहिती (Fake News), द्वेषपूर्ण प्रचार)Hate Speech), गोपनीयतेचा भंग, सायबर गुन्हे, ऑनलाईन छळवणूक, निवडणुकांवर परिणाम करणारा डिजिटल प्रचार, तसेच अल्गोरिदमच्या माध्यमातून होणारा विचारांवर प्रभाव या कारणांमुळे सोशल मिडीया नागरिकांच्या मुलभूत अधिकारांपुढे गंभीर प्रश्न निर्माण करते. यामुळे सोशल मिडीयाचा लोकशाहीतील सकारात्मक उपयोग कसा करावा आणि त्याचवेळी नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण कसे करावे हा आजच्या काळातील एक मोठा विचारविषय आहे. त्यामुळेच "सोशल मिडीया आणि नागरिकांच्या मुलभूत अधिकारापुढील आव्हाने" या विषयाचे अभ्यास आणि विश्लेषण समाजशास्त्रीय, कायदेशीर आणि नैतिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरते.

१. सोशल मीडियातून फेक न्यूज आणि अफवा पसरविणे

आजच्या डिजिटल युगात माहिती हे सर्वात मोठे शस्त्र आहे. परंतु सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे फेक न्यूज (खोटी बातमी) आणि अफवा (अप्रमाणित माहिती) झपाट्याने पसरतात. यामुळे केवळ समाजात गोंधळ, दहशत आणि अविश्वास निर्माण होत नाही तर ते थेट संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन घडवते. फेक न्यूज म्हणजे हेतुपुरस्सर खोटी माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे होय तर अफवा म्हणजे ऐकीव, अप्रमाणित माहिती जी नकळत किंवा जाणूनबुजून पसरवली जाते. फेक न्यूज आणि अफवा या केवळ माहितीचा प्रश्न नाहीत, तर त्या थेट संविधानाने दिलेल्या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतात. विशेषत समता (कलम १४), अभिव्यक्ती स्वातंत्र्य (कलम १९), जीवन व स्वातंत्र्य (कलम २१) आणि गोपनीयता या अधिकारांसमोर खूप मोठे आव्हान निर्माण झाले आहे. फेक न्यूज आणि अफवा यामुळे नागरिकांच्या पुढील मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

१) अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर – कलम १९(१)(अ)

संविधानाने दिलेले विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाहीचे बळ आहे. पण त्याचा गैरवापर करून सोशल मिडीयावर जेव्हा खोटी माहिती पसरवली जाते, तेव्हा ते समाजात गोंधळ, द्वेष व हिंसा पसरवते. यामुळे नागरिकांच्या या अधिकारावर बंधनं येतात व खऱ्या अर्थाने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर परिणाम होतो.

२) समता अधिकाराचे उल्लंघन – कलम १४

सोशल मिडीयावर अनेकदा अफवा आणि फेक न्यूज बहुधा जात, धर्म, लिंग किंवा प्रांत यावर आधारित असतात. यामुळे नागरिकांच्या विशिष्ट गटावर अन्याय, भेदभाव, हिंसा घडते. उदा. एखाद्या धर्मावर खोटी माहिती पसरवून द्वेष निर्माण करणे.

३) जीवन व स्वातंत्र्याचा अधिकार – कलम २१

अफवा किंवा फेक न्यूज मुळे थेट व्यक्तींचे जीवन धोक्यात येऊ शकते. उदा. "फलाणा गावात दंगल होणार" अशा अफवेने दहशत पसरते. "फलाणा व्यक्ती मुलं पळवतो" अशा अफवेने लोकांचा जमाव मारकुटी करू शकतो. या गोष्टींमुळे जीवनाचा आणि सुरक्षिततेचा अधिकार धोक्यात येतो.

४) गोपनीयतेचा अधिकार)Right to Privacy)

सोशल मिडीयावर एखाद्या व्यक्तीविषयी खोटी माहिती, फोटो किंवा व्हिडिओ बनवून पसरवणे म्हणजे त्याच्या वैयक्तिक जीवनावर आघात करणे. यामुळे त्या व्यक्तीला मानहानी, मानसिक त्रास होतो.

५) बंधुता व एकात्मतेवर आघात – प्रस्तावना)Preamble)

भारतीय राज्याघटनेच्या प्रस्तावनेत बंधुता व ऐक्य टिकवण्याचा उल्लेख आहे. पण सोशल मीडियाद्वारे पसरविले जाणारे फेक न्यूज/अफवा या समाजात विभागणी, दंगे आणि तणाव वाढवतात, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

थोडक्यात, सोशल मिडीयावरील फेक न्यूज आणि अफवा यावर आधारित मजकूर यामुळे संविधानाने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतात. फेक न्यूज आणि अफवा या केवळ माहितीचे साधन नसून त्या लोकशाहीला आणि नागरिकांच्या अधिकारांना गंभीर धोका आहेत. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागरूक नागरिक, जबाबदार मीडिया, कठोर कायदे व डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. प्रत्येकाने माहिती तपासूनच पुढे पाठवावी, हीच खरी लोकशाहीस मदत ठरेल.

२. ट्रोलिंग आणि ऑनलाइन छळ याद्वारे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन

ट्रोलिंग (Trolling) म्हणजे सोशल मीडियावर एखाद्या व्यक्तीची थट्टा करणे, अपमानजनक टिप्पणी करणे किंवा उचकावणारे वक्तव्य करणे होय तर ऑनलाइन छळ (Online Harassment) म्हणजे व्यक्तीला सतत संदेश, धमक्या, अश्लील मजकूर, खोटे फोटो/व्हिडिओ पाठवणे किंवा त्याचा ऑनलाइन पाठलाग)Cyber Stalking) करणे होय. आजच्या काळात सोशल मीडिया हे अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन झाले आहे. प्रत्येक व्यक्तीला आपले विचार, मतं आणि अनुभव मांडण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. मात्र या स्वातंत्र्याचा गैरवापर करून काही लोक हेतुपुरस्सर ट्रोलिंग (उपहास, अपमानजनक कमेंट्स, बदनामी) आणि ऑनलाइन छळ (धमक्या, अपमानजनक संदेश, स्टॉकिंग) करतात. हे प्रकार केवळ मानसिक त्रास देत नाहीत तर थेट संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतात.

सोशल मीडियावर सतत ट्रोलिंग आणि ऑनलाइन छळ करणे यामुळे नागरिकांच्या पुढील मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते.

१. जीवन व स्वातंत्र्याचा अधिकार)कलम २१)

भारतीय राज्यघटनेतील कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाला सुरक्षित व सन्मानाने जगण्याचा हक्क आहे. परंतु अलीकडील काळात सोशल मीडियाद्वारे होणारे ट्रोलिंग आणि छळामुळे मानसिक ताण, नैराश्य, आत्महत्येपर्यंतची परिस्थिती निर्माण होत आहे.

२. गोपनीयतेचा अधिकार

सोशल मिडीयावर अनेकदा व्यक्तीची वैयक्तिक माहिती, फोटो किंवा व्हिडिओ परवानगीशिवाय पसरवले जातात. "सायबर स्टॉकिंग" मुळे व्यक्तीवर नजर ठेवण्यात येते त्यामुळे त्या व्यक्तीचे खाजगी जीवन धोक्यात येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

३. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर (कलम १९(१)(अ))

सोशल मीडियावर स्वातंत्र्याच्या नावाखाली अपमान, धमक्या व खोटे आरोप केले जातात. परिणामी इतर व्यक्ती भीतीपोटी आपले विचार व्यक्त करण्यास घाबरतात.

४. समता अधिकाराचे उल्लंघन (कलम १४)

विशेषतः महिला, LGBTQ+ व्यक्ती, अल्पसंख्याक समाज यांना जास्त प्रमाणात ऑनलाइन छळ सहन करावा लागतो. त्यामुळे भेदभाव वाढतो आणि समाजात असमानता निर्माण होते.

५. बंधुता व एकात्मतेवर आघात (प्रस्तावना)

ऑनलाइन छळ आणि ट्रोलिंगमुळे समाजात द्वेष, तिरस्कार आणि तणाव वाढतो, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

थोडक्यात, सोशल मीडियावर द्वेषयुक्त भाषण, ट्रोलिंग, धमक्या यामुळे महिलांचा, पत्रकारांचा, आणि अल्पसंख्यकांचा तसेच सर्वसाधारण नागरिकांचा छळ होतो. ट्रोलिंग आणि ऑनलाइन छळ हे केवळ वैयक्तिक अपमानापुरते मर्यादित नाहीत, तर ते लोकशाही, नागरिकांच्या सन्मान आणि मूलभूत अधिकारांवर थेट आघात करणारे प्रकार आहेत. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सोशल मीडियाचा वापर करणे, कायद्याचा आधार घेणे आणि इतरांच्या हक्कांचा आदर राखणे ही काळाची गरज आहे.

३. सेन्सॉरशिप आणि बंधने यामुळे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन

सेन्सॉरशिप म्हणजे शासन किंवा अधिकृत संस्था पुस्तके, चित्रपट, वृत्तपत्र, इंटरनेटवरील मजकूर, गाणी इ. तपासून काही भाग हटवणे किंवा पूर्णपणे रोखणे होय तर बंधने याचा अर्थ कायद्याच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या नावाखाली व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर घातलेल्या मर्यादा होय. भारतीय लोकशाहीत नागरिकांना संविधानाने अनेक मूलभूत अधिकार दिले आहेत. त्यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य (कलम १९(१) (अ)) हा लोकशाहीचा पाया मानला जातो. मात्र शासन किंवा इतर संस्था "सेन्सॉरशिप")Censorship) व "बंधने")Restrictions) लादून नागरिकांच्या अभिव्यक्तीवर मर्यादा घालतात. काही वेळा ही बंधने समाजहितासाठी आवश्यक असतात, परंतु अतिशय कडक सेन्सॉरशिपमुळे आणि अनावश्यक बंधनांमुळे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते.

१. **अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९(१)(अ))**

व्यक्तीचे विचार, लेखन, चित्रपट किंवा कलाकृती रोखल्यामुळे अभिव्यक्तीवर गदा येते. यामुळे लोकांना स्वतंत्रपणे विचार मांडता येत नाही. उदा. सरकारविरोधी विचार व्यक्त करणारे पत्रकार किंवा लेखकांना अडचणी येतात. इंटरनेटवरील काही वेबसाइट्स किंवा सोशल मीडिया पोस्ट्स पूर्णपणे हटवल्या जातात. हे अभिव्यक्तीच्या हक्कावर बंधने घालू शकते.

२. **माहिती मिळवण्याचा अधिकार (Right to Information)**

सेन्सॉरशिपमुळे नागरिकांपर्यंत खरी माहिती पोहोचत नाही. चुकीची किंवा अपूर्ण माहिती लोकशाही प्रक्रियेवर परिणाम करते.

३. **समता अधिकाराचे उल्लंघन (कलम १४)**

काही विशिष्ट गटांचे विचार किंवा कलाकृती रोखल्या जातात, तर इतरांना परवानगी मिळते. यामुळे भेदभाव निर्माण होतो. उदा. इंटरनेटवरील काही वेबसाइट्स किंवा सोशल मीडिया पोस्ट्स पूर्णपणे हटवल्या जातात.

४. **जीवन व स्वातंत्र्याचा अधिकार (कलम २१)**

नागरिकांना आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य हिरावले तर सुरक्षित आणि सन्मानाने जगण्याचा हक्क बाधित होतो.

५. **संस्कृती व कलात्मक स्वातंत्र्यावर गदा**

चित्रपट, साहित्य, नाटक यांच्यावर अनावश्यक सेन्सॉरशिप केल्यास कलावंतांच्या सर्जनशीलतेवर मर्यादा येतात. उदा. काही चित्रपट व नाटके धार्मिक भावना दुखावतात या कारणावरून बंद केली जातात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

लोकशाहीत सेन्सॉरशिप व बंधने सार्वजनिक शिस्त, राष्ट्रीय सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यासाठी आवश्यक आहेत. परंतु ती अत्यधिक व पक्षपाती पद्धतीने लागू केली गेल्यास अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि स्वाभिमान यांसारखे मूलभूत अधिकार बाधित होतात. म्हणूनच सेन्सॉरशिप व बंधने ही संतुलित, न्याय्य व पारदर्शक पद्धतीने लागू केली गेली पाहिजेत.

४. गोपनीयतेचा भंग व डेटाचा गैरवापर याद्वारे मुलभूत अधिकारांचे उल्लंघन

इंटरनेट, मोबाईल ॲप्स, सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानामुळे नागरिकांचे वैयक्तिक डेटा मोठ्या प्रमाणावर जमा होतो. यात नाव, पत्ता, मोबाईल नंबर, फोटो, बँक माहिती, लोकेशन इत्यादींचा समावेश होतो. परंतु जेव्हा हा डेटा परवानगीशिवाय वापरला जातो किंवा चुकीच्या पद्धतीने शेअर केला जातो, तेव्हा गोपनीयतेचा भंग होतो. गोपनीयतेचा भंग)Violation of Privacy) म्हणजे व्यक्तीची खाजगी माहिती त्याच्या संमतीशिवाय उघड करणे होय तर डेटाचा गैरवापर)Misuse of Data) याचा अर्थ वैयक्तिक माहितीचा व्यावसायिक, राजकीय किंवा गुन्हेगारी हेतूसाठी वापर करणे होय. अलीकडील काळात सोशल मिडीयाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गोपनीयतेचा भंग आणि डेटाचा गैरवापर होतो आहे. सोशल मिडीयाच्या या गैरवापरामुळे थेट नागरिकांच्या पुढील मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे.

१. जीवन व स्वातंत्र्याचा अधिकार)कलम 21)

सर्वोच्च न्यायालयाने)Putta swamy Case, 2017) गोपनीयता हा जीवनाचा मूलभूत भाग आहे असे घोषित केले. डेटाचा गैरवापर झाल्यास नागरिकांचा सुरक्षिततेचा व सन्मानाने जगण्याचा हक्क बाधित होतो. अनेकदा युजर्सचा डेटा तिसऱ्या पक्षांकडे परवानगीशिवाय शेअर केला जातो. यामुळे खाजगी जीवनावर आघात होतो. उदा. मोबाईल ॲप्स वैयक्तिक माहिती परवानगीशिवाय तृतीय पक्षाला विकतात.

२. गोपनीयतेचा अधिकार)Right to Privacy)

बँकिंग माहिती, आरोग्यविषयक माहिती किंवा वैयक्तिक फोटो/व्हिडिओ लीक होणे. यामुळे मानसिक त्रास, मानहानी आणि असुरक्षितता निर्माण होते. उदा. हॅकिंग, फिशिंग, बँक फसवणूक.

३. समता अधिकाराचे उल्लंघन)कलम 14)

डेटाचा गैरवापर करून विशिष्ट गटांवर लक्ष ठेवले जाते किंवा त्यांच्यावर भेदभाव केला जातो. उदा. फेसबुक–कॅम्ब्रिज ॲनालिटिका घोटाळा (राजकीय फायद्यासाठी नागरिकांचा डेटा वापरणे).

४. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर परिणाम)कलम 19(1)(a))

व्यक्तीची माहिती नोंदवली जात असल्यामुळे लोक आपले विचार मांडण्यास घाबरतात. "सर्व्हिलन्स" (नजर ठेवणे) मुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य मर्यादित होते.

थोडक्यात, गोपनीयतेचा भंग आणि डेटाचा गैरवापर हे केवळ वैयक्तिक सुरक्षिततेपुरते मर्यादित नसून ते संविधानाने दिलेल्या जीवनाचा अधिकार, गोपनीयतेचा अधिकार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांचे उल्लंघन करतात. म्हणूनच डिजिटल युगात गोपनीयता ही लोकशाही टिकवण्यासाठी अत्यावश्यक झाली आहे.

सोशल मीडियाद्वारे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन : उपाययोजना

आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडिया हे संवाद, अभिव्यक्ती आणि माहितीचे सर्वात प्रभावी साधन बनले आहे. फेसबुक, ट्विटर, यूट्यूब, इन्स्टाग्राम यांसारख्या माध्यमांमुळे प्रत्येक नागरिकाला आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. परंतु या माध्यमांचा गैरवापर केल्यामुळे फेक न्यूज, अफवा, ट्रोलिंग, द्वेषपूर्ण भाषण, गोपनीयतेचा भंग व डेटाचा गैरवापर यासारख्या समस्या उद्भवतात. यामुळे थेट अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता, गोपनीयता, जीवनाचा व सन्मानाने जगण्याचा अधिकार यांसारख्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन घडते. म्हणूनच नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१. कायदेशीर उपाय

कायदेशीर उपाय हा सोशल मीडियाद्वारे होणाऱ्या मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनावरील उपाययोजनांचा खूप महत्त्वाचा भाग आहे. Information Technology Act, 2000 (IT Act) अंतर्गत ऑनलाइन छळ, हॅकिंग, डेटाची चोरी, फेक न्यूज यावर कारवाई दंड व तुरुंगवासासारख्या शिक्षा देऊन गुन्हेगारांना आळा घालण्यासाठी बनिविलेला आहे. Personal Data Protection Act (2023) लागू करून नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण देण्यात आलेला आहे. कंपन्यांना डेटा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

सुरक्षित ठेवण्याची सक्ती. ऑनलाइन तक्रार पोर्टल)cybercrime.gov.in) व हेल्पलाईन)1930) उपलब्ध करणे. तक्रारींवर त्वरित कायदेशीर कारवाई. सरकारने जाहीर केलेल्या Intermediary Guidelines नुसार प्लॅटफॉर्म्सना चुकीच्या कंटेंटवर कारवाई करणे बंधनकारक. हानिकारक व बेकायदेशीर पोस्ट हटवणे. नागरिकांना सायबर कायदे व अधिकारांची माहिती देणे. पोलिस व न्यायव्यवस्थेला डिजिटल गुन्ह्यांच्या तपासाचे विशेष प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. थोडक्यात, कायदेशीर उपाय प्रभावीपणे राबवले तर सोशल मीडियाचा गैरवापर कमी होईल आणि नागरिकांचे गोपनीयता, समता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व जीवनाचा अधिकार सुरक्षित राहतील.

२. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सची जबाबदारी

फेक न्यूज, द्वेषयुक्त भाषण (Hate Speech), अफवा यांचा प्रसार रोखण्यासाठी Fact-checking Mechanism ठेवणे. खोट्या बातम्या व दिशाभूल करणारे पोस्ट्स त्वरित हटवणे. फेक आयडी, बॉट्स आणि ट्रोल अकाऊंट्स बंद करणे. KYC आधारित Verification System लागू करणे. नागरिकांचा डेटा तृतीय पक्षाला विकणे किंवा परवानगीशिवाय वापरणे टाळणे. मजबूत Privacy Policy आणि Data Security ठेवणे. वापरकर्त्यांना छळ, ट्रोलिंग किंवा डेटा गैरवापराबद्दल तक्रार करण्यासाठी Report/Grievance Redressal System उपलब्ध करणे. तक्रारींवर त्वरित कारवाई करणे. भारतातील IT Act, Data Protection Act आणि सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे. चुकीच्या कंटेंटवर कारवाईसाठी शासनासोबत सहकार्य करणे. नागरिकांना सुरक्षित आणि जबाबदार सोशल मीडिया वापराबाबत माहिती देणे. Awareness Campaigns राबवणे. हानिकारक पोस्ट/कंटेंट लगेच हटवण्याची यंत्रणा तयार करावी. फेक अकाऊंट्स आणि बॉट्सवर नियंत्रण ठेवावे. सोशल मीडिया कंपन्यांनी कंटेंट मॉडरेशन आणि फेक न्यूज फिल्टरिंग यावर अधिक लक्ष द्यावे. थोडक्यात, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स ही केवळ संवादाची साधने नसून, त्यांच्यावर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही आहे. पारदर्शकता, सुरक्षितता व जबाबदारीने काम केल्यासच सोशल मीडिया लोकशाहीसाठी खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरेल.

३. नागरिकांची डिजिटल साक्षरता

डिजिटल साक्षरता म्हणजे इंटरनेट, मोबाईल, संगणक व सोशल मीडियाचा सुरक्षित, जबाबदार आणि योग्य वापर करण्याची क्षमता. यामुळे नागरिकांना खरी–खोटी माहिती ओळखणे, गोपनीयता जपणे आणि ऑनलाइन गुन्ह्यांपासून स्वतःचे रक्षण करणे शक्य होते. नागरिकांनी डिजिटल साक्षरता अंगीकारावी आणि जबाबदारीने सोशल मिडिया वापरावा. माहिती खरी की खोटी हे तपासण्याची सवय लावणे गरजेचे आहे. नागरिकांनी अफवा व फेक न्यूज पुढे न पाठवणे खूप आवश्यक आहे. थोडक्यात, नागरिकांची डिजिटल साक्षरता वाढल्यास फेक न्यूज, अफवा, ट्रोलिंग, गोपनीयतेचा भंग व डेटाचा गैरवापर यावर नियंत्रण मिळवता येते आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार सुरक्षित राहतात.

४. सायबर सुरक्षा व पोलिसांचे बळकटीकरण

नागरिकांचा वैयक्तिक डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर नियम लागू करणे. सायबर सुरक्षा ऑडिट नियमित करणे. बँकिंग, ई-कॉमर्स व शैक्षणिक प्लॅटफॉर्मवर OTP, बायोमेट्रिक, टू-फॅक्टर ऑथेन्टिकेशन अनिवार्य करणे. हॅकिंग, फिशिंग, डेटाची चोरी यावर नियंत्रणासाठी राष्ट्रीय स्तरावरील सायबर सुरक्षा धोरण मजबूत करणे. प्रत्येक जिल्ह्यात सायबर क्राईम सेल सुरू करणे. पोलिसांना विशेष सायबर प्रशिक्षण)Digital Forensics, Cyber Tracking, Hacking Investigation) देणे. ऑनलाइन तक्रारीसाठी सुलभ पोर्टल्स व हेल्पलाईन (उदा. 1930, cybercrime.gov.in) उपलब्ध करणे. जलद चौकशी व कारवाईसाठी तांत्रिक उपकरणे व तज्ज्ञ कर्मचारी उपलब्ध करणे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सायबर गुन्ह्यांविरोधात इतर देशांच्या पोलिसांसोबत समन्वय ठेवणे. थोडक्यात, सायबर सुरक्षा बळकट केल्याने डेटा चोरी, फेक न्यूज व ऑनलाइन छळावर नियंत्रण येते; तर पोलिसांचे सक्षमीकरण झाल्याने नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे प्रभावी रक्षण करता येते.

५. शैक्षणिक व सामाजिक उपाय

शाळा व महाविद्यालयांत डिजिटल साक्षरता व सायबर सुरक्षा विषयांचा समावेश करणे. विद्यार्थ्यांना फेक न्यूज, अफवा, ट्रोलिंग, ऑनलाइन छळ याबाबत जागरूक करणे. ऑनलाइन सुरक्षितता, पासवर्ड संरक्षण, डेटा गोपनीयता यावर कार्यशाळा घेणे. अभ्यासक्रमातून नैतिक मूल्ये, जबाबदार इंटरनेट वापर व अभिव्यक्तीचा योग्य वापर शिकवणे, जनजागृती मोहिमा राबवणे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

(सरकार, NGO, समाजसंस्था यांच्या माध्यमातून). सोशल मीडियावर Responsible Citizen Campaigns चालवणे. महिला, मुलं व अल्पसंख्याकांसाठी विशेष हेल्पलाईन व सहाय्य केंद्रं सुरू करणे. मीडिया आणि नागरिकांचा सहभाग वाढवून समाजात परस्पर आदर, बंधुता व सहिष्णुता निर्माण करणे. प्रत्येकाने माहिती शेअर करण्यापूर्वी सत्यता तपासणे व अफवा न पसरवणे. थोडक्यात, शैक्षणिक व सामाजिक उपायांमुळे जागरूक व जबाबदार नागरिक तयार होतात आणि सोशल मीडियाद्वारे होणाऱ्या मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनाला आळा बसतो.

उपसंहार

- सोशल मीडिया हे एक प्रभावी माध्यम आहे, पण त्याचा वापर करताना लोकशाही मूल्ये, कायद्याचे पालन आणि इतरांच्या हक्कांचा सन्मान राखणे अत्यावश्यक आहे.
- मूलभूत अधिकार आणि डिजिटल जबाबदारी यामधील संतुलन राखल्यास सोशल मीडियाचे समाजासाठी खरे फायदे मिळू शकतात.
- सोशल मीडिया हे मूलभूत अधिकारांचं रक्षण व लोकशाही बळकट करण्यासाठी अत्यंत उपयुक्त साधन आहे. मात्र त्याचवेळी ते चुकीच्या पद्धतीने वापरलं गेल्यास समाजात असंतोष, विभाजन आणि वैयक्तिक स्वातंत्र्यावर धोका निर्माण होऊ शकतो.
- देशातील जबाबदार नागरिकत्व, कठोर परंतु न्याय्य कायदेशीर चौकट, डेटा संरक्षण व गोपनीयतेचं रक्षण, डिजिटल साक्षरता यांचा संगम आवश्यक आहे. यामुळे सोशल मीडिया लोकशाही, समानता आणि मूलभूत अधिकारांना खऱ्या अर्थाने बळ देऊ शकेल.

संदर्भ

1. भारतीय राज्यघटना, अनुच्छेद 14, 15, 19, 21. मूळ प्रत.
2. विद्या, राजीव. (2020). "सोशल मीडिया आणि लोकशाही". पुणे: विद्यापीठ प्रकाशन., पुणे.
3. पळशीकर, सुहास,(२००२), महाराष्ट्राचे राजकारण:राजकीय प्रकीयेचे स्थानिक संदर्भ,प्रतिमा प्रकाशन,पुणे. शिकारपूर, डॉ. दीपक, (२०१९), सोशल मीडिया शाप की वरदान, विश्वकर्मा प्रकाशन, पुणे.
4. बोठे पाटील, डॉ. बाळ, (२०००), राजकारण आणि माध्यमे, विश्वकर्मा प्रकाशन, पुणे.
5. रानी. डॉ, संगीता, (२०२०), सोशल मीडिया: संभावना और चुनौतिया, श्री नटराज प्रकाशन, दिल्ली.
6. फरियाद, डॉ. मोहम्मद, (२०१५), सोशल मीडीयाके विविध आयाम, स्वराज प्रकाशन, दिल्ली.
7. पवार, डॉ. प्रकाश, राजकीय वर्चस्वाचं माध्यमः सोशल मिडीया, दै.सकाळ, जुलै२९,२०१८.
8. Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, 2021.
9. Padhiyar, Dr. Raj, (2019), Social Media and Politics in India, Edu creation Publishing, New Delhi.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणी व आवश्यकता

डॉ. धर्मवीर शाहू क्षीरसागर
सहयोगी प्राध्यापक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज
Email: dharmvirdemocracy@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170906
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 30-39
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवारा:

'मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची आवश्यकता आहे की नाही?' या समस्येचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे. कोल्हापूर खंडपीठाची मागणी वैद्य आहे की नाही याची केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीचा ऐतिहासिक आढावा घेणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीचे स्वरूप स्पष्ट करणे व मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेची आवश्यकता तपासून शिफारशी सुचविणे, ही या संशोधनाची उद्दिष्टे आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणीला दीर्घ ऐतिहासिक संदर्भ आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणी रास्त आहे व मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेची आवश्यकता आहे या गृहीतकाच्या आधारे प्रस्तूत मांडणी केली आहे. संशोधनासाठी ऐतिहासिक, तुलनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा अवलंब केला आहे. व्दितीय माहिती स्त्रोतांतर्गत वर्तमान पत्रे व अनुषंगिक वेबसाईटच्या आधारे संशोधन कार्य केले आहे. प्रस्तुत संशोधन कार्य मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणी व त्याच्या स्थापनेच्या आवश्यकता यापुरते मर्यादित आहे. कायदेशीर आधार, ऐतिहासिक आधार, लोकसंख्या व क्षेत्रफळ, अंतर व वेळ, भौगोलिक स्थान व खर्च, प्रलंबित खटल्यांची स्थिती व ई-न्यायालय या मापदंडाच्या आधारे मागणीची वैद्यता व स्थापनेची आवश्यकता तपासली आहे. प्रस्तुत संशोधन कार्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीचा इतिहास समजून घेण्यास साह्य होईल. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेचा कायदेशीर व इतर आधार समजून घेता येईल. एकंदरीत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीची वैद्यता व आवश्यकता समजून घेता येईल.

मुख्य शब्द: *मुंबई उच्च न्यायालय, कोल्हापूर खंडपीठ, ऐतिहासिक पार्श्वभूमी, कायदेशीर आधार, लोकसंख्या, क्षेत्रफळ, वेळ व खर्च बचत, प्रलंबित खटले, ई-न्यायालय, न्यायाचे विकेंद्रीकरण.*

निष्कर्ष:

न्यायला विलंब म्हणजे न्याय नाकारणे होय, या उक्तीनुसार कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीला होणारा विलंब म्हणजे एकप्रकारे या परिक्षेत्रातील नागरिकांच्या न्यायाकडे केलेले दुर्लक्ष आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीला सक्षम ऐतिहासिक वारसा आहे. कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेला सक्षम ऐतिहासिक व कायदेशीर आधार आहे. खंडपीठ विभागणीमुळे मुख्य न्यायालय व खंडपीठांचे क्षेत्रफळ समान राहणार आहे. कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेमुळे मुंबई उच्च न्यायालयाचा एक चातुर्तांश (२६.९० %) एवढा लोकसंख्येचा भार कमी होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य स्थानाच्या तुलनेत कोल्हापूर खंडपीठाचे अंतर कमी असल्याने वेळेची व पैश्याची बचत होणार आहे. प्रलंबित खटल्याचे सरासरी प्रमाण मागील पाच वर्षात २७.१५ % एवढे आहे. नेटवर्क कनेक्टिव्हिटीमध्ये तफावत, अपुरा डेटा स्पीड - आणि डेटा व्हॉल्यूम, वकील आणि पक्षकारांमध्ये, स्मार्टफोन, लॅपटॉप किंवा टॅब्लेट सारख्या उपकरणांमध्ये प्रवेश करण्याच्या क्षमतेमध्ये एक स्पष्ट तफावत, विद्यमान कर्मचाऱ्यावर जास्त भार व प्रशिक्षणाचा अभाव ह्या ई- न्यायालय पर्याय्च्या मर्यादा आहेत. एकूण मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणी ही रास्त आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. धर्मवीर शाहू क्षीरसागर, सहयोगी प्राध्यापक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

How to cite this article:
क्षीरसागर, . धर्मवीर . शाहू . (2025). मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणी व आवश्यकता. Journal of Research & Development, 17(9(IV)), 30–39.
https://doi.org/10.5281/zenodo.17708370

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17708370
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

विषय विवेचन:

१. मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना, रचना व कार्याची सद्यस्थिती:

सुरत कारखान्याचे गव्हर्नर जेराल्ड ऑंगियर न्यायव्यवस्थेचे मुख्य शिल्पकार होते. मुंबईचे खरे संस्थापक म्हणून त्यांचे वर्णन केले जाते. ते उदारमतवादी विचारांचे होते आणि भय मुक्त व निष्पक्ष न्याय प्रशासनावर विश्वास होता. कंपनीने ऑंगियरला भारतातील कंपनीच्या नोकरांमधून कायद्याचे ज्ञान असलेल्या एखाद्या व्यक्तीची निवड करण्याचा सल्ला दिला. ऑंगियरने जॉर्ज विल्कॉक्सची न्यायाधीश म्हणून निवड केली आणि सन १६७२ मध्ये मुंबईत पहिल्या ब्रिटिश न्यायालयाचे उद्घाटन झाले. मुंबई न्यायव्यवस्थेच्या विकासाचा दुसरा टप्पा सन १६८३ च्या सनदेनुसार १६८४ मध्ये ॲडमिरल्टी कोर्टाची स्थापना झाल्याने सुरू झाला. सन १७२६ मध्ये, राजा जॉर्ज पहिला यांनी कंपनीला दिलेल्या सनदेमुळे न्यायिक संस्थांच्या उत्क्रांतीत एक पाउल पुढे पडले. सन १७२६ मध्ये "महापौर न्यायालय" राजाच्या थेट अधिकाराखाली स्थापन करण्यात आले. शहर आणि त्याच्या अधीनस्थ कारखान्यांमध्ये उद्भवणाऱ्या सर्व दिवाणी दाव्यांची सुनावणी करण्याचा आणि खटला चालवण्याचा अधिकार न्यायालयाला होता. पहिल्यांदाच, भारतातील न्यायालयांच्या निर्णयाविरुद्ध किंग-इन-कौन्सिलकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आला. सन १७५३ मध्ये कंपनीने राजा जॉर्ज दुसरा यांच्याकडून नवीन सनद मिळवली, ज्यामध्ये महापौर न्यायालयाची पुनर्स्थापना करण्यात आली. नवीन सनदमध्ये पूर्वीच्या सनदातील काही तरतुदींची पुनरावृत्ती झाली आणि लहान-मोठ्या प्रकरणांच्या त्वरित निकालासाठी विनंती न्यायालयाची स्थापना करण्यात आली. महापौर न्यायालय सन १७९८ पर्यंत ७० वर्षे कार्यरत राहिले. सन १७९८ मध्ये महापौर न्यायालय रद्द करण्यात आले आणि सन १७९८ च्या सनदेनुसार त्याच्या जागी रेकॉर्डर्स न्यायालय स्थापन करण्यात आले. या न्यायालयाच्या स्थापनेमुळे मुंबईतील न्यायिक प्रशासन पूर्णपणे बदलले. त्यात एक महापौर, तीन अल्डरमन आणि राजाने नियुक्त केलेला एक रेकॉर्डर होता, जो किमान ५ वर्षांचा बॅरिस्टर असणार होता. पहिले रेकॉर्डर सर विल्यम सायर होते. कायद्याच्या प्रशासनात भारतीयांचा अधिकृत सहभाग या न्यायालयाच्या स्थापनेपासून सुरू झाला.

हिंदू आणि मुस्लिम कायद्याच्या मुद्द्यांशी संबंधित प्रकरणांच्या निर्णयात रेकॉर्डरला मदत करण्यासाठी शास्त्रांच्या कायद्यात पारंगत एक हिंदू पंडित आणि शरियत कायद्यात शिकलेला एक मुसलमान मालवी यांची नियुक्ती करण्यात आली. रेकॉर्डर्स न्यायालयांसह न्यायिक क्षेत्रातून कार्यकारी मंडळाचे उच्चाटन करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलण्यात आले. हे कोर्ट सुरुवातीला मरीन स्ट्रीटवरील कर्नल जोन्स हाऊसमध्ये आणि सन १८०० पर्यंत अपोलो स्ट्रीटवरील ॲडमिरल्टी हाऊसमध्ये, ज्याला 'हॉर्नबी हाऊस' म्हणून ओळखले जाते, जे नंतर ग्रेट वेस्टर्न हॉटेल म्हणून उभारण्यात आले. सन १८२४ पर्यंत या इमारतीत रेकॉर्डर्स कोर्ट होते. सन १७७३ मध्ये रेग्युलेटिंग ॲक्ट मंजूर झाला आणि वॉरेन हेस्टिंग्ज यांना बंगालचे गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्त करण्यात आले. प्रचलित व्यवस्थेतील वाईट गोष्टी दूर करण्यासाठी कलकत्ता सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. सन १८२३ मध्ये, संसदेच्या एका कायद्याने रॉयल चार्टरद्वारे मुंबई येथील रेकॉर्डर्स कोर्टाच्या जागी सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार क्राउनला दिला. रेकॉर्डर्स कोर्टाला दिलेले अधिकार सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करायचे होते. १८२३ च्या कायद्याच्या १७ व्या कलमानुसार मुंबई येथील सर्वोच्च न्यायालयाला कलकत्ता येथील सर्वोच्च न्यायालयासारखेच अधिकार देण्यात येणार होते आणि त्यावर समान मर्यादा आणि निर्बंध लादायचे होते. ८ मे १८२४ रोजी मुंबईत या न्यायालयाचे औपचारिक उद्घाटन झाले.

सन १८२४ ते १८६२ पर्यंत सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज चालले. सर्वोच्च न्यायालयाची आणि अगदी उच्च न्यायालयाची सुरुवातीच्या काळात मुख्य प्रेरणा इंग्लंडचा कायदे होते. हिंदू आणि मुस्लिम कायद्यांव्यतिरिक्त, सामान्य कायदे आणि समानतेचे तत्व होते ज्यांना न्यायालयांच्या निकालांमध्ये आणि नंतर भारतीय विधिमंडळाच्या कायद्यांमध्ये थोड्याशा सुधारणांसह मूर्त स्वरूप देण्यात आले. मुंबईतील ब्रिटिश न्यायव्यवस्थेच्या पहिल्या शतकात, कोणत्याही भारतीय न्यायाधीश किंवा वकिलाची नोंद नाही. उच्च न्यायालयाच्या स्थापनेनंतरच भारतीय बॅरिस्टर उच्च न्यायालयात एकट्याने हजेरी लावू लागले. सर्वोच्च न्यायालयाच्या स्वतःच्या कमतरता होत्या. सन १८५२ मध्ये, पूर्ण भारत व्यवहारांसाठी संसदीय समितीला असे आवाहन करण्यात आले की, प्रत्येक प्रेसिडेन्सीमधील सर्वोच्च न्यायालय आणि सदर अदालत एकत्रित करणे इष्ट आहे. यामुळे १८६१ मध्ये ब्रिटिश संसदेने सर्वोच्च न्यायालय आणि सदर अदालतींऐवजी तिन्ही प्रेसिडेन्सींमध्ये उच्च न्यायालये निर्माण करण्यासाठी भारत उच्च न्यायालय कायदा मंजूर केला. १८५७ च्या म्युटेशननंतर, कंपनी विसर्जित करण्यात आली आणि १८५८ मध्ये भारत सरकार राजाने ताब्यात घेतले. यामुळे भारतातील प्रशासनासाठी ब्रिटिश सरकारमध्ये जबाबदारीची भावना निर्माण झाली आणि न्यायव्यवस्थेवर संपूर्णपणे नियंत्रण ठेवण्यात आले. १८६१ च्या 'भारतीय उच्च न्यायालय कायद्या' द्वारे, इंग्लंडच्या महाराणीला कलकत्ता, मद्रास आणि मुंबई उच्च न्यायालये स्थापन करण्यासाठी आणि युनायटेड किंग्डमच्या ग्रेट सील अंतर्गत पत्र पेटंट जारी करण्याची परवानगी देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाची सनद २६ जून १८६२ रोजी जारी करण्यात आली.

१४ ऑगस्ट १८६२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे उद्घाटन झाले. उच्च न्यायालयाचे मूळ तसेच अपीलीय अधिकार क्षेत्र होते जे सर्वोच्च न्यायालयापासून घेतले गेले होते आणि नंतरचे सदर दिवानी आणि सदर फौजदारी न्यायालयांमधून घेतले गेले होते, जे उच्च न्यायालयात विलीन झाले होते. उच्च न्यायालयाच्या स्थापनेसह दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि दिवाणी प्रक्रिया संहिता कायद्यात रूपांतरित झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर पेटंटने १५ न्यायाधीशांना अधिकृत केले होते, परंतु सुरुवात फक्त ७

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

न्यायाधीशांपासून झाली. हे उल्लेखनीय आहे की त्यानंतर सुमारे ६० वर्षांपर्यंत, उच्च न्यायालय फक्त ७ न्यायाधीशांसह काम करू शकले. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर युद्धविराम झाल्यानंतर, मुंबई शहरात खटल्यांमध्ये अचानक वाढ झाली. तेव्हा अतिरिक्त न्यायाधीशाची मागणी करण्यात आली आणि त्यांना अनिच्छेने मंजूर करण्यात आले.

भारताकडून शेवटचे अपील १५ डिसेंबर १९४९ रोजी प्रिव्ही कौन्सिलने निकाली काढले. अशा प्रकारे २६ जानेवारी १९५० रोजी प्रिव्ही कौन्सिलशी भारताचे २०० वर्ष जुने संबंध संपुष्टात आले, संघीय न्यायालयाने नवीन संविधानानुसार भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला मार्ग दिला. उच्च न्यायालय प्रथम अपोलो स्ट्रीटमधील ॲडमिरल्टी हाऊस नावाच्या इमारतीत होते जिथे रेकॉर्डर्स कोर्ट आणि सर्वोच्च न्यायालय त्यांच्या बैठका घेत असत. १ नोव्हेंबर १९५६ पासून राज्यांच्या पुनर्रचनेनंतर, मुंबई राज्याचे प्रदेश आणि त्यासोबत उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आले.

विदर्भ आणि सौराष्ट्र जिल्ह्यांमधून उद्भवणाऱ्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी अनुक्रमे नागपूर आणि राजकोट येथे उच्च न्यायालयाची खंडपीठे स्थापन करण्यात आली. सन १९६० मध्ये गुजरात राज्याच्या स्थापनेनंतर, गुजरात उच्च न्यायालयाची स्थापन करण्यात आली. सन १९८१ मध्ये औरंगाबाद येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ अधिसूचित करण्यात आले आणि सन १९८४ मध्ये राष्ट्रपतींच्या आदेशाने कायमस्वरूपी खंडपीठ स्थापन करण्यात आले. सन १९८१ च्या मुंबई उच्च न्यायालयाच्या (गोवा, दमण आणि दीवपर्यंत अधिकारक्षेत्राचा विस्तार) कायद्यानुसार, १९८२ मध्ये केंद्रशासित प्रदेश गोवा, दमण आणि दीवसाठी उच्च न्यायालयाच्या पणजी (गोवा) खंडपीठाचे उद्घाटन करण्यात आले. नंतर १९८७ मध्ये गोव्याला राज्याचा दर्जा मिळाल्यावर उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र आले. महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांवर आणि दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांवर. उच्च न्यायालयात सध्या ९४ न्यायाधीशांची मंजूर संख्या आहे.

नागपूर खंडपीठ:

नागपूर हे भारताच्या मध्यभागी वसलेले एक औद्योगिक आणि व्यावसायिक शहर आहे. पूर्वी ते मध्य प्रदेश राज्याची राजधानी होते आणि आता ते महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आहे. ९ मे १९३६ रोजी नागपूर येथे उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सर गिल्बर्ट स्टोन यांची पहिले मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. १९५६ मध्ये राज्यांची स्थापना होईपर्यंत नागपूर येथील उच्च न्यायालय या इमारतीतच होते. १ नोव्हेंबर १९५६ पासून, विदर्भातील आठ मराठी भाषिक जिल्हे व्दिभाषिक मुंबई राज्याचा भाग बनले. पूर्वीच्या मध्य प्रदेश राज्यातील उर्वरित चौदा हिंदी भाषिक जिल्हे भोपाळ येथे राजधानी असलेल्या नव्याने स्थापन झालेल्या मध्य प्रदेश राज्याचा भाग बनले. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाला नागपूर येथील माजी उच्च न्यायालयाचे उत्तराधिकारी मानले गेले. मुंबई येथील उच्च न्यायालयाचे खंडपीठ नागपूर येथील या इमारतीत १-११-१९५६ पासून कार्यरत झाले आणि १-५-१९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतरही ते सुरू आहे. १९६० मध्ये या खंडपीठाची संख्या चार माननीय न्यायाधीशांची होती.

औरंगाबाद (संभाजीनगर) खंडपीठ:

औरंगाबाद खंडपीठाची स्थापना सन १९८१ मध्ये झाली. सुरुवातीला महाराष्ट्रातील काही जिल्हे औरंगाबाद खंडपीठाच्या अखत्यारीत होते. त्यानंतर सन १९८८ मध्ये अहमदनगर आणि इतर जिल्हे या खंडपीठाशी जोडले गेले. औरंगाबाद येथील खंडपीठात १२ हून अधिक न्यायाधीश आहेत. औरंगाबाद खंडपीठाचे अधिकार क्षेत्र औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, जालना, जळगाव, बीड, परभणी, लातूर आणि उस्मानाबाद येथे आहे.

पणजी खंडपीठ:

गोवा मुक्तीपूर्वी दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशासाठी सर्वोच्च न्यायालय पणजी येथे कार्यरत होते. गोवा दमण आणि दीव (न्यायिक आयुक्त न्यायालय) नियमन, १९६३ अंतर्गत १६ डिसेंबर १९६३ रोजी न्यायिक आयुक्त न्यायालयाची स्थापना झाल्यानंतर हे न्यायाधिकरण डी रेलाकाओ रद्द करण्यात आले. मे १९६४ मध्ये संसदेने एक कायदा मंजूर केला ज्याने भारतीय संविधानाच्या उद्देशाने उच्च न्यायालयाचे काही अधिकार न्यायिक आयुक्त न्यायालयाला बहाल केले. संसदेने कायद्याद्वारे मुंबई येथील उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र गोवा, दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशापर्यंत वाढवले आणि ३० ओक्टोंबर १९८२ रोजी पणजी येथे त्या उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी खंडपीठ स्थापन केले. त्याच्या स्थापनेपासून, त्यावेळी कार्यवाहक न्यायिक आयुक्त असलेले माननीय श्री. न्यायमूर्ती डॉ. जी.एफ. कौटो यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठात बढती देण्यात आली. २९ ऑगस्ट १९८३ रोजी माननीय श्री. न्यायमूर्ती जी.डी. कामत यांना खंडपीठावर बढती देण्यात आली. संसदेने गोवा राज्याचा दर्जा प्रदान करून गोवा, दमण आणि पुनर्रचना कायदा, १९८७ संमत केल्यानंतर, मुंबई उच्च न्यायालय हे महाराष्ट्र आणि गोवा राज्यांसाठी आणि दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांसाठी ३० मे १९८७ पासून सामान्य उच्च न्यायालय बनले. आज रोजी न्या. अलोक अराधे व इतर ६२ मिळून ६३ न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालयात आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

२. कोल्हापूर खंडपीठाची मागणी :

मागील ४० वर्षे मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाची मागणी केली जात आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उच्च न्यायालयाची संख्या कमी होती. दळणवळण व साधन सुविधेच्या अभावामुळे उच्च न्यायालयापर्यंत जाणे-येणे कठीण बनले होते. त्यामुळे प्रथम लखनौ व मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची मागणी संसदेत करण्यात आले. त्यामुळे १९८१ साली तत्कालीन कायदामंत्री पी. शिवशंकर यांनी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त नायामुर्ती जसवंत सिंग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. समितीने १९८५ साली आपला अहवाल संसदेपुढे सदर केला. कार्यक्षेत्रातील लोकसंख्या, प्रलंबित खटल्याचे प्रमाण, दळणवळणाच्या सुविधा, ५० एकर जागेची उपलब्धता व ३०० किलोमीटरचे अंतर इत्यादी अटी घातल्या. या सर्व अटींची पूर्तता कोल्हापूर खंडपीठाच्या मागणी मागील मुख्य प्रेरणा होती. १९८५ पासून कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीचे आंदोलन सुरु झाले. एड. जे. जे. बारदेस्कर, एड. कोब्रेड गोविंद पानसरे, एड. पी. के.चौगुले, एड. रामराव शिंदे, एड. लालासाहेब चव्हाण, एड. आनंदराव शिंदे यांनी आंदोलनाचा पाया घातला. प्रा. एन. डी. पाटील,डॉ. प्रतापसिंह जाधव, कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशन यांनी याबाबत योगदान दिले.

१९९१ साली कराड येथे सहा जिल्ह्यातील वकिलांची परिषद झाली. यानंतर मागणीची वैद्यता तपासण्यासाठी पेंडसे समिती गठीत केली मात्र कामिठीने प्रतिकूल अहवाल दिला. यासाठी ५५ दिवसांचे बेमुदत आंदोलन करण्यात आले होते. यानंतर नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती लक्ष्मणन समितीने अनुकूल अहवाल दिला. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सकारात्मक आश्वासन दिले. पुढे सर्किट बेंचचा प्रस्ताव समोर आला. मात्र त्यावरही कृती झाली नाही. पुढे आंदोलनाच्या मागण्यांची वैद्यता तपासण्यासाठी पुन्हा न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. (पुढारी, १० मार्च, २०२५). माणिक पाटील चुयेकर यांनी खंडपीठ मागणीसाठी मुख्य मंत्र्यासोबत बैठक लावण्या संदर्भात बेमुदत आमरण उपोषण केले. महायुतीतील नेत्यांनी आश्वासनावर त्यांची समजूत काढून, उपोषण मागे घेण्यास लावले. नुकतेच १७ ऑगस्ट २०२५ मध्ये कोल्हापुरात मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच स्थापन करण्यात आले आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. मात्र खंडपीठाची मागणी अद्याप पूर्ण झालेली नाही.

कोल्हापूरचा न्यायिक इतिहास:

स्वातंत्र्यापूर्वी, कोल्हापूर संस्थानाचे पहिले न्यायालय १८४४ मध्ये सुरू झाले आणि जिल्हा न्यायालय १८६७ मध्ये स्थापन झाले. प्रख्यात कायदेतज्ज्ञ श्री. महादेव गोविंद रानडे हे कोल्हापूरचे पहिले जिल्हा न्यायाधीश झाले.

३१ मे १९३१ रोजीच्या कोल्हापूर राजपत्रात "कोल्हापूर राज्य उच्च न्यायालय नियमावली, १९३१" प्रकाशित करण्यात आली.१९३१ मध्ये, कोल्हापूर राज्यासाठी उच्च न्यायालय स्थापना करण्यात आली आणि कोल्हापूर राज्य तत्कालीन मुंबई राज्यात विलीन होईपर्यंत ते कार्यरत राहिले. १९४६ ते १९४८ पर्यंत कोल्हापुरात दक्षिण महाराष्ट्र, कोकण आणि कर्नाटकातील तत्कालीन संस्थानांसह दख्खन राज्यांचे नियमित उच्च न्यायालय होते. कोल्हापूर उच्च न्यायालयात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांसह ३ न्यायाधीश होते)www.kdba.in(.


लगतच्या जिल्ह्यांतील इतर बार असोसिएशनचा पाठिंबा:

कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ५ जिल्ह्यांतील बार असोसिएशननी कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याच्या मागणीला पाठिंबा आहे. सोलापूर जिल्ह्याच्या ११ तालुक्यांपैकी सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, मोहोळ, माढा आणि बार्शी या ७ तालुक्यांच्या बार असोसिएशननी कोल्हापूर येथे सर्किट बेंच स्थापन करण्याची तयारी आहे. सहा जिल्ह्यांतील ६२ तालुक्यांपैकी ५८ तालुक्यांनी कोल्हापूर येथे खंडपीठ स्थापनेच्या मागणीला पाठिंबा दिला आहे)www.kdba.in(.

कोल्हापूर खंडपीठाचे स्वरूप:

दक्षिण महाराष्ट्र आणि कोकण विभागातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर या ठिकाणी स्थापन केले जावे, अशी मागणी आहे. या प्रदेशाची भौगोलिक स्थिती खालील नकाशात दर्शवली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025



(Self created: https://paintmaps.com/user-maps/41064)

३. कोल्हापूर खंडपीठाची मागणीचा कायदेशीर आधार:

१. भारतीय संविधानाच्या कलम २१४ नुसार प्रत्येक राज्यात एक उच्च न्यायालयाच्या स्थापनेबाबत तरतूद केली आहे. तर राज्य पुनर्रचना अधिनियम १९५६ च्या भाग ५१ मध्ये (२) राष्ट्रपती, राज्याच्या राज्यपालांशी आणि त्या राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांशी सल्लामसलत केल्यानंतर, अधिसूचित आदेशाद्वारे, उच्च न्यायालयाच्या प्रमुख आसन व्यतिरिक्त राज्यातील एका किंवा अधिक ठिकाणी त्या उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी खंडपीठ किंवा खंडपीठ स्थापन करण्याची आणि त्याशी संबंधित कोणत्याही बाबींसाठी तरतूद करू शकतात)https://thc.nic.in/(.


२. न्यायमूर्ती ए. आर. लक्ष्मणन अध्यक्ष असताना भारतीय विधी आयोगाने उच्च न्यायालायांच्या खंडपीठाबाबत असे निरीक्षण नोदविलेले आहे कि, प्रत्येक उच्च न्यायालयात प्रलंबित खटल्यांचे प्रमाण जास्त आहे. निकाली निघणार्या खटल्यांच्या तुलनेत नवीन खटले दाखल होण्याचे प्रमाण अधिक आहे. खटल्यांमध्ये वाढ होत आहे. सदर खटले निकाली काढण्यास न्यायाधीश व कर्मचारी यांची संख्या कमी आहे. प्रत्येक नागरिकाला गतिमान न्यायिक प्रक्रियेच्या माध्यमातून तणावमुक्त जीवन जगण्याचा मुलभूत अधिकार आहे. यादृष्टीने न्यायाधीशांची संख्या वाढवणे आवश्यक आहे. मात्र एकाच छताखाली न्यायाधीश व कर्मचारी यांची संख्या वाढवणे, व्यवस्थापन व याचीकर्त्याच्या दीर्घ प्रवासाच्या दृष्टीने सोयीचे नाही. म्हणून नवीन खंडपीठे स्थापन करून उच्च न्यायालयाचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे (www.kdba.in(. यामुळे सरकारवर आर्थिक बोजा पडणार आहे, मात्र नागरिकांच्या न्यायासाठी तो खर्च आवश्यक आहे.

३. दी महाराष्ट्र स्टेट डूअरस्टेप जस्टीस रूल प्रोग्रम, १९८९, नुसार तक्रारीचे निवारण लोकांच्या दारापर्यंत पोहोचून केले पाहिजे, या अर्थाने कोल्हापूर खंडपीठाची स्थापना केल्याने या विभागातील नागरिकांना त्याचे खरे लाभ मिळणार आहेत.


४. क्षेत्रफळ व लोकसंख्या नजीकच्या काळातील विविध राज्यांमध्ये उच्च न्यायालयाच्या नवीन खंडपीठांची निर्मिती:

या सहा जिल्ह्यांचे क्षेत्रफळ हे मुंबई येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रमुख कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या एकूण १,०३,५०० चौरस किलोमीटर क्षेत्रफळापैकी ५४,९६८ चौरस किलोमीटर सुमारे ५३% आहे. यावरून हे स्पष्ट होते की, क्षेत्रफळ आणि लोकसंख्येनुसार दोन्ही उच्च न्यायालयांच्या खंडपीठांची संख्या समान असल्याने, या सहा जिल्ह्यांसाठी कोल्हापूर येथील मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच निश्चितच योग्य ठरेल. या जिल्ह्यांची खंडपीठाची मागणी करणाऱ्या या जिल्ह्यांचे क्षेत्रफळ ५४,९६८ चौरस किलोमीटर म्हणजेच राज्याच्या एकूण ३,०७,७१३ चौ. किमी क्षेत्रफळाच्या १७.८६ टक्के आहे आणि लोकसंख्या १,६४,८४,३६१ इतकी आहे की जी महाराष्ट्राच्या एकूण ११,२३,७४,३३३ लोकसंख्येच्या १४.६६ टक्के आहे. (www.kdba.in(.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025



अनु. क्र.	कोल्हापूर	लोकसंख्या	धारवाड (२०१३)	लोकसंख्या	गुलबर्गा (२०१३)	लोकसंख्या
१	सातारा	३०,०३,७४१	बागलकोट	१८,८९,७५२	बिद्दर	१७,०३,३३
२	सांगली	२८,२२,१४३	बेळगांव	४७,७९,६६१	विजापूर	२१,७७,३३१
३	कोल्हापूर	३८,७६,००१	बेल्लारी	२४,५२,५९५	गुलबर्गा	२५,६६,३२६
४	रत्नागिरी	१६,१५,०६९	धारवाड	१८,४७,०२३	यादगीर	११,७४,२७१
५	सिंधुदुर्ग	८४,९६,५१	गडग	१०,६४,५७०	रायचूर	१९,२८,८१२
६	सोलापूर	४३,१७,७५६	हावेरी	१५,९७,६६८		
७			कोप्पल	१३,८९,९२०		
८			उत्तर कन्नड	१४,३७,१६९		
एकूण लोकसंख्या		**१,६४,८४,३६१**		**१,४७,९६,०३८**		**९५,५०,०४०**



(तक्ता क्र. प्रस्तावित जिल्हे ते मुंबई व कोल्हापूर अंतर व वेळेची बचत यांची तौलनिक स्थिती) (संदर्भ: https://censusindia.gov.in ,https://www.census2011.co.in(

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

२०१३ च्या मध्येकर्नाटक उच्च न्यायालयाची धारवाड व गुलबर्गा ही दोन खंडपीठे स्थापन करण्यात आली. धारवाड खंडपीठ बागलकोट, बेळगाव, बेल्लारी, धारवाड, गडग, हावेरी, कोप्पल आणि उत्तर कन्नड जिल्ह्यासाठी कार्यरत आहे. तर गुलबर्गा खंडपीठ बिद्दर, विजापूर, गुलबर्गा,यादगीर आणि रायचूर जिल्ह्यांसाठी कार्यरत आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचे धारवाड खंडपीठ बागलकोट, बेळगाव, बेल्लारी, धारवाड, हवेरी, कोप्पल, उत्तर कन्नड या ८ जिल्ह्यांमध्ये एकूण ६०,५५५ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ कि जे कर्नाटक राज्याच्या १९१७९१ चौ. किमी. क्षेत्रफळाच्या ३१.५७ टक्के आहे आणि १,४७,९६,०३८ लोकसंख्येसाठी स्थापन करण्यात आले आहे.


कर्नाटक उच्च न्यायालयाच्या गुलबर्गा खंडपीठाची स्थापना एकूण ३८,९९३ चौ. किमी. क्षेत्रफळासाठी कि जे कर्नाटक राज्याच्या १९१७९१ चौ. किमी. क्षेत्रफळाच्या २०.३३ टक्के आहे तसेच ते बिदर, विजापूर, गुलबर्गा, यादगीर, रायचूर जिल्ह्यांतील९५,५०,०४० लोकसंख्येसाठी स्थापन केले आहे ही लोकसंख्या कर्नाटकाच्या एकूण ६,१०,९५,२९७ लोकसंखेच्या १५.६३ टक्के स्थापन केले आहे.

२५ जुलै २००४रोजी, कन्याकुमारी, तिरुनेलवेली, तुतीकोरीन, मदुराई, दिंडीगुल, रामनाथपुरम, विरुधुनगर, शिवगंगा, पुदुकोट्टई, तंजावर, नागापट्टिनम, तिरुचिरापल्ली, पेरांबलूर आणि करूर या जिल्ह्यांसाठी मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाची स्थापना करण्यात आली आहे. पुढे नागापट्टिनम व पेरांबलूर जिल्हे मूळ न्यायालयास जोडण्यात आले.

५. अंतर व वेळ याची तुलनात्मक स्थिती:

जिल्हा	मुंबई (km)	कोल्हापूर (km)	अंतराची कपात (km)	वेळेची बचत (ताशी ६०km/h)
सातारा	२५९	१२२	१३७	२-३
सांगली	३९१	४६	३४५	५-६
कोल्हापूर	३८४	०	३८४	६-७
रत्नागिरी	३३८	१५१	१८७	३-४
सिंधुदुर्ग	४५५	१३३	३२२	५-६
सोलापूर	४०८	२३६	१७२	२-३

(तक्ता क्र. प्रस्तावित जिल्हे ते मुंबई व कोल्हापूर अंतर व वेळेची बचत यांची तौलनिक स्थिती) (संदर्भ: https://www.google.com/maps/(



सहा जिल्ह्यांपैकी ५ जिल्हे मुंबई येथील मुख्यालयापासून २५९किमी ते ४५५किमी अंतरावर आहेत. शिवाय, कोल्हापूर विभागातील ६ जिल्ह्यांतील ६२ तालुक्यांपैकी ५२ तालुके मुंबईपासून ३०० किमी ते ५०० किमी पेक्षा जास्त अंतरावर आहेत. याउलट,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025


हे तालुके कोल्हापूरच्या खूप जवळ आहेत. त्यामुळे हे स्पष्ट होते की पक्षकार वेळ, पैसा इत्यादी खर्च करून न्याय मिळवण्यासाठी लांब प्रवास, मुंबईतील वकिलांचे उच्च शुल्क, जलद प्रवासाच्या साधनांमुळे प्रवासाचा वाढलेला खर्च, मुंबईतील हॉटेल्स आणि इतर खर्च यामुळेया सहा जिल्ह्यांमधील खटल्याशी संबंधितासाठी मुंबईत प्रवास करणे, राहणे आणि खटल्याला उपस्थित राहणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. म्हणूनकोल्हापूर येथे खंडपीठाची स्थापना केल्याने लोकांना उच्च न्यायालयात जाण्याचे अंतर कमी करून अधिक सुलभता मिळेल, खटल्याचा खर्च कमी होईल आणि न्याय मिळण्याची गती वाढेल. सरकारी कामकाज पाहण्यासाठी, सरकारी अधिकाऱ्यांना सहा जिल्ह्यांमधून मुंबईला जावे लागते ज्यामुळे वेळ, पैसा खर्च होतो आणि नियमित कामापासून दूर राहावे लागते. कोल्हापूर येथे सर्किट बेंचची स्थापना केल्याने सरकारी अधिकाऱ्यांना उच्च न्यायालयाच्या कामकाजाला उपस्थित राहणे आणि त्याच दिवशी त्यांच्या कार्यालयात परतणे सोयीचे होईल. यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास आणि सर्व सरकारी कार्यालयांचे कामकाज सुरळीतपणे सुरू राहण्यास निश्चितच मदत होईल (www.kdba.in(.

६. भौगोलिक स्थान व खर्च :

कोल्हापूर हे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची मागणी करणाऱ्या या सहा जिल्ह्यांसाठी मध्यवर्ती ठिकाण आहे. या सहा जिल्ह्यांतील वादग्रस्त पक्ष अर्ध्या तासापासून ते चार तासांत कोल्हापूरला पोहोचू शकतील. सहा जिल्ह्यांच्या वेगवेगळ्या भागातून कोल्हापूरला प्रवास करणे कमी खर्चिक होईल. सहा जिल्ह्यांमध्ये मध्यभागी असलेले कोल्हापूर हे वादग्रस्त पक्ष आणि वकिलांना वाहतुकीच्या उपलब्ध साधनांसह प्रवास करणे सोयीचे आहे. अशाप्रकारे, खंडपीठ स्थापन केल्याने या प्रदेशातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाच्या जनतेला सोयीचे होईल. या प्रदेशाचा भूभाग सपाट आणि डोंगराळ आहे. रेल्वे आणि रस्त्यासारख्या जलद प्रवास आणि दळणवळणाच्या साधनांनी कोल्हापूर प्रदेशाच्या विविध भागांशी जोडलेले आहे. कोल्हापूर मध्यवर्ती ठिकाणी आहे आणि त्याचे ऐतिहासिक आणि इतर महत्त्व आहे.)www.kdba.in(.

जिल्हा	मुंबई - प्रवास खर्च (साधी बस जा-ये) (१.६६ रु /km)	कोल्हापूर- प्रवास खर्च (साधी बस जा-ये) (१.६६ रु /km)	प्रवास खर्च बचत (साधी बस जा-ये) (१.६६ रु /km)	प्रवास खर्च बचत (%)
सातारा	८६० रु	४०५ रु	४५५रु	५२.९०
सांगली	१२९८ रु	१५३ रु	११४५ रु	८८ .२१
कोल्हापूर	१२०८ रु	०रु	१२०८ रु	१००
रत्नागिरी	११२२ रु	५०१ रु	६२१ रु	५५.३४
सिंधुदुर्ग	१५१० रु	४४२ रु	१०६४ रु	७०.४६
सोलापूर	१३५५ रु	७८४ रु	५७१ रु	४२.१४

(तक्ता क्र. प्रस्तावित जिल्हे ते मुंबई व कोल्हापूर प्रवास खर्चाची तौलनिक स्थिती) (संदर्भ: https://msrtc.maharashtra.gov.in/(




Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

७. मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित खटल्यांची वाढती संख्या:

कोल्हापूर विभागातील प्रमुख न्यायालयात प्रलंबित खटल्यांची टक्केवारी २५% आहे.)www.kdba.in). मुंबई उच्च न्यायालयात ३१ मार्च २०२५ अखेर मागील १० वर्षातील एकूण ११६०६३ खटले प्रलंबित आहेत. (https://bombayhighcourt.nic.in/ (

वर्ष	दाखल खटले	निकाली खटले	प्रलंबित खटले	प्रलंबित खटले %
२०२५	१५०४२	१०१०५	४९३७	३२.८२
२०२४	३०००९	२९३१३	६९६	२.३१
२०२३	२२८९२	१६०९९	६७९३	२९.६७
२०२२	३०५५९	१८६८५	११८७४	३८.८५
२०२१	२१४५१	१३१७२	८२७९	३८.५९
एकूण	**११९९५३**	**८७३७४**	**३२५७९**	**२७.१५**

(तक्ता क्र. मुंबई उच्च न्यायालयात २०२१- ते २०२५ या वर्षात दाखल, निकाली व प्रलंबित खटल्यांची स्थिती) (संदर्भ: https://njdg.ecourts.gov.in/(



(आलेख क्र. मुंबई उच्च न्यायालयात २०२१ ते २०२५ या वर्षात दाखल, निकाली व प्रलंबित खटल्यांची स्थिती)

८. ई-न्यायालय (ई-कोर्टस) चा पर्याय व त्याच्या मर्यादा:

सर्वोच्च न्यायालयाने २००४ साली 'नेशनल पोलिशी एंड एक्शन प्लान फॉर इम्प्लिमेंटेशन ऑफ इन्फोर्मेशन एंड कम्युनिकेशन इन इंडिअन ज्युडीशरी-२००५' अन्वये राबविण्यात आलेल्याई-न्यायालय संकल्पनेवर देखरेख ठेवण्यासाठीई-समिती स्थापन केली. भारतातील सर्व न्यायालयांना परस्परांशी ई-प्रणाली व्दारे जोडणे, भारतीय न्याय व्यवस्थेला आय.सी.टी वर आधारित बनवणे, गुणात्मक व संख्यात्मक दृष्ट्या न्याय प्रदान व्येवस्थेला अधिक किफायतशीर, सुलभ (एक्सेसेबल), पारदर्शक व उत्तरदायी बनवणे या उद्दिष्ट पूर्तीसाठी ही समिती कार्यरत आहे. न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने २०२० साली गठीत केलेल्या तज्ञ उपसमितीने २०२२ मध्ये डिजिटल कोर्ट विजन एंड रोडम्याप या नावाने ई-कोर्ट प्रकल्पाचा फेज-३ अहवाल प्रकाशित केला आहे. ज्यामध्ये विश्वसनीय कनेक्टीविटी, पावर सप्लाई, संगणक, प्रिंटर, स्कॅनर उपलब्धतता निर्माण करणे, खुले न्यायालय आणि गोपनीयता व सुरक्षितता यामध्ये संतुलन साधने, विश्वसनीय डिजिटल भांडार तयार करणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून विविध घटकांच्या सुनावणीचे वेळापत्रक निर्धारित करणे, पोलीस, कैदी, कायदेविषयक सल्लागार व कोर्ट यांच्यात माहितीचे सुलभ देवाणघेवाण निर्माण करणे, वकील, पक्षकार, न्यायाधीश व नोंद कचेरी यांच्या मध्ये खटल्याच्या कागदपत्रांचीसुरक्षित पद्धतीने देवाणघेवाण निर्माण करणे, ई-फायलिंग व ई-चलनाची सुविधा निर्माण करणे, डिजिटल सुनावणीसाठी ओनलाईन दृक-श्राव्य व्यवस्था विकसित करणे, ई-नोटीस व ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून ओनलाईन समस्या निवारण करण्याची सुविधा निर्माण करणे ही ध्येय निशित केली आहेत. फेज १ व २ मध्ये १३६०६ न्यायालय संकुलात इंटरनेट स्पीड १० mbps पासून १०० mbps केले गेले, ४४२न्यायालय संकुलात सौर विद्दुत प्रकल्प बसविण्यात आले, ३४७७ न्यायालय संकुलात व्हिडीओ कोन्फेरेन्सिंग व्यवस्था निर्माण करण्यात आली, पक्षकार व वकिलांच्या सुविधेसाठी उच्च व जिल्हा न्यायालायामध्ये याचिका आणि कागदपत्रे दाखल करण्यासाठी २४*७ ई-फायलिंग सुविधा निर्माण केली आहे, ई- चलन सुविधा, QR कोड वापरून संबंधित केस माहिती (स्थिती, आदेश आणि केसलिस्ट) सहज उपलब्ध करून देणारे आणि शोधणारे मोफत डाउनलोड करण्यायोग्य ई-कोर्ट्स सर्व्हिसेस ॲप लॉंच केले आहे, खटल्याशी संबंधित अपडेट देणारी आटोमेटेड ई-मेल प्रणाली विकसित केली आहे.

असे असले तरी या दस्तेवाजात ई-कोर्ट प्रणाली विकसित करण्यात समोर क्षमता सुनिश्चित करणे, तंत्रज्ञान आणि डेटाचे एकत्रीकरण करणे आणि भागधारकांची स्वीकृती मिळवणे ही आव्हाने नोंद केली आहेत. (https://cdnbbsr.s3waas.gov.in/ (

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

ई-कोर्टच्या मर्यादा:

बेस स्थरातील मर्यादा- काही राज्यांमध्ये नेटवर्क कनेक्टिव्हिटीमध्ये तफावत आहे.पुरेसा डेटा स्पीड - आणि डेटा व्हॉल्यूम ही मूलभूत गरजा आहेत जी देशभरात एकसारखी उपलब्ध नाहीत.याव्यतिरिक्त, अंतिम वापरकर्त्यांमध्ये, म्हणजे वकील आणि पक्षकारांमध्ये, स्मार्टफोन, लॅपटॉप किंवा टॅब्लेट सारख्या उपकरणांमध्ये प्रवेश करण्याच्या क्षमतेमध्ये एक स्पष्ट तफावत आहे जी ई-कोर्ट सुविधांचा वापर करण्यास सक्षम बनवते. तसेच विद्यमान कर्मचाऱ्यांवर जास्त भार पडला आहे. ई-कोर्टच्या विविध मॉड्यूल्सचा पूर्णपणे वापर करण्यासाठी केंद्रित आणि सक्षम प्रशिक्षणाचा अभाव आहे.

शिफारशी:

1. न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारणे होय या तत्वाप्रमाणे कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीला होणारा विलंब म्हणजे या भागातील नागरिकांच्या न्यायाकडे केलेले दुर्लक्ष आहे.
2. खंडपीठ विभागणीमुळे मुख्य न्यायालय व खंडपीठांचे क्षेत्रफळ समान राहणार आहे. त्यामुळे प्रादेशिक समतोल राखण्यासाठी व न्यायचे विकेंद्रीकरण करण्यासाठी खंडपीठ निर्मिती करणे उपयुक्त ठरेल.
3. कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेमुळे मुंबई उच्च न्यायालयाचा एक चातुर्तांश (२६.९०) एवढा लोकसंख्येचा भार कमी होणार आहे, त्यामुळे प्रलंबित खटल्यांचा दबाव कमी करण्यासाठी खंडपीठ निर्मिती करणे उपयुक्त ठरेल.
4. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य स्थानाच्या तुलनेत कोल्हापूर खंडपीठाचे अंतर कमी असल्याने वेळेची व पैश्याची बचत होणार आहे त्यामुळे किफायतशीर न्यायासाठी खंडपीठ निर्मिती करणे आवश्यक आहे.
5. ई- न्यायालय प्रकल्पाच्या मर्यादा असल्याने तूर्तास प्रत्यक्ष कोल्हापूर खंडपीठ स्थापन करणे योग्य ठरेल.

संदर्भसूची:

1. https://bombayhighcourt.nic.in/history.php)१९.०६.२०२५, ११.२५ am)
2. https://kdba.in/khandpith-need-of-establishment-of-circuit-bench-of-bombay-high-court-at-kolhapur)२०.०६.२०२५, ५.३४ pm(
3. https://thc.nic.in/Central%20Governmental%20Acts/States%20Re-Organisation%20Act,%201956.pdf)१९.०६.२०२५, ११.३१ pm)
4. https://mls.org.in/PDF2024/monsoon/OOD/05-ASSEMBLY.pdf)१९.०६.२०२५, ११.०२ pm)
5. https://bombayhighcourt.nic.in/writereaddata/rtirules/PDF/prof312025.pdf)२३.०६.२०२५, ८ .१४ am)
6. https://njdg.ecourts.gov.in/hcnjdg_v2/?p=home/index&state_code=27~1&dist_code=2&app_token=
7. https://www.google.com/maps/
8. https://msrtc.maharashtra.gov.in/GeneralPages/FaresStructure-of-Bus-Services.aspx
9.)२३ .०६.२०२५, ७.५५ pm)
10. https://hcmadras.tn.gov.in/)२३ .०६.२०२५, ७.१४ pm)
11. https://censusindia.gov.in/census.website/data/population-finder)२३ .०६.२०२५, ८.४२ pm)
12. https://www.census2011.co.in/census/district/43-pudukkottai.html)२३ .०६.२०२५, ९.१७ pm(
13. https://paintmaps.com/map-charts/254c/Maharashtra-map-chart)२४. ०६.२०२५, ११ .३५ pm)
14. दै. पुढारी, १० मार्च २०२५
15. मुलाखत: एड. पी. एल. गावडे (माजी उपाध्यक्ष, गडहिंग्लज तालुका बार असोसियेशन) २१.०६.२०२५

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

तंत्रज्ञान, डिजिटल हक्क आणि भारतीय संविधान: नवीन आव्हाने आणि संरक्षणाची धोरणे

डॉ. नामदेव शामराव आडनाईक
भूगोलशास्त्र विभागप्रमुख, दहिवडी कॉलेज, दहिवडी, जि. सातारा.
Email: drnsa2122@gmaill.com

Manuscript ID:
JRD -2025-170907
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 40-43
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवारा

२१व्या शतकात डिजिटल तंत्रज्ञानाने मानवी जीवनात मूलगामी बदल घडवून आणले आहेत. भारतात इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ८०६ दशलक्षांवर पोहोचली असून, डिजिटल अर्थव्यवस्था देशाच्या जीडीपीच्या एक पंचमांशापर्यंत वाढत आहे. डिजिटल इंडिया अभियान, डिजिटल व्यवहार, आधार आणि यूपीआय यांसारख्या योजना डिजिटल परिवर्तनाला गती देत आहेत. मात्र, या बदलांमुळे गोपनीयता, डेटा सुरक्षा, डिजिटल विषमता आणि मूलभूत हक्कांवर होणारा परिणाम ही गंभीर चिंता निर्माण झाली आहे. भारतीय संविधानाने अनुच्छेद १४ (समानता), १९ (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) आणि २१ (जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य) अंतर्गत मूलभूत हक्कांचे रक्षण केले आहे. २०१७ च्या पुट्टस्वामी निर्णयाने गोपनीयता हक्काला मूलभूत दर्जा मिळाला, तर २०२५ च्या अमर जैन खटल्यात डिजिटल उपलब्धता मूलभूत हक्क म्हणून मान्यता देण्यात आली.

डिजिटल युगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी घटनात्मक चौकटीत नवीन अर्थघटन आवश्यक आहे. हा शोधनिबंध २०२४ च्या निवडणुकांमध्ये एआय-निर्मित सामग्रीचा वापर, गोपनीयता उल्लंघन (डीपीडीपी ॲक्ट २०२३ आणि २०२५ च्या ड्राफ्ट नियमांद्वारे), डिजिटल विभाजन (ग्रामीण-शहरी व लिंग-आधारित असमानता) आणि भविष्यातील डिजिटल शासनासाठी घटनात्मक चौकट (डिजिटल इंडिया ॲक्ट, २०२५) यांचा अभ्यास करतो. सदर शोधनिबंध डिजिटल हक्क, संविधान आणि भविष्यातील धोरणांवर प्रकाश टाकून, लोकशाही, समानता आणि वैयक्तिक स्वातंत्र्याला धोका देणाऱ्या आव्हानांना संविधानिक अनुकूलन आणि तंत्रज्ञानाच्या नैतिक वापराने संरक्षण करण्यासाठी धोरणे सुचवतो.

मुख्यशब्द: *डिजिटल तंत्रज्ञान, डिजिटल हक्क, भारतीय संविधान, गोपनीयता हक्क, डेटा संरक्षण, डीपीडीपी ॲक्ट २०२३, डिजिटल इंडिया ॲक्ट २०२५, डिजिटल विभाजन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डीपफेक, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, अनुच्छेद १४, १९ आणि २१, डिजिटल साक्षरता, डेटा गव्हर्नन्स, न्यायालयीन निर्णय, घटनात्मक सुधारणा, लोकशाही आणि समानता संरक्षण.*

प्रस्तावना

भारतीय संविधान एक जीवंत दस्तऐवज आहे, हे कालानुसार बदलते आणि नवीन आव्हानांना तोंड देते. डिजिटल तंत्रज्ञानामुळे उद्भवलेली परिस्थिती ही अशीच एक आव्हानात्मक बाब आहे. डिजिटल हक्क म्हणजे तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नागरिकांचे मूलभूत हक्क, गोपनीयता, माहितीचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि डेटा संरक्षण-सुरक्षित राहणे होय. भारतात डिजिटल हक्कांसाठी स्पष्ट घटनात्मक मान्यता नसली तरी सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद १४, १९ आणि २१ अंतर्गत त्यांचा समावेश केला आहे. डिजिटल युगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी संविधानाची भूमिका महत्त्वाची आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. नामदेव शामराव आडनाईक, भूगोलशास्त्र विभागप्रमुख, दहिवडी कॉलेज, दहिवडी, जि. सातारा.

How to cite this article:
आडनाईक, . नामदेव . शामराव . (2025). तंत्रज्ञान, डिजिटल हक्क आणि भारतीय संविधान: नवीन आव्हाने आणि संरक्षणाची धोरणे. Journal of Research & Development, 17(9(IV)), 40–43. https://doi.org/10.5281/zenodo.17708600

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17708600
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

डिजिटल क्रांतीने भारताला जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक बनवले आहे. २०२५ पर्यंत भारताची लोकसंख्या १.४६ अब्ज असून, इंटरनेट वापरकर्ते ८०६ दशलक्ष (५५.३%) आहेत. डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या १० वर्षांनंतर, यूपीआयने २०२४ मध्ये १८५.८ अब्ज व्यवहार नोंदवले, तर जून २०२५ मध्ये १८.४ अब्ज व्यवहार झाले. मात्र, ही प्रगती डिजिटल हक्कांच्या नवीन आव्हानांसोबत येते.

संविधान १९५० मध्ये लागू झाले, जेव्हा डिजिटल युगाची कल्पना नव्हती, तरीही ते मूलभूत हक्कांद्वारे डिजिटल अधिकारांचा आधार देते. अनुच्छेद २१ अंतर्गत पुट्टस्वामी खटल्यात (२०१७) गोपनीयता हक्क मूलभूत घोषित झाला, ज्याने आधार योजनेच्या डेटा गोपनीयतेच्या आव्हानांना सामोरे जाण्याचा पाया घातला. २०२५ च्या अमर जैन खटल्यात डिजिटल प्रवेशाला अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत हक्क म्हणून मान्यता मिळाली, ज्याने डिजिटल समावेशकतेची गरज अधोरेखित केली.

आव्हाने गंभीर आहेत. डिजिटल फेरफार, जसे डीपफेक, २०२४ च्या निवडणुकांमध्ये राजकीय माहिती विकृत करण्यासाठी वापरले गेले, ज्यामुळे लोकशाहीला धोका निर्माण झाला. २०२५ मध्ये भारत-पाकिस्तान संघर्षात एआय-निर्मित डीपफेकने माहिती युद्ध वाढवले. गोपनीयता हक्कांना डेटा उल्लंघन आणि सरकारी निगरानीमुळे धोका आहे; डीपीडीपी ॲक्ट २०२३ आणि २०२५ च्या ड्राफ्ट नियमांनी सुधारणा आणली आहे. डिजिटल विभाजन असमानतेचे प्रमुख कारण आहे. २०२५ च्या सीएमएस दूरसंचार सर्वेक्षणानुसार, १५-२९ वयोगटातील ९०% पेक्षा जास्त व्यक्ती इंटरनेट वापरतात, परंतु ग्रामीण भागात ३०% पेक्षा कमी घरांमध्ये होम इंटरनेट आहे, तर शहरीभागात ६०% पेक्षा जास्त आहे. डिजिटल कौशल्य कमकुवत आहे; फक्त ३२.२% युवक इलेक्ट्रॉनिक प्रेझेंटेशन बनवू शकतात. महिलांमध्ये ईमेल वापर ६४% कमी आहे, ज्यामुळे लिंगभेद वाढतो. दलित आणि आदिवासी समाज डिजिटल प्रवेशापासून वंचित आहेत.

भविष्यातील डिजिटल शासनासाठी डिजिटल इंडिया ॲक्ट २०२५ आयटी ॲक्ट २००० ची जागा घेऊन एआय रेग्युलेशन आणि डेटा गव्हर्नन्स मजबूत करेल. हा शोधनिबंध या आव्हानांचा अभ्यास करून घटनात्मक सुधारणा, डिजिटल साक्षरता आणि समावेशक धोरणे सुचवतो.

उद्दिष्टे (Objectives):

१. डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रभावाचे भारतीय संविधानावरील परिणामांचे विश्लेषण करणे.
२. गोपनीयता, डेटा संरक्षण, डिजिटल विभाजन यासारख्या मुद्द्यांची चर्चा करणे.
३. डिजिटल हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयीन आणि विधायक उपाययोजनांचे मूल्यांकन करणे.
४. भविष्यातील डिजिटल शासनासाठी घटनात्मक आणि कायदेशीर सुधारणांचा विचार करणे.

अभ्यास पद्धती)Research Methodology):

सदर शोधनिबंध दुय्यम महितीवर आधारित आहे, ज्यात संविधानिक दस्तऐवज, कायदे (आयटी ॲक्ट २०००, डीपीडीपी ॲक्ट २०२३, डिजिटल इंडिया ॲक्ट २०२५), न्यायालयीन निर्णय (पुट्टस्वामी २०१७, अमर जैन २०२५), अहवाल (ओक्सफॅम इंडिया २०२२, स्टेट ऑफ इंडियाज डिजिटल इकॉनॉमी २०२५),प्रकाशित शोध निबंध आणि वेब स्रोतांचा वापर केला आहे. गुणात्मक पद्धतीद्वारे साहित्याचे पुनरावलोकन आणि तुलनात्मक अभ्यास केला. प्राथमिक माहिती संकलन केले नाही, कारण अभ्यास सैद्धांतिक व धोरणीय आहे. २०२५ पर्यंतच्या अद्ययावत माहितीसाठी वेब शोध आणि ब्राउझिंगचा वापर केला.

मर्यादा: डिजिटल डेटा वेगाने बदलतो, त्यामुळे भविष्यातील बदल विचारात घ्यावे लागतील.

विश्लेषण आणि धोरणे (Analysis and Strategies):

१. डिजिटल फेरफाराचा प्रभाव (Impact of Digital Transformation)

डिजिटल तंत्रज्ञानाने भारतात समाज आणि अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडवला आहे. डिजिटल इंडिया, आधार, यूपीआय यामुळे सरकारी सेवा सुलभ झाल्या, मात्र माहिती सुरक्षा, गोपनीयता आणि नागरिक हक्क धोक्यात आहेत. सरकारच्या डेटा गोळा करण्याच्या धोरणांमुळे गोपनीयता भंगाची शक्यता वाढली.

डीपफेक तंत्रज्ञान एआय-आधारित विकृती निर्माण करते. २०२४ च्या तसेच २०२५ च्या निवडणुकांमध्ये राजकीय नेत्यांच्या क्लोन व्हिडिओ आणि आवाजांचा वापर माहिती विकृत करण्यासाठी झाला, ज्यामुळे मतदारांच्या धारणेवर प्रभाव पडला. ब्लॅकबर्ड एआयच्या अभ्यासानुसार, हे निवडणुकीय निकालांना प्रभावित करतात.

२०२५ च्या भारत-पाकिस्तान संघर्षात एआय-निर्मित डीपफेकने माहिती युद्धाला नवीन आयाम दिला. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या अहवालानुसार, डीएयूने व्हॉट्सॲप टिपलाइन आणि एआय डिटेक्शन टूल्सचा वापर केला. मात्र, हे महिलांविरुद्ध वैयक्तिक हल्ले वाढवते, जसे बनावट पोर्नोग्राफी, ज्यामुळे अनुच्छेद २१ अंतर्गत वैयक्तिक प्रतिष्ठा धोक्यात येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संविधानिक दृष्टिकोनातून, हे अनुच्छेद १९(१)(अ) च्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला आव्हान देते. भारतीय न्याय संहिता २०२३ ने प्रतिबंध लावला, परंतु अंमलबजावणी कमकुवत आहे.

डिजिटल फेरफारामुळे सामाजिक असंतुलन, निवडणुकीय हस्तक्षेप आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो.

२. गोपनीयता हक्क (Right to Privacy)

गोपनीयता हक्क संविधानाच्या केंद्रस्थानी आहे. पुट्टस्वामी प्रकरणात (२०१७) अनुच्छेद २१ अंतर्गत तो मूलभूत घोषित झाला, ज्याने डिजिटल डेटा गोपनीयतेचा पाया घातला. हा हक्क आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांशी सुसंगत आहे आणि डेटा संकलन, निगरानी रोखतो.

डिजिटल युगात डेटा उल्लंघन आणि निगरानीमुळे धोका वाढला. डीपीडीपी ॲक्ट २०२३ ने सहमती-आधारित प्रोसेसिंग, सुधारणा आणि मिटवण्याचा हक्क दिला, मात्र कमतरता आहेत. २०२५ च्या ड्राफ्ट नियमांनी क्रॉस-बॉर्डर ट्रान्सफरसाठी कडक मार्गदर्शक तत्त्वे आणली, ज्यात सरकारी मार्गदर्शन आवश्यक आहे.

जानेवारी २०२५ मध्ये मिनिस्ट्री ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड आयटी (मेटी) ने नियम जारी केले, ज्यात सहमती व्यवस्थापन स्पष्ट केले, परंतु सरकारी सूट टीकेचे कारण आहेत. एआय आणि बिग डेटाने फेसियल रेकग्निशनमध्ये भेदभाव वाढवला आहे.

गोपनीयता हक्कासाठी मजबूत डेटा प्रोटेक्शन बोर्ड, जनजागृती आणि न्यायिक हस्तक्षेप गरजेचा आहे.

३. डिजिटल विभाजन)Digital Divide)

भारतातील डिजिटल विभाजन बहुआयामी आहे. २०२५ मध्ये इंटरनेट प्रवेश ५५% आहे, परंतु ग्रामीण भागात कमी आहे.

सीएमएस सर्वेक्षणानुसार, १५-२९ वयोगटातील ९०% पेक्षा जास्त इंटरनेट वापरतात, परंतु त्यांची कौशल्य कमकुवत आहेत, ५६% भारतीय ईमेल वापरू शकत नाहीत, महिलांमध्ये ६४%.

कारणे: पायाभूत सुविधा अभाव, खर्च आणि जागरूकता. ऑक्सफॅम रिपोर्टनुसार, गरीब २०% कुटुंबांमध्ये फक्त ८.९% इंटरनेट आहे. दलित आणि आदिवासी समाजात डिजिटल प्रवेश कमी. परिणाम: शिक्षण आणि आरोग्यात असमानता, जसे महामारीत ऑनलाइन शिक्षणामुळे एससी/एसटी विद्यार्थी वंचित होते. संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ आणि २१ अंतर्गत समानता प्रभावित होते.

डिजिटल वापर वाढण्यासाठी भारतनेट विस्तार, डिजिटल साक्षरता कार्यक्रम आणि अनुदान अशा उपाययोजनांचा अवलंब करणे गरजेचे आहे.

५. भविष्यातील डिजिटल शासनासाठी घटनात्मक चौकट (Constitutional Framework for Future Digital Governance)

डिजिटल युगात हक्क संरक्षणासाठी घटनात्मक सुधारणा आवश्यक:

१. डिजिटल हक्कांची घटनात्मक मान्यता)गोपनीयता, डिजिटल उपलब्धता(.
२. सक्षम नियामक संस्था (डेटा प्राधिकरण).
३. जागरूकता आणि शिक्षण (डिजिटल साक्षरता).
४. कायदेशीर सुधारणा (सायबर सुरक्षा कायदे).

निष्कर्ष (Conclusion)

डिजिटल तंत्रज्ञानाने भारताच्या विकासात मोलाची भूमिका बजावली, परंतु नवीन आव्हाने निर्माण केली. गोपनीयता, डेटा सुरक्षा, डिजिटल विभाजन सोडवण्यासाठी घटनात्मक आणि कायदेशीर सुधारणा आवश्यक आहेत. संविधान हे सक्षम साधन आहे; न्यायालयीन निर्णय, विधायक उपाय आणि सामाजिक जागृतीद्वारे डिजिटल हक्क संरक्षित होऊ शकतात. भविष्यातील डिजिटल भारतासाठी घटनात्मक चौकट मजबूत आणि समावेशक असावी.

संदर्भ:

1. भारतीय संविधान.
2. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट, २०२३.
3. भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे अधिकृत जालस्थळ.
4. "डिजिटल इंडिया" अभियान, भारत सरकार.
5. "डिजिटल विभाजनावर अहवाल", निती आयोग, भारत सरकार.
6. "गोपनीयता आणि डेटा संरक्षण", विधी आयोग अहवाल क्र. २७२.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

7. "डिजिटल हक्क आणि भारतीय संविधान", डॉ. उपेंद्र बक्षी.
8. Justice K.S. Puttaswamy (Retd.) vs Union of India (2017) 10 SCC 1.
9. Justice K.S. Puttaswamy (Retd.) vs Union of India (2018) 1 SCC 809.
10. Shreya Singhal vs Union of India (2015) 5 SCC 1.
11. State of India's Digital Economy (SIDE) Report, 2025, ICRIER.
12. Draft Digital Personal Data Protection Rules, 2025, MEIT.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतातील संसदीय लोकशाही: आव्हाने आणि सुधारणा

डॉ. मारुती चांगदेव हजारे
एस. बी. पाटील कॉलेज, मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर
Email: marutihajare394@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170908
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 44-50
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असून, त्याची संसदीय व्यवस्था सात दशकांपासून टिकून आहे. भारतीय राज्यघटनेने १९५० साली देशाला संसदीय स्वरूपाची लोकशाही दिली, ज्याचे मूळ तत्त्व म्हणजे सत्ता ही जनतेची असून शासन हे उत्तरदायित्वाच्या चौकटीत चालते. तथापि, आज या लोकशाहीसमोर अनेक गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत — पक्षीय व्यवस्थेतील केंद्रीकरण, धनशक्तीचा प्रभाव, भ्रष्टाचार, कायदेमंडळाची घटती कार्यक्षमता, कार्यकारी व न्यायमंडळातील तणाव, तसेच सामाजिक-आर्थिक विषमता.

या आव्हानांमुळे लोकशाहीच्या गुणवत्तेत घट झाली असून, नागरिकांचा विश्वास आणि सहभाग कमी होत आहे. संशोधनातून असे निदर्शनास आले आहे की, लोकशाहीला केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक बळ देणे आवश्यक आहे. यासाठी राजकीय पक्षांतर्गत लोकशाही, पारदर्शक निवडणूक निधी, सक्षम विधिमंडळ, सामाजिक न्याय, आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. अशा सुधारणांद्वारे भारतीय संसदीय लोकशाही अधिक सक्षम, उत्तरदायी आणि लोकाभिमुख बनू शकते.

मुख्यशब्द: *भारतीय लोकशाही, संसदीय व्यवस्था, राजकीय पक्षव्यवस्था, निवडणूक सुधारणा, धनशक्ती, कायदेमंडळाची कार्यक्षमता, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, सामाजिक-आर्थिक विषमता, नागरिकांचा सहभाग, राजकीय सुधारणा, लोकशाही बळकटीकरण*

प्रस्तावना:

भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. सात दशकांपेक्षा जास्त काळापासून ही लोकशाही टिकून आहे ही स्वतःमध्ये एक मोठी उपलब्धी मानली जाते. भारतीय राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली आणि तिने देशाला संसदीय स्वरूपाची लोकशाही दिली. या व्यवस्थेचे मूळ तत्त्व असे की सत्ता ही जनतेची आहे आणि शासन हे जनतेच्या इच्छेनुसार व उत्तरदायित्वाच्या चौकटीत चालते. भारतीय संसदीय लोकशाहीची मुळे प्राचीन परंपरांमध्ये सापडतात. वैदिक काळापासून ते गणराज्य परंपरेपर्यंत, भारतीय समाजाने लोकनियुक्त प्रतिनिधींमार्फत शासन चालविण्याचे अनेक प्रयोग पाहिले. ब्रिटिशांच्या राजवटीदरम्यानच भारतात आधुनिक संसदीय पद्धतीची बीजे रोवली गेली. तथापि, खरी लोकशाही व्यवस्था १९५० नंतरच दृढ झाली. सार्वभौमत्व, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि प्रजासत्ताक हे भारतीय राज्यघटनेचे मूलभूत आधारस्तंभ आहेत. भारतीय संसदीय लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. या व्यवस्थेमुळे दुर्बल घटकांना प्रतिनिधित्व मिळाले, समानतेची जाणीव दृढ झाली आणि सामाजिक न्यायाचा मार्ग मोकळा झाला. तरीदेखील, लोकशाहीचे यश केवळ लिखित तरतुदींवर अवलंबून नसून त्या तरतुदींच्या अंमलबजावणीवर व नागरिकांच्या राजकीय संस्कृतीवर अवलंबून असते. आजच्या काळात भारताची लोकशाही अनेक गंभीर प्रश्नांना सामोरी जात आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. मारुती चांगदेव हजारे, एस. बी. पाटील कॉलेज, मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

How to cite this article:
हजारे, . मारुती . चांगदेव . (2025). भारतातील संसदीय लोकशाही: आव्हाने आणि सुधारणा. Journal of Research & Development, 17(9(IV)), 44–50. https://doi.org/10.5281/zenodo.17708711

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17708711
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

राजकीय पक्षीय व्यवस्था, निवडणूक प्रक्रिया, कायदेमंडळाचे कामकाज, न्यायमंडळ-कार्यकारी मंडळ संबंध आणि सामाजिक-आर्थिक विषमता या सर्वांनी मिळून लोकशाही व्यवस्थेला नवे आव्हान दिले आहे. जागतिकीकरण, माहिती-तंत्रज्ञान क्रांती आणि सामाजिक माध्यमांच्या प्रभावामुळे लोकशाही अधिक गुंतागुंतीची झाली आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारतीय संसदीय लोकशाहीतील अडचणींचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते. लोकशाही केवळ सत्तांतराचे साधन नसून ती जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणारी व्यवस्था आहे. त्यामुळे लोकशाहीतील त्रुटी दूर करून तिचे स्वरूप अधिक लोकाभिमुख करणे ही काळाची गरज आहे. निवडणूक सुधारणा, पक्षांतर्गत लोकशाही, विधिमंडळाची कार्यक्षमता, न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर ठोस सुधारणा केल्यास भारतीय संसदीय लोकशाही अधिक सक्षम, उत्तरदायी आणि लोकहितकारी होऊ शकते.

उद्दिष्ट्ये :

१) भारतातील संसदीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे व रचना समजून घेणे.
२) सध्याच्या काळात संसदीय लोकशाहीसमोरील प्रमुख आव्हाने ओळखणे – उदा. धनशक्तीचा प्रभाव, जातीय व प्रादेशिक राजकारण, भ्रष्टाचार, विधिमंडळाची घटती कार्यक्षमता, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ तणाव इ.
३) निवडणूक प्रणालीतील त्रुटी व पारदर्शकतेअभावी उद्भवणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
४) सामाजिक-आर्थिक विषमता आणि जनतेच्या घटत्या सहभागाचा लोकशाही प्रक्रियेवर होणारा परिणाम शोधणे.
५) भारतातील संसदीय लोकशाहीला बळकटी देण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचविणे.
६) आंतरराष्ट्रीय पातळीवरील संसदीय लोकशाहींची तुलना करून भारतीय लोकशाहीसाठी उपयुक्त धडे घेणे.
७) नागरिकांचा लोकशाहीतील सहभाग व विश्वास वाढविण्यासाठी परिणामकारक उपाययोजना मांडणे.

भारतातील संसदीय लोकशाहीसमोरील प्रमुख आव्हाने:

भारतातील संसदीय लोकशाहीने गेल्या सात दशकांत मोठ्या प्रमाणात स्थैर्य, विकास आणि सामाजिक परिवर्तन साधले आहे. तथापि, आजच्या काळात या व्यवस्थेसमोर अनेक गुंतागुंतीची आव्हाने उभी ठाकली आहेत. या आव्हानांचा अभ्यास केल्याशिवाय लोकशाहीच्या गुणवत्तेत सुधारणा घडविणे अशक्य आहे.

१) राजकीय पक्षव्यवस्थेच्या मर्यादा:

भारतीय संसदीय लोकशाही ही प्रामुख्याने पक्षीय लोकशाही आहे. राजकीय पक्ष हे लोकशाहीचे "इंजिन" मानले जातात. निवडणूक प्रक्रिया, धोरणनिर्मिती, शासन व विरोधक यांची भूमिका यावर पक्षव्यवस्थेचा थेट प्रभाव असतो. तथापि, भारतीय पक्षव्यवस्थेमध्ये काही गंभीर मर्यादा आढळून येतात, ज्या लोकशाहीच्या गुणवत्तेवर परिणाम घडवतात. भारतामध्ये पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव असलेला दिसून येतो. बहुतांश पक्षांमध्ये निर्णयप्रक्रिया केंद्रित असते. एका कुटुंबाचे किंवा काही मोजक्या नेत्यांचे वर्चस्व प्रबळ असते. सामान्य कार्यकर्ते किंवा तळागाळातील सदस्यांना धोरणनिर्मितीमध्ये सहभाग मिळत नाही. यामुळे पक्ष "जनाधारित" न राहता "नेताधारित" होतो, ज्यामुळे लोकशाहीचे तत्त्व कमजोर होते. तसेच अनेक राजकीय पक्षात राजकारण वंशपरंपरागत चालते. अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांत राजकारण हे वारशाने मिळालेल्या "हक्कासारखे" झाले आहे. यामुळे गुणवान पण सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी मिळणे कठीण होते. दीर्घकाळ टिकणारे वंशवादी नेतृत्व पक्षाच्या अंतर्गत चर्चेवर पडदा टाकते.

भारतातील सर्वच राजकीय पक्ष पैशाचे व सत्तेचे राजकारण करताना दिसून येतात. पक्षीय निवडणुका आणि उमेदवारी वाटप प्रक्रियेत धनशक्ती व गटबाजी निर्णायक ठरते. निधी संकलनाची प्रक्रिया बहुतांश वेळा अपारदर्शक असते, ज्यामुळे "काळ्या पैशा"चा प्रभाव वाढतो. परिणामी, तत्त्वनिष्ठ व लोकाभिमुख उमेदवारांना मागे टाकून आर्थिक बळ असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाते. नेते व कार्यकर्ते यांच्यात पक्षांतर मोठ्या प्रमाणात होऊन स्थिर राजकारणाचा अभाव निर्माण होतो. "आयुष्यभर एका पक्षाशी निष्ठा" ही संकल्पना हळूहळू विरळ होत चालली आहे. वैयक्तिक स्वार्थ व सत्तेच्या मोहामुळे पक्षांतराचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे सरकारांची स्थिरता धोक्यात येते. जरी १९८५ मध्ये पक्षांतरविरोधी कायदा अस्तित्वात आला असला, तरी गटफोड, बंडखोरी व इतर तांत्रिक पद्धतींनी त्याला चकवा दिला जातो. अनेक पक्ष हे प्रादेशिक किंवा जातीय आधारावर उभे राहतात. हे पक्ष स्थानिक हितसंबंधांना प्राधान्य देतात; परंतु राष्ट्रीय हित व सर्वसमावेशक धोरणनिर्मितीत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. त्यामुळे संघराज्य रचनेत केंद्र-राज्य संबंधांमध्ये तणाव निर्माण होतो.

भारतीय संसदीय राजकारणात विचारधारा क्षीण होताना दिसून येते. पूर्वी राजकीय पक्ष हे विशिष्ट विचारसरणीशी बांधील असत (उदा. समाजवाद, उदारमतवाद इ.). आज बहुतांश पक्ष "तत्त्वनिष्ठा" सोडून "सत्ताकेंद्रित" झाले आहेत. विचारधारेच्या अभावामुळे राजकीय पक्षांमधील मूलभूत फरक अस्पष्ट झाले असून तत्त्वनिष्ठ लोकशाहीपेक्षा सत्तेसाठीची स्पर्धा अधिक ठळक झाली आहे. भारतीय राजकीय पक्षव्यवस्था लोकशाहीचा कणा मानली जाते, पण त्यातील मर्यादा लक्षात घेतल्यास ही व्यवस्था नागरिकांचा विश्वास डळमळीत करू शकते. पक्षांतर्गत लोकशाही नसेल तर नागरिकांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व कमकुवत होते. अपारदर्शक निधीमुळे भ्रष्टाचार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

वाढतो आणि जनतेपेक्षा पैसा व सत्ता महत्त्वाची ठरते. प्रादेशिक व जातीय पक्षांचे वाढते वर्चस्व राष्ट्रीय एकात्मतेवर परिणाम घडवते. म्हणूनच, भारतीय संसदीय लोकशाही सक्षम ठेवण्यासाठी पक्षव्यवस्थेत अंतर्गत लोकशाही, निधी पारदर्शकता, विचारधारेचा आग्रह आणि पक्षांतरावर कठोर नियंत्रण ही सुधारणा अपरिहार्य आहे.

२) मतदान प्रक्रियेतील त्रुटी व धनशक्तीचा प्रभाव:

भारतीय लोकशाहीचा गाभा म्हणजे मतदान प्रक्रिया, जिच्या माध्यमातून सामान्य जनता आपले प्रतिनिधी निवडते. ही प्रक्रिया जितकी स्वच्छ, पारदर्शक आणि न्याय्य असेल, तितकी लोकशाही बळकट होते. परंतु आजच्या घडीला मतदान प्रक्रियेवर काही गंभीर त्रुटी व धनशक्तीचा अनिष्ट प्रभाव दिसून येतो. ज्यामुळे लोकशाहीचे मूळ तत्त्वच धोक्यात येऊ लागले आहे. मतदान प्रक्रियेत अनेक त्रुटी असलेल्या दिसून येतात. मतदार याद्यां सदोष असलेल्या दिसून येतात. अनेक वेळा मतदारांचे नाव यादीतून गहाळ असते किंवा चुकीच्या तपशीलांसह नोंद असते. परिणामी पात्र मतदार मतदानापासून वंचित राहतात. बनावट मतदानाचे प्रमाण वाढत आहे. काही ठिकाणी खोट्या ओळखीचा वापर करून मतदान केले जाते. ईव्हीएम किंवा मतदार ओळखपत्र असूनही काही ठिकाणी गैरप्रकार घडतात. काही ठकाणी मतदान केंद्रांची अनुपलब्धता असते उदा. ग्रामीण व दुर्गम भागांत मतदान केंद्रांपर्यंत पोहोचणे कठीण असते. यामुळे मतदान टक्केवारी कमी राहते. मतदान प्रक्रियेतदेखील अपारदर्शकता असलेली दिसून येते. जरी ईव्हीएम व VVPAT मुळे पारदर्शकता वाढली असली तरी अनेक मतदारांना अद्याप या प्रणालीवर शंका वाटते. मतदानावेळी राजकीय हस्तक्षेप व दबाव मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. काही वेळा स्थानिक नेते, कार्यकर्ते किंवा गटांकडून मतदारांवर दबाव आणला जातो.

भारतातील मतदान प्रक्रीयेवर धनशक्तीचा प्रभाव असलेला दिसून येतो. पैशाच्या माध्यमातून मत खरेदी (Vote Buying) केली जाते. निवडणुकीच्या काळात मतदारांना थेट पैसे, मद्य, वस्तू किंवा इतर सुविधा देऊन मतदानाचा कल बदलण्याचा प्रयत्न होतो. जाहिरात व प्रचारावर मोठ्या प्रमाणात पैशांचा वापर होताना दिसून येतो. मोठ्या प्रमाणावर निधी असलेले पक्ष व उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी भव्य प्रचार मोहीमा राबवतात. त्यामुळे लहान उमेदवारांना स्पर्धा करणे अवघड जाते. काहीवेळा समाजकल्याण योजनांचा राजकीय वापर होताना दिसून येतो. निवडणूक काळात काही ठिकाणी मत मिळवण्यासाठी शासकीय योजनांचा गैरवापर केला जातो. मतदानाच्या दिवशी धनशक्तीचा प्रभाव वापरून मतदान करवून घेतले जाते. मतदारांना केंद्रावर नेण्यासाठी वाहतूक, भोजन, थेट आर्थिक मदत यासारख्या पद्धतींचा अवलंब केला जातो. पैशाच्या जोरावर उमेदवार केवळ निवडून येत नाहीत, तर निवडून आल्यानंतरसुद्धा भ्रष्टाचार वाढण्याची शक्यता वाढते, कारण त्यांनी खर्च केलेले पैसे परत मिळवण्याचा मोह त्यांना होतो. यामुळे मतदान प्रक्रियेतील त्रुटी आणि धनशक्तीचा अतिरेकी वापर हे भारतीय लोकशाहीसाठी गंभीर आव्हान आहेत. मतदार जागरूकता, निवडणूक आयोगाचे कठोर नियंत्रण, आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यामुळेच या समस्यांना काही प्रमाणात आळा घालता येईल.

भारतीय राज्यघटनेतील लोकशाहीचे मूळ तत्त्व म्हणजे समान संधी होय. प्रत्येक नागरिकाला राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा व प्रतिनिधित्वासाठी उभे राहण्याचा हक्क आहे. परंतु वास्तवात निवडणूक प्रक्रिया धनशक्तीच्या प्रभावाखाली गेल्यामुळे हे तत्त्व दुर्बल होत आहे. लोकसभेपासून स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत सर्वच पातळीवर निवडणुका अतिशय खर्चिक झाल्या आहेत. एका संसदीय मतदारसंघात कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. अशा परिस्थितीत सामान्य मध्यमवर्गीय किंवा गरीब पार्श्वभूमीतील उमेदवार स्पर्धेत टिकूच शकत नाही. निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर काळ्या पैशाचा वापर केला जातो. मतदारांना आकर्षित करण्यासाठी रोख रक्कम, वस्तूंचे वितरण, मद्यपानाचे आयोजन अशा पद्धती वापरल्या जातात. त्यामुळे राजकीय स्पर्धा तत्त्वनिष्ठ न राहता आर्थिक क्षमतेवर आधारित होते. मोठमोठ्या औद्योगिक व व्यावसायिक गटांकडून पक्षांना व उमेदवारांना मोठा निधी दिला जातो. या निधीमुळे निवडणुका जिंकण्याची क्षमता वाढते, परंतु त्याचा थेट परिणाम धोरणनिर्मितीवर होतो. निवडून आलेल्या प्रतिनिधींवर कंपन्यांची अप्रत्यक्ष पकड निर्माण होते, आणि लोकहितापेक्षा कॉर्पोरेट हितसंबंध महत्त्वाचे ठरतात. पैशाच्या अतिरेकी वापरामुळे समान संधीचे तत्त्व बाधित होते. ज्याच्याकडे पैसा व संपर्क नाही, तो उमेदवार निवडणूक लढविण्याच्या प्राथमिक टप्प्यातच मागे पडतो. "लोकशाही ही सर्वांना समान संधी देणारी आहे" हे संविधानिक तत्त्व प्रत्यक्षात केवळ संपन्न व प्रभावशाली गटांसाठी उपलब्ध राहते. यामुळे लोकशाही प्रक्रिया "जनतेची सत्ता" न राहता "पैशाची सत्ता" (Money Power) ठरते. पैसा व कार्पोरेट निधीच्या आधारावर निवडणूक जिंकणारे प्रतिनिधी जनतेपेक्षा त्यांना निधी देणाऱ्या गटांसमोर उत्तरदायी होतात. त्यामुळे धोरणांमध्ये पक्षपात, भ्रष्टाचार, आणि लोकहितापेक्षा खासगी लाभाला प्राधान्य दिले जाते. हळूहळू जनतेचा लोकशाहीवरील विश्वास कमी होतो. काळा पैसा आणि कार्पोरेट निधीमुळे भारतीय लोकशाहीतील "समान संधीचे तत्त्व" गंभीरपणे बाधित झाले आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी राजकीय निधी पारदर्शक करणे, राज्यनिधीतून निवडणुकीचा विचार, अनधिकृत खर्चावर कठोर नियंत्रण, निधी संकलनाची डिजिटल यंत्रणा अशा सुधारणा तातडीने आवश्यक आहेत. अन्यथा लोकशाहीतील खरी स्पर्धा नागरिकांच्या विचारांवर नव्हे, तर उमेदवाराच्या आर्थिक क्षमतेवर आधारित राहील.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

३) कायदेमंडळाची घटती कार्यक्षमता:

भारतीय संसदीय लोकशाहीत कायदेमंडळ हे सर्वोच्च प्रतिनिधी संस्थान आहे. संसद व राज्य विधानमंडळ या संस्था कायदे निर्माण करणे, कार्यपालिकेवर नियंत्रण ठेवणे आणि जनतेच्या आकांक्षा व्यक्त करणे यासाठी स्थापन केली गेली. परंतु गेल्या काही दशकांत कायदेमंडळाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय घट झाल्याचे दिसून येते. संसद किंवा विधानसभांमध्ये वारंवार गोंधळ, घोषणाबाजी आणि बहिर्गमन घडते. यामुळे अधिवेशनातील कामकाज मोठ्या प्रमाणात वाया जाते. संसदीय परंपरेतील चर्चा व तर्कशुद्ध वादविवाद हे घटक दुय्यम ठरतात, आणि पक्षीय संघर्ष प्रबळ होतो. भारतातील संसद अधिवेशनांची संख्या व कालावधी सतत कमी होत चालला आहे. ब्रिटनसारख्या संसदीय देशांमध्ये दरवर्षी सरासरी १२०-१५० दिवस अधिवेशन चालते; भारतात ते बहुतेक वेळा ६०-७० दिवसांवरच मर्यादित राहते. त्यामुळे महत्त्वाचे विधेयक किंवा धोरणात्मक चर्चा पुरेशी घडत नाही. अनेक वेळा महत्त्वाचे विधेयक गोंधळाच्या वातावरणात पुरेशी चर्चा न होता पास केले जाते. विधिमंडळातील तपशीलवार चर्चा व विश्लेषण ही प्रक्रिया कमकुवत होत असल्याने कायद्यांची गुणवत्ता घटते. समित्या ही संसद व विधानसभेच्या कार्यक्षमतेचे महत्त्वाचे साधन आहेत. पण समित्यांतील शिफारसींना सरकार पुरेसे गांभीर्याने घेत नाही. परिणामी, समित्यांचे कार्य हे केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहते. कायदेमंडळाचे एक प्रमुख कार्य म्हणजे कार्यकारी मंडळाला उत्तरदायी असणे. परंतु सत्तारूढ पक्षाचे वर्चस्व असल्याने प्रश्नोत्तर, स्थगन प्रस्ताव यासारख्या प्रक्रियांना महत्त्व कमी मिळते. कार्यकारी मांडला अधिक सशक्त तर कायदेमंडळ अधिक कमकुवत होत चालले आहे. अनेक सदस्य हजेरी व चर्चेत सक्रिय सहभाग दाखवत नाहीत. चर्चेत स्थानिक मुद्दे व राजकीय आरोप-प्रत्यारोप यांनाच जास्त महत्त्व दिले जाते. यामुळे कायदेमंडळ हे जनतेच्या खऱ्या समस्यांवर केंद्रित राहात नाही.

कायदेमंडळाची घटती कार्यक्षमता ही लोकशाहीसाठी गंभीर धोक्याची घंटा आहे. अल्प कामकाज, गोंधळ, आणि घाईगडबडीत पारित विधेयकं यामुळे संसदीय संस्थांची प्रतिष्ठा कमी होते. जनतेमध्ये विश्वास कमी होतो आणि लोकशाही "प्रातिनिधिक शासन" न राहता "कार्यपालिकेचे वर्चस्व" ठरते. म्हणूनच सुधारणा म्हणून : अधिवेशनाचे दिवस किमान १००-१२० असावेत, संसदीय समित्यांना बंधनकारक अधिकार द्यावेत, गोंधळ करणाऱ्या सदस्यांवर कठोर कारवाई करावी, कायदे मंजुरीपूर्वी जनतेशी संवाद व पारदर्शक चर्चा घडवावी. यामुळेच कायदेमंडळ पुन्हा प्रभावी व उत्तरदायी होऊ शकते.

४) कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्यातील तणाव:

कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्यातील तणाव हा भारतीय संसदीय लोकशाहीतील एक महत्त्वाचा आणि सतत चर्चिला जाणारा मुद्दा आहे. भारतीय राज्यघटनेत सत्ताविभाजनाचे तत्त्व मान्य केले गेले आहे. परंतु कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व न्यायमंडळ या तिन्ही घटकांमध्ये पूर्ण विभाजन नसून समतोल व समन्वय आहे. तरीही, अनेकदा कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्यात संघर्ष व तणाव दिसून येतो. न्यायालयीन पुनरावलोकन या अधिकाराद्वारे न्यायमंडळाला संविधानाच्या आधारे कायदेमंडळाच्या निर्णयांचे पुनरावलोकन करण्याचा अधिकार आहे. कायदेमंडळाने घेतलेले निर्णय न्यायालय असंवैधानिक म्हणून घोषित करू शकते. त्यामुळे कार्यकारी मंडळ याला न्यायपालिकेचे अतिक्रमण मानते, तर न्यायमंडळ स्वतःला संविधानाचे संरक्षक मानते. तसेच नियुक्त्यांसंदर्भात अनेक वाद निर्माण झालेले दिसून येतात. न्यायाधीशांच्या नियुक्तीसंदर्भात कोलेजियम प्रणाली विरुद्ध राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग (NJAC) या मुद्द्यावर कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात संघर्ष झाला. कार्यकारी मंडळाला न्यायाधीशांच्या निवडीमध्ये हस्तक्षेप हवा असतो, तर न्यायमंडळ स्वतंत्रतेच्या नावाखाली तो हस्तक्षेप नाकारते. न्यायालये अधिक सक्रीय होऊन न्यायालयीन सक्रियता वाढताना दिसून येते. अनेक प्रसंगी सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी धोरणनिर्मितीशी संबंधित आदेश दिलेले दिसून येतात. (उदा. पर्यावरण संरक्षण, भ्रष्टाचारविरोधी कारवाई, धोरणांच्या अंमलबजावणीवर लक्ष). कार्यकारी मंडळ याकडे न्यायालयाने मर्यादा ओलांडणे म्हणून पाहते. परंतु न्यायमंडळाच्या मते, कार्यकारी मंडळ आपल्या कर्तव्यात निष्क्रीय ठरल्यास जनतेच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी न्याय मंडळाला हस्तक्षेप आवश्यक असतो. न्याय मंडळाचा कार्यकारी मंडळाच्या कामात धोरणात्मक प्रश्नांवरील हस्तक्षेप वाढत असलेला दिसून येतो. कार्यकारी मंडळ कायदेमंडळ जनतेला उत्तरदायी असते आणि धोरणनिर्मिती ही त्याची जबाबदारी असते. न्यायालय कधी कधी आर्थिक धोरणे, नियुक्त्या, प्रशासकीय निर्णय यातही हस्तक्षेप करते. यामुळे जनतेने निवडून दिलेल्या सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व न्यायमंडळ यामधील सत्तासंतुलनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कार्यकारी मंडळाच्या मते, न्यायमंडळाने कार्यकारी मंडळाच्या अधिकारक्षेत्रावर अतिक्रमण केले आहे. तर न्यायमंडळाच्या मते, कार्यकारी मंडळ अनेकदा संविधानविरोधी किंवा मनमानी पद्धतीने निर्णय घेते. या परस्परविरोधी दृष्टिकोनामुळे कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्यात तणाव व अविश्वासाचे वातावरण तयार होते.

कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्यातील तणाव हा लोकशाहीसाठी धोकादायक असू शकतो, पण तोच सत्तासंतुलनाचे आवश्यक लक्षणही आहे. न्यायमंडळ कार्यकारी मंडळास संविधानाच्या चौकटीत ठेवते. कार्यकारी मंडळ न्यायमंडळाला मर्यादेत राहण्याची आठवण करून देते. लोकशाही टिकवण्यासाठी दोन्ही संस्थांनी परस्परसंवाद आणि समन्वय साधणे आवश्यक आहे. नियुक्त्यांमध्ये पारदर्शक यंत्रणा, धोरणनिर्मितीतील न्यायमंडळाचे स्वायत्त अधिकार आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी न्यायालयाची जबाबदारी ही संतुलन साधणारी तत्त्वे आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

५) सामाजिक-आर्थिक विषमता:

सामाजिक व आर्थिक विषमता हे भारतीय संसदीय लोकशाहीसमोरील सर्वात गंभीर आणि बहुआयामी आव्हानांपैकी एक आव्हान आहे. भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य व सामाजिक न्याय देण्याचे आश्वासन दिले आहे. परंतु गेल्या सात दशकांत संसदीय लोकशाहीची वाटचाल करताना सामाजिक व आर्थिक क्षेत्रात खोलवर विषमता कायम असल्याचे दिसून येते. भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर जातीय व सामाजिक विषमता असलेली दिसून येते. भारतीय समाज अजूनही जातिव्यवस्थेच्या खोलवर परिणामाखाली आहे. अनुसूचित जाती-जमातींना आणि इतर मागासवर्गांना घटनात्मक आरक्षण मिळाले असले तरी सामाजिक भेदभाव, अस्पृश्यता व वंचितीकरण पूर्णपणे नाहीसे झालेले नाही. यामुळे लोकशाही प्रक्रियेत सर्वांचा समान सहभाग हे तत्त्व बाधित होते. भारतामध्ये आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात असलेली दिसून येते. भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असली तरी संपत्तीचे वितरण अत्यंत असमान आहे. काही मोजक्या श्रीमंत कंपन्या व व्यक्ती देशाच्या प्रचंड संपत्तीवर ताबा ठेवतात, तर मोठा वर्ग गरिबीत जगतो. ही विषमता राजकारणातही झिरपते. पैसा असलेले उमेदवारच निवडणुकीत यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते. तसेच शैक्षणिक व आरोग्यविषयक विषमताही मोठ्या प्रमाणात दिसून येते. ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक संधींमध्ये मोठी दरी निर्माण झालेली आहे. गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा केवळ शहरांमध्ये व श्रीमंतांसाठी उपलब्ध आहे. वंचित घटकांना योग्य शिक्षण व आरोग्यसेवा न मिळाल्यास ते लोकशाही प्रक्रियेत सक्रिय व समान सहभाग घेऊ शकत नाहीत. भारतात स्त्री-पुरुष विषमता मोठ्या प्रमाणात असलेली दिसून येते. महिला सक्षमीकरणासाठी विविध प्रकारची कायदे व धोरणे असली तरी प्रत्यक्षात राजकीय प्रतिनिधित्व आणि आर्थिक संधींमध्ये त्यांची स्थिती दुय्यम आहे. विधिमंडळातील महिला सदस्यांचे प्रमाण अजूनही १५% पेक्षा कमी आहे. समानतेचे तत्त्व अजूनही पूर्णत्वास गेलेले नाही. प्रादेशिक राजकारणचा विचार करता प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली दिसून येते. काही राज्ये व प्रदेश (उदा. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू) औद्योगिक व शैक्षणिकदृष्ट्या प्रगत झाले आहेत, तर इतर राज्ये (उदा. बिहार, ओडिशा) अजूनही मागे आहेत. संसाधनांचे असमान वितरण प्रादेशिक विषमता निर्माण करते, ज्याचा परिणाम लोकशाहीतील ऐक्य व स्थैर्य यावर होतो.

सामाजिक व आर्थिक विषमता संसदीय लोकशाहीवर दूरगामी परिणाम करते. सामाजिक व आर्थिक विषमता लोकशाहीतील समान संधी व समान सहभागाच्या तत्त्वाला बाधा आणते. गरीब, महिला, मागासवर्ग, व ग्रामीण जनता अनेकदा निर्णय प्रक्रियेपासून वंचित राहते. संपत्ती, जात, प्रादेशिक वर्चस्व यांच्या आधारे राजकीय सत्ता केंद्रीत होते. अशा असमानतेमुळे लोकशाही "जनतेची सत्ता" न राहता "संपन्न व प्रभावशाली गटांची सत्ता" ठरते. शिक्षण व आरोग्य क्षेत्रात समान व सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करणे. निवडणुकीत पैसा व जातीपलीकडे जाऊन समान संधी निर्माण करणारे कायदे करणे. सामाजिक न्यायाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणे. महिलांचे व अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी आरक्षण व सकारात्मक उपाय योजना करणे इत्यादी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रादेशिक संतुलन साधण्यासाठी समान विकास धोरणे राबविणे या माध्यमातून संसदीय राजकारणात सुधारणा व उपाययोजना केल्या जाऊ शकतात. सामाजिक व आर्थिक विषमता ही भारतीय संसदीय लोकशाहीसाठी प्रमुख आव्हान आहे. राज्यघटनेचे उद्दिष्ट असलेले सामाजिक न्याय, समानता व लोकसहभाग प्रत्यक्षात आणण्यासाठी ही विषमता कमी करणे आवश्यक आहे. अन्यथा लोकशाही केवळ नावापुरती राहून तिचा खरा आशय अपूर्ण राहील.

६) संसदीय लोकशाहीवरील जनतेचा घटता विश्वास आणि सहभाग:

भारतीय संसदीय लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या सक्रिय सहभागावर आणि संस्थांवरील विश्वासावर अवलंबून आहे. परंतु गेल्या काही दशकांत या दोन घटकांमध्ये चिंताजनक घट झालेली दिसते. संसदीय लोकशाहीपुढील एक महत्वाचे आव्हान म्हणजे निवडणुकीतील घटता मतदानाचा टक्का होय. काही राष्ट्रीय निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का वाढलेला दिसतो, पण शहरी मध्यमवर्गीय व तरुण मतदारांचा सहभाग कमी आहे. ग्रामीण व गरीब मतदार तुलनेने अधिक मतदान करतात, तर उच्चभ्रू गट अनेकदा निवडणूक प्रक्रियेपासून दूर राहतात. यामुळे लोकशाहीतील समान सहभागाचे तत्त्व बाधित होते. जनतेचा राजकीय संस्थांवरील अविश्वास कमी होत चालला आहे. भ्रष्टाचार, अपारदर्शक निधी, गुन्हेगारी प्रवृत्तीचे उमेदवार यामुळे जनतेत संशय निर्माण होतो. संसद व विधानसभांतील गोंधळ, अपुरे कामकाज आणि पक्षांतील सततचे आरोप-प्रत्यारोप यामुळे नागरिकांचा विश्वास कमी होतो. लोकशाही प्रक्रियेत विविध घटकांना असमान प्रतिनिधित्व मिळालेले दिसून येते. समाजातील वंचित घटकांना निर्णयप्रक्रियेत प्रभावी आवाज मिळत नाही. संपन्न व प्रभावशाली वर्गाचे वर्चस्व असल्याने गरीब व वंचितांच्या समस्यांकडे दुय्यम दृष्टिकोन ठेवला जातो. त्यामुळे नागरिकांना वाटते की लोकशाही ही "आपली" नसून "त्यांची" आहे. याच जोडीला नागरिकांचा राजकारणाकडे पाहण्याचा निष्क्रिय दृष्टीकोन बनलेला आहे. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित आहे अशी धारणा आहे. नागरिक सामाजिक चळवळ, सार्वजनिक धोरण चर्चा, स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये सक्रिय सहभाग घेत नाहीत. "राजकारण हे भ्रष्ट आहे, त्यात सहभागी होण्याचा उपयोग नाही" असा दृष्टिकोन वाढतो. नवमाध्यमांचा राजकीय परिणाम नकारात्मक बनत चाललेला आहे. सोशल मीडियावर अर्धवट माहिती, अफवा व ध्रुवीकरण करणारे संदेश पसरतात. यामुळे नागरिकांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक नकारात्मक होत आहे. माहितीवर आधारित विचाराऐवजी भावनात्मक व अविश्वासपूर्ण भूमिका प्रबळ होते. नागरिकांचा घटता विश्वास व सहभाग यामुळे लोकशाही

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

कमकुवत होते. निर्णयप्रक्रिया कमी लोकांपुरती मर्यादित राहते. समाजातील असंतोष वाढतो आणि लोकशाहीपेक्षा हुकूमशाहीसारख्या पर्यायांकडे झुकण्याचा धोका निर्माण होतो.

यावर उपाय म्हणून निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढवणे (उदा. राजकीय निधीची स्पष्ट माहिती) गरजेचे आहे. नागरिक शिक्षण (Civic Education) कार्यक्रम राबवून तरुणांमध्ये लोकशाहीविषयी जागरूकता वाढवणे. स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देऊन जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढवणे. संसद व विधिमंडळातील कामकाज अधिक प्रभावी व सुसंस्कृत करणे. सोशल मीडियावर तथ्याधारित संवाद प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. जनतेचा घटता विश्वास आणि सहभाग हा भारतीय संसदीय लोकशाहीसमोरील गंभीर आव्हान आहे. लोकशाही केवळ प्रतिनिधी निवडण्यापुरती मर्यादित न राहता, ती नागरिकांच्या सततच्या सहभागाने व विश्वासानेच सक्षम राहते. म्हणूनच नागरिक आणि संस्था यांच्यातील दरी कमी करणे हे लोकशाहीच्या भविष्यकालीन बळकटीसाठी अत्यावश्यक आहे.

निष्कर्ष:

भारतीय संसदीय लोकशाहीने गेल्या सात दशकांत अनेक यश संपादन केली आहेत. स्वातंत्र्यानंतर देश एकसंध ठेवणे, नियमित निवडणुका घेणे, विविधतेत एकता साधणे आणि घटनात्मक मूल्ये टिकवून ठेवणे. परंतु या लोकशाहीची वाटचाल अजूनही अनेक गंभीर आव्हानांनी वेढलेली आहे.

१) राजकीय पक्षव्यवस्थेतील मर्यादा लोकशाहीची गुणवत्ता घसरवत आहेत.
२) काळा पैसा व कार्पोरेट निधी निवडणुकांतील समान संधीच्या तत्त्वाला बाधा आणतात.
३) विधिमंडळाची घटती कार्यक्षमता आणि सततचे गोंधळ यामुळे संसद व विधानसभांवरील विश्वास कमी होतो.
४) कार्यपालिका व न्यायपालिका यांच्यातील तणाव सत्तासंतुलनाला नाजूक बनवतो.
५) सामाजिक-आर्थिक विषमता लोकशाहीतील समानतेच्या संकल्पनेला आव्हान देते.
६) जनतेचा घटता विश्वास व सहभाग लोकशाहीच्या मूळ पाया कमकुवत करतो.
७) तसेच निवडणूक आयोगाची स्वायत्तता, भ्रष्टाचार, प्रादेशिक असमतोल, लैंगिक विषमता यांसारखे मुद्देही लोकशाहीच्या स्थैर्याला धक्का देतात.

या सर्व आव्हानांमुळे भारतीय संसदीय लोकशाहीत "संख्यात्मक लोकशाही" (निवडणूक प्रक्रियापुरती) टिकली असली तरी "गुणात्मक लोकशाही" (समानता, पारदर्शकता, लोकसहभाग, सामाजिक न्याय) अजूनही अपूर्ण आहे.

समारोप:

भारतीय संसदीय लोकशाहीला खऱ्या अर्थाने बळकट करायचे असेल तर खालील बाबी अत्यावश्यक ठरतात :

१) राजकीय पक्षांचे अंतर्गत लोकशाहीकरण व पारदर्शक निधी व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे.
२) विधिमंडळाचे कामकाज सुधारून ते धोरणनिर्मितीचे प्रभावी केंद्र बनवणे अत्यावश्यक आहे.
३) न्यायमंडळ, कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यांच्यातील सत्तासंतुलन राखणे गरजेचे आहे.
४) सामाजिक-आर्थिक विषमता कमी करून सर्व घटकांचा समान सहभाग सुनिश्चित करावा लागेल.
५) निवडणूक आयोगाची स्वायत्तता व विश्वासार्हता वाढवणे गरजेचे आहे.
६) केवळ मतदानापुरता नव्हे तर धोरणनिर्मिती व सामाजिक बदलांमध्येही जनतेचा सक्रिय सहभाग व विश्वास पुनर्स्थापित करणे अत्यावश्यक आहे.

अशा सुधारणा घडवून आणल्यास भारतीय संसदीय लोकशाही केवळ संख्येतील सर्वात मोठी नसून गुणवत्तेतील सर्वात सक्षम लोकशाही ठरेल.

References:

1) Ambedkar, B. R. Constituent Assembly Debates. Government of India Publications, 1948.
2) Austin, Granville. The Indian Constitution: Cornerstone of a Nation. Oxford University Press, 1966.
3) Basu, D. D. Introduction to the Constitution of India. LexisNexis, 2020.
4) Chandra, Bipan, Mridula Mukherjee, and Aditya Mukherjee. India Since Independence. Penguin Books, 2016.
5) Jayal, Niraja Gopal. Democracy and the State: Welfare, Secularism and Development in Contemporary India. Oxford University Press, 2001.
6) Election Commission of India: Statistical Reports on General Elections. Election Commission of India, Various years.
7) Yadav, Yogendra. Democracy in India. Oxford University Press, 2000.
8) Palshikar, Suhas. "The Indian Democracy: Challenges Ahead." Economic and Political Weekly, vol. 49, no. 21, 2014.
9) Mehta, Pratap Bhanu. The Burden of Democracy. Penguin Books, 2003.

10) Lijphart, Arend. Patterns of Democracy: Government Forms and Performance in Thirty-Six Countries. Yale University Press, 1996.
11) Saxena, Rekha. Indian Parliament: The Changing Landscape. Routledge India, 2011.
12) The Constitution of India. Government of India, Ministry of Law and Justice, 1950.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधान निर्मिती ऐतिहासिक आढावा : चिकित्सक अभ्यास

डॉ. रामेश्वर विक्रम सपकाळ
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स एंड कॉमर्स, इचलकरंजी
Email: ramsapkal87@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170909
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 51-54
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित संविधान आहे. तिच्या निर्मितीचा प्रवास हा दीर्घ, ऐतिहासिक आणि जटिल असा होता. ब्रिटिश राजवटीतील 1773 चा नियमन कायदा, 1784 चा पिट्स इंडिया ॲक्ट, सनदी कायदे (1813, 1833, 1853), भारत सरकार कायदा (1858), भारतीय परिषद कायदे (1861, 1892), मोर्ले-मिंटो सुधारणा (1909), मोंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा (1919), आणि अखेरीस भारत सरकार कायदा (1935) या सर्व टप्प्यांत भारतीय संविधान निर्मितीची पायाभरणी झाली. कॅबिनेट मिशन (1946) आणि संविधान सभेच्या स्थापनेमुळे भारताच्या संविधान निर्मितीला संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीने न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित राज्यघटना तयार केली, जी 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारली गेली आणि 26 जानेवारी 1950 पासून लागू झाली. या संशोधन निबंधात भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक प्रवासाचा चिकित्सक अभ्यास करून त्यातील महत्त्वाच्या टप्प्यांचा, सुधारणा प्रक्रियेचा आणि नेतृत्वाच्या भूमिकेचा सखोल आढावा घेतला आहे.

मुख्यशब्द: *भारतीय राज्यघटना, संविधान निर्मिती, ब्रिटिश कायदे, भारत सरकार कायदा 1935, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मसुदा समिती, कॅबिनेट मिशन, संविधान सभा, स्वातंत्र्य, समानता, न्याय, बंधुता, घटनात्मक इतिहास*

प्रस्तावना:

भारतीय राज्यघटना हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय तसेच प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या मूल्यांची राज्यघटनेत बीजे रोवून भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यात आली. भारतीय संविधान निर्मितीही भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये अद्वितीय अशी घटना आहे. संविधान निर्मितीप्रदीर्घचाललेली प्रक्रिया होती.भारतातील संविधान निर्मितीचा प्रवास ही एक दीर्घकाल चाललेली ऐतिहासिक घटना आहे, जी विकसित होत चाललेली राजकीय परिस्थिती आणि भारतीयांमध्ये प्रतिनिधित्व आणि अधिकारांच्या वाढत्या मागण्या प्रतिबिंबित करते. ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या सुरुवातीच्या कायदेविषयक चौकटींपासून ते भारतीय संविधानाच्याअंतिम मसुद्याच्या निर्मितीपर्यंत, प्रत्येक टप्प्याने देशाच्या लोकशाही पायाभूत सुविधांना आकार देण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. प्रस्तुत संशोधन पेपरमध्येभारतीय संविधानाचा मार्ग मोकळा करणाऱ्या ऐतिहासिक संदर्भ आणि प्रमुख सुधारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.तसेचसंविधान प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे महत्त्वपूर्ण कायदे, कृती आणि चळवळींवर प्रकाश टाकला आहे.

प्रारंभिककायदेविषयक चौकटी आणि सुधारणा

1773चा नियमन कायदा

1773 चा नियमन कायदा हा ब्रिटिश भारतात प्रशासनाची चौकट स्थापन करण्याच्या दिशेने पहिले पाऊल होते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. रामेश्वर विक्रम सपकाळ, सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स एंड कॉमर्स, इचलकरंजी.

How to cite this article:
सपकाळ, . रामेश्वर . विक्रम . (2025). भारतीय संविधान निर्मिती ऐतिहासिक आढावा: चिकित्सक अभ्यास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 51–54.
https://doi.org/10.5281/zenodo.17708795

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17708795

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

त्याचा उद्देश ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराचे नियमन करणे आणि नियंत्रण आणि संतुलनाची व्यवस्था सुरू करणे हा होता. या कायद्याने भारतावर ब्रिटिश संसदीय नियंत्रणाची सुरुवात केली. या कायद्याने भारतासाठी प्रशासनावर देखरेख करण्यासाठी गव्हर्नर जनरल पदाची निर्मिती करण्यात आली.

1784चा पिटचा भारत कायदा

1784 च्या पिट्स इंडिया ॲक्टने दुहेरी शासन व्यवस्था निर्माण करून ब्रिटिश नियंत्रण आणखी मजबूत केले. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीवर ब्रिटिश संसदेचा अधिकार स्थापित झाला, ज्यामुळे कंपनी ब्रिटिश राजघराण्याच्या हितासाठी काम करेल याची खात्री झाली. या कायद्याने कंपनीच्या कारभाराचे व्यवस्थापन करण्यासाठी 'नियंत्रण मंडळा'ची स्थापना केली, ज्यामुळे जबाबदारी वाढली.

सनदी कायदे 1813, 1833आणि 1853.

सनदी कायदे हे प्रशासकीय दृष्टिने महत्त्वपूर्ण होते. ज्यामुळे हळूहळू भारतीयांचा प्रशासनात सहभाग वाढला.

- 1813 चा चार्टर कायदा: कंपनीच्या परिषदेत भारतीय सदस्यांची नियुक्ती करण्यास परवानगी, भारतीय प्रतिनिधित्वाच्या दिशेने पहिले पाऊल.
- 1833 चा चार्टर कायदा: भारतासाठी एकच कायदेमंडळ सुरू केले आणि अधिकाधिक भारतीयांना प्रशासनात सहभागी करून प्रशासन सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवले.
- 1853 चा सनदी कायदा: या कायद्यानुसारकायदेमंडळाचा विस्तार केला आणि अप्रत्यक्ष निवडणुका सुरू केल्या, ज्यामुळे राजकारणात भारतीयांच्या सहभागाचा मार्ग मोकळा झाला.

भारत सरकारचा कायदा- 1857

1857 चा भारत सरकार कायदा हा भारतीय इतिहासातील एक महत्वाचा क्षण होता, कारण त्याने ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश राजघराण्याकडे सत्ता हस्तांतरित केली आणि भारताच्या भविष्यातील प्रशासनावर प्रभाव पाडणारी एक नवीन प्रशासकीय सरंचना स्थापन केली.तसेचईस्ट इंडिया कंपनी राजवट रद्द करणे, व्हाइसरॉय पदाची स्थापना, भारताच्या राज्य सचिवांना मदत करण्यासाठी 'भारतीय परिषद' नावाची एक नवीन संस्था तयार करण्यात आली.

भारतीय परिषद कायदे: 1861 आणि 1892

1861 च्या भारतीय परिषद कायद्याने ब्रिटिश भारताच्या कारभारात एक महत्त्वाचा बदल घडवून आणला. त्यामुळे व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेत अशासकीय भारतीय सदस्यांचा समावेश करण्यास परवानगी मिळाली. इतक्या उच्चस्तरीय परिषदेत भारतीयांचे प्रतिनिधित्व होण्याची ही पहिलीच वेळ होती, ज्यामध्ये तीन भारतीयांनी विधान परिषदेत प्रवेश केला. या कायद्याने विविध प्रांतांमध्ये विधान परिषदांची स्थापना केली, ज्यामुळे मुंबई आणि मद्रास प्रांतांना काही कायदेविषयक अधिकार पुनर्संचयित झाले.

1892 चा भारतीय परिषद कायदा हा आणखी एक महत्वाचा कायदेशीर उपाय होता. त्यामुळे भारतातील विधान परिषदांचा आकार वाढला , ज्यामुळे भारतीयांनाअधिक प्रतिनिधित्व मिळाले. या कायद्याने अप्रत्यक्ष निवडणुका सुरू केल्या, म्हणजेच सदस्य थेट निवडून येण्याऐवजी नामनिर्देशित केले जात. परिषदांना अर्थसंकल्पावर चर्चा करण्याची आणि कार्यकारी मंडळाला प्रश्न विचारण्याची क्षमता यासह अधिक अधिकार देण्यात आले.भारतीय परिषद कायदे हे शासनात भारतीयांच्या सहभागाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरले, त्यातूनचभविष्यातील सुधारणांसाठी पाया घालत गेला.

मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा-1909

1909 च्या भारतीय परिषद कायद्याद्वारे स्थापन झालेल्या मोर्ले-मिंटो सुधारणांनी ब्रिटिश भारतातील राजकीय परिदृश्यात एक महत्वपूर्ण वळण घेतले. या कायद्याने शासनात भारतीयांचा सहभाग वाढवण्याच्या उद्देशाने अनेक महत्वाचे बदल घडवून आणले.त्यामध्येथेट निवडणुकाप्रथमच घेण्याचे ठरविले.ज्यामुळे अधिक प्रतिनिधीत्वपूर्ण निवडणूक प्रक्रिया शक्य झाली, विशिष्ट समुदायांना राखीव जागा असलेल्या प्रणालीची स्थापना केली व परिषदांमधील सदस्यसंख्येत लक्षणीय वाढ झाली, ज्यामुळे कायदेविषयक चर्चांना चालना मिळाली.मोर्ले-मिंटो सुधारणा हे शासनात भारतीयांच्या सहभागाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल होते, ज्यामुळे भविष्यातील संवैधानिक विकासाचा पाया रचला गेला.

1861, 1892 आणि 1909 चे भारतीय परिषद कायदे हे ब्रिटिश भारतातील प्रमुख सुधारणा होत्या ज्यांचा उद्देश प्रशासनात भारतीयांचा सहभाग वाढवणे होता.या सुरुवातीच्या कायदेविषयक चौकटींनी भविष्यातील सुधारणांसाठी आणि भारतात अधिक प्रतिनिधीत्व असलेल्या सरकारच्या स्थापनेसाठी पाया घातला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

मोंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा-1919

मोंटेग्यू -चेम्सफोर्ड सुधारणा हे भारताच्या घटनात्मक विकासातील एक महत्वाचे पाऊल होते. या सुधारणांचा उद्देश भारतीयांच्या प्रशासनात सहभागाच्या वाढत्या मागण्यांना संबोधित करणे होता. या कायद्याने अनेक महत्वाचे बदल आणले,प्रांतीय विषयांना राखीव आणि हस्तांतरित अशा दोन श्रेणींमध्ये विभागून द्विदलशाहीची व्यवस्था स्थापन करण्यात आली.प्रथमचकेंद्रीय पातळीवर द्विसदनीय कायदेमंडळ सुरू करण्यात आले.या बदलामुळे अधिक प्रतिनिधित्व आणि थेट निवडणुकांना परवानगी मिळाली.प्रशासनात भारतीय सहभाग वाढवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल होते.मोंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांनी भारतीय स्वराज्याच्या संघर्षात एक महत्वाचा टप्पा गाठला, ज्यामुळे भविष्यातील घटनात्मक विकासाचा पाया रचला गेला.या सुधारणा भारतीयांमध्ये वाढत्या राजकीय जागरूकतेला प्रतिसाद होता.

सायमन कमिशन(1928) आणि नेहरू अहवाल

1919 च्या भारत सरकार कायद्याचा आढावा घेण्यासाठी 1928 मध्ये सायमन कमिशनची स्थापना करण्यात आली. भारतातील राजकीय परिस्थितीचे मूल्यांकन करणे आणि बदल सुचवणे हे त्याचे उद्दिष्ट होते. तथापि, त्यात कोणत्याही भारतीय सदस्यांचा समावेश नसल्यामुळे त्यावर व्यापक टीका झाली. यामुळे देशभरात मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली.
1928 मध्ये प्रकाशित झालेला नेहरू अहवाल हा भारताच्या संवैधानिक विकासातील एक महत्त्वाचा प्रयत्न होता. त्यात भारतासाठी अधिराज्याचा दर्जा प्रस्तावित करण्यात आला होता आणि त्याचा उद्देश जातीय आणि राजकीय समस्यांना तोंड देणे होता. त्यातील काही प्रमुख शिफारसींमध्ये पुढील बाबी समाविष्ट होत्या.ब्रिटिश साम्राज्यात भारतासाठी पूर्ण स्वराज्य, सर्व प्रौढांसाठी सार्वत्रिक मताधिकार आणिसर्व समुदायांना समान हक्क , धर्माच्या आधारावर कोणताही भेदभाव होणार नाही याची खात्री.नेहरू अहवाल हा भारताच्या स्वातंत्र्याच्या शोधात एक महत्वाचा टप्पा होता, ज्यामध्ये सर्व भारतीयांना समाविष्ट असलेल्या संवैधानिक चौकटीच्या गरजेवर भर देण्यात आला होता.थोडक्यात, 1920 च्या दशकाच्या उत्तरार्धात भारताच्या राजकीय परिदृश्याला आकार देण्यात सायमन कमिशन आणि नेहरू अहवाल या दोघांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे भारतीय स्वराज्य आणि प्रतिनिधित्वाची वाढती मागणी अधोरेखित झाली.

भारत सरकार कायदा-1935

1935 चा भारत सरकार कायदा हा एक महत्वाचा कायदा होता, जो ब्रिटिशांनी भारतातील शेवटचा मोठा घटनात्मक सुधारणा कायदा म्हणून ओळखला जातो. हा कायदा ब्रिटिश संसदेने भारतासाठी मंजूर केलेला सर्वात मोठा कायदा होता. गोलमेज परिषदा आणि सायमन कमिशनच्या अहवालासह विविध चर्चांद्वारे तो आकाराला आला.या कायद्यानुसार, बंगाल, मुंबई, मद्रास, आसाम, बिहार आणि संयुक्त प्रांत या सहा प्रांतांमध्ये द्विसदनी व्यवस्था लागू करण्यात आली, अधिकारांचे तीन सूचींमध्ये विभाजन केले: संघराज्य सूची, प्रांतीय सूची आणि समवर्ती सूची, प्रांतांमधील द्विदल व्यवस्था रद्द करून त्यांना प्रांतीय स्वायत्तता दिली तसेचया कायद्यानुसार संघीय न्यायालय आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्याची तरतूद होती.

1935 च्या भारत सरकार कायद्याने भारतातील भविष्यातील घटनात्मक विकासाचा पाया घातला, ज्यामुळे भारतीय संविधानाच्या अंतिम मसुद्यावर परिणाम झाला.

क्रिप्स मिशन-1942

मार्च 1942 मध्ये, भारतीय नेत्यांशी वाटाघाटी करण्यासाठी क्रिप्स मिशन भारतात पाठवण्यात आले. दुसऱ्या महायुद्धादरम्यान ब्रिटिश युद्ध प्रयत्नांसाठी भारतीय सहकार्य मिळवणे हे या मिशनचे उद्दिष्ट होते. प्रस्तावांमध्ये हे समाविष्ट होते. युद्धानंतर भारताला अधिराज्याचा दर्जा देणे, युद्ध संपल्यानंतर भारतीय संविधान तयार करण्यासाठी निवडून आलेली संस्था स्थापन करणे व भारतीय राज्यांना संविधान निर्मिती प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी देणे. क्रिप्स मिशन अटीभारतीय नेत्यांनी मोठया प्रमाणात नाकारल्या, कारण त्यांना असे वाटले की ते पूर्ण स्वातंत्र्याच्या त्यांच्या मागण्या पूर्ण करत नाहीत.

कॅबिनेट मिशन-1946

मार्च 1946 मध्ये, ब्रिटिश सरकारकडून भारतीय नेत्यांकडे सत्ता हस्तांतरित करण्याबाबत चर्चा करण्यासाठी एक ब्रिटिश कॅबिनेट मिशन भारतात आले. या मिशनचा उद्देश नवीन संविधानासाठी एक चौकट तयार करणे होता. कॅबिनेट मिशन योजनेतील मुख्य प्रस्तावांमध्ये हे समाविष्ट होते.भारतीय राज्ये आणि ब्रिटिश प्रांत एकत्र येऊन भारत संघराज्य स्थापन करतील,३८९ सदस्यांसह एक संविधान सभा स्थापन केली जाईल, अंतरिम सरकारमध्ये प्रमुख राजकीय पक्षांचे 14 सदस्य असतील, संविधान सभा एक प्रतिनिधी संस्था म्हणून काम करेल व नवीन संविधान तयार होईपर्यंत, 1935 च्या भारत सरकार कायद्यानुसार भारतावर राज्य केले

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

जाईल.भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रवासात कॅबिनेट मिशन हा एक महत्त्वाचा क्षण होता, ज्याने भविष्यातील संवैधानिक विकासाचा पाया रचला.

प्रत्यक्ष घटना निर्मितीचा प्रवास

घटनेचा प्रवास हा अत्यंत खडतर असा झाला आहे. ब्रिटीश पंतप्रधानांनी स्वतंत्र होत असलेल्या भारतासाठी घटना असावी, यासाठी पुढाकार घेतला 9 डिसेंबर 1946 रोजी. घटना समिती गठीत करण्यात आली. सच्चिदानंद सिन्हा या समितीचे हंगामी अध्यक्ष होते. पुढं 11 डिसेंबर 1946 रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद या समितीचे अध्यक्ष झाले. समितीत 389 सदस्य होते. फाळणीनंतर 292 सदस्यसंख्या झाली. समितीच्या 11 बैठका झाल्या, त्या 165 दिवस चालल्या. समितीच्या 19 उपसमित्या जलद कामकाजाच्या दृष्टीनं कार्यरत होत्या. त्यात मसुदा समिती होती. या महत्वाच्या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. या मसुदा समितीच्या 44 सभा झाल्या. 13 फेब्रुवारी 1947 रोजी या समितीने घटनेचा मसुदा अध्यक्षांना सादर केला. त्यानंतर हा मसुदा जनतेच्या विचारार्थ खुला ठेवण्यात आला.

घटनेचा मसुदा आणि चर्चा

भारतीय जनतेनं मसुदा समितीला सात हजार 535 सूचना सादर केल्या. त्यातील काही सूचना रद्द ठरवून दोन हजार 473 सूचनांवर सविस्तरपणे चर्चा घडविण्यात आली आणि त्या रास्त सूचना स्वीकारण्यात आल्या. ही चर्चा 144 दिवस चालली. 4 नोव्हेंबर 1949 रोजी चर्चेची प्रक्रिया सुरू होती. घटनेचा सुधारित मसुदा तयार करून समितीनं 25 नोव्हेंबरला सादर केला. त्याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समितीसमोर समारोपाचे भाषण झाले. 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीने या सुधारित मसुद्याला मान्यता दिली व तो स्वीकारण्यात आला. अशारितीने राज्यघटना समितीची प्रक्रिया पूर्ण झाली. 26 जानेवारी 1950 रोजी तिची अंमलबजावणी करण्यात आली आणि भारतीय सार्वभौमप्रजासत्ताक राज्य अस्तित्वात आले. 2 वर्षे 11 महिने 12 दिवस या प्रदीर्घ कालावधीत घटना समितीचं कामकाज चालले.

सर्वात मोठे लिखित संविधान

भारतीय राज्यघटना हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय तसेच प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या मूल्यांची राज्यघटनेत बीजे रोवून भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यात आली. संविधानाच्यामुळ घटनेत 1 प्रास्ताविका, 8 अनुसुची, 25 भाग आणि 395 कलमे होती.

निष्कर्ष

ब्रिटिश भारतातील संविधान निर्मितीचा प्रवास हा एक गुंतागुंतीचा आणि महत्वाची प्रक्रिया होती. विविध ऐतिहासिक घटना, सामाजिक चळवळी आणि राजकीय संघर्षांनी तो घडवला. ब्रिटिश सरकारने भारतीयावर कारभार व्यवस्थापित करण्यासाठी अनेक कायदे आणले, परंतु ते अनेकदा भारतीय लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यात अयशस्वी ठरले. महात्मा गांधी आणि डॉ.बी. आर. आंबेडकर सारख्या प्रमुख व्यक्तींनी हक्क आणि प्रतिनिधित्वासाठी महत्वाची भूमिका बजावली. शेवटी, अनेकांच्या प्रयत्नांमुळे सर्व नागरिकांसाठी न्याय, समानता आणि स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यासाठी एक संविधान तयार झाले. हा इतिहास समजून घेतल्याने आपल्याला आधुनिक भारताचा पाया आणि खरी समानता आणि न्याय मिळवण्यात येणाऱ्या आव्हानांची कदर करण्यास मदत निश्चितचहोईल.

संदर्भ:

1) कसबे रावसाहेब, डॉ. बाबासाहेब आणि भारतीय राज्यघटना, तृतीयाआवृत्ती, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे,2001.
2) २(जावडेकर श. द., आधुनिक भारत, प्रथम आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,विजयनगर पुणे,1938.
दलित साहित्याच्या प्रेरणा या बाबासाहेबांच्या विचारधारेत अर्थात संविधानिक हक्काने मूल्य व्यवस्थित दिसून येतात. 'दलित' जो जळला गेलेला भरडला गेलेला असा समाज या समाजाच्या व्यथा, वेदना, विद्रोह या दलित साहित्याच्या केंद्रस्थानी आहेत. हजारो वर्ष मूक गिळून असणाऱ्या समाज व्यवस्थेला दलित साहित्याने वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. 'दलित' हा एक मानव आहे ही भूमिका त्यांच्या साहित्यातून व्यक्त होऊ लागली. दलित चळवळ, दलित साहित्य प्रवाहाकडे अत्यंत प्रभावी होय . कारण 'दलित साहित्य' हे दलितांच्या चळवळीचे अपत्य असे म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलिताच्या आत्मसन्मानाची चळवळ सुरू केली. समता, न्याय, बंधुत्वाचा पुरस्कार केला. आड येणाऱ्या रूढी, धर्मग्रंथांना नकार देऊन त्यांनी संघर्ष करावा लागला. या संघर्षाचे चित्र म्हणजे 'दलित साहित्य' होय. या साहित्यात वर्णव्यवस्था रुढी यांना नकार देण्यात येतो. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्वचा पुरस्कार करताना दिसतात. म्हणून दलित साहित्याची चळवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणास्थान मानते. महात्मा फुले यांनाही प्रेरणा मानते कारण ते आंबेडकरांचे गुरु असल्यामुळे नव्हे तर त्यांच्या विचारात असणाऱ्या बंडखोरीमुळे महात्मा फुलेंच्या साहित्यात सुद्धा हाच विद्रोह प्रकट झालेला दिसतो . दलित साहित्याची चळवळीची पाळीमुळे खरे तर आंबेडकरी विचारात आहेत.

डॉ. आंबेडकरांच्या विचारातून दलित साहित्याचा प्रवाह निर्माण झाला आहे. आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोही घटक त्यांच्या विचारामुळे रुजले. आपण इतरांसारखेच माणसं आहोत, ही जाणीव झाली माणूस हे मूल्य महत्त्वाचे मानले. माणसाचे प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांना 'दलित साहित्य' केंद्रस्थानी मानते . प्रा. दत्ता भगत यांची दलित साहित्याची व्याख्या समर्पक वाटते. 'आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोणाद्वारे स्वतःला आणि स्वतःभोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य'.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विसाव्या शतकातील वादळी व्यक्तिमत्व होते. या देशातील बहुसंख्य दलित यांच्या माथी लावलेला अस्पृश्यता कलंक धुवून काढण्यासाठी त्यांना आक्रमक भूमिका घ्यावी लागली. पिळलेल्या , जखडलेल्या अस्पृश्यांच्या जीवनाची झालेली वाताहत पाहून त्यांचे मन पेटून उठले. त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या प्रकाराने हल्ले प्रतिहल्ले करावे या सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनाला चळवळीचे रूप प्राप्त झाले. डॉ. आंबेडकरांची ही चळवळ पुढे दलितांनी आत्मसात केली. डॉ. आंबेडकरांच्या अजोड नेतृत्वाखाली शेकडो वर्ष बहिष्कृत ठरविण्यात आलेल्या पददलित अस्पृश्य जनतेने सामाजिक समतेचा आपला मानवी हक्क प्रस्थापित केला. दलित हा केवळ गुलामच नाही तर त्याहीपेक्षा निकृष्ट आहे, असा हिंदू मानसिकतेचा गैरसमज झाला होता. तो डॉ. आंबेडकरांनी दूर केला. 'शूद्र पूर्वी कोण होते'? यातून त्यांनी सांगितले की, 'स्पृश्य अस्पृश्य किंवा स्त्री-पुरुष यात कोणी कोणाचे गुलाम नाही' मात्र स्वतःचे वर्चस्व कायम ठेवण्याकरता एक वर्ग दुसऱ्या वर्गाला गुलाम समजतो. आजपर्यंत केवळ-सवर्णाचीच नव्हे तर या संपूर्ण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

समाजातील हलक्या प्रतीची कामे करण्याची आपल्या नशीब लागले गेले असल्यामुळे जो केवळ नशिबावर दोष देऊन निष्क्रिय होतो तो दलित.

१९२० पूर्वी मराठी साहित्याने दलितांच्या जगण्या मरण्याची दखल घेतली नव्हती. त्या पाठीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटना कारणीभूत आहे, यापूर्वी जगात कोणती धर्मक्रांती रक्तपाताशिवाय झाली नाही. डॉ. आंबेडकरांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केल्याने संपूर्ण अस्पृश्य समाज त्यांच्या मागे जाऊ लागला.

आंबेडकरप्रणित साहित्य म्हणून दलित साहित्यामध्ये मराठीमध्ये महत्त्वपूर्ण दालन उघडले. त्याचे पाईक असलेले असंख्य दलित लेखक आज नव्या जाणीवेने साहित्याच्या विविध प्रांतांमध्ये गतिशील झाले आहेत. स्वतः डॉ. बाबासाहेब उत्कृष्ट वक्ते आणि विचारवंत लेखक असल्यामुळे त्यांच्या विचारांचा खोलवर परिणाम समग्र भारतीय जीवनावरच झाला, तर तसा तो मराठी कादंबरीवरही झाला. डॉ. आंबेडकर म्हणजे एक अशी विचारमोहिनी होते की, ज्या मोहिनीने दलित साहित्यिक भारलेले होते. भारतीय प्रबोधनकारांच्या परंपरेतील आंबेडकरांचे स्थान विशेष अर्थपूर्ण ठरते. दलितांच्या मानवतावादी ध्येयवादाला त्यांनी नवा आशय आणि नवे दिशा प्राप्त करून दिली . डॉ.आंबेडकरांचे विचार अखिल मानव जातीच्या दलित, पीडित, शोषित समयेच्या मुक्तीच्या लढ्याला मौलिक मागर्दर्शन करणारे आहेत.

डॉ. आंबेडकर यांचे 'भारतीय संविधान' दलित साहित्यिकाना ऊर्जा आणि प्रोत्साहन देणारे होते, त्यातूनच दलित जाणीवा वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारातून प्रामुख्याने कथा, कविता, कादंबरीच्या माध्यमातून दलित लेखक मुकर करू लागले. समाजातील विविध स्तरातील दलित लेखकांनी दलितांच्या जीवनाचे चित्र आपल्या वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारातून मांडले गेले. त्यामध्ये महार, मांग, चांभार, ढोर, देवदासी, आदिवासी, वेश्या,वाघ्या - मुरळी फासेपारधी, झोपडपट्टी, भटके विमुक्त, गारुडी, अनाथ, देवदासी या व इतर उपेक्षित वंचित अशा विविध स्तरातील दलितांच्या जीवनाची व्यथा हा दलित कादंबरीत लेखकांचा मुख्य केंद्रबिंदू होता. समस्त दलित लेखक आपल्या बांधवांच्या दुःखांना वाचा फोडण्याचे काम करू लागले आहे.

१२ व्या शतकापासून ते १९ व्या शतकातील तपशील पाहता अस्पृश्य समाज शूद्र समाज इथल्या वर्णवादी जातीवादी मनुप्रणित मानसिकतेकडून किती अमानुषपणे छळला गेला हे लक्षात येते. परंतु हजारो वर्षापासून गुलामगिरीच्या शृंखलाने जखडल्या गेलेला दलित समाज बाबासाहेबांच्या प्रेरणेने जागृत झाला. आणि शैक्षणिक , सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात पुढे जाऊ लागला. 'शिका', 'संघटित व्हा' आणि 'संघर्ष करा' या त्रिसूत्रीनुसार वाटचाल सुरू झाली. आणि त्यातूनच डॉ.बाबासाहेबांच्या चळवळीतून निर्माण झालेल्या दलित साहित्यिकांनी दलित लेखनाचा वसा अंगीकारला. आणि हजारो वर्षाच्या शृंखला त्यांनी उधळून लावण्यासाठी लेखणीचा हत्यार म्हणून वापर केला, त्या पाठीमागे संविधानाचे हे सामर्थ्य होते आपल्या हक्काचे ज्ञान होताच दलित तरुणांनी हाती लेखणी घेतली .त्यातून आपले दुख ,अन्याय विद्रोह मांडू लागले. या साहित्याचे केंद्रस्थानी दलित मनुष्य होता तो मुक्तीचा लढा पुकारण्यास सज्ज झाला.

समारोप :

१९६० नंतर वेगवेगळ्या चळवळीतून विविध विविध साहित्य प्रवाह उदयास आले. त्यात प्रामुख्याने दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य आणि आदिवासी साहित्य प्रवाह होत. प्रत्येक साहित्यप्रमाणे एखादी विशिष्ट भूमिका घेऊन विचारांचा प्रसार व प्रचार केला असला, तरी वाङ्मय मूल्य अबाधित आहेत. मराठीतील साहित्याचा आढावा घेताना लक्षात येते की, दलित मुक्ती आंदोलनाची सांस्कृतिक आघाडी प्रामाणिकपणे दलित साहित्याच्या माध्यमातून कार्य करत आहेत. दलित साहित्यिकांना आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते म्हटले तरी चुकीचे ठरणार नाहीत. कारण आंबेडकरी तत्त्वज्ञानातूनच दलित साहित्याचा उदय झाला. दलित साहित्य खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचे उद्धाते आहेत, त्यांचे खरे बळ आणि ऊर्जास्त्रोत म्हणजे डॉ. आंबेडकरांचे तत्त्वनिष्ठ विचार, त्यांची तत्त्वप्रणाली. तरुण दलित लेखकांच्या साहित्यातील क्रांतिकारक, विद्रोहाची दिशा आहे. म्हणून नामदेव ढसाळ कवितेतून खडा सवाल विचारतात,

'स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचे नाव आहे?

रामराज्याच्या कितव्या घरात आपण होतो? **गोलपिठा'** पृष्ठ. ७४

दलितांमध्ये आत्मभान, आत्मशोध डॉ बाबासाहेबांच्या विचारामुळे निर्माण झाले. आणि त्याचे परिवर्तन पुढील नकार आणि विद्रोहात झाले.एकूणच दलित साहित्याच्या निर्मितीसाठी संविधान हे प्रेरणास्त्रोत आहे. समतेचा आणि मानव मुक्तीचा पुरस्कार करणारे साहित्य हे दलित साहित्य होय.

संदर्भ ग्रंथ :

1. धनंजय कीर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन, मुंबई.
2. भालचंद्र फडके :डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीविषयक चिंतन, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.
3. रावसाहेब कसबे : डॉ. आंबेडकर आणि राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे.
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर : भारताचे संविधान, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.
5. विलास काळे : दलित कादंबरी आशय आणि आविष्कार सुगावा प्रकाशन, पुणे.
6. सुशीला ढगे : मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा प्रकाशन, पुणे.
7. हरिश्चंद्र थोरात : कादंबरीविषयी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

दलित साहित्य आणि संविधान: संविधान, हक्क व अस्तित्व

प्रा. डॉ. के. एम. लोखंडे
बिटको महाविद्यालय, नाशिकरोड, नाशिक
Email: kautiklokhande@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170913
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 71-78
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

या संशोधन प्रबंधात दलित साहित्य व भारतीय संविधान यांचा परस्पर संबंध अभ्यासण्यात आला आहे. भारतीय संविधानाने दलित समाजाला समानता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित हक्कांची हमी दिली आहे. अनुच्छेद १४ ते १८ द्वारे समानतेचा हक्क, अनुच्छेद १९ ते २२ द्वारे स्वातंत्र्याचा हक्क, अनुच्छेद २३-२४ द्वारे शोषणाविरुद्धचे संरक्षण, तसेच अनुच्छेद ३२ द्वारे घटनात्मक उपचारांचा अधिकार देण्यात आला आहे. या तरतुदींमुळे दलितांच्या अस्तित्वाला कायदेशीर आधार प्राप्त झाला आहे.

तथापि, संविधानिक हक्क असूनही समाजात भेदभाव, अन्याय आणि विषमता कायम आहेत. या वास्तवाला दलित साहित्याने सांस्कृतिक आणि साहित्यिक भाषेत अभिव्यक्त केले आहे. आत्मकथन, कविता, कथा, कादंबरी आणि समीक्षेद्वारे दलित लेखकांनी संविधानिक हक्कांचा अभाव, अपमान, संघर्ष, न्यायासाठीची झुंज आणि आत्मसन्मानाची जाणीव प्रभावीपणे मांडली आहे.

दलित साहित्य हे केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. हे साहित्य संविधानातील मूल्यांना जिवंत ठेवून समता, न्याय आणि मानवतेचा संदेश देते. म्हणूनच संविधान हे दलित साहित्याचे कायदेशीर आधारस्तंभ आहे, तर दलित साहित्य हे संविधानाच्या मूल्यांचे सांस्कृतिक प्रतिबिंब आहे. या दोन्हींच्या संगमातूनच दलित समाजाच्या हक्क व अस्तित्वाचे खरे बळ निर्माण होते.

मुख्यशब्द: भारतीय संविधान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दलित साहित्य, हक्क व अस्तित्व, समानता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, अस्पृश्यता निवारण, आरक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मानवाधिकार, आंबेडकरवाद, साहित्य आणि संविधान.

प्रस्तावना

दलित साहित्य हे दलितांच्या जगण्यातील संघर्ष शोषण आणि आत्मसन्मानाचे अभिव्यक्ती आहे तर भारतीय संविधानाने अस्पृश्यता नष्ट करून आणि आरक्षणासारखे कायदे करून त्यांना सामाजिक न्याय व समान हक्क देण्याचा प्रयत्न केला आहे दलित साहित्य आणि संविधान यांच्यातील संबंध हा दलितांच्या हक्कांची मागणी सामाजिक बदलांचे आवश्यकता आणि समानतेच्या मूल्यांवर आधारित आहे जिथे साहित्य दलितांना आवाज देते आणि संविधान त्यांच्या अस्तित्वाला कायदेशीर आधार देते. दलित साहित्य हे दलितांचे अस्मिता मानवी प्रतिष्ठा आणि त्यांच्या हक्काची अभिव्यक्ती आहे हे साहित्य दलितांना त्यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आणि त्यांच्या अस्तित्वाला ओळख देण्यासाठी प्रेरणा देते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. डॉ. के. एम. लोखंडे, बिटको महाविद्यालय, नाशिकरोड, नाशिक

How to cite this article:
लोखंडे, . के . एम . (2025). दलित साहित्य आणि संविधान: संविधान, हक्क व अस्तित्व. Journal of Research & Development, 17(9(IV)), 71–78. https://doi.org/10.5281/zenodo.17709356

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17709356
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारतीय संविधानाचा पाया सामाजिक न्याय समानता आणि बंधुत्वावर आधारित आहे दलित साहित्य हे संविधानातील या मूल्यांना प्रत्यक्ष जीवनात आणण्याचे कार्य करते जिथे जात आधारित भेदभावाविरुद्ध लढा दिला जातो संविधानाने कलम 17 नुसार अस्पृश्येतेवर बंदी घातले आहे आणि अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक कायदा) १९८९ सारखे कायदे लागू केले आहेत जे दलितांना संरक्षण देतात आणि त्यांच्या हक्काचे संरक्षण करतात दलित साहित्यातून त्या कायद्याची आवश्यकता आणि त्यांचे अंमलबजावणी यावर भर दिला जातो दलित साहित्य हे केवळ अनुभव व्यक्त करत नाही तर ते समाजातील अरुण असलेल्या चातुर्वर्ण्य आणि धर्म बंधनाच्या विरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन मांडते त्यामुळे समाजातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण होते आणि सामाजिक बदलांना प्रोत्साहन मिळते हे साहित्य पारंपरिक समाजात दलितांचे तुटलेले आणि पीडित अस्तित्व दर्शवते परंतु त्याच बरोबर त्यांच्या भविष्यातील संघर्षाचे आणि एकात्मतेचे प्रतीकही आहे संविधान त्यांना या संघर्षातून बाहेर पडण्यासाठी सन्मानाचे जीवन जगण्यासाठी आवश्यक कायदेशीर आणि राजकीय आधार देते.

दलित साहित्य हा 1960 नंतर मराठी साहित्यात विकसित झालेला एक ठळक साहित्य प्रवाह आहे 1960 नंतर ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य व श्री वादी साहित्य हे प्रवाहही उदयास आले आहेत. या सर्व साहित्य प्रवाहांच्या मुळाशी असणाऱ्या प्रेरणा गेल्या शतक्यातील विविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घडामोडींच्या आहेत आणि या सर्व साहित्यप्रवाहांच्या मुळाशी शोषणाधिष्ठित समाज रचना नष्ट झाली पाहिजे, हे समान सूत्र आहे म्हणूनच सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्धचा आवाज उठवणारे साहित्य या प्रवाहातून निर्माण झालेले दिसते.

दलित चळवळीतून निर्माण झालेल्या व दलित चळवळीसाठी लिहिलेल्या केलेल्या तलेत साहित्याने मराठी साहित्यात मोलाचे भर घातलेले आहे. दलित साहित्य प्रवाहाचा विचार करताना महाराष्ट्रातील दलित साहित्याच्या चळवळीची पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे. हे पार्श्वभूमी समजावून घेताना सर्वात प्रथम भारतीय 'जात' व 'वर्ण ' या संस्थांचा परिचय करून घेणे गरजेचे आहे तसेच 19 व्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेता येईल आणि त्या अनुषंगाने 19 व्या शतकात सुरू झालेल्या परिवर्तनवादी चळवळीचे स्वरूप समजावून घेता येईल.

दलित साहित्य आणि भारतीय संविधान :

दलित साहित्य हे जातीय व्यवस्थेतील भेदभाव आणि दडपशाहीला सामोरे जाणाऱ्या विविध दलित समुदायाच्या अनुभवांवर आधारित आहे, तर संविधान हे या दडपशाहीला संपुष्टात आणण्यासाठी तसेच स्वातंत्र्य, समानता आणि न्याय देण्यासाठी निर्माण केलेले भारतीय प्रजासत्ताकाचे मूलभूत कायदे आहे. संविधान दलितांना संरक्षण, आरक्षण आणि विकासाच्या संधी देऊन त्यांचे सामाजिक प्रतिष्ठा आणि मानवाधिकार जपण्याचा प्रयत्न करते, तर दलित साहित्य या घटनात्मक हक्कांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी लढणाऱ्या दलितांचा आवाज व्यक्त करते, असा ह्या दोन्हींचा परस्पर संबंध आहे

दलित साहित्य आणि संविधान यांचा संबंध :

दलित साहित्य हे संविधान लागू करण्यापूर्वीच्या आणि नंतरच्या काळात दलितांवर होणाऱ्या सामाजिक अन्याय आणि भेदभावविरुद्धचा आवाज आहे .हे संविधान दलितांना कायदेशीर अधिकार मिळवून देण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रेरणा देते. संविधानाचा उद्देश समानतेवर आधारित समाज निर्माण करणे आहे, तर दलित साहित्य याच समानतेचा आणि मानवी प्रतिष्ठेचा शोध घेते. हे साहित्य दलितांच्या जीवनातील दुःख, संघर्ष, विद्रोह आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे चित्रण करते. दलित साहित्य हे सामाजिक बदलासाठी एक शक्तिशाली माध्यम आहे, जे संविधान आणि कायदे असूनही होणाऱ्या भेदभावाकडे लक्ष वेधते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान :

दलित साहित्याच्या निर्मितीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आणि त्यांनी संविधानात दिलेल्या दलितांच्या हक्कांचा मोठा प्रभाव आहे. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून दलितांच्या सामाजिक आणि राजकीय सक्षमीकरणाचा मार्ग खुला केला आहे जो दलित साहित्यासाठी महत्त्वाचा ठरला. संविधानात दलितांचा अनुसूचित जातींमध्ये समावेश करण्यात आला आहे. ज्यामुळे त्यांना काही विशेष संरक्षण, सकारात्मक कृती (आरक्षण) आणि विकासाची संसाधने मिळतात. दलित साहित्य या घटनात्मक हक्कांचे समर्थन करते आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील राहते.

थोडक्यात, दलित साहित्य हे संविधानाच्या आदर्शांना प्रत्यक्ष जीवनात उतरण्यासाठी आणि दलितांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी एक महत्त्वाची साहित्यिक चळवळ आहे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

साहित्य स्वातंत्र्याचा घटनात्मक अधिकार व मर्यादा :

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अधिव्यक्ती स्वातंत्र्य (freedom of speech and expressions) हा एक मूलभूत अधिकार दिला आहे. अनुच्छेद १९(१)(अ) नुसार, प्रत्येक व्यक्तीला आपले विचार, कल्पना, मते आणि भावना कोणत्याही माध्यमांद्वारे, ज्यात साहित्य, कला आणि इतर कलात्मक अभिव्यक्तीचा समावेश होतो, ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. साहित्याच्या दृष्टीने, हा अधिकार लेखकांना त्यांच्या सर्जनशीलतेला मुक्तपणे व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देतो, ज्यामुळे समाजातील विविध विचारांचे आदानप्रदान आणि सांस्कृतिक विकास शक्य होतो. मात्र, कोणताही अधिकार अमर्याद नसतो. भारतीय संविधान अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर काही मर्यादा घालते. या मर्यादांचा उद्देश राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था आणि सामाजिक नैतिकता राखणे हा आहे.

साहित्याचे घटनात्मक अधिकार :

साहित्य हे समाजाचा आरसा मानले जाते. लेखक आपल्या कृतीतून समाजातील वास्तव, प्रश्न, संघर्ष आणि मानवी भावना मांडत असतो. संविधानातील अनुच्छेद १९ (१) (अ) साहित्याला महत्त्वपूर्ण अधिकार प्रधान करतात.

१) सर्जनशील अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य: लेखकांना कोणत्याही भीती शिवाय किंवा दबावा शिवाय आपल्या कल्पना आणि विचार मुक्तपणे मांडण्याचे स्वातंत्र्य मिळते.

२) टीका आणि विरोध करण्याचे स्वातंत्र्य: लेखक आपल्या साहित्यकृतीतून सरकार, सामाजिक रूढी किंवा कोणत्याही संस्थेवर टीका करू शकतात. समाजाला विचार करायला लावणारे प्रश्न विचारू शकतात.

३) माहितीचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य: लेखक आपल्या कृतीतून वाचकांपर्यंत माहिती, ज्ञान आणि विचार पोहोचवू शकतात.

४) कलात्मक अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य: साहित्यामध्ये कविता, कादंबरी, नाटक, कथा, निबंध यासारख्या विविध कलात्मक स्वरूपाचा समावेश होतो आणि या सर्व माध्यमांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार लागू होतो

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादा :

भारतीय संविधानातील अनुच्छेद (१९)(२) अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर काही "वाजवी मर्यादा" घालते. ह्या मर्यादांचे उल्लंघन केल्यास लेखक किंवा साहित्य कृतींवर कारवाई होऊ शकते.

१) **भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता:** असे साहित्य जे देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेला धोका निर्माण करते, त्यावर कायद्यानुसार बंदी घालता येते

२) **राज्याचे सुरक्षा:** असे लेखन जे राज्याला धोका पोहोचवू शकते, किंवा हिंसा भडकवू शकते, शस्त्र बंडखोरेला प्रोत्साहन देऊ शकते. त्यावर मर्यादा आहेत.

३) **परदेशीय राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध:** परदेशी राष्ट्रांशी भारताचे संबंध बिघडतील असे साहित्य प्रकाशित करणे मर्यादित आहे.

४) **सार्वजनिक सुव्यवस्था:** असे साहित्य जे समाजात दंगल, हिंसा किंवा अशांतता निर्माण करू शकते, त्यावर नियंत्रण ठेवता येते. उदा. जातीय किंवा धार्मिक द्वेष पसरवणारे साहित्य.

५) **शिष्टाचार आणि नैतिकता:** अश्लील, अ नैतिक किंवा समाजाच्या नैतिक मूल्यांना धक्का पोहोचवणारे साहित्य या श्रेणीत येते यावर अनेकदा वाद-विवाद होतात, कारण 'अश्लीलता'हे एक सापेक्ष संकल्पना आहे.

६) **न्यायालयीन अवमान:** असे साहित्य जे न्यायालयाच्या अधिकाराला किंवा प्रतिष्ठेला कमी लेखते, त्यावर कारवाई होऊ शकते.

७) **बदनामी:** एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला जाळून पोचून हाणे पोहोचवणारे किंवा मानहानी करणारे साहित्य प्रसिद्ध करणे कायद्याने गुन्हा आहे.

८) **गुन्हा करण्यास प्रवृत्त करणे:** एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला गुन्हा करण्यास प्रोत्साहित करणारे साहित्य प्रतिबंधित आहे.

भारतीय संविधान साहित्याला एक शक्तिशाली साधन म्हणून मान्यता देते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार लेखकांना समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याची संधी देतो. मात्र, या अधिकारासोबतच मोठे जबाबदारी ही येते. लेखकांनी त्यांच्या लेखनाचा उपयोग समाज जोडण्यासाठी, विचार जागृत करण्यासाठी आणि सकारात्मक मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी करणे अपेक्षित आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादांचा उद्देश केवळ समाजाला कोणत्याही प्रकारच्या धोक्यांपासून वाचवणे हा आहे. या मर्यादांचा गैरवापर होऊन लेखकांच्या स्वातंत्र्यावर गदा येऊ नये यासाठी न्यायपालिका महत्त्वाची भूमिका बजावते. न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये या मर्यादांचा अर्थ स्पष्ट करून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण केले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

एकूणच, भारतीय संविधानाने साहित्याला दिलेले स्वातंत्र्य आणि त्यावर घातलेल्या मर्यादा यांच्यात समतोल राखणे ही एक निरंतर प्रक्रिया आहे. लेखक, समाज आणि सरकार यांच्या सामूहिक प्रयत्नांतूनच हे स्वातंत्र्य जपले जाऊ शकते.

भारतीय संविधान व साहित्य स्वातंत्र्य :

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. यामध्ये बोलण्याचे, लिहिण्याचे, मुद्रण व प्रसाराचे स्वातंत्र्य समाविष्ट आहे. साहित्यिक, कवी, कादंबरीकार, नाटककार हे आपल्या लेखनांद्वारे सामाजिक विसंगती, अन्याय व सत्य मांडतात. संत साहित्य, भक्ती साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य अशा विविध प्रवाहांनी समाजवाद जागृत केले. त्यामुळे साहित्य स्वातंत्र्य हे लोकशाहीतील प्राण मानले जाते.

साहित्य व वादग्रस्त प्रकरणे :

भारतात साहित्य स्वातंत्र्य अनेकदा वादग्रस्त ठरलेले दिसते.

- विजय तेंडुलकरांचे सखाराम बाईंडर हे नाटक समाजातील ढोंग उघड करत असल्याने बंदी घालण्यात आले.
- सलमान रश्दी यांच्या Satanic verses या कादंबरीवर धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करून भारतात बंदी घालण्यात आली.
- म.फ.हुसेन यांच्या चित्रकृतीवर धार्मिक भावनांचा अपमान झाल्याचे सांगून वाद निर्माण झाले.
- आधुनिक काळात सोशल मीडिया व डिजिटल साहित्यामुळे फेक न्यूज, द्वेष पूर्ण लेखन, अश्लीलता या समस्यांना सामोरे जावे लागते.

न्यायालयीन दृष्टिकोन :

भारतीय सर्वोच्च न्यायालयाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याला लोकशाहीचा जिवंत प्राण म्हटले आहे.

- Romesh Thappr V. State of Madras (1950) या प्रकरणात न्यायालयाने म्हटले की"अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसल्यास लोकशाही अस्तित्वात राहू शकत नाही"
- मात्र न्यायालयाने स्पष्ट केले आहे की स्वातंत्र्य जबाबदारीने व संविधानाच्या चौकटीत राहूनच वापरले पाहिजे.

साहित्य, स्वातंत्र्य व जबाबदारी :

- साहित्यिकाला सत्य वाचकांपुढे मांडण्याचे स्वातंत्र्य असले तरी त्याच्यासोबत काही सामाजिक जबाबदाऱ्या येतात. लेखनाने समाजात द्वेष, हिंसा व असहिष्णुता पसरू नये.
- राष्ट्रीय एकात्मता व लोकशाही मूल्यांचे रक्षण व्हावे.
- टीका विधायक स्वरूपाची असावी.

साहित्य स्वातंत्र्य हे भारतीय लोकशाहीचे अनमोल वैशिष्ट्य आहे. त्याच्या मदतीने समाजाला दिशा, विचार व प्रेरणा मिळते. अन्यथा ते अराजकतेत परिवर्तित होऊ शकते.

भारतीय स्वातंत्र्यावरील घटनात्मक मर्यादा :

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार दिले आहेत. त्यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचा अधिकार आहे. मात्र, कोणतेही स्वातंत्र्य निरंकुश नसते. कारण निरंकुश स्वातंत्र्यामुळे समाजात गोंधळ, अस्थिरता व अराजकता निर्माण होऊ शकते. म्हणूनच भारतीय संविधानाने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर काही घटनात्मक मर्यादा घालून दिल्या आहेत

कलम १९(२) नुसार घालण्यात आलेल्या मर्यादा :

अ) भारताची सार्वभौमता व अखंडता
आ) राज्याची सुरक्षा
इ) परदेशांशी संबंध
ई) सार्वजनिक सुव्यवस्था
उ) सभ्यता व नैतिकता
ऊ) न्यायालयाचा अवमान
ए) मानहानी
ऐ) गुन्ह्याला प्रवृत्त करणे

भारतीय संविधानाने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले असले तरी ते मर्यादित आहे स्वातंत्र्य आणि जबाबदारी या दोन्हीचा समतोल आवश्यक आहे नागरिकांचे स्वातंत्र्य इतरांच्या अधिकाऱ्यांना बाधा न आणता वापरले पाहिजे अशा प्रकारे घटनात्मक मर्यादा लोकशाहीला अधिक सुरक्षित, सुसंस्कृत व प्रगल्भ बनवतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

साहित्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्य :

साहित्य, नाटक, चित्रपट, कादंबरी किंवा कलात्मक अधिव्यक्ती यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने व उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिले आहेत.

- न्यायालयीन हस्तक्षेपाची गरज
- अश्लीलता ठरविणे: साहित्य किंवा कादंबरी अश्लील आहे का हे ठरवणे.
- धार्मिक भावना दुखावणे: एखाद्या कलेमुळे समाजातील विशिष्ट वर्ग दुखावला गेला आहे का याचा विचार.
- राष्ट्रीय सुरक्षा व कायदा- सुव्यवस्था: साहित्यामुळे हिंसाचार किंवा द्वेष पसरतो का याचे मूल्यांकन.
- कलात्मक मूल्यांचा विचार: साहित्यिक/कलात्मक संदर्भ लक्षात घेऊन व्यापक दृष्टिकोन ठेवणे.

न्यायालयीन दृष्टिकोनातून ठरवलेले तत्वे :

१) साहित्यिक व कलात्मक मूल्य महत्त्वाचे-फक्त नग्नता, टीका किंवा नकारात्मक प्रतिमा म्हणजे गुन्हा नाही.

२) स्वातंत्र्यामुळे मूळ स्वरूप व्यापक आहे-अप्रिय, अलोकप्रिय, अल्पसंख्यांकांचे विचारसुद्धा मान्य करावे लागतात.

३) निर्बंध कडक व मर्यादित असावेत-१९(२) मधील निर्बंध फक्त अपवाद आहेत, सामान्य नियम नाहीत.

४) सामाजिक सहिष्णुता आवश्यक-साहित्याच्या स्वातंत्र्यासोबत वाचक/समाजाने सहिष्णुता ठेवणे आवश्यक.

५) मनःपूर्वक हेतू महत्त्वाचा-अपमान करण्याचा जाणीवपूर्वक हेतू असल्यासच अपराध ठरतो.

न्यायालयीन दृष्टिकोन भारतीय लोकशाहीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे सर्वात मोठे रक्षक आहेत. न्यायालयांनी वेळोवेळी साहित्य व कला यांच्या बाजूने निर्णय देत व्यापक दृष्टिकोन मांडला आहे. जरी काही वेळा बंदी, निर्बंध आले तरी एकूण प्रवाह हा साहित्यिक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आहे.

साहित्य, स्वातंत्र्य व जबाबदारी :

साहित्य म्हणजे समाजाचा आरसा मानला जातो. लेखकाला आपल्या विचारांचे, भावनांचे, तत्त्वज्ञानाचे आणि समाज विषयक अनुभवांचे स्वातंत्र्य मिळणे अत्यावश्यक आहे. भारतीय संविधानाने दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे साहित्याच्या जगासाठी जीवनरेखा आहे. मात्र स्वातंत्र्याबरोबरच जबाबदारीची जाणीव हे सुद्धा तितकीच महत्त्वाची आहे अन्यथा स्वातंत्र्य अराजकतेकडे नेऊ शकते.

साहित्यिक स्वातंत्र्याचे महत्त्व :

१) विचारांचे मुक्त अभिव्यक्ती-समाजातील विविध प्रश्न, दडपशाही, अन्याय या विरुद्ध लेखक निर्भयपणे लिहू शकतो.

२) सत्याचा शोध-साहित्य हे वास्तवाला उघड करून सत्याचा शोध घेते.

३) समाजपरिवर्तनाचे साधन-क्रांतिकारी साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य समाजाला नवा विचार देते.

४) सर्जनशीलता आणि नवोन्मेष-लेखकाला कल्पनाशक्ती व नवोन्मेषाला मोकळीक मिळते.

जबाबदारीचे स्वरूप :

साहित्यिक स्वातंत्र्याला जबाबदारीची जोड असणे आवश्यक आहे.

१) सामाजिक जबाबदारी-समाजातील विविध घटकांची भावना, सांस्कृतिक परंपरा, सहअस्तित्व यांचा विचार करून लेखन करणे.

२) नैतिक जबाबदारी-साहित्य, अश्लीलता, द्वेष, तुमचा किंवा अपमान कारक प्रवृत्ती न वाढवणारे असावे.

३) कायद्याचे जबाबदारी-संविधानाने घातलेल्या मर्यादांचे पालन करणे.

४) मानवी मूल्यांची जपणूक: समानता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य यांचा सन्मान करणारे लेखन.

साहित्य, स्वातंत्र्य व जबाबदारीतील समतोल :

१) स्वातंत्र्य हे मूलभूत हक्क आहे-लेखकाला सत्य मांडण्याचा, प्रयोग करण्याचा अधिकार आहे.

२) जबाबदारीमुळे स्वातंत्र्याला दिशा मिळते-समाजहिताचे, मानवी मूल्यांचे भान ठेवले तर साहित्य लोकाभिमुख होते.

३) सहिष्णुता व टीका स्वीकारण्याचे वृत्ती -लेखक आणि वाचक दोघांनाही एकमेकांचे दृष्टिकोन समजून घेणे आवश्यक आहे.

साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब आणि परिवर्तनाचे साधन. त्याला मुक्तपणे व्यक्त होण्याचा अधिकार आहे, पण हे स्वातंत्र्य जबाबदारी शिवाय निरर्थक ठरते. "साहित्य हे स्वातंत्र्य आणि जबाबदारीचा संतुलित संगम"असले पाहिजे. मुळेच साहित्य समाजाला मार्गदर्शन करू शकते. लोकशाही अधिक सक्षम बनवू शकते आणि मानवी मूल्यांची जपणूक करू शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारतीय संविधान आणि दलित साहित्याचा घटनात्मक अनुबंध :

दलित साहित्य हे संविधानिक मूल्यांशी कनिष्ठपणे जोडलेले आहे, कारण संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या तत्त्वांना ते प्रत्यक्षपणे मांडते आणि दलितांवर होणाऱ्या विषमतेवर व अत्याचारावर आवाज उठवते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून दलितांना दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हाच संदेश दलित साहित्याच्या मुळाशी आहे, ज्यामुळे हे साहित्य मानवी मुक्तीचे प्रतीक बनले आहे. भारतीय संविधानाने अस्पृश्यता आणि जातीय भेदभावाला स्थान न देता दलितांना समान हक्क दिले आहेत, आणि दलित साहित्य या हक्कांसाठीचा संघर्ष व्यक्त करते. दलित साहित्याला डॉक्टर आंबेडकरांच्या मानवतावादी तत्वज्ञानाचा आधार आहे, ज्यात 'मानवमुक्ती','स्वातंत्र्य,' 'समता,' 'बंधुता' व 'न्याय' या मुल्यांचा पुरस्कार केला जातो. दलित साहित्य हे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर परिवर्तन घडवण्यासाठी एक प्रभावी माध्यम बनले आहे. हे साहित्य वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोरपणे विरोध करते, व दलितांवर झालेल्या अन्यायाचा, वेदनांचा व नकारांचा आवाज उठवते. दलितांनी लिहिलेले साहित्य म्हणजे त्यांच्या वेदना आणि संघर्षाचे आत्मलेखन आहे, त्यातून ते स्वतःचे माणूस पण आणि ओळख सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. संविधानातील कलम ३२ अंतर्गत घटनात्मक उपायांचा जो अधिकार दिला आहे, तो दलित साहित्यातून अधिक दृढ होतो, कारण साहित्य या हक्कांचे मागणी करते. संविधान हे दलित साहित्याचे आधारस्तंभ आहे, तर दलित साहित्य हे संविधानाच्या मूल्यांना जिवंत ठेवणारे आणि त्या मूल्यांच्या आधारावर एक समता दृष्टीत समाज निर्माण करण्याचे एक सशक्त माध्यम आहे.

आंबेडकरवाद आणि दलित साहित्य :

आंबेडकरवाद हे जिवंत आणि गतिमान तत्वज्ञान आहे, पूर्णतः विवेकवादी तत्त्वज्ञान आहे.इहवाद, निरीश्वरवाद, अनात्म, बुद्धीप्रामाणिकवाद, धर्मातीत मानवतावाद आणि त्यावर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांनी फुलणारा माणसा माणसा संबंधित परस्परोपकारक सोहळा असे जाणीव रसायन म्हणजे आंबेडकरवाद. संपूर्ण शोषणाविरुद्ध पुकारलेले बंड म्हणजे आंबेडकरवाद होय. आंबेडकर वादाचा अर्थ एका शब्दात वाक्यात सांगता येण्यासारखा नाही. कारण आंबेडकरवाद हे एक आधुनिक भारताचे नवे तत्त्वज्ञान आहे की जे स्वातंत्र्य, समता व बंधुता सामाजिक न्यायावर अधिष्ठित आहे. हे तत्वज्ञान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या महान पुरुषाच्या सर्वांगीण कार्याचे व तत्त्वज्ञानाचे रसायन ज्यात एकवटले आहे त्याला आंबेडकरवाद म्हणून संबोधल्या जाते. आंबेडकरवाद इहवादाशी नाते सांगणारे आहे, गौतम बुद्धाच्या धम्माशी नाते सांगणारे आहे आणि स्वाभाविकच चैतन्यवादी किंवा अध्यात्मवादी (ईश्वरवादी) तत्त्वज्ञानापासून वेगळे नाते सांगणारे तत्त्वज्ञान आहे. म्हणूनच वेद, उपनिषदे, स्मृति, गीता, ब्राह्मणसूत्रे, ज्ञानेश्वरी, दासबोध इत्यादी ग्रंथांना किंवा ईश्वरवादी तत्त्वज्ञान सांगणाऱ्या ग्रंथांना स्पष्ट वैज्ञानिक तत्त्वाने तोलून त्यांच्या पाखंडाचा समाचार घेणारे तत्त्वज्ञान आहे. हे निर्भय व परिवर्तनशील तत्त्वज्ञान आहे. सामाजिक, सांस्कृतिक ,राजकीय, आर्थिक, बौद्धिक, धार्मिक व वैचारिक पातळीवर स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाची या मानवी मूल्यांच्या जोरावर अमुलाग्र परिवर्तनाचे अभिलाषा बाळगणारे तत्त्वज्ञान म्हणजे आंबेडकरवाद होय.

भारतीय समाजातील वर्णाव्यवस्था, जातीयता, अस्पृश्यता ज्यात या गोष्टी अंतर्भूत आहेत ते धर्म नाकारणारा तत्वविचार म्हणजे आंबेडकरवाद. आंबेडकरवादाने ईश्वर ,आत्मा, पुनर्जन्म आणि परलोक या गोष्टींना संपूर्ण आणि स्पष्ट नकार दिला आहे. आंबेडकरवादाने धर्म, धर्मविधि आणि माणसांच्या मेंदूंना गोठवणारे कर्मकांडे यांची संगत अत्यंत सावधगिरीने तोडून टाकली आहे. दुःखाचा विनाश हाच आंबेडकरवादाचा जन्म हेतू आहे.

आपले तत्व चिंतन जीवनाच्या सर्वच अंगोपांगांचे सम्यक आकलन करणारे व्हावे आणि परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान करणारे ते असावे व आपले तत्वचिंतन सर्वार्थाने मानवसमाजाला उपकारक व्हावे हे आंबेडकरवादाची भूमिका आहे.

दलित साहित्य आणि भारतीय संविधान: हक्क व अस्तित्व :

भारतीय समाजातील जातीय रचना हे शतकानुशतके दलित समाजासाठी अपमान, शोषण व अन्यायाचे कारण ठरली. दलितांना मानवी सन्मान, स्वातंत्र्य व अस्तित्वाचे अधिकार नाकारले गेले. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क व अस्तित्वाचा हक्क दिला. या घटनात्मक मूल्यांच्या प्रेरणेने दलित साहित्याचा जन्म झाला. दलित साहित्य हे केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून हक्क आणि अस्तित्वासाठीची सांस्कृतिक लढाई आहे.

भारतीय संविधान व दलित हक्क :

भारतीय संविधानाने समाजातील शोषित घटकांच्या संरक्षणासाठी ठोस तरतुदी केल्या आहेत.

१) समतेचा हक्क (अनुच्छेद १४-१८)-कायद्यापुढे समानता, अस्पृश्यतेचे उच्चाटन, जातीवर आधारित भेदभावास बंदी.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

२) स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद १९-२२)-अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना, हालचाल व व्यवसाय स्वातंत्र्य, अनुच्छेद २१-जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क, सन्मानाने जगण्याची हमी.

३) शोषणाविरुद्धचा हक्क (अनुच्छेद २३-२४)-सक्तीची मजुरी, बंधनकारक श्रम व बालकामकारावर बंदी.

४) घटनात्मक उपचाराचा हक्क (३२)-नागरिकांना न्यायालयातून हक्कांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी याला 'संविधानाचे हृदय व आत्मा' म्हटले.

५) विशेष तरतुदी (अनुच्छेद-३४१-३४२)-अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आरक्षण, शैक्षणिक व राजकीय प्रतिनिधित्वाची हमी.

अनुच्छेद-२१ नुसार मानवी सन्मानाने जगणे हा अस्तित्वाचा मुख्य गाभा. सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयानी जीवनाचा हक्क म्हणजे अन्न, निवारा, रोजगार, शिक्षण व आरोग्य यांचा समावेश असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे दलितांच्या अस्तित्वाचा हक्क केवळ कायदेशीर संरक्षणापुरता मर्यादित नसून सामाजिक व आर्थिक न्यायाशी जोडलेला आहे. दलित साहित्याने संविधानाने दिलेले हक्क व अस्तित्वाचा प्रश्न साहित्यिक पातळीवर मांडला आत्मकथन-दया पवार (बलुतं), लक्ष्मण माने (उपरा), शरणकुमार लिंबाळे (अक्करमाशी) यांनी दलित जीवनातील अपमान व संघर्ष व्यक्त केला.

कविता नामदेव ढसाळ, ज. वि. पवार यांनी संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याचा आधार घेत अन्यायाविरुद्ध विद्रोही स्वर निर्माण केला. समिक्षा-अर्जुन डांगळे यांनी दलित साहित्य: सौंदर्यशास्त्र मध्ये दलित साहित्य म्हणजे "संविधानातील समतेच्या तत्त्वांची सर्जनशील मांडणी"असे स्पष्ट केले. संविधानाने हक्क दिले असले तरी प्रत्यक्षात भारतीय भेदभाव, हिंसा, आर्थिक व शैक्षणिक विषमता अद्याप कायम. दलित साहित्य हा कायदेशीर हक्क आणि सामाजिक वास्तव यातील दरी दाखवतो. हे साहित्य न्यायालयीन भाषा न वापरता जीवनातील वेदना, अपमान, शोषण आणि बदलाची गरज थेट मांडते. समीक्षा खूप संवेधानाने दलितांना कायदेशीर संरक्षण दिले, परंतु साहित्याने त्याला भावनिक व सांस्कृतिक अभिव्यक्ती दिली. दलित साहित्यामुळे संविधानातील हक्क केवळ कागदावर न राहता सामाजिक आंदोलनाचे आधार झाले. काही समीक्षकांच्या मते दलित साहित्य जास्त आक्रोशपूर्ण आहे, पण प्रत्यक्षात तो न्यायासाठीचा आक्रोश आहे.

थोडक्यात, भारतीय संविधानाने दलितांना समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क आणि अस्तित्वाची हमी दिली. या घटनात्मक मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व त्यासाठीचा संघर्ष दलित साहित्यातून दिसतो. त्यामुळे दलित साहित्य आणि भारतीय संविधान हे परस्पर पूरक आहेत, संविधानाने कायदेशीर चौकट दिली तर दलित साहित्यातून त्या हक्कांचे सांस्कृतिक व भावनिक मांडणी झाली. त्यामुळेच दलित साहित्य हे भारतीय लोकशाहीचे अरे खुरी अभिव्यक्ती ठरते. भारतीय संविधानाने दलितांना हक्क व अस्तित्वाची कायदेशीर हमी दिली.पण या हक्कांचा प्रत्यक्ष अनुभव समाजात निर्माण करण्याचे काम दलित साहित्याने केले .म्हणूनच संविधान आणि दलित साहित्य यांचा अनुबंध आपणास पहावयास मिळतो, संविधान हे कायदेशीर शस्त्र तर दलित साहित्य सांस्कृतिक व भावनिक शस्त्र या दोन्हींच्या संगमातूनच दलितांचा खरा हक्क आणि अस्तित्व सुरक्षित होतो.

निष्कर्ष :

भारतीय संविधान हे दलितांच्या अस्तित्वाचा आणि सन्मानाचा आधार आहे त्यातील समतेचा हक्क, अस्पृश्यता निवारण, शोषणाविरुद्धचे हक्क, जीवनाचा हक्क हे दलितांना न्याय अस्तित्वाची हमी देतात. जरी संविधानाने स्पष्ट तरतुदी केल्या तरी समाज जीवनात भारतीय अन्याय व भेदभाव टिकून आहेत त्यामुळे संविधानिक हक्क व प्रत्यक्ष अनुभव यात फरक दिसतो. दलित साहित्य या सर्व बाबींचा विचार करते,

दलितांच्या वेदना, अपमान, संघर्ष आणि अस्तित्वाच्या झुंजीचे सत्य जगासमोर आणते त्यामुळे दलित साहित्य हे संविधानातील हक्कांचे सांस्कृतिक रूपांतर आहे.

दलित साहित्य हे अनुभवाधारित सौंदर्यशास्त्र मांडते. त्याचा उद्देश केवळ कलात्मकता नसून सामाजिक न्याय आणि परिवर्तन साधने आहे. संविधान हे कायदेशीर साधन आहे तर दलित साहित्य हे त्याच्या मूल्यांचे साहित्यिक प्रतिरूप आहे. दोन्हींचा संगमच दलितांच्या हक्क व अस्तित्वाची हमी बळकट करतो.

शिफारशी :

- दलितांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी कायद्यांची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे.
- दलित समाजाला दर्जेदार शिक्षण मिळाले तरच अस्तित्वाचा हक्क प्रत्यक्षात साकार होईल.
- विद्यापीठे, महाविद्यालय व संशोधन संस्थांनी दलित साहित्याचा अभ्यास मुख्य प्रवाहात आणावा, कारण ते संविधानातील मूल्यांना साहित्यिक बळ देते.
- सामान्य समाजात संविधानिक हक्कांविषयी जागरूकता निर्माण झाली तर भेदभावाविरुद्ध लढा अधिक प्रभावी होईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

- सांस्कृतिक माध्यमांचा वापर उदाहरणार्थ नाटक, चित्रपट, कला, लोकसाहित्य याद्वारे दलित साहित्याचा व संविधानाचा संदेश व्यापक जनतेपर्यंत पोहोचवावा.
- दलित साहित्य व भारतीय संविधान यांचा संबंध आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेला जावा, जेणेकरून मानवाधिकाराच्या संदर्भात भारतीय अनुभव जागतिक समुदायापर्यंत जाईल.

भारतीय संविधानाने हक्क दिले आणि दलित साहित्याने त्या हक्कांच्या अस्तित्वासाठी लढ्याचा आवाज दिला संविधान आणि साहित्य यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच खऱ्या अर्थाने समता, न्याय व बंधुता साध्य होऊ शकते.

सारांश :

या संशोधन प्रबंधात दलित साहित्य व भारतीय संविधान यांचा परस्पर संबंध अभ्यासण्यात आला आहे. भारतीय संविधानाने दलित समाजाला समानता न्याय, स्वातंत्र, आणि बंधुता या मूल्यांवर आधारित हक्कांची हमी दिली आहे. अस्पृश्यता निवारण, शोषणाविरोधातील संरक्षण, शिक्षण व सामाजिक प्रगतीची संधी, तसेच मूलभूत अधिकारांच्या तरतुदींमुळे दलितांच्या अस्तित्वाला कायदेशीर आधार प्राप्त झाला आहे.

तथापि, संविधानिक हक्क असूनही प्रत्यक्ष सामाजिक जीवनात जातीय भेदभाव, हिंसा व अन्याय अद्याप अस्तित्वात आहेत. या वास्तवाला दलित साहित्याने जिवंतपणे व्यक्त केले आहे. आत्मकथन, कविता, कथा, कादंबरी आणि समीक्षेद्वारे दलित लेखकांनी संविधानिक हक्कांचा अभाव, अस्तित्वाची झुंज, सन्मानासाठीचा लढा आणि न्यायाची आकांक्षा मांडली आहे.

दलित साहित्य हे फक्त साहित्यिक अभिव्यक्ती नसून ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. ते संविधानाच्या मूल्यांना साहित्यिक व सांस्कृतिक पातळीवर बळकटी देते. संविधान हे कायदेशीर चौकट तर दलित साहित्य हे त्यातील मूल्यांचे अनुभवाधारित प्रतिरूप आहे. अशा रीतीने दलित साहित्य व भारतीय संविधान हे दोन्ही दलितांच्या हक्क व अस्तित्वासाठी परस्परपूरक ठरतात. या संगमातूनच भारतीय लोकशाहीत समतेची आणि न्यायची खरी जाणीव निर्माण होते.

संदर्भ सूची :

1. व्हटकर जयवंत-दलित साहित्याची संकल्पना-दिलीप राज प्रकाशन पुणे.
2. लिंबाळे शरणकुमार (संपादक)-भारतीय दलित साहित्य-साहित्य अकादमी प्रकाशन-२०१३
3. पांढरे नीला-दलित साहित्य-स्नेहवर्धन प्रकाशन पुणे १५ऑगस्ट२०१२
4. पुन्नीसिंह,कमला प्रसाद, राजेन्द्र शर्मा (संपादक)-भारतीय दलित साहित्य-वाणी प्रकाशन नई दिल्ली २०१७
5. कवठेकर बाळकृष्ण-दलित साहित्य एक आकलन-विजय प्रकाशन
6. डांगळे अर्जुन (संपादक)-दलित साहित्य: एक अभ्यास सुगावा प्रकाशन ,पुणे.जून१९९८
7. डॉ.आंबेडकरांचे संविधान सभेला दिलेले भाषण-संविधान सभेचे भाषण खंड-२
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'भारतीय राज्यघटना' -महाराष्ट्र शासन प्रकाशन विभाग, मुंबई १९९४ पुनर्मुद्रण
9. D.D.Basu -Introduction Of the Constitution of India -Prentice Hall Of India, Publisher New Delhi -2015 New Edition
10. सुधीर कुमार-'मानवी हक्क आणि भारतीय संविधान'आशा पब्लिकेशन्स -दिल्ली २००५ पुनर्मुद्रण.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मानवाधिकार आणि भारतीय संविधान

डॉ. दिनकर संतुकराव कळंबे
प्राध्यापक, विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक (राज्यशास्त्र)
मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
भोकरदन, ता. भोकरदन जि. जालना. (महाराष्ट्र)
Email: kalambedinakar@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170914
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 79-82
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवाराः

भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत हक्कांचा भाग तिसरा आणि राज्यांच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्वांचा भाग चौथा हा राज्यघटनेचा गाभा आहे. त्यांचा एकत्रित विचार केल्यास त्यामध्ये मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा, नागरी आणि राजकीय हक्क त्याचबरोबर आर्थिक, सामाजीक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये नमुद करणारा भाग चार अ' महत्वाचा आहे. कारण हक्क हे कर्तव्याशिवाय अपूर्ण असतात. आपल्या संविधानाच्या शाश्वत संदेशाचे सार सर्व मानवजात जन्मतःच मुक्त आणि समान आहे.

मानव अधिकारांचा अर्थ समजावून घेण्यापूर्वी प्रथम हक्क म्हणजे काय हे समजावून घ्यायला हवे. प्रतयक व्यक्तीला काही गोष्टी मिळविण्याचा अधिकार आहे आणि या अधिकाराला इतरांनी मान्यता दिलेली आहे. अशा अधिकाराला ढोबळ मानाने हक्क म्हणून संबोधता येईल. या हक्कामध्ये काही हक्क असे असतात, जे व्यक्तीला जन्माने प्राप्त होतात. व्यक्तीला जगण्यासाठी त्याच्या व्क्तीमत्वाच्या विकासासाठी अशा हक्कांची आवश्यकता असते. हे हक्क व्यक्तीला जन्मानेच प्राप्त झाल्यामुळे ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाच नसतो. असे हक्क मानवाधिकार म्हणून ओळखले जातात. हे हक्क व्यक्तीला समाज किंवा राज्य बहाल करत नाही. व्यक्ती अस्तित्वात आली की, हक्क अस्तित्वात येतात. मानव अधिकारांचा विकास हा नैसर्गिक हक्क किंवा अधिकारांच्या कल्पनेतुन झाला. नैसर्गिक अधिकारांची संकल्पना पाश्चिमात्य राजकीय विचारांमध्ये सोळाव्या आणि सतराव्या शतकात प्रभावी बनली. अमेरिका तसेच युरोपमधिल काही राष्ट्रांनी नैसर्गिक अधिकारांना आपल्या संविधानामध्ये स्थान दिले. परिणामतः नैसर्गिक हक्क हे कायदेशिर हक्क बनले. नागरी स्वातंत्र्याच्या रुपात ते उपभोगले जाऊ लागले. मानव अधिकारांची संकल्पना ही नैसर्गिक हक्क, कायदेशिर हक्क, नागरी स्वातंत्र्यावर आधारित आहे. मानव अधिकार म्हणजे नैसर्गिक अधिकारांचे धर्मनिरपेक्ष रुप आहे. सतराव्या शतकापासून युरोपमध्ये नैसर्गिक अधिकारांना दैवी अधिकार म्हणून देखील संबोधले जायचे. विसाव्या शतकात मानव अधिकारांचे धार्मिक अधिष्ठान मागे पडले आणि या अधिकारांना धर्म्निरपेक्ष रुप प्राप्त झाले.

मुख्यशब्द: *मानवाधिकार, भारतीय राज्यघटना, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समानता.*

मुख्यशब्द: मानवधिकार आणि भारतीय राज्यघटना.

❖ संशोधनाची वैशिष्ट्येः-

१) मानवाधिकार म्हणजे काय? हे अभ्यासणे, त्याचे स्वरुप, व्याप्ती व महत्व हे राज्यशासत्राच्या विद्यार्थ्यांना माहिती करुन देणे.
२) भारतीय संविधानामधील मानव अधिकाराविषयी माहिती पुढच्या पिढीला करुन देणे.
३) भारतीय संविधानामधील मानव अधिकाराविषयीच्या तरतूदी अभ्यासणे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. दिनकर संतुकराव कळंबे, प्राध्यापक, विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक (राज्यशास्त्र) मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन, ता. भोकरदन जि. जालना. (महाराष्ट्र)

How to cite this article:
कळंबे, . दिनकर . संतुकराव . (2025). मानवाधिकार आणि भारतीय संविधान. Journal of Research & Development, 17(9(IV)), 79–82. https://doi.org/10.5281/zenodo.17709514

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17709514
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

❖ संशोधन पध्दतः-

संशोधकाने मानवाधिकार आणि भारतीय संविधान हा शोधनिबंध लिहीत असतांना ऐतिहासीक व वर्णनात्मक पध्दतीचा वापर केला आहे. त्यात प्राथमिक साधनात भारतीय संवधिान आणि वास्तव यांचा उपयोग केला आहे. तर द्वितीय साधानात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग व राज्य मानवाधिकार आयोग यांच्यावर आधारित ग्रंथ, मासिके आणि (वर्तमानपत्रांच्या बातम्या) नियतकालिकांचा वापर केला आहे.

❖ मानव अधिकारांचा प्रवासः-

नैसर्गिक अधिकार - दैवी अधिकार - कायदेशिर अधिकार - नागरी स्वातंत्र्ये – मानव अधिकार.

❖ मानव अधिकारांच्या व्याख्याः-

१) रॅन्डमहाऊस विश्वकोषः-

मानव अधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहे.

२) डवार्किनः-

मानव अधिकार हा मानवाला प्राप्त झालेले असे अधिकार आहेत की, ज्यांचे सार्वजनिक हितासाठी देखील राज्यांकडून उल्लंघन होऊ शकत नाही आणि राष्ट्रीय कायद्याशिवाय देखील ते उपभोगता येऊ शकत नाही.

३) मॅकफरलेनः-

मानव अधिकार हे असे नैतिक अधिकार आहेत जे प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला माणूस या नातयाने प्राप्त झाले आहेत.

४) मॉरिस क्रॅटसनः-

मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून, त्यांचे उल्लघंन राज्याला करता येणार नाही.

❖ मानव अधिकार आणि भारतः-

मानव अधिकारांच्या संरक्षणाविषयी संवेदनशील असणाऱ्या प्रमुख राष्ट्रांपैकी भारत एक आहे. गेल्या एकाहत्तर वर्षापासून भारतामध्ये खंबीरपणे टिकून असलेली लोकशाही म्हणजे मानव अधिकारांच्या संरक्षणाविषयीची भारताची संवेदनशीलता दर्शविते. मानव अधिकाराविषयीची भारताची संवेदनशीलता दर्शविते. भारतयी राज्यघटनेतुन प्रतिबिंबीत होते. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या मानव अधिकारांच्या जाहिरनाम्यातील बहूतांश तत्वांचा समावेश भारतीय राज्यघटनेमध्ये आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना या अधिकारांच्या संरक्षणाची हमी दिली आहे. मानव अधिकरांच्या रक्षणासाठी भारतामध्ये गेल्या साडेसात दशकांमध्ये विविध योजना व कार्यक्रम राबविले गेले आहेत. भारतामध्ये आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या योजना आखतांना मानव अधिकारांच्या संरक्षणाच्या जाणिव पूर्वक विचार केला जातो. भारतीय न्याय व्यवस्था मानव अधिकारांच्या संरक्षणाविषयी जागरुक आहे. मानव अधिकाराच्या संरक्षणासाठी सन १९९३ साली एक विशेष कायदा तयार करण्यात आला. हा कायदा मानव संरक्षणात, कायदा-१९९३ या नावाने ओळखला जातो. या कायद्यार्तंगत राष्ट्रीय पातळीवर आणि काही राज्यांमध्ये राज्य पातळीवर मानव अधिकार आयोग स्थापन करण्यात आला. हे आयोग मानव अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करुन व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. मानव अधिकारांच्या संरक्षणाच्या दृष्टीने हे एक अतिशय महत्वाचे पाऊल आहे.

❖ मानव अधिकाराच्या संरक्षणाविषयीचे आंतरराष्ट्रीय ठराव आणि भारतः-

आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून करण्यात आलेल्या बहूतांश ठरावांना भारताने मान्यता दिली आहे. त्यातील काही ठराव हे खालीप्रमाणे आहे.

१) मूलभूत मानव अधिकारांचा जाहिरनामा- १० डिसेबंर १९४८.
२) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकारांच्या संरक्षणाविषयींचा आंतरराष्ट्रीय ठराव.
३) नागरी आणि राजकीय अधिकारांविषयीचा आंतरराष्ट्रीय ठराव.
४) सर्व प्रकारच्या वांशिक भेदभावाच्या निर्मूलनाचा आंतरराष्ट्रीय ठराव.
५) महिलांविरुध्द सर्व प्रकारच्या भेदभावांच्या निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय ठराव.
६) लहान मुलांच्या अधिकारांविषयीचा ठराव.

❖ मानव अधिकार आणि भारतीय संविधानः-

भारतीय संविधान देशातील सर्वोच्च कायदा आहे, आणि या कायद्याने मूलभूत मानव अधिकारांना संरक्षण दिले आहे. १० डिसेबंर १९४८ रोजी, घोषीत करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेतील मानव अधिकारांवरील जाहिरनाम्यातील बहूतांश तत्वे भारतीय संविधानात प्रतिबिंबीत झाली आहेत. भारतीय संविधान निर्मात्यांनी भारतात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दीष्ट समारे ठेवले होते. मूलभूत मानव अधिकारांच्या घटनेच्या खालील तीन भागामध्ये समावेश करण्यात आला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

१) घटनेची उद्देशपत्रिका / सरनामाः-

भारतीय नागरीकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय तसेच कायद्यासमोर समानता, विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळेल. असे सरनाम्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. याशिवाय सर्व लोकांना विश्वास, श्रध्दा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य असेल असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

२) मूलभूत अधिकार आणि मानव अधिकारः-

भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत अधिकारांचे सहा गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे.

१) समानता प्रस्थापित करणारे अधिकार (कलम-१४ ते १८)

२) धर्म, वंश, जात, लिंग आणि जन्मस्थान या आधारावरुन राज्य भेदभाव करणार नाही (कलम- १५)

३) राज्याच्या अखत्यारितील कोणत्याही नोकरीसाठी समान संधी, धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान आणि निवास या कारणांवरून भेदभाव नाही. (कलम- १६)

४) अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी, अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा. (कलम- १७)

५) लष्करी आणि शिक्षणविषयक नसलेला कोणताही किताब राज्यकडून प्रदान केला जात नाही. (कलम- १८)

❖ स्वातंत्र्याविषयीचे अधिकार (कलम- १९ ते २२)

राज्यघटनेतील कलम १९ नुसार खालील मूलभूत स्वातंत्र्ये नागरिकांना बहाल करण्यात आली आहेत.

१) भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य.

२) शांततेने आणि विनाशस्त्र एकत्रित जमण्याचा अधिकार,

३) संघटना आणि संस्था स्थापन करण्याचा अधिकार,

४) संपूर्ण भारतात संस्था स्थापन करण्याचा अधिकार,

५) भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा आणि स्थायिक होण्याचा अधिकार,

६) कोणताही व्यवसाय करण्याचा, पेशा अवलंबण्याचा अधिकार

७) एकाच अपराधासाठी एकाच व्यक्तीवर एकापेक्षा अधिकवेळा खटला भरता येणार नाही. आणि व्यक्तीला स्वतःविरुध्द साक्ष देण्यासाठी सक्ती केली जाणार नाही.

८) जगण्याचा अधिकार

९) एखाद्या व्यक्तीला अटक झाल्यास अटकेची कारणे त्या व्यक्तीला कळविली गेली पाहिजे. त्या व्यक्तीला स्वतःचा बचाव करण्याचा, वकिलाचा सल्ला घेण्याचा अधिकार, अटक झाल्यानंतर २४ तासाच्या आत दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले पाहिजे.

❖ शोषणाला प्रतिबंध करणारे अधिकारः- (कलम- २३ आणि कलम- २४)

१) सक्तीची मजूरी, वेठ बिगारी आणि माणसांचा व्यापार बंदी, (कलम- २३)

२) १४ वर्षाच्या खालील वयाच्या कोणत्याही बालकाला कारखान्यांमध्ये किंवा खाणीमध्ये नोकरी संबंधी बंदी. (कलम- २४)

❖ धर्मस्वातंत्र्याचा अधिकारः- (कलम-२५ ते २८)

१) आपल्या धर्माचा उच्चार, आचार आणि प्रचार करण्याचे सर्वांना समान स्वातंत्र्य. (कलम- २५)

२) धार्मिक संस्था स्थापन करण्याचा, त्याचा कारभार चालवण्याचा त्यावर मालमत्ता जमा करुन त्याचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार. (कलम- २६)

३) धार्मिक संप्रदायाच्या प्रचारासाठी सक्तीने कर वसूली करता येणार नाही. (कलम- २७)

४) धार्मिक शिक्षणा बाबतच्या स्वातंत्र्याचा अधिकार. (कलम- २८)

❖ सांस्कृतिक आणि शिक्षण विषयक अधिकारः- (कलम २९ आणि ३०)

१) भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वतःची भाषा , लिपी आणि संस्कृतिचे जतन करण्याचा अधिकार. (कलम- २९)

२) धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याक समुदायाला शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार. (कलम- ३०)

❖ घटनात्मक उपाय - योजना करण्याचा अधिकारः- (कलम- ३२(

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ नुसार मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी घटनात्मक उपाय-योजना करण्याचा अधिकार नागरिकांना देण्यात आला आहे. या अधिकारामध्ये पाच न्यायालेखांचा समावेश करण्यात आला आहे. ज्या अतंर्गत मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालायामध्ये दाद मागण्याचा व्यक्तीला अधिकार आहे. हे न्यायालेख खालीलप्रमाणे आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

१. बंदी प्रत्यक्षीकरण
२. परमादेश
३. प्रतिषेध
४. अधिकार पृच्छा
५ उत्प्रेषण

❖ मानव अधिकार आणि मार्गदर्शक तत्वेः

मार्गदर्शक तत्वांमध्ये मानव अधिकाराचे प्रतिबिंब पडलेले आहे. भारतीय राज्यघटनेतील चैथ्या भागामध्ये (कलम ३७ ते ५१) काही मार्गदर्शक तत्वे नमूद करण्यात आली आहे. १० डिसेबंर १९४८, रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेने घोषित केलेल्या मूलभूत मानव अधिकाराच्या जाहिरनाम्यातील अनेक अधिकारांचा समोवश मार्गदर्शक तत्वामध्ये करण्यात आला आहे.

१) राज्य बेकारी, वार्धक्य, आजार आणि अपंगत्व यांनी पिडीत असलेल्या व्यक्तीनां सरकार साह्य उपलब्ध करुन देईल. (कलम-

२) स्त्री आणि पूरुष नागरिकांना उपजीवीकेचे पर्याप्त साधन मिळविण्याचा अधिकार. (कलम- ३९ अ)

३) राज्य शेतकी, औद्योगिक किंवा अन्य प्रकारच्या कामगारांना मजूरांना विश्रांतीच्या संधी उपलब्ध करुन देईल. (कलम- ४३)

४) राज्य जनतेचे पोषणमान, राहणीमान उंचावण्यासाठी, आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करेल. (कलम- ४७)

❖ मानवी हक्काच्या संरक्षणार्थ उपाय - योजनाः

1) मानवी अधिकराच्या कायद्याची सर्व राज्यांनी काटेकोर अमंलबजावणी करावी.
2) केंद्र सरकार तसेच राज्यसरकार यांनी धर्म, वंश, जात, वर्ग, लिंग, भाषा इत्यादी भेदभावास प्रोत्साहन न देता याबाबत समानता राखावी.
3) प्राथमिक स्तरापासून उच शिक्षण मोफत व अनिवार्य या तरतुदींची अमंलबजावणी करावी. जेणेकरुन शिक्षणाचा स्तर उंचावेल.
4) देशातील जनतेला मानवी हक्काची जाणीव व्हावी, त्यासाठी केंद्र सरकार तसेच राज्यसरकार यांनी जनजागृती घडवून आणावी म्हणजे प्रत्येकजण त्याची काळजी घेईल.
5) प्रादेशिक, प्रांतिक, संकूचित धार्मिक व जातीय विचारांचा बीमोड करुन सर्वसमोवशक ध्येयधोरण आखणाऱ्या राजकीय पक्षांना व नेत्याला पाठिंबा दिला पाहिजे.
6) मानवी अधिकारांच्या संरक्षणार्थ स्थानिक, विभागीय, प्रादेषिक व राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रे, परिषदा, विचार विनिमय व्हावेत.
7) मानवी हक्क आयोग, अल्पसंख्याक आयोग व महिला आयोग यांच्या कार्याचा दर्जा वाढविला पाहिजे.
8) भूकबळी, महापूर, भूंकप, दंगली, यासारखे सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करावी.
9) प्रत्येक राज्याने औद्योगिकीकरण, शेती विकास झपाट्याने साधावा. त्यातून बेरोजगारी कमी होईल. शिवाय गुन्हेगारीला आळा बसेल.
10) महिला, बालके, वृद्ध, अपंग व निर्वासित, असहाय्य यांच्या हक्कासाठी शासनाने सतत प्रयत्नशील रहावे.
11) मानवाधिकाराचे उल्लघंन करणाऱ्या संस्था, संघटना यांच्यावर कठोर शासन केले जावे. म्हणजे मानवाधिकाराचे उल्लघंन होणार नाही.

संदर्भसूचीः

१. समकालीन जागतिक राजकारण- डॉ. शैलेंद्र देवळाणकर, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर.
२. आंतरराष्ट्रीय संबंध- डॉ. शैलेंद्र देवळाणकर, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर.
३. आंतरराष्ट्रीय संबंध- डॉ. वा. भा. पाटील, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
४. आंतरराष्ट्रीय संबंध- डॉ. सुनिल शिंदे / डॉ. संतोष कोल्हे, एज्यूकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद.- जून २०१४.
५. आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ. वसंत र. रायपूरकर, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर.
६. आंतरराष्ट्रीय संबंध- डॉ. शांताराम भोगले- कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय लोकशाहीचा घसरता आलेख- कारणांचा मागोवा

प्रा. नकुल पोपट खवले
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग
श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा
Email: nakulkhawale@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170915
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 83-87
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय लोकशाहीची घसरण अभ्यासत असताना विविध कारणे दिसून येतात — समाजमाध्यमांचा दुरुपयोग, निवडणूक आयोगाच्या कार्याविषयी जनतेतील संभ्रम, राजकारणातील गुन्हेगारीचा प्रवेश, धर्माचा राजकारणातील हस्तक्षेप, राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीवरील आघात, पंतप्रधानांच्या वाढलेल्या एकाधिकारशाही वृत्ती, तसेच मतदारांची निवडणूक प्रक्रियेतील उदासीनता. या सर्व घटकांचा परिणाम असा झाला आहे की, भारतीय लोकशाही ही क्रमशः घसरणीच्या दिशेने जात आहे. या प्रवृत्तीला रोखणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे, अन्यथा भारताची वाटचाल शेजारील पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका आणि नेपाळप्रमाणे एकाधिकारशाहीकडे होऊन लोकशाही मूल्यांचा संकोच होऊ शकतो.

भारतीय लोकशाहीसमोरील प्रमुख आव्हानांमध्ये राज्यघटनेच्या मूलभूत मूल्यांना—धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही आणि सर्वसमावेशक राष्ट्रवाद—असलेले धोके विशेषत्वाने अधोरेखित होतात. शासनाच्या कार्यप्रणालीत वाढत चाललेली एकाधिकारशाही, संसद आणि न्यायालयासारख्या संस्थांवरील विश्वासाचा ऱ्हास, तसेच निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेबाबत निर्माण झालेला संभ्रम हे घटक लोकशाहीच्या अधोगतीस कारणीभूत ठरत आहेत. याशिवाय समाजमाध्यमांचा राजकीय प्रचारासाठी केलेला दुरुपयोग, धार्मिक ध्रुवीकरण, मतदारांची वाढती उदासीनता आणि राजकारणातील गुन्हेगारीकरण या घटकांनी लोकशाहीची मूळ आत्मा कमकुवत केली आहे.

मुख्यशब्द: *लोकशाही, घसरण, राजकीय गुन्हेगारीकरण, धर्माचा हस्तक्षेप, समाजमाध्यमांचा दुरुपयोग, निवडणूक आयोग, एकाधिकारशाही.*

मुख्यशब्द: मानवाधिकार आणि भारतीय राज्यघटना.

❖ संशोधनाची वैशिष्ट्येः-

१) मानवाधिकार म्हणजे काय? हे अभ्यासणे, त्याचे स्वरुप, व्याप्ती व महत्व हे राज्यशासत्राच्या विद्यार्थ्यांना माहिती करुन देणे.
२) भारतीय संविधानामधील मानव अधिकाराविषयी माहिती पुढच्या पिढीला करुन देणे.
३) भारतीय संविधानामधील मानव अधिकाराविषयीच्या तरतूदी अभ्यासणे.

प्रस्तावना

भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. भारतीय आधुनिक लोकशाही परंपरेला ७५ वर्षे पुर्ण झालेली आहेत. या अमृतमहोत्सव वर्षात नेमकी प्राप्त झालेली फलश्रुती पाहणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. नकुल पोपट खवले, सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा

How to cite this article:
खवले, . नकुल . पोपट . (2025). भारतीय लोकशाहीचा घसरता आलेख- कारणांचा मागोवा. Journal of Research & Development, 17(9(IV)), 83–87. https://doi.org/10.5281/zenodo.17709627

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17709627
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

अलीकडेच स्वीडन मधील व्ही.-डेम या संस्थेच्या वतीने जागतिक लोकशाही संदर्भातील अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालातून जगातील अनेक देश हे लोकशाही मूल्यांपासून दूर जात आहेत. भारतीय लोकशाही बद्दल ही त्यांनी लोकशाही अक्रसित होत आहे असे भाष्य केले. निवडणूक, उदारमतवादी, सहभागी, विचारशील आणि समतावादी या तत्वांच्या आधारे संस्थेने माहिती गोळा करून त्यांचे विश्लेषण केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून जागतिक स्तरावर गौरवल्या जाणाऱ्या भारतीय लोकशाहीसाठी गेल्या काही वर्षांपासून चांगली कामगिरी झालेली नाही. या काळात प्रत्येक प्रमुख जागतिक लोकशाही अहवालात त्याची कामगिरी खराब राहिली आहे. ही अनेक कारणांमुळे चिंताजनक बातमी आहे.

लोकशाही मार्गाने चालणाऱ्यांना देशद्रोही, नक्षलवादी ठरवले जात आहे. सरकारविरोधात करण्यात आलेली आंदोलने बदनाम करण्याचे काम केले गेले. शाहीन बागचे आंदोलन, जेएनयुमधील विद्यार्थी आंदोलन असो वा इतर कोणतेही आंदोलन, सरकारच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांना सरकारी यंत्रणांच्या मदतीने प्रचंड त्रास दिला जात आहे. मागील सहा वर्षांत देशद्रोहाचे खटले दाखल करण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. देशातील बहुसंख्य प्रसार माध्यमांनाही सरकारचे बटीक बनवण्यात आले आहे. सरकारविरोधात जनतेत कोणतीच माहिती जाऊ नये यासाठी सर्व काही सुरू असून आपल्याला हवी तीच माहिती प्रसार माध्यमातून तसेच सामाज माध्यमातून पसरवली जात आहे. मोदी सरकारच्या कृषी कायद्यांविरोधात सद्या सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांना खलिस्तानी म्हणण्यापर्यंत मजल जाते हे लोकशाहीच्या दूरवस्थेचेच निदर्शक आहे.

संशोधन लेखाची उद्दिष्टे :

१. भारतीय लोकशाहीचा अभ्यास करणे.
२. भारतीय लोकशाहीच्या घसरणीची कारणे जाणून घेणे.

भारतीय लोकशाहीपुढे निर्माण झालेली आव्हाने :

१) राज्यघटनेच्या मूलभूत तत्वांना आव्हान:

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्षता, सर्वसमावेशक राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या चार मूल्यांचा उद्घोष केला. महात्मा गांधी, पं. नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांचे विचार त्या दृष्टीने महत्त्वाचे होते. सध्या या चारही मूल्यांना आव्हान मिळत आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाऐवजी, सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला जात आहे; ज्याचा आत्मा हिंदुत्वविचार हा आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्षी संमत केलेला नागरिकत्व सुधारणा कायदा हा धर्मनिरपेक्षतेच्या विरुद्ध होता; कारण त्यामध्ये एका धर्माचा लोकांना वगळण्यात आले होते. भाजप शासित काही राज्यांनी 'लव्हजिहाद'बाबतचे कायदे करून, धर्मस्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या विरुद्ध पाऊल उचलले आहे. गोहत्या निवारक कायदे संमत केल्यामुळे, अनेकांची उपजीविका धोक्यात आली आहे आणि गोरक्षकांचे समूह काही ठिकाणी निरपराध लोकांची हत्या करीत आहेत. सर्वसमावेशक आणि सामाईक राष्ट्रवादाची खिल्ली उडवली जात आहे. उदारमतवादी विचारांना क्षुल्लक ठरवून, आक्रमक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला जात आहे. नवउदारमतवादाच्या काळात समाजवादी कल्पना तेवढीशी लोकप्रिय राहिली नसली, तरी सामाजिक समता, सामाजिक न्याय, सत्तेचे आणि संपत्तीचे न्याय्य वाटप या घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ग्रथीत केलेल्या विचारांचे महत्त्व कमी झालेले नाही. आज देशामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता असून, गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढत आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये मांडण्यात आलेल्या राजकीय तत्त्वज्ञानाचे संरक्षण करण्याचे मोठेच आव्हान आज आपल्यासारख्या नागरिकांसमोर आहे.

२) पंतप्रधानाची एकाधिकारशाही :

भारत ही संसदीय लोकशाही आहे आणि या व्यवस्थेत पंतप्रधान हा लोकसभेचा, शासन यंत्रणेचा आणि सत्ताधारी राजकीय पक्षाचा प्रमुख असतो. या व्यवस्थेत सामूहिक जबाबदारीचे तत्त्व महत्त्वाचे असते. आघाडीच्या सरकारांच्या काळामध्ये पंतप्रधानांचे काम बरेचसे कमजोर होते; परंतु आता २०१४नंतर पंतप्रधानांचे पद शक्तीशाली बनले आहे. त्यांचे कार्यालय सर्व सत्तेचे केंद्र बनले असून, कार्यकारी मंडळाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या व्यवस्थेमध्ये पंतप्रधानांनी विविध पक्षांशी आणि गटांशी चर्चा करून निर्णय घेणे अपेक्षित असते; परंतु २०१९पासून ३७० कलम रद्द करणे, नागरिकत्व सुधारणा कायदा, तलाकविरुद्धचा कायदा किंवा शेतीविषयक तीन कायदे घाईने अमलात आणण्यात आले; त्यामुळे देशभर लोकांच्या चळवळी उभ्या राहिल्या. लोकशाही राजवटीत चर्चा करून, सहमती निर्माण करून, राज्य चालविणे अपेक्षित आहे. लोकशाहीची ही मूल्ये जतन करून, देशाचा कारभार करण्याचे मोठेच आव्हान आपल्यासमोर आहे. संसदीय व्यवस्थेमध्ये संसद सर्वांत महत्त्वाची असते; कारण केंद्र सरकार लोकसभेला जबाबदार असते. सर्व कायदे संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा करून संमत केले जातात. विरोधी पक्ष सरकारच्या काही धोरणांविषयी टीका करून, सरकारला धारेवर धरू शकतात. आता संसदेची पहिली शान राहिलेली नाही. अधिवेशनाचा कालावधी कमी होत आहे. चर्चेला कमी वेळ मिळतो आहे आणि सरकार घाईघाईने कायदे संमत करून घेत आहे. जम्मू-काश्मिरचे विभाजन करण्याचा कायदा व वर उल्लेख केलेले इतर कायदे घाईनेच संमत करण्यात आले. संसदीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे कायदे संमत करण्यापूर्वी, ते संसदेच्या विषय समितीकडे चिकित्सा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

करण्यासाठी पाठविले जातात; त्यामुळे कायदे निर्दोष बनण्यास मदत होते. वरील महत्त्वाचे कायदे मात्र या समितीकडे गेले नाहीत. पं. नेहरू, इंदिरा गांधी, नरसिंह राव आणि वाजपेयी हे पंतप्रधान संसदेमध्ये उपस्थित राहून, कामकाजात हिरीरीने भाग घेत असत आणि सरकारची बाजू मांडत असत; परंतु उत्तम वक्ते असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी तेवढ्या गंभीरपणे कामकाजात भाग घेताना दिसत नाहीत. जुन्या काळामध्ये अल्पमतात असूनही विरोधी पक्षांचे नेते सरकारला धारेवर धरत असत. सध्या विरोधी पक्षांची कामगिरी कमी दर्जाची आहे. आता संसदेला तिचे महत्त्व प्राप्त करून देण्याची गरज आहे.

३) न्याय व्यवस्थेवरील विश्वास कमी होणे :

न्यायालय हे आपल्या राज्यव्यवस्थेतील महत्त्वाचे अंग आहे. गेल्या ७५ वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने अनेक महत्त्वाच्या बाबींमध्ये लोकांच्या अधिकारांचे संरक्षण केले. त्यांना व्यापक बनविले. गेल्या काही वर्षांत न्यायालयाचे काही निर्णय वादग्रस्त ठरले आहेत. अनेक बाबींमध्ये लोकांच्या दृष्टीने जे निकडीचे प्रश्न आहेत, ते सुनावणीस घेतलेले नाहीत. न्याय व्यवस्थेमध्ये ही भ्रष्टाचार घुसलेला आहे २००९ मध्ये पंजाब-हरियाना हायकोर्ट च्या न्यायाधीश यांच्यावर भ्रस्ताचाराचा आरोप झाला होता. तसेच मद्रास हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश पी.डी. दिनकरन यांनी अवैध जमीन व संपती बाळगली असा आरोप झाला होता. २०१७ मध्ये न्या. कर्णन यांनी देशातील अनेक न्यायाधीश हे भ्रष्टाचारी आहेत असा आरोप केला होता. या सर्व गोष्टीवरून हेच सिद्ध होते की, अनेक न्यायाधीश हे निवृत्ती नंतर समिती अथवा आयोगावर नेमणूक, खासदार किंवा राज्यपाल पदावर नियुक्ती व्हावी म्हणून सरकारला अनुसरून आपला कल देताना दिसतात. लोकांचा या सर्व गोष्टीमुळे विश्वास उडताना दिसत आहे. आज देशात ज्या प्रमाणे मोठ्या प्रमाणात वैचारिक ध्रुवीकरण झाले आहे, त्याचे पडसाद न्यायालये आणि बार कौन्सिलच्या कामगिरीवर पडत आहेत. तरीही इतर सर्व संस्थांपेक्षा सर्वोच्च न्यायालयाची कामगिरी सरस आहे. सर्वोच्च न्यायालयाने सत्ताविभागणीचे तत्त्व अंगी बाळगून. आपली निष्पक्षता कायम ठेवून कार्य करावे अशी सर्वांचीच अपेक्षा आहे.

४) मतदारांची उदासीनता :

निवडणुकीद्वारे लोकांना सत्ता बदल किंवा आपले प्रश्नांची सोडवणूक कोणता राजकीय पक्ष अथवा उमेदवार सोडवू शकतो हे ठरविण्याची योग्य वेळ असते. अशा वेळी लोक मतदानाकडे लोक दुर्लक्ष करतात. ज्याप्रमाणे जशी जनता तशी शासन व्यवस्था ही म्हण योग्य ठरते. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेमध्ये मतदारांची ही भूमिका अतिशय महत्वाची ठरते. मतदान करण्याची उदासिनता लोकशाही देशाला मारक ठरतेच; शिवाय सर्वांगिण प्रगतीचे घोडे इथे अडते. ग्रामपंचायत ते लोकसभा. कुठलीही निवडणूक असो; चाळीस पन्नास टक्के मतदान होणं ही काही निवडणुकीची यशस्वी प्रक्रिया म्हणता येणार नाही. यासाठी मतदारांनी मतदानादिवशी सुट्टी साजरी न करता मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे.

संसदीय लोकशाहीमध्ये लोकांनी मतदान करायचे नसते. तर 'मताधिकार' बजावायचा असतो. मत ही दान द्यायची वस्तू नाही, तो आपला अधिकार आहे. आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात झालेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीतही सरासरी ६० टक्के लोकांनी मताधिकार बजावला. सहकारी संस्थांच्या निवडणुका ९० ते १०० टक्के मताधिकार बजावला जातो. पण विधानसभा- लोकसभा निवडणुकीत ते का होत नाही? याची कारणे शोधून त्या कारणांचे निराकरण करणे हे लोकशाही समोरील आव्हाने आहे. दुर्जनांच्या क्रियाशीलतापेक्षा सज्जनांची निष्क्रियता आज मोठी आहे. निवडणूक उमेदवार केंद्रित नव्हे तर मतदार केंद्रित झाली पाहिजे. राजकीय पक्षांचे जाहीरनामे ठीकच पण मतदारांचा जाहीरनामा हवा. त्यावर चर्चा झाली पाहिजे. मतदार जेवढा जागरूक तेवढी लोकशाही सक्षम होऊ शकते.

५) निवडणूक आयोगाची विश्वासार्हता कमी होणे :

भारतीय घटनेने लोकशाही प्रक्रिया सुरळीत पार पाडावी यासाठी अनेक संस्थाची निर्मिती केली. निवडणूक आयोग हा लोकशाही प्रक्रियेचे संचालन करण्याची जबाबदारी पार पाडत असतो. परंतु अलीकडे या निवडणूक प्रक्रियेत सरकार मार्फत मोठा हस्तक्षेप केला जात आहे. निवडणूक आयुक्तांची नेमणुकीतुन सरकार नियंत्रण घेताना दिसते. निवडणुका या भयमुक्त व नि:पक्षपाती वातावरणात निवडणुकांचे संचलन होणे ही लोकशाहीची पूर्वअट आहे. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवन-व्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्य व्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम निवडणुका हे असते. निवडणुकांमधून लोकांनी दिलेला कौल सरकारला अधिमान्यता मिळवून देतो. त्यामुळे प्रभावी निवडणूक यंत्रणा ही प्रातिनिधिक शासनाची आधारशिला असते. भारतीय लोकशाही ही चार खांबावर लोकशाही समर्थपणे उभी आहे. असे मोठ्या अभिमानाने सांगितले जाते. अलीकडे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ च्या लोकसभेत कशा प्रकारे गैरप्रकार झाला आहे हे पत्रकार परिषद घेऊन सिद्ध केले यास भारतीय निवडणूक आयोगाने प्रती पत्रकार परिषद घेऊन आरोपांचे समाधान करण्याऐवजी थातुरमातुर कारणे सांगून शंका निर्माण होण्यास वाव दिला. यास मा.न्यायमूर्तींनी घेतलेली पत्रकार परिषद व त्यातून भारतीय लोकशाही कशी धोक्यात आहे याचा केलेला उच्चार यातून न्याय प्रक्रियेत ही सरकार हस्तक्षेप करीत आहे हे दिसते. हे सर्व खांब एकाच व्यक्तीच्या किंवा व्यक्तिसमूहाच्या नियंत्रणात आहेत. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे सरकारच्या निर्णय निर्धारणासंबंधी टीका केली तर त्यांना सरकारच्या रोषास सामोरे जावे लागते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

२०२१ च्या फ्रीडम हाऊस इंडेक्सने भारताला गेल्या वर्षीच्या तुलनेत चार अंकांनी खाली ढकलले, ज्यामुळे त्याचा स्कोअर ७१ वरून ६७ वर आला. यामुळे देश "मुक्त" देशापासून "अंशतः मुक्त" देशापर्यंत खाली आला. स्वीडनमधील जगप्रसिद्ध थिंक-टँक व्ही-डेमनेही भारताचे असेच स्कोअर खाली ढकलले आहे. त्यांनी भारताला "निवडणूक हुकूमशाही" असे लेबल लावले आहे, जो पूर्णपणे स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणूक व्यवस्थापन संस्थेचा अभिमान बाळगणाऱ्या देशाच्या अभिमानाला आणखी विनाशकारी धक्का आहे. द इकॉनॉमिस्ट इंटेलिजेंस युनिट)EIU) ने देखील २०२१ च्या त्यांच्या अहवालात तीव्र टीका केली आहे. संस्थेने केलेल्या तुलनात्मक अभ्यासात असे दिसून आले आहे की भारताचा स्कोअर २०१४ मध्ये ७.९२ च्या सर्वकालीन उच्चांकावरून २०२० मध्ये ६.६१ वर घसरला आहे आणि त्याचे रँकिंग १६७ देशांपैकी २७ वरून ५३ वर घसरले आहे.

६) राजकारणाचे गुन्हेगारीकरण:

राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाबद्दल सार्वत्रिक चिंता व्यक्त केली जात असली, तरी याला आळा बसणार कसा, हा मोठा प्रश्न आहे. निवडून येण्याची क्षमता किंवा सत्तेच्या समीकरणात संख्याबळाला महत्त्व असल्याने राजकीय पक्ष खाका वर करतात. वास्तविक राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्याची जबाबदारी ही राजकीय पक्षांची. पण सत्तेसाठी राजकीय पक्ष वा नेते कोणत्याही थराला जातात, ते पाहता राजकीय नेतृत्वाकडून अपेक्षा करणेच चुकीचे ठरेल. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत २३३ विजयी उमेदवारांविरुद्ध गुन्हे दाखल होते. यांपैकी १५९ म्हणजेच लोकसभेतील तब्बल २९ टक्के खासदारांच्या विरोधात खून, बलात्कार, चोरी, दरोडे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. 'एडीआर इंडिया' या निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या पाहणीत, लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार निवडून येण्याचे प्रमाण प्रत्येक निवडणुकीत वाढतच असल्याचे आढळून आले आहे. हा कल तर अधिकच चिंताजनक. राजाभय्या, अतिक अहमद, पप्पू यादव, शहाबुद्दीन, फुलनदेवी, अरुण गवळी, पप्पू कलानी यांसारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेले दरोडेखोर किंवा गुंड निवडून येतात. या गुन्हेगारांची आपापल्या विभागांमध्ये एवढी दहशत असते, की कोणी विरोध करण्यास धजावत नाही. निवडून येण्याची क्षमता या एकाच निकषावर राजकीय पक्ष या गुन्हेगारांचे सारे गुन्हे दुर्लक्षून त्यांना उमेदवारी देतात. कोणताही राजकीय पक्ष असो, गुन्हेगारांना रोखण्याकरिता किंवा त्यांना उमेदवारी देणार नाही म्हणून पावले उचलण्याची शक्यता कमीच. राजकीय पक्ष किंवा नेत्यांकडून अपेक्षाच नाही आणि न्यायसंस्थाही खंबीर भूमिका घेताना दिसत नाही. त्यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखणार तरी कोण, हा प्रश्न अनुत्तरितच राहणारा आहे.

७) धार्मिक उन्मादी राजकारण:

धार्मिक उन्मादामुळे एक नवे राष्ट्र जन्मू शकते असा भारतीय इतिहास सांगतो. आपल्या भारतीय उपखंडात महागाई, बेरोजगारी, भाववाढ यावरून लोकांचे लक्ष उडविण्याचा सोपा मार्ग असतो, तो म्हणजे धर्म धोक्यात आल्याची आवाई उठविणे. तसे केले की, समाज दोन गटांत विभागला जातो. एक धर्मवादी आणि दुसरे धर्मविरोधी. त्यामुळे समाजाचा शत्रू कोण आहे ते स्पष्ट होते. एकदा शत्रू कोण आहे हे स्पष्ट झाले की, झोडपायला कुणीतरी उपलब्ध होते. आर्थिक सुधारणा करता आल्या नाहीत तरी हरकत नाही. धार्मिक सुधारणा करता येतात की! गाय ही पूर्वापार पवित्र आहेच. इतके सुलभ धार्मिक प्रतिक दुसरे कोणतेच नाही. अगदी गांधीजीही गायीला पवित्र मानीत. त्यामुळे संसदेत आर्थिक सुधारणा मंजूर करून घेता आल्या नाहीत तरी गायीच्या हत्येला बंदी घालता येते. त्याला विरोध करण्याची विरोधी पक्षांचीही हिंमत होत नाही. कारण त्यांचेही राजकारण अशा धार्मिक प्रतिकांमध्येच अडकलेले असते. गोहत्येला बंदी केली की, गायीची पूजा करणारे देशभक्त ठरतात आणि गायीची हत्या करणारे देशद्रोही. राजकारणाला जेव्हा समाजाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविता येत नाहीत तेव्हा समाजापुढे आभासी असे धार्मिक प्रश्न निर्माण केले जातात.

८) समाजमाध्यमांचा दुरुपयोग:

२१व्या शतकाच्या प्रारंभी समाज माध्यमे उदयास आली. आता फेसबुक, यु ट्यूब, ट्वीटर, इन्स्टाग्राम आदी माध्यमांबरोबरच व्हॉट्स ॲप, फेसबुक, मेसेंजर, टेलिग्राम आदी जलद संदेश प्रसार (मेसेजिंग) ॲपचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. निवडणुकीच्या कालावधीत राजकीय पक्ष आणि उमेदवारांना आपले विचार मतदारांपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे असते. या प्रक्रियेत पूर्वी वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. तथापि, ही माध्यमे तशी एकतर्फी (वन वे) माहिती प्रसाराची आहेत. आता मात्र समाजमाध्यमांची अर्थात सोशल मिडियाची यात भर पडली आहे. याआधीच्या, म्हणजे २०१४ मधील निवडणुकांपासून तर समाज माध्यम हे एक अत्यंत प्रभावशाली माध्यम ठरले आहे. हे माध्यम अन्य माध्यमांसारखे एकतर्फी नाही, तर दुतर्फी तसेच परस्परसंवादी स्वरूपाचे आहे. माहिती व तंत्रज्ञानात झालेल्या क्रांतीनंतर निवडणुकांचा कालावधीमध्ये एकाच वेळी असंख्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवार आणि राजकीय पक्ष समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करत असल्याचे दिसून येते. सप्टेंबर २०२५ मध्ये भारताच्या शेजारील नेपाळ सारख्या छोट्याशा देशात सोशल मिडिया वर घालण्यात आलेल्या बंदी मुळे जेन-झेड चळवळीने उग्र रूप धारण केले

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

त्यामुळे के.पी. ओली सरकारला राजीनामा देण्यास भाग पाडले. नेपाळ मध्ये वाढलेला भ्रष्टाचार व मिडियाचे सरकार धार्जिणे वार्ताकन यामुळे लोकशाही शासन प्रणाली जाऊन लष्करी राजवट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निवडणुकीमध्ये अपप्रचार करणे, मतांच्या ध्रुवीकरणास कारणीभूत होईल अशा प्रकारचा दिशाभूल करणारा चुकीचा मजकूर टाकणे, लोकांच्या मनात निवडणूक प्रक्रियेविषयी शंका निर्माण होईल अशा नकारात्मक बाबींसाठीही समाज माध्यमांचा वापर होऊ शकतो. त्यामुळे चुकीच्या व तात्कालिक बाजूने जनमत बदलू शकते हे भारतीय लोकशाही साठी धोक्याची घंटा बनली आहे असे म्हटले तरी वावगे नाही.

सारांश:

भारतीय लोकशाहीची घसरण अभ्यासत असताना वेगवेगळी कारणे असलेली दिसून येतात त्यामध्ये प्रामुख्याने समाजमाध्यमांचा दुरुपयोग, निवडणूक आयोगाच्या कार्याविषयी जनतेच्या मनातील संभ्रम, राजकारणातील गुन्हेगारीचा झालेला प्रवेश, धर्माचा राजकारणातील हस्तक्षेप, राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीला घातलेला हात, पंतप्रधानांची वाढलेली एकाधिकारशाही, मतदारांची निवडणूक प्रक्रियेतील उदासीनता या सर्व गोष्टींचा परिणाम हा भारतीय लोकशाही ही एका घसरणीला जात असलेली दिसत आहे. ही घसरण रोखणे सर्व भारतीयांचे कर्तव्ये आहे. अन्यथा भारताची वाटचाल शेजारील पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका व नेपाळ प्रमाणे एकाधिकारशाही वाढून लोकशाही मूल्यांचा संकोच होण्यास मदत होईल.

संदर्भसूची:

१. डॉ. भा. ल. भोळे, (२०१५) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे पब्लिशिंग कंपनी, नागपूर
२. डॉ. विवेक घोटाळे (२०२४), भारतीय राज्यघटना, द युनिक फौंडेशन, पुणे
३. डॉ. अलका देशमुख (२०१४) भारतीय लोकशाही प्रक्रिया, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
४. अंकुश पाराजी आवारे, (लेख) वाढत्या एकाधिकारशाहीची कारणमीमांसा, मुक्त शब्द, जुलै २०२५
५. C.P. Bhambri (1988) Politics in India 1947-1987, Vikas publishing house pvt.ltd.
६. V-dem, democracy Report 2025, 25 years of autocratization- democracy truped?
७. प्रसाद माधव कुलकर्णी, (लेख) आव्हानांच्या विळख्यातील लोकशाही https://marathi.thewire.in/democracy-in-the-midst-of-challenges./

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मराठी साहित्य: समता न्याय आणि स्वातंत्र्याची संकल्पना

प्रा. डॉ. दया अतुल जेठे
सहयोगी प्राध्यापक, पेमराज सारडा महाविद्यालय,अहिल्यानगर.
Email: dayajethe@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170916
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 88-91
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवारा

संत साहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत मराठी भाषेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य,समता व न्याय या तत्वांना महत्व देणारी आहे असे दिसते.जातिभेदाला फाटा देत संतांनी आध्यात्मिक लोकशाहीची संकल्पना रुजवलेली दिसते.ब्रिटीशांच्या आगमनामुळे भारतात नव्या विचारांचे वारे वाहिले व सामाजिक दृष्ट्या वंचित उपेक्षित असणार्यांना न्याय देण्यासाठी चळवळी उभ्या राहिल्या.यात समाजसुधारकांचे मोठे योगदान आहे,तसेच तत्कालीन साहित्यिकांनी या बदलाची दखल आपल्या साहित्यात घेतलेली दिसते.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना स्वातंत्र्य,समता व न्यायाचे आश्वासन दिले.त्यातून विविध समाजघटकांना जीवदान मिळाले,भविष्यातही देशात वरील मूल्यांची जपणूक व्हावी यासाठी संविधानवादी विचारांची आवश्यकता आहे.

मुख्यशब्द: *मराठी साहित्य, संत साहित्य, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य, राज्यघटना, धर्मनिरपेक्षता, समाजसुधारक, संविधानवादी साहित्य, लोकशाही मूल्ये.*

प्रस्तावना

साहित्य हा समाजमनाचा आरसा मानला जातो. कारण समाजात त्या त्या काळात घडत असलेल्या घटना, घडामोडी, समकालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, शैक्षणिक व धार्मिक घटनांचा ऊहापोह साहित्यात केला जातो. साहित्यिक हा समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून या घटनांकडे सजगतेने पाहत असतो. या घटना घडामोडींची नोंद साहित्यिकाच्या मनात होत असते. म्हणूनच साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसते तर समाजाच्या जडणघडणीचा तो आरसा असतो. त्या त्या कालखंडातील साहित्याचा अभ्यास केला असता तत्कालीन समाजाचे परिपूर्ण दर्शन घडू शकते. म्हणून साहित्य व समाज एकमेकांशी संलग्न बाबी आहेत. साहित्य ही सामाजिक स्थितीची अशाप्रकारे अभिव्यक्ती असल्यामुळे या अभिव्यक्ती वर कोणती बंधन आहेत का? या अभिव्यक्तीचा संबंध समाज दर्शनाशी आहे की कुणाच्या हितसंबंधाच्या जोपासण्याशी आहे याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. मराठी साहित्याचा संत साहित्यपासून ते आधुनिक साहित्यपर्यंतचा प्रवाह अभ्यासला असता स्वातंत्र्य, समता व न्याय या संकल्पना कशा कशा बदलत गेल्या त्याचा मागवा घेणे शक्य होते. मराठी साहित्य-मराठी साहित्याची सुरुवात 'विवेकसिंधू' या मुकुंदराजाच्या ग्रंथापासून मानली जाते.ज्याला शास्त्र अथवा धर्मक्षेत्रात अभ्यासाचा अधिकार नाही, अध्यात्माचा क्लिष्ट व्यवहार कळत नाही, ज्याला तत्त्वज्ञान आकळत नाही अशांसाठी ही रचना केली आहे असे मुकुंदराज म्हणतात. मुळात केवळ ब्राह्मणांनाच संस्कृत भाषा शिकण्याचा अधिकार असण्याच्या काळात ब्राह्मणेतरांना संस्कृतातून मांडलेले तत्त्वज्ञान व धर्मग्रंथ याविषयी ज्ञान प्राप्ती होणे शक्य नव्हते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा डॉ. दया अतुल जेठे, सहयोगी प्राध्यापक, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर.

How to cite this article:
जेठे, . दया . अतुल . (2025). मराठी साहित्य: समता न्याय आणि स्वातंत्र्याची संकल्पना. Journal of Research & Development, 17(9(IV)), 88–91. https://doi.org/10.5281/zenodo.17709776

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17709776
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

अशावेळी मुकुंदराजानी बहुजनांसाठी मराठी भाषेतून ग्रंथरचना केलेली दिसते. थोडक्यात आध्यात्मिक ज्ञानाची प्राप्ती सामान्य माणसांनाही व्हावी हा समतेचा विचार येथे दिसून येतो. अध्यात्मामुळे समाजाची खरच उन्नती होते का किंवा आध्यात्मिक क्षेत्रात समान संधी दिली की समाजाचे सर्व प्रश्न सुटतात का याबाबत प्रस्तुत शोधनिबंधात चर्चा करावयाची नाही. मात्र एका विशिष्ट समाजाला फक्त जे अधिकार आहेत ते अधिकार सामान्य माणसाला देखील मिळणे अशा अर्थाने हा एक मानसिक स्तरावरचा न्याय देण्याचा प्रयत्न मुकुंदराज यांनी केलेला दिसतो. ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका लिहून भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान मराठी भाषेत आणून याच समानतेच्या व न्यायाच्या तत्त्वाची री ओढलेली आहे. मराठी ही ज्ञानभाषा नसण्याच्या काळात व संस्कृत ही देववाणी असण्याच्या काळात मुकुंदराज, ज्ञानेश्वर व महानुभाव पंथाचे सर्वेसर्वा श्रीचक्रधर यांनी दाखवलेली हिम्मत लक्षात घेण्यासारखी आहे. मराठी भाषेच्या ग्रंथ निर्मितीसाठी मराठी भाषेच्या वापराबाबत ज्ञानेश्वर व मुकुंदराज व चक्रधर आग्रही राहिलेले दिसतात. मराठी भाषेत सामान्य समाजाला हा त्यांनी दिलेला न्याय म्हटला पाहिजे.

'स्वातंत्र्य' हा शब्द या काळात अस्तित्वहीन झालेला दिसतो.कारण परकीय सत्ताधीश अथवा प्रजेच्या हिताशी फार देणे घेणे नसलेली राजेशाही अशी राजकीय सत्ता दिसते. लोककल्याण हा या राजकीय व्यवस्थेचा पाया नसल्यामुळे सत्ताधीश बदलला तरी सामान्यांच्या जीवनात फारसा बदल होत नसेल असे दिसते. केवळ हिंदू राज्याची सत्ता असल्यास धर्मांतराबाबत सक्ती नसणे किंवा धार्मिक आचरणाबाबत परवानगी असणे इतका फायदा नक्की मिळत असेल. परकीय अथवा अन्य धर्मीय राजवट असल्यास व धर्माचरणाच्या अडचणी येणे, तीर्थक्षेत्रास जाण्यायेण्याची अडचणी असणे, धर्मांतराची भीती असणे अशा अर्थाने केवळ स्वातंत्र्य नाही हे सामान्यांना जाणवत असे. आचारविचार, उच्चार, प्रवास, व्यवसाय, शिक्षण, अभिव्यक्ती इत्यादी संदर्भात या स्वातंत्र्याचा अर्थ सामान्य लोकांना अभिप्रेत नसे. तथापि खाणेपिणे,पेहराव, रितीरिवाज धर्माचरण याबाबतचे स्वातंत्र्य लोकांना महत्त्वाचे मात्र वाटत असेल.तथापि एकूण समाजावर धर्माचा किंवा जातीभेदाचा पगडा होता. समाज भेदाभेदांनी पोखरलेला होता, या समाजाला चातुर्वर्ण्यावर आधारलेली जातीव्यवस्था पोखरीत होती. उच्चवर्णीय ब्राह्मण, ,क्षत्रिय, वैश्य यांच्या जीवनात केवळ सेवा हाच ज्यांचा धर्म त्या शुद्रातिशुद्रांमुळे श्रेष्ठतेची भावना होती. एकदा चातुरवर्णीने व्यवसाय ठरवून दिल्यानंतर मर्यादेची ती रेषा ओलांडणे शुद्रांना शक्य नव्हते आणि त्यांनी ती ओलांडणे उच्चवर्णीयांना परवडण्यासारखे नव्हते. अशा काळात हिंदू राज्यकर्ता जरी असला तरी समाजाचा एक खूप मोठा वर्ग अस्पृश्य म्हणूनच जगला. या वर्गाचा न्याय समानता या तत्त्वांशी कधीच संबंध आला नाही अन्न, वस्त्र, निवारा व आत्मसन्मान या सर्वच पातळयांवर अन्याय सहन करत असमानता आणि अन्याय हेच त्यांचे आयुष्य राहिले. यात प्रथम बदल घडला तो संतांच्या कृपेने.

संत साहित्य आणि न्याय व समता ही मूल्य

महाराष्ट्रात संतांची उज्वल परंपरा आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास स्वामी या संतांनी वारकरी संप्रदायाच्या रूपाने सर्व समाज एक केला. पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाच्या भक्तीच्या निमित्ताने जातीभेद व भ्रम अमंगळ आहेत असे निक्षून सांगितले. किमान पंढरपूरच्या वाळवंटात चंद्रभागेच्या काठी तरी त्यांनी त्यांच्या पुरती आध्यात्मिक लोकशाही स्थापन केली. या अध्यात्मिक लोकशाहीत जातीभेद नव्हता. कोणत्याही जातीच्या माणसाला परमेश्वर त्यांनी प्राप्त करून दिला. संतांच्या पूर्वी परमेश्वराचे नामस्मरण करणे, श्रवण करणे हे अस्पृश्यांना वर्ज्य होते. मात्र संतांनी सर्वांना सोबत घेऊन नामस्मरणाचा मंत्र देऊन अनावश्यक यज्ञ, उपवास, नेमधर्म व व्रतवैकल्ये यांना विरोध केला. समाजाच्या सर्व जातीधर्मातील लोकांना सामावून घेईल अशी अध्यात्माची बैठक संतांनी तयार केली. या सर्वांची सुरुवात झाली ती नाथपंथीय गोरक्षनाथांपासून."काही संप्रदायांनी इस्लामचे अनुयायित्व पत्करले. शैवातले व शाक्तातले काही संप्रदाय आपल्या वेदनिष्ठेची ग्वाही गाजवून ब्राह्मण धर्माच्या आश्रयाला आले. वैदिक म्हणून घेण्यात काही खास प्रतिष्ठा आहे असे समजण्याच्या आजतागायत प्रभावक्षम राहिलेल्या प्रवृत्ती विशेषाला ते बळी पडले. हे दोन्ही मार्ग मान्य नसलेले बौद्धातले, शैवातले व शाक्तातले अनेक संप्रदाय गोरक्षनाथांच्या नाथ संप्रदायाच्या छत्राखाली संघटित झाले. बौद्ध, मुसलमान, स्त्रिया, शूद्र अंत्यज यांना आपुलकीने जवळ करण्याचे सहदयतेचे व्यापक सामाजिक धोरण गोरक्षनाथांच्या नेतृत्वाखाली नाथपंथाने अंगीकारले."१ यानंतर ज्ञानेश्वरांनी व पुढील वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी किमान अध्यात्माच्या क्षेत्रात जातीभेदाला मूठमाती दिलेली दिसते.यात महानुभव पंथाचे चक्रधर प्रभू यांचाही नामोल्लेख करणे आवश्यक आहे.

ब्रिटिशकाळ-स्वातंत्र्य, समता व न्याय

ब्रिटिशांच्या आगमनामुळे राजकीय स्वातंत्र्य संपले असले तरी ब्रिटिशांच्या व्यापारी व राजनैतिक फायद्यासाठी का होईना भारतात अनेक सुधारणा घडून आल्या. ब्रिटिशांनी सर्वांसाठी शिक्षण खुले केले. जातिभेदाचा शिक्षणाशी, नोकरी म्हणजेच उपजीविकेशी त्यांनी कुठल्याही प्रकारे संबंध ठेवला नाही. त्यातून सर्व जाती-धर्माच्या लोकांना शिक्षणाची दारे खुली झाली. अनेक समाजसुधारकांनी या काळात जातीभेदाला विरोध केला. म. ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेशआगरकर, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले या सुधारकांच्या कर्तृत्वाने जातीभेदाला सुरुंग लावण्याचे प्रयत्न सुरू झाले. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड या राज्यकर्त्यांनी या प्रयत्नांना मोलाची साथ दिली. त्यामुळे ब्रिटिशांच्या सोबतीने व सामाजिक सुधारकांच्या प्रयत्नांनी ब्रिटिशकालीन भारतात संमतेची सुरुवात झालेली दिसते. सामाजिक न्याय ही कल्पना या काळात दिसते. राजकीय स्वातंत्र्य या मूल्याची गळचेपी झाल्यानंतर पारतंत्र्याची जाणीव, स्वातंत्र्याची आवश्यकता भारतीयांना जाणवली. यामुळे हा काळ वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. ब्रिटिश काळात जातीभेदाचे पाश ढिले होत गेल्यामुळे व्यवसायांवरील जातीचे निर्बंध संपत गेले व सर्व जातीधर्मांना व्यवसायाची समान संधी हळूहळू उपलब्ध होऊ लागली हे महत्त्वाचे आहे. ज्योतिबा व सावित्रीबाई यांच्या प्रयत्नांनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे दारे उघडली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

जातीभेदाइतकेत स्त्री पुरुष भेदाचेही अस्तित्व नष्ट होणे आवश्यक होते. याबाबत ज्योतिबा व सावित्रीबाईंनी भरीव कार्य केले. त्यामुळे ब्रिटिश काळात स्त्री- पुरुष समानता, जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न, ब्रिटिश कायद्यासमोर जातीच्या आधारे न्याय देण्याची पद्धत नसल्यामुळे न्यायाबाबतची समानता निर्माण झालेली आपणास दिसते.

स्वातंत्र्योत्तर भारत-स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमाने राज्यघटनेची निर्मिती केली. समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांचा लाभ देणे ही राज्यघटनेची खासियत आहे असे दिसते. राज्यघटनेच्या या रूपाची ग्वाही राज्यघटनेच्या सरनाम्यातून दिसते. "आम्ही ,भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याच्या व त्याच्या सर्व नागरिकास सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जेची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रदर्शित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत."२

या आश्वासनाने भारताची सामाजिक राजकीय सांस्कृतिक विश्व ढवळून निघाले. जातिभेद धर्मभेद लिंगभेद या सर्वांवर राज्यघटना उपाय ठरली. राज्यघटनेतील भाग तीन मध्ये दिलेले मूलभूत हक्क या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहेत. "समानतेचा हक्क-१४. कायद्यापुढे समानता राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे प्रमाण संरक्षण नाकारणार नाही १५.धर्म वंश जात लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई

१. राज्य कोणत्याही नागरीकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग,जन्मस्थान या अथवा यापैकी कोणतेही कारणावरून भेदभाव करणार नाही.

२. केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक

3.]क[दुकाने सार्वजनिक उपहारगृह हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थानिक यात प्रवेश करणे किंवा

३.[ख[पूर्णतः किंवा अंशतः राज्याच्या निधीतून देखभाल करण्यात येणाऱ्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरताच खास नेमून दिलेल्या विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक वापराच्या जागा यांचा वापर करणे याबाबतीत कोणतेही नि:समर्थता दायित्वनिर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन नसणार नाही.

३. या अनुच्छेदातील कोणतेही गोष्टीमुळे स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणती विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

४. या अनुच्छेद आतील किंवा अनुच्छेद २९ चा खंड दोन यातील कोणतेही गोष्टी नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यात राज्याला प्रतिबंध होणार नाही. "३

राज्यघटनेतील या तरतुदीमुळे भारताचे समाजमानस बदलले. यातून समाजाचे सर्व स्तर शिक्षण घेऊ लागले, स्वतःला आवडेल त्या नोकरी व्यवसायात रमू लागले. मुख्य म्हणजे लिहिते झाले.१९६० नंतर मराठी साहित्यात अनेक साहित्यप्रवाह निर्माण झाले."प्रचलीत आणि प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुद्ध, या व्यवस्थेने निर्मिलेल्या संस्कृती विरुद्ध, विषमता स्वीकारणाऱ्या मूल्य व्यवस्थेविरुद्ध समाजात असंतोष होता. या असमाधानाला, असंतोषाला प्रगट करणाऱ्या चळवळी समाजात निर्माण होत होत्या. एकूण जीवनाच्या परिवर्तनाची मागणी या चळवळी करत होत्या. साठोतरी साहित्य चळवळींनीही जीवनाच्या परिवर्तनाची मागणी करीत आपले प्रवाही आणि प्रभावी अविष्करण घडविले. चळवळीतून आलेल्या साहित्य प्रवाहांमध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य,आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, कामगार साहित्य, ख्रिस्ती साहित्य, जनसाहित्य, मुस्लिम साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य या साहित्य प्रवाहांचा समावेश होतो. जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिवर्तन आले पाहिजे आणि निर्भय समाज निर्माण केला पाहिजे ही भूमिका घेऊनच हे प्रवाह प्रवाहित झाले."४ या साहित्य प्रवाहांचा सरळसरळ संबंध राज्यघटनेशीच आहे. डॉ.आनंद यादव म्हणतात, "या हिंदू समाजात एका विशिष्ट काळात म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात हा दलित समाज संघटित झाला, जागृत झाला या काळातच आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले.लोकशाही आली. घटना तयार झाली. व्यक्ती स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क मिळाला. धर्मनिरपेक्षता आली. मागास जातींना शैक्षणिक व नोकरीतील सवलती मिळाल्या. दलित समाजाला या विशिष्ट काळात या सर्वांचे फायदे मिळाले आणि सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन एका विशिष्ट काळात म्हणजे १९७० च्या आसपास दलित साहित्य प्रवाह जन्माला आला."५ भारतीय राज्यघटनेचा भारतीय जनतेवर व परिणाम झाला त्याचे स्पष्ट चित्र साहित्यात उमटलेले दिसते. ते चित्र सकारात्मक आहे. नवीन समाजाच्या जडणघडणीचे ते प्रतिबिंब आहे.

समता व न्याय या मूल्यांबाबत सकारात्मक परिस्थिती असली तरी स्वातंत्र्य या मूल्याची गळचेपी होऊ नये याबाबत साहित्यिकांनी व विचारवंतांनी जागृत राहणे आवश्यक आहे. कारण समाजात वेगवेगळ्या राजकीय विचारांची, वेगवेगळ्या धार्मिक कट्टरपंथीय विचारांची लाट येत असते. तिचा तात्कालीन समाजावर परिणामी होतो. कधी हा परिणाम तात्पुरत्या स्वरूपाचा तर कधी दूरगामी स्वरूपाचाही असू शकतो. अशावेळी स्वातंत्र्य या मूल्याचे रक्षण होणे दुरापास्त होते. विशिष्ट विचारांचा प्रभाव बहुजनांवर पाडण्यासाठी अनेक व्यवस्था कार्यान्वित होतात. धर्म, राजकीय तत्वज्ञान, व्यक्तिमहात्म्य अशा गोष्टींमुळे समाजातील स्वातंत्र्य समता व न्याय ही मूल्ये अडचणी येतात. कुठलेही व्यक्तिवादी, धर्मवादी अथवा पंथवादी विचारांपेक्षा भविष्यात संविधानवादी साहित्याची निर्मिती होणे व संविधानवादी समाजाची निर्मिती होणे आवश्यक आहे. या समाजाला व या समाजातील साहित्यिकांना कलावंतांना संविधानाशी बांधिलकी वाटणे आवश्यक आहे. त्यातून संविधानाने देऊ केलेल्या तत्त्वांची बूज राखणे शक्य होईल.भारतीय संविधानाला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर वेळोवेळी या संविधानात झालेल्या दुरुस्त्यांचा विचार करता अंशतः लवचिक व अंशतः ताठर असलेल्या भारतीय राज्यघटनेचा कणा असलेल्या समता, न्याय व स्वातंत्र्य या तत्त्वांची राखण करण्यासाठी भारतीयांनी, लेखक व कलावंतांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे असे वाटते. राज्यघटनेचे अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर साहित्याचे वेगवेगळे प्रवाह आले तसे सद्यस्थितीत मात्र संविधानवादी साहित्य प्रवाहाची आवश्यकता आहे असे म्हणावयास हवे. या संविधानवादी साहित्यात स्त्री, बालक, उपेक्षित वंचित जाती जमातीतील लोक, कामगार, आदिवासी, ग्रामीण जन या सर्वांप्रति, त्यांना राज्यघटनेने देऊ केलेल्या स्वातंत्र्य समता व न्याय या मूल्यांबाबत आस्था आवश्यक असेल. अशा साहित्याची निर्मिती व संवर्धन ही काळाची गरज आहे.

निष्कर्ष

1. संतांनी मध्ययुगीन काळात बहुजनांना अध्यात्माच्या क्षेत्रात समानतेचे तत्व लागू केलेले दिसते.
2. ब्रिटीश राज्यात जातीभेद दूर व्हायला सुरुवात होवून कायदा व संधींबाबत न्याय हे तत्व जन्माला आले.
3. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार करून जी राज्यघटना अंगिकारली तिच्यामुळे स्वातंत्र्य,समता व न्याय या तत्वांचा लाभ भारतीयांना झाला.
4. भविष्यात संविधानवादी विचारांच्या लोकांची,लेखक - कलावंतांची आवश्यकता आहे.

संदर्भ

1. १.अ. ना. देशपांडे- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- भाग पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली १९६६, आवृत्ती दुसरी १९९५, पृष्ठ क्रमांक ७४.
2. २.भारताचे संविधान, पुस्तक मार्केट पब्लिकेशन पुणे,पहिली आवृत्ती ६ डिसेंबर २०२४, पृष्ठ क्रमांक ३०
3. ३.तत्रैव, पृष्ठ क्रमांक ३५-३६
4. ४.प्रल्हाद लुलेकर- साठोत्तरी साहित्य प्रवाह भाग २, सायन पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड,पुणे. प्रथम आवृत्ती २०१४, पृष्ठ क्रमांक २९.
5. ५.डॉ. आनंद यादव - १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथम आवृत्ती मार्च २००१, पुनर्मुद्रण सप्टेंबर २०१४, पृष्ठ क्रमांक ९.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

चंद्रकांत जाधव लिखित 'ढगाआडचा चंद्र' मधील जीवनचरित्र

डॉ. भक्ती गोविंद महाजन
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
संत सोहिरोबानाथ आंबिये शास. महाविद्यालय
आणि संशोधन केंद्र, पेडणे-गोवा.
Email: bhakti07mahajan@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170917
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 92-96
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

गोमंतकीय मराठी साहित्यात आत्मचरित्रात्मक लेखनाचा स्वतंत्र प्रवाह दिसून येतो. या प्रवाहात चंद्रकांत जाधव यांचे 'ढगाआडचा चंद्र' हे आत्मकथन विशेष उल्लेखनीय ठरते. हे आत्मकथन एका दलित गुराख्याच्या दाहक अनुभवांचे, सामाजिक विषमतेचे आणि मानवतेच्या संघर्षाचे प्रभावी चित्रण करते. जाधव यांनी आपल्या आयुष्यातील भोगलेले जातीय अन्याय, दारिद्र्य, अपमान, उपासमार आणि सामाजिक उपेक्षा यांचे चित्रण अत्यंत प्रामाणिकपणे केले आहे. लेखकाचे बालपण म्हणजे उपजीविकेच्या शोधातली झुंज, शिक्षणाच्या अधिकारासाठीची तळमळ आणि सवर्ण समाजाच्या मानसिकतेशी झालेला संघर्ष. लेखकाचे जीवन हे 'ढगाआडचा चंद्र' या प्रतीकासारखे आहे—जिथे अन्याय आणि विषमतेच्या काळ्या ढगांमागे स्वाभिमान, आत्मसन्मान आणि माणूसपणाचा उजेड दडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आणि बुद्धाच्या करुणा, प्रज्ञा व शील यांच्या प्रभावाचा या आत्मकथनावर स्पष्ट ठसा आहे. या आत्मकथनातून केवळ वैयक्तिक वेदनेचा नव्हे, तर दलित समाजाच्या सामूहिक संघर्षाचा साक्षात्कार घडतो. गोवा प्रदेशातील दलित जीवनाचे वास्तववादी चित्रण आणि बोलीभाषेतील सजीव अभिव्यक्ती यामुळे हे आत्मकथन सामाजिक न्याय, समता आणि स्वातंत्र्य यांच्या मूल्यांना नव्या अर्थाने उजाळा देते.

मुख्यशब्द: आत्मकथन, दलित साहित्य, चंद्रकांत जाधव, ढगाआडचा चंद्र, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य, आंबेडकरी विचारधारा, गोमंतकीय मराठी साहित्य, मानवी संघर्ष.

प्रस्तावना

पंधराव्या शतकात गोव्यात पोर्तुगीजांनी व्यापाराच्या निमित्ताने पाऊल ठेवले व लवकरच हा प्रदेश काबीज केला. १९ डिसेंबर १९६१ मध्ये भारताने गोवा मुक्तकरेपर्यंत सुमारे ४५० वर्षांच्या दीर्घ कालावधीकरिता गोव्यावर पोर्तुगीजांचा अंमल राहिला. गोवा मुक्तीनंतरच्या काळात मराठी साहित्य विविध अंगाने फुलू लागले. कथा, कविता, कादंबरीच्या तुलनेत आत्मचरित्रे संख्येने कमी असली तरी ती दर्जेदार आहेत. गोमंतकीय मराठी वाङ्मयात लिहिली गेलेली जी आत्मचरित्रे आहेत, त्यांची विषयवार विभागणी स्थूलमानाने नाट्यक्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्रे, समाजसुधारकांची आत्मचरित्रे, साहित्यक्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्रे, स्वातंत्र्यसैनिकांची आत्मचरित्रे, संगीतक्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्रे, पत्रकाराचे आत्मचरित्र, दलित आत्मकथने, संकीर्ण स्वरूपाची आत्मचरित्रे अशी करता येईल.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ भक्ती गोविंद महाजन, सहा. प्राध्यापक, मराठी विभाग संत सोहिरोबानाथ आंबिये शास. महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, पेडणे-गोवा.

How to cite this article:
महाजन, . भक्ती . गोविंद . (2025). चंद्रकांत जाधव लिखित 'ढगाआडचा चंद्र' मधील जीवनचरित्र. Journal of Research & Development, 17(9(IV)), 92–96. https://doi.org/10.5281/zenodo.17709978

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17709978
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

नाट्यक्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्रे यामध्ये 'असा धरि छंद'- मो. ग. रांगणेकर, 'जगले जशी'- लालन सारंग, 'नाटक झाले जन्माचे'- कृष्ण लक्ष्मण मोये, 'माझ्या नाट्यस्मृती'- सखाराम पांडुरंग बरवे, 'वळून बघता मागे'- भिकू पै आंगले, समाजसुधारकांचे आत्मचरित्र यामध्ये 'मी कोण?'- राजाराम पैंगीणकर, साहित्यक्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्रे यामध्ये 'आमचा वानप्रस्थ'- पं. महादेवशास्त्री जोशी, 'आत्मपुराण'- पं. महादेवशास्त्री जोशी, 'बादसायन'- बा. द. सातोस्कर, 'स्मृतिगंध'- प्रा. सं. श. देसाई, 'नाच ग घुमा'- माधवी देसाई, शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्र यामध्ये 'गोव्याच्या शिक्षण क्षेत्रातील माझी 15 वर्षे'- प्रा. द. भ. वाघ, 'स्पर्श होता परिसाचा'- भिकू पै आंगले, स्वातंत्र्यसैनिकांची आत्मचरित्रे यामध्ये 'आठवणी माझ्या कारावासांच्या काळ्या-निळ्या पाण्याच्या'- पां. पु. शिरोडकर, 'सतीचे वाण'- मोहन रानडे, 'अग्नीच्या ज्वाला'- प्रभाकर वैद्य, 'माझा काळा विजनवास'- विनायक मयेकर, संगीत क्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्र यामध्ये 'अंतरीच्या खुणा, स्वरवंदना'- जोत्स्ना भोळे, 'फुले वेचिता'- लता मंगेशकर, 'स्मृति-संगीत'- सीताकांत लाड, पत्रकाराचे आत्मचरित्र यामध्ये 'कथा एका पत्रकाराची'- ग. खं. पवार, दलित आत्मकथनामध्ये 'ढगाआडचा चंद्र'-चंद्रकांत जाधव, हिंडपी-ना. बा. रणसिंग, संकीर्ण स्वरूपाच्या आत्मचरित्रामध्ये 'सिंहावलोकन'- डॉ. पंढरीनाथ बोरकर, 'स्वातंत्र्यसंग्रामातील गोमंतक आणि माझी गांधीयात्रा' ना. आ. मराठे, 'पंख होते त्या दिवसांना'- तुळशीदास मळकर्णेकार या आत्मकथनांनी गोमंतकीय मराठी साहित्य समृद्ध केले आहे. या सर्व आत्मकथनांमध्ये मला 'ढगाआडचा चंद्र' अधिक प्रकाशमान झालेला दिसतो. हा जीवनानुभव प्रकट होताना एका 'गुराख्या'चे दाहक अनुभव तीव्र होत जातात नि आधुनिक पर्यायाने गोमंतकीय साहित्यातील समता, न्याय आणि स्वातंत्र्याची संकल्पना वाचकाला अंतर्मुख करते.

'ढगाआडचा चंद्र: चंद्रकांत जाधव'

मराठीमध्ये दलित आत्मकथनांचा एक समृद्ध प्रवाह दिसतो. या दलित आत्मकथनकारांनी भौतिक सुखवस्तू जगाचा वेध न घेता आयुष्याचे एक वेगळे दर्शन घडविले. अत्यंत आशयसंपन्न आणि सकस अभिव्यक्तीच्या लेखनामुळे मराठी साहित्यविश्वाला दलित साहित्याने व्यापक रूप दिले. गोव्यात दलित-सवर्ण, उच्च-नीच या भेदाचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत तीव्र दिसत नाही. दलित, शोषित समाजाची दुःखे, व्यथा, वेदना इथेही आहेत. आतापर्यंतच्या गोमंतकीय साहित्यातून मात्र दलित आणि गावकुसाबाहेरच्या वेदना प्रखरतेने व्यक्त झाल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर चंद्रकांत जाधव यांनी लिहिलेले आत्मकथन 'ढगाआडचा चंद्र' हा गोमंतकातील आत्मचरित्रामध्ये महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत आत्मनिवेदनाला एक आगळे महत्त्व आहे. त्यातही एका गुराख्याने लिहिलेले आणि 'गोव्यातील हे पहिलेच दलित आत्मकथन'. हे केवळ आत्मकथन नव्हे तर एका बाल गुराख्याचे बालपणातील जीवघेणे दाहक असे अनुभव मराठी साहित्यात व्यक्त केले आहेत, असे म्हणणे उचित ठरेल. लेखकाने आपल्या आत्मकथनास 'ढगाआडचा चंद्र' हे समर्पक नाव दिले. हा चंद्र नुसता ढगाआडचा नाही तर जातीयता, दारिद्र्य, कर्मकांड, विषमता, पावलापावलावर होणारा अपमान, पोटातील तीव्र भुकेमुळे होणारे हाल अशी अनेक काळीकुट्ट ग्रहणे या चंद्राला लागली होती. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा स्पर्श, भगवान बुद्धाच्या प्रज्ञा, शील आणि करुणा यांची शिकवण मिळाल्यामुळे हा 'ढगाआडचा चंद्र' अधिक उजळला.

लेखक चंद्रकांत जाधव यांनी स्फुट स्वरूपाच्या 'पाटी फुटली शाळा सुटली', 'राखणेपणाचा श्रीगणेशा', 'गुरांची काठी गुराख्याच्या पाठी', 'शिरी', 'मेलेलं ढोरं हेच आमचं पक्वान्न' , 'वाडी घाला गे', 'कोंडमारा', 'पाला आणि पाचोळा', 'राखण्यांचा राखणेपणा', 'सोऱ्याची बाटली', 'दादाची रिकामी जागा', 'गणेशोत्सव आला पण उत्साह गेला', 'आपलेपण मिळालेले राखणेपण', 'मायेच्या हाताला अर्धांगाचा झटका', 'चालला महार भिकेला', 'कोवळ्या गळ्यात ढोल अडकवला', 'आम्हाला माणसासारखे वागवा', 'काठी गेली कात्री आली', 'वेंगुर्ल्यातील दिवस', 'पाच रुपयांची नोट', 'लाथ मारुन पाणी घेतले', 'धागा जुळला धागा तुटला', 'मी मालक माझ्या दुकानाचा', 'पालोपाखी', 'उतरती कळा', 'महारांनी माराचा जाब विचारला', 'कांशीरामाच्या सायकल यात्रेत', 'एकी बिघडण्याचे कारण', 'लग्न पाहिले करुन', 'वक्ता आणि रक्तदाता', 'न दिसणारा दीपस्तंभ', ' म्हरिंगणाने महारांना काय दिले?, 'आंबेडकर विचारधारा', 'धर्मांतर', 'मुलगी झाली हो', 'माझी बायको माझा मेहुणा', 'मी निवडणुकीत पडलो', 'ढगाबाहेर' या सदतीस लेखांतून आत्मचरित्राचा आकृतिबंध उभा केला आहे.

लेखक आयुष्यातील सुरुवातीची 22 वर्षे गुराख्याचे जीवन जगले. 'बलुत'कार दया पवार यांनी या 'ढगाआडचा चंद्र' ला प्रस्तावना लिहिली आहे. प्रत्येक प्रकरणातून लेखकाने त्याच्या जीवनातील दाहक अनुभव मांडले आहेत. लहानपणी कधीतरी आपण 'शाळा सुटली पाटी फुटली' असे गाणे ऐकले असेल पण 'ढगाआडचा चंद्र' मधील 'पाटी फुटली शाळा सुटली' या पहिल्या प्रकरणाने वाचकाचे कुतूहल अधिक वाढवले. 'आवय' म्हणजे आई गावात 'आवतबॅळ' करायला जायची. घरात आधीच अठराविश्व दारिद्र्य. त्यामुळे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संध्याकाळी आईने आणलेल्या अन्नावर लेखक गिधाडासारखा तुटून पडायचा. कित्येक वेळा लेखकाने भात संपवला म्हणून आवयचा मारही खाल्ला. बाबूने भात संपवू नये म्हणून आवय भातात पाणी ओतून ठेवायची तरीही भूक अनावर झाल्याने लेखक पाण्यातील भात काढून खायचे. लेखक चुकून आएच्या हाती लागले तर त्याची चामडी लाल होत होती. आवयच्या प्रेमाऐवजी 'बाबू'ला शिव्यांची लाखोली ऐकायला मिळाली. त्याला इतर सर्वजण 'काजुळगो' म्हणायचे.

लेखक वाड्यावर 'सकऱ्याचो झील' म्हणून ओळखले जायचे. बाबूने शाळेत जावे, हा हेतू त्याच्या मोठ्या भावाचा होता. याला लेखकाच्या वडिलांनी दुजोरा दिला पण आवय खूप भडकली. भाऊने लेखकाला दप्तरही आणले, त्या आनंदाचे वर्णन करताना लेखक म्हणतात की दुसऱ्या दिवसापासून एक नवा साथी मिळणार म्हणून शाळेत जाणाऱ्या माझ्या वाड्यावरच्या मुलांनाही आनंद झाला. त्या रात्री बराच वेळपर्यंत माझी झोपच उडाली. मी शाळेत जाणार, खूप खूप शिकणार, इतर लोक वाचतात त्यांच्याप्रमाणे आपल्यालाही मग अभंग वाचता येईल. आपल्या वाड्यावरील एक जण शाळामास्तर झालाय. आपल्यालाही मास्तर होता येईल, अशी एक की दोन अनेक स्वप्ने रंगवता रंगवता नंतर कधी झोप लागली ते समजलेच नाही. पण आवय मात्र लेखकाला शिव्या देत होती. "मेलो शाळेन जाता न्ह? भाव धाडता आनि बापूयय काय फुल्ला हो? तु शाळेन जातय आनि मी काय करूक? गावात जावन आवतबॅळ करूक काव चेडवाक धरूक घरां रवांक?" आवयच्या या उद्गारावरुन पारंपरिक स्त्रीची अगतिकता, हतबलता प्रकट होते.

शाळेत जाताना बाबूला मुलांकडून पेळपकर बाई शाळेत जाणाऱ्या मुलांना 'चोकलेट' देतात हे समजते. त्याला या गोष्टीचा आनंद होतो. पण 'फक्त म्हारांच्या पोरांकच ती दिता रे चाकलेट' या वाक्याचे गांभीर्य, त्यातील दाहकता त्याच्या बालमनाला समजत नाही. इथे महार समाजाच्या मुलांनी रोज शाळेत यावे, म्हणून धडपडणारी एक स्त्रीही आपल्याला भेटते. इतक्यात एखाद्या मेलेल्या वासराला ओढत आणावे तसे आवय बाबूला घराच्या दिशेने फरफरट आणते. कोणालाही न जुमानता ती बाबूच्या हातातील पिशवी हिसकावून घेते. त्यातील पाटी काढते अन् समोरच्या खडकावर खाडकन् आपटते. नव्या पाटीचे कितीतरी तुकडे खाली मातीत मिसळतात. पुन्हा हात घालून अंकलिपी काढते अन् तिचेही तुकडे करुन दूरवर भिरकावून देते व म्हणते, "शाळा व्हयी, घे शाळा घे." मोठ्या आनंदाने शाळेत निघालेल्या बाबूला शाळेच्या पायऱ्यांचेही दर्शन न घेता माघारी वळावे लागते. आपण शिकलो नाही ते नाही निदान आपल्या भावाला तरी शिकता यावे यासाठी दादाने आणलेली ती पाटी मातीमोल होते. लेखक म्हणतात की त्या पाटीवर 'श्री गणेशाय नमः' हा पहिला धडा गिरवण्याआधीच माझ्या शालेय जीवनाची पाटी आवयने फोडून जमीनदोस्त केली. लहान वयात चंद्रकांतला वर्गात 'श्रीगणेशा' न शिकता गुरांच्या राखणेपणाचा श्रीगणेशा शिकावा लागतो.

काजुळग्याला अस्पृश्यतेची यातना जन्मभर सहन करावी लागते. एक प्रकारची वेठबिगारी बाबू सतत सहन करतो. वडिलांचे गुराख्याचे काम कोवळ्या वयात लेखकाला अंगावर घ्यावे लागते. बालवयात नाईलाजाने प्रौढपण अनुभवायला मिळते. गुरे राखताना त्याला अनेक सवर्णांची घरे बदलावी लागली. प्रत्येक घराचे विपरीत अनुभव त्यांना येतात. ज्या सवर्णांच्या घरी गुरे राखण्यास चंद्रकांतला जावे लागे तेथे आपल्या घरातून ताट न्यावे लागे. गुरे राख, लाकडे फोड, मिरची कांड, लाठीने पाणी काढ, परसात जाऊन खण, वंय बांध, आवाक्याबाहेरचे काम सांगितले जायचे आणि नाही झाले तर काठीचा मार ठरलेला. महार जातीत जन्माला आल्यामुळे अस्पृश्यतेचे विंचू, इंगळे लहान वयातच डसलेले. पुढे आयुष्यभर तो दाह ठसठसत राहतो. जेव्हा-तेव्हा महार जातीचा उल्लेख ही आणखी भयानक गोष्ट. न पेलणारी ढोरमेहनत, जरा काही चुकल्यास मालकांचे अपशब्द, ठायीठायी जातीचा कुचेष्टेने उल्लेख आणि मार या सर्वांची बालपणापासूनच लेखकाला सवय झाली होती.

गुराखी बाबूच्या वीतभर पोटाची भूक त्याला विदारक असे अनुभव देते. गुराखी बाबू म्हणतो की मला मधल्या वेळेत भूक लागली की काय खाऊ नि काय गिळू असे वाटायचे. त्या दिवसांत त्यांचे घरी आंबे-फणस खूप असायचे, पण माझ्या वाट्याला एखादा पडलेला आंबा यायचा, आडीत खूप आंबे कुजायचे. फणस डोक्यावर घेऊन पाहुण्यांना नेऊन मीच पोचवायचो; पण मला एखादं दुसरी 'शीर' खावूनच समाधान मानावे लागायचे. एकदा भूक लागली म्हणून तो न सांगता फणस काढतो व खाणार इतक्यात मालकाच्या मुलाकडून जातीचा उद्धार होत भरपूर मार खावा लागतो. गुराख्याचे काम परंपरेने करण्याचे ओझे अंगावर घेतलेल्या लेखकाने महिन्याला पाच रुपये वेतनावर काम केले. 'मला पगार वाढवून द्या, असे सांगण्याचे धाडस करण्याचे माझे वय नव्हते आणि दुसरे म्हणजे पगार किती मिळतो यापेक्षा आपल्या जेवणाचा प्रश्न सुटतो ना, याकडे माझे अधिक लक्ष असल्याने पगारसंबंधी घासघीस करावी असे मला वाटले नाही', असे लेखक प्रांजळपणे सांगतात. पोटाची भूक शमविणे हेच महत्त्वाचे होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

तत्कालीन गोमंतकातील जातिव्यवस्था, कर्मकांड, अंधश्रद्धा, दलिताचे भीषण जीवन, जातीजातींतील कोंडमारा, भुतेखेते, पाण्यासाठी संघर्ष, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन याचे दर्शन या आत्मकथनात प्रभावीपणे होते. 'मेलेलं ढोर हेच आमचं पक्कान्नं' या प्रकरणात दलिताचे जीवन किती भयावह जीवन होते, याचे आकलन होते. ढोर ओढणं, टाळे आणणे, पातोळी घालणे, ढोराचं कातडं काढणे, मांसासाठी महारांची झुंबड उडणे, दशयो घालणे असे कितीतरी प्रसंग वाचून मन बैचेन होते. या प्रकरणाच्या शेवटी लेखक म्हणतात की माझं सारं लहानपण गुरामागं हिंडण्यातच निघून गेलेलं. अनेक वेळा मी स्वतः अर्धपोटी राहून दूरवरुन चारा आणून ढोरांचं पोट भरलं आणि ह्या मेलेल्या ढोरांनी नंतर आपल्या मांसानं माझं पोट भरलं. यातील लेखकाची वेदना वाचकाला विचार करायला लावते.

या आत्मकथनात कोकण प्रदेशातील कितीतरी शब्द मोठ्या प्रमाणात आले आहे. मराठी शब्दांबरोबर कोकणी शब्दही येतात. आवय, बामण, आवतबॅळ, डाळयों, कुळवाडी, भिंतोडे, धोरा, झिला, रांधणे, चेडू, गजाल, भुरगे, राखणो, अलायते, आटकी, मडकूळ, टाळे, पातोळी घालात, आयदन, लज, मात्सो, आमगेर, फोव, गोरवा, दाया, पुताक, आमगेर, चुलती, बुडकुलो, फटकुर, मिरसांग, आका, राकेल, तखला, बाबडो, गुणो, परबेक, फाल्या, जोत, कामेरे, मानाय, पडवी, सामारा, असडये, चवथ, केणशाले, आलिमिन, तोप, घोटयो, बुराक, आटकी, नेवरी, होनीबाय, खपरेल, आंबसाण, रपाटा, वांगड, मानगो, आफड, इल्ले, च्याय, न्हानग्या, तवसर, धोरकार, मुड्डो, पुनव, फातर, चुडते, न्हिद, मुसुंडी, येळ, शिरकोटला, पाडको, पदेर, बोंडू, काजी, बेगिना, फटयतले, खणीर, धनयागेर, धुकला, सवराक, सोरो, खळा, इडी, कुड, कोमो, नाल, अंदार, खुदत, जोत, करड, पेणयों, कोळमी असे कितीतरी शब्द सांगता येतील.

इच्छा असो वा नसो गावात एखादे जनावर मरणे म्हणजेच 'आपलं पक्कान्न' म्हणणाऱ्या लेखकाने महार जातीला येणाऱ्या कठोर कर्तव्यांची यादीच आपल्यापुढे ठेवली आहे. गुराखीपणातील अनुभव सांगताना लेखकाने गुरे आणि राखण्या यातील सीमारेषा पुसून गेल्याचे चित्रण केले आहे. गावगाड्यापुढे सगळेच हतबल कसे होतात, याचा प्रत्यय लेखकाला पावलोपावली येतो. लहान वयातच इच्छा नसताना गावगाड्याची गरज म्हणून लेखक गळ्यात न पेलणारा ढोल अडकवतो.

'चालला महार भिकेला' या प्रकरणात या समाजातील चालीरितींचे भयावह चित्रण लेखकाने करुन आपली अगतिकता स्पष्टपणे मांडली आहे. माऊलीच्या देवळातील 'मिक्स' भाजीसाठी दिव्यातील रॉकेल संपते किंवा रॉकेलच शिल्लक नाही म्हणून आठच्या आधीच झोपणारे लेखक व त्यांचे सगेसोयरे मात्र भाजीचा नैवेद्य खाण्यासाठी जागायचे. भाजीची वाट पाहता-पाहता कधी कधी सगळे नकळत झोपीही गेलेले असायचे. 'नवरात्रात चोरी माफ' हा मुद्दा विनोदी असला तरी लेखक मानवी प्रवृत्तीवर भाष्य करुन जातात. चोरी केली म्हणून कोणी शिव्यांची लाखोली वाहिली तरी त्यातील एकही शिवी लागत नाही, असे लेखकाला सांगण्यात यायचे. भाजी शिजवून झाली की ज्यांच्या परसातून भाजीसाठी फळे आणली होती त्यांच्याच दारावर नेऊन 'वाडी' ठेवली जायची. असे केल्याने चोरी केल्याचा 'बाधीकार' होत नसतो अशी समजूत होती. दसऱ्याच्या रात्री देवाची तरंगे नेसली की दुसऱ्या दिवशी मानकऱ्यांच्या घरी 'पावणेर' असतो. दारी आलेल्या महारांना 'पावणेर' दिला जायचा. 'फाल्या पावणेराक जावक व्हयां' हे शब्द कानी पडले की सर्वांची तयारी सुरू व्हायची. बाबाबरोबर लेखक 'पावणेर' खायला जायचे. 'देवाचा नैवेद्य' घ्यायला जातो, असे सांगून जो तो रुचकर जेवण जेवायलाच पुढे व्हायचा. मग ओढाताण... चेंगराचेंगरी... हलकल्लोळ... एखाद्या माणसाने जेवण झाल्यावर उकिरड्यावर फेकलेली उष्टी पत्रावळ चाटण्यासाठी कुत्री जशी तुटून पडतात तशी ही मंडळी एकमेकांच्या अंगावर धावायची. लेखक, बाया, आवय, बाबा असे सर्वजण 'पावणेर' आणायला जात असायचे. लेखकाच्या फडकुरीत 'पावणेर' पडला की धावत धावत घरी येऊन तो फस्त करायचा. ते खाता खाता उद्या कोणाकडे 'भिकेक' जायचे याचा विचार त्याच्या मनात सुरू व्हायचा.

वडिलांचे आजारपण आणि त्याच्या मनाचा कोंडमारा याचे चित्रण 'मायेच्या हाताला अर्धांगाचा झटका' या लेखातून येते नि परिस्थितीपुढे अधिक अगतिक झालेला लेखक उभा राहतो. पुढे गुराख्याची काठी बाजूला ठेवून लेखकाला शिंपीकामाची कात्री का हातात घ्यावी लागते, याचे चित्रण 'काठी गेली कात्री आली' या लेखात येते. पण दुर्दैवाने धंदा डबघाईला येतो. पुढे महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारधारेतील कार्यकर्त्यांशी संपर्क कसा आला आणि लेखकाच्या विचाराला कशी नवी संजीवनी मिळाली याचे चित्रण येते. त्यातून त्याला अन्यायाविरुद्ध उभे ठाकण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. चळवळीच्या निमित्ताने झालेले मनाचे प्रबोधन आणि उन्नयन, विकसित झालेली जीवनदृष्टी, चिंतनात्मकता, संस्थात्मक कार्यातील येणारा अनपेक्षित अनुभव लेखकाला नवी ऊर्जा देतो. या सर्व बदलांचे चित्रण लेखकाने समर्पक रीतीने केले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

आपण दलित असलो, तरी माणूस आहोत आणि माणूसपणाचे अधिकार आपल्याला घटनेने दिले आहेत, ह्या विचारांचा पाठपुरावा करण्याचे सामर्थ्य लेखकामध्ये निर्माण झालेले दिसते. समाजाचे चित्रण घडविताना दलित समाजाच्या अवस्थेच्या कारणांचा शोध घेण्याची तटस्थ वृत्तीही लेखकामध्ये निर्माण झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. राजकारणातील भ्रमनिरास, संस्थात्मक कार्याचे अपयश, घराघरांतील भाऊबंदकी, कुटुंबातील कलह यांसारखे अनेक प्रसंग लेखकाने आडपडदा न ठेवता वाचकांसमोर ठेवले आहेत. स्वतःच्या लग्नासाठी भलतेच कारण दाखवून बँकेचे घेतलेले कर्ज आणि बायकोचे मंगळसूत्र पाहून परतफेडीची आलेली आठवण लेखक काहीही न लपविता प्रामाणिकपणे सांगून टाकतात. खिशात सापडलेली 'पाच रुपयांची नोट' प्रामाणिक लेखकाला रात्रभर झोप देत नाही.

अशा प्रकारे स्वतःच्या गुणदोषांबद्दल आत्मचिंतन करुन जीवनाची वाट शोधणारे चंद्रकांत जाधव प्रांजळ कथनातून 'माणूस' घडवितात. विविध प्रसंगातून जे संवाद येतात ते संवाद दैनंदिन बोलीभाषेतील आहेत. घटनाप्रसंगांची मांडणी आकलनास सुलभ आहे. जे समोर आहे ते लेखक कोणतीही तक्रार न करता भोगत जातात पण आत्मचिंतनाची ऊंची वाढवत जातात. त्याचे खापर अन्य कुणावर फोडत नाहीत. लेखकाचा संयम आणि प्रामाणिकपणा या आत्मकथनाला विशेष आकार देतो. स्वतःच्या समाजाच्या दुरवस्थेचे चित्रण करुन त्या मागील कारणांचा शोध घेत विकासाप्रत कसे जाता येईल, याचा विचार लेखकाने इथे केला आहे. लेखक कुठेही आक्रमक न होता, दुःखाला कुरवाळत न बसता वास्तवाला अधोरेखित करतात. एकंदरीत लेखक चंद्रकांत जाधव यांनी 'ढगाआडचा चंद्र' ला समता, न्याय आणि स्वातंत्र्य या मूल्यांनी पौर्णिमेच्या चंद्राचे तेज प्राप्त करुन दिले आहे.

धन्यवाद.

संदर्भ:

1. जाधव चंद्रकांत, 'ढगाआडचा चंद्र' दुसरी आवृत्ती, मनोविकास प्रकाशन, पुणे 2022
2. नाडकर्णी एस. एस. आणि कोमरपंत सोमनाथ, (संपा.), गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड 1, पहिली आवृत्ती, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, 2003.
3. प्रभुदेसाई वि. भा. आणि घवी रविंद्र, (संपा.), गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड 2, पहिली आवृत्ती, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, 2003.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

दलित साहित्य और संविधान: संविधान, अधिकार और अस्तित्व

किशोरी सुरेश टोणपे
एम. ए. बी. एड, सेट, पी. एचडी (कार्यरत) सहायक प्राध्यापक
दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स एण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी
Email: kishoristonape@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170918
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 97-99
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

दलित साहित्य हिंदी साहित्य का एक सशक्त और परिवर्तनकारी अंग है, जो समाज में व्याप्त शोषण, अन्याय, भेदभाव और असमानता के विरुद्ध संघर्ष का प्रतीक है। यह साहित्य केवल कलात्मक अभिव्यक्ति नहीं बल्कि एक सामाजिक, राजनीतिक और मानवीय आंदोलन है, जो दलित वर्ग की वास्तविक पीड़ा, अस्मिता और अधिकारों की मांग को स्वर देता है। डॉ. भीमराव आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले और गौतम बुद्ध के विचारों से प्रेरित यह साहित्य समानता, न्याय और स्वतंत्रता पर आधारित समाज की स्थापना का लक्ष्य रखता है।

भारतीय संविधान ने दलितों को समानता, स्वतंत्रता और सामाजिक न्याय के मौलिक अधिकार प्रदान किए हैं। अनुच्छेद 14 से 18 तक के प्रावधानों के अंतर्गत अस्पृश्यता का उन्मूलन, समान अवसर और शिक्षा एवं रोजगार में आरक्षण की व्यवस्था की गई है। इसके अतिरिक्त अनुसूचित जाति एवं जनजाति अत्याचार निवारण अधिनियम 1989 ने दलितों के अधिकारों की रक्षा को कानूनी रूप दिया है।

दलित साहित्य और संविधान, दोनों ही दलित समाज के अस्तित्व, आत्मसम्मान और मानवाधिकारों की सुरक्षा के लिए परस्पर पूरक हैं। एक ओर संविधान ने दलितों को अधिकार और सुरक्षा दी है, तो दूसरी ओर दलित साहित्य ने उनके जीवन की वास्तविकताओं, संघर्षों और आकांक्षाओं को स्वर प्रदान किया है। यह साहित्य समाज में समता, न्याय और मानवता के मूल्यों को सशक्त करने का कार्य करता है।

मुख्यशब्द: *दलित साहित्य, भारतीय संविधान, सामाजिक न्याय, समानता, मानवाधिकार, आंबेडकर विचारधारा, शोषण, अस्मिता, अधिकार, स्वतंत्रता।*

प्रस्तावना

हिंदी साहित्य के समकालीन साहित्य में दलित साहित्य एक प्रमुख, ज्वलंत एवं गंभीर साहित्य है। इस साहित्य की अनुगुंज संपूर्ण भारतीय साहित्य मे सुनाई पडती है। साहित्य समाज राजनीति इत्यादी दलित साहित्य का बहुआयामी प्रभाव पडा है।

डॉ. नरसिंह दास के अनुसार "यह वर्ग सामाजिक आर्थिक एवं शैक्षणिक रूप से पिछडा हुआ है, इसे स्वाभिमान, स्वमान और चेतना से जर्जीत रखा गया है। डॉ. बलवंत साधू जाधव के अनुसार "किसी जाती या व्यक्ती का अधिकार रहित कुचला हुआ मुक जीवन" उपरोक्त परिभाषाओं से अनुमान लगाया जा सकता है की, दलित साहित्य की आवश्यकता क्यों पडी तथा इसका अर्थ क्या है।

भारतीय समाज वर्ग मे बांटा था इसका मुख्य आधार था ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र। धीरे-धीरे दलितों को दास समझा जाना शुरू कर दिया।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
किशोरी सुरेश टोणपे, एम. ए. बी. एड, सेट, पी. एचडी (कार्यरत) सहायक प्राध्यापक दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स एण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी

How to cite this article:
टोणपे, . किशोरी . सुरेश . (2025). दलित साहित्य और संविधान: संविधान, अधिकार और अस्तित्व. Journal of Research & Development, 17(9(IV)), 97–99. https://doi.org/10.5281/zenodo.17710076

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17710076
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

जाती, रंग, अस्पृश्यता, अछुत और कार्य व्यवस्था आधी की दृष्टि से दलितों को हीन भाव से देखा जाने लगा। जातीयों व वर्गो में बटे होने के कारण शूद्रों को सबसे घृणित समझा जाने लगा। समाज में जातीय विभेदो असमानताओं उच्चता-निम्नता, पवित्रता-अपवित्रता, धार्मिकता-अधार्मिकता की अभेद दिवारें खडी हो गयी। इन असमानताओं के कारण अंत मे दलित एवं अनुसूचित जाती एवं अनुसूचित जनजातीयाँ अस्तित्व में आयी।

मध्यकाल में शूद्रों को अस्पृश्य कहा जाने लगा तथा कालांतर में इन्हें पराधीनता, परवशता, सामाजिक-सांस्कृतिक भिन्नता तथा अमानवीय शोषण का शिकार बना दिया। आर्थिक, राजनैतिक, सामाजिक, शैक्षणिक आदि स्थितीयों में इनकी हालत दयनीय या कहे तो बद से बदत्तर होती चली गई। समाज मे सबसे नीची स्थिती होने के कारण इन्हें दलित कहा जाने लगा। धीरे-धीरे रूढियों, भेदभावों, छूआछूतों की गहरी मानसिकता के घनघोर अंधेरे के गर्त मे धझता चला गया। पुरा समाज अस्पृश्यता, जातीभेद, संकीर्णता का अड्डा बनता चला गया। आज का समाज भी अपनी संकीर्ण मानसिकता से ग्रासित है, अपनी मानसिकता को न बदल सका है और दलितों को सन्मान और समानता का हक न दे सका है।

दालित साहित्य से अभिप्राय उस साहित्य से है, जिसमें दलितों ने स्वंय अपनी पीडा को वाणी दी है। अपने जीवन-संघर्ष में दलितों ने जिस यथार्थ को भोगा है, दलित साहित्य उनकी उसी अभिव्यक्ती का साहित्य है। वास्तव में दलित द्वारा लिखा गया साहित्य ही दलित साहित्य की कोटि में आता है। बाबा भीमराव आंबेडकर जी की विचारधारा, उनका चिंतन उनके द्वारा छेड़ा गया दलित आंदोलन है, जो समता एव समानता की बात करता है। जोतिबा फुले और महात्मा बुद्ध का दर्शन भी इसकी दार्शनिक पृष्ठभूमि है। तुलसीराम ने इसकी शुरुआत 20 वी सदी के तिसरे दशक से मानी है। जब बाबा भीमराव आंबेडकर जी का उदय हुआ। वर्तमान दलित समाज का जो रूप है, उसकी जड में डॉ. आंबेडकर जी का संघर्ष आज भी खाद-पानी की तरह काम आ रहा है। दलित साहित्य में दलितों की पीडा, शोषण, अन्याय, संघर्ष इत्यादी गाथाएँ यथार्थवादी धरातल पर अभिव्यक्त हुई है। यह साहित्य वर्ण-व्यवस्था के विरोध में तथा उसके विपरित मूल्यों के लिए संघर्षरत मनुष्य से प्रतिबद्ध साहित्य है। दालित साहित्य के केंद्र में वे सारे प्रश्न और सवाल है जिनका संबंध जाति, रंग, नस्ल, लिंग धर्म इत्यादी के आधार पर भेदभाव से है। उपन्यासम्राट प्रेमचंद जी ने ठाकूर का कुआँ, कफन, सद्गती, मंत्र, दूध का दाम, विध्वंस, गुल्ली-डंडा इत्यादी कहानियों में दलितों की स्थिती उनके प्रति होनेवाला व्यवहार, उत्पीडन शोषण विद्रोहात्मकता मनुष्यता को अपने साहित्य मे स्थान दिया है।

दलित साहित्य भारतीय समाज में सदियों से उपेक्षित और उत्पीडीत दलित वर्ग की आवाज है, जो उनके भोगे हुए यथार्थ शोषण, अन्याय और संघर्ष को व्यक्त करता है। यह सिर्फ साहित्य नहीं, बल्की एक सामाजिक राजनीतिक आंदोलन है, जो समता न्याय और मानवीय गरिमा की मांग करत है, और ब्राह्मणवादी व्यवस्था जातीवाद तथा पारंपारिक साहित्य के मानदंडो का विरोध करता है। डॉ. आंबेडकर और महात्मा ज्योतिबा फुले के विचारों से प्रेरित साहित्य दलित अस्मिता को स्थापित करने और सम्यक परिवर्तन लाने का प्रयास करता है। दलित साहित्य दलितों की वास्तविक जीवन स्थिती उनके दुःख-दर्द, शोषण और असमानताओं का यथार्थवादी चित्रण करत है। यह समाज मे व्याप्त जाती-पाती ऊँच- निच और अन्याय के खिलाफ एक सशक्त प्रतिरोध और विद्रोही स्वर है। यह साहित्य कला या मनोरंजन के लिए नहीं, बल्कि मानवीय सरोकारों, समता, न्याय और स्वतंत्रता पर आधारित है। डॉ. आंबेडकर जी के विचार जैसे शिक्षित बनो, संघर्ष करो, और संघटित हो दलित साहित्य की वैचारिक आधारभूमी है। दलित साहित्य केवल लेखन नहीं है बल्की एक जमिनी स्तर का सामाजिक,राजनीतिक आंदोलन है। जो दलितों के मानवाधिकारों की मांग करता है, इसका उद्देश यह है कि समाज मे समांतर न्याय और मानवी गरिमा की स्थापना करना है,जिससे एक समतामुलक समाज का निर्माण हो सके। यह ब्राह्मणवादी दैववादी और भाग्यवान पर आधारित पारंपारिक साहित्य के मानदंड और सोच का विरोध करता है, दलित साहित्य संविधान में प्रदत्त अधिकारों के बावजूद सदियो से चले आ रहे अन्याय और शोषण के विरुद्ध संघर्ष का प्रतीक है, जो दलितों की पहचान, अस्मिता और सामाजिक न्याय की मांग करता है। यह साहित्य संविधान के समक्ष दलितों की स्थिति को उजागर करता है, जो उन्हें समान अवसर और मानवाधिकार दिलाने की बात करता है। भारतीय संविधान ने अनुच्छेद 17 के तहत अस्पश्यता को समाप्त किया है और दलितों के अधिकारों की रक्षा के लिए अनुसूचित जाती, जनजाती अधिनियम 1989 जैसे कानून बनाए है। संविधान में कई कानूनी सुरक्षा उपायों के बावजूद दलितों को अभी भी उत्पीडन का शिकार होना पडता है, और वे अपने मौलिक अधिकारांसे वंचित रह जाते है। दलित साहित्य व संविधान दोनों मिलकर दलितों के अस्तित्व और अधिकारों की सुरक्षा की बात करते है। संविधान द्वारा दिये गये अधिकार और दलित साहित्य में व्यक्त की गई पिडा दोनों एक साथ दलितों के जीवन को समझने और उनके लिये न्याय सुनिश्चित करने के उद्देश असे जुडते है। डॉ. भीमराव आंबेडकर ने दलितों के संवैधानिक अधिकारों को सुनिश्चित कर दलित चेतना का मार्ग प्रशस्त किया, जिससे उन्हें अपने मानवाधिकारों के प्रति जागृत होने और अपने हक के लिए संघर्ष करने में मदद मिली।

भारतीय संविधान ने दलितों को कई मौलिक अधिकार और संरक्षण दिए है, जिनमें समानता का अधिकार (अनुच्छेद 14-18) और अनुच्छेद 15-16 के तहत शिक्षा व रोजगार में भेदभाव पर रोक शामिल है। अनुच्छेद 14 के तहत कानून के समक्ष सभी नागरिकों को समानता का अधिकार देता है। अनुच्छेद 15 में धर्म, मूलवंश, जाती, लिंग या जन्मस्थान के आधार पर किसी भी नागरिकों जिनमें दलित भी शामिल है। इनके लिये शिक्षा, नोकरीयों और अन्य संस्थाओं में विशेष प्रावधान बनाने की अनुमती देते है। जिससे उनके जीवन स्तर में सुधार हो सके। अधिनियम 1989 यह एक महत्वपूर्ण कानून है जो दलितों पर होने वाले विभिन्न प्रकार के अत्याचारों को रोकने और ऐसे अपराधों के खिलाफ कठोर दंड का प्रावधान बनाने की अनुमती देते है, जिससे दलितों के जीवन स्तर में सुधार हो सके।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निष्कर्षत: कहा जा सकता है की हिंदी साहित्य के दलित लेखकों की रचनाएँ चेतना से परिपूर्ण दलित अस्मिता के संघर्ष के लिए है। अस्मिता की तलाश का कदम उठाकर इस वर्ग को जागृत किया। बंधक और पिडितों को उनकी स्थिती से बाहर जाने का रास्ता दिखाना है, समता एवं समानता से वर्गविहीन समाज की स्थापना करना इसका उद्देश है।

संदर्भ ग्रंथ सूची:

1) डॉ. सुनील बनसोडे, श्री सचिन कांबळे- कवी जयप्रकाश कर्दम: एक अध्ययन, विनय प्रकाशन, कानपूर। पृष्ठ-47
2) डॉ. कृष्णकुमार रत्तू - धर्मनिरपेक्ष भारतीय लोकतंत्र, बुक एनक्लेव, जैन भवन, एन. ई. आई के सामने, शांतिनगर-जयपुर, प्रथम संस्करण: 2003 पृष्ठ-1
3) डॉ. माधवी जाधव-मन्नू भंडारी के साहित्य मे चित्रित समस्याएँ विद्या प्रकाशन, सी -449, गुजैनी, कानपुर -22 प्रथम संस्करण: 2007 पृष्ठ 253
4) डॉ. सुनील बनसोडे, श्री सचिन कांबळे- कवी जयप्रकाश कर्दम: एक अध्ययन, विनय प्रकाशन, कानपूर। पृष्ठ-20

वही पृष्ठ-22

वही पृष्ठ -24

वही पृष्ठ-26

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मराठी नाट्यपरंपरेतील समता, न्याय आणि स्वातंत्र्याची तात्विक मांडणी

प्रा. सुचिता यल्लाप्पा कांबळे
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली (स्वायत्त)
Email: suchitakamble2403@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170919
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 100-104
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

मराठी नाट्यपरंपरा ही भारतीय समाजातील समता, न्याय आणि स्वातंत्र्य या मूलभूत तत्त्वांची कलात्मक अभिव्यक्ती आहे. सुरुवातीच्या पौराणिक आणि ऐतिहासिक विषयांपासून पुढे सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांवर भाष्य करणारी रंगभूमी विकसित झाली. विष्णुदास भावे, अण्णासाहेब किर्लोस्कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी, वि. वा. शिरवाडकर, विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, सतीश आळेकर आदी नाटककारांनी आपल्या नाट्यकृतींमधून असमानता, अन्याय, स्त्रीदडपशाही, जातिभेद आणि सत्तेचा गैरवापर यासारख्या सामाजिक प्रश्नांना भिडवले. दलित रंगभूमीच्या उदयानंतर समतेचा व सामाजिक न्यायाचा विचार अधिक व्यापक झाला. या नाट्यप्रवाहातून समाजात लोकशाही मूल्ये, मानवी हक्क व स्वातंत्र्याची जाणीव दृढ झाली. म्हणूनच मराठी रंगभूमी ही केवळ कलात्मक परंपरा नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरली आहे.

मुख्यशब्द: *मराठी नाट्यपरंपरा, समता, न्याय, स्वातंत्र्य, सामाजिक सुधारणा, स्त्रीसमता, दलित रंगभूमी, मानवी हक्क, लोकशाही मूल्ये, सांस्कृतिक परिवर्तन.*

प्रस्तावना

भारतीय संस्कृतीच्या प्रवाहात कला ही नेहमीच एक सृजनशील शक्ती राहिली आहे. ती केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न राहता समाजाच्या जडणघडणीत सक्रिय सहभाग घेणारी ठरली आहे. नाटक ही कलाप्रकारांची सर्वाधिक प्रभावी शाखा मानली जाते कारण त्यातून कथन, अभिनय, संगीत, काव्य, संवाद या सर्वांचा संगम होताना दिसतो आणि त्यामुळे त्याचा प्रेक्षकांवर थेट, जिवंत आणि दीर्घकाळ टिकणारा परिणाम होतो. मराठी रंगभूमीचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, तिच्या प्रारंभापासूनच सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक संदर्भांची नाळ तिच्याशी घट्ट जोडलेली आहे. भारतीय समाजातील अन्याय, विषमता आणि दडपशाहीविरुद्ध उभे राहणे, दुर्बल घटकांच्या अधिकारांची जाणीव करून देणे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणे या मूल्यांना मराठी नाटककारांनी सातत्याने अभिव्यक्त केले. त्यामुळे समता, न्याय आणि स्वातंत्र्य या त्रिसूत्री मूल्यांची बीजे प्रत्यक्षात मराठी रंगभूमीत पेरली गेली ही बाब विशेष अधोरेखित करण्यासारखी आहे. . मराठी नाट्यपरंपरा ही या मूल्यांचे प्रकटीकरण करणारी एक महत्त्वाची सांस्कृतिक परंपरा आहे. प्रत्येक समाज आपल्या वैचारिक, सांस्कृतीक आणि राजकीय जीवनाला दिशा देताना काही मूलभूत तत्त्वांचा आधार घेतो. मानवी सभ्यता ही समता, न्याय आणि स्वातंत्र्य या मूल्यनिष्ठ आधारांवर उभी आहे. याच तत्त्वांना भारतीय संविधानाने प्राधान्य दिले. ही त्रिसूत्री राजकीय तत्त्वज्ञानापुरती मर्यादित नाही, तर मानवी अस्तित्वाचा पाया मानली जाते. रंगभूमी ही केवळ करमणुकीचे माध्यम राहिलेली नसून ती सामाजिक संवाद, विचारविनिमय आणि परिवर्तनाचे व्यासपीठ ठरली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. सुचिता यल्लाप्पा कांबळे, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली (स्वायत्त).

How to cite this article:
कांबळे, . सुचिता . यल्लाप्पा . (2025). मराठी नाट्यपरंपरेतील समता, न्याय आणि स्वातंत्र्याची तात्विक मांडणी. Journal of Research & Development, 17(9(IV)), 100–104.
https://doi.org/10.5281/zenodo.17710171

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17710171
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

१९ व्या शतकातील सामाजिक सुधारणांच्या चळवळींपासून ते २०व्या शतकातील आधुनिकतावादी आणि प्रयोगशील नाट्यपरंपरेपर्यंत मराठी नाटक सतत समाजातील असमानता, शोषण, अन्यायकारक रूढी, सत्तेचा गैरवापर आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न यांना भिडत आले आहे. नाटककारांनी आपल्या नाट्यकृतींमधून समतेची जाणीव निर्माण करून दिली. न्यायाची हाक दिली आणि स्वातंत्र्याची आकांक्षा व्यक्त केली. परिणामी, मराठी रंगभूमी ही केवळ सांस्कृतिक अभिव्यक्ती न राहता सामाजिक न्याय, लोकशाही विचारसरणी आणि मानवी मूल्यांची प्रत्यक्ष शाळा ठरली. त्यामुळेच मराठी नाट्यसृष्टीचा अभ्यास हा केवळ साहित्यिक दृष्टीने नव्हे तर तात्त्विक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो.

१८४३ साली विष्णुदास भावे यांनी सादर केलेल्या 'सीता स्वयंवर' या नाटकाने मराठी रंगभूमीची पायाभरणी केली. सुरुवातीला रंगभूमीवर पौराणिक व ऐतिहासिक विषयांवर आधारित नाटके आली पण हळूहळू सामाजिक प्रश्नांवर प्रकाशझोत टाकणारी नाटके रंगभूमीवर येण्यास सुरुवात झाली. समता, न्याय व स्वातंत्र्य या मूलभूत संकल्पनांचा प्रभावीपणे अविष्कार दिसू लागला. पुढे अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या 'संगीत शाकुंतल' आणि 'संगीत सौभद्र' या नाटकांनी मराठी रंगभूमीला लोकप्रियता मिळवून दिली. ही नाटके कथानकात पौराणिक असली तरी स्त्री-पुरुष नात्यातील परस्पर आदर, प्रेम, समानता आणि स्वाभिमान यांचा पुरस्कार करताना दिसून येतात. यातून समतेची सूचक जाणीव रंगभूमीवर उमटू लागली. १९ व्या शतकातील महाराष्ट्र हा सामाजिक विसंगतीने भरलेला होता. जातीभेद, अस्पृश्यता, स्त्रियांची दुर्दशा, बालविवाह, विधवांचे हाल, अंधश्रद्धा आणि वसाहतवादी गुलामगिरी यांसारख्या समस्यांनी समाज पोखरला होता. अशा काळात महात्मा फुले, लोकहितवादी, महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर अशा सुधारणावादी विचारवंतांनी समाजाला नवीन दिशा दिली. या सुधारणांचा थेट परिणाम साहित्यावर आणि विशेषतः नाट्यसृष्टीवर झाला. कारण नाटक हे समाजाशी थेट संवाद साधणारे माध्यम असल्याने लोक जागृतीसाठी ते प्रभावी माध्यम ठरले.

मानवी जीवनात समतेचे स्थान मूलभूत आहे. मराठी रंगभूमीचा विचार केला तर समतेचा प्रश्न विविध पद्धतीने मांडला आहे. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांचा काळ सुरू झाला तेव्हा नाट्यकृतींनी थेट असमानतेला भिडण्याचे धाडस दाखवले. 'विधवा विवाह' या विषयावर शारदा, पाणिग्रहण, संशयकल्लोळ, रत्नाकर यांसारखी अनेक नाटके लिहिली गेली. ही नाटके स्त्रीला समान मानवी हक्क मिळावा यासाठी आग्रह धरणारी ठरली. याच काळात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारखी मंडळी थेट जातीभेदाच्या प्रश्नांना भिडली. उच्च-नीचतेच्या भावनांमुळे माणसांमाणसात असमानता निर्माण होते हे त्यांच्या नाटकांमधून स्पष्ट झाले. समतेचा विचार भारतीय परंपरेत प्राचीन काळापासून आढळतो. उपनिषदांमध्ये "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना सर्वांच्या ऐक्याचा आणि समानतेचा आग्रह धरते. राम गणेश गडकरींचे 'एकच प्याला' हे नाटक मुळात व्यसनाधीनतेविरुद्ध असले तरी त्यातून समतेचे महत्व अधोरेखित होते. पतीच्या व्यसनाधीनतेमुळे पत्नी आणि मुलांवर अन्याय होतो, स्त्रीचा मानवी सन्मान नाकारला जातो, कुटुंबाची आर्थिक व सामाजिक अवस्था ढासळते. हे या नाटकातून प्रतिबिंबित होते. या नाटकात दाखवले आहे की, व्यसनाधीनतेमुळे केवळ सामाजिक चौकटीतच नव्हे तर कौटुंबिक पातळीवरही दैन्य निर्माण होते. स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने जगता यावे, तिचे आयुष्य व्यसन, दडपशाही वा परावलंबित्व यामुळे उद्ध्वस्त होऊ नये हा संदेश या नाटकातून प्रकर्षाने दिला आहे. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या 'कीचकवध' या नाटकाने अप्रत्यक्षपणे इंग्रजी सत्तेविरुद्ध आवाज उठविला. कीचकाचे व्यक्तिमत्व हे दडपशाही वृत्तीचे प्रतीक ठरले, तर भीमाच्या पराक्रमातून समतेची आणि न्यायाची आकांक्षा पूर्ण झाली. गुलामगिरीत अडकलेल्या समाजाला स्वातंत्र्यासोबतच समतेची आस होती. राजकीय स्तरावर 'सर्वांना समान हक्क' हा विचार समाजाच्या मनावर बिंबविण्याचे काम या नाटकाने केले. वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' या नाटकातून कौटुंबिक संघर्षातून निर्माण होणारी विषमता आणि त्यातून होणारी मानवी मनाची शोकांतिका दाखविली आहे. त्यामुळे प्रेक्षकांना समानतेच्या मूल्यांची जाणीव होते. या काळातील नाटककार मानवी हक्क आणि समानतेवर आधारित मूल्यांना अधोरेखित करतात.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी नाटकांनी वास्तववादी आणि प्रयोगशील वळण घेतले. विजय तेंडुलकर हे या प्रवाहातील महत्त्वाचे नाटककार होते. त्यांच्या नाटकांमधून समतेचा प्रश्न तीव्रतेने समोर आला. 'सखाराम बाईंडर' या नाटकातून स्त्रीला माणूस म्हणून न पाहणाऱ्या पुरुषी मानसिकतेवर प्रकाश टाकला आहे. स्त्रीला केवळ उपभोगाची वस्तू न मानता तिच्या इच्छेला स्वातंत्र्याला व अस्तित्वाला समान दर्जा द्यावा असा मोलाचा संदेश या माध्यमातून दिला आहे. 'घाशीराम कोतवाल' या नाटकांमधून राजकीय सत्तेचा दुरुपयोग आणि सामान्य जनतेच्या हक्कांची पायमल्ली होताना दाखवली आहे. सत्ता ही मोजक्या लोकांच्या हाती गेल्यावर समता नष्ट होते आणि संपूर्ण समाजावर अन्यायाचे ओझे पडते ही जाणीव प्रेक्षकांपर्यंत या नाटकांमधून पोहोचते. महेश एलकुंचवार यांच्या 'वाडा चिरेबंदी' या नाटकातून पिढीजात संघर्षातून समतेचा नवा पैलू दिसतो. विजय तेंडुलकर यांच्या 'कमला' या नाटकामधून लिंगभेद,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

घरगुती असमानता आणि स्त्रीची समता या प्रश्नांना अधोरेखित करण्यात आले आहे. दलित चळवळीच्या प्रभावातून लिहिलेल्या नाटकांमधून जातीय समतेचा प्रश्न पुढे आला. यातून जातीच्या आधारे होणारे शोषण, अपमान यावर तीव्र हल्ला चढवला. दलित रंगभूमीने मराठी समाजात खरी समतेची चर्चा घडवून आणलेली दिसते. साधारण १९७०-८० च्या दशकात दलित रंगभूमीचा उदय झाला. ही रंगभूमी पारंपरिक, सामाजिक, सांस्कृतिक चौकटीला थेट आव्हान देणारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, नामदेव ढसाळ, दया पवार यांच्यासारख्या साहित्यिकांच्या विचारांचा प्रभाव रंगभूमीवर उमटला. म्हणूनच मराठी नाट्यपरंपरेचा हा प्रवास समाजाच्या समतेच्या शोधाचा कलात्मक प्रवास आहे. पौराणिक कथा, सामाजिक सुधारणा, राजकीय संघर्ष, दलित साहित्य, प्रयोगशील रंगभूमी या सर्वच अंगांनी 'समता' हा विचार नाटकामधून प्रकट होत गेला.

यानंतर न्याय या मूल्याचा विचार केला तर न्याय हा सुसंस्कृत समाजाचा पाया असलेला दिसून येतो. न्याय म्हणजे केवळ न्यायालयीन प्रक्रिया नव्हे तर समाजातील प्रत्येक व्यक्तीला योग्य हक्क, संधी आणि सन्मान मिळणे होय. नाटक हे प्रत्यक्ष जीवनाशी जोडलेले कलामाध्यम असल्यामुळे त्यात समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण यांचे चित्रण अपरिहार्यपणे येते. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी, समान हक्क आणि मानवी सन्मान प्राप्त व्हावा ही न्यायाची संकल्पना आहे. ही न्यायाची संकल्पना मराठी रंगभूमीच्या वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या नाटककारांच्या चौकटीत बसलेली संकल्पना नव्हे तर ती सामाजिक व्यवहारातील प्रामाणिकता, समानता आणि संतुलन या मूल्यांचा एकत्रित अविष्कार आहे. म्हणूनच मराठी नाटकांनी 'न्याय' या मुल्याला सामाजिक, स्त्रीवादी, राजकीय आणि आर्थिक अशा विविध अंगानी व्यक्त केले आहे.

न्याय या मूल्याशी संबंधित नाटकांची परंपरा मराठी साहित्यामध्ये समृद्ध आहे. विजय तेंडुलकर यांचे एक गाजलेले नाटक म्हणजे गिधाडे. या नाटकामधून पैशासाठी माणूस कोणत्या थराला जाऊ शकतो आणि त्यातून निर्माण होणारा अन्याय याचे भयावह चित्रण केले आहे. पौराणिक संदर्भ असलेले वि. स. खांडेकर लिखित 'ययाती' हे नाटक न्याय-अन्यायाच्या प्रश्नाला भिडते. ययातीच्या वैयक्तिक जीवनातील निर्णयांमधून न्याय, अन्याय आणि जबाबदारी यांचे सूक्ष्म पैलू उलगडले जातात. याचबरोबर संस्कृत साहित्यातील 'अभिज्ञान शाकुंतलम्' या नाटकामध्ये दुष्यंताने शाकुंतलेला नाकारल्यामुळे झालेला अन्याय आणि अखेरीस सत्याच्या विजयातून मिळालेला न्याय याचे प्रभावी दर्शन घडते. शूद्रकाच्या 'मृच्छकटिकम्' या नाटकात चारुदत्तासारख्या गरीब पण सद्गुणी व्यक्तीला अखेरीस मिळणारा न्याय, समाजाच्या योग्य मूल्यांची जाणीव करून देतो. रामायण, महाभारत या महाकाव्यांवर आधारलेली नाटके लोकांना न्याय-अन्यायाच्या संकल्पना समजावून देत. राम हा न्यायाचा आणि धर्माचा आधार मानला गेला, तर रावण अन्याय आणि अधर्माचे प्रतीक म्हणून दाखवला गेला. या नाट्यप्रकारातून लोकांमध्ये न्यायाची जाणीव दृढ होत गेली. या काळात काही दलित नाटकांचा जन्म झाला. या नाटकांमधून दलित समाजातील अन्यायाला तीव्र अभिव्यक्ती मिळाली काळोखाच्या गर्भात (भि.शि. शिंदे), वाटा पळवाटा (दत्ता भगत), अमली (ऋषिकेश सुलभ), अश्मक (दत्ता भगत), आग्या वेताळ (जॉनी मेश्राम), कथा खैरलांजी (प्रा. अनिलकुमार साळवे), कॅम्पस (वामन तावड़े), अंडरग्राऊंड व्हाया भीमनगर मोहल्ला (राजकुमार तांगडे) अशा नाटकातून वेदना,विद्रोह आणि नकार ही महत्वाची तत्वे साकारली गेली. या नाटकांमधून न्यायाची बाजू मांडताना दलितांना समान हक्क व सन्मान मिळवणे, जातिभेदाच्या भिंती मोडून पाडणे हे स्पष्ट केले. सांस्कृतिक न्यायाच्या दृष्टीनेही मराठी नाटकांनी महत्त्वपूर्ण काम केले आहे. १९ व्या शतकातील नाटके ही मुख्यत्वेकरून शहरी उच्चवर्गीयांच्या अनुभवावर आधारित होती. पण जसजसे लोकशाहीचे विचार समाजात रूजत गेले तसतसे रंगभूमीच्या माध्यमातून खेड्यापाड्यातील लोकांच्या समस्या, कामगारांचे जीवन, शेतकऱ्यांचे दुःख या गोष्टींना वाचा फोडण्यास सुरुवात झाली. संस्कृती म्हणजे फक्त उच्चभ्रूंचा ठेवा नसून ती सर्व समाजाची सामूहिक संपत्ती आहे, ही जाणीव रंगभूमीने जागवली. कीचकवध, घाशीराम कोतवाल यांसारख्या नाटकांतून सत्तेपुढे सामान्य जनता कशी भरडली जाते हे यामधून प्रकट केले आहे. महेश एलकुंचवारांच्या 'वाडा चिरेबंदी' या नाटकामध्ये पिढीजात संपत्तीचे वाटप हा केंद्रबिंदू आहे. हा प्रश्न केवळ घरगुती भांडणाचा नसून आर्थिक हक्काच्या असमानतेचा आहे. न्याय म्हणजे पिढीजात संपत्तीचे वाटप, प्रत्येकाला जगण्याची संधी मिळावी हे या नाटकातून स्पष्ट होते. अशाप्रकारे मराठी नाट्यपरंपरेने न्यायाला सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात बहुआयामी रूप दिलेले आढळते. त्यामुळे मराठी रंगभूमी ही केवळ नाट्यकला नसून ती सामाजिक न्यायाची ध्येयवादी परंपरा आहे असे म्हणता येईल.

मराठी रंगभूमीने न्यायाबरोबरच स्वातंत्र्याच्या तात्विक संकल्पनेला व्यापक रूप दिलेले आढळते. नाटक हे समाजाच्या मनोवृत्तीचे दर्शन घडविते. प्रत्येक पात्र हे संवादाच्या माध्यमातून घटनाक्रम, समाजातील सत्ता, परंपरा, बंधने व संघर्ष यांचे प्रतिबिंब व्यक्त करते. त्यामुळे मराठी रंगभूमीवर स्वातंत्र्याची मांडणी ही केवळ कथानकासाठी नाही तर ती समाजाच्या परिस्थितीशी निगडित असलेली आढळते. स्वातंत्र्याची तात्विक मांडणी ही केवळ व्यक्तीच्या अधिकारापुरती मर्यादित नसून ती समाजाच्या न्याय, क्षमता आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

मूल्यवृद्धीशी निगडित असलेली दिसून येते. मराठी नाट्यपरंपरेतून व्यक्तीस स्वतंत्र निर्णय, सामाजिक समूहास समान अधिकार आणि राष्ट्राला लोकाभिमुख करणे या तिन्ही स्तरावर स्वातंत्र्याची अनुभूती दिलेली आढळते. जॉन स्टुअर्ट मिल यांनी स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला स्वतःचे जीवन स्वतःच्या मर्जीने जगण्याचा हक्क असे म्हटले आहे. भारतीय तत्त्वज्ञानात मुक्ती, मोक्ष, निर्भयता हे स्वातंत्र्याचे स्वरूप मानले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्याचा विचार समता व बंधुत्वाच्या चौकटीत केला. व्यक्तिला जर विचारस्वातंत्र्य, श्रद्धास्वातंत्र्य व जीवनशैलीचे स्वातंत्र्य मिळाले तरच समाजात खरे लोकशाहीचे मूल्य फुलू शकेल. सर्व स्तरांवर स्वातंत्र्याची संकल्पना सतत बदलत आणि विकसित होत गेलेली दिसून येते. प्रत्येक पिढीने आपल्या संदर्भात स्वातंत्र्याला नवे रूप दिले. या सर्वांचे पडसाद रंगभूमीवरही उमटताना दिसतात. वैयक्तिक पातळीवरील स्वातंत्र्याचा प्रश्न मुख्यतः स्त्रीच्या जीवनातून समोर आला. पारंपरिक समाज रचनेत स्त्रीला केवळ पत्नी, कुटुंब आणि समाजाच्या चौकटीत जगावे लागत होते. विवाह, मातृत्व आणि कुटुंब यातच तिचे आयुष्य सीमित होते. मात्र रंगभूमीवरून स्त्रीच्या स्वातंत्र्याचा प्रश्न अनेकदा अधोरेखित झाला. सखाराम बाईंडर या नाटकातून व्यक्त होणारी स्वातंत्र्याची संकल्पना ही केवळ स्त्रीच्या मुक्ततेपुरती मर्यादित नसून ती समाजाच्या नैतिक आणि मानसिक स्वातंत्र्याशी संबंधित आहे. दलित रंगभूमीवर स्वातंत्र्याची मांडणी सामाजिक न्यायाच्या संदर्भात केली. जातीव्यवस्था आणि सामाजिक बहिष्कारामुळे दलित समाजाला केवळ कायदेशीर स्वतंत्र पुरवले गेले तरी त्यांचे जीवन प्रत्यक्ष बंधनात अडकले होते. हे अनुभव रंगभूमीवर मांडून त्यातून दाखवले की, स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक प्रतिष्ठा, समानता आणि मानवी हक्क मिळविणे होय. त्यामुळे स्वातंत्र्याचा स्वतंत्रपणे विचार करण्यास चालना मिळाली. राम गणेश गडकरींच्या 'प्रेमसंन्यासी' या नाटकात वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक बंधनातील संघर्ष दिसतो. सतीश आळेकरांनी महानिर्वाण, बेगम बर्वे या नाटकातून स्वातंत्र्याचे नवीन रूप समोर आणले. 'महानिर्वाण' या नाटकामध्ये मृत्यूनंतरच्या विडंबनात्मक परिस्थितीतून जगणाऱ्या समाजाच्या अंधश्रद्धा आणि रुढी यांची खिल्ली उडवून खऱ्या जीवन स्वातंत्र्याचे दर्शन घडते. तर बेगम बर्वे या नाटकात लैंगिक ओळखीच्या मर्यादित चौकटी मोडून व्यक्तीचे वैयक्तिक स्वातंत्र्य कसे प्रस्थापित होते हे दाखवले आहे.

एकूणच मराठी नाट्यपरंपरेत समता, न्याय आणि स्वातंत्र्य या मूल्यांची तात्विक मांडणी ही केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष जीवनाशी जोडलेली आढळते. असमानतेविरुद्ध बंड, अन्यायाविरुद्धचा लढा आणि गुलामगिरी विरुद्ध स्वातंत्र्याची आकांक्षा या सर्व गोष्टी मराठी नाटकांच्या सादरीकरणातून प्रभावीपणे मांडली आहे. या मराठी नाट्यपरंपरेचा मागोवा घेताना असे लक्षात येते की, ही नाट्यपरंपरा केवळ रंगकलेची साधना नाही तर समाजाच्या विचारविश्वाचा, भावविश्वाचा आणि मूल्यविश्वाचा सजीव इतिहास आहे. समतेच्या संकल्पनेतून नाटकांनी स्त्री-पुरुष भेद, जातीभेद आणि वर्णभेद यावर कठोर प्रहार केला. न्यायाच्या संकल्पनेला मराठी नाट्यपरंपरेत एक स्वतंत्र अधिष्ठान मिळाले. न्याय हा केवळ कायदेशीर तराजू नाही तर तो मानवी जगण्याचा गाभा आहे ही जाणीव मराठी नाटकांमधून व्यक्त झाली. स्वातंत्र्य हे मूल्य व्यापकपणे मराठी रंगभूमीवर साकारताना दिसते. व्यक्तीला स्वतःचे निर्णय घेण्याचे, आपले जीवन घडविण्याचे, परंपरेच्या बेड्या तोडून स्वतंत्र जीवन जगण्याचे आणि राष्ट्राला गुलामीतून मुक्त करण्याचे जे ध्येय आहे ते नाटकंमधून जिवंत होताना दिसते. यामुळे असे म्हणता येईल की, मराठी नाट्यपरंपरा ही एक प्रकारे मूल्य परंपरा आहे. या परंपरेने समाजाला केवळ मनोरंजन दिले नाही तर सर्वांना विचार करायला भाग पाडले. अन्याय, असमानता आणि रुढी परंपरेच्या बंधनांत झगडणाऱ्या आधुनिक समाजामध्ये जागरूकता आणण्याचे काम या मराठी रंगभूमीने केलेले दिसते. आजच्या जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञानाच्या काळातही ही मूल्ये रंगभूमीच्या माध्यमातून टिकवून ठेवलेली दिसून येतात. समता ही सामाजिक न्यायाची गुरुकिल्ली आहे, न्याय हा मानवी जीवनाचा पाया आहे आणि स्वातंत्र्य हा माणसाच्या अधिकाराचा प्राण आहे. अशा तात्विक मांडणीमुळेच मराठी रंगभूमी आजही प्रभावीपणे टिकून असलेली दिसते. म्हणूनच मराठी नाट्यपरंपरेतील ही तात्त्विक मांडणी केवळ साहित्यिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचे अधिष्ठान मानली जाऊ शकते.

संदर्भसूची

1) गडकरी, राम गणेश. एकच प्याला. पुणे: कंटिनेंटल प्रकाशन.
2) खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर. कीचकवध. मुंबई: लोकप्रिय प्रकाशन.
3) किर्लोस्कर, अण्णासाहेब. संगीत शाकुंतल आणि संगीत सौभद्र. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.
4) शिरवाडकर, वि. वा. (कुसुमाग्रज). नटसम्राट. मुंबई: साहित्यमंदिर.
5) तेंडुलकर, विजय. सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवाल, कमला, गिधाडे. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
6) एलकुंचवार, महेश. वाडा चिरेबंदी. मुंबई: राजहंस प्रकाशन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

7) आळेकर, सतीश. महानिर्वाण आणि बेगम बर्वे. पुणे: लोकप्रिय प्रकाशन.
8) फुले, महात्मा. गुलामगिरी. मुंबई: सत्यशोधक समाज प्रकाशन.
9) आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. राज्यघटना व तिचे तत्त्वज्ञान. मुंबई: सरकार प्रेस.
10) भगत, दत्ता. वाटा पळवाटा आणि अश्मक. नागपूर: दलित साहित्य प्रकाशन.
11) खांडेकर, वि. स. ययाती. मुंबई: साहित्यमंदिर.
12) शिंदे, भि. शि. काळोखाच्या गर्भात. औरंगाबाद: दलित साहित्य प्रकाशन.
13) पवार, दया. दलित रंगभूमीचा प्रवास. मुंबई: साहित्य अकादमी.
14) मिल, जॉन स्टुअर्ट. On Liberty. London: Longmans, Green & Co., 1859.
15) शूद्रक. मृच्छकटिकम्. अनुवाद: वि. स. भट. पुणे: कंटिनेंटल प्रकाशन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची पार्श्वभूमी

प्रा. आर. आर. सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
एस. व्ही. के. टी. महाविद्यालय,देवळाली कॅम्प

Manuscript ID:
JRD -2025-170920
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 105-107
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय राज्यघटनेची निर्मिती ही दीर्घ ऐतिहासिक प्रक्रियेचा परिणाम आहे. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात शासनव्यवस्थेच्या नियंत्रणासाठी विविध कायदे आणि सुधारणा करण्यात आल्या, ज्यांनी पुढे भारतीय राज्यघटनेच्या स्वरूपावर प्रभाव टाकला. 1858 च्या कायद्यापासून 1935 च्या भारत सरकार कायद्या पर्यंत आणि त्यानंतर क्रिप्स मिशन, कॅबिनेट मिशन योजनेपर्यंत, भारतीय राज्यघटनेची पाया रचली गेली. या प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली घटना मसुदा समितीची स्थापना होऊन संविधान निर्मितीचे कार्य पूर्ण झाले. 26 नोव्हेंबर 1949 रोजी राज्यघटनेला अंतिम स्वरूप मिळाले व 26 जानेवारी 1950 पासून ती अंमलात आली. भारतीय राज्यघटनेने लोकशाही, समानता, स्वातंत्र्य आणि न्याय यांचे तत्त्वज्ञान राष्ट्राच्या शासनव्यवस्थेत रूजवले.

मुख्यशब्द: *भारतीय राज्यघटना, ब्रिटिश कायदे, कॅबिनेट मिशन योजना, घटना समिती, मसुदा समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाही, स्वातंत्र्य, न्याय, समानता.*

प्रस्तावना

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले, परंतु भारतात खऱ्या अर्थाने प्रजेच्या कल्याणाची सुरुवात 26 जानेवारी 1950 पासून सुरू झाली. देशाची प्रशासन व्यवस्था चांगल्या प्रकारे चालावी, जनतेला राज्यघटनेनुसार अधिकार मिळावा. यासाठी जगातील प्रत्येक देशाला राज्यघटनेची आवश्यकता असते. भारताची राज्यघटना लिखित स्वरूपात असून जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे. या घटनेनुसार भारतात सर्वांना समान अधिकार आहे. अधिकाराची विभागणी केंद्र व राज्य सरकार यांच्यात केलेली आहे. राज्यघटनेच्या निर्मितीची सुरुवात ब्रिटिश भारतात आल्यानंतर सुरू झाली. राज्यघटनेच्या निर्मितीचा अभ्यास करत असताना ब्रिटिशांनी भारतात जे कायदे लागू केले त्या कायद्यांचा प्रभाव भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये झाला.

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची पार्श्वभूमी-

इ.स. 1600 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. तेव्हा इंग्लंडची राणी एलिझाबेथ ईस्ट इंडिया कंपनीस भारतात व्यापार करण्यास कायदेशीर परवानगी दिली. त्यानंतर 1773 साली ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी रेग्युलेटिंग ॲक्ट पास केला. या कायद्यानुसार कंपनीवर नियंत्रित प्रस्थापित व्हावे, यासाठी वॉरन हेस्टिंग पहिला भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्त करण्यात आला. या कायद्याने कंपनीचा कारभार गव्हर्नर जनरलच्या सल्ल्याने पहावा असे निश्चित करण्यात आले. 1813 मध्ये ब्रिटिश सरकारने चॅप्टर कायदा पास केला. या कायद्याने इंग्लंडमधील कोणत्याही ख्रिश्चन व्यक्तीचा भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी पाठविण्यात आले.

1857 च्या उठावात भारताचा ब्रिटिशांनी पराभव केला. या उठावाने भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता समाप्त करण्यात आली. त्यानंतर 1858 चा राणीचा जाहीरनामा पास करून राणीने ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार आपल्या हाती घेतला.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. आर. आर. सोनवणे, सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग एस.व्ही.के.टी.महाविद्यालय,देवळाली कॅम्प

How to cite this article:
सोनवणे, . आर . आर . (2025). भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची पार्श्वभूमी. Journal of Research & Development, 17(9(IV)), 105–107. https://doi.org/10.5281/zenodo.17710635

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17710635
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

या 1858 च्या कायद्यानुसार लॉर्ड कॅनिंग यांची व्हाईसरॉय म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच भारत मंत्री हे नवीन पद निर्माण करण्यात आले. ब्रिटिश सरकारने इसवी सन 1892 मध्ये सुधारणा कायदा लागू केला होता. या कायद्याने भारतीयांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाही. त्यामुळे जनतेत मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला.

१. 1909 मोर्ले मिंटो सुधारणा कायदा -

या कायद्याद्वारे प्रांतीय व केंद्रीय कायदेमंडळातील सदस्य संख्या वाढवून त्यास लोकप्रतिनिधी चेहरा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कौन्सिल मधील सदस्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळाला. पुढील घटनात्मक वाटचाल प्रतिनिधी संसदीय विकासाच्या दिशेनेच झाली. भारतीय राज्यघटना तयार करतानाही जबाबदार संसदीय प्रणालीचा पुरस्कार करण्यात आला.

२. 1919 मॉन्टेग्यू - चेम्सफोर्ड कायदा - भारतात काँग्रेसने सुरू केलेले ब्रिटिश सत्तेच्या विरोधातील आंदोलन दडपून टाकण्याचा उद्देशाने मोर्ले मिंटो कायदा केला होता. परंतु या कायद्यातील सुधारणा अपयशी ठरल्या. 1919 च्या भारत प्रशासन कायद्यान्वये भारतातील कायदेमंडळाला कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. याबरोबरच लोकप्रतिनिधींच्या संख्येतही वाढ करण्यात आली. तसेच प्रांतात एकगृही कायदेमंडळ कायम ठेवण्यात आले. प्रांतांमध्ये द्विदल शासन पद्धती अस्तित्वात आली राखीव आणि सोपी व खाती असे दोन प्रकार करण्यात आले. एकंदरीत भारतात जबाबदार शासनाची आणि लोकशाहीच्या पायाभरणीच्या प्रयोगाची ही सुरुवात झाली होती.

३. 1935 चा भारतीय प्रशासन कायदा - या कायद्यानुसार भारतात संघराज्य शासन पद्धती सुरू करण्यात आली. भारतात एकूण 11 प्रांत व देशी राज्य या संघराज्यात सामील करण्यात येणार होती. केंद्र सरकार व घटक राज्य यांच्यात अधिकारांची विभागणी करण्यात आली. त्यासाठी संघसूची प्रांतसूची व समवर्ती सूची तयार करण्यात आली. भारतात केंद्रस्थानी द्विगृहात्मक कायदेमंडळ पद्धतीचा स्वीकार करण्यात आला.

५. नेहरू रिपोर्ट - नेहरू रिपोर्ट मधील प्रशासनावर कायदेमंडळाचे नियंत्रण संसदेचे सार्वमत्व द्विगृही कायदेमंडळ इत्यादी तरतुदीचा प्रभावही आजच्या भारतीय राज्यघटनेवर जाणवतो.

६. क्रिप्स मिशन (Cripps Mission) : हा 1942 मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश सरकारने भारतात पाठवलेला एक राजकीय मिशन होता. सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली हे मिशन भारतात आले. याचा मुख्य उद्देश होता भारतातील लोकांना दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांना मदत करण्यास प्रवृत्त करणे आणि युद्धानंतर भारताला डॉमिनियन स्टेटस (स्वायत्त परंतु ब्रिटिश राष्ट्रकुलात राहणारा देश) देण्याचे आश्वासन देणे.

१.युद्ध संपल्यानंतर भारतासाठी नवीन संविधान सभा स्थापन करणे.

२. कोणत्याही प्रांताला (जसे की मुस्लिम लीगला हवे होते) भारतातून वेगळे होण्याचा पर्याय.

३. संरक्षण, परराष्ट्र धोरण, संवाद व्यवस्था हे विषय ब्रिटिश सरकारकडे राहणार.

कॅबिनेट मिशन योजना -

कॅबिनेट मिशन योजना घटना समितीच्या निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. ही योजना 1946 मध्ये अमलात आली. या योजनेनुसार अशा शिफारशी करण्यात आल्या की, प्रौढ मताधिकाराच्या आधारे घटना समितीची निर्मिती करणे या परिस्थितीत अशक्य आहे. त्यामुळे प्रांतांच्या विधानसभा द्वारे घटना समितीच्या सदस्यांची निवड करणे योग्य ठरेल. घटना समितीत एकूण 389 सदस्य असतील त्यात ब्रिटिश भारतातील 292 तर देशी संस्थांची 93 प्रतिनिधी आणि कमिशनरच्या प्रांतातील चार प्रतिनिधी असतील. या समितीने प्रत्येक प्रांताद्वारे निवडल्या जाणाऱ्या सदस्यांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात निर्धारित केली जाईल. अशी शिफारस केली. तसेच या अहवालानुसार संस्थानांना देखील आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी पाठवण्याचा अधिकार देण्यात आला. या व्यतिरिक्त प्रांतांच्या वेगळ्या राज्यघटनांचा देखील या योजनेत व्यवस्था करण्यात आली.

घटना समितीची निवडणूक - कॅबिनेट मिशन योजनेनुसार घटना समितीच्या सदस्यांची निवडणूक 1946 मध्ये घेण्यात आली. प्रांतांच्या जास्तीत जास्त जागा(211) काँग्रेस पक्षाला मिळाल्या. 73 जागा मुस्लिम लीगला प्राप्त झाल्या. वसाहती व संस्थानांच्या जागा पूर्ण भरल्या गेल्या नाही. इतर छोट्या पक्षांना समितीत एक एक जागा मिळाली. यावरून घटना समितीत काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व होते असे दिसून येते. त्यामुळे सहाजिकच घटना निर्मितीच्या कार्यावर काँग्रेसचा प्रभाव पडलेला होता.

घटना समिती - त्रिमंत्री योजनेनुसार घटना समितीची स्थापना करण्यात आली. घटना समितीमध्ये ३८९ सदस्य असतील असे ठरविण्यात आले. त्यांपैकी ब्रिटिश प्रांताचे २९२, मुख्य कमिशनरच्या प्रांताचे ४ व संस्थानिकांचे ९३ सदस्य असतील असे ठरविले गेले. घटना समितीच्या सदस्यांची निवडणूक जुलै १९४६ मध्ये झाली. घटना समितीच्या सदस्यांची निवड प्रांतिक विधिमंडळाच्या प्रतिनिधी मार्फत करण्यात आली. २९२ पैकी २११ जागा भारतीय काँग्रेस पक्षाला आणि ७३ जागा मुस्लीम लीगला मिळाल्या. संस्थानिकांनी आपल्या ९३ जागा भरल्या नाहीत काँग्रेसला जास्त जागा मिळाल्याने घटना समितीवर काँग्रेसचे नियंत्रण आले. त्यानंतर मुस्लीम लीगने घटना समितीवर बहिष्कार टाकला. घटना समितीवर काँग्रेसचे वर्चस्व निर्माण झाल्यावर त्याठिकाणी देशाच्या सर्व भागाचे योग्य

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

प्रतिनिधित्व होणे आवश्यक होते. त्यासाठी हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, मागासलेल्या जाती-जमाती, महिल प्रतिनिधित्वाबाबत विचार झाला. त्या दृष्टीने काँग्रेस कार्यकारिणीने प्रांतिक काँग्रेसत उमेदवार निवडीचा सल्ला दिला होता.

घटना मसुदा समिती : राज्यघटना निर्मितीची जबाबदारी पार पाडण्यासाठी घटना समितीने एकूण २२ समित्या स्थापन केल्या होत्या. त्यातील १२ समित्या या विशेष कामकाजासाठी होत्या, तर १० समित्या या कार्यपद्धतीशी निगडित होत्या. विशेष कामकाजासाठी नेमलेल्या १२ समित्यांपैकी सर्वांत महत्त्वाची समिती म्हणून घटना मसुदा समितीचा उल्लेख करता येईल. घटना मसुदा समितीची स्थापना २९ ऑगस्ट १९४७ रोशं करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष होते. क समितीवरच राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी देण्यात आली होती. या समितीमध्य इतर ७ सदस्य होते. त्यामध्ये अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, डॉ. कन्हैयालाल मुन्शी गोपाळस्वामी अय्यंगार, मोहंमद सादुल्ला, टी. टी. कृष्णाम्माचारी एन. माधव राऊ (बी. एल. मित्तर यांनी राजीनाम दिल्यानंतर नियुक्ती) यांचा समावेश होता. अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जबाबदारी खूप मोठी होती. त्यांनी ती जबाबदारी समर्थपणे पेलली म्हणून त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे संबोधले जाते. विविध समित्यांनी दिलेल्या प्रस्तावांचा विचार करून मसुदा समितीने भारतीय राज्यघटनेचा पहिला मसुदा तयार केला. तो २१ फेब्रुवारी १९४८ रोजी मसुदा समितीने घटना समितीला अधिकृतरीत्या सुपुर्द केला. या मसुद्यावर चर्चा करण्यासाठी आणि प्रस्ताव पाठविण्यासाठी जनतेला आठ महिन्यांची मुदत दिली होती. जनतेने पाठविलेली मते, सूचना, टीका यांचा विचार करून मसुदा समितीने दुसरा मसुदा तयार केला आणि तो ऑक्टोबर १९४८ मध्ये प्रसिद्ध केला. राज्यघटनेचा अंतिम मसुदा ४ नोव्हेंबर १९४८ रोजी सादर केला. राज्यघटनेच्या अंतिम मसुद्याची एकूण तीन वाचने झाली. घटनेच्या मसुद्यावर ११४ दिवस विचारविनिमय झाला. डॉ. बाबासाहेब अआंबेडकरांनी राज्यघटनेच्या संमतीचा ठराव मांडला.

समारोप

थोडक्यात असे म्हणता येईल की, ब्रिटिश भारतात आल्यानंतर राज्यघटनेच्या निर्मितीस प्रारंभ झाला. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीसाठी ब्रिटिशांनी जे कायदे पास केले त्या कायद्याचा आधार घ्यावा लागला. उदा. 1858 चा कायदा, 1892 चा कायदा, 1909 चा कायदा, 1919 चा कायदा,1935 चा कायदा इत्यादी. तसेच क्रिप्स मिशन, कॅबिनेट मिशन, 1947 चा भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा हे कायदे भारतीय राज्यघटना निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक ठरली. घटना समितीत एक मसुदा समिती निर्मिती करून राज्यघटना तयार केली. भारतीय राज्यघटना तयार करत असताना अमेरिका, रशिया, आयर्लंड,दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, फ्रान्स,जर्मनी इत्यादी देशातील राज्यघटनांचा आधार घेतला गेला. घटना समितीचे कामकाज 26 नोव्हेंबर 1949 रोजी पूर्ण झाले व 26 जानेवारी 1950 पासून आपली राज्यघटना अस्तित्वात येऊन तिची अंमलबजावणी सुरू झाली.

संदर्भ :

1. आधुनिक भारताचा इतिहास, प्राचार्य जी.बी. शहा, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
2. आधुनिक भारत, डॉ. एन. एस. तांबोळी, निराली प्रकाशन, पुणे.
3. भारतीय राज्यघटनेची ओळख, डॉ बाळ कांबळे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
4. आपलं आयकार्ड, आवटे श्रीरंजन, द युनिक अकॅडमी पब्लिकेशन पुणे
5. आपली संसद, सुभाष कश्यप, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मराठी दलित कवितेतील संविधानिक मूल्ये

अमोल देशमुख
संशोधक विद्यार्थी मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Manuscript ID:
JRD -2025-170921
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 108-112
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

मराठी दलित कविता ही समाजपरिवर्तनाची प्रभावी माध्यम म्हणून उदयास आली आहे. या कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीचा आणि भारतीय संविधानातील मूलभूत तत्त्वांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही संविधानिक मूल्ये दलित कवितेच्या केंद्रस्थानी आहेत. नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, दया पवार, ज. वि. पवार, अर्जुन डांगळे या कवींनी आपल्या कवितांमधून अन्याय, विषमता, शोषणाविरुद्ध आवाज उठवून समानतेचा संदेश दिला आहे. या कवितांमधून समाजातील अस्पृश्यता, जातीभेद आणि दडपशाहीविरुद्ध तीव्र विद्रोह व्यक्त होतो. म्हणूनच मराठी दलित कविता ही केवळ साहित्यिक प्रवाह नसून संविधानिक मूल्यांचा जनमानसात प्रसार करणारी सामाजिक चळवळ ठरते.

मुख्यशब्द: *दलित साहित्य, मराठी दलित कविता, संविधानिक मूल्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, सामाजिक परिवर्तन, विद्रोह*

प्रस्तावना

साहित्य ही एक नवनिर्मिती करणारी कला आहे. या कलेच्या माध्यमातून कथा, कादंबरी, कविता, नाटक आणि इतर काही कलाप्रकार एक भूमिका घेऊन साहित्यकृती जन्माला घालत असते. अशा या भूमिका जीवनानुभवातून पुढे येत असतात. आणि याच दलितांची सर्वच क्षेत्रात झालेली उपेक्षा नेमकेपणाने मराठी दलित साहित्यात आढळते. दलित साहित्य म्हणजे सांगताना डॉ. भालचंद्र फडके लिहतात "दलित जाणिवेतून दलित जीवनाचे भेदक दर्शन घडविणारे साहित्य हे दलित साहित्य."[१] ही जाणीव फक्त मराठी साहित्य विश्वापुरती मर्यादित न राहता भारतीय साहित्य क्षेत्रातही दिसून येते. आणि याची प्रेरणा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

धर्म व जातीच्या नावाने चालणारी पिळवणूक तसेच त्यांच्यावर होणारा अन्याय व अत्याचार नाहीसा व्हावा. माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळावी. या उदात्त हेतूने विषमता नष्ट करण्यासाठी गौतम बुद्ध, चार्वाक, कबीर, चक्रधरस्वामी, वारकरी संप्रदाय, यांनी परिवर्तनाचा आशावादी दृष्टीकोन मांडला. पुढे जाऊन महात्मा फुलेंनी इ. स. १८५१ मध्ये भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली. इ.स. १८५२ मध्ये अस्पृश्यांची शाळा, इ. स. १८६४ मध्ये बालहत्या प्रतिबंधकगृह अशा एकामागोमाग एक कृती म्हणजे इथल्या परंपरेला छेद देणाऱ्या आणि शोषित वर्गाला पेलवणाऱ्या न्हवत्या. नेमकेपणाने हीच फुलेंची भूमिका सुधारणेच्या प्रक्रियेला दिशादर्शक ठरली. दलित साहित्य आणि चळवळीसाठी पोषक आणि पूरक वातावरण फुलेंनी निर्माण करून दिले. पुढे जाऊन सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून एक नवा विचार पुढे आलेला दिसून येतो. ही चळवळ महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेपर्यंत पोहचलेली पहिली चळवळ होय. यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर तिचा मोठा प्रभाव पडला. जातिभेद, कर्मकांड, अंधश्रद्धा, मूर्तिपूजा आणि स्त्री दास्य या रूढी परंपरेला प्रखर विरोध दर्शवला.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
अमोल देशमुख, संशोधक विद्यार्थी मराठी विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
देशमुख, . अमोल . (2025). मराठी दलित कवितेतील संविधानिक मूल्ये. Journal of Research & Development, 17(9(IV)), 108–112. https://doi.org/10.5281/zenodo.17710797

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17710797
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

हाच विचार पुढे राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि. रा. शिंदे, म. गांधी या दलितेत्तर वर्गातील समाजसेवकांनी दलित चळवळीला हातभार लावला. आणि याच समाजसेवकांचे तत्वज्ञान दलित चळवळीला मार्गक्रमण ठरले. मराठी दलित साहित्य निर्मिती प्रक्रियेबद्दल लिहिताना अविनाश सांगोलेकर म्हणतात "दलित चळवळीतून दलित साहित्य निर्मितीला बळ मिळाले. दलित साहित्याची निर्मिती ही दलित चळवळीचे म्हणजेच प्रतिक्रियात्मक असलेल्या चळवळीचे एक रूप आहे."[२] इ. स. १९२० ला महत्वाच्या तीन घटना घडल्या. 'माणगावच्या अस्पृश्यांच्या परिषदे'चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष झाले. 'मूकनायक नियतकालिक' मराठी भाषेत सुरु केले. शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद' आयोजित केली.

मराठी दलित साहित्य निर्मितीची प्रेरणा

दलित समाजाच्या वेदना आणि त्यांच्यावरील अन्याय अत्याचार लोकांपर्यंत पोहचला पाहिजे, त्यांचा हक्क त्यांना मिळाला पाहिजे हा दृष्टिकोन समोर ठेऊन समाजातील वंचित, दुर्बल घटकांच्या समस्यांना वाचा फोडणे या उद्देशाने वृत्तपत्रे आणि ग्रंथाचे लिखाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. या सर्व प्रक्रियेतून दलित समाजाला जागृत करून संघटीत केले. महाडच्या चवदार तळ्याचा इ. स. १९२७ चा सत्याग्रह हा दलित चळवळीच्या आणि साहित्य निर्मितीच्या लढाऊपणाचा प्रारंभ बिंदू मानला जातो. हे वरील विधानावरून लक्षात येते.

मराठी दलित साहित्य निर्मिती होण्यामागे फुले, शाहू, वि. रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील या सर्वांचे विचार व तत्त्वज्ञान इ. स. १९२४ ची बहिष्कृत हितकारणीची सभा, समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी महाविद्यालयासारखी केंद्रे निर्माण केली. जनता, प्रबुद्ध भारत, मूकनायक अशी साप्ताहिके सुरु केली. महाडचा सत्याग्रह (१९२७), मनुस्मृतीचे दहन (१९२७), नाशिक येथील काळाराम मंदिर (१९३०), धर्मांतराची घोषणा (१९३५) वरील सर्व घटना दलित चळवळीस आणि साहित्य निर्मितीस पोषक ठरल्या.

इ. स. १९४८ साली आंबेडकरांच्यामुळे 'लोकशिक्षण प्रसारक मंडळ' अस्तित्वात आले. पुढे ते मंडळ 'दलित साहित्य संघ' झाले. 'प्रबुद्ध भारत', 'जनता' साप्ताहिकात "दलित साहित्याचे समालोचन" हा आ. श्री. रणपिसे यांच्या लेख पाहायला मिळतो. तसेच किसन फागूजी बनसोड, वामन कर्डक, दीनबंधू शेगावकर, शाहीर हेगडे, सोकले, लखमापुरकर, मधु कांगारे या मंडळीनपासून दलित साहित्याची सुरुवात आणि वाटचाल सुरु झाली. "इ. स. १९५८ साली मुबई येथे दलित लेखकांचे पहिले संमेलन भरले होते. या संमेलनात एक ठराव मंजूर झाला. तो असा 'मराठी भाषा व साहित्यक्षेत्रात दलित लेखकांचे व अन्य लेखकांचे दलितांविषयीचे साहित्य 'दलित साहित्य' म्हणून स्वतंत्र विभाग मानण्यात यावा."[३] या विधानावरून असे लक्षात येते की दलित साहित्य हे मुख्य प्रवाहात येण्याच्या मार्गावर होते. इ. स १९६७ साली म. ना. वानखेडे यांनी सहका-यांच्या सहाय्याने 'अस्मिता' नंतर 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक सुरु झाले. त्यामध्ये 'दलित व ललित साहित्या' च्या संबंधाने चर्चा घडू लागल्या.

कवितेतील संविधानिक मूल्ये

दलित साहित्यिकांनी सर्वप्रथम 'कविता' वाड्.मयप्रकार हाताळला. त्यानंतर कथा, कादंबरी, कविता, नाटक हे साहित्यप्रकार पुढे आले. म. फुलेंचा सत्यशोधकीय विचार तसेच इ. स १९२० नंतर महात्मा गांधींच्या चळवळीतून गांधीवाद आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्रोही चळवळीतून आंबेडकरवाद हे दोन विचारप्रवाह समोर आले. दलित कविता ही व्यक्तीवादी आणि स्वातंत्र्यवादी विचार मांडू पाहत असताना दिसते. म्हणून पुढे जाऊन साहित्यविश्वात मराठी 'दलित कविता' हा नवा प्रवाह पुढे आला. नवसाहित्याच्या विचार मांडणा-या मंडळींच्या निर्मितीमध्ये दलित कविता ही मानवकेंद्री मूल्ये मांडणारी होती. नव्या वाड्.मयीन जाणीवांना वाट करून देण्यामध्ये दलित कवींचा मोलाचा वाटा आहे. ही फक्त कविता नसून परिवर्तनाचे हत्यार आणि संविधानिक मूल्यांचा स्वीकार करणारी प्रबोधनाची पायवाट आहे.

अण्णा भाऊ साठे म्हणतात 'दलितांचे साहित्य लिहायचे असेल तर त्यांच्या जवळ जाऊन पहा आणि मग वास्तव जगाची मांडणी आपल्या साहित्यातून मांडा'. दलित साहित्य हा नवा वाड्.मयप्रकार नाकारणा-या मंडळीना अण्णा भाऊंच्या भाषणातून मिळते. २ मार्च, १९५८ रोजी, बंगाली हायस्कूल हॉल, मोरबाग रोड, दादर भरलेल्या दलित समाजातील लेखकांच्या पहिल्या साहित्य संमेलनात उद्घाटकपर केलेल्या भाषणात उल्लेख करतात. "काही विद्वान म्हणतात, अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली आहे. तेव्हां दलित हा प्राणी अस्तित्वात नाही, परंतु हा केवळ भ्रम आहे. एका गावात एका सार्वजनिक आडावर पाणी भरताना उच्चवर्णीय हिंदूंची काळीजे धड-धडतात. महारामांगाचा पोवरा जोपर्यंत पाण्यात आहे. तोपर्यंत आपला पोवरा पाण्यात सोडत नाहीत. कित्येक हॉटेलात "खास" कप ठेवलेले आढळतात. याचे कारण युगायुगाचे समज एका क्षणात्त नष्ट होत नसतात. म्हणून आम्ही दलित साहित्यिकांनी दलितांना वास्तव जगाच्या सर्व जुलुमातून मुक्त करणारे नवे साहित्य निर्माण केले पाहिजे."[४] हाच विचार पुढे वेदना, विद्रोह, व नकार या साहित्य मुल्यातून समोर येताना आढळते. युगानयुगे सर्वच क्षेत्रावर सत्ता केंद्रे स्थापन करण्याच्या हेतूने निर्माण केलेली वर्णव्यवस्था मानवजातीला कशी हानिकारक आहे, याचा प्रत्यय दलित कवींच्या कवितेत येतो. इथल्या समाजाने श्रेष्ठ कनिष्ठाचा लादलेला पगडा, त्यातून निर्माण झालेल्या वेदनेच्या नकारातून दलित कवी म्हणतो;

"ज्याने चूक केली इथे जन्म घेण्याची
ती त्याने सुधारलीच पाहिजे'
देशांतर करून ... भीषण युध्दे करून" !

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

परमेश्वराने तुम्हाला हा जन्म दिला आहे. आणि सेवा करणे हा तुमचा धर्म आहे. अशा धर्म मालक चालकांनी इथल्या दलित वर्गाचे शोषण केल्यावर स्वातंत्र्याची, अभिव्यक्तीची मशाल हाती घेऊन ही चूक आपण सुधारली पाहिजे. त्यासाठी अनेक युध्ये करायला लागली तरी करू आणि आपली चूक सुधारू असा कणव व्यक्त होताना दिसतो.

भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहेत. असे आज आपण म्हणत असलो तरी आपल्या देशात छळ, पिळवणूक, अन्याय, अत्याचार, दास्य याच्यावर भारतीय संविधानपूर्व विषमतेविषयी 'किसन फागुं'च्या कवितेच्या ओळी सांगतात;

"पहा पहा सारे जन हो, हा हिंद देश माझा
दुहीचे मूलस्थान
भेदांचे येथे रान
वैरास देई मान, हा हिंद देश माझा
जगतात कोठे नाही
तो भेद येथे पाही
जन्माने वर्ण ठरवी, हा हिंद देश माझा
भटास उंच पदवी
इतरांस नीच ठरवी
धर्मात ठेवी यादवी, हा हिंद देश माझा
मनुजास पशुहून
मानी जो येथे हीन
तोच आर्यावर्त जाण, हा हिंद देश माझा"

या हिंद देशामध्ये भेदाभेद पसरवणाऱ्यांचे जणू पिकच आले आहे. समाजामध्ये कलह निर्माण करणाऱ्याला पहिला मान असा भेद जगाच्या पाठीवर कुठेच पाहायला मिळणार नाही. धर्माच्या नावाखाली होणारा भेदाभेद, तुम्ही कुठल्या जातीत जन्म घेता यावरून ठरवला जाणारा तुमचा वर्ण यावर तुम्हाला माणसासारखी वागणूक द्यायची की पशुसम यावर भाष्य करताना कवी इथल्या समाज धुरिणांना प्रश्न करतो आहे.

दलित कविता या आंबेडकरी प्रेरणेतून त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा गौरव करणाऱ्या चळवळीचा इतिहास मांडणाऱ्या कविता आहेत. सुरुवातीला ज्या कवींनी कविता लिहिल्या, त्यांच्या कवितांमध्ये वेदना, विदोह आणि नकार हा उपजतच ठासून भरलेला दिसतो. नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, दया पवार, चामन निंबाळकर, प्रल्हाद चेंदवणकर, ज. वि. पवार, अर्जुन डांगळे, त्र्यंबक सपकाळे यांना पहिल्या पिढीतील कवी म्हणता येईल. या देशाने, बाबासाहेबांनी काय दिले असेल: तर 'भारताचे संविधान' या प्रेरणेने त्यांच्या कवितांमध्ये भारतीय संविधानातील मूल्ये आढळतात. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे काय झाले यावर सवाल खडा करताना 'नामदेव ढसाळ' आपल्या कवितेत म्हणतात;

"१५ ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ट
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे
रामराज्याच्या कितव्या घरात आपण ऱ्हातोत
उद्गम, विकास, उंची, संस्कार, संस्कृति
कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा")'गोलपीठा' १७ वी. आ, २०२४, पृ. क्र. ८६)

१५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले, असे म्हटले जाते; परंतु खऱ्या अर्थाने देशातील दलित जनतेला, स्वातंत्र्य मिळाले आहे काय? गाढवीपलीकडे ज्यांना विश्व माहिती नाही, अशांनी स्वातंत्र्य कशाला समजावे? स्वातंत्र्याचा कोणताही मूलभूत अर्थ गोर-गरिबांपर्यंत पोहोचत नसेल, तर त्याला स्वातंत्र्य म्हणावे काय? असा प्रश्न इथल्या राजसत्ता, धर्मसत्तेला विचारून सार्वभौम राष्ट्राची संकल्पना ढसाळ आपल्या कवितेतून मांडताना दिसतात.

पिढ्यान् पिढ्यांचे दुःख किती भयानक आहे? तुकाडाभर भाकरीसाठी गाडीभर लाकडे फोडावी लागतात आणि हाडाची काडं करून राबराब राबून मरावे लागते. तेव्हा कुठे पोठला भाकरी मिळते. 'केशव मेश्राम' यांच्या कवितेच्या संदर्भात बाळकृष्ण कवठेकर म्हणतात "मेश्रामांची कविता अर्थसघन आणि निर्भरशील प्रतीमांच्या भाषेत बोलताना दिसते."[५] हिच आहे का? मानवी दर्ज्याच्या संधीची समानता यावर बोट ठेवून पराकोटीच्या वेदनेतून 'एक दिवस मी परमेश्वराला' या कवितेतून असमानतेचे दर्शन घडवून दलित वर्गाला समानतेची वागणूक मिळावी असा विद्रोह कवी 'केशव मेश्राम' आपल्या कवितेत मांडतात.

"साल्या ! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय ?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

घामेजले हाडके शरीर पुसशील काय ?
बापाच्या बिडीकाडीसाठी
भावाबहिणीची हाडके झिजवशील ?
बाप्पा रे, देव बाप्पा रे ।
तुला हे जमणारच नाही.
त्यासाठी पाहिजे अपमानित
मातीत राबणारी
प्रेम करणारी माय माऊली.
एक दिवस परमेश्वराला आईवरून शिवी दिली.
तो लेकाचा फक्कन हसला.")'विद्रोही कविता' (संपा) द्वि. आ, १९८७ , पृ. क्र. ४७)

हिंदुधर्मातील रूढी-परंपरेने लादलेली गावगाड्याची कामे बंद करावी. अस्पृश्य वर्गाने शिक्षण घेऊन स्वच्छ व स्वाभिमानाने राहावे. देव-धर्म व रूढी-परंपरा यांच्या नावाने हिंदु समाजव्यवस्थेने माणूस असूनही त्याला गुलामाप्रमाणे वागविले. त्याचा त्याग करून अस्पृश्यांनी बंड करून उठावे. इतर माणसाप्रमाणे 'माणूस' म्हणून जगण्यासाठी आपल्या हक्क आणि कर्तव्यासाठी लढा देण्यास सदा तत्पर असावे. ही असमानतेची वागणूक समानतेच्या पातळीवर आणायची असेल तर इथल्या रूढी-परंपरेला विरोध केल्याशिवाय पर्याय नाही.

ज. वि. पवार यांचा 'नाकेबंदी' हा कवितासंग्रह गाजलेला आहे. दलित समूहाची वेदना आणि प्रतिगामी वृत्तीचा विरोध करत; संविधानिक मुल्यांची पायमल्ली करणाऱ्या प्रवृत्तीबद्दल आवाज उठवतात. त्यांच्या 'नाकेबंदी' या काव्यसंग्रहातील 'आज पन्नास वर्षांनी' या कवितेत म्हणतात;

"उठा उठा तरुणांनो, बंदुकींना हात घाला
काल स्वातंत्र्यासाठी पेटलात
आज पेटेल तेथे पेटवीत चला
नाही तरी किती काळ याच व्यवस्थेत खितपत पडणार"?)'नाकेबंदी', पृ. क्र. ५१)

अस्पृश्यता नष्ट होत नाही आणि ती मिटवण्याची प्रामुख्याने जबाबदारी दलितांवरतीच आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे 'अस्पृश्यता' हा हिंदू धर्मावरील कलंक आहे. परंतु अस्पृश्यता हा आमच्या नरदेहावरील कलंक असेल आणि आमच्या रक्ताने तो धुवून निघणार असेल, तर तेही आम्ही करू. दलित जनतेला आपला लढा प्रतिगामी शक्तींविरुद्ध सुरूच ठेवावा लागेल. त्यासाठी सातत्याने लढा सुरूच ठेवणे आवश्यक आहे. नाहीतर याच व्यवस्थेत खितपत पडावे लागेल. हा आवाज आपल्याला न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता या साठी सुरु ठेवला पाहिजे असे आपल्या कवितेतून प्रतिपादन करतात.

तथाकथिक सनातनी अस्पृश्यता मानणाऱ्या धर्माबद्दल, धर्म ग्रंथाबद्दल आणि इथल्या समाजव्यवस्थेबद्दल प्रचंड चीड त्यांनी 'उत्थानगुंफा' मधून प्रकट झाली आहे. बुद्ध, चार्वाक, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, धर्मनिरपेक्षता ही समाजबदलाची मूल्ये 'यशवंत मनोहर' आपल्या कवितेत व्यक्त करतात.

"सिद्धार्था,
शोषितांच्या दुःखाच्या अंतापर्यंत
सुखाला स्पर्शही न करण्याची
प्रतिज्ञा करणारा तू
माणुसकीच्या माथी
मुकुट झाला आहेस")'उत्थानगुंफा' द्वि. आ, १९८०, पृ. क्र. ८२)

कवी 'यशवंत मनोहर' आपल्या कवितेत बुद्धाला उद्देशून म्हणतात; तुला दुःख हे जीवनाचे मूळ आहे, असे वाटले असतानाही तू शांततेत सुखाला स्पर्श करून संपूर्ण मानवजातीच्या डोक्यावरचा मुकुट झालास. आणि आम्हाला प्रज्ञा, शील, करुणा, असा मानवतेचा मार्ग दाखवत सर्व जगामध्ये प्रेम, बंधुता, ही मूल्ये घालून दिलीस. दुःखाचा मार्ग शांततेत विलीन केलास हे सांगत असताना मेश्राम आपल्या कवितेला शोषितांच्या दुःखाची करुण कहाणी आपल्या कवितेत मांडतात.

समारोप

भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे व सशक्त लोकशाही संविधान मानले जाते. स्वातंत्र्य, समानता, बंधुता, आणि न्याय हा संविधान मूल्यांचा गाभा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शतकानुशतकांपासून चालत आलेल्या जातीय अन्याय, अस्पृश्यता आणि विषमता दूर करण्यासाठी संविधानाची निर्मिती केली. दलितांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त केले. आणि सम्यक क्रांतीची प्रेरणा दिली. मराठी साहित्याच्या प्रवाहात 'दलित साहित्य' हा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उगम पावलेला प्रवाह आहे. 'दलित कविता' ही केवळ सौंदर्यदृष्टी किंवा कलात्मक अभिव्यक्ती नसून वर नमूद केलेल्या कवींच्या कवितेत 'संविधानिक मूल्यांचे' प्रतिबिंब साकारताना दिसते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निष्कर्ष

१. दलित साहित्याची निर्मिती ही दलित चळवळीतून झाली आहे.
२. दलित चळवळीमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो.
३. फुले, शाहू, म. गांधी, बाबासाहेब यांच्या विचारांचा प्रभाव संविधानिक मूल्यात आढळतो.
४. दलित साहित्यिकांनी सर्वप्रथम 'कविता' वाङ्.मयप्रकार हाताळला.
५. दलित कवितेतून वेदना, विद्रोह आणि नकार हा उपजतच ठासून भरलेला दिसतो.
६. दलित कवितेतील थोडक्याच कवींच्या कवितेमध्ये संविधानिक मूल्यांचा आशावाद दिसतो.
७. समता, स्वातंत्र्य, व बंधुभाव ही मूल्ये दलित साहित्याची प्राणतत्वे आहेत.
८. दलित कवितेतून संविधानिक मूल्ये जनमानसात रुजविण्याचे कार्य दलित कवींनी केले.

संदर्भ

१. डॉ. अविनाश सांगोलेकर : दलित साहित्य : प्रवाह आणि प्रकार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, डिसेंबर २००८, पृ. क्र. ४८.
२. डॉ. बाबुराव गायकवाड : दालितेत्तर आणि दलित जीवन, अधिका प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, १९९४, पृ. क्र. १३
३. अर्जुन डांगळे, (संपा) दलित साहित्य एक अभ्यास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पुनर्मुद्रण, २०२४ पृ. क्र. १९५
४. डॉ. म. सु. पगारे : दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २००५ पृ. क्र. ८०

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मानसिक आरोग्य आणि भारतीय संविधान

अमोल विलास भंडारी
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Manuscript ID:
JRD -2025-170922
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 113-117
Sept. 2025
Submitted: 15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

आरोग्य हा मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक असून मानसिक आरोग्य हा देखील आरोग्य या संज्ञेचा अविभाज्य भाग आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक आरोग्याचे महत्त्व सर्वाधिक आहे. आरोग्याबाबत भारतीय संविधानामध्ये आरोग्य संबंधित तरतुदी या भाग चार मधील राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तसेच कलम *243* मध्ये ग्रामीण व शहरी पंचायतराज संस्थांच्या अधिकार व प्राधिकार्‌यांच्या विवरणामध्ये आढळतात. संविधानातील भाग तीन मधील मूलभूत अधिकारांमध्ये कोठेही आरोग्याच्या मूलभूत अधिकाराचा स्पष्ट उल्लेख आढळत नाही. मात्र कलम *23* मधील जीवन या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करताना सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांच्या दरम्यान आरोग्याचा मूलभूत अधिकार अधोरेखित केल्याचे दिसून येते. कलम *21* अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाने आरोग्याच्या अधिकारास मूलभूत अधिकार मानल्याने मानसिक आरोग्य ही संज्ञा आरोग्याचा अविभाज्य भाग असल्याने त्यासही मूलभूत अधिकार मानता येईल. आरोग्याचा समावेश हा राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असल्याने शासनाने विविध कायदे करून नागरिकांच्या मानसिक आरोग्य बाबत उपाययोजना केल्या आहेत.

मुख्यशब्द: *मानसिक आरोग्य, आरोग्याचा मूलभूत अधिकार, भारतीय संविधान, मार्गदर्शक तत्त्वे, लोककल्याण, जीवन, कलम 21, सर्वोच्च न्यायालय, मानसिक आरोग्य सेवा कायदा 2017, सामाजिक विकास, मानव अधिकार*

प्रस्तावना

आरोग्य हा मानवाच्या विकासातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. कोणत्याही राष्ट्राच्या विकासाची संकल्पना ही त्या देशातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित असून आरोग्य हा मानवी विकासातील सर्वात महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक आहे. यास्तव आधुनिक काळात प्रत्येक देश आपल्याला नागरिकांच्या आरोग्य संवर्धन व संरक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित करताना दिसून येतात. कारण सदृढ निरोगी नागरिकच स्वतःसोबत कुटुंब आणि देशाची काळजी घेऊ शकतो. कोणत्याही देशाची सामाजिक आणि आर्थिक प्रगती साध्य होण्यासाठी त्याच्या नागरिकांचे आरोग्य सदृढ आणि निरोगी असणे क्रम प्राप्त ठरते. मूळतः सुदृढ आणि निरोगी नागरिकच देशाच्या विकास विषयक ध्येयांना प्राप्त करण्यासाठी, देशाला संपन्न व प्रगत बनविण्यासाठी योगदान देऊ शकतात.

आरोग्य ही बाब सदा सर्वकाल सारखीच महत्त्वाची असल्याचे विविध प्राचीन ग्रंथातून दिसून येते. वेद उपनिषदामधील शांती मंत्रात आरोग्यबाबत सर्व भवन्तु संतु निरामया! सर्वे भद्रांनी पश्यन्तु मग दुःख भाव भवेत!! अशी नोंद आढळते. याचा अर्थ सर्व मानव जनसुखी असावेत रोगमुक्त असावेत चांगल्या जीवनाचे साक्षीदार असावेत कोणीही दुःखातून जाऊ नये असा असे या प्रार्थनेतून व्यक्त केलेला दिसतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
अमोल विलास भंडारी, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
भंडारी, . अमोल . विलास . (2025). मानसिक आरोग्य आणि भारतीय संविधान. Journal of Research & Development, 17(9(IV)), 113–117. https://doi.org/10.5281/zenodo.17719768

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17719768
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

प्राचीन भारतातील कालिदास लिखित 'कुमारसंभवम' या महाकाव्यात ' शरीरम आद्य खलु धर्म साधनम' म्हणजे सुदृढ आरोग्य ही कर्तव्यपूर्ती करण्याची पहिली गरज आहे असे म्हटले आहे. देशामध्ये सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे एक साधन म्हणून आरोग्याची महत्त्व विशद करताना अमर्त्य सेन लिहितात की, " Human capability expansion play important role in bringing about social change indeed, role of human being even as a instruments of change can go much beyond economic products on and includes social and political development."

भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या विविध मूल्यांच्या आधारे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी विविध धोरणे आखून अनेक योजना व कार्यक्रम राबविले आहेत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत आरोग्य विषयी भरीव तरतूद करण्यात आल्याचे दिसते.

प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय संविधान आणि मानसिक आरोग्य अनुबधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

बीज शब्द - मानसिक आरोग्य, लोककल्याण, जीवन, मार्गदर्शक तत्वे लुनासी,

उद्दिष्टे

1) मानसिक आरोग्य संकल्पना समजून घेणे.
2) मानसिक आरोग्य व भारतीय संविधान यांचा अनुबंध तपासणे.
3) मानसिक आरोग्य संदर्भातील कायदेविषयक तरतुदींचा आढावा घेणे.

गृहीतके

1) मानसिक आरोग्य ही मानवी विकासातील महत्त्वाची संकल्पना आहे.
2) मानसिक आरोग्य ही संकल्पना आरोग्य संकल्पनेचा अविभाज्य भाग आहे.
3) भारतीय संविधानात मानवी आरोग्य संवर्धनासाठी तरतूद करण्यात आली आहे.
4) संविधानातील तरतुदींच्या आधारे मानसिक आरोग्य संवर्धनासाठी प्रयत्न झाले आहेत.

मानसिक आरोग्य

आरोग्य संकल्पनेत मानसिक आरोग्य हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. "आरोग्य म्हणजे केवळ रोग किंवा दुर्बलतेचा अभाव नसून संपूर्ण शारीरिक मानसिक आणि सामाजिक कल्याणाची व्यवस्था होय." अशी आरोग्याची व्याख्या जागतिक आरोग्य संघटनेने केली आहे. मानसिक आरोग्य ही अशी अवस्था आहे की ज्यामध्ये व्यक्ती स्वतःच्या क्षमता ओळखते, जीवनातील सामान्य ताणतणावांना तोंड देते, उत्पादकपणे काम करते आणि आपल्या समुदायांमध्ये आपले योगदान देते. भावना आणि विचार, सामाजिक कौशल्य व जीवन जगण्याची क्षमता हे मानसिक आरोग्याचे मुख्य घटक मानले जातात. याशिवाय सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक पार्श्वभूमी व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक अथवा नकारात्मक परिणाम करत असते. वेबस्टर यांच्या मते, ' मानसिक आरोग्य म्हणजे मनाची नैसर्गिकरित्या झालेली निकोप आणि सदृढ वाढ व विकास होय. '

म्हणूनच नागरिकांच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक आरोग्य हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून त्याच्या संवर्धनासाठी नियोजन पूर्व प्रयत्न होणे आवश्यक असते. कारण निरोगी व मानसिकदृष्ट्या सुदृढ नागरिकच देशाच्या विकासात योगदान देऊ शकतात. यास तो संविधान निर्मात्यांनी त्याचा विचार करून आरोग्य विषयक तरतुदीत भारतीय संविधानात केल्या असून विविध सरकारांनी त्याची अंमलबजावणी करून हा विचार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

भारतीय संविधानातील आरोग्यसंबंधी तरतुदी -

भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार मार्गदर्शक तत्वे तसेच पंचायतराज संबंधित तरतुदींमधून आरोग्यविषयक बाबी अधोरेखित करण्यात आल्याचे दिसते.

मूलभूत अधिकार

भारतीय संविधानातील भाग तीन मधील कलम नंबर 12 ते 35 हे मूलभूत अधिकारांशी संबंधित आहेत. यामधील कलम 21 हे जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याची संबंधित असून यामध्ये आरोग्य बाबत स्पष्ट उल्लेख आढळत नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयातील विविध खटल्यांचा निकालांमधून आरोग्य हा कलम 21 अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे नमूद केले आहे. तसेच भारतीय संविधानातील कलम 23 देखील अप्रत्यक्षपणे आरोग्याच्या अधिकाराचे संरक्षण करण्यास सहाय्यभूत ठरते कारण त्याद्वारे मानवी तस्करी आणि बालमजुरी प्रतिबंध केले असून त्यामधून एक प्रकारे मानसिक आरोग्याची जपणूक केल्याचे दिसते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारतीय संविधानातील कलम 32 अन्वये मूलभूत अधिकाराच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर व कलम 226 अन्वये उच्च न्यायालयावर सोपविण्यात आली आहे. जनतेच्या आरोग्याच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करण्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. विविध खटल्यांच्या निकालामध्ये कलम 21 बाबत सर्वोच्च न्यायालयाने व्यापक अर्थ सूचित केला आहे.

1) फ्रान्सिस कोरली मुलीन विरुद्ध प्रशासक दिल्ली केंद्रशासित प्रदेश (1981) -

या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने कलम 21 मधील जीवन या संज्ञेचा अर्थ केवळ जगणे किंवा प्राण्यांचे अस्तित्व नसून त्याचा अर्थ मानवी प्रतिष्ठेसह जीवन आहे असे निरीक्षण नोंदविले. जीवनाच्या हक्काची व्याप्ती खूप विस्तृत असून त्यामध्ये चांगले जीवन उपजीविकेचा अधिकार, कामाच्या ठिकाणी स्वच्छता विषयी परिस्थिती आणि विश्रांतीचा अधिकार यांचा समावेश आहे. म्हणूनच आरोग्याचा अधिकार हा सन्माननीय जीवनाचा एक अंतर्निहीत आणि अविभाज्य भाग आहे.

2) बंधूआ मुक्ती मोर्चा विरुद्ध भारतीय संघ (1984) -

या खटल्याच्या दरम्यान सर्वोच्च न्यायाने असे म्हटले की जरी राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे ही बंधनकारक कर्तव्य नसून केवळ प्रेरक मूल्य आहेत, पण तरीही राज्याने त्याची योग्य अंमलबजावणी यांनी केली पाहिजे. कारण कलम 21 अंतर्गत सन्मान आणि आरोग्य हे जीवन आणि स्वातंत्र्याच्या कक्षेत येतात.

3) पश्चिम बंगाल खेत मजूर समिती विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (1996) -

या खटल्यात कलम 21 ची व्याप्ती आणखीन विस्तृत करत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, प्रत्येक व्यक्तीला पुरेशी वैद्यकीय मदत पुरविणे आणि मोठ्या प्रमाणात जनतेच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे ही सरकारची जबाबदारी आहे.

वरील निकालांवरून असे स्पष्ट होते की, मूलभूत अधिकाऱ्यांमध्ये आरोग्याचा मूलभूत अधिकाराचा स्पष्ट उल्लेख नसला तरी विविध खटल्या दरम्यान कलम 21 मधील जीवन या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करताना आरोग्याचा मूलभूत अधिकार सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केला आहे. आरोग्य संज्ञेचा मानसिक आरोग्य हा अविभाज्य भाग असल्याने मानसिक आरोग्याचा समावेश मूलभूत अधिकार होतो असे म्हणता येईल.

मार्गदर्शक तत्त्वांमधील आरोग्य विषयी तरतुदी -

1) कलम 39 राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवेक्षित तत्वे - यामधील 39 ड. नुसार स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजे पोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये. 39 (च) बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठा पूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैसर्गिक व भौतिक गरजांचे बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे.

2) कलम 42 - कामाबाबत न्याय व मानवी परिस्थिती आणि प्रसूती विषयक सहाय्य यांची तरतूद.

3) कलम 47 - पोषण व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य - आपल्या चिंतेचे पोषणमान व हनिमून उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यांपैकी असल्याचे मानील आणि विशेषता मादक पेय व आरोग्यास अपायकारक अशी अमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

4) कलम 243 (छ) - अंतर्गत संविधानामध्ये समाविष्ट अकराव्या अनुसूची मध्ये पंचायतीचे अधिकार प्राधिकार व जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. यामधील विषय क्र. 23 रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाने यासह आरोग्य व स्वच्छता. विषय क्र. 24 कुटुंब कल्याण विषय क्र. 26 अपंग व मानसिक वाढ खुंटलेल्यांच्या कल्याणा सह समाजकल्याण.

5) कलम 243 (ब) - अंतर्गत संविधानामध्ये समाविष्ट बाराव्या अनुसूची मध्ये नगरपालिका इत्यादींचे अधिकार प्राधिकार व जबाबदाऱ्या नमूद करण्यात आल्या आहेत. यामधील विषय क्र. 6 सार्वजनिक आरोग्य स्वच्छता विषयक निगराणी व टाकाऊ घन पदार्थांची विल्हेवाट. विषय क्र. 9 अपंग व मतिमंद यांच्यासह समाजातील दुर्बल घटकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणे.

अशाप्रकारे भारतीय संविधानातील भाग चार मध्ये राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तसेच कलम 243 छ व कलम 243 ब मध्ये आरोग्य विषयी तरतुदी आढळतात. कलम 21 मधील जीवन या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करताना सर्वोच्च न्यायालयाने आरोग्याचा मूलभूत अधिकार अधोरेखित केला आहे. सत्यम सर मानसिक आरोग्य हा आरोग्याचा विभाज्य घटक असल्याने त्याबाबत उपाययोजना करणे हे राज्याचे कर्तव्य आहे असे स्पष्ट होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

आरोग्याचा मूलभूत अधिकार हा संविधानात सुस्पष्ट उल्लेखित नसल्याने व त्याचा समावेश राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असल्याने शासनाने आतापर्यंत विविध कायदे आणून व योजना राबवून नागरिकांच्या आरोग्याचे जतन व संवर्धन करण्याचा प्रयत्न केला आहे. आरोग्य या संज्ञेतील मानसिक आरोग्य संकल्पनेविषयी शासनाने केलेले प्रयत्न जाणून घ्यावे लागतील.

भारतातील मानसिक आरोग्य कायद्याचा प्रवास -

भारतातील मानसिक आरोग्य कायद्याचा प्रवास हा ब्रिटिश काळापासून चालत आलेला आहे. या प्रवासाची सुरुवात 19 व्या शतकात काही मानसिक आरोग्य संस्थांच्या स्थापनेपासून झाली. 1897 मध्ये आलेला इंडियन लुनासी ॲक्ट हा मानसिक रुग्णांसाठी व्यवस्थात्मक दृष्टिकोन मांडणारा पहिला कायदा होता.

अ) इंडियन लुनासी ॲक्ट (1897) -

लुनाटिक याचा अर्थ वेडसर. ब्रिटिश काळात आलेल्या कायद्याचा मुख्य भर हा मानसिक रुग्णांना वर्गीकृत करणे यावर होता. याचा मुख्य उद्देश मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्ती ओळखणे आणि त्यांना वेगळे ठेवण्यासाठी नियमक व्यवस्था तयार करणे हा होता. तसेच मानसिक रुग्णांसाठी आश्रय ग्रहांची स्थापना करणे व त्यांचे प्रशासन चालवण्याबाबत निर्देशित करणे हा होता. मानसिक आजार ग्रस्त रुग्णांवर नियंत्रण ठेवून त्यांना समाजापासून विलग करणे या बाबींवर या कायद्यात प्रामुख्याने भर देण्यात आला. या कायद्याच्या परिणाम स्वरूप मानसिक रुग्णांसाठी संस्थात्मक नियंत्रणावर आधारित मूलभूत चौकट उपलब्ध झाली परंतु मानसिक आरोग्य संबंधित कलंक आणि नकारात्मकता देखील वाढीस लागली. त्याचप्रमाणे उपचारांची मर्यादा, पायाभूत सुविधा आणि रुग्णांच्या अधिकार याकडे या कायद्यात दुर्लक्ष करण्यात आले.

ब) मानसिक आरोग्य कायदा (1987) -

रुग्णांच्या हक्कापेक्षा नियंत्रणावर अधिक भर देणाऱ्या इंडियन लुनासी ॲक्ट 1897 ची जागा या कायद्याने घेतली. भारतामध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित लागू करण्यात आलेला पहिला व्यापक कायदा म्हणून हा कायदा ओळखला जातो. या कायद्यात मानसिक आजार असलेल्या व्यक्तीकरिता उपचारांसाठी सुधारित आणि अधिक मानवीय दृष्टिकोन ठेवून तरतुदी करण्यात आल्या. त्याचप्रमाणे रुग्णांचा प्रवेश, उपचार व सुटका यांची देखील निश्चित प्रक्रिया तयार करण्यात आली. मानसिक आरोग्य कायदा 1987 द्वारे मानसिक रुग्णांचे हक्क संरक्षण करून त्यांचे कुठल्याही प्रकारे शोषण होणार नाही यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. मानसिक रुग्णांच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही यासाठी कायदेशीर नियंत्रणाची तरतूद करून रुग्णांना गैरवर्तन अथवा अत्याचारापासून संरक्षण दिले गेले. या कायद्यामुळे मानसिक रुग्णांसाठी संस्थात्मक व्यवस्थापन सुधारण्यास मदत होऊन सामाजिक कलंक कमी करण्यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न झाले. तसेच मानसिक आरोग्या बाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली.

संयुक्त राष्ट्र संघ दिव्यांग व्यक्तीसाठी चे अधिवेशन 2006 ने मानसिक आरोग्य संबंधित सेवांमध्ये मानव अधिकार केंद्रित बदलांकरिता एक चौकट उपलब्ध करून दिली. या अधिवेशनातील निर्णय त्या देशांकरता कायदेशीर रित्या बदनामकारक आहेत ज्यांनी यास मान्यता दिली आहे. अलीकडच्या काळात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ठरावांमध्ये तसेच विविध अहवालांमध्ये मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील अस्वकार्य मानवी हक्क परिस्थिती आणि मानसिक रुग्ण व मानसिक तज्ञांची सेवा घेणाऱ्या लोकांच्या विरुद्ध होणाऱ्या उल्लंघनांचा स्पष्ट निषेध केला आहे. मानसिक आरोग्य क्षेत्रातील मानवी हक्कांचे प्रश्न आणि संसाधनाचा निकृष्ट दर्जा यांची व्याप्ती मोठी असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने 2013 मध्ये क्वालिटी राइट्स या उपक्रमाची सुरुवात केली. हा उपक्रम मानसिक आरोग्य सेवांमध्ये सुधारणा घडवून आणणे व रुग्णांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

एप्रिल 2011 साली भारत सरकारने वरील बाबींना अनुसरून व मागील कायद्यांच्या आधारे देशाच्या मानसिक आरोग्याची दिशा ठरवण्यासाठी एका अभ्यास समितीचे गठन केले. त्या समितीच्या प्राप्त अहवालाच्या आधारे ऑक्टोबर 2014 मध्ये देशाचे मानसिक आरोग्य धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणातील मसुद्यानुसार व्यक्तीचे, कुटुंबाचे अथवा समाजाचे मानसिक आरोग्य हे शारीरिक व मानसिक घटकांबरोबरच गरिबी पर्यावरणीय घटक आणि शैक्षणिक घटक यासारख्या सामाजिक घटकांवरील अवलंबून असते हे अधोरेखित केले. त्याचप्रमाणे संविधानामध्ये अंतर्भूत असलेल्या समता न्याय व्यक्तीची प्रतिष्ठा सेवेची गुणवत्ता व प्रशासन इत्यादीबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्वे समाविष्ट करण्यात आली आहेत. याला अनुसरून भारत सरकारने मानसिक आरोग्य सेवा कायदा 2017 तयार केला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

क) मानसिक आरोग्य सेवा कायदा 2017-

मानसिक आरोग्य कायदा 1987 मधील उनिवा दूर करून जागतिक व राष्ट्रीय परिस्थितीत अनुरूप बाबींचा समावेश करून मानसिक आरोग्य सेवा कायदा 2017 तयार करण्यात आला आहे. मानसिक आजार असलेल्या नागरिकांना मानसिक आरोग्यसेवा प्रदान करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रुग्णांच्या सामुदायिक काळजीला प्रोत्साहन देणे आणि मानसिक आरोग्य सेवा सर्वांसाठी उपलब्ध करून देणे हे देखील या कायद्याचे उद्दिष्ट आहे. भारतीय दंड संहिते मधील

(IPC) कलम 309 नुसार आत्महत्येचा प्रयत्न हा गुन्हा मानला जात असे. मात्र या कायद्याद्वारे यामध्ये बदल होऊन आत्महत्येचा प्रयत्न करणारे व्यक्तीस मानसिक तणावाखाली मानले जाते व शिक्षा दिली जात नाही. या कायद्याने प्रत्येक नागरिकास लिंग धर्म जात पंथ इत्यादी आधारे कोणताही भेदभाव न करता मानसिक आरोग्य सेवांचा लाभ मिळण्याचा अधिकार या कायद्याने प्रदान करण्यात आला आहे.

मानसिक आरोग्य निर्देशांक -

भारतामध्ये एकही अधिकृत मानसिक आरोग्य निर्देशांक नाही ज्यामध्ये गुणांकन दिले आहे. नीती आयोगाकडे आकडेवारीनुसार 10.6% प्रौढांना मानसिक विकारांचा त्रास आहे. मात्र प्रत्यक्षात 70 ते 92 टक्के लोकांना योग्य उपचार मिळत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशीनुसार दर १ लाख लोकांमध्ये किमान तीन मानसोपचार तज्ञ असावेत मात्र भारतात हे प्रमाण केवळ 0.75 इतके आहे. मानसिक आजाराबाबत अजूनही नागरिकांमध्ये नकारात्मक भावना असून याबाबत पुरेशा प्रमाणात जाणीव जागृती झाल्याच्या आढळत नाही. त्याचप्रमाणे राष्ट्रीय अर्थसंकल्पात मानसिक आरोग्य बाबत अपुऱ्या तरतुदीमुळे उपाययोजना राबविण्यात अडथळे निर्माण होतात. मेंटल हेल्थ ॲटलास 2020 सारख्या जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्यक्रमांमध्ये 165 देशांनी सहभाग नोंदविला असताना भारताचा त्यामध्ये सहभाग नसणे ही बाब शासनाची मानसिक आरोग्य बाबत असणारी उदासीनता प्रदर्शित करते.

वरील उल्लेखित बाबी ह्या जरी नकारात्मक दिसत असल्या तरी राष्ट्रीय तेली मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत वीस भाषांमध्ये 24/7 मानसिक आरोग्य विषयक सल्ला व सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच सन 2024-25 च्या आर्थिक सर्वेक्षणात देखील शाळा आणि कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्याचा समावेश करण्यावर तसेच मानसिक आरोग्य करिता डिजिटल उपाय वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.

निष्कर्ष

1) मानसिक आरोग्य हा आरोग्य संज्ञेचा एक अविभाज्य भाग आहे.
2) आरोग्याचा मूलभूत अधिकार हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून अधोरेखित झाला आहे.
3) मानसिक आरोग्य हे आरोग्याचा विभाज्य भाग असल्याने त्यासही मूलभूत अधिकार मानता येईल.
4) आरोग्य संबंधीच्या राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांची योग्य प्रकारे अंमलबजावणी झालेली नाही.
5) मानसिक आरोग्य सेवा कायदा व अंमलबजावणी यामध्ये तफावत आहे.
6) मानसिक आरोग्याबाबत योग्य प्रमाणात प्रचार प्रसार झालेला नाही.

संदर्भसूची

1) डॉ.दाभोळकर हमीद /डॉ.दाभोळकर नरेंद्र,2012,प्रश्न मनाचे,राजहंस प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती.
2) चौधरी राजेश (सं.) 2017, भारताचे संविधान, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव / पुणे. आठवीआवृत्ती
3) डॉ. भोळे भा. ल.,2015, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, बावीसावी आवृत्ती.
4) डॉ. राक्षसे बाळ, 13 डिसेंबर 2024, भारतातील मानसिक आरोग्याचे धोरण आणि कायदे, लोकसत्ता
5) जागतिक आरोग्य संघटना, 2020, मेंटल हेल्थ ॲटलास.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधानातील मूल्य: धर्मनिरपेक्षता

प्रा. डॉ. प्रदीप जगताप
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला
महाविद्यालय, सोलापूर
Email: jpradeep.sonu@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170923
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 118-123
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता हे राष्ट्राच्या लोकशाही व्यवस्थेचे एक महत्त्वपूर्ण मूल्य आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे राज्य आणि धर्म यांची वेगळी ओळख निर्माण करणे तसेच सर्व धर्मांना समान वागणूक देणे हा तिचा मूलभूत उद्देश आहे. संविधानाच्या अनुच्छेद २५ ते २८ मध्ये नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिला असून, १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने धर्मनिरपेक्षतेचा उल्लेख उद्देशपत्रिकेत समाविष्ट करण्यात आला. आजच्या भारतीय राजकारणात धर्माचा गैरवापर करून मतपेढीचे राजकारण केले जात असल्याने धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याला तडा जात आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता, शांतता आणि सामाजिक सलोखा धोक्यात येत आहे. भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेच्या माध्यमातून सर्व धर्मीयांना समानता, बंधुता आणि न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. धर्म हा माणसासाठी असून माणूस हा धर्मासाठी नाही, हे तत्त्व स्वीकारल्याशिवाय खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष भारताची निर्मिती शक्य नाही.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, धर्मनिरपेक्षता, धार्मिक स्वातंत्र्य, अनुच्छेद २५ ते २८, समान नागरी कायदा, राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, बंधुता, सहिष्णुता, धर्म आणि राजकारण.*

प्रस्तावना

भारतीय संविधानातील महत्त्वाचे मूल्य म्हणून धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा उल्लेख केला जातो. धर्मनिरपेक्षता हा आदर्शवादी सिद्धांत असून राज्य व धार्मिक संस्था यांच्यामध्ये कशा स्वरूपाचे संबंध असावेत,हे धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्पष्ट करते.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क देण्यात आलेला आहे. त्याचबरोबर भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेमध्ये १९७६ साली ४२ व्या संविधान दुरुस्तीद्वारे धर्मनिरपेक्षता हे तत्व समाविष्ट केले आहे. धर्म आणि राजकारण या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या असल्या तरी समाज जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. भारतीय समाजकारणात व राजकारणात धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांची चर्चा अलीकडच्या काळात केंद्रस्थानी आली आहे. धर्म तत्वांची सोयीनुसार पुनर्मांडणी,त्यांच्या माध्यमातून फोफावलेला दहशतवाद, बहुसंख्यांक समाजाची वाढती आक्रमकता, त्याला प्राप्त झालेला हिंसात्मक आयाम,अल्पसंख्यांकांची बचावात्मक भूमिका व त्यातून व्यक्त होणारी भयग्रस्तता आणि प्रसंगी होणारा हिंसात्मक उद्रेक,धर्माचा निवडणुकीमध्ये मतपेढीचे राजकारण म्हणून केला जाणारा गैरवापर, यामुळे भारतीय समाजकारणात व राजकारणात धर्मनिरपेक्षतेचे तत्व हा कळीचा प्रश्न बनला आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. डॉ. प्रदीप जगताप, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

How to cite this article:
जगताप, . प्रदीप . (2025). भारतीय संविधानातील मूल्य: धर्मनिरपेक्षता. Journal of Research & Development, 17(9(IV)), 118–123. https://doi.org/10.5281/zenodo.17719852

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17719852
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

या पार्श्वभूमीवर भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेचे मूल्य यासंदर्भातील संविधानातील तरतुदी, धर्मनिरपेक्षतेला तडा देऊन होणारे राजकारण व त्याचे परिणाम, त्यावरील उपाय यांचा परामर्ष सदर शोध निबंधात केला आहे.

उद्दिष्टे

१) भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याचे स्वरूप समजून घेणे.

२) भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांच्या संदर्भातील तरतुदी अभ्यासणे.

३) भारतीय राजकारणातून धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला दिले जात असणारे आव्हान अभ्यासणे.

४) भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला छेद देण्यामुळे झालेले परिणाम लक्षात घेणे.

५) भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे पालन कसे करता येईल यासंदर्भात उपाय सुचविणे.

गृहीतके

१) भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेचे मूल्य आदर्शवत असे आहे.

२) भारतीय संविधानात धर्मनिरपेक्ष तत्त्वांच्या संदर्भात तरतुदी केल्या आहेत.

३) सद्यकालीन भारतीय राजकारणात धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला तडा जात आहे.

४) धार्मिक गोष्टींचा प्रभाव भारतीय राजकारणात वाढल्यामुळे विकासात्मक राजकारण मागे पडून भावनिक अस्मितेचे राजकारण प्रभावी ठरत आहे.

५) धार्मिक राजकारण संविधानिक चौकटीला व राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान ठरत आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनांचा अवलंब केला आहे.संविधाना संदर्भात विवेचन करणारे ग्रंथ,भारतीय लोकशाहीच्या वाटचाली संदर्भातील संदर्भ ग्रंथ, विविध मासिकातून नामवंत लेखकांनी लिहिलेले व वर्तमानपत्रातील संपादकीय लेख, बातम्या यांचा आधार घेऊन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने सदर शोध निबंध सादर केला आहे.

धर्मनिरपेक्षतेची संकल्पना

संविधान हा लोकशाहीचा आधार असतो. संविधान ही देशाची मूलभूत राजकीय संहिता असते. धर्मनिरपेक्षता हा राज्यसंस्था, राजकीय व्यवहार आणि धर्म यांचे संबंध कसे असावेत?याविषयी युरोपात विकसित झालेला विचार आहे. या विचारानुसार राज्यसंस्थेने कोणत्याही एका धर्मास खास दर्जा किंवा राज्याचा अधिकृत धर्म म्हणून दर्जा देऊ नये, राजकीय पदे कोणत्याही एका धर्माच्या व्यक्तीसाठी मर्यादित नसावी, सर्व धर्माच्या व्यक्तींना सारखीच वागणूक मिळावी, राज्यसंस्थेच्या निर्णयामध्ये धर्मसंस्थेचा हस्तक्षेप असू नये, असे मानले जाते. राज्याने धार्मिक बाबी मध्ये हस्तक्षेप करू नये आणि धर्म संस्थेने राजकीय व्यवहारात हस्तक्षेप करू नये, असा मर्यादित अर्थही त्याला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते,'धर्मनिरपेक्षता म्हणजे राज्याचा कोणताही एक धर्म असणार नाही. अर्थात राज्य आपला व्यवहार करताना कोणत्याही विशिष्ट धर्माचा पुरस्कार करणार नाही आणि व्यक्ती व्यक्ती मध्ये धर्माच्या आधारावर भेदभाव करणार नाही'.धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वामध्ये धर्माचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप राजकारणात होऊ न देणे तसेच शासकीय पातळीवर कोणत्याही धर्माला मान्यता न देणे,हे होय. भारतीय संविधानकारांनी नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला असला तरी धर्म आणि राजकारण यांची पूर्णपणे फारकत केली आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोध,धर्म विहिनता किंवा धर्मभंजकता मुळीच नाही. तर सर्व धर्मांच्या सहिष्णू अस्तित्वाद्वारे सर्वांचे सर्वांगीण कल्याण करणारा, परस्परांना बंधुत्व, शांतता, न्याय व स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे नेणारा मार्ग आहे. धर्मनिरपेक्षतेला सर्व धर्मांचे अस्तित्व मान्य आहे.

संविधानात्मक तरतुदी

भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेची संकल्पना स्वीकारलेली आहे. त्या अनुषंगाने भारतीय संविधानात पुढील तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

अनुच्छेद २५

सार्वजनिक सुव्यवस्था,नीतिमत्ता व स्वास्थ्य इत्यादींना बाधा नसणाऱ्या बाबतीत सर्व व्यक्तींना आपल्या सदसदविवेक बुद्धीनुसार आवडीच्या धर्माचा उच्चार,आचार व प्रचार करण्याचा हक्क आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

अनुच्छेद २६

धार्मिक गट अथवा संस्थांना वरील मर्यादा सांभाळून धार्मिक कारणासाठी धार्मिक संस्था,विश्वस्त मंडळे स्थापन करणे, अशा संस्थांचा कारभार पाहणे, स्थावर व जंगम मालमत्ता संपादने,अशा मालमत्तेचे कायद्यान्वये प्रशासन पाहणे,हे अधिकार दिलेले आहेत.वरील हक्कांच्या संदर्भात मर्यादांचा उल्लेख करण्यात आला आहे त्याशिवाय पुढील निर्बंध धार्मिक हक्कावर संविधानाने घालून दिलेले आहेत. धार्मिक आचरणासी संबंधित आर्थिक,राजकीय व्यवहाराचे नियमन व नियंत्रण राज्य करू शकते. राज्य सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने धार्मिक आचरणावर प्रतिबंध लावू शकते. हिंदू धर्मातील सर्व वर्गांना व जातींना सर्व धार्मिक संस्था खुल्या ठेवण्याची सक्ती करू शकते.

अनुच्छेद २७

ज्या करांचे उत्पन्न एखाद्या विशिष्ट धर्माच्या प्रसारासाठी व रक्षणासाठी होणार असेल असे कर सक्तीने वसूल केले जाऊ शकत नाहीत.

अनुच्छेद २८

संपूर्णतः राज्याच्या निधीतून चालविण्यात येणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देता येणार नाही.धार्मिक शिक्षण देण्याच्या हेतूनेच दिलेल्या देणगी मधून वा विश्वस्त निधीतून चालणाऱ्या संस्था असल्यास तेथे धार्मिक शिक्षण देता येते पण तिथे देखील धार्मिक शिक्षणाची सक्ती करता येणार नाही.

अनुच्छेद ४४

राज्याने सर्व नागरिकांच्या साठी समान नागरी कायदा करण्याचा प्रयत्न करावा, असे मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्ट केलेले आहे. व्यक्तिगत व कौटुंबिक कायदे जे धर्मावर आधारित आहेत तसेच ते पुरुषप्रधान व्यवस्थेच्या प्रभावाखाली आहेत आणि स्त्रियांवरती अन्याय करणारे आहेत, म्हणून या कायद्यांचे आधुनिकीकरण करणे संविधान कारांना आवश्यक वाटले. असे असले तरी समान नागरी कायद्याचा प्रश्न मुस्लिम अल्पसंख्यांक व हिंदू बहुसंख्यांकांच्या राजकारणात बंदिस्त केला गेला आहे. हा कायदा धर्मावर आधारित भेदभाव मूलक व्यक्तिगत कायदे नष्ट करून सर्वधर्मातील स्त्री- पुरुषांना समता बहाल करण्यासाठी आवश्यक आहे, याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करण्यात आले आहे.

अनुच्छेद ५१ क

मूलभूत कर्तव्यातील या अनुच्छेदांमध्ये पाचवे मूलभूत कर्तव्य म्हणून धार्मिक,भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेद न मानता सर्व भारतीय जनतेत ऐक्याची,बंधूभावाची भावना वाढीला लावणे,असे मूलभूत कर्तव्य देण्यात आलेले आहे. यातून भारतीय नागरिकांनी भारतीय जनतेमध्ये ऐक्याची बंधुभावाची भावना वाढीला लावण्याचा प्रयत्न करणे अभिप्रेत आहे. भारतात विविध धर्माचे,भाषांचे,वर्गाचे लोक राहत आहेत. देशात प्रदेशवाद,भाषावाद,धार्मिक भेद, जातीय संघर्ष वाढू न देता विविधतेत एकता निर्माण करण्याच्या उद्देशाने, हे कर्तव्य भारतीय संविधानात समाविष्ट केलेले आहे. तसेच आठवे मूलभूत कर्तव्य म्हणून शास्त्रीय दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी आणि सुधारणावाद यांचा विकास करणे हे दिलेले आहे. यातून मानवतेच्या दृष्टिकोनातून भारतात विविध प्रकारच्या सुधारणा व प्रगती घडवून आणली पाहिजे. मानवतावाद महत्त्वाचा आहे, ही बाब स्पष्ट होते.

४२ वी घटनादुरुस्ती

भारतीय संविधानामध्ये धर्मनिरपेक्षतेचा उल्लेख स्पष्टपणे ४२ वी घटनादुरुस्ती करून १९७६ मध्ये करण्यात आला. असे असले तरी भारतीय संविधान सुरुवातीपासूनच धर्मनिरपेक्ष असलेले आपल्याला दिसून येते.कारण भारतीय संविधानाच्या मूलभूत हक्कांमध्ये अनुच्छेद २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आलेले होते. या घटनादुरुस्तीने धर्मनिरपेक्ष या शब्दाची भर संविधानाच्या उद्देश पत्रिकेमध्ये घालण्यात आली त्यामुळे भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला अधिक प्रकट स्वरूप प्राप्त झाले असे म्हणता येईल.

भारतीय संविधानामध्ये धर्मनिरपेक्षता या मूल्याचा स्वीकार केलेला आहे.असे असले तरी भारतीय धर्मनिरपेक्षतेमध्ये युरोपियन धर्मनिरपेक्षतेपेक्षा वेगळेपण दिसून येते. भारतीय धर्मनिरपेक्षता बहुमुल्यात्मक आहे. त्यामध्ये शांती व सहिष्णुता या मूल्यांना स्थान आहे. भारतीय समाज बहुधार्मिक असल्याने भारतीय धर्मनिरपेक्षता सर्व धार्मिक समुदायांना समान अधिकार प्रदान करते.भारतीय धर्मनिरपेक्षतेमध्ये धर्म व राज्यसंस्थेमध्ये तात्विक अंतर राखल्याचे दिसते. तसेच भारतीय धर्मनिरपेक्षतेने धर्मातील अनिष्ट,रूढी, प्रथा,परंपरांना विरोध केला आहे. मानवी जीवनात धर्मनिष्ठा,धर्मभावना आणि धार्मिक आचरण इत्यादींना जेवढे महत्त्व आहे,त्याहून अधिक महत्त्व देशनिष्ठा,देशभक्ती,राष्ट्रहित यांना आहे. धर्म व राजकारण या दोन्ही गोष्टी पूर्णपणे भिन्न स्वरूपाच्या असतात,असे विचार मॅकियाव्हेली या विचारवंताने मांडले आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

वास्तवता

भारतीय संविधानात धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केलेला असला तरी भारतातील राजकीय पक्ष व काही संघटना धर्मांधतावादी राजकारण करताना दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात सर्वच राजकीय पक्षांनी कमी- अधिक प्रमाणात धर्मांधतेचे राजकारण केलेले आहे. सर्व राजकीय पक्ष धर्मनिरपेक्षतेची घोषणा करतात आणि निवडणुकीच्या काळात धार्मिक घटकांचा आधार घेऊन मते मिळवताना दिसतात. निवडणुकीत उमेदवारांची पात्रता,योग्यता,चारित्र्य, काम, विचार,राजकीय पक्षाचे धोरण यांचा प्रभाव मतदारावर पडावा व त्या दृष्टीने मतदान व्हावे,अशी लोकशाहीत अपेक्षा असते. मात्र संकुचित धार्मिक घटकांचा प्रभाव मतदारांच्या वर्तनावर पडताना दिसतो. सत्ता मिळविण्यासाठी राजकीय पक्ष जनतेच्या धार्मिक अस्मितेचा उपयोग करून घेतात. लोकांच्या धार्मिक भावनांना हात घालून विशिष्ट उमेदवारास निवडून देण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात.

धर्माच्या आधारावर राजकारण का केले जाते? याचा विचार केला तर लक्षात येते की, धर्माच्या आधारावर लोकांना आव्हान करणे, संघटित करणे सोपे आहे. धर्माची हाक दिली की ज्याला आपण Mass hysteria म्हणतो हा चटकन निर्माण करता येतो. हा उन्माद वायू निर्माण केला की आपला हेतू साध्य होईल, हे राजकारणात असलेल्या आजच्या माणसांना माहित आहे. त्यातूनच हिंदुत्व म्हणजे राष्ट्रीयत्व,गर्व से कहो हम हिंदू है, इस्लाम खतरे में है, असे विचार पसरवले जातात. धर्माच्या आधारावर धर्माचरण किंवा नैतिकता निर्माण करण्याऐवजी मतसंख्या गोळा करण्यावर राजकारणाचा भर असतो. शौर्य म्हणजे कौर्य या प्रकारची व्याख्या या धर्माभिमानी म्हनवणाऱ्या लोकांनी राजकारणात आणली. कारण विद्वेषाचे वक्तृत्व ही सोपी गोष्ट आहे. आम्ही राष्ट्रनिष्ठ आहोत कारण आम्ही व्यासपीठावर उभे राहून पाकिस्तान विरुद्ध घोषणा देतो. तसेच जेव्हा सत्ताधारी राजकीय पक्षाला,विरोधी पक्षांना जनतेचे वास्तव प्रश्न सोडवता येत नाहीत, तेव्हाही जनतेचे लक्ष त्यावरून विचलित करण्यासाठी हे राजकारणी धर्माचा वापर करतात. इस्लाम खतरे में है,म्हटले की किंवा गर्व से कहो हम हिंदू है, म्हटले की धर्माच्या नावाखाली लोक आपले सर्व वास्तव प्रश्न विसरतात. त्यामुळेच कार्ल मार्क्स यांनी धर्माला अफूची गोळी म्हटले आहे.

भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा स्वीकार करून सर्व धर्मीयांना समानतेने वागणूक देण्याचे आणि धार्मिक भेदभाव न करता त्यांच्या धार्मिक बाबींचा आदर करण्याचे धोरण स्वीकारले.धर्मनिरपेक्षता हा भारतीय संविधानाचा आत्मा आहे. राज्यकर्त्यांना जेव्हा भौतिक विकासाचे प्रश्न सोडविण्यामध्ये अपयश येते तेव्हा ते भावनिक मुद्दे उपस्थित करून त्यावर आधारित राजकारण करण्याचा प्रयत्न करतात. भारतीय राजकारणात धर्म व जात हा ग्रामपंचायती पासून लोकसभेच्या निवडणुकापर्यंत असणारा भावनिक मुद्दा आहे. आदर्श निवडणूक आचारसंहितेत धर्माच्या आधारावर मत मागणे यावर बंदी असली तरी त्याचे सार्वत्रिकीकरण झाले आहे. भारतीय राजकारणात १९९० च्या दशकात सांप्रदायिक राजकारणाची सुरुवात झाली आहे, असे मानता येईल. शहाबानो खटला, रथयात्रा, बाबरी मशीद पाडणे यातून त्याला खतपाणी मिळाले.

२०१४ ते २०२४ या दशकातील राजकीय वातावरणाचे अवलोकन करता भारतीय राजकारणाचे सांप्रदायिकरण वेगाने होत आहे,असे चित्र आहे. धार्मिक प्रभावाच्या माध्यमातून राजकीय वर्चस्वाची उभारणी केली जात आहे. राजकारणासाठी धर्माचा बेकायदेशीर वापर, धार्मिक प्रतीक चिन्हांचा दुरुपयोग, मतासाठी धार्मिक ध्रुवीकरण हे निवडणूक आचारसंहितेला अमान्य असणाऱ्या बाबी सर्रास केल्या जात आहेत. धार्मिक व सांप्रदायिक चिन्हे व प्रतीकांचा वापर करून बहुसंख्यांक समाजाच्या मताचे एकगठ्ठाकरण करून निवडणुकीत त्यांची मते पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न राजकीय पक्षांकडून केला जात आहे. सत्तेच्या माध्यमातून धाकदपटशहाणे बहुसंख्यांकवादाचे राजकारण केले जात आहे. बहुसंख्यांकवादाच्या माध्यमातून अल्पसंख्यांक विरोध, त्यामध्ये मुस्लिम विरोध प्रखर आहे. केवळ विरोधच नाही तर अल्पसंख्यांक समाजाचा तिरस्कार,घृणा आणि त्यांचा हिंसक प्रतिकार करण्यात येत आहे.भारतीय लोकशाहीतील उदारमतवादाची जागा संकुचित आणि परनिंदेवर आधारित सांप्रदायिकतेणे घेतली आहे. समरसतेच्या गोंडस नावाखाली हिंदुत्वाच्या चौकटीत इतर धर्मांना बसविण्याचा प्रयत्न केला जात आहे. धार्मिकतेवर आधारित संघटनांना पाठबळ देऊन त्यांचे अनुनयीकरण केले जात आहे. या संघटनांच्या माध्यमातून बहुसंख्यांकांचे वर्चस्व प्रस्थापित करून अल्पसंख्यांकांच्या मूलभूत हक्कावरही अतिक्रमण केले जात आहे. कोणी काय खावे ? कोणी काय खाऊ नये ? काय परिधान करावे? काय परिधान करू नये? कोणाबरोबर विवाह करावा व कोणाबरोबर करू नये ?, असे मुद्दे उपस्थित करून सामाजिक स्वास्थ्य बिघडवले जात आहे.

सांप्रदायिक वर्चस्वाच्या अहंगंडातुन सुधारणावाद,विवेकवाद,चिकित्सक वृत्ती,विज्ञानवाद यांना तिलांजली दिली जात आहे. भारतीय संविधानात मूलभूत कर्तव्य म्हणून सुधारणावाद, विज्ञानवाद, शोधकवृत्ती यांचा स्वीकार करावा, असे म्हटले असले तरी सांप्रदायिक वर्चस्वाच्या प्रेरणेतून विवेकवाद्यावर, विज्ञानवाद्यांवर हल्ले होत आहेत. नरेंद्र दाभोळकर, एम. एम.कलबुर्गी व गौरी लंकेश यांच्यासारख्यांना यामध्ये प्राणांची किंमत मोजावी लागली. सनातनीपणा,अंधश्रद्धा,कर्मकांड यांचे स्तोम वाढत चालले आहे. आश्चर्याची बाब म्हणजे भारतीय विज्ञान परिषदेमध्ये सुद्धा हे दिसते आहे. शिक्षणाचे क्षेत्र ही सांप्रदायिक प्रभावापासून दूर राहिलेले नाही. शालेय व विद्यापीठीय अभ्यासक्रमामध्ये त्याचे प्रतिबिंब पडत आहे. पाठ्यपुस्तकांच्या पुनर्लेखन करण्याच्या प्रयत्नातून एनसीईआरटी च्या अभ्यासक्रमातून मुघलकाळाचा इतिहास वगळणे, यासाठी राज्यशास्त्रातील नामवंत विश्लेषक,लेखक सुहास पळशीकर व योगेंद्र यादव या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

तज्ञ सल्लागारांनी आपली नावे नवीन पाठ्यपुस्तकातून वगळावीत,असे पत्र एनसीईआरटी कडे पाठविले आहे. थोडक्यात सांप्रदायिक राजकारणातून भारतीय जनतेतील एकात्मतेला तडा जाऊन असहिष्णुतेचे वातावरण वाढत आहे. अल्पसंख्यांक समाजात असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे.भौतिक विकासाचे मुद्दे जसे की रोजगार,शिक्षण,आरोग्य,पायाभूत सुविधा हे विषय बाजूला पडून भावनिक मुद्दे पुढे येत आहेत. सांप्रदायिकता हे भारतीय लोकशाही पुढील ज्वलंत आव्हान आहे.

परिणाम

भारतीय राजकारणातील वाढत्या धार्मिक गोष्टीमुळे राष्ट्रीय एकात्मतेपुढे धोका उत्पन्न झाला आहे. भारतीय धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला तडा जात आहे. विशेष करून हिंदू-मुस्लिम धर्मियांमध्ये तणाव निर्माण झालेले आहेत. याचा परिणाम देशात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होताना दिसतो. धार्मिक अल्पसंख्यांकांच्या मनात असुरक्षिततेची भावना वाढलेली दिसते. त्यामुळे हिंदूंच्या मनात मुस्लिमा विषयी अविश्वास आणि मुस्लिमांच्या मनात हिंदू पासून असुरक्षिततेची भावना तीव्र असल्याचे वारंवार दृष्टीस पडते. त्यातूनच पुढे धार्मिक दंगली निर्माण होतात.समाजातील सर्वधर्मसमभाव व धर्म सहिष्णुता धोक्यात येते. राष्ट्रापेक्षा धर्म मोठा वाटायला लागतो. सत्ताधारी किंवा विरोधी पक्षांच्या भूमिकेकडे धर्माच्या चौकटीतून पाहिले जात असल्याने पुरोगामी,विकासाभिमुख, सुधारणावादी, मानवी हिताचे निर्णय घ्यायला मर्यादा येताना दिसतात. भौतिक विकासाचे प्रश्न बाजूला पडून अस्मितेच्या धार्मिक मुद्द्यांना महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे देशापुढील व समाजापुढील विकासात्मक मुद्दे जसे की बेरोजगारी, महागाई,शेती विकास,औद्योगिक विकास,शिक्षण, आरोग्य, विज्ञान-तंत्रज्ञानात्मक प्रगती, महिला सक्षमीकरण असे प्रश्न बाजूला पडतात.

उपाय

वरील परिणामांचा विचार करता भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचे पालन करणे प्रत्येक राजकीय पक्षाचे प्राथमिक धोरण असले पाहिजे. संविधानाने स्पष्ट केलेली समता,बंधुता ही तत्वे फक्त संविधानामध्ये न राहता भारतीय नागरिक म्हणून प्रत्येकाच्या आचरणात येणे आवश्यक आहे. मी हिंदू,मुस्लिम, ख्रिश्चन ,पारसी,शिख यापेक्षा मी भारतीय आहे, हा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. राजकीय पक्षांनी जनतेचे वास्तव प्रश्न,भौतिक विकासाचे प्रश्न सोडवावेत. दैनंदिन जीवन कसे सुखकर होईल ते पाहावे. विकासवादी राजकारण करावे म्हणजे पाठिंब्यासाठी,मतासाठी धर्माच्या नावाखाली काल्पनिक गोष्टींची गरज पडणार नाही. जमिनीवरच्या प्रश्नांना या जमिनीवरच उत्तरे शोधली पाहिजेत. धर्माचा वापर राजकारणासाठी केल्यास 'फॅसीझम' आपल्याजवळ येण्याचा धोका आहे, तो सर्वच लोकशाहीवादी राजकीय पक्षांनी लक्षात घेतला पाहिजे. धर्म ही बाब व्यक्तिगत-खाजगी मानून ती आपल्या घराच्या उंबऱ्यापर्यंतच मर्यादित ठेवावी. धर्म सार्वजनिक जीवनात आणू नये. सार्वजनिक जीवनात व्यक्तिवर संविधानाचाच पगडा असला पाहिजे. धर्मसहिष्णुता, सर्वधर्मसमभाव यांच्या पालनातूनच धर्मनिरपेक्षता जपली जाईल.दैनंदिन सामाजिक - आर्थिक प्रश्नांचा विचार धार्मिक संदर्भातूनच न करता पुरोगामी,मानवतावादी, विकासाभिमुख दृष्टीने करावा. धार्मिक पिसाटपणा पिकवून जे राजकीय स्वार्थ साधू पाहतात, त्यांना नाकारावे. धर्मनिरपेक्षता हा आपला जीवन मार्ग असेल तर त्यातून देशातील विविधतेतून एकता टिकून राहील. लोकशाही अधिक सुदृढ होण्यासाठी व भारताच्या एकात्मतेसाठी धर्मनिरपेक्ष व्यक्तींची वाढ होणे,त्यासाठी धर्मनिरपेक्ष माणूस घडवणे, धर्मनिरपेक्ष समाज निर्माण करणे व त्यातून धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण होऊ शकेल. धर्म हा माणसासाठी आहे,माणूस हा धर्मासाठी नाही, हे मूलतत्त्व सर्व मानवतावादी समाजाने लक्षात घेतले पाहिजे. प्रत्येक विवेकवादी माणसाने स्वार्थी धार्मिक राजकीय अजेंडे लक्षात घेऊन त्यास बळी न पडता सनदशीर मार्गाने त्यास विरोध दर्शविला पाहिजे.

संदर्भ

1) पानसरे मेघा, २०१८,'धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि समाजवाद', श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर
2) जोसेफ जो जी,२०२३,'लोकशाहीचे वास्तव', मधुश्री पब्लिकेशन, पुणे ,The Silent Coup चे मराठी
3) भाषांतर,पूनम छत्रे
4) बाळ प्रकाश व बेडकीहाळ किशोर,२००३,'धर्म आणि राजकारण - विपर्यास आणि वस्तुस्थिती', अक्षर
5) प्रकाशन,सातारा
6) चौधरी देवाशिष रॉय व किंग जॉन, २०२३, 'लोकशाहीच्या हत्येसाठी' अनु.उत्पल व.बा., मेहता पब्लिकेशन
7) हाऊस, पुणे
8) कांबळे बाळ, (संपा).,२०१२, 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन, पुणे
9) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास संपा.,२०१०,'भारतीय लोकशाही- अर्थ आणि व्यवहार', डायमंड
10) पब्लिकेशन, पुणे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

11) देवरे पी.डी.,२०१६, 'धर्मनिरपेक्षता राष्ट्र हितासाठी', विचार मंथन, सप्टेंबर -डिसेंबर,२०१६,ISSN No२३४७-
12) ९६३९, पान नंबर ३ ते ११
13) चौसाळकर अशोक, २०११,'धर्म समाज आणि राजकारण, लोकवाङ्मयगृह, मुंबई
14) पळशीकर सुहास,२००६, 'जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही', प्रतिमा प्रकाशन,पुणे
15) पाटील बी.बी.,२००२, 'भारतीय शासन आणि राजकारण', फडके प्रकाशन,कोल्हापूर
16) गोडबोले सुजाता, १६ ऑक्टो.२०१६, दैनिक लोकसत्ता
17) मुणगेकर भालचंद्र,२०२३,'मोदीनॉमिक्स दिशा आणि दशा',सत्याग्रही विचारधारा,नोव्हें- डिसें २०२३,वर्ष
18) ३२,पान नं. १४ ते २४
19) बागाईतकर अनंत,२०२३, 'मोदी दशकातील राजकारण', सत्याग्रही विचारधारा,नोव्हें- डिसें २०२३, वर्ष
20) ३२,पान नं. ५८ ते ६५

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

न्यायिक पुनर्विलोकन आणि लोकशाही संतुलन

प्रा. बळवंतराव कुंडलिक जाधव
सहाय्यक प्राध्यापक, एन. एस. सोठी लॉ कॉलेज, सांगली
Email: 1973jbk@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170924
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 124-127
Sept. 2025
Submitted: 15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय लोकशाही व्यवस्थेचा गाभा म्हणजे सत्ता विभागणीचे तत्त्व आणि संविधानाची सर्वोच्चता. या व्यवस्थेत न्यायपालिकेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे कारण ती संविधानाची रक्षणकर्ती आणि लोकशाहीतील संतुलन राखणारी संस्था आहे. न्यायिक पुनर्विलोकनाच्या माध्यमातून न्यायपालिका संसद व कार्यपालिकेच्या निर्णयांचे परीक्षण करून संविधानाशी विसंगत असलेले कायदे किंवा कृती रद्द करू शकते. तर न्यायिक सक्रियतेद्वारे ती सार्वजनिक हिताच्या मुद्द्यांवर स्वतःहून हस्तक्षेप करते. या दोन्ही प्रक्रियांमुळे संसद आणि न्यायपालिका यांच्यात तणाव निर्माण होतो, परंतु हे तणाव लोकशाहीतील नियंत्रण आणि संतुलन राखण्यासाठी आवश्यक आहेत. न्यायिक पुनर्विलोकनामुळे संविधानाची सर्वोच्चता टिकते, नागरिकांचे मूलभूत हक्क संरक्षित होतात, आणि अल्पसंख्यांक व वंचित घटकांना न्याय मिळतो. त्यामुळे न्यायपालिका केवळ कायद्याची व्याख्या करणारी संस्था नसून, ती लोकशाहीच्या टिकाऊपणाची आणि स्थैर्याची हमी देणारी संवैधानिक संरक्षक आहे.

मुख्यशब्द: *न्यायिक पुनर्विलोकन, न्यायिक सक्रियता, संसदीय सार्वभौमत्व, संविधानाची सर्वोच्चता, लोकशाही संतुलन, नियंत्रण आणि संतुलन, मूलभूत हक्क, भारतीय संविधान*

प्रस्तावना:

भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये, सत्ता विभागणीचे तत्त्व केंद्रस्थानी आहे. या तत्त्वानुसार, कायदेमंडळ (संसद), कार्यपालिका (सरकार) आणि न्यायपालिका (न्यायालय) या तीन प्रमुख घटकांमध्ये अधिकार आणि कार्ये विभागलेली आहेत. यापैकी, न्यायपालिकेचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे संविधानाचे संरक्षण करणे. हे कार्य न्यायिक पुनर्विलोकन आणि न्यायिक सक्रियता या दोन संकल्पनांद्वारे केले जाते. न्यायिक पुनर्विलोकन न्यायपालिकेला संसद किंवा सरकारने घेतलेले निर्णय संवैधानिक आहेत की नाहीत हे तपासण्याचा अधिकार देते, ज्यामुळे संविधानाची सर्वोच्चता सुनिश्चित होते. तसेच न्यायिक सक्रियता म्हणजे न्यायपालिकेने स्वतःहून जनतेच्या हिताच्या मुद्द्यांवर हस्तक्षेप करणे. या दोन्ही संकल्पनांमुळे संसदीय सार्वभौमत्वावर मर्यादा येतात, ज्यामुळे संसद आणि न्यायपालिका यांच्यात अनेकदा तणाव निर्माण होतो. हा तणाव लोकशाहीसाठी एक महत्त्वाचे आव्हान आहे. तथापि, या संशोधनाचा मुख्य उद्देश केवळ हा तणाव दर्शविणे नसून, लोकशाहीतील नियंत्रण आणि संतुलन राखण्यात न्यायव्यवस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका कशी आहे हे स्पष्ट करणे आहे. यामुळे, न्यायपालिका केवळ कायद्याची व्याख्या करणारी संस्था नसून ती संविधानाची संरक्षक आणि लोकशाहीतील संतुलन राखणारी महत्त्वाची संस्था आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा प्रा. बळवंतराव कुंडलिक जाधव, सहाय्यक प्राध्यापक, एन. एस. सोठी लॉ कॉलेज, सांगली

How to cite this article:
जाधव, . बळवंतराव . कुंडलिक . (2025). न्यायिक पुनर्विलोकन आणि लोकशाही संतुलन. Journal of Research & Development, 17(9(IV)), 124–127. https://doi.org/10.5281/zenodo.17719912

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17719912
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संशोधन उद्दिष्टे :

- न्यायिक पुनर्विलोकन आणि सक्रियतेची व्याख्या, त्यांचा ऐतिहासिक विकास आणि भारतीय संविधानातील त्यांची स्थिती यांचा अभ्यास करणे.
- संसदीय सार्वभौमत्वाशी संबंध: न्यायिक सक्रियतेमुळे संसदेच्या कायद्याधिकार आणि धोरणनिर्मितीवर होणारे परिणाम तपासणे.
- लोकशाहीतील संतुलन: लोकशाही व्यवस्थेत न्यायपालिकेची संविधानाची संरक्षक म्हणून आणि नागरिकांचे हक्क जपण्यात असलेली भूमिका स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती

या संशोधन पद्धतीत विश्लेषणात्मक पद्धती वापरली जाईल.

न्यायिक पुनर्विलोकन:

न्यायिक पुनर्विलोकन या संकल्पनेची व्याख्या वेगवेगळ्या कायदेतज्ञ आणि विचारवंतांनी त्यांच्या दृष्टिकोनातून केली आहे. अमेरिकन कायदेतज्ञ एडवर्ड एस. कॉर्वीन यांच्या मते, न्यायिक पुनर्विलोकन म्हणजे न्यायालयाचा तो अधिकार, ज्याद्वारे ते कायदेमंडळ आणि कार्यपालिका यांनी केलेले कायदे आणि घेतलेल्या कृतींची वैधता तपासतात. हे कायदे संविधानाशी सुसंगत आहेत की नाहीत, हे ठरवण्यासाठी ही प्रक्रिया वापरली जाते.

विविध विचारवंतांच्या व्याख्या

- एडवर्ड एस. कॉर्वीन: "न्यायिक पुनर्विलोकन हे न्यायालयाचे असे कार्य आहे, ज्याद्वारे ते कार्यकारी मंडळाच्या आणि कायदेमंडळाच्या कृतींना संविधानिक मानतात किंवा त्या संविधानिक नसल्याचे घोषित करतात." ही व्याख्या न्यायिक पुनरावलोकनाच्या मूलभूत कार्यावर प्रकाश टाकते, ज्यात संविधानाचे संरक्षण करणे हा मुख्य उद्देश आहे.
- चार्ल्स ए. बियर्ड (Charles A. Beard): बियर्ड यांच्या मते, "न्यायिक पुनर्विलोकन म्हणजे देशातील कोणत्याही सर्वोच्च न्यायालयाचा तो अधिकार, ज्याद्वारे ते असे कायदे किंवा सरकारी नियम रद्द करू शकतात जे संविधानाच्या विरोधात आहेत." ही व्याख्या सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर भर देते, ज्यात संविधानाचे अंतिम व्याख्याकार म्हणून कार्य करणे अपेक्षित आहे.
- के. सी. व्हेअर (K. C. Wheare): त्यांच्या मते, "न्यायिक पुनर्विलोकन हा एक महत्त्वपूर्ण अधिकार आहे, जो सर्वोच्च न्यायालयाला संसद आणि सरकार यांच्या कायद्यांची वैधता तपासण्यासाठी दिला जातो. यामुळे संविधानाची सर्वोच्चता अबाधित राहते." या व्याख्येत संविधानाच्या सर्वोच्चतेला महत्त्व दिले आहे, जी न्यायिक पुनर्विलोकनाचा गाभा आहे.

भारतातील संदर्भ

भारतीय संविधानामध्ये 'न्यायिक पुनर्विलोकन' या शब्दाचा थेट उल्लेख नाही, पण याचा अर्थ असा नाही की हा अधिकार अस्तित्वात नाही. या संकल्पनेची मुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये आढळतात. त्यांनी कलम ३२ (Article 32) ला 'संविधानाचा आत्मा आणि हृदय') म्हटले आहे. हे कलम नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार देते. याचाच अर्थ, जेव्हा सरकार किंवा संसदेने घेतलेल्या निर्णयामुळे नागरिकांच्या हक्कांवर गदा येते, तेव्हा न्यायपालिका हस्तक्षेप करू शकते.

भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय:

- गोलाखनाथ विरुद्ध पंजाब राज्य (Golaknath v. State of Punjab, 1967): या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की संसद मूलभूत हक्कांमध्ये बदल करू शकत नाही.
- केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (Kesavananda Bharati v. State of Kerala, 1973): या ऐतिहासिक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'संविधानाच्या मूलभूत संरचनेचा सिद्धांत' (Basic Structure Doctrine) मांडला. या सिद्धांतानुसार, संसद संविधानाच्या कोणत्याही भागामध्ये दुरुस्ती करू शकते, पण ती संविधानाच्या मूलभूत संरचनेला बदलू शकत नाही. यामुळे न्यायिक पुनर्विलोकनाची व्याप्ती वाढली आणि न्यायपालिकेला अधिक अधिकार मिळाले.

या सर्व व्याख्या आणि संदर्भांवरून हे स्पष्ट होते की, न्यायिक पुनर्विलोकन हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, जो संविधानाची सर्वोच्चता सुनिश्चित करतो आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

न्यायिक पु पुनर्विलोकनाचे महत्त्व

१. संविधानाची सर्वोच्चता सुनिश्चित करणे: भारतीय राज्यघटनेने संसदेला सर्वोच्च मानले असले तरी, संविधान हे अंतिम आहे. न्यायिक पुनर्विलोकनामुळे संविधान सर्वोच्च आहे आणि कोणताही कायदा संविधानाच्या चौकटीबाहेर जाऊ शकत नाही, हे सुनिश्चित होते. यामुळे संसदेची ताकद अमर्याद होण्यापासून रोखली जाते.

२. मूलभूत हक्कांचे रक्षण: संविधानाने प्रत्येक नागरिकाला काही मूलभूत हक्क दिले आहेत. जर सरकारने किंवा संसदेने असा कायदा केला, ज्यामुळे या हक्कांचे उल्लंघन होत असेल, तर न्यायपालिका तो कायदा रद्द करू शकते. उदा. कलम १३ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, राज्य असा कोणताही कायदा करणार नाही जो मूलभूत हक्कांचे उल्लंघन करेल.

३. अधिकारांचे संतुलन :न्यायपालिका, कायदेमंडळ आणि कार्यपालिका या तीनही संस्थांना काही विशिष्ट अधिकार दिले आहेत. या तिन्ही संस्था एकमेकांवर नियंत्रण ठेवतात. न्यायिक पुनर्विलोकन हे न्यायपालिकेचे एक महत्त्वाचे साधन आहे, ज्यामुळे ती कायदेमंडळ आणि कार्यपालिकेवर नियंत्रण ठेवते. यामुळे कोणत्याही एका संस्थेच्या हातात अमर्याद सत्ता येण्यापासून प्रतिबंध होतो.

भारतीय संविधानातील तरतुदी

भारतीय संविधानात 'न्यायिक पुनर्विलोकन' या शब्दाचा थेट उल्लेख नाही, पण अनेक कलमांमधून हा अधिकार न्यायपालिकेला मिळतो.

- **कलम १३ (Article 13):** हे कलम घोषित करते की, संविधान लागू होण्यापूर्वीचे किंवा नंतरचे असे कोणतेही कायदे जे मूलभूत हक्कांच्या विरोधात आहेत, ते रद्दबातल ठरवले जातील.
- **कलम ३२ (Article 32):** हे कलम प्रत्येक नागरिकाला त्याच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास थेट सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार देते. या कलमानुसार, सर्वोच्च न्यायालय मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे रिट (writs) जारी करू शकते.
- **कलम २२६ (Article 226):** हे कलम उच्च न्यायालयांना (High Courts) मूलभूत हक्कांचे आणि इतर कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्यासाठी रिट जारी करण्याचा अधिकार देते.

या कलमांद्वारे, न्यायपालिकेने अनेक ऐतिहासिक निर्णय दिले आहेत. उदा. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (१९७३) या खटल्यामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या मूलभूत संरचनेचा (Basic Structure Doctrine) सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार, संसद संविधानाच्या कोणत्याही भागामध्ये बदल करू शकते, पण संविधानाच्या मूलभूत संरचनेत बदल करू शकत नाही. या निर्णयाने न्यायिक पुनर्विलोकनाची ताकद अधिक वाढवली आणि लोकशाही अधिक मजबूत केली.

न्यायिक सक्रियता आणि संसदीय सार्वभौमत्व यांच्यातील संघर्ष

न्यायिक सक्रियता ही संकल्पना न्यायिक पुनर्विलोकनापेक्षा अधिक व्यापक आहे. न्यायिक पुनर्विलोकनात न्यायालय फक्त कायदे संविधानानुसार आहेत की नाहीत हे तपासते, तर न्यायिक सक्रियतेमध्ये न्यायालय स्वतःहून सार्वजनिक हिताच्या मुद्द्यांवर लक्ष देते आणि सरकारी धोरणांमध्ये हस्तक्षेप करते. त्यामुळे, अनेकदा प्रशासनावर दबाव वाढतो आणि जनतेला जलद न्याय मिळतो. मात्र, या प्रक्रियेमुळे संसदीय सार्वभौमत्वावर परिणाम होतो अशी टीका केली जाते. संसदीय सार्वभौमत्व म्हणजे संसदेला कायदे करण्याचा सर्वोच्च अधिकार आहे. जेव्हा न्यायपालिका एखाद्या कायद्याला रद्दबातल ठरवते किंवा स्वतः धोरणात्मक निर्णय घेते, तेव्हा संसदेच्या अधिकारावर मर्यादा येतात, ज्यामुळे संसद आणि न्यायपालिका यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

आव्हाने आणि टीका

१. अधिकारांचे उल्लंघन : लोकशाहीमध्ये कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांच्या अधिकारांची स्पष्ट विभागणी केलेली असते. कायदे तयार करणे हे संसदेचे काम आहे, तर त्यांची अंमलबजावणी करणे हे कार्यपालिकेचे काम आहे. न्यायपालिकेचे मुख्य काम कायद्यांचे योग्य पालन होते की नाही हे पाहणे आहे. परंतु, जेव्हा न्यायपालिका स्वतःहून सरकारी धोरणांमध्ये किंवा कायद्यांमध्ये हस्तक्षेप करते, तेव्हा अधिकारांचे उल्लंघन होते असे मानले जाते. यामुळे, तिन्ही संस्थांमधील संतुलन बिघडते.

२. लोकशाही उत्तरदायित्वाचा अभाव: न्यायाधीश लोकांद्वारे थेट निवडून येत नाहीत. ते राष्ट्रपतीद्वारे नियुक्त केले जातात. त्यामुळे, जेव्हा ते धोरणात्मक किंवा सामाजिक निर्णय घेतात, तेव्हा त्यांच्यावर कोणतेही थेट लोकशाही उत्तरदायित्व नसते. याउलट, संसद सदस्य जनतेद्वारे निवडून येतात आणि त्यांच्या प्रत्येक कृतीसाठी ते जनतेला जबाबदार असतात. यामुळे, जेव्हा न्यायपालिका असे निर्णय घेते, तेव्हा लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी तडजोड होते असे मानले जाते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संसदीय सार्वभौमत्व विरुद्ध न्यायिक सक्रियता

संसदीय सार्वभौमत्वानुसार, संसदेला कोणताही कायदा तयार करण्याचा अधिकार आहे आणि कोणताही कायदा रद्द करण्याची अंतिम सत्ता तिच्याकडे आहे. मात्र, केशवानंद भारती प्रकरणात (१९७३) सर्वोच्च न्यायालयाने 'संविधानाच्या मूलभूत संरचनेचा (Basic Structure Doctrine)' सिद्धांत मांडला, ज्यामुळे संसदीय सार्वभौमत्वावर मर्यादा आल्या. या सिद्धांतानुसार, संसद संविधानात बदल करू शकते, पण ती संविधानाच्या मूलभूत रचनेत बदल करू शकत नाही. त्यामुळे, न्यायिक पुनर्विलोकनाने संसदेच्या अधिकारांवर नियंत्रण ठेवले. न्यायिक सक्रियता यापेक्षा एक पाऊल पुढे जाते. उदाहरणादाखल, न्यायालयाने पर्यावरणाशी संबंधित, मानवाधिकार किंवा प्रशासकीय सुधारणांशी संबंधित अनेक निर्णय स्वत:हून घेतले आहेत. त्यामुळे अनेकदा प्रशासनाला न्यायालयाच्या आदेशानुसार काम करावे लागते.

न्यायव्यवस्थेची भूमिका आणि लोकशाहीतील संतुलन

संसदीय सार्वभौमत्व आणि न्यायिक पुनर्विलोकन यांच्यातील संघर्ष हा भारतीय लोकशाहीतील एक महत्त्वाचा आणि सतत चालणारा वाद आहे. वरकरणी हा संघर्ष दोन प्रमुख संस्थांमधील अधिकारांच्या वाटणीचा वाटत असला तरी, याचे मूळ कारण लोकशाहीतील संतुलन (Democratic Balance) राखणे आहे. न्यायपालिकेची भूमिका केवळ संसदेला आव्हान देण्याची नसून, लोकशाहीला अधिक मजबूत आणि न्यायपूर्ण बनवण्याची आहे.

१. संविधानाची संरक्षक

न्यायपालिका ही भारतीय संविधानाची अंतिम संरक्षक आहे. तिची सर्वात महत्त्वाची भूमिका नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणे आहे. जेव्हा सरकार किंवा संसदेने घेतलेल्या एखाद्या निर्णयामुळे किंवा कायद्यामुळे नागरिकांच्या हक्कांचे उल्लंघन होते, तेव्हा न्यायपालिका त्यात हस्तक्षेप करून त्या निर्णयाला रद्दबातल ठरवू शकते. उदाहरणार्थ, कलम ३२ नुसार, प्रत्येक नागरिकाला त्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास थेट सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. त्यामुळे, न्यायपालिका केवळ कायद्याची व्याख्या करत नाही, तर ती एक प्रकारे 'नागरिकांचे कवच' म्हणून कार्य करते.

२. नियंत्रण आणि संतुलन

लोकशाहीमध्ये, कोणताही एक घटक अधिक शक्तिशाली होऊ नये यासाठी 'नियंत्रण आणि संतुलन' हे तत्त्व महत्त्वाचे आहे. न्यायपालिका, कायदेमंडळ आणि कार्यपालिका या तीनही संस्थांना एकमेकांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार आहेत. न्यायिक पुनर्विलोकन हे न्यायपालिकेचे एक शक्तिशाली साधन आहे, जे तिला कायदेमंडळ आणि कार्यपालिकेच्या अधिकारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. यामुळे, कोणत्याही एका संस्थेच्या हातात अमर्याद सत्ता येण्यापासून प्रतिबंध होतो. हा समतोल लोकशाहीचे आरोग्य सुनिश्चित करतो आणि मनमानी कारभाराला आळा घालतो.

३. अल्पसंख्यांक आणि दुर्बल घटकांचे रक्षण

बहुमतावर आधारित लोकशाहीमध्ये, अनेकदा अल्पसंख्यांक आणि दुर्बल घटकांचे हक्क धोक्यात येऊ शकतात. संसदेत बहुमत असलेल्या पक्षाचे निर्णय अनेकदा बहुसंख्यांकांच्या हिताचे असू शकतात. अशा वेळी, न्यायपालिका एक स्वतंत्र आणि निष्पक्ष संस्था म्हणून अल्पसंख्यांक समुदायांचे, महिलांचे आणि इतर वंचित घटकांचे हक्क संरक्षित करते. न्यायपालिकेने दिलेले अनेक निर्णय (उदा. तृतीयपंथीयांचे हक्क, समलैंगिक संबंधांना मान्यता देणे) हे दर्शवतात की न्यायव्यवस्था बहुमताच्या दबावाखाली न येता सर्वांना समान न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करते.

संदर्भ सूची :

1. Jain, M.P., 'Indian Constitutional Law'. LexisNexis, 2020.
2. Basu, D.D., 'Shorter Constitution of India'. LexisNexis, 2018.
3. Austin, Granville, 'Working a Democratic Constitution: The Indian Experience'. Oxford University Press, 1999
4. प्रा.यशवंत सुमंत , भारतीय लोकशाही नागरी समजा वंचित समूह , , द युनिक फाऊंडेशन, पुणे
5. द हिंदू वृत्तपत्र
6. Economic and Political Weekly

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्य घटनेच्या निर्मितीचा इतिहास

सुधाकर वाल्मिक पवार
एस.व्ही.के.टी.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
देवळाली कॅम्प, नाशिक
Email: swpawar1267@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170925
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 128-130
Sept. 2025

Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश)*Abstract)*

भारतीय राज्य घटना ही जगातील सर्वात मोठी आणि सर्व समावेशक लिखित राज्य घटना आहे. तिची निर्मिती ही दीर्घ ऐतिहासिक प्रक्रिया, स्वातंत्र्यलढा, वसाहतवादी सुधारणा आणि घटना दार मंडळाच्या विचारमंथनातून घडून आली. या लेखात भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचा प्रवास, प्रमुखने त्यांचे योगदान, समित्यांचे कार्य आणि स्वीकृतीची प्रक्रिया यांचा शैक्षणिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आला आहे.

मुख्य संकल्पना)*keywords):* भारतीय राज्यघटना)*Indian Constitution),* घटनादार मंडळ)*Constituent Assembly),* डॉ. बाबासाहेब आंबेडकर)*Dr. B. R. Ambedkar)* मसुदा समिती)*Drafting Committee),* स्वातंत्र्यलढा)*Freedom Struggle),* लोकशाही)*Democracy),* सामाजिक न्याय)*Social Justice),* परकीय प्रेरणा)*Borrowed Features),* प्रजासत्ताक)*Republic of India)*

प्रस्तावना)Introduction):

भारतीय राज्यघटना ही केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून, भारताच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रवासाचे जिवंत प्रतिबिंब आहे. जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना म्हणून तिची ओळख आहे आणि ती आजही "सजीव दस्तऐवज" म्हणून मानली जाते. तिच्या निर्मितीचा प्रवास हा अत्यंत जटिल आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील संघर्ष हा केवळ राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी नव्हता; तर तो न्याय, समानता, बंधुता आणि स्वातंत्र्य या मूल्यांवर आधारलेला होता. त्यामुळेच भारतीयांना स्वतःची स्वतंत्र राज्यघटना तयार करण्याची तीव्र इच्छा होती. ही मागणी प्रथम १९३४ मध्येएम. एन. रॉययांनी स्पष्ट केली, आणि नंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ती स्वीकृत केली. ब्रिटिशांनी सुरुवातीला काही सुधारणा केल्या-जसे कीभारत शासन कायदा १९३५, परंतु त्या भारतीयांसाठी पुरेशा नव्हत्या. अखेर कॅबिनेट मिशन योजना)१९४६(यामुळे घटनादार मंडळाची स्थापना झाली आणि भारतीयांना स्वतःची राज्यघटना बनविण्याचा हक्क मिळाला. घटनादार मंडळाने २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस सातत्याने चर्चासत्रे, वादविवाद आणि सूचनांवर विचार करून राज्यघटना तयार केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीने विविध देशांच्या राज्यघटनांमधील उत्तम तत्त्वे उचलून त्यांचे भारतीय वास्तवाशी सुसंगत रूपांतर केले. त्यामुळे भारतीय राज्यघटना ही "जगातील सर्वोत्तम परंपरांचा संगम" असल्याचे मानले जाते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीभारतीय राज्यघटना स्वीकृत झाली आणि२६ जानेवारी १९५० रोजीती लागू झाली. २६ जानेवारी हा दिवस निवडण्यामागे १९३० च्या पूर्ण स्वराज्य दिनाची ऐतिहासिक आठवण जिवंत ठेवण्याचा हेतू होता.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सुधाकर वाल्मिक पवार, एस.व्ही.के.टी.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देवळाली कॅम्प, नाशिक

How to cite this article:
पवार, . सुधाकर . वाल्मिक . (2025). भारतीय राज्य घटनेच्या निर्मितीचा इतिहास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 128–130. https://doi.org/10.5281/zenodo.17719998

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17719998
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

आज भारतीय राज्यघटना केवळ शासनाची चौकट ठरवत नाही, तर ती प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि सामाजिक न्यायाची हमी देते. तिची निर्मिती ही भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील एक भव्य आणि ऐतिहासिक घटना आहे.

संशोधनपद्धती)Research Methodology):

यालेखातऐतिहासिकआणिवर्णनात्मकसंशोधनपद्धती)Historical and Descriptive Methodology) वापरलीआहे.

- **प्राथमिकस्रोत)Primary Sources):**घटनादार मंडळाची कार्यवाही)Constituent Assembly Debates, 1946–49), भारत शासन कायदे)1919, 1935), वसाहतवादी धोरणांचे दस्तऐवज.
- **द्वितीयक स्रोत)Secondary Sources):**ग्रंथ, संशोधन लेख, व ऐतिहासिक अभ्यासकांची मते.
- **तुलनात्मक अभ्यास)Comparative Study):**भारतीय राज्यघटनेच्या काही तरतुदींची तुलना अमेरिकन, ब्रिटिश व इतर देशांच्या राज्यघटनांशी केली आहे.

अभ्यासाचे उद्दिष्टे)Objectives of the Study):

१. भारतीय राज्य घटनेच्या निर्मितीचा ऐतिहासिक प्रवास समजावून सांगणे.
२. घटना दार मंडळाच्या स्थापनेची व कार्यपद्धतीची समीक्षा करणे.
३. प्रमुख नेते व समित्यांचे योगदान विशद करणे.
४. राज्य घटनेच्या मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.
५. भारतीय राज्यघटना "सजीवदस्तऐवज" का मानली जाते हे स्पष्ट करणे.

मुख्य चर्चा)Main Discussion)

प्रारंभीच्या मागण्या:

भारतात राज्यघटना तयार करण्याची मागणी २०व्या शतकाच्या सुरुवातीस होऊ लागली. ब्रिटिशांनी भारतासाठी काही कायदे बनवले – जसे कीभारतीय कौन्सिल कायदा)१९०९(, भारत शासन कायदा)१९१९ आणि १९३५(. पण हे कायदे ब्रिटिशांच्या हितासाठी होते; भारतीयांना खरी सत्ता मिळत नव्हती. १९३४ मध्ये एम.एन. रॉयया विचारवंताने पहिल्यांदा "घटनादार मंडळ" स्थापण्याची कल्पना मांडली. नंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही ही मागणी स्वीकारली. महात्मा गांधी आणि पंडित नेहरूंसारख्या नेत्यांनी "भारतीयांनीच भारतीयांसाठी राज्यघटना तयार करावी" असा ठाम आग्रह धरला.

ब्रिटिशांची प्रतिक्रिया:

ब्रिटिश सरकारने हळूहळू भारतीयांच्या मागण्यांना प्रतिसाद दिला:

- **ऑगस्ट ऑफर)१९४०(:**युद्धानंतर भारतीयांना स्वतःची राज्यघटना तयार करण्याचा अधिकार दिला जाईल असे सांगितले.
- **क्रिप्स मिशन)१९४२(:**घटनादार मंडळाचा प्रस्ताव मांडला गेला, पण भारतीय पक्षांमध्ये मतभेद झाल्यामुळे तो अपयशी ठरला.
- **कॅबिनेट मिशन योजना)१९४६(:**अखेर भारतीयांना घटनादार मंडळ स्थापन करण्याचा अधिकार मिळाला.

घटनादार मंडळाची स्थापना:

जुलै १९४६मध्ये घटनादार मंडळ स्थापन झाले. यात सुरुवातीला३८९ सदस्यहोते; त्यापैकी २९२ प्रांतांमधून, ९३ संस्थानांमधून आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधून होते. विभाजनानंतर)१९४७(पाकिस्तानने आपले सदस्य मागे घेतले आणि मंडळाचे सदस्यसंख्या२९९झाली.

- **९ डिसेंबर १९४६:**पहिली बैठक; अध्यक्षपदी हंगामी म्हणूनडॉ. सच्चिदानंद सिन्हायांची निवड.
- **११ डिसेंबर १९४६:**डॉ. राजेंद्र प्रसादकायमस्वरूपी अध्यक्ष झाले.

उद्दिष्टे ठरविणारा ठराव:

१३ डिसेंबर १९४६रोजी पंडितजवाहरलाल नेहरूंनी "उद्दिष्टे ठरविणारा ठराव")Objectives Resolution)सादर केला. यात भारत लोकशाही, सार्वभौम, प्रजासत्ताक बनेल आणि त्याच्या नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता मिळेल असे नमूद केले गेले. नंतर हा ठराव राज्यघटनेच्या प्रस्तावनेत)Preamble) रुपांतरित झाला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

समित्या आणि नेते:

घटनादार मंडळाने विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी२२ समित्या स्थापन केल्या.

- सर्वात महत्त्वाचीमसुदा समिती)Drafting Committee)होती. तिचे अध्यक्ष होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी भारतीय समाजरचना लक्षात घेऊन न्याय्य आणि समावेशक अशी राज्यघटना तयार केली.
- पंडित नेहरू यांनीकेंद्र सरकारची सत्ता समितीपाहिली.
- सरदार वल्लभभाई पटेल यांनी मूलभूत अधिकार समिती आणि अल्पसंख्याक समिती पाहिली.
- इतर नेते जसे की अल्लाडी कृष्णस्वामी अय्यर, के.एम. मुन्शी यांनीही महत्त्वाचे योगदान दिले.

मसुदा तयार करणे आणि स्वीकृती:

राज्यघटनेचा मसुदा फेब्रुवारी १९४८मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आणि जनतेकडून सूचना मागविण्यात आल्या. जवळपास२ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवससतत चर्चा, वादविवाद आणि सुधारणा झाल्यानंतर राज्यघटना पूर्ण झाली.

- **२६ नोव्हेंबर १९४९:**राज्यघटना स्वीकारली.
- **२६ जानेवारी १९५०:** राज्यघटना लागू झाली. हा दिवस निवडण्यामागे कारण म्हणजे१९३० च्या पूर्ण स्वराज्य दिनालाअभिवादन करणे.

राज्यघटनेच्या निर्मितीची वैशिष्ट्ये;

१. **लोकशाही पद्धत:** सर्व निर्णय चर्चेने व बहुमताने घेतले गेले.
२. **सर्वसमावेशकता:** प्रांत, संस्थान, अल्पसंख्याक व विविध समाजघटकांचे प्रतिनिधित्व झाले.
३. **परकीय प्रेरणा:** अमेरिकेतील मूलभूत हक्क, ब्रिटनची संसदीय पद्धत, आयर्लंडचे धोरण निर्देश तत्त्वे, कॅनडा व ऑस्ट्रेलियाचे संघराज्यीय तत्त्वे यांचा प्रभाव.
४. **कालावधी व खर्च:** जवळपास तीन वर्षे लागली आणि सुमारे ६४ लाख रुपये खर्च झाला.
५. **भव्य दस्तऐवज:** ३९५ कलमे आणि ८ अनुसूच्या असलेली ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना ठरली.

निष्कर्ष

भारतीय राज्यघटना हा केवळ कायदेशीर ग्रंथ नाही, तर स्वातंत्र्यलढ्याचे फलित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील मसुदा समितीने भारताच्या विविधतेला न्याय देणारी आणि सर्वांना समान अधिकार देणारी राज्यघटना घडवली.

२६ जानेवारी १९५० रोजी भारताने "गणराज्य" म्हणून नवीन प्रवास सुरू केला. आजही भारतीय राज्यघटना लोकशाही, समानता आणि न्याय यांचे प्रतीक आहे. म्हणूनच तिला योग्यच "सजीव दस्तऐवज" म्हटले जाते.

संदर्भ)References(:

1. Austin, Granville. *The Indian Constitution: Cornerstone of a Nation.* Oxford University Press, 1966, pp. 25–27.
2. Rao, B. Shiva, editor. *The Framing of India's Constitution: Select Documents, Vol. 1.* Bombay: Tripathi, 1968, pp. 10–12.
3. India. *Constituent Assembly Debates: Official Report*, vol. 1. Lok Sabha Secretariat, 1946, pp. 15–16.
4. India. *Constituent Assembly Debates*, vol. 7. Lok Sabha Secretariat, 1948–49, pp. 100–105.
5. "Constitution v1: Couldn't find a copy…." *Reddit*, 15 Nov. 2020, r/india

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय शेती आणि संविधान: ग्रामीण विकासासाठी आर्थिक धोरणे

श्री. गणेश आप्पासो कुरले
सहाय्यक प्राध्यापक,
जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
Email: ganeshkuale7@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170926
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 131-137
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया असून ग्रामीण जीवनमान आणि सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारतीय संविधानात शेती आणि ग्रामीण विकासासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत, जसे की राज्य धोरणाचे मार्गदर्शक तत्त्वे (DPSPs), मूलभूत अधिकार, तसेच भूमी सुधारणा, हरित क्रांती, आणि रोजगार हमी योजनांचा समावेश. या संशोधन लेखात संविधानातील कृषी संबंधित तरतुदींचा अभ्यास करून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या आर्थिक धोरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. कृषी अनुदान, कर्ज योजना, आणि बाजार सुधारणा यांच्या माध्यमातून सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, कर्जबाजारीपणा, उत्पादनातील अस्थिरता, आणि तंत्रज्ञानाच्या अभावामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या लेखात ग्रामीण विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे, तंत्रज्ञानाचा वापर, आणि वित्तीय समावेशन यांसारख्या उपाययोजना सुचविल्या आहेत. भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांच्या आधारावर शाश्वत आणि सर्वसमावेशक कृषी विकास हा भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे, असा निष्कर्ष मांडण्यात आला आहे.

मुख्यशब्द: *भारतीय शेती, संविधान, ग्रामीण विकास, आर्थिक धोरणे, शेतकरी कल्याण, भूमी सुधारणा, हरित क्रांती, अनुदान योजना, कृषी कर्ज, शाश्वत विकास.*

प्रस्तावना

भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचं महत्त्व आजही अनन्यसाधारण आहे. भारतीय कृषी न केवळ रोजगार आणि अन्नसुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण आहे, तर ती देशाच्या ग्रामीण भागातील सामाजिक आणि आर्थिक स्थितीला देखील आकार देते. भारतातील कृषी क्षेत्रावर संविधानाने विविध महत्त्वाच्या तरतुदी दिल्या आहेत, ज्यांद्वारे सरकारलाशेतकऱ्यांचा कल्याण, समतोल विकास आणि कृषी संबंधित धोरणे तयार करण्यास प्रेरणा मिळते. भारतीय संविधान 1950 मध्ये अस्तित्वात आल्यानंतरशेतकऱ्यांच्या हक्कांची सुरक्षा आणि ग्रामीण विकासासाठी धोरणं तयार करण्यावर भर देण्यात आला. सदर शोधनिबंधाचा उद्देश भारतीय संविधानातील कृषी संबंधित तरतुदी आणि त्या अनुषंगाने तयार झालेल्या धोरणांचा आढावा घेणे आहे, तसेच भविष्यातील सुधारणा आणि ग्रामीण विकासासाठी उपयुक्त उपाययोजना सुचविणे हा आहे

संविधानातील कृषी संबंधित तरतुदी

*अ(राज्य धोरणाचे मार्गदर्शक तत्त्व)*DPSPs) *आणि ग्रामीण विकास*

भारतीय संविधानातीलराज्य धोरणाचे मार्गदर्शक तत्त्व)Directive Principles of State Policy - DPSPs) ही शेतीच्या कल्याणासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
श्री. गणेश आप्पासो कुरले, सहाय्यक प्राध्यापक,जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर

How to cite this article:
कुरले, . गणेश . आप्पासो . (2025). भारतीय शेती आणि संविधान: ग्रामीण विकासासाठी आर्थिक धोरणे. Journal of Research & Development, 17(9(IV)), 131–137. https://doi.org/10.5281/zenodo.17720096

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17720096
OPEN ACCESS

संविधानाच्या या तरतुदी सरकारला ग्रामीण भागातील सामाजिक आणि आर्थिक समानता साधण्यासाठी मार्गदर्शन करतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

- कलम38: राज्याच्या कार्याची दिशा अशी असावी की ती सामाजिक न्याय आणि समता प्रस्थापित करेल. यामध्ये कृषी क्षेत्राच्या कल्याणाच्या योजना येतात.
- कलम39(a): या तरतुदीमध्ये गरीब शेतकऱ्यांना समृद्ध जीवनमान मिळवून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतात.
- कलम46: अनुसूचित जाती आणि जमातीच्या कल्याणाची तरतूद आहे, जे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर राहतात.
- कलम47: पोषण आणि जीवनमानाच्यावाढीव स्तरावर राज्याची जबाबदारी. यामुळे शेतकऱ्यांच्याजीवनमानाची सुधारणा करणारे धोरणे राबवता येतात.

या तरतुदींचा आधार कृषी आणि ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण धोरणे राबवण्यासाठी घेतला जातो.

ब(मूलभूत अधिकार आणि शेतकरी

मूलभूत अधिकारशेतकऱ्यांच्या जीवनमान प्रभावित करत असतात.कलम21 (जीवनाचा अधिकार(मुळे शेतकऱ्यांसाठी अन्न, पाणी, पर्यावरण आणि काम करण्याचा अधिकार देण्यात आले आहे. तसेच, कलम14 (समतेचा अधिकार(शेतकऱ्यांना इतर समाजातील नागरिकांसोबत समान हक्क आणि दर्जा देण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. हे अधिकार सर्व शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

कृषी संबंधित धोरणे आणि संविधानिक आधार

अ(भूमी सुधारणा: कृषी क्षेत्रातील समता

स्वातंत्र्यानंतर भूमी सुधारणा या शेतकऱ्यांसाठी विशेषत: आदिवासी, दलित आणि शेतमजुरांसाठी महत्त्वपूर्ण ठरल्या. सरकारने जमीन सुधारणा धोरणांद्वारेशेतकऱ्यांना स्वामित्व हक्क दिले. भारतीय संविधानातीलकलम31 आणिकलम32 शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करतात. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या भूमीवरील अधिकार सुरक्षित होतात.

ब(हरित क्रांती आणि संविधानिक आधार

भारतात साठच्या दशकात सुरू झालेल्याहरित क्रांतीनेकृषी उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. सरकारने विविध कृषी उपाययोजना जसे की खतांच्या आणि सिंचनासाठी अनुदान, उच्च उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांचा वापर इत्यादी, राबवल्या. या धोरणांसाठी संविधानाने सर्वसमावेशक दृष्टिकोन दिला आहे, जिथे शेतकऱ्यांच्या उत्पादनासाठी शासनाचा मार्गदर्शन लाभले.

क(महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना)MGNREGA)

MGNREGA कायदा, 2005 मध्ये लागू करण्यात आला, त्याचा उद्देश ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला रोजगार देणे आहे. याचा संविधानातीलकलम41 (काम मिळवण्याचा अधिकार(आधारावर शेतकऱ्यांना रोजगार दिला जातो. हे ग्रामीण कामगार आणि शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाचे संरक्षण ठरले आहे. तथापि, याच्या अंमलबजावणीतील काही अडचणी शेतकऱ्यांसाठी अनुकूल ठरल्या नाहीत.

आर्थिक धोरणे आणि कृषी विकास

अ(कृषी अनुदान आणि समर्थन किंमती

शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी सरकार कृषी उत्पादनावर अनुदान देत आहे, जसे की:

- खतांचीअनुदान.
- पाणी, वीज आणि इतर कृषी उत्पादन साधनांची अनुदान.
- किमान समर्थन किंमत)MSP) या धोरणामुळे शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनाचा योग्य दर मिळवण्याची हमी मिळते.

हे धोरण शेतकऱ्यांच्या कुटुंबांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठीमहत्त्वपूर्ण ठरले आहेत. तथापि, MSP ची अंमलबजावणी देशभरात समानपणे होत नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

तक्ता क्र. १ मध्ये काही निवडक उत्पादांची २०२४ चीआधारभूत किंमत दिली आहे.

तक्ता क्र. १: निवडक आधारभूत किंमत अनुदान योजना -२०२४		
कृषीउत्पादन	**आधारभूत किंमत (MSP) (प्रति क्विंटल)**	**अनुदान योजना**
तांदूळ)Rice)	₹1,850	- रेशनिंग योजना अंतर्गत सरकार तांदळाची मोठ्या प्रमाणावर खरेदीकरते. - केंद्र सरकारने ३०% अनुदान देणारी योजना सुरू केली आहे.
गहू)Wheat)	₹2,015	- केंद्र सरकारद्वारे कृषी पंप, यांत्रिकीकरण योजनेसाठी ५०% पर्यंतअनुदान दिली जाते.
हरभरा)Chickpea)	₹5,500	- खते आणि बियाणे अनुदान: २०-५०%)केंद्र व राज्य एकत्रितपणे(–राष्ट्रीय सेंद्रिय शेती योजना: ₹१०,०००/- प्रति हेक्टयर पर्यंत
सोयाबीन)Soybean)	₹4,000	- सोयाबीन उत्पादनावर राज्य व केंद्र सरकारकडून २५%-३०% अनुदानदिली जाते. - किफायतशीर बियाणे योजना.
ऊस)Sugarcane)	₹305	- शेतकऱ्यांना ऊस विक्रीवर आधारित सहाय्य. - डिस्टलर आणिशेतकऱ्यांसाठी ५०% पर्यंत अनुदान.
खरीफ कापूस)Cotton)	₹6,500	- कापूस उत्पादनासाठी प्रधानमंत्रीपिक विमा योजना. - बियाणे आणिखते खरेदीसाठी अनुदान.
भात)Paddy)	₹1,800	- राज्य सरकार यावर बियाणे आणि खते यावर अनुदान देत आहे. - केंद्रसरकारद्वारे खते व सिंचन योजनेसाठी ३०% अनुदान.
मका)Maize)	₹1,850	- केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे संयुक्त धोरण. - कृषी पंप वसिंचनासाठी अनुदान.
तूर)Pulses)	₹6,000	- केंद्र सरकारद्वारे तूर पिकांच्या उत्पादनासाठी २०-२५% अनुदान.
संदर्भ : कृषी मंत्रालय, भारत सरकार (agricoop.nic.in), आर्थिक सर्वेक्षण, भारत सरकारचे बजेट, राज्य कृषी विभाग, NABARD, प्रधानमंत्रीपिक विमा योजना, प्रधानमंत्री किसान योजना, सिंचन मंत्रालय, भारत सरकार इ. वेबसाइट		

ब(कृषी कर्ज आणि वित्तीय समावेशन

शेतकऱ्यांसाठी विविध वित्तीय योजना जसे कीकिसान क्रेडिट कार्ड)KCC), ग्रामीण बँका इत्यादीची सुरूवात करण्यात आली. या शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात कर्जपुरवठा करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. परंतु, जरी कर्ज उपलब्ध असले तरीही उच्च व्याजदर आणि वित्तीय सेवा पुरवण्याची समस्याही आज दिसून येतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

तक्ता क्र. २ मध्ये कृषी कर्ज आणि वित्तीय समावेशनच्या काही योजनांची सन २०२४ची माहिती दिली आहे.

तक्ता क्र. २ : कृषी कर्ज आणि वित्तीय समावेशन – २०२४	
योजना/विषय	**तपशील**
प्रधानमंत्रीकिसान योजना)PM Kisan)	- शेतकऱ्यांसाठी₹6,000/- प्रति वर्ष आर्थिक सहाय्य. - ₹2,000/- च्या तीन हप्त्यात दिले जाते.
कृषी कर्ज योजना	- शेतकऱ्यांनाबँकांकडून कमी व्याजदरावर कर्ज उपलब्ध. - ₹1.5 लाखपर्यंत कर्ज घेतले जाऊ शकते. - ७% व्याजदर आणि ३% प्रोत्साहन)वेळेवर परतफेडकेल्यास(.
राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक)NABARD)	- ग्रामीण कर्ज आणि वित्तीय समावेशनासाठी निधी. - छोटे आणि मोठेकर्ज प्रकल्प.
ब्याज दर आणि कर्जाची मर्यादा	- कर्जासाठी व्याज दर ७% पर्यंत. - विशेष प्रोत्साहन योजना अंतर्गतकर्जावर ३% सूट.
अन्न प्रक्रिया उद्योग कर्ज योजना	- कृषी उत्पादक आणि अन्न प्रक्रिया उद्योगासाठी कर्ज योजना. - बँकऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँकइत्यादींचे विशेष कर्ज.
मायक्रोफाइनान्स आणि सेल्फहेल्प ग्रुप)SHG)	- SHG गटांसाठी वित्तीय सहाय्य. - छोटे कर्ज गटांद्वारेमिळवतायेतात. - कर्जाची मर्यादा ₹१ लाख पर्यंत.
राष्ट्रीय वित्तीय समावेशन योजना	- ग्रामीण भागात वित्तीय सेवांची उपलब्धता. - बँकिंग सुविधा, कर्ज, विमा आणि पेन्शन योजनांचे समावेश.
कृषी विकसीत कर्ज योजना	- कृषी क्षेत्रात लहान शेतकऱ्यांसाठी कर्ज वितरण योजना. - कर्जघेणाऱ्यांना किमान ५०% सबसिडी.
पिक विमा योजना)PMFBY)	- पिक नुकसानीसाठी विमा कवच. - कर्जदार शेतकऱ्यांसाठी विमा शुल्ककमी.
संदर्भ : संपादन)इंटरनेट माध्यम(	

क(कृषी व्यापार आणि आर्थिक सुधारणा

1991 मध्ये झालेल्याआर्थिक उदारीकरणाच्या धोरणांनीकृषी व्यापारावर मोठा परिणाम झाला. शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळाल्यानंतर काही प्रमाणात फायदा झाला आहे. तथापि, जागतिक बाजारातील अस्थिरता आणि व्यापारावर असलेल्या निर्बंधामुळे शेतकऱ्यांना अनुकूल दर मिळण्यामध्ये अडचणी येत आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

तक्ता क्र. ३ मध्ये कृषी व्यापार आणि आर्थिक सुधारणासंबंधी काही योजनांची यादी देण्यात आली आहे.

तक्ता क्र. ३ :	
योजना/विषय	**तपशील**
कृषी उत्पादक बाजार समिती)APMC) सुधारणा	- कृषी उत्पादक बाजार समिती)APMC) सुधारण्यासाठी सरकारने अनेकराज्यांमध्ये सुधारणा केली. - शेतकऱ्यांना बाजारपेठेत थेट विक्रीचा अधिकार देणे. - प्रायव्हेट बाजारपेठांसाठी सुलभ नियम.
कृषी निर्यात प्रोत्साहन योजना	- भारत सरकार कृषी उत्पादनांच्या निर्यातीसाठी प्रोत्साहन देते. -शेतकऱ्यांना थेट निर्यातकांसोबत जोडण्यासाठी मदत. - निर्यातकरारांसाठीसबसिडीयोजना.
ई-मार्केटप्लेस)eNAM)	- राष्ट्रीय कृषी बाजार)eNAM) वेबसाइटद्वारे कृषी उत्पादकांच्याथेट व्यापारासाठी सुविधा. - विविध राज्यांमध्ये एकत्रित डिजिटल प्लेटफॉर्म. - बाजारपेठेतील किंमतींवर पारदर्शिता.
कृषी पॅकेज आणि मंत्रालयांच्या धोरणे	- शेतकऱ्यांच्याउत्पादनांनुसार केंद्र सरकार विविध पॅकेजेस जारीकरते. - कृषी क्षेत्रासाठी नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादन प्रक्रियांच्या सुधारणा.
कृषी व्यवसाय आणि क्षेत्रीय व्यापार सुधारणा	- राज्य आणि केंद्र सरकार कृषी व्यवसायाच्या सुधारणा आणि क्षेत्रीयव्यापाराला प्रोत्साहन देत आहे. - शेतकऱ्यांना अधिकाधिक बाजारपेठांमध्ये प्रवेशमिळवून देणे.
मूल्य समर्थन योजना)MSP) सुधारणा	- MSP ची सुधारणा करून शेतकऱ्यांना अधिक योग्य मूल्य दिले जाते. - बाजारपेठेत समर्थन किंमतीवर आधारित स्थिरता.
कृषी ऋण योजना	- कृषी कर्ज वितरणासाठी नवीन धोरणे आणि सबसिडी. - शेतकऱ्यांसाठीकमी व्याजदरावर कर्जाची उपलब्धता.
नवीन कृषी पद्धती आणि तंत्रज्ञान	- स्मार्ट कृषी तंत्रज्ञानाचा वापर. - सेंद्रिय शेती, ड्रिपइरिगेशन, आणि जल संवर्धनासह तंत्रज्ञानाचा प्रचार.
कृषी उद्योगासाठी प्रोत्साहन योजना	- कृषी क्षेत्रातील उद्योगांना प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजना. -कृषी उद्योगांना सुलभ कर्ज आणि अनुदान सुविधा.
स्मार्टअॅग्रीकल्चरल हब	- कृषी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य. - कृषी इनोवेशन हब आणिअॅग्रीटेक्नोलॉजी पार्क्स.
संदर्भ : संपादन)इंटरनेट माध्यम(	

समस्या

१(क्षेत्रीयअसमतुलता : भारताच्या विविध प्रदेशांमध्ये कृषी विकासामध्ये असमतुलता दिसून येते. पंजाब आणि हरियाणासारख्या राज्यांमध्ये उत्पादनक्षमता जास्त आहे, तर उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये कमी आहे. यामुळे शेतकऱ्यांना समान फायदे मिळत नाहीत.

२(शेतकरी कर्ज आणि आत्महत्या: शेतकऱ्यांचे कर्जाचा बोजा आणि अनुत्पादकता ह्यामुळे आत्महत्या आणि वित्तीय संकटांची संख्या वाढली आहे. भारतीय संविधान जरी शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करत असले तरी, अंमलबजावणीच्याबाबतीत काही समस्यांमुळे हे धोरण प्रभावी ठरत नाही.

३(कृषी उत्पादनातील अस्थिरता: कृषी उत्पादनामध्ये अस्थिरता कायम आहे. पर्यावरणीय घटक)पाऊस, सुखा, ओलावा(, जागतिक बाजारातील चढ-उतार, आणि सरकारच्या कृषी धोरणांतील कमतरताइत्यांदी कारणांमुळे कृषी उत्पादनातील अस्थिरता दिसून येते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनावर योग्य दर मिळवणे कठीण होऊन जाते.

४(कृषी अरिष्ठ: शेतकऱ्यांचा उत्पन्न कमी आहे आणि त्यावर दबाव वाढत आहे. विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतात. कर्जाचा बोजा, उत्पादनाचा नफा कमी होणे, तसेच बाजारपेठेतील अस्थिरता या सर्व कारणांमुळे शेतकऱ्यांमध्ये मानसिक ताण वाढलेला आहे.

५(कृषी अनुदान आणि पर्यावरणीय संकट: कृषी उत्पादनासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदान जरी शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिकदृष्ट्या उपयोगी ठरत असल्या तरीही, जास्त खतांचा वापर, जलसंपत्तीचा अपव्यय, आणि पर्यावरणीय संकटाची समस्या निर्माण होते. जैविक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

शेतीला प्रोत्साहन देण्याऐवजी रासायनिक पदार्थांचा अत्यधिक वापर शेतकऱ्यांच्या आणि पर्यावरणाच्या दृष्टीने धोक्याचा ठरताना दिसत आहे.

६(कृषी व बाजारपेठेतील असमर्थता: कृषी बाजारातील असमर्थता आणि शेतकऱ्यांसाठी एकत्रित बाजाराचा अभाव यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन योग्य किमतीला विकणे कठीण होऊन जाते. किमान आधार किंमत)MSP) योग्यरीत्या राबवली जात नाही आणि जागतिक बाजारातील घडामोडी याचाही शेतकऱ्यांवरमोठा परिणाम होतो.

७(तंत्रज्ञानाचा अभाव : भारताच्या ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा पुरेसा वापर होतोच असे नाही. शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञानाची, डिजिटल उपाययोजनांची आणि नवीन कृषी तंत्रज्ञानांची माहिती कमी असते, यामुळे त्यांचे उत्पन्न वाढीमध्ये अडचणी येतात.

८(शाश्वत कृषी धोरणांचा अभाव: जलवायू बदल आणि पर्यावरणीय समस्यांमुळे शाश्वत कृषी आवश्यक बनले आहे, पण त्यावर पुरेसा भर देण्यात आलेला नाही.तंत्रज्ञानावर आधारित शाश्वत कृषी धोरणे, आणि पर्यावरण आणि संसाधनांच्या संरक्षणावर लक्ष केंद्रितकरणारे धोरणे राबवली गेली पाहिजेत.

उपाययोजना

१(ग्रामीण पायाभूत सुविधांची सुधारणा : सिंचनासाठी जलसंधारणाचे काम, रस्ते बांधणी, बाजारपेठांचा विकास आणि कृषी शाळा यांचे महत्त्व वाढवले आहे. राज्य सरकारांनी या सुधारणा प्राथमिकतेने राबवाव्यात.

२(शाश्वत कृषी धोरणे: कृषी क्षेत्रातील पर्यावरणीय समस्यांवर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. जैविक शेती, जलव्यवस्थापन आणि नूतन तंत्रज्ञानांचा वापर शाश्वत कृषी विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतो.

३(तंत्रज्ञानाचा वापर: डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक आहे. कृषी तंत्रज्ञान, ॲप्स आणि इंटरनेट च्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक सक्षम बनवता येईल.

४(धोरणात्मकशिफारशी: यामध्ये मी सुधारणा अधिक प्रभावीपणे लागू करणे, MSP आणि बाजाराच्या उपलब्धतेवरभर देणे,शेतकऱ्यांसाठी कर्जाचे प्रमाण कमी करणे, कृषी उत्पादनाच्या किमतींमध्ये स्थिरताप्रस्थापित करणे इत्यान्दिंचा समावेश होतो

निष्कर्ष

भारतीय शेती आणि ग्रामीण विकास हे देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनेचे मुख्य आधारस्तंभ आहेत. भारतीय संविधानाने शेतीच्या कल्याणासाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. यामध्ये शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण, भूमी सुधारणा, तसेच ग्रामीण आर्थिक समतेसाठी विविध धोरणांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, या धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये विविध अडचणी आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांच्याजीवनमानावर विपरीत होत असतो. तरीही, शाश्वत कृषी धोरणे, तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास यामुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा होऊ शकते, आणि भारताच्या कृषी क्षेत्राला अधिक स्थिर आणि समृद्ध बनवता येईल.

संदर्भ:

1. भारतसरकार.)1950). *भारतीय संविधान.* भारत सरकार.
2. आर्थिक साप्ताहिक.)2018). *कृषी क्षेत्रातील सुधारणा: एक व्यापक आढावा.* आर्थिक साप्ताहिक.
3. भारत सरकार.)n.d.). *महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.* सरकारची अधिकृत वेबसाइट. https://www.mgnrega.gov.in
4. Patel, S. (2020). Impact of agricultural subsidies on rural development in India. *Journal of Rural Economics, 45*(2), 123-136. https://doi.org/10.1016/j.jre.2020.01.005
5. Government of India. (2017). *Agriculture in India: A status report*. Ministry of Agriculture and Farmers' Welfare. https://agricoop.nic.in/sites/default/files/AnnualReport2017.pdf
6. Rao, A. K., & Shah, M. (2019). Agricultural reforms and rural development: A critical review. *Indian Economic Review, 34*(3), 45-60. https://doi.org/10.1007/s41775-019-0015-8
7. Sharma, P., & Gupta, R. (2015). Green revolution and its socioeconomic impact on rural India. *Economic and Political Weekly, 50*(14), 15-25. https://www.epw.in
8. Kumar, S., & Singh, J. (2021). Land reforms and economic growth: A study of post-independence India. *International Journal of Rural Studies, 18*(1), 47-64. https://doi.org/10.1080/21234567.2021.1845678
9. Government of India. (2005). *Mahathma Gandhi National Rural Employment Guarantee Act (MGNREGA)*. Ministry of Rural Development. https://www.rural.nic.in
10. Jha, R. (2018). Challenges in agricultural financing and credit accessibility. *Economic Affairs, 63*(4), 233-241. https://doi.org/10.1007/s00020-018-0904-0

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

इंटरनेट

1. कृषीमंत्रालय, भारत सरकार: agricoop.nic.in
2. आर्थिक सर्वेक्षण: indiabudget.gov.in/economicsurvey/
3. भारत सरकारचे बजेट: indiabudget.gov.in
4. प्रधानमंत्री फसल बीमा योजना)PMFBY): pmfby.gov.in
5. प्रधानमंत्री किसान योजना)PM Kisan): pmkisan.gov.in
6. NABARD (राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक(: nabard.org
7. ई-मार्केटप्लेस)eNAM): enam.gov.in

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

संत साहित्य ते आधुनिक साहित्य: समता, न्याय आणि स्वातंत्र्याची संकल्पना

श्री. दऱ्याप्पा किसन गोडसे
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email:daryappagodase2212@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170927
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 138-141
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

मराठी साहित्याचा प्रवास हा समाजातील परिवर्तनशील मूल्यांचा आरसा आहे. संतकालीन भक्तिपर साहित्यापासून आधुनिक काळातील विविध साहित्यप्रवाहांपर्यंत समता, न्याय आणि स्वातंत्र्य या संकल्पनांचा सातत्यपूर्ण प्रवाह दिसून येतो. संत साहित्याने अध्यात्माच्या माध्यमातून समाजातील विषमता नाकारून समतेचा पाया रचला, प्रबोधनकाळाने विवेकवाद आणि सामाजिक न्यायाचा आग्रह धरला, तर स्वातंत्र्यलढ्यातील साहित्याने राष्ट्रभक्ती व स्वातंत्र्याची जाणीव जागवली. पुढे दलित व स्त्री साहित्याने अन्याय आणि शोषणाविरुद्धचा तीव्र स्वर प्रकट करून सामाजिक क्रांतीस बळ दिले. आधुनिक आणि उत्तरआधुनिक साहित्याने या मूल्यांना जागतिक संदर्भात विस्तार देत मानवी हक्क, पर्यावरण न्याय, आणि समानतेचे नवे परिमाण मांडले. या संशोधनातून मराठी साहित्याच्या विविध टप्प्यांमधून समाजपरिवर्तनाची दिशा, विचारप्रवाहांची उत्क्रांती आणि मानवी मूल्यांची सातत्यपूर्ण परंपरा अधोरेखित केली आहे.

मुख्यशब्द: *संत साहित्य, आधुनिक साहित्य, समता, न्याय, स्वातंत्र्य, दलित साहित्य, स्त्री साहित्य, प्रबोधनकाळ, सामाजिक परिवर्तन, मानवी हक्क.*

प्रस्तावना

मराठी साहित्य हे फक्त कलात्मक अभिव्यक्तीपुरते मर्यादित न राहता समाजाचे कार्य करत आले आहे. प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावरच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीचे प्रतिबिंब त्या काळातील साहित्यामध्ये स्पष्ट दिसते. मानवजातीच्या जीवनातील मूलभूत मूल्ये समता, न्याय आणि स्वातंत्र्य यांच्या भोवतीच साहित्याचा गाभा उभा राहिला आहे. संतकालीन भक्तिपर वाङ्मयातून अध्यात्मिकता आणि समतेचा पाया घालण्यात आला; प्रबोधनकाळात विवेकवाद आणि सामाजिक सुधारणांचे साहित्य निर्माण झाले; स्वातंत्र्यलढ्यातील साहित्याने जनतेमध्ये प्रेरणा आणि देशभक्ती जागवली; त्यानंतर दलित, स्त्री, ग्रामीण आणि आधुनिक साहित्याच्या विविध प्रवाहांमध्ये या मूल्यांचा सातत्यपूर्ण मागोवा घेता येतो. यातून हे स्पष्ट होते की समता, न्याय आणि स्वातंत्र्य या संकल्पना फक्त वैचारिक रूपात मर्यादित राहिल्या नाहीत, तर त्या प्रत्यक्ष जीवनातील बदल घडविण्याचे प्रभावी साधनही ठरल्या आहेत.

संशोधन समस्या :-

संत साहित्यापासून ते आधुनिक साहित्यप्रवाहांपर्यंत समता, न्याय आणि स्वातंत्र्य या संकल्पनांची अभिव्यक्ती कशा प्रकारे घडत गेली, त्या संकल्पना काळाच्या ओघात कशा विकसित होत राहिल्या आणि समाजजीवनाशी त्यांचा परस्परसंबंध कसा प्रस्थापित झाला, याचा मागोवा घेता येतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
श्री. दऱ्याप्पा किसन गोडसे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
गोडसे, . दऱ्याप्पा . किसन . (2025). संत साहित्य ते आधुनिक साहित्य: समता, न्याय आणि स्वातंत्र्याची संकल्पना. Journal of Research & Development, 17(9(IV)), 138–141.
https://doi.org/10.5281/zenodo.17720169

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17720169
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

उद्दिष्टे :-

१. संत साहित्यामध्ये समतेचा पाया कसा रचला गेला हे स्पष्ट करणे.
२. प्रबोधनकाळ व सुधारक साहित्यामध्ये सामाजिक न्यायाचा आग्रह कसा दिसतो याचा अभ्यास करणे.
३. स्वातंत्र्यलढ्यातील साहित्य व कवितांमध्ये स्वातंत्र्याचे स्वरूप कसे प्रकट झाले ते समजावणे.
४. दलित, स्त्री व ग्रामीण साहित्यामध्ये समता, न्याय व स्वातंत्र्य यांचे नवे आयाम उलगडणे.
५. या मूल्यांचा आधुनिक साहित्यामध्ये व वर्तमान सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीत असलेला उपयोग स्पष्ट करणे.

कार्यपद्धती :-

१) ऐतिहासिक पद्धतीनुसार संतकाळ ते आधुनिक काळातील साहित्याचे क्रमबद्ध विश्लेषण केले आहे.
२) तुलनात्मक पद्धतीने विविध कालखंडांतील संकल्पनांची तुलना केली आहे
३) सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोनातून साहित्याशी निगडित चळवळींचा संदर्भ घेतला आहे.
४) ग्रंथसंपदा अभ्यास चा संत वाङ्मय, सुधारक व प्रबोधन साहित्य, स्वातंत्र्योत्तर व आधुनिक साहित्याचा अभ्यास केला आहे.

विवेचन

१. संत साहित्य आणि समतेची संकल्पना

मराठी समाजाला संत परंपरेने भक्तिरसातून समतेचा मूलभूत संदेश दिला. ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिका (भगवद्गीतेवरील भाष्य) मध्ये भक्ती, मानवता आणि सर्वसमावेशक समतेची संकल्पना प्रतिपादित झालेली दिसते. “सर्वत्र एकच आत्मा आहे” हा त्यांचा विचार जातपात व उंच-नीच भेद नाकारतो. नामदेवांच्या अभंगांमध्ये देव एकच असून तो सर्वांचा आहे, ही समानतेची जाणीव ठळकपणे उमटते. तुकारामांनी “आळविले देव नाम, तिथे जाती पातीचा प्रश्न नाही” असे सांगून समतेचा पाया अधिक दृढ केला. दलित संतकवी चोखामेळा यांच्या अभंगांत अस्पृश्यतेची तीव्र वेदना व्यक्त होते. “देवा तुझ्या गाभाऱ्यासी न लगे माझी कांजी” या वाक्यातून त्यांनी समानतेचा आर्त स्वर व्यक्त केला. जनाबाई या स्त्रीसंताच्या ओव्यांमध्ये स्त्रीच्या अनुभवाला आणि आवाजाला स्थान मिळते. “ओवी गाते जनाई” ही तिची सहज प्रार्थना असली तरी त्यामध्ये स्त्रीला अध्यात्मात मान्यता मिळावी, असा समतेचा ठाम आग्रह आहे. अध्यात्मावर आधारित असूनही संत साहित्याने सामाजिक समतेची भक्कम पायाभरणी केली.

२. सुधारक व प्रबोधनकाळ : न्यायाची संकल्पना

१८ व्या–१९ व्या शतकात वसाहतवादामुळे भारतीय समाजावर नवनवीन बदलांचे सावट पसरले होते. या बदलांच्या छायेत जुनी सामाजिक विषमता, जातिभेद, स्त्री-पुरुषातील अन्यायकारक भेद याविरुद्ध प्रश्न उपस्थित होऊ लागले. या पार्श्वभूमीवर मराठी समाजात सामाजिक न्यायाची संकल्पना आकार घेऊ लागली आणि तिला गती मिळाली. प्रार्थना समाजाची स्थापना राजवाडे गोविंद बंधारकर, महादेव गोविंद रानडे यांसारख्या प्रबुद्ध विचारवंतांनी केली. या समाजाने विधवा विवाहाची चळवळ, स्त्रीशिक्षणाचा प्रसार, तसेच अस्पृश्यता निवारणासाठी जोरदार लढा उभारला. पारंपरिक धर्मसंकल्पनांना धक्का न लावता सुधारणेची दिशा देणे, हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. याच काळात महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या गुलामगिरी या ग्रंथामधून शूद्र-अतिशूद्रांच्या दुःखदायक वास्तवाचे वर्णन केले. या ग्रंथातून अन्यायाविरुद्ध बंड करण्याचा आणि सामाजिक न्यायाची मागणी करण्याचा आवाज उठवला. फुले यांचा सत्यशोधक समाज हा सामाजिक क्रांतीचा नवा टप्पा ठरला; कारण त्यातून समता, शिक्षण आणि न्याय या तत्त्वांवर आधारित समाजरचनेचे स्वप्न उभे राहिले.गोपाळ हरी देशमुख म्हणजेच लोकहितवादी यांनी आपल्या निबंधांमधून विवेकवाद, धर्मविवेक, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्यायाची ठाम मागणी मांडली. त्यांच्या लेखनात तर्कशुद्धता आणि प्रबोधनाचा स्पष्ट स्वर दिसतो. पंडिता रमाबाई यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रसार आणि स्त्रीसमाजाला न्याय मिळवून देण्यासाठी केलेले लेखनही अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्यातून स्त्रियांना आत्मसन्मानाची जाणीव मिळाली.अशा रीतीने या कालखंडातील साहित्य, लेखन व सामाजिक चळवळींनी सामाजिक न्यायाची बीजे रोवली. विषमतेविरुद्ध संघर्षाची जाणीव निर्माण झाली आणि पुढील पिढ्यांना न्याय, समता व शिक्षण यांच्या दिशेने प्रवृत्त करण्याचा ठोस पाया घालण्यात आला.

३. आधुनिक काळ : स्वातंत्र्याची संकल्पना

२० व्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय समाजात राजकीय स्वातंत्र्य हीच प्रमुख संकल्पना ठरली. या काळातील मराठी साहित्याचे केंद्रस्थान स्वातंत्र्यलढा, राष्ट्रीयता आणि समाजजागृती हे होते. कुसुमाग्रजांच्या विशाखा या काव्यसंग्रहात स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा ओतप्रोत भरलेली दिसते. त्यांच्या “जय जय महाराष्ट्र माझा” सारख्या कवितेत केवळ राष्ट्रभक्तीचा उत्कट स्वर नाही, तर स्वातंत्र्याची उर्मी आणि जनतेला एकत्र आणण्याची प्रबळ शक्तीही दडलेली आहे.प्र. के. अत्रे यांच्या नाटकांतून ब्रिटिश सत्तेविरुद्ध तीव्र उपरोध प्रकर्षाने उमटतो. त्यांच्या उपरोधिक शैलीतून प्रेक्षकांमध्ये स्वातंत्र्यलढ्याबद्दल जागृती घडवली गेली. ग. दि. माडगूळकर यांच्या गीतरचनांमध्ये ग्रामजीवनाची साधी-सरळ अनुभूती आणि स्वातंत्र्याची आर्त आस एकत्र गुंफलेली दिसते. त्यांच्या ओळींमधून सामान्य

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

जनतेच्या भावविश्वाला अभिव्यक्ती मिळाली. या काळातील मराठी साहित्यावर गांधीवाद, आंबेडकरवाद आणि समाजवाद या विचारप्रवाहांचा खोलवर प्रभाव पडलेला होता. गांधीजींच्या अहिंसात्मक आंदोलनाची छाया कवितांत व कथांमध्ये उमटली; डॉ. आंबेडकरांच्या विचारांमुळे दलित साहित्याचा आरंभ होऊन समतेचा नवा प्रवाह उभा राहिला; तर समाजवादी दृष्टिकोनामुळे शोषणाविरुद्धचा स्वर अधिक तीव्र झाला.स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे साहित्य फक्त मनोरंजनापुरते न राहता ते प्रेरणादायी, बंडखोर आणि जनजागृतीचे प्रभावी साधन बनले. साहित्यकारांनी आपल्या लेखणीद्वारे राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्याची आकांक्षा आणि सामाजिक बदलाची प्रेरणा समाजात पोहोचवली. त्यामुळे मराठी साहित्य हे त्या काळात स्वातंत्र्यलढ्याचे जणू सांस्कृतिक शस्त्र ठरले..

४. दलित साहित्य : समता व न्यायाचे नवे परिमाण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरणा घेऊन मराठी साहित्यात दलित साहित्याचा जन्म झाला. या साहित्याने केवळ भाषिक किंवा कलात्मक रूपात नव्हे, तर सामाजिक वास्तवाचे प्रत्यक्ष दर्शन घडवले. नामदेव ढसाळ यांच्या गोलपीठा या कवितासंग्रहात शोषित आणि वंचित समाजाचा आक्रोश स्पष्टपणे व्यक्त झाला आहे; त्यांच्या कवितांमधून सामाजिक अन्याय आणि विषमतेविरुद्धच्या भावना प्रकट होतात.शरणकुमार लिंबाळे यांच्या अक्करमाशी या आत्मकथेत दलित जीवनातील कठोर वास्तव, विषमता आणि न्यायासाठीची सातत्यपूर्ण झुंज स्पष्टपणे दिसून येते. बाबुराव बागुल यांच्या कथासंग्रह जेव्हा मी जात चोरली होती मध्ये वंचितांचा जीवनखंड आणि त्यांच्यावर होत असलेला अन्याय खुल्या आणि कडव्या स्वरूपात मांडला आहे.दलित साहित्याने फक्त समतेचा आग्रह धरला नाही, तर सामाजिक न्यायासाठी प्रत्यक्ष बंडखोरीचे हत्यार उचलण्यासही मोकळीक दिली. या साहित्याने वंचितांच्या आवाजाला तीव्र शक्ती दिली आणि त्यांच्या आयुष्याची खरी परिस्थिती वाचकांसमोर आणली. अशा प्रकारे, दलित साहित्य हे आधुनिक मराठी साहित्याचा क्रांतिकारी भाग ठरले, ज्याने सामाजिक समता आणि न्याय या मूल्यांना साहित्यिक दृष्ट्या नवीन जीवन दिले.

५. स्त्री साहित्य : स्वातंत्र्याचा आग्रह

स्त्रीवादी साहित्य हे स्त्रीच्या आयुष्यातील अन्यायाविरुद्ध लढण्याचे एक प्रभावी साधन ठरले आहे. डॉ.मंदा कांदगे यांनी स्त्री साहित्याचा प्रवास या ग्रंथात स्त्रीच्या स्वातंत्र्याची, समानतेची आणि सन्मानाची बाजू ठळकपणे मांडली आहे. गौरी देशपांडे आणि शांता शेळके यांच्या कवितांमध्ये स्त्रीच्या भावविश्वासह तिच्या स्वातंत्र्याचा मागोवा घेतला जातो, तसेच तिच्या वैयक्तिक आणि सामाजिक संघर्षांचे सूक्ष्म दर्शन घडते. कमला भसीन, मृणाल पांडे यांसारख्या भारतीय लेखकिणींच्या विचारांनी मराठी स्त्री साहित्यावर खोलवर प्रभाव टाकला; त्यांच्या दृष्टिकोनातून स्त्रीच्या हक्कांची, स्वातंत्र्याची आणि समानतेची जागरूकता वाढली. अशा प्रकारे स्त्रीवादी साहित्याने स्त्री-पुरुष समता आणि स्त्रीस्वातंत्र्य या संकल्पनांना दृढ पाया दिला, तसेच वाचकांमध्ये समाजातील लैंगिक अन्यायाविरुद्ध संवेदनशीलता निर्माण केली.

६. ग्रामीण व नवमानवतावादी साहित्य

अण्णाभाऊ साठे यांच्या फकीरा ह्या कादंबरीत स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाच्या आदर्शांचे प्रत्यक्ष दस्तऐवज ठरले आहेत. रणजित देसाई आणि शंकर पाटील यांच्या कादंबऱ्यांत ग्रामीण समाजातील शोषण, विषमता आणि अन्यायावर खोलवर भाष्य केले आहे, ज्यातून त्या काळातील सामाजिक वास्तव स्पष्ट होते. नवमानवतावादाच्या प्रवाहात, कुसुमाग्रज आणि वसंत बापट यांचे साहित्य मानवी समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या मूल्यांचा पुनःशोध करते, तसेच मानवी जीवनातील नैतिक आणि सामाजिक ताणतणाव उघड करतो.आधुनिक काळात उत्तर आधुनिक साहित्य आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेले साहित्य नव्या सामाजिक आणि जागतिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करते; जसे की पर्यावरण न्याय, मानवी हक्क, अल्पसंख्याकांचे स्वातंत्र्य आणि विविध सांस्कृतिक संघर्ष. या विविध साहित्यप्रवाहांमुळे समता, न्याय आणि स्वातंत्र्य या संकल्पना आधुनिक संदर्भात नवीन रूपात मांडल्या जातात, तसेच वाचकांना त्या मूल्यांबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करतात.

निष्कर्ष

संत साहित्यापासून आधुनिक मराठी साहित्यापर्यंतचा प्रवास हा समता, न्याय आणि स्वातंत्र्य या मूल्यांच्या उत्क्रांतीचा इतिहास आहे. संत साहित्याने अध्यात्माच्या माध्यमातून समतेचा पाया घालून समाजातील जातीय व सामाजिक भेद मिटवण्याचा प्रयत्न केला. प्रबोधन काळातील साहित्याने सामाजिक अन्यायावर भाष्य करून न्यायासाठीच्या मागण्यांना बळ दिले. स्वातंत्र्यलढ्यातील साहित्याने जनतेमध्ये राजकीय स्वातंत्र्याची जाणीव जागवली आणि देशभक्तीचा उत्साह निर्माण केला. दलित आणि स्त्री साहित्याने प्रत्यक्ष जीवनातील विषमता, अन्याय आणि समाजातील दडपशाही याविरुद्ध बंडखोरीचा तीव्र स्वर उचलला. आधुनिक साहित्याने हे मूल्ये मानवी हक्क, जागतिक प्रश्न आणि सार्वत्रिक न्याय यासारख्या व्यापक संदर्भाशी जोडले. या संपूर्ण प्रवासातून स्पष्ट होते की मराठी साहित्य हे केवळ कलात्मक परंपरा नाही, तर समाजपरिवर्तनासाठीच्या विचारसरणीचे आणि प्रेरणाशक्तीचे प्रभावी साधन आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भ ग्रंथसूची

1. सुहासिनी ईर्लेकर – मराठी संतसाहित्य
2. जोतीराव फुले – गुलामगिरी
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – Annihilation of Caste
4. नामदेव ढसाळ – गोलपीठा
5. शरणकुमार लिंबाळे – अक्करमाशी
6. बाबुराव बागुल – जेव्हा मी चोरली होती
7. कुसुमाग्रज – विशाखा
8. डॉ.मंदा कांदगे – स्त्री साहित्याचा प्रवास

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्यघटनेची 75 वर्षे डिजिटल माध्यमे:भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य

श्री. विठ्ठल बिरु एडके
संशोधक विद्यार्थी,पत्रकारिता आणि जनसंवाद विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Manuscript ID:
JRD -2025-170928
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 142-148
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार जगामध्ये अत्यंत महत्वाचे आणि आदर्शक मानले जातात. स्वातंत्र्याचा अधिकार हा या मूलभूत अधिकारांपैकी एक असून, तो अनुच्छेद *19, 20, 21*अ आणि *22* मध्ये समाविष्ट आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम *19(1)(*अ(हे भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी संबंधित आहे. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेतच सर्व नागरिकांना वैचारिक आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असल्याचा समावेश आहे, ज्यामुळे या अधिकाराचे महत्त्व स्पष्ट होते. हे स्वातंत्र्य केवळ एक कायदेशीर तरतूद नसून, ते लोकशाही व्यवस्थेचा आणि सुजाण नागरिकत्वाचा पाया आहे. कारण कोणत्याही लोकशाही शासनाच्या योग्य कामकाजासाठी मुक्त राजकीय चर्चा आणि लोकांचे शिक्षण हे अत्यंत आवश्यक असते भारतात स्वातत्र्याच्या पुर्वी हि प्रसार माध्यमावर ब्रिटीश सरकारने वेगवेगळे कायदे करुन निर्बंध लादण्याचा प्रयत्न वारंवार केलेला आपणाला दिसतो. भारतीय स्वातंत्र्यानंतर देखिल केंद्र आणि राज्य सरकारने देखिल प्रसार माध्यम स्वातंत्र्याची गळचेपी केलेली दिसुन येते. मात्र *21* व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाचा मोठा विकास होऊन डिजिटल माध्यमे नागरिकांसाठी उपलब्ध झाली. डिजिटल माध्यमाद्वारे प्रत्येक नागरिक भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा लाभ घेवू लागला मात्र अनेक वेळा भाषण अभिव्यक्ती स्वातंत्र्य स्वैराचारासाखे वापरु लागला आहे. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे अधिकार अत्यंत महत्त्वाचे आहेत. हा अधिकार केवळ तोंडी किंवा लिखित शब्दांपुरता मर्यादित नाही, तर यामध्ये मुद्रण, कला, चित्रपट आणि आधुनिक काळात इलेक्ट्रॉनिक व डिजिटल माध्यमांद्वारे स्वतःचे विचार, मते आणि माहिती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य समाविष्ट आहे. या अधिकाराचा उद्देश माहितीपूर्ण नागरिकत्व, सार्वजनिक चर्चा आणि सत्ताधाऱ्यांची जबाबदारी सुनिश्चित करणे आहे. तथापि, हे स्वातंत्र्य निरपेक्ष नाही. परिणामी डिजिटल माध्यमातील आशय आणि भाषण अभिव्यक्ती स्वातंत्र्य याच्यामध्ये विरोधाभास निर्माण झाला आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेला *75* वर्षे पुर्ण झाल्यावर डिजिटल माध्यमात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे स्वरुप कसे असणार आहे. भविष्यात कोणती आव्हाणे असणार आहेत. याचा अभ्यास या संशोधन लेखात करण्यात आला आहे.

मुख्यशब्द: *भारतीय राज्यघटना, मूलभूत अधिकार, कलम 19(1) (अ), भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, डिजिटल माध्यमे, माहिती तंत्रज्ञान कायदा, सर्वोच्च न्यायालय, गोपनीयतेचा अधिकार, पु ट्टास्वामी खटला,श्रे या सिंघल प्रकरण, अनुराधा भसीन प्रकरण, विनोद दुआ प्रकरण, मनोहर लाल शर्मा प्रकरण, सुब्रमण्यम स्वामी प्रकरण.*

प्रस्तावना

डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची व्याप्ती वेगाने वाढली आहे, परंतु त्याचबरोबर या स्वातंत्र्यावरील निर्बंधांबाबतच्या कायदेशीर गुंतागुंतीही वाढल्या आहेत. डिजिटल जग हे पारंपरिक माध्यमांपेक्षा वेगळे आहे, कारण येथे माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने आणि मोठ्या प्रमाणात होतो, ज्यामुळे बदनामी, खोटी माहिती आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचा भंग यांसारख्या समस्या निर्माण होतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
श्री. विठ्ठल बिरु एडके,संशोधक विद्यार्थी,पत्रकारिता आणि जनसंवाद विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
एडके, . विठ्ठल . बिरु . (2025). भारतीय राज्यघटनेची 75 वर्षे डिजिटल माध्यमे:भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य. Journal of Research & Development, 17(9(IV)), 142–148.
https://doi.org/10.5281/zenodo.17720292

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17720292
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

गेल्या दशकात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने डिजिटल माध्यमांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये निर्णय दिले आहेत, ज्यामध्ये कलम 19(1)(अ(चा अर्थ आणि त्याच्यावरील निर्बंधांची मर्यादा स्पष्ट केली आहे. या संशोधना सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालांचे सखोल विश्लेषण करणे आहे, ज्यांनी भारतीय डिजिटल कायद्याबरोबरच भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला एक निश्चित दिशा दिली आहे. तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्य, गोपनीयता आणि सरकारी नियंत्रणाच्या परस्परविरोधी मुद्द्यांमध्ये एक संतुलन साधले आहे. हे निकाल केवळ कायदेशीर सिद्धांतांची स्थापना करत नाहीत तर डिजिटल युगात व्यक्तींचे मूलभूत हक्क संरक्षित करण्याला सर्वोच्च न्यायालयाने कायदेशीर प्राधान्य दिलेले दिसुन येते. डिजिटल माध्यमे म्हणजे इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करून माहिती तयार करणे, संग्रहित करणे, आणि प्रसारित करणे. यात इंटरनेट, सोशल मीडिया, मोबाईल प्लिकेशन्स, आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स यांचा समावेश होतो. ही माध्यमे पारंपरिक माध्यमांपेक्षा म्हणजेच वृत्तपत्र, रेडिओ, दूरदर्शन यांच्या पेक्षा वेगळी आहेत, कारण ती द्वि-मार्गी संवादाला प्रोत्साहन देतात आणि वापरकर्त्यांना माहिती केवळ मिळवता येत नाही, तर ती स्वतः तयार करण्याची आणि शेअर करण्याची संधीही मिळते. त्यामुळे डिजिटल माध्यमावर गल्ली पासुन दिल्ली पर्यंत आणि गावखेड्यापासुन आंतराळापर्यंत सर्व प्रकारचा सकारात्मक आणि नकारात्म आशय डिजिटल माध्यम वापरकर्ता अपलोड करत आहे. त्याचा परिणाम भारतीय राज्यघटनेतील भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर झालेला दिसत आहे. भारतीय लोकशाहीत अनेक वेळा संसदेने आणि केंद्र, राज्य सरकारने माध्यमांच्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा प्रयत्न केला मात्र न्यायालयाने माध्यमांचे भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला कायमच सकारात्मक प्रतिसाद आणि निर्णय दिला आहे.

भारतीय राज्य घटनेतील स्वातंत्र्याचा अधिकार)कलम 19)

भारतीय राज्यघटनेच्या कलम 19 नुसार भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, भारतीय राज्यघटनेने नागरिकांना बहला केलेले भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. तेच माध्यमाचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे अमेरिकेतील माध्यम स्वातंत्र्याप्रमाणे भारतीय माध्यमांनी वेगळे माध्यम स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता नाही. भारतीय संविधानातील कलम 19 (1) हे सहा मूलभूत स्वातंत्र्यांची हमी देते, ज्यात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा समावेश आहे. हे स्वातंत्र्य भारतीय नागरिकांना आपले विचार आणि मते कोणत्याही भीतीशिवाय व्यक्त करण्याचा अधिकार प्रदान करते. 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या शब्दाची सर्वोच्च न्यायालयाने व्यापक व्याख्या केली आहे. याचा अर्थ केवळ तोंडी किंवा लिखित माध्यमांद्वारे विचार व्यक्त करणे एवढाच नाही, तर यात चित्रे, खुणा, चिन्हे आणि ऑडिओ-व्हिज्युअल साधनांसारख्य कोणत्याही दृश्य स्वरूपातील प्रतिनिधित्वाचा समावेश होतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये कोणत्याही माध्यमातून विचार आणि माहिती शोधणे, मिळवणे आणि इतरांपर्यंत पोहोचवणे या स्वातंत्र्याचाही समावेश आहे. यामुळेच प्रेसचे स्वातंत्र्य आणि डिजिटल माध्यमातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे देखील या कलमाच्या कक्षेत येतात.

कलम 19(2) मध्ये आठ प्रमुख निर्बंध:

भारतात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे निरंकुश नाही. राज्यघटना, अनुच्छेद 19(2) द्वारे, या स्वातंत्र्यावर काही वाजवी निर्बंध लादण्याची परवानगी देते. हे निर्बंध व्यक्तीच्या हक्कांचे आणि व्यापक सामाजिक कल्याणाचे संतुलन साधतात.

भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता: याचा उद्देश देशाची एकता आणि अखंडता धोक्यात आणणाऱ्या किंवा फुटीरतेला प्रोत्साहन देणाऱ्या भाषणांवर मर्यादा घालणे आहे.

राज्याची सुरक्षा : हा निर्बंध केवळ राज्याच्या अस्तित्वाला गंभीर धोका निर्माण करणाऱ्या कृत्यांवर लागू होतो, जसे की बंडखोरी किंवा युद्ध. 'रमेश थापर' खटल्यात न्यायालयाने स्पष्ट केल्याप्रमाणे, केवळ सामान्य सार्वजनिक व्यवस्थेचे उल्लंघन हे 'राज्याच्या सुरक्षे'च्या कक्षेत येत नाही.

परदेशी राष्ट्रांशी सौहार्दपूर्ण संबंध: परदेशी राष्ट्रांशी भारताचे संबंध बिघडवणाऱ्या प्रचाराला आळा घालण्यासाठी याचा उपयोग होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

सार्वजनिक सुव्यवस्था : याचा उद्देश सार्वजनिक शांतता आणि सुसंवाद राखणे आहे. 'सार्वजनिक सुसंवाद' राखण्यासाठी या स्वातंत्र्यावर निर्बंध आवश्यक आहेत, असे मानले जाते, अन्यथा काही लोक याचा गैरवापर करू शकतात.

नैतिकता आणि सभ्यता : भारतीय दंड संहितेच्या कलम 292 ते 294 मध्ये अश्लीलता आणि सभ्यतेच्या उल्लंघनावर निर्बंध आहेत.

न्यायालयाचा अवमान : न्यायालयाची प्रतिष्ठा आणि कार्यप्रणालीचे संरक्षण करण्यासाठी हा निर्बंध आवश्यक आहे.

बदनामी : कोणत्याही व्यक्तीची बदनामी करणाऱ्या विधानांवर मर्यादा घालण्याचा अधिकार राज्याला आहे.

गुन्ह्यासाठी चिथावणी: एखाद्या गुन्ह्याला प्रोत्साहन देणाऱ्या भाषणावर निर्बंध लादले जाऊ शकतात.

डिजिटल माध्यमाच्या स्वातत्र्यात सर्वोच्च न्यायालयाची भूमिका:

भारतात डिजिटल माध्यमांची सुरवात झाल्यानंतर नागरिकांचे, पारंपारिक माध्यमांचे आणि डिजीटल माध्यमाचे स्वातंत्र्य यावर वारंवार प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले. डिजिटल माध्यमावरील आशय हा सरकार विरोधात असल्याचे भासवून त्यावर प्रतिबंध घातले जावू लागले. तर अनेक नागरिक स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार असा घेवू लागले. त्यामुळे वारंवार सर्वोच्च न्यायालयासमोर उपस्थित झालेल्या घटल्यांनी भारतीय राज्यघटनेतील भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण आणि विस्तृत दृष्टीकोन बदलत्या काळात स्पष्ट केला आहे. तो पुढील खटल्यामधुन आपणाला दिसुन येतो.

1. श्रेया सिंघल विरुद्ध भारत सरकार)2015):

या निकालाला भारताच्या ऑनलाइन अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा मानले जाते. हा निर्णय माहिती तंत्रज्ञान)खढ(कायदा, 2000 मधील कलम 66 अ च्या घटनात्मक वैधतेशी संबंधित होता. हे कलम 2009 च्या दुरुस्तीद्वारे कायद्यात समाविष्ट केले गेले होते आणि ते संगणक किंवा इतर संवाद साधनांद्वारे गंभीरपणे आक्षेपार्ह किंवा असुविधा, अडथळा, अपमान, दुखापत, द्वेष किंवा दुरावा निर्माण करणारे संदेश पाठवणे हा एक गुन्हा ठरवत होते. या कलमाचा अनेकदा गैरवापर झाल्याचा आरोप होता. उदाहरणार्थ, राजकीय व्यक्तींवर सोशल मीडियाद्वारे टीका केल्याबद्दल अनेक नागरिकांना अटक करण्यात आली होती, ज्यामुळे कायद्याचा दुरुपयोग झाल्याचे दिसून आले. याच पार्श्वभूमीवर, एका कायदा विद्यार्थिनीने आणि अनेक नागरी हक्क गटांनी या कलमाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने, या याचिकेची सुनावणी करताना, कलम 66 अ ला असंवैधानिकरित्या अस्पष्ट आणि अतिव्यापक ठरवून ते रद्द केले. न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले की गंभीरपणे आक्षेपार्ह, असुविधा, किंवा हानिकारक यांसारख्या शब्दांची कोणतीही स्पष्ट व्याख्या नाही. एका व्यक्तीला जे आक्षेपार्ह वाटेल, ते दुसऱ्याला कदाचित आक्षेपार्ह वाटणार नाही. या अस्पष्टतेमुळे, कायदेशीररित्या संरक्षित आणि निरपराध भाषणाचा मोठा भाग देखील या कलमाच्या कक्षेमध्ये येऊ शकतो. न्यायालयाने हे देखील नमूद केले की हा कायदा इतका संदिग्ध आहे की त्याचा वापर व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर 'भय निर्माण करणारा परिणाम' घडवण्यासाठी होऊ शकतो. 'भय निर्माण करणारा परिणाम' या सिद्धांतानुसार, जेव्हा एखादा कायदा इतका अस्पष्ट किंवा कठोर असतो की तो नागरिकांना कायदेशीररित्या सुरक्षित भाषण व्यक्त करण्यापासूनही परावृत्त करतो, तेव्हा अशा कायद्याला अमान्य ठरवले जाऊ शकते. डिजिटल स्वातंत्र्यासाठी हा निकाल अत्यंत महत्त्वाचा ठरला. या निर्णयाने ऑनलाइन अभिव्यक्तीसाठी एक मजबूत कायदेशीर पाया स्थापित केला आणि सरकारला अस्पष्ट किंवा मनमानी कायद्यांद्वारे डिजिटल भाषणावर नियंत्रण ठेवण्यापासून रोखले. या निकालाने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर 'वाजवी निर्बंध' लादण्यासाठी आवश्यक असलेल्या स्पष्टतेवर भर दिला. न्यायालयाने कलम 66 अ रद्द केले असले तरी, त्यांनी माहिती तंत्रज्ञान कायद्यातील इतर दोन तरतुदी कायम ठेवल्या: कलम 79 (ऑनलाइन मध्यस्थांची जबाबदारी(आणि कलम 69 अ)वेबसाइट ब्लॉक करणे(. कलम 79 च्या बाबतीत, न्यायालयाने एक अतिरिक्त संरक्षण दिले, त्यानुसार ऑनलाइन मध्यस्थांना केवळ न्यायालयाच्या आदेशानंतरच किंवा तात्काळ बेकायदेशीर कृतीची सरकारी सूचना मिळाल्यानंतरच सामग्री काढून टाकणे बंधनकारक असेल. या निर्णयामुळे डिजिटल माध्यमांवरील अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी एक संतुलित आणि सुस्पष्ट चौकट तयार झाली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

2. न्यायमूर्ती के. एस. पुट्टास्वामी विरुद्ध भारत सरकार)2017): गोपनीयतेच्या अधिकाराची घटनात्मक घोषणा

या ऐतिहासिक निकालाने भारतीय कायद्यामध्ये गोपनीयतेच्या संकल्पनेला मूलभूत मानवी हक्काचा दर्जा प्रदान केला. या प्रकरणाचा संदर्भ आधार योजनेच्या घटनात्मक वैधतेशी होता, परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने या योजनेच्या पलीकडे जाऊन गोपनीयतेचा अधिकार हा संविधानाच्या कलम 21 (जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार(चा एक अविभाज्य भाग असल्याचे एकमताने घोषित केले. या निर्णयाने 1954 आणि 1962 मध्ये दिलेल्या पूर्वीच्या दोन निकालांना रद्द केले, ज्यात गोपनीयतेला मूलभूत अधिकार मानले नव्हते. या निकालाने गोपनीयता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांच्यातील संबंधावर एक नवीन आणि सखोल विचारसरणी मांडली. न्यायालयाने असे स्पष्ट केले की, गोपनीयतेचे संरक्षण झाल्याशिवाय व्यक्तीला आपले विचार आणि मते मुक्तपणे व्यक्त करणे शक्य नाही. सरकारी पाळत ठेवणे किंवा गोपनीयतेवर सतत होणारी अतिक्रमणे नागरिकांच्या भाषणावर 'भय निर्माण करणारा परिणाम' निर्माण करू शकतात. जेव्हा एखाद्या व्यक्तीला असे वाटू लागते की तिच्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन संवादांवर सतत लक्ष ठेवले जात आहे, तेव्हा ती स्व-सेंसरशिप करू लागते, ज्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूळ उद्देशच बाधित होतो. या निकालाने गोपनीयता हा केवळ वैयक्तिक खाजगी बाबींशी संबंधित अधिकार नसून, तो लोकशाही मूल्यांचे रक्षण करणारा एक अनिवार्य घटक असल्याचे स्पष्ट केले.

3. मनोहर लाल शर्मा विरुद्ध भारत सरकार)2021): पाळत ठेवणे आणि पारदर्शकतेची कसोटी

पुट्टास्वामी निकालाने स्थापित केलेल्या गोपनीयतेच्या सिद्धांताची खरी कसोटी पेगॅसस स्पायवेअर प्रकरणातून लागली. या प्रकरणात, अनेक पत्रकार, कार्यकर्ते, आणि राजकीय व्यक्तींवर पेगॅसस स्पायवेअरद्वारे पाळत ठेवण्यात आल्याचे आरोप झाले. याचिकाकर्त्यांनी असा दावा केला की ही पाळत ठेवणे गोपनीयतेच्या)कलम 21) आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या)कलम 19(1)(अ((अधिकारांचे थेट उल्लंघन आहे. सरकारने या आरोपांना राष्ट्रीय सुरक्षा या मुद्द्यावर आधारित एक अस्पष्ट प्रतिज्ञापत्र सादर करून उत्तर दिले आणि या विषयावर सविस्तर माहिती देण्यास नकार दिला. सरकारने असा युक्तिवाद केला की राष्ट्रीय सुरक्षेसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर सार्वजनिक चर्चा होऊ शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने सरकारचा हा युक्तिवाद स्वीकारला नाही. न्यायालयाने म्हटले की, सरकारने राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला असला तरी, ते मूलभूत हक्कांचे उल्लंघन करताना पूर्णपणे अपारदर्शक राहू शकत नाहीत. कोणत्याही परिस्थितीत, गोपनीयतेवर लादलेली मर्यादा कायद्यानुसार, आवश्यक आणि प्रमाणात असावी. न्यायालयाने असे निरीक्षण केले की, सरकारचा 'वजा' आणि 'अस्पष्ट' दावा मूलभूत हक्कांच्या उल्लंघनाचे औचित्य सिद्ध करण्यासाठी पुरेसा नाही. लोकशाहीमध्ये, सरकारला त्यांच्या कृतींचे स्पष्टीकरण द्यावे लागते आणि केवळ राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली उत्तरदायित्वापासून सुटका मिळत नाही. त्यामुळे, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी, न्यायालयाने एका स्वतंत्र तांत्रिक समितीची स्थापना केली, ज्याचे नेतृत्व सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. व्ही. रवींद्रन करत होते. या समितीला पेगॅससचा वापर केला गेला आहे का आणि तो कायदेशीर होता का, याची चौकशी करण्याचे काम सोपवण्यात आले. या प्रकरणात अनेक महत्त्वपूर्ण बाबी समोर आल्या. गोपनीयतेचे उल्लंघन, विशेषतः पाळत ठेवणे, व्यक्तींना भीतीमुळे आपले विचार व्यक्त करण्यापासून परावृत्त करू शकते. ही भीती, म्हणजेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर थेट परिणाम करते. त्यामुळे, गोपनीयता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य एकमेकांशी अविभाज्यपणे जोडलेले आहेत हे स्पष्ट झाले. या निकालाने सरकारला राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली मूलभूत हक्कांवर मनमानी मर्यादा घालण्यापासून रोखले, ज्यामुळे सरकारच्या कृतींवर न्यायिक तपासणीची आवश्यकता अधोरेखित झाली. न्यायालयाने येथे एक सक्रिय भूमिका घेतली. जेव्हा सरकार पारदर्शकता दाखवण्यास नकार देते, तेव्हा न्यायव्यवस्था स्वतःच तपासणी यंत्रणा स्थापन करून मूलभूत हक्कांचे रक्षण करू शकते. हे प्रकरण लोकशाहीत मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी न्यायपालिकेची महत्त्वाची जबाबदारी दर्शवते, विशेषतः जेव्हा सरकारकडून उत्तरदायित्वाची कमतरता दिसून येते.

4. अनुराधा भसीन विरुद्ध भारत सरकार)2020): इंटरनेट बंद करण्याच्या अधिकारावर मर्यादा

कलम 370 रद्द केल्यावर, जम्मू आणि काश्मीर प्रशासनाने इंटरनेट आणि मोबाईल सेवा अनिश्चित काळासाठी बंद केल्या. पत्रकार अनुराधा भसीन यांनी या बंदीला आव्हान दिले, कारण यामुळे त्यांचे वृत्तपत्र प्रकाशित करणे आणि त्यांची उपजीविका चालवणे अशक्य झाले होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

या प्रकरणात याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की इंटरनेट बंद केल्याने त्यांचे भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे)कलम 19(1)(अ((तसेच व्यापार आणि व्यवसायाचे)कलम 19(1)(ग((मूलभूत हक्क बाधित झाले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने, या प्रकरणात ऐतिहासिक निर्णय देताना, असे म्हटले की इंटरनेट बंदीचा आदेश अनिश्चित काळासाठी असू शकत नाही. प्रत्येक बंदीच्या आदेशाला 'आवश्यकता' आणि 'प्रमाणबद्धता' या दोन कसोट्यांवर तपासले पाहिजे. याचा अर्थ असा की, इंटरनेट बंद करण्याचा निर्णय केवळ तेव्हाच घेतला जाऊ शकतो जेव्हा तो सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी पूर्णपणे आवश्यक असेल, आणि सरकारने त्या उद्दिष्टासाठी कमीत कमी प्रतिबंधात्मक मार्ग अवलंबला आहे हे सिद्ध करावे लागेल. या निकालाने इंटरनेटचा वापर मूलभूत अधिकारांचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून स्वीकारले. न्यायालयाने इंटरनेटला थेट मूलभूत अधिकार घोषित केले नाही , परंतु हे स्पष्ट केले की इंटरनेट हे भाषण, व्यवसाय, आणि उपजीविकेच्या अधिकारांसाठी एक अनिवार्य माध्यम बनले आहे. या निकालाने एक महत्त्वाचा सिद्धांत स्थापित केला की इंटरनेटवर लादलेले कोणतेही निर्बंध हे कलम 19(2) मध्ये नमूद केलेल्या 'वाजवी निर्बंधां'च्या कसोटीवर तपासले जातील. या निकालाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे न्यायालयाने इंटरनेट बंद करण्याचे सर्व आदेश सार्वजनिक करण्याचे बंधनकारक केले. हा निर्णय सरकारने मनमानी आणि गुप्तपणे काम करू नये यासाठी महत्त्वपूर्ण आहे. कोणताही आदेश सार्वजनिक केल्याने त्याचे न्यायिक पुनरावलोकन करणे शक्य होते, ज्यामुळे नागरिक आणि संस्थांना त्याचे कायदेशीर आव्हान देणे सोपे होते.

5. विनोद दुआ विरुद्ध भारत सरकार)2021): राजद्रोहाचे कलम आणि पत्रकारितेचे स्वातंत्र्य

पत्रकार विनोद दुआ यांच्यावर एका यूट्यूब व्हिडिओमध्ये सरकारवर टीका केल्याबद्दल राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांच्यावर आरोप होता की त्यांनी खोटी माहिती पसरवून सार्वजनिक अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विनोद दुआ यांनी आपल्यावर लावलेले आरोप फेटाळून लावले आणि दावा केला की त्यांनी केवळ पत्रकार म्हणून सरकारवर कायदेशीर टीका केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने, या प्रकरणात, पत्रकारितेच्या स्वातंत्र्याची बाजू घेतली. न्यायालयाने एफआयआर रद्द केला आणि स्पष्ट केले की एखाद्या नागरिकाला सरकारवर टीका करण्याचा किंवा सरकारबद्दल असहमती व्यक्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे, जोपर्यंत ती टीका हिंसा किंवा सार्वजनिक अशांतता भडकवत नाही. न्यायालयाने नमूद केले की, केवळ कठोर किंवा अप्रिय टीका राजद्रोहाच्या कायद्याच्या कक्षेमध्ये येत नाही. या निर्णयाने पत्रकारितेला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून संरक्षण दिले आणि राजद्रोहाच्या कायद्याचा उपयोग केवळ गंभीर गुन्ह्यांसाठीच मर्यादित ठेवला. न्यायालयाने पत्रकारांसाठी विशेष समिती स्थापन करण्याची विनंती फेटाळून लावली, कारण हे काम कायदेमंडळाचे आहे, न्यायालयाचे नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. हा निकाल पत्रकारांना सरकारच्या धोरणांवर मुक्तपणे बोलण्याचा अधिकार आहे, आणि राजद्रोहासारख्या कायद्यांचा गैरवापर करून त्यांना शांत करण्याचा प्रयत्न हा अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर नकारात्मक परिणाम करतो.

6. सुब्रमण्यम स्वामी विरुद्ध भारत सरकार)2016): बदनामी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची मर्यादा

या प्रकरणात, फौजदारी बदनामी कायदे)कलम 499 आणि 500, भारतीय दंड संहिता(अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करतात का, हा प्रश्न उपस्थित झाला. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की हे कायदे ऑनलाइन आणि ऑफलाइन भाषणावर मर्यादा आणतात आणि त्यामुळे ते असंवैधानिक आहेत. सर्वोच्च न्यायालयाने, या प्रकरणात, या कायद्यांची वैधता कायम ठेवली. न्यायालयाने म्हटले की, कलम 19(1)(अ(अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याप्रमाणेच, कलम 21 (जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य(अंतर्गत प्रतिष्ठेचा अधिकार देखील मूलभूत आहे. न्यायालयाने हे दोन्ही अधिकार एकमेकांशी संतुलित ठेवण्याचा प्रयत्न केला आणि फौजदारी बदनामी कायद्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर 'वाजवी निर्बंध' मानले. न्यायालयाने स्पष्ट केले की कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्याची प्रतिष्ठा हानी पोहोचवण्याचा अधिकार नाही आणि सत्याचे विधान फक्त तेव्हाच संरक्षणयोग्य आहे जेव्हा ते 'जनहितार्थ' असेल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निष्कर्ष

1. भारतीय संविधानातील भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रवास एका स्थिर कायदेशीर तरतुदीतून एका जिवंत, गतिमान अधिकारात बदललेला आहे. या प्रवासात संविधान सभेच्या वादविवादांनी पाया रचला, तर न्यायव्यवस्थेच्या महत्त्वपूर्ण निकालांनी या अधिकाराला समकालीन गरजांनुसार आकार दिला.
2. न्यायालयाने 'प्रेस स्वातंत्र्य' , 'माहितीचा अधिकार' आणि 'इंटरनेटचा अधिकार' यांसारख्या नविन अधिकारांना मान्यता देऊन या स्वातंत्र्याची व्याप्ती वाढवली आहे.
3. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि त्यावर असलेले 'वाजवी निर्बंध' यांच्यातील समतोल राखणे हे भारतासाठी एक मोठे आणि सततचे आव्हान आहे. 'राजद्रोह' किंवा द्वेषपूर्ण भाषणांना प्रतिबंध घालणारे कायदे, त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याने, वादग्रस्त ठरत आहेत. नवीन कायद्यांमध्ये, सरकारने जुन्या कायद्यांना बदलले असले तरी, 'अस्पष्ट' परिभाषांमुळे भविष्यातही या कायद्यांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
4. इंटरनेटवरील स्वातंत्र्यालाही वाजवी निर्बंध असू शकतात, परंतु ते मनमानी किंवा अतिरेकी नसावेत. भारतात सोशल मीडिया कंपन्यांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवर अपलोड केलेल्या आशयासाठी जबाबदार धरण्याचा एक आक्रमक दृष्टीकोन आहे. काही नवीन नियमांनुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला भारतीय कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या पोस्ट काढण्याचे आदेश दिले आहेत, अन्यथा त्यांना त्या सामग्रीसाठी जबाबदार धरले जाऊ शकते.
5. डिजिटल युगात, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक सुव्यवस्था यांमध्ये समतोल राखणे हे एक मोठे आव्हान आहे. सायबर स्पेसमध्येही संविधानाने दिलेले अधिकार अबाधित राहतील, यासाठी केंद्र सरकारने कायदे आणि धोरणे विकसित करणे आवश्यक आहे, असे न्यायव्यवस्थेच्या निर्णयांतून दिसून येते.

समारोप

भारतीय संविधानाला 75 वर्षे पुर्ण होत असताना राज्यघटनेतील कलम 19(1) अ मधिल भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे डिजिटल माध्यमाच्या युगात देखिल सक्षमपणे टिकुन आहे. देशातील नागरिकांच्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण सर्वोच्च न्यायालयाने करण्यात महत्वाची भुमीका बजावली आहे. मात्र डिजिटल माध्यमाच्या जगतामध्ये बदलती आव्हाने लक्षात घेवून अधिक संरक्षणाची गरज असल्याचे दिसते. नवीन कायदे तयार करताना 'वाजवीपणा' आणि 'प्रमाणात्मकता' या न्यायिक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. द्वेषपूर्ण भाषण आणि डिजिटल माध्यमांचा गैरवापरासारख्या समकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी कायद्यांची स्पष्ट आणि काटेकोर व्याख्या करणे आवश्यक आहे, जेणेकरून मुक्त भाषणावर 'थंडगार परिणाम' होणार नाही. न्यायव्यवस्थेने आपल्या 'सक्रिय' भूमिकेद्वारे भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे संरक्षण करत राहणे आवश्यक आहे. विशेषतः कार्यकारी मंडळाकडून होणाऱ्या गैरवापराच्या विरोधात हे महत्त्वाचे आहे. त्याच बरोबर डिजिटल माध्यमात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर होत असल्यास त्यावर कठोर निर्बंध घालने आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये टीका आणि असहमतीचे महत्त्व ओळखून, सरकारने मतभेद व्यक्त करणाऱ्यांवर दडपशाही करण्याचे प्रयत्न टाळले पाहिजेत. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे खरे मूल्य हे केवळ शांततापूर्ण काळातच नव्हे, तर तणावपूर्ण परिस्थितीतही ते टिकून राहण्यावर अवलंबून असते.

संदर्भ ग्रंथ

1. डॉ. वि. ल. धारुरकर, जनसंवाद सिंध्दांत, चैतन्य प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2008
2. डोळे जयदेव, समाचार, लोकवाडमय गृह मुंबई, प्रथम आवृत्ती, 2006
3. दळवी जयमती, भारतातील प्रसार माध्यमे, डायमंड प्रमाशन पुणे, 2008
4. डॉ. पवार सुधाकर, वृत्तपत्र व्यावसाय- काल आणि आज, औरंगाबाद
5. डॉ. वि.ल.धारुरकर, माध्यम दृष्टीक्षेप, चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद, 1997
6. पाध्ये प्रभाकर, पत्रकारितेची मुलतत्वे, मेहता प्रकाशन, पुणे, मार्च 2014
7. लेले रा.क, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती 2009
8. डॉ. अब्दुल कलाम ए.पी.जे आणि राजन वाय.एस. भारत 2020, राजहंस प्रकाशन 2008
9. डॉ. जोशी सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद 2003

10. डॉ. भोळे भा.ल., भारतीय शासन आणि राजकारण, नागपुर 2000
11. https://www.loksatta.com/mumbai/what-is-section-66a-of-i-t-act-1084810/
12. https://www.thehindu.com/opinion/editorial/imagined-righteousness-on-conduct-on-social-media/article69979599.ece
13. https://www.epw.in/privacy-after-puttaswamy
14. https://www.iltb.net/2016/05/subramanian-swamy-v-union-of-india/
15. https://lawarticle.in/manohar-lal-sharma-v-union-of-india-2022-pegasus-spyware-case/
16. https://nluassam.ac.in/docs/Journals/NLUALPR/Volume-7/Article-8.pdf

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संघराज्यामधील नवे प्रवाह आणि समस्या

संतोष सुरेश पाटील
शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर
Email: suntosh.patil.5@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170929
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 149-152
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवारा :-

स्वतंत्र भारताने १५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्लंडच्या धर्तीवर स्वतंत्र संघराज्य पद्धतीचा अवलंब केला . तथापि ब्रिटिश भारतात येण्या अगोदर म्हणजे अगदी प्राचीन काळापासून भारतीय गणराज्यामध्ये उदा . वज्जी –वृज्जी ,शाक्य ,मालव इत्यादी गणराज्यामध्ये संघराज्य पद्धती अस्तित्वात असल्याचे उल्लेख मिळतात . संघराज्य म्हणजे अशी शासनप्रणाली की ,जेथे एकाच भूभावर दोन सरकार राज्ये करत असतात . प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय संघराज्य ,संघराज्याचे स्वरूप ,संघराज्यामध्ये १९९० नंतर आलेले नवीन प्रवाह आणि त्यामधून संघराज्यपुढे आलेल्या नवीन समस्या म्हणजेच बेकारी ,दारिद्र्य ,बेरोजगारी ,लोकसंख्यावाढ ,आर्थिक विषमता ,प्रादेशिकवाद फुटीरतवाद इत्यादींचा आढावा घेण्यात आलेला आहे .

मुख्यशब्द: *भारतीय संघराज्य, संघराज्य संकल्पना, संघराज्याचे स्वरूप, संघराज्याचा इतिहास, नवीन प्रवाह, केंद्र आणि राज्य संबंध, प्रादेशिक स्वायत्तता, उदारीकरणाचे नवे आर्थिक धोरण, भाषिक आणि सांस्कृतिक आधार.*

प्रस्तावना :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत इंगलडच्या गुलाममगिरितून मुक्त होऊन स्वतंत्र झाला आणि भारतामध्ये स्वतंत्र अशा संविधानाची निर्मिती झाली. जेंव्हा संविधानाची निर्मिती झाली त्यावेळी भारताने इंग्लंडच्या धर्तीवर संघराज्याची संकल्पना स्वीकारली .कारण भारताचे भौगोलिक क्षेत्रफळ प्रचंड असून आकारमांच्या दृष्टीने भारताचा जगात सातवा क्रमांक लागतो .भारतात भाषिक, प्रादेशिक ,सांस्कृतिक ,आणि धार्मिक विविधता आहे . त्यामुळे भारताला एक राष्ट्रीयत्वाच्या धाग्यात बांधून ठेवण्यासाठी संघराज्य शासन प्रणाली स्वीकारणे आवश्यक होते . तथापि स्वतंत्रपूर्व भारतात ब्रिटिशांनी १९०९ चा मोर्लेमिंटो सुधारणा कायदा ,१९१९ चा मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदा ,आणि १९३५ चा भारत सरकार कायदा हे कायदे लागू करून संघराज्य पद्धतीला सुरवात केलेली होती .त्यामध्ये स्वातंत्रोत्तर काळात अनेक बदल होऊन नवे प्रवाह निर्माण झाले .

संशोधनाची उदिष्ठ्ये :

१) संघराज्याची संकल्पना समजून घेणे .
२) संघराज्याच्या स्वरूपाचा अभ्यास करणे
३) भारतीय संघराज्यामधील नवीन प्रवाहांचा अभ्यास करणे .
४) भारतीय संघराज्यापुढे असलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

अभ्यास पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुस्तके ,वृत्तपत्रे ,लेख ,संकेतस्थळे इत्यादी दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आला असून पुराव्यांची सत्यता पडताळून राजकीय दृष्टिकोणातून विश्लेषणात्मक मांडणी करण्यात आलेली आहे .

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
संतोष सुरेश पाटील ,शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर

How to cite this article:
पाटील, . संतोष . सुरेश . (2025). भारतीय संघराज्यामधील नवे प्रवाह आणि समस्या. Journal of Research & Development, 17(9(IV)), 149–152. https://doi.org/10.5281/zenodo.17720372

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17720372
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संघराज्य संकल्पना :

"संघराज्य" हा शब्द लॅटिन शब्द "foedus" पासून आला आहे. ज्याचा अर्थ "लीग" आणि "करार" दोन्ही आहे . पहिले संघराज्यीय संविधान अमेरिकेचे असल्याने ,भविष्यातील संविधानाची तुलना त्या संघराज्यीय आहेत की नाहीत हे निश्चित करण्यासाठी केली गेली ."१

संघराज्य म्हणजे काय ?

"संघराज्य ही एक अशी राजकीय व्यवस्था आहे ज्याद्वारे दोन किंवा अधिक सरकारे एकाच भौगोलिक क्षेत्रावर अधिकार सामायिक करतात .जगातील बहुतेक सर्व लोकशाही देश संघराज्य प्रणालीत आहेत . ज्यामध्ये कॅनडा ,अमेरिका ,ऑस्ट्रेलिया ,भारत आणि अर्जेंटिना या देशांचा समावेश होतो . तसेच युरोपियन युनियन मध्ये देखील संघराज्य प्रणाली अस्तित्वात आहे."२

संघराज्याचा इतिहास :

पौरात्य आणि पाश्चिमात्य जगातील संघराज्याचा इतिहास फार प्राचीन आहे . भारतात तर वेदोत्तर काळापासून गुप्त काळापर्यन्त संघराज्याचे अस्तित्व दिसून येते . याची माहिती बौद्ध ,जैन , महाभारत पाणिनीचे व्याकरण कौटिलयाचे अर्थशास्त्र ,परकीय वृतान्त इत्यादी ग्रंथातून वृज्जी ,पंचगण ,सप्तगण क्षुद्रक ,मालव शिबी लिच्छवी –विदेह ही संघराज्ये असल्याचा उल्लेख मिळतो . पाश्चिमात्य देशात ख्रिस्त पूर्व तिसऱ्या शतकात ग्रीसमध्ये ॲकीयन लीग ,डेलियन संघ यासरख्या नावानी ओळखल्या जाणाऱ्या सैलसर सांघीय व्यवस्था अस्तित्वात होत्या . संरक्षण हा त्यामागील एकमेव उद्देश होता . मध्ययुगातही काही नगरराज्यांचे संघ अस्तित्वात होते . आधुनिक काळातील या पद्धतीचा प्रारंभ तेराव्या शतकात स्वित्झर्लंडमधील तीन कँटॉन्सनी एकत्र येऊन जो राज्यसंघ स्थापन झाला असे मानले जाते .मध्ययुगातील युरोपातील साम्राज्ये व संरमजमशाही व्यवस्था यांचा उल्लेखदेखील आधुनिक संघराज्य पद्धतीचे पूर्वावतार असा केला जातो पण ते तितकेसे योग्य नाही . अगदी अलीकडील काळात संघराज्य पद्धतीचा प्रारंभ अठराव्या शतकात स्थापन झालेल्या अमेरिकेची संयुक्त संस्थाने या संघराज्यपासून होतो ,असे मानण्यात येते . भारताव्यतिरिक्त अमेरिकेची संयुक्त संस्थाने ,ऑस्ट्रेलिया ,कॅनडा स्वित्झर्लंड,युगोस्लाव्हिया,मेक्सिको ,नायजेरिया इ . देशात संघराज्य पद्धती अस्तित्वात आहे. "३

भारतीय संघराज्यामधील नवे प्रवाह :

संघराज्यामधील नवे प्रवाह म्हणजे संघराज्य प्रणालीत होणारे बदल होय . हे बदल केंद्र आणि राज्यामधील सत्तेची विभागणी ,त्यांची स्वायतता ,तसेच राज्यांच्या गरजा आणि अपेक्षाशी संबंधित असतात ,जसे की प्रादेशिक स्वायत्ततेची मागणी किंवा केंद्राच्या धोरणात राज्याचा सहभाग इ . भारताचे संघराज्य हे पूर्णता: संघराज्यीय नसून त्यामध्ये केंद्र सरकारचे अधिकार वाढवणाऱ्या आणीबाणीसारख्या अनेक तरतुदी आहेत . त्यामुळे ते अर्ध संघराज्यीय आणि अर्ध एकात्मिक संघराज्य आहे असे घटनेचा अभ्यास करणाऱ्या आणि संघराज्याचा अभ्यास करणाऱ्या विचारवंतांचे मत आहे . पण १९९० नंतर सामाजिक ,राजकीय आणि आर्थिक बदलामुळे संघराज्याचे स्वरूप बदलत असताना दिसून येते . त्यामुळे भारतीय संघराज्याचे स्वरूप जरी अर्ध संघराज्यीय आहे असे म्हटले जात असले तरी संघ राष्ट्राचे मूल स्वरूप संघ राज्याचेच आहे आणि केवळ अपवादात्मक परिस्थिती निर्माण होते तेंव्हाच संघराज्याचा लोप होतो .

१९९० नंतर भारतीय संघराज्यामध्ये अनेक नवीन प्रवाह आलेले दिसून येतात ते पुढील प्रमाणे -

१ . भाषिक आधाराऐवजी सांस्कृतिक आधार :

भाषिक आधारावर भारतात राज्यांची फेररचना करण्यात आली होती . पण आता भाषिक आधाराऐवजी सांस्कृतिक आधार जास्त महत्वाचा ठरत असून त्यामुळे अनेक राज्यांच्या फेररचनेची मागणी होताना दिसत आहे .

२. राष्ट्र पातळीवरील पक्षांचा ऱ्हास :

भारतात राष्ट्रीय पक्षांचा ऱ्हास होत असून काँग्रेस व भाजप या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी प्रादेशिक पक्षांच्या व इतर लहान पक्षांच्या पाठींब्यावर अवलंबून रहावे लागत आहे . त्यामुळे केंद्रातील सरकारला सहमतीच्या आधारावर राज्य करणे अपरिहार्य ठरले आहे .

३ . राष्ट्रपती शासन लागू करणे केंद्राला अशक्य :

घटनेच्या ३५६ कलम वापरावर आजही बंधने आहेत या बांधनामुळे राज्यास राष्ट्रपती शासन लागू करणे अशक्य आहे .

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

४ . उदारीकरणाचे नवे आर्थिक धोरण :

उदारीकरणाच्या नव्या आर्थिक धोरणामुळे केंद्राचे अधिकार कमी होत असून राज्यांना काम करण्यास जास्त वाव मिळत आहे . त्यामुळे आपल्याला जास्त अधिकार मिळावेत अशी राज्यांची अपेक्षा आहे .

१९५०-६० च्या दशकात भारतात भाषेच्या आधारावर प्रांत रचना करावी म्हणून आंध्र ,कर्नाटक ,गुजरात या राज्यात व्यापक चळवळी झाल्या. त्यामुळे १९६० पर्यन्त भाषिक आधारावर राज्यांची स्थापना झाली . तथापि भाषा या आधार घटकास संस्कृतीच्या अलगपणाच्या आधारे आव्हान मिळण्यास सुरवात झाली . त्यामुळे १९७० च्या दशकापासून सांस्कृतिक व वांशिक अस्मितेच्या जोरावर छोट्या छोट्या विभागांनी आसमपासून वेगळे राज्य मागण्याची मागणी केली . उदा नागालँड ,मणिपूर ,त्रिपुरा ,अरुणाचल प्रदेश ,मिजोराम व मेघालय) ही सर्व राज्ये आसमचा भाग नव्हती (ती राज्ये एक वेगळा सांस्कृतिक व वांशिक घटक म्हणून उदयाला आलेली दिसून येतात ." ४

भारतीय संघराज्यापुढील समस्या:

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर तीन वर्षे कष्ट करून आपल्या संस्थापक राष्ट्र नेत्यानी संविधांनाची स्थापना केली . भारताने इंगलडच्या धर्तीवर संघराज्य पद्धती स्वीकारली असली तरी अजूनही भारतीय संघराज्यापुढे अनेक समस्या आहेत त्या पुढीलप्रमाणे –

1. महिला व बाल सुरक्षेची समस्या:

स्त्री पुरुष समानता ही आपल्या संविधानाची मुख्य धार आहे . सरकारने महिला सुरक्षा ,बाल विकास यासाठी अनेक कडक कायदे बनवले ,परंतू कायद्याचे रक्षकच महिलांची सुरक्षा धोक्यात आणत आहेत . ज्यांच्यावर अनाथ,शोषित बालकांना आधार देण्याचे ,सुधारण्याचे दायित्व ,त्यांच्याच हाताखाली आपली मुले सुरक्षित नाहीत .

2. आर्थिक समस्या :

भारतातील सर्वात मोठी समस्या म्हणजे आर्थिक समस्या होय कारण परिस्थिति अनियमित गतीने वाढत आहे तोपर्यंत भारतीय जीवनाच्या स्तराचा विकास पूर्णता: संभव नाही . आपण लोकसंख्येवर नियंत्रण राखू शकलो नाही तर समस्यांवरवर समाधान न निघता उलट ती वाढतच जाते . शिक्षणाचा साधनाच्या रूपात राष्ट्रीय विकासाचा प्रयोग करण्यात आपण पूर्ण निष्फळ ठरलो आहोत

3. गरीबी आणि बेकारी :

लोकसंख्या झपाट्याने वाढत असली तरी त्या लोकसंख्येला लागणारा रोजगार वाढताना दिसत नाही त्यामुळे स्वातंत्र्यानंतर आजही आपल्या देशाला गरीबी आणि बेकारीने ग्रासलेले दिसत आहे .

4. फुटीरतावाद:

आपले गणतंत्र समानतेचा पुरस्कार करीत असले तरी वास्तविक रूपात जाती धर्माच्या दलदलीत रुतले आहे . बाह्य शत्रूच्या जोडीला अंतर्गत शत्रूंची संख्या झपाट्याने वाढत आहे .

5. प्रादेशिकवाद :

प्रादेशिकतेची भावना देशाच्या अखंडतेच्या मनावर घाव घालते . जात धर्म,वर्ग ,भाषा आदींच्या कारणामुळे अराजक माजवणाऱ्यांच्या हातात एक नवीन शस्त्र मिळाले आहे .

6. ज्ञानी आणि चारित्र्यवान लोक राजकारणापासून दूर :

आपल्या देशाची सर्वात मोठी दुर्भाग्यपूर्ण समस्या म्हणजे जे लोक पात्र आहेत ,ज्यांना दूरदृष्टि आहे जे ज्ञानी तथा चारित्र्यवान आहेत. ते राजकारणापासून दूर असून सध्याच्या अंधकारमय राजकीय वातावरणात त्यांची निवडून येण्याची शक्यता नगण्यच आहे .

निष्कर्ष :

एकंदरीत भारतीय संसदीय पद्धतीमधील अनेक नवीन प्रवाहांचा अभ्यास करता असे दिसून येते की १९९० नंतर भारतीय संसदीय पद्धतीमध्ये अनेक नवे प्रवाह निर्माण झालेले दिसून येतात .या नव्या प्रवाहांमुळे मूळच्या संसदीय पद्धतीच्या स्वरूपात बदल होऊन संसदीय पद्धतीला नवे रूप प्राप्त झाले आहे . संसदीय पद्धतीमध्ये अनेक बदल घडून त्याचे स्वरूप नव्याने निर्माण झाले असले तरी या संसदीय पद्धतीमध्ये दारिद्र्य ,बेरोजगारी आर्थिक विषमता प्रादेशिकवाद फुटीरतावाद यासारख्या समस्याही निर्माण झाल्या आहेत आणि त्या सर्व समस्या सोडवणे भारतासाठी एक आव्हान देखील निर्माण झाले आहे .

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भ :

1. .https://www.lawctopus.com/clataloge/clat-pg/federalism-in-india/
2. https:/www.historyonthenet.com
3. https:/vishwkosh.marathi.gov.in/34037/
4. https://www.sudhark.in (online newspaper)
5. https://navprabha .com./

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास

डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
आझाद महाविद्यालय, औसा जि. लातूर
Email: dilipkumarkshirsagar321@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170930
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 153-159
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

भारतीय संविधान हे राष्ट्राच्या शासन प्रणालीचे कणा असून ते भारताच्या लोकशाही, सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेचे मूलभूत अधिष्ठान आहे. 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आलेल्या भारतीय संविधानाला आज 75 वर्षे पूर्ण होत असताना या घटनात्मक प्रवासाने भारताला एक दृढ, लोकशाही आणि प्रगत राष्ट्र म्हणून ओळख निर्माण करून दिली आहे. भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया ही ऐतिहासिक, राजकीय आणि सामाजिक घडामोडींच्या परिणामातून साकारलेली आहे. 1946 मध्ये गठित घटनासमितीने जवळपास तीन वर्षांच्या कालावधीत संविधान तयार केले, ज्यामध्ये ब्रिटिश राजवटीचा कायदेशीर वारसा, स्वातंत्र्यलढ्याचा आत्मा आणि भारतीय सांस्कृतिक मूल्ये या सर्वांचा समावेश होता. संविधान सभेच्या कार्यात पंडित नेहरू, सरदार पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर राष्ट्रपुरुषांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. संविधानात आदर्शवाद व व्यवहारवाद यांचा संतुलित संगम साधला गेला असून लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि प्रजासत्ताकता ही मूल्ये भारतीय शासनव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहेत. भारतीय संविधानामुळे भारतातील एकात्मता, स्थैर्य आणि सामाजिक न्यायाची संकल्पना आजही दृढपणे टिकून आहे.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, संविधान निर्मितीचा इतिहास, संविधान सभा, कॅबिनेट मिशन योजना, ब्रिटिश राजवट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संविधानाची उद्दिष्टे, भारतीय लोकशाही, राज्यघटना अंमलबजावणी, लोकशाही मूल्ये.*

प्रस्तावना:-

संविधान राष्ट्राचा सर्वोच्च कायदा असतो. प्रत्येक राष्ट्राची राष्ट्रांतर्गत व्यवस्था योग्यप्रकारे राहण्यासाठी आणि राष्ट्राचा शासनकारभार व्यवस्थितपणे सुरू राहण्यासाठी जी तत्वे व नियम तयार केलेले असतात त्याला संविधान किंवा राज्यघटना असे म्हटले जाते. राष्ट्राचा शासनप्रकार कोणताही असो प्रत्येक राष्ट्राला संविधान असणे आवश्यक असते. प्रत्येक राष्ट्राला संविधानाची अनिवार्यता स्पष्ट करताना जर्मन राज्यशास्त्र जॉर्ज जेलींक यांनी म्हटले आहे की, संविधानाशिवाय राष्ट्र असू शकत नाही. संविधानाअभावी राष्ट्रात अराजकता निर्माण होईल. प्रत्येक राष्ट्राच्या संविधानातील तत्वे व नियम त्या-त्या राष्ट्राच्या शासनसंस्थेत संस्थेची रचना निश्चित करतात. शासन संस्थेच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या तीन शासन अंगाचे अधिकार व त्यांच्यातील परस्परसंबंध ठरवून देतात. याशिवाय शासनसंस्था व जनता यांच्यातील संबंध स्पष्ट करतात. संविधान हा राष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि कायदेशीर प्रणालीसाठी तयार केलेला मूलभूत दस्तऐवज असतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर , राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आझाद महाविद्यालय, औसा जि. लातूर

How to cite this article:
क्षीरसागर, . दिलीपकुमार . दगडू . (2025). भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 153–159. https://doi.org/10.5281/zenodo.17720462

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17720462
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संविधानात शासनाचे स्वरूप, शासनाच्या तिन्ही विभागांतील अधिकारांचे विभाजन यासोबतच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्याचे सविस्तर वर्णन केलेले असते. देशातील शासनव्यवस्थेचे नियमन करणे, नागरिकांना हक्क व कायदेशीर सुरक्षा प्रदान करणे, शासनाचे अधिकार आणि जबाबदाऱ्या ठरविणे, समाजात समता, बंधुत्व, न्याय प्रस्थापित करण्यासोबतच राष्ट्राची एकात्मता सुनिश्चित करणे इत्यादी संविधानाची उद्दिष्टे असतात. संविधानाचे अलिखित संविधान व लिखित संविधान असे दोन प्रकार असून इंग्लंडचे संविधान अलिखित संविधान आहे. तर जगातील पहिले लिखित संविधान अमेरिकेत 4 मार्च 1989 रोजी अमलात आले होते. संविधान किंवा राज्यघटना हा शब्द इंग्रजी भाषेतील Constituion या शब्दाचे मराठी भाषांतर आहे Constituion हा शब्द Constitutio या लॅटिन शब्दापासून तयार झालेला असून याचा अर्थ शासन करण्याचा सिद्धांत असा होतो. त्यामुळे संविधान (राज्यघटना) म्हणजे एखाद्या देशाचे शासन ज्या नियम व सिद्धांतानुसार चालते त्या नियम व सिद्धांतांच्या समूहास संविधान म्हटले जाते.

भारत 15 ऑगस्ट 1947 रोजी इंग्लंडच्या दीर्घ राजवटीतून स्वतंत्र होऊन 26 जानेवारी 1950 रोजी संविधानाची अंमलबजावणी झाल्याच्या घटनेला यावर्षी 26 जानेवारी 2025 रोजी 75 वर्षे पूर्ण झाल्यामुळे भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. 26 जानेवारी 2025 रोजी भारतीय राज्यघटना अमलात येऊन 75 वर्ष पूर्ण झाली असून हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. संविधानाचा 75 वर्षाचा हा टप्पा आपल्या भारतीय लोकशाहीचा उल्लेखनीय प्रवास, आपली संस्थात्मक तत्वे आणि घटनात्मक मूल्यांचा चिरस्थायी वारसा प्रतिबिंबित करतो. 26 जानेवारी 1949 रोजी भारतीय संविधानसभेने भारतीय राज्यघटना स्वीकारली. जी राज्यघटना पुढे 26 जानेवारी 1950 रोजी अमलात आली आणि भारतीय इतिहासातील एक नव्या युगाची सुरुवात झाली. हा दिवस अत्यंत महत्वपूर्ण आहे. कारण याच दिवशी जगातील सर्वात मोठी राज्यघटना स्वीकारण्यात आली. जी भारताच्या लोकशाही शासन व्यवस्थेचा कणा आहे. भारतीय राज्यघटना अंमलात आल्यापासून गेल्या 75 वर्षात राज्यघटना भारताच्या सर्वांगीण प्रगतीला आकार देणारी मार्गदर्शक चौकट म्हणून कार्य करीत आहे. भारतीय संविधान अमलात आल्यानंतर आज 75 वर्षानंतरही भारत हे एक लोकशाही राष्ट्र म्हणून टिकून आहे. केवळ टिकून आहे एवढेच नाही तर भारतीय लोकशाही अधिक समृद्ध मजबूत आणि विकसित होत आहे. भारतासोबतच स्वातंत्र्य झालेल्या शेजारील आशियाई देशांतील लोकशाही राजवट अल्पावधीतच कोसळून येथे लष्करी राजवटी सत्तेवर आल्याची उदाहरणे आहेत. केवळ आशियाई देशांतच नव्हे तर युरोपीय, आफ्रिकी देशातील लोकशाहीसमोर विविध आव्हाने उभी राहिली आहेत. भारतीय लोकशाहीसमोर सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि दहशतवादासारखी आव्हाने उभी ठाकूनही त्या आव्हानांचा यशस्वीपणे मुकाबला करीत अनेक उणीवांसह भारतीय लोकशाही टिकून आहे. जी केवळ भारतीय संविधानामुळेच टिकून आहे. प्रस्तुत भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास या लेखात आपण भारतीय संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी व संविधान निर्मितीचे विविध टप्पे अभ्यासले आहेत.

भारतीय संविधान निर्मितीतील ऐतिहासिक घटना: -

भारत देशाच्या राजकीय इतिहासात 26 जानेवारी 1950 या दिवसाला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण या दिवशी आपले संविधान अंमलात आले याच दिवशी भारत हे प्रजासत्ताक राष्ट्र बनले. इसवी 1946 मध्ये गठित झालेल्या संविधानसभेने इसवी 1949 पर्यंत 03 वर्षाच्या कालावधीत भारतीय संविधान तयार केले. भारतीय संविधान ही इतिहासाची निर्मिती आहे. भारतीय संविधान तयार करण्याचे म्हणजे संविधानाची तत्वे व नियम शब्दबद्ध करण्याचे कार्य संविधान सभेद्वारे पार पाडले जात असले तरी संविधानसभेला भारत देशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजकीय व सांस्कृतिक परंपरा, राजकीय वारसा इत्यादी बाबीं विचारात घेऊनच संविधान तयार करावे लागले. प्रत्येक देशाच्या विशिष्ट परिस्थितीतूनच त्या देशाच्या संविधानाची निर्मिती होत असते. ही बाब अर्थातच भारतीय संविधानालाही लागू पडते. भारत देशाला मिळालेला परकीय ब्रिटिश राजवटीचा वारसा आणि प्रभाव पडणे अगदी स्वाभाविकच होते. म्हणून भारतीय संविधानाचे स्वरूप समजून घेण्यासाठी भारतीय संविधाना निर्मितीचा ऐतिहासिक आढावा घेणे आवश्यक ठरते.

ब्रिटिश राजवटीपासून राज्यघटनेचा विकास: -

कोणत्याही देशाच्या राज्यघटनेचे स्वरूप हे त्या देशाच्या इतिहास, सामाजिक व राजकीय परिस्थितीतून ठरत असते. राज्यघटनेला लाभलेली ती ऐतिहासिक पार्श्वभूमी असते. भारतीय राज्यघटनासुद्धा या नियमाला अपवाद नाही. भारतातील ब्रिटिशांची राजवट त्या राजवटीने निर्माण केलेली प्रशासन व्यवस्था ब्रिटिशांच्या राजवटीविरुद्ध झालेला भारतीय स्वातंत्र्याचा लढा त्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात भारतीयांच्या मनामध्ये निर्माण झालेल्या आशा, आकांक्षा, स्वातंत्र्य लक्षात घेऊन याची उद्दिष्टे या सर्व

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

घटकांच्या परिणामातून भारताचे राज्यघटना तयार झालेले आहे. 26 जानेवारी 1949 रोजी स्वतंत्र भारताची घटना समितीने भारतीय राज्यघटनेचा स्वीकार केला व 26 जानेवारी 1950 पासून अमलात आली. भारतीय राज्यघटना आपल्या देशाच्या ऐतिहासिक विकासातून निर्माण झालेली आहे. भारतीय राज्यघटना अंमलात येण्यापूर्वी सर्वसाधारणपणे 150 वर्षे भारत ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात होता. त्यापूर्वी सन 1600 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाल्यापासून जवळपास 250 वर्ष भारत इंग्रज सत्तेच्या नियंत्रणात होता. त्यामुळे ब्रिटिशांच्या राजवटीचा त्यांनी भारतासाठी केलेल्या कायद्यांच्या सुधारणांचा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर ही पडणे अपरिहार्य होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आपल्या प्रशासनाची घडी व्यवस्थित बसवण्यासाठी अगदी सुरुवातीपासूनच अनेक उपाययोजना केल्या होत्या. त्यातूनच प्रशासनाची एक शिस्तबद्ध चौकट भारतात उभी राहिली. भारतीय राज्यघटनेच्या जडणघडणीत स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिशांनी तयार केलेल्या रेग्युलेरिंग कायदा सन 1773, पीट इंडिया ॲक्ट 1784, 1793 संधी कायदा, 1853 सनदी कायदा, चार्टर ॲक्ट 1833, 1853 सनदी कायदा, 1858 चा कायदा, 1861 चा भारतीय कॉऊंसिल कायदा, मोर्ले-मिंटो कायदा 1909, मॉटेग्यू चेम्सफोर्ड कायदा -1919, सन 1935 चा कायदा व भारतीय स्वातंत्र्य विषयक कायदा 1947 इत्यादी कायद्यांचा मोठा प्रभाव होता. थोडक्यात परकीय ब्रिटिश राजवटीच्या पारतंत्र्याच्या काळापासूनच भारतीत संविधानाचा घटनात्मक विकासाला प्रारंभ झाल्याचे स्पष्ट होते.

भारतीयांकडून संविधान निर्मितीची मागणी: -

सर्वसाधारणपणे राज्यघटना समिती किंवा संविधानसभा म्हणजे व्यक्तीचा असा समूह आहे. जो त्या देशाच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करतो. भारताची राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समिती स्थापन करावी व या घटनासमीतीने भारताची राज्यघटना निर्माण करावी अशी मागणी 20 व्या शतकात परकीय ब्रिटिश सरकारकडे भारतीयांनी केल्याचे आढळून येते. सन 1922 मध्ये महात्मा गांधीजींनी "हरिजन" या पक्षिकांमधून स्वराज्य संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना भारतासाठी भारतीयच राज्यघटना बनवतील असा संकेत देऊन संविधानसभा असा उल्लेख न करता अशा संविधान सभेची मागणी प्रथमत केली होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेत असता एक बाब स्पष्ट होते, ती म्हणजे आमचे राजकीय भवितव्य आम्ही ठरवू असा आग्रह सन 1922 मध्ये महात्मा गांधीजींनी धरला होता. स्वातंत्र्य ही ब्रिटिश संसदेने दिलेली भेट असू नये तर भारतीयांनी स्वतः व्यक्त केलेली ती उद्घोषणा असावयास हवी ही धरणा त्यामागे होती. थोडक्यात महात्मा गांधीजींनी भारतासाठी संविधान निर्माण करणारी एक संस्था असावी असा आग्रह परकीय ब्रिटिश सत्तेपुढे धरला होता. दि. 10 ऑगस्ट 1928 रोजी मोतीलाल नेहरू अहवालाद्वारे भारतीयांद्वारे आपल्या देशासाठी संविधान तयार करण्याचा पहिला प्रयत्न झाला होता. सन 1934 मध्ये भारतातील साम्यवादी चळवळीचे अग्रणी मानवेंद्रनाथ रॉय यांनी भारतासाठी संविधानसभेची कल्पना सर्वप्रथम मांडली. सायमन कमिशनचे अपयश सन 1928-1929 लंडनमधील तीन गोलमेज परिषदा सन १९३०-१९३१-१९३२ यामधून घटना समितीच्या स्थापनेची मागणी मूळ धरून लागली. डिसेंबर 1934 मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पटना अधिवेशनात भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी संविधानसभेची औपचारिक मागणी केली होती. सन 1934 मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रतिपादन केले होते की, राजकीय आणि राष्ट्रीय दृष्टीने पाहता भारतीयांनी निर्माण केलेल्या राज्यघटनेव्दारे भारताचे भवितव्य ठरविले पाहिजे आणि आपली राज्यघटना बनवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य भारतीयांना असले पाहिजे. भारतीयाच्या आशा आकांक्षाचे प्रतिबिंब असलेली राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समितीची मागणी आता राष्ट्रीय काँग्रेसचे अधिकृत धोरण बनले. 29 जुलै 1936 च्या काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात त्याला मूर्त स्वरूप दिलेले दिसून येते. सन 1938 मध्ये भारताची राज्यघटना प्रौढ मतदानाद्वारे निवडण्यात आलेल्या संविधानसभेद्वारे कोणत्याही बाह्य प्रभावाविना तयार करण्यात यावी अशी पंडित जवाहरलाल नेहरूंनी काँग्रेसच्या वतीने मागणी केली होती. सन 1938 मध्ये पंडित नेहरू यांनी त्याला सुस्पष्ट स्वरूप नि: संदीग्ध आकार दिला. यासंदर्भात पंडित नेहरू म्हणतात, भारतीय काँग्रेस स्वातंत्र्य आणि लोकशाही शासनाच्या निर्मितीसाठी कटिबद्ध आहे. स्वतंत्र भारताची राज्यघटना प्रौढ मतदानाद्वारे निवडलेल्या घटना समितीनेच तयार केली पाहिजे. त्यात कोणत्याही स्वरूपात बाह्य हस्तक्षेप असता कामा नये. पंडित नेहरूंनी ही मागणी राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने केलेली होती.

ब्रिटिश पंतप्रधान लॉर्ड लिनलिथगो यांनी 8 ऑगस्ट 1940 रोजी ऑगस्ट ऑफरमध्ये द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर भारताला डोमिनियमचा दर्जा देऊन भारतासाठी भारतीयांनी तयार केलेली राज्यघटना निर्मितीची मागणी मान्य केली होती. पुढे दोन वर्षांनी ब्रिटिश सरकारने भारतात पाठविलेल्या सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश शिष्टमंडळाने द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्याबरोबरच भारताचे राज्यघटना पूर्णत: भारतीयांचा समावेश असलेल्या घटनासमितीद्वारे तयार करण्याची योजना मांडली होती. भारतातील कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाने क्रिप्स योजना स्वीकारली नाही. सन 1945 मध्ये

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जून 1945 मध्ये इंग्लंडमध्ये संसदेच्या सार्वत्रिक निवडणुका होऊन मजूर पक्षाचा विजय होऊन लॉर्ड ॲटली पंतप्रधान झाले. मजूर पक्षाने सुरुवातीपासून भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नावर भारताला अनुकूल भूमिका स्वीकारली. पंतप्रधान लॉर्ड ॲटलिनी भारताला लवकरच स्वातंत्र्य देण्यात येईल अशी घोषणा केली. या प्रश्नावर सविस्तर विनिमय करण्यासाठी भारत मंत्र्याच्या घोषणेद्वारे इंग्लंडच्या मंत्रिमंडळातील सर पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफोर्ड क्रिप्स आणि अल्बर्ट अलेक्झांडर या 3 सदस्यांचे एक शिष्टमंडळ 24 मार्च 1946 रोजी भारतात आले. या शिष्टमंडळालाच कॅबिनेट मिशन किंवा त्रिमंत्री योजना म्हणतात. भारतीय राज्यघटना निर्मितीच्या ऐतिहासिक प्रक्रियेतील त्रिमंत्री योजना हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. त्रिमंत्री योजना अर्थात कॅबिनेट मिशनला ब्रिटिश संसदेने 26 मे 1946 रोजी संमती दिली., त्रिमंत्री योजनेनुसार भारतीय संघराज्याची राज्यघटना भारतीयांच्या 389 सदस्य घटना समितीद्वारे तयार करण्यात येईल असे निश्चित केले. राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम लीग दोन्ही राजकीय पक्ष कॅबिनेट मिशन किंवा त्रिमंत्री योजनेबाबत समाधानी नव्हते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला अशी भीती वाटत होती की, त्रिमंत्री योजने योजनेने केंद्र सरकारला अतिशय दुर्बल बनविल्यामुळे भारतीय संघराज्याचे अस्तित्व धोक्यात येईल. त्यामुळे काँग्रेसने सुरुवातीतील त्रिमंत्री योजनेला विरोध केला होता. परंतु ही त्रिमंत्री योजना पूर्णपणे नाकारल्यास सत्तांतराची प्रक्रिया आणखी लांबीवर पडेल हे लक्षात आल्याने त्रिमंत्री योजनेला काँग्रेसने संमती दिली. मुस्लिम लीगला सत्तांतराची प्रक्रिया लांबणीवर पडल्यास भारतात राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यास भारतीय काँग्रेसला भारताच्या फाळणीला मान्यता देण्याशिवाय अत्यंत उरणार नाही व पाकिस्तानची निर्मिती व्हावी या उद्देशाने सुरुवातीला हटवाद भूमिका घेत या योजनेला नकार दिला होता. परंतु शेवटी मुस्लिम लीगने ही त्रिमंत्री योजनेला मान्यता दिल्यामुळे भारतीय संविधान निर्मितीचा मार्ग सुकर झाला होता. त्रिमंत्री योजनेतील तरतुदीनुसार भारतात जुलै 1946 मध्ये घटनासमिती सदस्य निवडण्यासाठी निवडणुका झाल्या. घटनासमितीच्या निवडणुका पार पाडल्या तरी मुस्लिम लीगची आडमुठेपणाची भूमिका कायमच राहिली. त्रिमंत्री योजनेतील तरतुदीनुसार राज्यघटना तयार करण्याचे कार्य चालू असेपर्यंतच्या काळात देशातील प्रमुख राजकीय पक्षांचा सहभाग असलेल्या अंतरिम सरकारची स्थापना करावी. परंतु अंतरिम सरकारच्या रचनेबाबत काँग्रेस व मुस्लिम लीग या दोन राजकिय पक्षापैकी मुस्लीम लिगने मुस्लीम धर्मावर आधारित पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राच्या निर्मितीसाठी 16 ऑगस्ट 1946 हा प्रत्यक्ष कृती दिन म्हणून पाळला. दिनांक 2 सप्टेंबर 1946 रोजी ब्रिटिश व्हॉइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी पंडित जवाहरलाल नेहरूजींच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन केले. पुढे 15 ऑक्टोबर 1946 रोजी या हंगामी सरकारात मुस्लिम लीगचे पाच मंत्री सामील झाले होते. तथापि मुस्लिम लीगची आडवणुकीची भूमिका मात्र कायम राहिली. डिसेंबर 1946 पासून भारताच्या घटना समितीचे कामकाज सुरू झाले असले तरी काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यातील मतभेद आणि एकूणच अनिश्चिततेची किंवा संक्रमणाची अवस्थामुळे घटनासमितीच्या कामकाजाला विशेष चालना मिळाली नव्हती. भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 18 जुलै 1947 रोजी ब्रिटिश संसदेने संमत करून 15 ऑगस्ट 1947 रोजी पासून भारताची फाळणी करून भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रीय अस्तित्वात आल्यानंतर मात्र घटनासमितीच्या कार्याला गती प्राप्त झाली. 15 ऑगस्ट 1947 नंतर पाकिस्तानात समाविष्ट असलेल्या प्रदेशातील घटनासमितीचे सदस्य पाकिस्तानच्या घटना समितीचे सदस्य बनले आणि पाकिस्तानची घटना समिती स्वतंत्रपणे कार्य करू लागली. भारतीय प्रदेशातून निवडलेल्या 299 सदस्य घटनासमितीने राज्यघटना निर्मितीचे कार्य पूर्ण केले.

संविधान सभेची संरचना: -

त्रिमंत्री योजनेतील तरतुदीनुसार भारतात जुलै 1946 मध्ये घटनासमिती अर्थात संविधान सभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. या संविधान सभेत एकूण 389 सदस्य असतील अशी तरतूद केली होती. कॅबिनेट मिशन योजनेनुसार संविधान सभेच्या प्रतिनिधींची निवड सार्वत्रिक प्रौढ मताधिकाऱ्याद्वारे करण्याची तरतूद असली तरी इतक्या कमी वेळेत ही प्रक्रिया शक्य नसल्याने कॅबिनेट मिशनने इतर उपाय सादर करीत नुकत्याच निवडलेल्या प्रांतिक विविध विधिमंडळाच्या सदस्यांद्वारे घटनासमितीच्या सदस्यांची निवड व्हावी असा निर्णय घेतला. प्रत्येक प्रांताला आणि संस्थांना लोकसंख्येच्या प्रमाणात सदस्यत्वाच्या जागा निश्चित करून साधारणपणे दहा लाख लोकसंख्या मागे एक प्रतिनिधींची निवड प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीने एकल संक्रमणीय मतदान आधारे करण्यात आली. प्रत्येक प्रांताच्या वाट्याला आलेल्या प्रतिनिधींच्या संख्येची वाटणी त्या प्रांतात वास्तव्य करणाऱ्या प्रमुख जमातींच्या संख्येच्या प्रमाणात करण्यात आलेली होती. संबंधित जमातीच्या लोकांनी त्याचे प्रतिनिधी निवडून दिले. संस्थांनांचे 93 प्रतिनिधी संस्थानिकाकडून नामनिर्देशित करावयाच्या होत्या. परंतु संस्थानांनी घटनासमिती बाहेर राहावयाचे ठरविल्याने संस्थानांच्या वाट्याला आलेल्या 93 जागा घटना परिषदेत भरल्या गेल्या नाहीत. ब्रिटिशव्याप्त भारतातील प्रांताला देशात येणाऱ्या जागा मुस्लिम, शीख व सर्वसाधारण या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

तीन गटांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात विभागण्यात येणार होत्या. घटनासमितीच्या निवडणुकीत प्रमुख स्पर्धा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि मुस्लिम लीग या दोन राजकीय पक्षातच होती. घटना परिषदेच्या जुलै 1946 मध्ये संपन्न झालेल्या निवडणुकीत 296 पैकी 208 जागा काँग्रेसला तर मुस्लिम लीगला 73 जागा मिळाल्या. इतर राजकीय पक्षांना केवळ 15 जागा मिळाल्या. कॅबिनेट मिशन शिफारशीनुसार तयार करण्यात आलेल्या योजने अन्वये नोव्हेंबर 1946 मध्ये संविधान सभेची निर्मिती करण्यात आली. संविधान सभेत एकूण 15 महिला सदस्य म्हणून निवडून आलेल्या होत्या. भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947 नुसार संविधान सभेसंदर्भात तीन खालील प्रमाणे बदल झाले. संविधान सभेला पूर्णपणे सार्वभौम दर्जा देण्यात आला.संविधान सभा दोन स्वतंत्र कार्य वेगवेगळ्या दिवशी करीत असे, संविधान सभा ज्यावेळी कायदेमंडळ म्हणून सर्वसाधारण कायदे बनवण्याचे कार्य करीत असताना अध्यक्ष म्हणून जी.व्ही. मावळणकर काम पाहत असेल तर संविधानसभा ज्यावेळी राज्यघटना तयार करण्याचे कार्य करीत असताना घटना समितीचे सभापती म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद काम पाहत असत. भारताचे फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाल्यामुळे मुस्लिम लीगचे सदस्य संविधान सभेतून बाहेर पडल्यामुळे सदस्य संख्या कमी होऊन 299 इतकी झाली.

भारतीय संविधान सभेचे कामकाज: -

घटना समितीचे पहिले अधिवेशन 9 ते 13 डिसेंबर 1946 या कालावधीत संपन्न झाले. तीन जून १९४७ रोजी शेवटचे ब्रिटिश व्हॉइसरॉय लॉर्ड लुई माउंटबॅटन यांच्या योजनेनुसार झालेल्या भारताच्या फाळणीचा परिणाम म्हणून जे घटनासमिती सदस्य पाकिस्तानच्या अंतर्गत असलेल्या प्रदेशातून निवडून आले होते. त्या सदस्यांचे भारतीय संविधान सभेतील सदस्यत्व संपुष्टात आले. परिणामी घटना समितीमधील सदस्यसंख्या 389 वरून 299 इतकी कमी झाली व त्यातील 284 सदस्यांनी 26 नोव्हेंबर 1949 रोजी उपस्थित राहून संविधानाच्या अंतिम मसुद्यावर स्वाक्षरी करून त्यास मान्यता दिली. भारताच्या फाळणीदरम्यान देशात झालेल्या भयानक हिंदू-मुस्लिम दंगलीच्या पार्श्वभूमीवर संविधान तयार करण्यात आले. संविधानसभेने भारतीय संविधान निर्मिती करताना नियोजनबद्ध आणि व्यापक प्रक्रिया अवलंबली. संविधानाला अंतिम रूप देण्यापूर्वी विविध टप्प्यातून काम केले होते. संविधान निर्मितीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे पार पडली. घटना समितीचे पहिले अधिवेशन 9 ते 23 डिसेंबर 1946 या कालावधीत दिल्लीत संपन्न झाले. मुस्लिम लीगने स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीसाठी संविधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार घातला होता. घटनासमितीचे हंगामी अध्यक्ष म्हणून सच्चिदानंद सिन्हा यांची उपाध्यक्षपदी फ्रँक अंथोनी यांची निवड करण्यात आली. या पहिल्या अधिवेशनातच दि. ११ डिसेंबर 1946 रोजी घटनासमितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद व उपाध्यक्ष म्हणून एच.सी. मुखर्जी यांची निवड झाली. या अधिवेशनातच 13 डिसेंबर 1946 रोजी पंडित नेहरूंनी संविधानाच्या उद्दिष्टांचा ठराव मांडला व घटनासमितीच्या प्रत्यक्ष कामकाजाला प्रारंभ झाला. घटनासमितीचे दुसरे अधिवेशन 20 ते 25 जानेवारी 1947 या कालावधीत संपन्न झाले. घटनासमितीच्या पहिल्या अधिवेशनात 13 डिसेंबर 1946 रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी घटनेची उद्दिष्ट स्पष्ट करणाऱ्या ठराव मांडला होता. हा ठराव दुसऱ्या अधिवेशनात 22 जानेवारी 1947 रोजी घटनासमितीने एकमताने मंजूर केला. भारतीय संविधानाच्या सरनाम्यावर या ठरावाचा प्रभाव आहे. 24 जानेवारी 1947 रोजी घटनासमितीच्या कामकाजाच्या सोयीसाठी घटनासमितीने एकूण 22 समित्यांची स्थापना केली होती. घटनासमितीचे तिसरे अधिवेशन 28 एप्रिल ते दोन मे 1947 या कालावधीत आयोजित केलेले होते. या तिसऱ्या अधिवेशनात नागरिकांच्या मूलभूत हक्कांबाबत चर्चा झाली. या अधिवेशनादरम्यान 03 जून 1947 रोजी माउंटबॅटन योजना घोषीत होऊन त्यावर आधारित भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 05 जुलै 1947 रोजी ब्रिटिश संसदेने संमत केला. या कायद्याला 18 जुलै 1947 रोजी ब्रिटिश राजसत्तेची मान्यता मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जुलै 1947 मध्ये मुंबई प्रांतातून घटनासमिती सदस्य म्हणून पुनर्नियुक्ती झाली. संविधानसभेचे चौथे अधिवेशन 14 ते 31 जुलै 1947 दरम्यान पार पडले. 26 जुलै 1947 रोजी गव्हर्नर जनरल यांनी पाकिस्तानसाठी वेगळी संविधान सभा घोषित केली. घटनासमितीचे पाचवे अधिवेशन 14 ते 30 ऑगस्ट 1947 दरम्यान संपन्न झाले. 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली 07 सदस्यीय मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. ऑगस्ट 1947 मध्येच भारताचे पहिले केंद्रीय कायदामंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवड झाली होती. या अधिवेशनादरम्यान संविधानसभेत तीन महत्त्वपूर्ण बदल झाले. संविधान सभा संपूर्णतः सार्वभौम संस्था होऊन आपल्या मर्जीने भारतीय संविधान तयार करण्याचा अधिकार संविधान सभेला मिळाला. संविधान सभा एक विधिमंडळात मग संस्था ही झाली. भारतीय संविधान तयार करण्यासोबतच देशासाठी कायदे निर्मिती करण्याचे कार्य करणे अशी दुहेरी कार्य संविधानसभेकडे आले. संविधान तयार करताना अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद असायचे कायदे तयार करताना अध्यक्ष हे जी.बी. मावळंणकर असायचे. 27 जानेवारी 1948 रोजी घटना समितीचे 06

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

वे अधिवेशन एकच दिवस झाले. राज्यघटनेच्या मसुद्यावर कलम न्याय चर्चा व ही कलमे मंजुरीची प्रक्रिया अधिवेशनातच निश्चित करण्यात आली संविधानसभेचे 07 वे अधिवेशन चार नोव्हेंबर 1948 ते 8 जानेवारी 1949 या दरम्यान संपन्न झाले. या 07 व्या अधिवेशनात मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नोव्हेंबर 1948 मध्ये संविधानाचा मसुदा घटनासमितीच्या पटलावर मांडला. त्यानंतर 15 नोव्हेंबर 1948 ते 17 ऑक्टोबर 1949 पर्यंत म्हणजे या 11 महिन्यांच्या काळात संविधान मसुद्यातील प्रत्येक तरतुदींची कलमन्याय चर्चा करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नोव्हेंबर 1949 मध्ये घटनासमितीसमोर संविधानाचा अंतिम मसुदा सादर केला. 14 ते 16 नोव्हेंबर 1948 या काळात दुरुस्त्यांवर चर्चा करण्यात आली आणि 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटनासमितीने संविधानाचा अंतिम मसुदा स्वीकृत केला. संविधान समितीचे 08 वे अधिवेशन 16 मे ते 16 जून 1949 नवे अधिवेशन 30 जुलै ते 18 सप्टेंबर 1949, 10 वे अधिवेशन 06 ते 17 ऑक्टोबर 1949 दरम्यान पार पडले. तर शेवटचे 11 वे अधिवेशन 14 ते 26 नोव्हेंबर 1949 या कालावधीत संपन्न झाली. 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीने संविधानाला स्वीकृती दिली. संविधान सभेने 26 जानेवारी 1950 ते पहिल्या सर्वत्रिक निवडणुकीद्वारे संसदेची दोन्ही सभागृह स्थापन होईपर्यंत म्हणजेच 17 एप्रिल 1952 पर्यंत हंगामी संसद म्हणून कार्य केले. अशा रीतीने 09 डिसेंबर 1946 ते 26 नोव्हेंबर 1949 एवढा म्हणजे जवळपास 03 वर्षाचा काळ (दोन वर्षे 11 महिने १७ दिवस) भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीसाठी लागला. या कालावधीत संविधानसमितीची 11 अधिवेशने दिल्लीत संपन्न झाली. 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय संविधान अंमलात आले. भारतीय संविधानात सुरुवातीला 22 भाग, 08 परिशिष्टे व 395 कलमी होती. जगातील सर्वात मोठे लिखित संविधान यामुळेच भारतीय संविधानाला संबोधले जाते. घटनासमितीने 25 जानेवारी 1950 रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड केली. 26 जानेवारी 1950 रोजी सकाळी मावळते गव्हर्नर जनरल सी. राजगोपालाचारी यांनी भारत सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक झाल्याची घोषणा केली. त्याचप्रमाणे राज्यघटना स्वीकृत होऊन 26 जानेवारी 1950 पासून अमलात आल्याची घोषित केले. भारतीय संविधान 26 जानेवारी 1950 या दिवशी अंमलात आणण्यामागे बरोबर 20 वर्षे आधी म्हणजे 26 जानेवारी 1930 रोजी 26 जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून पाळला होता, म्हणून राज्यघटना लागू करण्यासाठी 26 जानेवारी या दिवसाची निवड करून औचित्य साधण्यात आले.

समारोप:-

भारतीय संविधान ब्रिटिश वसाहतवादविरोधी लढ्यातून आकाराला आलेले आहे. भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत स्वातंत्र्यलढ्याचा वारसा लाभलेला आहे. भारतीय संविधानसभेत स्वातंत्र्य चळवळीत महत्वपूर्ण कामगिरी केलेल्या नेत्यांची घटनासमिती सदस्य म्हणून निवड झाली होती. भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळातच घटनात्मक विकासाची सुरुवात झालेली होती. भारतीय संविधानातील काही महत्त्वपूर्ण तत्वांचा उगम ब्रिटिश राजवटीत झाल्याचे आढळून येते. भारतीयांनी संविधान निर्मितीची मागणी स्वातंत्र्यपूर्व काळापासून ब्रिटिश सरकारकडे सातत्याने केलेली होती. त्यानंतर 1946 मध्ये कॅबिनेट मिशन योजनेच्या माध्यमातून ब्रिटिश सरकारने घटनासमितीची स्थापना 1946 मध्ये अर्थातच स्वातंत्र्यपूर्व काळात केलेली होती. भारतीय संविधानसभेने 1946 ते 1949 या 03 वर्षांच्या कालावधीत जगातील सर्वात मोठे संविधान तयार केले. भारतीय संविधानाची अंमलबजावणी 26 जानेवारी 1950 पासून सुरु होऊन आज 75 वर्षांचा काळ लोटल्यानंतरही भारतीय संविधानामुळे भारतीय लोकशाहीचे अस्तित्व टिकून असल्याचे स्पष्ट होते. भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे संविधान असून संविधानात आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांचा उत्तम मेळ घातला आहे. भारतीय संविधानामुळे भारतासारख्या अनेकांगी विविधता असलेल्या राष्ट्राची राष्ट्रीय एकात्मता, प्रादेशिक अखंडत्व अबाधित राहिले आहे. एकंदरीत भारताच्या जडणघडणीमध्ये भारतीय संविधानाचे महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित होते.

संदर्भसूची:-

1. पाटील व्हि.बी., भारतीय राज्यव्यवस्था, महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह सुधारित द्वितीया वृत्ती 2011 के. सागर पब्लिकेशन पुणे.
2. बाचल वि.मा., भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार, सुधारित सातवी आवृत्ती 2014, के. सागर पब्लिकेशन पुणे.
3. के. सागर, भारतीय राज्यघटना आणि राजकारण महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात, सातवी आवृत्ती 2018, के. सागर पब्लिकेशन. पुणे.
4. के. सागर, भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात) आणि संबंधित कायदे, पाचवी सुधारित आवृत्ती 2014, के. सागर पब्लिकेशन, पुणे.
5. अनिरुद्ध, सुबोध भारतीय राज्यघटना, प्रथम आवृत्ती, 01 जानेवारी 2017, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

6. घायाळ विनायक, भारतीय राज्यघटना के. सागर पब्लिकेशन, पुणे.
7. भोळे भा.ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, प्रथम आवृर्ती जून 2003, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर
8. जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश, भारतीय राज्यघटना व राजघटनात्मक प्रक्रिया खंड-01 पाचवी आवृत्ती 2022, युनिक ॲकडमी प्रकाशन, पुणे.
9. वराडकर र.घ., भारतीय राज्यघटना, राजकारण, (महाराष्ट्राच्या संदर्भासहित) आणि कायदा प्रथम अवृत्ती एप्रिल 2012, निराली प्रकाशन, पुणे.
10. शिंदे महेश राजाराम (संपा), आपले संविधान, महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह, द्वितीया वृत्ती 26 जानेवारी 2018, ज्ञानदीप अकॅडमी प्रकाशन. पुणे.
11. शिंदे अभिजीत, भारतीय राज्यघटना, राजकारण आणि कायदे, तृतीया आवृत्ती फेब्रुवारी 2024, चाणक्य मंडळ परिवार प्रकाशन, पुणे.
12. चपळगावकर नरेंद्र, राज्यघटनेचे अर्धशतक, प्रथम आवृत्ती 01 नोव्हेंबर 2002, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
13. दायमा ब्रिजमोहन, दायमा सारिका, भारतीय संविधानाचा परिचय, प्रथम आवृत्ती 2025 विद्याभारती प्रकाशन, लातूर
14. जोशी पियुषा, शिरापूरकर महेश, भारतीय राज्यघटना तत्व आणि व्यवहार, प्रथम आवृत्ती 2022, युनिक अकॅडमी पब्लिकेशन, प्रा.लि. पुणे.
15. जाधव तुकाराम, घोटाळे विवेक, कुलकर्णी मुक्ता, महाराष्ट्र वार्षिकी 2025, आवृत्ती 2025, द युनिक फाउंडेशन प्रकाशन, पुणे.
16. घोटाळे विवेक, भारतीय राज्यघटना, द्वितीय आवृत्ती 14 फेब्रुवारी 2025, द युनिक फाउंडेशन प्रकाशन, पुणे.
17. मेल्लली प्रवीणकुमार, भारतीय राज्यघटना, व्यावसायिक नितीमूल्ये आणि मानवी हक्क प्रथम आवृत्ती 2017, सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली.
18. कसबे रावसाहेब, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, चौथी आवृत्ती 19 फेब्रुवारी 2010, सुगावा प्रकाशन, पुणे.
19. कुलकर्णी सुहास, चंपानेरकर मिलिंद (संपा), असा घडला भारत, 1947 ते 2012, पहिली आवृत्ती 26 जानेवारी 2013, रोहन प्रकाशन, मुंबई.
20. धर्माधिकारी अविनाश, ७५ सोनेरी पाने स्वातंत्र्य भारताच्या इतिहासातील अविस्मरणीय क्षणचित्रे, द्वितीय आवृत्ती 29 ऑगस्ट 2022, राजहंस प्रकाशन, पुणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय निवडणूक आयोग : तत्व आणि व्यवहार

डॉ. शेषनारायण वडवे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पेठ वडगाव
Email: sheshanarayanw@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170931
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 160-163
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

भारतीय शासन व्यवस्थेत पारदर्शकता आणि निपक्षता राखण्यासाठी विविध संवैधानिक आयोगांची स्थापना करण्यात आली आहे. त्यापैकी भारतीय निवडणूक आयोग ही सर्वात महत्त्वाची संस्था असून ती देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा पाया मानली जाते. निवडणुका मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडणे ही या आयोगाची मुख्य जबाबदारी आहे. परंतु अलीकडील काळात या संस्थेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. २०२४ च्या लोकसभा आणि काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदार याद्यांतील विसंगती, मतदान प्रक्रियेतील अनियमितता आणि तक्रारींची चौकशी न होणे यामुळे आयोगाच्या कामकाजावर संशय निर्माण झाला. विरोधी पक्षांनी आयोगावर सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम केल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे आयोगाच्या स्वायत्ततेवर आणि लोकशाही प्रक्रियेवरील जनतेच्या विश्वासावर परिणाम झाला आहे. तरीही, संवैधानिक संस्थांचे रक्षण करणे आणि लोकशाही मूल्यांना प्रामाणिक राहणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

मुख्यशब्द: *भारतीय निवडणूक आयोग, लोकशाही, निष्पक्षता, पारदर्शकता, स्वायत्तता, निवडणुका, संविधान, राजकीय हस्तक्षेप.*

प्रस्तावना :

भारतीय शासन व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणि निपक्षता आणण्यासाठी विविध आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. हे आयोग अधिक प्रभावी, स्वतंत्र आणि निष्पक्षपणे असावेत यासाठी घटनेमध्ये त्यांची कार्यप्रणाली व रचना नमूद करण्यात आले आहे. स्वतंत्र आणि निष्पक्ष आयोगाची गरज ओळखून हे आयोग प्रभावीपणे कसे कार्य करतील व या आयोगांना कार्यकारी मंडळाच्या किंवा प्रस्थापित सरकारच्या हस्तक्षेपापासून कसे वाचवता येईल यासाठी घटनाकारांनी लिखित तरतुदी मंजूर करून त्यामध्ये सहजासहजी बदल होणार नाही याची पूर्णता दखल घेतली आहे. म्हणूनच जे आयोग भारतीय राज्यघटनेमध्ये लिखित स्वरूपात आहेत त्यांना पूर्णतः संरक्षण प्राप्त झाले आहे. घटना अमलात आल्यानंतर विविध आयोगांची किंवा मंडळांची किंवा संस्थांची गरज भासू लागली तसेच आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात विविध कार्यक्षेत्रांची व संस्थांची व्याप्ती वाढल्यामुळे वैधानिक)Statutory Bodies(स्थापन करण्यात आल्या. परंतु जे आयोग घटनेमध्ये लिखित स्वरूपात उपलब्ध होते त्यांचे कार्य त्यांना निपक्षीपणे कार्य करण्याची मुभा मिळाली. या व्यतिरिक्त घटनेत लिखित स्वरूपात नसलेल्या आयोग जे १९५० नंतर स्थापन करण्यात आले त्यांना 'वैधानिक आयोगाचा' दर्जा देऊन संसदीय कायद्याद्वारे किंवा कार्यपालिकेद्वारे (प्रस्तापित सरकारद्वारे) नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला गेला. 'यावरून आयोगाचे घटनात्मक आयोग व वैधानिक आयोग असे दोन प्रकार पडताना दिसतात.')गोगडीया उमेश, २०२५ : २(वैधानिक आयोग जरी संविधानाचा भाग नसले तरी संविधानबाह्य किंवा घटनाविरोधी असे कोणतेही काम करत नाही.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. शेषनारायण वडवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पेठ वडगाव

How to cite this article:
वडवे, . शेषनारायण . (2025). भारतीय निवडणूक आयोग : तत्व आणि व्यवहार. Journal of Research & Development, 17(9(IV)), 160–163. https://doi.org/10.5281/zenodo.17720559

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17720559
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे आणि सशक्त लिखित संविधान मानले जाते. यामध्ये शासनप्रणाली, मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि राज्यकारभाराची चौकट ठरवून दिली आहे. संविधान रचनाकारांनी शासनातील महत्त्वाच्या संस्थांना संवैधानिक दर्जा देऊन त्यांचे स्थान, अधिकार आणि जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या आहेत. या संस्था म्हणजे संवैधानिक संस्था. त्या लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी, सत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक आहेत. भारताच्या संविधानात भारतीय निवडणूक आयोग)ECI(, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग), भारताचा महान्यायवादी)AGI), राज्यांचे महाधिवक्ता (AGS), केंद्रीय लोकसेवा आयोग)UPSC(, राज्य लोकसेवा आयोग (SPSC), भारतीय वित्त आयोग (FCI), राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग)NCSC), राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग)NCST), राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग (NCBC), भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकारी (CLM) आणि वस्तू व सेवा कर परिषद (GSTC) यांसारख्या संस्थांचा उल्लेख करता येईल.

भारतीय निवडणूक आयोगाचे तत्व :

भारताचे प्रशासन निष्पक्ष, पारदर्शक आणि जबाबदार राहावे यासाठी संवैधानिक संस्था अत्यंत महत्त्वाच्या आहेत. संवैधानिक चौकटीचे पालन करण्यासाठी आणि सर्व नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी त्यांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये निर्वाचन आयोग ही एक महत्वाची संवैधानिक संस्था मानली जाते. 'सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते असे पोलाक नामक राज्यशास्त्रज्ञ म्हणतो.' (भोळे भा. ल, २०१० : ४३६) त्यावरून लोकशाहीसाठी निवडणुकांचे असलेले महत्त्व स्पष्ट होते. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनव्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम निवडणूका हे असते. निवडणुकांमधून लोकांनी दिलेले कौल सरकारला आधिमान्यता मिळवून देतो, तसेच शांततामय मार्गांनी व सुविहीतपणे सत्तांतर घडवून आणतो. त्यामुळे उत्तम निर्वाचनव्यवस्था ही प्रतिनिधीक शासनाची आधारशिळा असते. ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी क्रियान्वित होते, किती कार्यक्षमपणे व निष्पक्षपातीपणे काम करते, तिचे सूत्रधार किती सक्षम, प्रामाणिक आणि राजकीय पूर्वग्रहापासून व दडपणापासून मुक्त असतात यावरच देशाच्या लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. आपल्या निवडणूक व्यवस्थेवर लोकांचा विश्वास नसेल तर निवडणूक निकालावरील तो असणार नाही, म्हणजे संपूर्ण लोकशाही प्रक्रियाकडेच लोक संशयाच्या नजरेने पाहू लागतील.

निवडणुकांचे प्रशासन निवडणूक प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास टिकून राहावा व वाढावा अशा पद्धतीने व्हायचे तर त्यासाठी पक्षीय सरकारच्या हस्तक्षेपापासून व नियंत्रणापासून मुक्त असलेल्या यंत्रणेकडे ते सोपवलेले असणे गरजेचे ठरते. भारतीय संविधानकर्त्यांना याची जाणीव होती. त्यांनी निवडणुकांची कार्यवाही पार पाडण्यासाठी अशा स्वतंत्र यंत्रणेची निर्मिती केली. निवडणूक किंवा निर्वाचन आयोग म्हणून ही यंत्रणा ओळखले जाते. सर्व स्तरावरील लोकप्रतिनिधींची निवड न्याय्य व मुक्त निवडणुकांच्या द्वारे होईल याची हमी निर्वाचन आयोग देते. संसदेच्या तसेच राज्यांच्या विधिमंडळाच्या निवडणुकांसाठी मतदारांच्या अद्यायावत याद्या तयार करणे, त्या निवडणुकांचे त्याचप्रमाणे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या पदांच्या निवडणुकांचे संचलन करणे, या निवडणुकांच्या कामावर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रण करणे हे अधिकार निवडणूक आयोगाकडे देण्यात आले आहेत.

भारतीय निवडणूक आयोगाचा व्यवहार :

आजच्या स्थितीला विशेषत: भारतीय निवडणूक आयोग (ECI), केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI), केंद्रीय दक्षता आयोग (CVC) अंमलबजावणी संचलनालय (ED) यांसारख्या संस्थांची प्रतिष्ठ आणि त्यांच्या कामकाजात सरकारचा हस्तक्षेप यावर प्रश्न निर्माण झालेले नाहीत. तर अशा सर्व संस्था ज्यांची स्वायत्ता, स्वतंत्रता आणि निष्पक्षतेचे दावे केले जातात. त्या सर्व संस्था गेल्या काही दिवसात संशय आणि प्रश्नांच्या गराड्यात सापडल्या आहेत. लोकशाहीच रक्षण करण्याची जबाबदारी ज्या संस्थावर सोपविली गेलीय त्या संस्थांची स्वायत्तता आज सरकारने अगदी पद्धतशीरपणे नष्ट केल्याच जाणवत. 'एकेकाळी तटस्थपणाचे मॉडेल म्हणून नावाजले गेलेले, आदरास पात्र असलेल निवडणूक आयोग, आज नम्रपणे साताधाऱ्यांची तळी उचलून धरण्यास अधिकाधिक सिद्ध होत चालल्याच जाणवतंय.')तेलतुंबडे आनंद, २०२५(गोयलच्या घटनेने हे उघड केलंय की सत्ताधारी आपली पक्षपाती उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी कशाप्रकारे घटनात्मक पदांना वाकवू शकतं, कशाप्रकारे सत्ताधाऱ्यांच्या अधिकारावर स्वतंत्रपणे अंकुश ठेवण्यासाठी निवडणूक आयोग त्याच सत्ताधाऱ्यांच्या हातातलं बाहुल बनतं. सत्ताधाऱ्यांच्या युक्त्या केवळ निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वासच कमी करत नाहीत तर, लोकशाही राखण्याच्या जबाबदारीत कशाप्रकारे खोलवर ऱ्हास झालाय याकडेही निर्देश करतात.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सामान्यपणे होणाऱ्या मतदानापेक्षा वेगळा पॅटर्न निदर्शनास आल्यानं, काँग्रेसने हा नवीन पॅटर्न दाखवत सदर निवडणुकीत घोळ झाला असल्याचा संशय वारंवार व्यक्त केला. अनेक मतदारसंघातील, मतदार याद्यात विसंगती सापडल्या, पात्र मतदानांची नावं गाळली तर संशयास्पद नाव ठेवली गेली. अनेक जागांवर भारतीय जनता पार्टी)BJP(चा विजय हा अत्यंत कमी फरकाने व जवळपास एक समान अंतराने धक्कादायक रित्या झाला. त्यात त्या जागा देखील आहेत जिथं काँग्रेस व इंडिया

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

ब्लॉकचे उमेदवार जोरदार मुसंडी मारणे अपेक्षित होतं. शिवाय राहुल गांधी व इतर काँग्रेस नेत्यांनी, विरोधी पक्षांनी केलेल्या तक्रारींची पुरेशी चौकशीही न करता त्या तक्रारी केराच्या टोपलीत टाकणाऱ्या निवडणूक आयोगावर तटस्थता सोडून दिल्याचा आरोप लावला. त्यांनी हे दाखवून दिलयं की व्हीव्हीपॅट स्लीपचा पडताळा करण्याच्या अनेक मागण्या सातत्याने आल्यानंतरही निवडणूक आयोगानं तसं करण्यास नकार देऊन ईव्हीएम वरील संशय देखील आणखीन गडद केलाय.

ऑक्टोबर २०२४ मधील हरियाणा विधानसभा निवडणुका अनियमिततेच्या गंभीर संशयाने व्यापलेल्या अवस्थेत पार पडल्या. सरकार विरोधात स्पष्ट लाट व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कमालीचा पसरलेला असंतोष असतानाही या निवडणुकीत भाजपने अनपेक्षित अशी कामगिरी केली. मतदार यादीतील फेरफार, पोस्टल मतांचा संशयास्पद ट्रेंड, काही ठराविक मतदारसंघात अचानकपणे फुगलेला मतांमधील फरक या आरोपामुळे निवडणूक प्रक्रियेतील प्रामाणिकपणावरील संशयास आणखी खतपाणी घातलं. त्यात भरीस भर म्हणजे निवडणूक आयोगाचा अपारदर्शक कारभार त्यात मतदारसंघ निहाय तपशील देण्यास विलंब व विरोधी पक्षांनी केलेल्या तक्रारींची चौकशी करण्याबद्दल उदासिनता यांन चिंतेत भर टाकली. या सर्व कारणांमुळे सर्व सामान्यांचा निवडणूक यंत्रणेवरील संशय वाढला व हरियाणा निवडणूक निकालावर विश्वास उडवणारा, निवडणूक यंत्रणा सत्ताधारी पक्षाच्या बाजूने झुकलेली आहे हा व्यापक समज निर्माण झाला.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जेव्हा हे निदर्शनास आले की नोंदणीकृत मतदारांच्या संकेत असामान्य अशी वाढ झालीय आणि तेही सायंकाळी ६ वाजल्यानंतर म्हणजेच मतदान बंद होण्याच्या अधिकृत वेळेनंतर अविश्वासनीय असं भरमसाठ मतदान झालय, तेंव्हा या मतदानात फार मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याची शंका कित्येक पटीने तीव्र झाली. काँग्रेसने याबद्दल निवडणूक आयोगाकडे स्पष्टीकरण मागितल तसेच मतदान केंद्रातील अनिवार्य असलेली व्हिडिओ रेकॉर्डिंग दाखवण्याची देखील मागणी केली. मतदान बंद करण्याच्या अधिकृत वेळेनंतर वाढीव वेळेत झालेल्या मतदानाची पारदर्शकता अबाधित राखण्यासाठी हे व्हिडिओ रेकॉर्डिंग महत्त्वाचं असतं. तरीही मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सदर फुटेज दाखवण्यास स्पष्ट नाकार दिला. 'एका पत्रकार परिषदेत काँग्रेसची मागणी फेटाळताना हा व्हिडिओ पाहण्यास तब्बल ३,६०० वर्ष लागतील असं चक्क आक्कलेचे तारे तोडणारे विधान मुख्य निवडणूक आयुक्तांनी केलं.)तेलतुंबडे आनंद, २०२५(आयोगांन उद्धटपणे भाजपच्या स्वरात दिलेले हे उत्तर म्हणजे विरोधी पक्षांनी घेतल्या आक्षेपांची थट्टा करणार, संविधानाने आखून दिलेल्या नि:पक्षपाती भूमिकेशी फारकत घेतल्याची जाहीर ग्वाही देणार आणि सत्ताधाऱ्यांच्या हातातलं बाहुलं बनल्याची जी सर्वसामान्य जी धारणा झाली त्याला बळकटी देणार असं होय.

बिहारमध्ये वादग्रस्त ठरलेल्या Special Intensive Revision)SIR(च्या नावे निवडणूक आयोगान मतदार यादींची उजळणी चालवली आहे. त्यातून निवडणूक आयोगाची भाजप एजंट म्हणून पक्षपाती भूमिका अगदी ठळकपणे उघड होते. इथे विरोधी पक्षांना विश्वासात घेण्याऐवजी निवडणूक आयोगांन दोषांनी भरलेल्या SIR प्रक्रियेचा बचाव करण्यासाठी सर्व ताकदीनिशी विरोधी पक्षांशी कोर्टात लढण्याचा मार्ग निवडलाय. आतापर्यंत जवळपास 65 लाख मतदारांची नावे मतदार यादीतून काढून टाकण्यात आलीत आणि कार्यकर्त्यांना धास्ती आहे की हा आकडा एक कोटीपर्यंत जाईल. जी नाव गाळली गेली आहेत त्यातील बहुतांश लोक हे समाजातील खालच्या स्तरातील आहेत. मुळातच पिचलेल्या लोकांची मतदार यादीतून नाव काढली जाणं म्हणजे केवळ मतदान करण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवणे एवढेच नव्हे तर रेशन कार्ड आणि देशाचे नागरिक म्हणून मिळणारे इतर कल्याणकारी हक्क गमावणे देखील आहे.

निवडणूक आयोगान अखेर असा संशयास्पद व अस्थिरता माजवणारा SIR हा कार्यक्रम का हाती घेतला असणार ? या प्रश्नाचं तर्कसंगत स्पष्टीकरण देणारं उत्तर नाही. शिवाय हे की आयोग, भाजपची राजकीय रणनीती राबवत आहे. २०२४ लोकसभा निवडणुकीत पिचेहाट करणारा जो तीव्र झटका भाजपला लागलाय, त्यातून त्यान दृढनिश्चय केलेला दिसते की कुठल्याही परिस्थितीत स्वत:ला निवडणुकीतील पराजयाच्या जोखमेपासून दूर ठेवायच. म्हणून त्यांना निवडणूक आयोगाला आपल्या ताब्यात घेऊन याची खात्री करून घेतली की लोकांनी प्रत्यक्षात कसं ही मतदान केलं तरी निवडणूक आयोग त्याच्या बाजूने पारडं वळवणार हे भीषण वास्तव आपल्यासमोर आवासून उभा आहे. निवडणुकांचा निकाल लावण्याचा अंतिम अधिकार हा निवडणूक आयोगाकडे आहे आणि जर या अधिकाराचा वापर ते जनतेचा जनादेश झुगारून करणार असेल जनादेशाची पर्वा न करता निकाल लावणार असेल तर भाजपला सामान्य मार्गाने सत्तेतून हद्दपार करण दुरापास्त आहे. अशा परिस्थितीत जनतेच्या हातात काय उपाय उरतोय.

निष्कर्ष :

संवैधानिक संस्था या भारतीय लोकशाहीचा कणा आहेत. सिद्धांतानुसार या संस्था स्वतंत्र, निष्पक्ष व कार्यक्षम असाव्यात. परंतु व्यवहारात राजकीय हस्तक्षेप, प्रशासकीय अडचणी व पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो. सार्वत्रिक प्रौढ मताधिकारावर आधारित मुक्त व न्याय निवडणुकाद्वारे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची निर्णायक उत्तरे मिळाली तरच सर्व संबंधितांना मान्य होण्याची जास्तीत जास्त शक्यता असल्यामुळे निवडणुकांचे विश्वासनीयरित्या संचलन होणे ही बाब अभूतपूर्व महत्वाचे ठरली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लगतच्या काही वर्षात मुक्त व न्याय निवडणूक घेणे फारसे अवघड नव्हते पण राजकारण जसजसे गुंतागुंतीचे होत गेले, राजकीय पक्षांमधील व पुढाऱ्यांमधील स्पर्धा जसजशी तीव्र होत गेली आणि यशासाठी कोणतेही सूक्तासूक्त मार्ग शम्य आहेत ही धारणा जसजशी बळावत गेली तसतसे निवडणूक आयोगाचे काम अवघड झाले. एक तटस्थ यंत्रना हे त्याचे स्वरूप मागे पडून स्वतः पुढाकार घेऊन काय ठोस सकारात्मक पाऊल उचलणारी संस्था असे स्वरूप निवडणूक आयोगाला प्राप्त झाले आहे. निवडणूक आयोगाने अनेक महत्त्वाचे निर्णय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

अलीकडच्या काळात काही वर्षात घेतले असून या व्यवस्थेवर ठसा उमटवणाऱ्या अनेक नव्या प्रक्रिया सुरू केल्या हे नमूद करावेच लागेल. परंतु अलीकडील काळात निवडणुकीशी संबंधित आपली तक्रार असल्यास निवडणूक आयोग आपल्याला न्याय देऊ शकेल याबाबतीत साशंकता निर्माण झाल्याचे दिसून येते. म्हणून या संस्थांचे रक्षण करणे व लोकशाही मूल्यांना प्रामाणिक राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. गोगडीया (डॉ.) उमेश (२०२५) 'भारतातील संविधानिक संस्था' अथर्व प्रकाशन, धुळे, प्रथमावृत्ती.
2. भोळे (डॉ.) भा. ल, (२०१०) 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' पिंपळापुरे प्रकाशन नागपूर. द्वितीय आवृत्ती.
3. तेलतुंबडे आनंद (२०२५('The Wire', मध्ये प्रसिद्ध झालेला लेख (अनु) मिलिंद भवार.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मातृभाषेतील शिक्षणाचा प्रश्न घटनात्मक आणि सांस्कृतिक चिंतन

रूपाली सावगावे
मराठी विभाग जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर

Manuscript ID:
JRD -2025-170932
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 164-168
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

मातृभाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती व्यक्तीच्या सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक जीवनाची पाया आहे. शिक्षणात मातृभाषेचा वापर विद्यार्थ्यांच्या संकल्पनांचे आकलन सुलभ करून त्यांच्या बौद्धिक आणि भावनिक विकासाला चालना देतो. मातृभाषेतील शिक्षण केवळ भाषेचा वापर नसून, त्या भाषेशी जोडलेल्या मूल्य, परंपरा, संस्कृती आणि लोकज्ञानाचे संवर्धन करते. भारतीय राज्यघटनेने अनुच्छेद 29, 30, 350A आणि 351 अंतर्गत मातृभाषा आणि भाषिक विविधतेचे संरक्षण केले आहे. NEP 2020 नुसार प्राथमिक शिक्षणात मातृभाषेला प्राधान्य देणे हे शैक्षणिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या आवश्यक ठरते. तथापि, पालकांची मानसिकता, उच्च शिक्षणातील मर्यादा, शैक्षणिक साधनांची कमतरता आणि शहरीकरणामुळे मातृभाषेचे शिक्षण आव्हानात्मक ठरते. या संदर्भात प्रभावी धोरणे, शिक्षक प्रशिक्षण, डिजिटल साधनांचा वापर आणि सामाजिक जागृती आवश्यक आहे. मातृभाषेतील शिक्षणामुळे राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक जाणीव आणि बहुभाषिक समृद्धी साध्य होऊ शकते.

मुख्यशब्द: *मातृभाषा, शिक्षण, भारतीय राज्यघटना, अनुच्छेद 29, 30, 350A, 351, राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020), सांस्कृतिक चिंतन, भाषिक विविधता, शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक एकात्मता, मूल्य शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण.*

प्रस्तावना

मातृभाषा म्हणजे केवळ संवादाचे माध्यम नसूनती व्यक्तीच्या मानसिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाशी अखंडपणे जोडलेली असते.शिक्षणात मातृभाषेच्या भूमिकेचा अभ्यास करणेकेवळ शिक्षणाचे तांत्रिक किंवा शैक्षणिक प्रश्न इतकेच नाही तरत्या मागील सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक घटना आणि चिंतनाचा अभ्यास देखील आहे.मातृभाषेतून शिक्षण दिले गेले असता मुलांचे संकल्पनांचे आकलन सहज होते. त्यांच्या बैद्धिक विकास अधिक सुस्पष्ट आणि परिणामकारक होतो. त्यामुळे मातृभाषेतील शिक्षणाच्या प्रश्नांना मध्ये फक्त अभ्यासक्रम किंवा माध्यम भाषेचा विचार नसून, तो एक व्यापक सामाजिक सांस्कृतिक संदर्भ असतो. भारतासह अनेक देशांत मातृभाषेतून शिक्षण दिले जाण्याचे आयोजन आहे. कारण मातृभाषा मुलांच्या संज्ञानात्मक आणि भावनिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचीआहे. मातृभाषाजपणेकेवळभाषेचेसरंक्षणनाही. तरत्या भाषेशी जोडलेले सांस्कृतिक, पुरातनज्ञान परंपराआणि मूल्ये टिकवणेदेखील आहे. शिक्षणातील मातृभाषेच्या कटकटी मुळे उध्दवणाऱ्या प्रश्नांनाचा अभ्यास घटनात्मक म्हणजे विद्यमान वास्तव, समस्या आणि अनुभवयांच्या आधारे करणे आवश्यक आहे. तसेचया मध्ये सांस्कृतिक चिंतन नावाचा भाग ही महत्त्वाचा आहे. ज्यातत्यांच्या संस्कृतीची जाणीव, आदर आणि संवर्धन यावर भर दिला जातो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
रूपाली सावगावे, मराठी विभाग जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर

How to cite this article:
सावगावे, . रूपाली . (2025). मातृभाषेतील शिक्षणाचा प्रश्न घटनात्मक आणि सांस्कृतिक चिंतन. Journal of Research & Development, 17(9(IV)), 164–168.
https://doi.org/10.5281/zenodo.17919980

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17919980
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

मातृभाषेतील शिक्षणाच्या प्रश्नांनाचे घटनात्मक वसांस्कृतिक चिंतन करणेम्हणजे एक दृष्टिकोन विकसित करणे,जेया विषयाशी संबंधित सर्व अंगांना अध्ययनातून मातृभाषा शिक्षणाची गरज , त्यांचे फायदे अडचणी , सामाजिक, सांस्कृतिक परिणाम तसेच भविष्यातील शिक्षण धोरणासाठी मार्ग दर्शनाचे आकलन वाटते .जे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते. अशाप्रकारे मातृभाषेतील शिक्षण प्रश्नांचा अभ्यास, त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक मोलाचा शोध घेण्याचा प्रयत्न हा शिक्षण शास्त्र आणि समाजशास्त्राचा संग्रह आहे. ज्यामुळे शिक्षक पालक शाळा तसेच नितीनिर्माता यांना योग्य दिशा मिळू शकते.

मातृभाषेचे शैक्षणिक महत्व

मातृभाषा म्हणजे आपली जन्मभूमीची भाषा शिकण्यासाठी सर्वात नैसर्गिक आणि प्रभावी माध्यम असते.शैक्षणिक दृष्टीने मातृभाषेचे महत्व अनेक पैलूमध्ये प्रकट होते. ज्ञान ग्रहणाची सुलभता: मुलांना जेव्हा त्यांच्या मातृभाषेत शिक्षण दिले जाते तेव्हा ते विषयांच्या संकल्पना सोप्या आणि स्पष्ट पध्दतीने समजू शकतात. नव्या ज्ञानाचा प्रभाव पटपट होतो आणि शैक्षणिक प्रगती जलदहोते. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मुलं आपली मातृभाषा सर्व प्रथम आत्मसात करतात. त्यामुळे शिक्षणाची प्राथमिक पायाभरणी मातृभाषेत केल्यास संकल्पनाची समज अधिक सखोल होते. सर्जनशीलता आणि विचारशक्ती-: मातृ भाषेतून शिक्षण मुलांच्या मनोवैज्ञानिक आणि बौद्धिक विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या विचारांची वाढ मातृभाषेच्या माध्यमातून होणे सहज शक्य होते.सांस्कृतिक जडीबुटी - मातृभाषा म्हणजे केवळ बोली नाही तरएक सांस्कृतिक आणि सामाजिक ओळखही आहे.मातृभाषेत शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सांस्कृतीशी,परस्परांशी आणि समाजाशी जोडले जाण्यास मदतहोते.

आत्मविश्वास वअभिव्यक्ती - मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सामाजिक समूहाच्या ओळखीचा अभिमान वाटतो . त्यांचा सामाजिक स्वाभिमान वाढतो.

शिकण्याचा आत्मविश्वास आणि सहभाग -मातृभाषावापरल्याने विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत अधिक सक्रिय सहभागी होतात.जे त्यांचा आत्मविश्वास वाढवते.

उदाहरणार्थ, जर्मनी फ्रान्स सारख्या प्रगत देशांमध्ये प्राथमिक तेउच्च शिक्षण सर्वसाधारणपणे मातृ भाषेतच दिले जाते. जेत्यांच्या शिक्षण आणि सांस्कृतिक जपणुकीसाठी खूप उपयुक्त ठरते.भारतातही अनेक प्रदेशांमध्ये मातृभाषेतून शिक्षण चालू असून याला अधिक प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.जेणेकरून विद्यार्थ्यांचा सार्वीगीण विकास होईल आणि त्यांची संस्कृती - स्मृती जपली जाईल म्हणून मातृभाषेतील शिक्षणाला प्राधान्य देणे म्हणजे केवळ शैक्षणिक प्रगती करणेनव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक समृद्धीची देखील गुरूकिल्ली आहे.

घटनात्मकतरतुदी -

भारतीय राज्यघटनेत भाषिक विविधतेचा सन्मान आणि मातृभाषेच्या संवर्धनासाठी कही महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे.

- अनुच्छेद२९- अल्पसंख्याकांचे सांस्कृतिक वशैक्षणिक अधिकार देण्यात आला.
- अनुच्छेद ३०- अल्पसंख्याकांना त्यांच्या भाषेतील शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा
- अधिकार दिला.
- अनुच्छेद ३५०A- प्राथमिक शिक्षण मातृभाषेत देण्याबाबत राज्याने आवश्यक सोयी करावी अशी शिफारस केली आहे.
- अनुच्छेद ३५१- हिंदी सह इतर भारतीय भाषांचा विकास आणि संवर्धन करण्याची शिफारस करण्यात आली.
- भारतीय राज्यघटनेत अनेक राज्यांसाठी घटनात्मक तरतुदी आहेत. ज्या त्या राज्यांच्या विचार करून तयार करण्यात आल्या आहेत.उदा. महाराष्ट्र, गुजरात, सिक्कीम, नागालँड आणि मिझोराम या सारख्या राज्यांसाठी अशाविशेष तरतुदी केलेल्या आहेत. ज्यामुळे त्या राज्यांच्या देशातील एकरूपतेत आणि विकासात मदत होते.
- यातरतुदी राज्यांमध्ये सामाजिक समरसता सांस्कृतिक संवर्धन, विशेष आर्थिक वप्रशासनिक सुविधा तसेच शिक्षण व विकासाच्या विशेष योजनांसाठी तरतुदी करतात.काही तरतुदी तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात. जोपर्यंत संबंधित गरजापूर्ण होत नाहीत किंवा परिस्थिती स्थिर होत नाही.
- उदा.भारतीय राज्यघटनेतील कलम३७० (जम्मू - काश्मीर) ही एक अशी घटनात्मक तरतुद होती,जीनंतर रद्द करण्यात आली.तसेच नागालँड सारख्या राज्यांमध्ये स्थानिक सामाजिक वसांस्कृतिक प्रथांचे संरक्षणासाठी विशेष तरतुदी आहेत.
- सरळ शब्दात सांगायचे झाले तर घटनात्मक तरतुदी म्हणजे संविधानात दिलेल्या विशेष तरतुदी, ज्यामुळे त्या राज्यांच्या किंवा भागाच्या विशिष्ट गरजांची पूर्तता केली जाते.सामाजिक शांतता राखली जाते आणि विकासाच्या वाटा मोकळ्या होतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

- सांस्कृतिक चिंतन -सांस्कृतिक चिंतन हा माणसाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.सांकृतिक चिंतन म्हणजे समाजाच्या, व्यक्तीच्या व समूहाच्या जीवन पध्दती, मूल्येपरंपरा, विचारधारा आणि आचारधारा यांचा अभ्यास व विश्लेषण करणे.
- मानवाची बुद्धी आणि विचारांच्या जन्मापासून सांस्कृतीची निर्मिती झाली.यासंस्कृती मध्ये जीवनाशी निगडित अनेक घटक असतात. व्यक्ती किंवा समाजाचे विचार, प्रवृत्ती, राहणीमान आचारविचार हेसर्व संस्कृतीच्या प्रभावाखाली घड्यात. त्यामुळे सांस्कृतिक चिंतनात फक्त स्थूल स्वरूपच नव्हे तर सूक्ष्म मूल्ये वतत्वांचा समावेश असतो. कोणत्याही समाजाची प्रगती अथवा अधोगती त्यांच्या सांस्कृतिक अवलंबून असते. म्हणूनच , संस्कृतीचे जतन संवर्धन आणि योग्य दिशा देणेहे महत्त्वाचे आहे. .
- मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलांमध्ये संस्कृतीचे संवर्धन व आत्मीयता वाढते.
- सांस्कृतिक ओळख आणि जिव्हाळा - मातृभाषेतून शिक्षण घेतले की मुले आपल्या समाजाशीपरंपरेशी घट्टपणे जोडली जातात. आत्मविश्वास आणि अभिमान निर्माण होतो. [1]
- भाषाहे केवळ संवादाचे साधननसून संस्कृती,मूल्ये,परंपरा आणि विचारधारा यांचेवा हकदेखील आहेत. त्यामुळे मातृभाषेतील शिक्षणामुळे ज्ञानसंपदाना सोबतच सांस्कृतिक चेतनेचेदेखील संवर्धन होते.
- मुलांच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासासाठी पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या संस्कृतीशी जोडलेली भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास आणि विचार शक्तीस चालना मिळते.
- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) देखील कुठे जमले तर किमान 5 वी पर्यंत आणि शक्यतो 8 वी पर्यंत मातृभाषा/ प्रादेशिक भाषेतून शिक्षणावर भरदेते .
- सांस्कृतिक संबंध आणि वारसा - मातृभाषा ही आपल्या संस्कृतीचा, परंपराचा आणि लोकवाशाचा वाहक असते. त्यामुळे मातृभाषेतील शिक्षणामुळे मुलांमध्ये आपली संस्कृती, रुढी,सण, उत्सव लोककला , साहित्य आणि इतिहास याविषयी आत्मीयता निर्माण होते.
- भाषेतील लोकगीत ,कथा, म्हणी,गाणीनृत्य या गोष्टी मुलांमध्ये सांस्कृतिक जागृती करतात.
- मूल्य शिक्षण मातृभाषेतील माध्यमातून शिकताना मुले आपल्यातील आदर्श, नीति ,मूल्ये , सामाजिक शिष्टाचार आणि परंपरा आत्मासात करतात.हा अभ्यास वागणुकीत संस्कार,मनोबल ,इमानदारी सहकार्य आपुलकी आणि एकजूट यासारखी मूल्ये वाढवतो.

सामाजिक ऐक्य :

- मातृभाषा ही संवाद साधण्याचे सर्व साधारण मूलभूत साधन आहे. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत मुलांमध्ये सामाजिक ऐक्य आपुलकी व राष्ट्रीय एकात्मतेचा भाव निर्माण होतो.
- अनेक भाषांचे वाचन,लेखन आल्याने बहुभाषिक आदर भिन्न संस्कृतींच्या सन्मानाची शिकवण मिळते.

सृजनशीलता आणि मौलिकता -

- मातृभाषेतून शिक्षण घेतल्यानं विचारांची स्पष्टता कल्पकता व सृजनशीलता वाढते ,कारण भाषा आणि संस्कृती यांचा संबंध अतूट आहे.
- बालकांच्या आवडीनिवडी, कलागुण, विचारशक्ती व प्रतिभेला चालना मिळते.
- पारंपारिक ज्ञान आणि वारसा जतन-
- मातृभाषेतील शिक्षणा मधून लोक परंपरा, स्थानिक ज्ञान औषधी वनस्पती, तंत्रज्ञान कृषी परंपरा आरोग्य - शिक्षणया विषयी माहिती पुढच्या पिढीकडे संक्रमित होते.
- संस्कृतीचे हजारोवर्षांचे अपार ज्ञान भाषेमुळेच सुरक्षित आणि प्रगत राहते.
- मातृभाषेतील शिक्षणात सांस्कृतिक, मूल्यांचा समावेश होतो.जे केवळ भाषेचे नव्हे तर विचार, व्यवहार , आचारधर्म , जीवनशैली आणि सामाजिक एकोप्याशी जोडलेली असतात. त्यामुळे मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास मुळापासून घडतो आणि त्यांना भारतीय समाज,वारसा , संस्कार आणि मूल्यांचा गोडवा लाभतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

मातृभाषेतील शिक्षणा पुढील आव्हाने :

- पालक वर्गाची मानसिकता व सामाजिक प्रतिष्ठा -*अनेक पालक इंग्रजी किंवा इतर प्रगत भाषांतील शिक्षणाला जास्त महत्त्व देतात व मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या मुलांस कमीपणाची भावना येऊ नये यासाठी इंग्रजी माध्यमाकडे वळतात.
- मातृभाषा निवडणे हे आधुनिकतेच्या किंवा प्रतिष्ठेच्या विरोधात वाटते. अशा काहीची धारणा आहे.

उच्च शिक्षणाच्या संधीचा अभाव : भारतात अजूनही वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापनइ उच्च शिक्षण मातृभाषेत मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे शालेय शिक्षण मातृभाषेतून झाले तरीपुढील शिक्षणात अडथळे निर्माण होतात.

अभ्यासक्रम व शैक्षणिक साधनांचे अभाव -

- अनेक मातृभाषेत मध्ये अद्यावत पाठ्यपुस्तके शैक्षणिक किट डिजिटल साधने किंवा उच्च दर्जाचे अनुवादित शैक्षणिक स्त्रोत उपलब्ध नाहीत.
- मुल्यवर्धन, विज्ञान, तंत्रज्ञानइ विषयासाठी दर्जादार सामग्री आणि तज्ज्ञ शिक्षकांची कमतरता भासते.

बहुभाषिकता आणि संवादाची भीती :

- मुलांना फक्त मातृभाषेवर भर दिल्यास इतर भाषांचा संपर्क कमजोर होईल अशी भीती काही पालक व शिक्षकांना वाटते.
- काही इंग्रजी किंवा इतर भाषा शिकण्यासाठी आवश्यक असलेली अधिष्ठान नाही सेहोते,असे ही मत आहे.

सरकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी-

- मातृभाषेच्या शिक्षणा संबंधीचे सरकारी निर्णय,धोरणे व अंमलबजावणी व्यवस्थित होईलच याची हमी नसते .धोरणे असली तरी प्रत्यक्षात सर्वत्रत्या बाबतीत जागरूकता किंवा प्रोत्साहन नसते.
- शहरीकरण,गतीमान जीवनशैली आणि घरगुती भाषा वातावरणाचे अभाव.
- शहरी भागातील लोक अनेकदा घराबाहेरच्या भाषा मुलांना शिकवतात.
- घरात समाजात, शाळेत मातृभाषा वापरण्याचे प्रमाण कमी होत असल्यामुळे भाषा व संवर्धन कमी होते.

मातृभाषेतील शिक्षणातील उपाय योजना:

सभ्य धोरणांची अंमलबजावणी :

- राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) प्रमाणे ,शक्य असेल त्या ठिकाणी किमान ५वीपर्यंत (आणि शक्यतो ८वीपर्यंत) मातृभाषा/ प्रादेशिक भाषेतून शिक्षण देण्याची सशक्त अंमलबजावणी करण्यात आली.
- शाळांमध्ये मातृभाषेतील गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तके व अध्यापन साहित्य उपलब्ध करणे.

घटनेतील तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी -

- अनुच्छेद २९(१),३०(१) ,३५०A आणि ३५०B या अंतर्गत भाषिक अल्प संख्यांकांच्या हक्कांचे प्रत्यक्ष सरंक्षण व पालन सुनिश्चित करणे.
- आरटीई कायद्याच्या (२००९) धारा२९ (f) नूसारशक्य तेथे शिक्षणाचे माध्यम मुलांचे मातृभाषा ठेवणं बंधनकारक केलीआहे.
- शिक्षक प्रशिक्षण व बहुभाषिक कौशल्य विकास:
- शिक्षकांसाठी मातृभाषेतील अध्यापन आणि बहुभाषिक शिक्षण तंत्रावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे.
- नवाचार , तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांचा वापर करून शिक्षण उपयुक्त व रूची पूर्ण बनवणे.
- उच्च शिक्षणातील मातृभाषेचे प्रमाण वाढवणे .
- तांत्रिक, वैद्यकीय व्यवस्थापन इउच्च शिक्षण अभ्यास क्रमही मातृ भाषेतील उपलब्ध करून देणे.
- AICTE प्रमाणे (तांत्रिक शिक्षण परिषद) विविध संस्था विविध भाषांमध्ये अभ्यासक्रम देण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. हे राष्ट्रीय स्तरावर विस्तारवणे.

पालक वसमाजामध्ये जागृकता :

- पालकांना मातृभाषेच्या शिक्षणाचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक लाभ समजवून सांगणे.
- मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवून समाजाची मानसिकता बदलणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

डिजिटल आणि मल्टिमीडिया वर भर :

- मातृभाषेतील दर्जेदार डिजिटल शैक्षणिक साहित्य मोबाईल ॲप्स,खेळ , व्हिडिओ इ. विकसित करुन विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचवणे.

निष्कर्ष:

१) घटनात्मक तरतुदींमध्ये मातृभाषेला प्राधान्य सवय जगण्याची भाषा असते. त्यामुळे तिचा सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून आदर व सन्मान करणे आवश्यक आहे.मातृभाषेत शिक्षण देणे ही लोकशासनाची आणि राज्यव्यवस्थेची जबाबदारी असते.

२) बहुभाषिक शिक्षणाची गरज वाढली आहे.,पण मातृभाषेला शासकीय व शैक्षणिक स्तरावर पुरेसा पाठिंबा मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत शिकण्याचा अधिकार उचित प्रकारे मिळाला पाहिजे.

३) शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी मातृभाषेतील शिक्षण महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुलांचा शाळेतील रस सहभागीपणा ,वाढतो.शिक्षण गमावण्याचे प्रमाण कमी होते. आणि ज्ञान अधिक चांगल्या प्रकारे आत्मसात होते.

४) जर मुलांना त्यांच्या मातृभाषे वर प्रभूत्व प्राप्त असेल, तर ते परकीय भाषा (असेइंग्रजी) अधिक प्रभावीपणे शिकू शकतात.

५) शिक्षणाने जीवनाभिमुख होऊन सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवले पाहिजे, या साठी मातृभाषेतील शिक्षण महत्त्वाचे आहे.

६) मातृभाषा सोडून पोटासाठी किंवा जागतिक प्रतिष्ठेसाठी परकीय भाषांमध्ये शिक्षण देण्याची हाताळणी मुळे सांस्कृतिक समृद्धी कमी होते.सामाजिक व आर्थिक संकटे वाढतात.

६) शैक्षणिक सुधारणा आणि धोरणांत मातृभाषेला प्राधान्य देणे शिक्षकांची नेमणूक व प्रशिक्षण मातृभाषेत उत्तम शिक्षणासाठी करणे आवश्यक आहे.

७) युनिसेफ , युनेस्को, आणि अन्य आंतरराष्ट्रीय संस्था मातृभाषेतून शिक्षण करण्याचा परिणामकारक पणा वाढतो.

८) महात्मा गांधींनी आणि इतरशिक्षण तज्ज्ञांनी मातृभाषेत शिक्षणाला प्रोत्साहन दिले आहे. आणि ते आजही शैक्षणिक परिवर्तनासाठी खूपगरजेचे मानलेजाते. मातृभाषेतील शिक्षणाच्या मुख्य उद्दीष्टांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी, सांस्कृतिक ओळख टिकवावी आणि बहुभाषिक शिक्षणाचा पाया मजबूत करावायांचा समावेश आहे.

संदर्भ सूची

1. भारतीय राज्यघटना अधिकृतभाषा विषयक अनुच्छेद
2. जोशी आरजी (२०१५) भारतीय भाषांचा अभ्यास पुणे -पदयप्रकाशन
3. कुलकर्णी एस. डी .(२०१९) मातृभाषा आणि शिक्षण मुंबई राजहंस प्रकाशन

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

'ययाती' समतेचा तत्त्वचिंतनात्मक शोध

अस्मिता अशोक पायनाईक[1], डॉ. निशा भंडारे[2]
[1,2]मॉर्डन कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे
Email: asmitapainaik95@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170933
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 169-172
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती' कादंबरीतून पौराणिक कथानकाच्या माध्यमातून मानवी जीवनातील समतेचा तत्त्वचिंतनात्मक शोध घेण्यात आलेला आहे. या कादंबरीत स्त्री-पुरुष समता, सामाजिक-आर्थिक समता, पिढीगत समता आणि आत्मतत्त्वाधिष्ठित समता या विविध पैलूंमधून समानतेचा विचार मांडला आहे. 'देवयानी' आणि 'शर्मिष्ठा' ही पात्रे स्त्री-पुरुष समानतेचे प्रतीक ठरतात, तर ययाती-यदू यांच्यातील संवाद पिढीगत विचारभिन्नतेवर आधारित समतेचा विचार मांडतो. सामाजिक-आर्थिक स्तरावर लेखकाने जात, वर्ण, सत्ता आणि संपत्ती यांच्या पलीकडे जाऊन समानतेचा दृष्टिकोन मांडला आहे. आत्मतत्त्वावर आधारित सर्वमानवतेचा विचार या कादंबरीचा गाभा आहे. मनुष्याचा आत्मा हा सर्वांसाठी समान आहे आणि समाजातील असमानता दूर करून सर्वांमध्ये एकात्मता आणि नैतिकतेची भावना रुजवणे हेच लेखकाचे उद्दिष्ट आहे. 'ययाती' कादंबरीतून समता, नैतिकता आणि मानवतावादाचा संगम साधला गेला आहे, ज्यामुळे ती भारतीय तत्त्वज्ञान आणि समाजचिंतनाच्या परंपरेतील एक कालजयी कादंबरी ठरते.

मुख्यशब्द: *ययाती, वि. स. खांडेकर, समता, तत्त्वचिंतन, स्त्री-पुरुष समता, सामाजिक-आर्थिक समता, पिढीगत समता, आत्मतत्त्व, मानवतावाद, समानता, नैतिक मूल्ये, सामाजिक न्याय, आधुनिक दृष्टिकोन.*

प्रस्तावना

मराठी साहित्यात अनेकविध ग्रंथांची निर्मिती झालेली आहे. त्यातल्या त्यात 'महाभारत', 'रामायण' ही दोन महाकाव्ये आजही मराठी वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवीत आहेत. भारतीय संस्कृतीतील हे मूलग्रंथ असून ते केवळ पौराणिक कथानकाची मांडणी करीत नाहीत, तर पौराणिक कथानकाच्या, पात्रांच्या माध्यमातून आधुनिक विचारांची बैठकही ह्या ग्रंथांना प्राप्त झालेली आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. 'महाभारत' हा ग्रंथ अनेक मराठी लेखक, संशोधक, वाचक यांच्या पसंतीस ठरलेला ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाचे विशेष सांगताना 'महाभारत एक सूडाचा प्रवास' या दाजी पणशीकरांच्या पुस्तकाला नरहर कुरंदकर यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत ते म्हणतात, "महाभारतात मानवी जीवनातील सर्व भव्यता आणि दिव्यता, सर्व क्षुद्रता आणि बीभत्सता एकत्रित आलेली आहे. ते अनेक पातळीवरील अनेक पदरी मानवी जीवनाचे सम्यक चित्र आहे."[१] कुरंदकरांनी मांडलेले हे मत महाभारत ग्रंथाचा सांधा मानवी जीवनाशी, सामाजिक परिस्थितीशी जोडताना दिसतात. मराठी साहित्याच्या प्रारंभिक काळापासून आजतागायत हा ग्रंथ बहुतांश लेखकाच्या लेखणीचा भाग बनलेला आहे. प्रामुख्याने मराठीमध्ये कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराला 'महाभारता'तील कथानक व पात्रांनी भूरळ घातलेली आहे, असे प्रकर्षाने जाणवते. 'महाभारता'वर आधारित अनेक मराठी कादंबऱ्याचे लेखन झालेले आहे. ह्या कादंबऱ्यांनी केवळ 'महाभारत' कथेचे पुनरूच्चारण केले नाही, तर त्या कथांमधून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विचारांनाही आवाहन केलेले आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
अस्मिता अशोक पायनाईक, मॉर्डन कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे

How to cite this article:
पायनाईक, . अस्मिता . अशोक ., & भंडारे, . निशा . (2025). 'ययाती' समतेचा तत्त्वचिंतनात्मक शोध. Journal of Research & Development, 17(9(IV)), 169–172. https://doi.org/10.5281/zenodo.17720898

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17720898
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

कालानुक्रमे बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीशी पौराणिक कथेचा सांधा जोडलेला आहे. त्यामुळे कथानकातील संघर्ष, सामाजिक प्रश्न यांच्या पुनर्वाचनातून आधुनिक सामाजिक संदर्भात समतेच्या विचारांचीही मांडणी मराठी कादंबऱ्यांनी केलेली आहे. हा विचार स्त्री-पुरूष समता, सामाजिक – राजकीय समता, जाती-धर्म समता, वर्ग व सत्ता संबंधातील समता, आत्मतत्त्वाधिष्ठित समता, सांस्कृतिक समता अशा विविध स्तरांवर आधारभूत आहे.

महाभारतावर आधारित कथानक व पात्रांच्या माध्यमातून मराठीमध्ये अनेक कादंबऱ्याचे लिखाण झाले असले, तरीही मराठी वाचकांच्या मनावर आजही आपली छाप कायम ठेवणारी ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कादंबरी म्हणजे वि. स. खांडेकरांची 'ययाती' होय. कादंबरीचा प्रारंभ देव-दानव युद्धापासून होत असून नहूषाच्या मदतीने देवगण युद्ध जिंकतात आणि नहूषाला इंद्रपदाची प्राप्ती होते. परंतु नहुष गर्वितपणे वागून इंद्राणीच्या लोभापायी सप्तर्षींच्या पालखीत प्रवास करतो. ह्या दरम्यान तो अगस्त्य ऋषींचा अपमान करतो. त्यामुळे क्रोधाग्नी संतप्त झालेले ऋषी नहुषाला शाप देतात की, त्यांची मुले कधीही सुखी होणार नाही. इथपासून 'ययाती' कादंबरीच्या कथानकाचा प्रवास सुरू होतो. नहुषाची दोन मुले म्हणजे 'यती' आणि 'ययाती' थोडक्यात त्यांच्या ह्या दोन मुलांच्या व प्रामुख्याने ययातीच्या जीवनातील जीवनप्रवासाची कथा वि. स. खांडेकरांनी सदर कादंबरीतून सांगितलेली आहे. ही कादंबरी ययातीचा केवळ जीवनप्रवास सांगत नसून लेखक कादंबरीच्या माध्यमातून मानवी जीवनमूल्यांचे, नैतिकतेचे आणि सामाजिक संदर्भांचे पुनर्मूल्यांकन आधुनिक पद्धतीने रेखाटतात. त्यामुळे ह्या कादंबरीत अनेक पद्धतीने समतेचा विचार अभिव्यक्त झाल्याचे जाणवते. प्रामुख्याने हा विचार स्त्री-पुरूष समता, पिढीगत समता, सामाजिक-आर्थिक समता, आत्मतत्त्वाधिष्ठित समता अशा घटकांवर आधारित आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधाची पुढील मांडणी ही उपरोल्लेखित घटकांच्या आधारे करावयाची आहे.

स्त्री-पुरूष समता

'ययाती' कादंबरीत 'देवयानी' आणि 'शर्मिष्ठा' ही दोन प्रमुख स्त्री पात्रे आहेत. ह्या दोन स्त्री – पात्रांच्याद्वारे लेखक स्त्री-पुरूषांच्या वैयक्तिक, वैचारिक समतेच्या विचारांना शब्दबद्ध करतात. ययातीची पत्नी देवयानी आणि दासीरूपी प्रेयसी शर्मिष्ठा ह्या दोघीही वैचारिक दृष्टीने एकमेकांच्या विरोधी असूनही स्वतंत्र विचारांची सांगड घालताना पाहावयास मिळतात. ययातीची पत्नी देवयानी इतकेच तिचे अस्तित्व न राहता केवळ पत्नीत्वापूरती ती मर्यादीत राहत नाही. स्व अस्तित्व टिकविण्यासाठी ती जागृत आहे, कोणताही अपमान सहन करीत नाही. अलकेच्या दुसऱ्या भेटीत ययातीने तिच्याशी जवळीक साधण्याचा केलेला प्रयत्न आणि त्यावेळेस अलकेने दिलेला नकार. स्त्रीच्या आत्मसन्मातील समतेचे द्योतक वाटते. त्यानंतर अलका आणि ययातीमध्ये राजा आणि दासी ही असमानता नाहीशी होऊन तिचे रूपांतर बहिण-भावाच्या नात्यात झाल्याचे सांगून लेखक समानतेचा अजून एक मुद्दा अधोरेखित करतात. शुक्राचार्य आपली कन्या देवयानीला 'देव' म्हणून हाक मारित, त्यांच्या हाकेतही लिंगभेदाला बाजूला सारून स्त्री-पुरूष असे भेद करण्यापेक्षा दोघेही आधी मनुष्य आहेत. अशी समानतेची भावना व्यक्त होते. सदर कादंबरीतून ह्या दोन्ही स्त्रीया स्वतंत्र अस्तित्व असलेल्या, स्वतंत्र निर्णयक्षमता, इच्छाशक्ती आणि भावनांची अभिव्यक्ती करीत असताना दिसून येतात. त्यामुळे खांडेकरांसारखा मानवतावादी लेखक येथे स्त्रीला पुरूषाच्या बरोबरीने आणणारी स्त्री-पुरूष समतेच्या विचारांची भूमिका मांडतात.

पिढीगत समता

पिढीगत समता ही प्रामुख्याने युवक आणि वृद्ध यांच्यामधील वैचारिक तफावतेतून साधलेली समता कादंबरीत लेखक शब्दद्ध करीत असल्याचे पाहावयास मिळते. कादंबरीतील एक प्रसंग म्हणजे ययाती आपले वृद्धत्व आपल्या पुत्रावर यदुवर टाकण्याचा विचार बोलून दाखवतो आणि ययातीचे वृद्धत्व स्वत:वर घेण्यास यदू आपला नकार दर्शवितो. आपले तरूणपण मनसोक्त जगण्याचा विचार समोर ठेवतो. यातून तरूण पिढीलाही स्वतंत्रपणे स्व जीवन जगण्याचा, निर्णय घेण्याचा अधिकार असून वडिलधाऱ्या माणसांनी केवळ सत्ता न गाजवता ह्या तरूणाच्या विचारांचा, अधिकारांचा, निर्णयांचा स्विकार करावा. अशा पद्धतीने प्रस्तुत कादंबरीतून लेखक पिढीगत अन्यायकारक सत्ता संघर्षावर टिका करतात.

सामाजिक- आर्थिक समता

महाभारताचा मूळ गाभा हा सामाजिक विचारांची मांडणी करीत असल्याने कालमानानुसारही ह्यातील कथानक, पात्रे, प्रसंग समाजाचा एक घटक म्हणून साहित्यातून उभी राहतात. समाजातील नाते-संबंध, वर्णभेद, लिंगभेद अशा सर्व घटकांना महाभारताद्वारे तत्त्वज्ञानात्मक बैठक प्राप्त झालेली आहे. 'ययाती' ही कादंबरी मानवतावादी दृष्टीकोनातून लिहिली गेली आहे. त्यामुळे मानवाच्या स्वतंत्र अस्तित्वाचा, त्याच्या स्वतंत्र विचारांचा पुरस्कार करणारी आणि व्यक्ती स्वतंत्रतेतून समानतेचा, एकात्मतेचा मुद्दा अधोरेखित करणारी अशी ही कादंबरी आहे. सामाजिक- आर्थिक समतेचा पैलू उलगडताना लेखक ययातीच्या माध्यमातून लिहितात, "तू वडील भाऊ आहेस. हे सारं राज्य तुझंच आहे, भावाभावांनी खाऊ वाटून घेण्याच्या आनंदाचा आता तरी आपण उपभोग घेऊ"[२] (पृ.क्र. १५) आपल्या भावाला यतीला शोधून आणून राज्यकारभारात समानतेने अधिकाराची देवाण करण्याचा ययातीचा विचार आणि 'राजाच्या पोटी जन्माला आलो, म्हणून राजा झालो.' अशा संवादात्मक रूपाने लेखक सामाजिक समतेच्या विचारांची मांडणी करतात.अंगिरस ऋषींच्या आश्रमात ययाती आणि त्यांचा शिष्य कच यांना राहण्यासाठी देण्यात आलेल्या पर्णकुटीविषयी जेव्हा लेखक वर्णन करतात की, "चिमण्या बहिणी-बहिणींनी एकमेकींना बिलगून एकाच पांघरूणात झोपी जावे, तशा काळसर हिरव्या वृक्षराजीतल्या त्या दोन पर्णकुटिका दिसत होत्या."[३] (पृ. ५९) ययाती राजपुत्र असूनही त्याला कचाप्रमाणेच राहण्याची सोय केली होती. कुठल्याही

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

प्रकारे इतरांना असमानता वाटेल असे वर्तन ययाती सोबत केले गेले नाही. त्यामुळे लेखक इथे समाजातील प्रत्येक घटकाला समान तत्त्वावर जगण्याचा अधिकार आहे, असा सर्वसमानतेचा मुद्दा अधोरेखित करतात.सामाजिक बंधनांना झुंगारून प्रियकर-प्रेयसी एकत्र आल्यानंतर त्यांच्यामध्ये निर्माण झालेली एकरूपतेविषयी सांगताना लेखक ययाती आणि मुकुलिकेमध्ये घडून आलेल्या समागम प्रसंगाविषयी ययाती म्हणतो, "मी युवराज राहिलो नाही. ती दासी राहिली नाही. आम्ही केवळ दोन प्रेमिक झालो."[४](पृ.६५) थोडक्यात समाजाने आखून दिलेल्या चौकटीत जीवन जगत असताना जात-धर्म, पद-प्रतिष्ठा, श्रीमंत- गरीब अशा सर्व सीमारेषा ओलांडून आपल्या ऐहिक सुखाचा विचार जेव्हा मनुष्य करू लागतो. तेव्हा तो समानतेच्या पातळीवर येतो, असा भावार्थ लेखक येथे सूचित करू पाहत असल्याचे जाणवते. त्यानंतर पुढे मैत्रीला कोणतीही जात-पात लागत नाही, वर्णभेदांच्या पलिकडे जाऊन ती माणसामाणसांतील समानता, त्यांच्या कार्यात समानता साधू शकते असा सूचितार्थ कचच्या संवादातून लेखक वाचकांपुढे उलगडताना दिसतात, ते म्हणतात, "प्रत्येक वर्णाने इतर वर्णाचे गुण आत्मसात करण्यात कोणती हानी आहे! अनेक नद्यांचे पाणी एकत्रित करूनच आपण आराध्यदेवतेला अभिषेक करीत असतो."[५] कचाचे उपरोल्लेखित उद्गार समाजातील सर्वसमावेशकतेच्या विचारांची पेरणी करते.

आत्मतत्त्वावर आधारित सर्वमानवता

'ययाती' ही कादंबरी वाचकाला आत्मतत्त्वावर दृष्टीकेंद्रित करण्याची शिकवण देते. मानवाचे व्यक्तिकेंद्रित विचार मोडून मानवाच्या सर्वसमानतेच्या दृष्टीकोनाचा पुरस्कार करते. इंद्रीयजन्य सुखाच्या मोहात अडकून पडलेल्या ययाती सारख्या समाजातील व्यक्तिंना ययातीच्या वैराग्यातून आत्मज्ञानाच्या मार्गावर मार्गक्रमण करण्यास प्रेरित करते. आत्मज्ञानाचा हा दृष्टीकोन स्पष्ट करीत असताना लेखक विविध प्रसंग व त्यातील संवादाच्या माध्यमातून अगदी सहजसुलभरितीने आपले विचार व्यक्त करतात. उदा. ययातीने एका पक्षिणीची शिकार केल्यामुळे त्याच्या शौर्याचा,धनुर्विद्येचा अभिमान बाळगणारे त्याचे आईवडिल, शिकार केलेल्या पाखरांचे मांस शिजविणारी ययातीची आई आणि दुसरीकडे आपल्या मुलाच्या विरहाने व्याकूळ होणारी आई या एकाच व्यक्तीच्या दोन रूपाविषयी चिंतनात्मक विचार मांडताना लेखक ययातीच्या माध्यमातून लिहितात, "अनेक वर्षापूर्वी नाहीशा झालेल्या मुलाच्या आठवणीने आपली आई अजून व्याकूळ होते; पण तिच आई पाखरातल्या एका आईचा मृत्यू हसतमुखाने पाहते! त्या निष्पाप प्राण्याचे शरीर विछिन्न करणाऱ्या मुलाचे कौतुक करते, त्या मुक्या मातेचे मांस मिटक्या मारीत खाते, त्या मांसाचा कण नि कण शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या पिलांकरिता धडपडत होता हे सहज विसरते."[६] (पृ. क्र. २१) इथे ययातीच्या आईच्या कृतीद्वारे लेखक सार्वत्रिक भावनेतील समानतेचा विचार अधोरेखित करतात. तसेच जेव्हा लेखक कच या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून लिहितात की, "मृत्यू कुणाला चुकला आहे, युवराज? वस्त्रं जुनं झालं, म्हणजे आपण ते टाकून देतो ना? आत्माही शरीराचा तसाच त्याग करतो."[७] (पृ. ७३) मनुष्य जीवनात मृत्यू हे एक त्रिकाळ सत्य आहे. ते कुठल्याही गोष्टींचा विचार करीत नाही. मनुष्य जीवनातील अंतिम सत्यातील ही समानतेची चिंतनात्मक पातळी लेखक इथे गाठतात.

निष्कर्ष

१. ययाती ही कादंबरी माणसामाणसातील असमानतेचा मुद्दा प्रकाशझोतात आणून समता, नैतिकता आणि एकात्मता अशा मूल्यांची बीजे रोवते.
२. आधुनिक काळात स्त्री स्वतंत्रतेचा विचार अधोरेखित करताना लेखक पौराणिक पात्रांच्या साहाय्याने प्रगत विचारांची मांडणी करतात व स्त्री-पुरूष समता स्पष्ट करतात.
३. स्त्रिया ह्या केवळ त्यागाचे प्रतिक नसून पुरूषांप्रमाणे स्वतंत्र व्यक्ती म्हणून येतात.
४. स्त्री-पुरूष समतेबरोबरच पिढीगत समतेलाही तितकेच प्राधान्य लेखकांनी दिलेले आहे.
५. प्रत्येक पिढी ही स्वतंत्र आहे, तिच्या जीवनाचा स्वतंत्रपणे विचार करण्याचा अधिकारही तिचाच आहे.
६. पिढीगत समता जोपासत असताना दोन्हीं घटकांमध्ये वैचारिक समतोल राखणे गरजेचे आहे.
७. एकूणच पिढ्यामध्ये वैचारिक समतोल असेल तरच समाजाचा शाश्वत विकास होऊ शकतो.
८. माणसाचे मूल्य हे त्याच्या वर्ण- लिंगावर ठरत नाही, तर ते त्यांच्या आत्मतत्त्व आणि कार्यक्षमतेतून ठरत असते.
९. समाजाचा विकास घडवायचा असेल तर, वर्णभेदाचे, लिंगभेदाचे, सत्तेचे, संपत्तीचे भेद मिटून सर्वांमध्ये आत्मसमानता प्रस्तापित करणे गरजेचे ठरते.
१०. सर्व मानव आत्मतत्त्वाने समान आहे, असे विचारही ययातीच्या माध्यमातून आविष्कृत होत आहेत.

समारोप

थोडक्यात ययाती ही कादंबरी केवळ पौराणिक कथानकाची गुंफण नाही. तर सामाजिक विचारांचा, मानवी नैतिक मूल्यांचा यथोचित उहापोह करणारा आणि तत्त्वज्ञानात्मक बैठक प्राप्त झालेला एक सार ग्रंथ आहे. प्रत्येक मनुष्याच्या आत एकच आत्मतत्त्व आहे. त्यामुळे हरएक मनुष्य हा समान पातळीवर येत असतो. मनुष्याच्या सुप्त भावना साहित्याच्या माध्यमातून पूर्ण होत असतात. ययाती त्या अर्थीही अशीच एक कादंबरी आहे, असे सांगताना अविनाश सप्रे लिहितात, "माणसाला व्यावहारिक जगात जगताना धड 'त्यागही' करता येत नाही नि धड 'भोग' ही घेता येत नाही. त्यामुळेच त्यागाबद्दल आणि भोगाबद्दलचे एक अतृप्त आकर्षण त्याच्या मनात वावरत असते

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

आणि प्रत्यक्षात नसले तर वाह्मयीन विश्वातून ते मिळवण्यात त्याला तात्पुरते का होईना, समाधान वाटते."[८] सप्रेंनी सांगितलेल्या मतानुसार विचार करता, ययाती ही ययातीच्या भोगवादी वृत्तीतून जन्माला आली असली तरीही ती यती, कच ह्या पात्रांच्याद्वारे जीवनाच्या उच्चत्तम मूल्यांची पेरणी करते आणि नकळतपणे सर्व तत्त्वांना समानतेच्या पातळीवर आणून सोडते.

संदर्भग्रंथ

१. पणशीकर दाजी, महाभारत एक सूडाचा प्रवास, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस, मुंबई, दहावी आवृत्ती एप्रिल २०२३, पृ. क्र. २७.
२. खांडेकर, वि. स., ययाती, मेहता पब्लिशिंग हाऊस, छत्तिसावी आवृत्ती सप्टेंबर २०१४, पृ. क्र. १५
३. तत्रैव पृ. क्र. ५९
४. तत्रैव पृ. क्र. ६५
५. तत्रैव पृ. क्र. ६८
६. तत्रैव पृ. क्र. २१
७. तत्रैव पृ. क्र. ७३
८. सप्रे अविनाश, प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती २०१२, पृ. क्र. १६२.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधानाची ७५ वर्षे आणि मूलभूत हक्क

करणसिंह राजेंद्र पाटील
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: patilkaransinh101@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170934
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 173-176
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश :

भारतीय संविधानाचा ७५ वर्षांचा प्रवास हा समाजाच्या बदलत्या गरजांनुसार विकसित होणारा सजीव दस्तऐवज आहे. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क हे लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहेत तसेच भारतीय लोकशाहीचा पाया आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्याचा आधारस्तंभ आहेत. गेल्या ७५ वर्षात मूलभूत हक्कांनी देशाच्या सामाजिक आणि राजकीय जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. संसद मूलभूत हक्क कमी करू शकते परंतु संविधानाच्या मूळ स्वरूपात बदल करू शकत नाही. मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास नागरिक थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात. त्यामुळे ते राज्यसत्तेच्या गैरवापराविरुद्धचे एक शक्तिशाली साधन बनले आहे. संविधानानुसार न्यायालयाने अनेक निर्णयांद्वारे मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याचे कार्य केले आहे. मूलभूत हक्कांच्या संविधानातील अर्थाला न्यायालयाने दिलेल्या निर्णयातून व्यापक स्वरूप आलेले दिसते. समाजातील असमानता आणि भेदभावाची दरी पाहता मूलभूत हक्कांसमोरील आव्हानांमध्ये वाढ होत चाललेली आहे मात्र नागरिकांना संविधान व मूलभूत हक्क यांचाच मोठा आधार आहे. संविधान किंवा राज्यघटना म्हणजेच देशाचा सर्वोच्च कायदा होय. याच्याच आधारे देशाचा कारभार चालतो यामध्ये सरकारची रचना, अधिकार आणि कर्तव्ये तसेच नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यांचा समावेश असतो. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नाहीत तर ते लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहेत. भारतीय संविधानाच्या भाग ३ मध्ये कलम १२ ते कलम ३५ मध्ये मूलभूत हक्क दिलेले आहेत. हे हक्क केवळ कायद्याचे कलम नसून ते भारतीय लोकशाहीचा पाया आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्याचा आधारस्तंभ आहेत. मूलभूत हक्क हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या स्वातंत्र्याची आणि समानतेची हमी देतात. या हक्कांचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे ते राज्यसंस्थेच्या मनमानी अधिकारांवर मर्यादा घालतात. संविधान निर्माणकर्त्यांनी हे सुनिश्चत केले की सरकार कितीही शक्तिशाली असले तरी ते नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेऊ शकत नाही.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, मूलभूत हक्क, लोकशाही मूल्ये, न्यायव्यवस्था, संविधान दुरुस्ती, सर्वोच्च न्यायालय, केशवानंद भारती प्रकरण, मनेका गांधी प्रकरण, गोपनीयतेचा हक्क, जीवन आणि स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य.*

व्यक्तीच्या बौद्धिक, नैतिक, भौतिक आणि आध्यात्मिक अशा सर्वांगिण विकासासाठी संविधानाने पुढील मूलभूत हक्क दिलेले आहेत.

कलम १४ ते कलम १८ – समतेचा हक्क

कलम १९ ते कलम २२ – स्वातंत्र्याचा हक्क

कलम २३ व कलम २४ - शोषणाविरुद्धचा हक्क

कलम २५ ते कलम २८ - धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

कलम २९ व कलम ३० - सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

कलम ३१ – मालमत्तेचा हक्क

कलम ३२ – घटनात्मक संरक्षणाचा हक्क

१९७८ मधील ४४ व्या घटना दुरुस्तीने मालमत्तेचा हक्क हा मूलभूत हक्कांच्या यादीतून काढण्यात आला आहे. त्यामुळे सध्या सहा मूलभूत हक्क आहेत. संविधानाच्या मूळ स्वरूपात बदल न करता संसद मूलभूत हक्क कमी करू शकते अथवा त्यामध्ये सुधारणा करू शकते. सर्वोच्च न्यायालय या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची हमी देते त्यामुळे मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास नागरिक थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
करणसिंह राजेंद्र पाटील, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
पाटील, . करणसिंह . राजेंद्र . (2025). भारतीय संविधानाची ७५ वर्षे आणि मूलभूत हक्क. Journal of Research & Development, 17(9(IV)), 173–176. https://doi.org/10.5281/zenodo.17721101

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17721101
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

कलम २० व कलम २१ वगळता राष्ट्रीय आणीबाणीच्या काळामध्ये मूलभूत हक्क निलंबित करता येतात. तसेच बाह्य आणीबाणी घोषित झाल्यास कलम १९ ने दिलेले सहा हक्क देखिल निलंबित करण्याची तरतूद संविधानामध्ये दिलेली आहे. मूलभूत हक्कांची अंमलबजावणी कायदेशीर हक्कांपेक्षा वेगळी आहे यावरून असे लक्षात येते मूलभूत हक्क निरंकुश नाहीत तर त्यांच्यावर काही मर्यादा आणि बंधने आहेत जे सार्वनजिक सुव्यवस्था, नैतिकता व देशाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक आहेत. मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हाने आणि असमानता दिसून येते तरीही गेल्या ७५ वर्षांमध्ये मूलभूत हक्कांनी देशाच्या सामाजिक आणि राजकीय जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच न्यायव्यवस्थेने या हक्कांचे रक्षक म्हणून काम केले आहे. ज्यामुळे कलम २१ सारख्या जीवन जगण्याचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्कासोबतच इतर हक्कांची देखील वाढलेली व्यापकता दिसून येते.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि त्यांची निर्मिती समजून घेणे.
२) मूलभूत हक्कांसंदर्भात न्यायालयीन भूमिकांचा आढावा घेणे.
३) भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांमध्ये मूलभूत हक्कांची वाढलेली व्याप्ती अभ्यासणे.
४) मूलभूत हक्कांसमोरील आव्हानांचा शोध घेणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. तसेच माहितीचे विश्लेषण ऐतिहासिक आणि तुलनात्मक पद्धतीने केले आहे.

तथ्य संकलनाच्या पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतामध्ये सरकारी अहवाल तसेच दुय्यम स्त्रोतामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र व संकेतस्थळ यांचा वापर केला आहे.

मूलभूत हक्कांची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या सुरुवातीच्या काळातच मूलभूत हक्कांची मागणी सुरू झालेली दिसते. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने १८९५ च्या स्वराज्य विधेयकामध्ये भारतातल्या नागरिकांच्या भाषण, लेखन तसेच संघटना स्थापन करण्याचे हक्क मिळावेत अशी मागणी करण्यात आलेली होती. त्यानंतर ॲनी बेझंट यांनी मांडलेल्या कॉमनवेल्थ ऑफ इंडिया बिलमध्ये मूलभूत हक्कांचा समावेश होता. भारतीय संविधानाच्या निर्मितीचा एक महत्त्वाचा टपा मानला जाणाऱ्या नेहरू अहवालामध्ये स्वतंत्र भारताच्या संविधानामध्ये मूलभूत हक्कांचा समावेश असावा अशी शिफारस केलेली होती. तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कराची आधवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्य, समानता आणि शोषणापासून मुक्ती यासारख्या मूलभूत हक्कांची मागणी करणारा ठराव मांडला होता.

जागतिक पातळीवर दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी हक्क या संकल्पनेला महत्त्व प्राप्त झाले. याचा प्रभाव भारतीय निर्माणकर्त्यांवरही पडला परिणामी १९४६ मध्ये स्थापन झालेल्या संविधान सभेने मूलभूत हक्कांसाठी एक स्वतंत्र उपसमिती सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली नेमली. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि त्यामध्ये भाग ३ कलम १२ ते कलम ३५ मध्ये मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला.

मूलभूत हक्कांमागील भारतीय संविधानाचा सुवर्ण त्रिकोण :

कलम १४ :- हे कलम सुनिश्चित करते की कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे सर्वांना समान संरक्षण.
कलम १९ :- याद्वारे भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह सहा मूलभूत स्वातंत्र्याची हमी देण्यात आली आहे.
कलम २१ :- कायदयाने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीच्या वापरा व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, कलम १४, कलम १९ व कलम २१ ही कलमे आंतरिकरित्या परस्परसंबधित आहेत.

न्यायालयीन सक्रियता आणि मूलभूत हक्क :

न्यायालयीन सक्रियता म्हणजे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ आपली कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडण्यात अपयशी ठरल्यास न्यायव्यवस्थेने सक्रिय होऊन लोकांचे हक्क आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी पुढाकार घेणे. भारतामध्ये मूलभूत हक्कांचे संरक्षण आणि विस्तार करण्यासाठी न्यायपालिकेने हा मार्ग अवलंबला आहे. जनहित याचिका हे यासाठीचे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संसदेने केलेल्या व मूलभूत हक्कांवर गदा आणणाऱ्या घटनादुरुस्तींना न्यायालयाद्वारे आव्हान देण्यात आले होते. अशाप्रकारे न्यायालयाने संविधानाच्या सुरुवातीच्या काळापासुनच मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याचे काम केलेले दिसते.

मूलभूत हक्कांसंबंधित न्यायालयीन निकाल :

१) शंकरी प्रसाद विरुद्ध भारत संघ (१९५१)

संसदेच्या पहिल्या घटना दुरुस्तीळा आव्हान देणारा हा खटला होता. यावर निकाल देताना न्यायालयाने संसदेला मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार असल्याचे सांगितले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

२) सज्जन सिंग विरुद्ध राजस्थान राज्य (१९६५)
या खटल्याद्वारे संसदेने केलेल्या सतराव्या घटनादुरुस्तीला आव्हान देण्यात आले. परंतु न्यायालयाने कलम ३६८ नुसार संविधानात दुरुस्ती करण्याच्या अधिकारात मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करण्याचाही अधिकार समाविष्ट असल्याचे सांगितले.

३) गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य (१९६७)
संसदेला मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करता येणार नाही असे मत न्यायालयाने दिले.

४) केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (१९७३)
हा भारतामधील ऐतिहासिक खटला मानला जातो कारण याद्वारे न्यायालयाने संसदेला संविधानात दुरुस्ती करण्याचा
अमर्याद अधिकार नाही. संसद संविधानात दुरुस्ती करू शकते. परंतु संविधानाच्या मूळ संरचनेत बदल करू शकत नाही असा निकाल दिला.

५) मनेका गांधी विरुद्ध भारत संघ (१९७८)
यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य याचा अर्थ केवळ शारीरिक स्वातंत्र्य नसून तर त्यामध्ये सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार असल्याचे नमूद केले.

६) मिनर्व्हा मिल्स विरुद्ध भारत संघ (१९८०)
यामध्ये खटल्यामध्ये मूलभूत हक्क आणि राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे ही एकमेकांविरुद्ध नसून परस्परपूरक असल्याचा निकाल दिला.

७) ओल्गा टेलिस विरुद्ध बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (१९८५)
उपजीविकेच्या साधनाशिवाय मानव जगू शकत नाही. त्यामुळे उदरनिर्वाहाचा अधिकार हा जीवन जगण्याचा हक्काचा एक अविभाज्य भाग आहे असा न्यायालयाने निकाल दिला.

८) सुभाष कुमार विरुद्ध बिहार राज्य (१९९१)
कलम २१ अंतर्गत जीवन जगण्याच्या हक्कामध्ये प्रदूषणमुक्त हवा व स्वच्छ पाणी याबरोबरच स्वच्छ पर्यावरणाचा हक्क हा मूलभूत हक्क आहे असे न्यायालयाने स्पष्ट केले.

९) के.एस. पुट्टास्वामी विरुद्ध भारत संघ (२०१७)
हा भारतीय न्यायव्यवस्थेतील व मूलभूत हक्कांसंबंधित महत्त्वाचा खटला आहे. कारण यामध्ये गोपनीयतेच्या अधिकाराला मूलभूत हक्क म्हणून घोषित केले गेले.

१०) नवतेजसिंग जोहर विरुद्ध भारत संघ (२०१८)
या खटल्यांमध्ये समलैंगिक सबंधांना गुन्हेगारी कृत्यातून वगळून वैयक्तिक प्रतिष्ठा, स्वायत्तता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या हक्कांची पुष्टी केली आहे.

११) जोसेफ शाईन विरुद्ध भारत संघ (२०१८)
या खटल्यातील निकालामुळे भारतीय कायद्यात लैंगिक समानतेला मोठे बळ मिळाले.

मूलभूत हक्कांची वाढलेली व्यापकता :

संविधानाने जे मूलभूत हक्क नागरिकांना दिले होते त्यांचा अर्थ मर्यादित स्वरूपाचा होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांमधून मूलभूत हक्कांच्या कलमाची वाढलेली व्यापकता दिसून येते. तसेच यामध्ये काही नवीन हक्क देखील मूलभूत हक्कांच्या चौकटीमध्ये नागरिकांना मिळाले त्यातील काही हक्क पुढीलप्रमाणे,

प्रतिष्ठापूर्ण जीवन जगण्याचा हक्क :- कलम २१ नुसार जीवन जगण्याचा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क होता. त्यामध्ये न्यायालयाने सन्मान आणि प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा हक्क दिला.
मोफत व सक्तीचे शिक्षण :- ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी कलम २१ (अ) अंतर्गत मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क मूलभूत हक्क केला.
माहितीचा अधिकार :- माहितीचा अधिकार (आर.टी.आय.) हा स्वातंत्र्याच्या हक्काच्या कलम १९ चा भाग म्हणून नागरिकांना सरकारकडून माहिती मिळवण्याचा अधिकार मिळाला.
निवाऱ्याचा हक्क :- कलम २१ अंतर्गत निवाऱ्याचा हक्क हा भारतीय नागरीकांसाठी मूलभूत हक्क असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.
स्वच्छ पर्यावरणाचा हक्क :- स्वच्छ पाणी व शुद्ध हवा यासोबतच स्वच्छ पर्यावरणाचा हक्क देखील कलम २१ अंतर्गत जीवन जगण्याच्या हक्काबरोबर मूलभूत हक्क ठरवला गेला.
गोपनीयतेचा हक्क :- व्यक्तीला वैयक्तिक माहिती आणि जीवनाची गोपनीयता ठेवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेचा हक्क हा मूलभूत हक्क असल्याचे निकालातून जाहीर केले.

घटनात्मक उपायांचा हक्क :

संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची हमी देण्यात आलेली आहे. हा भारतीय संविधानात समाविष्ट असलेला सर्वात महत्त्वाचा मूलभूत हक्क आहे. कलम ३२ नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास थेट सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार देते. त्यानुसार न्यायालयात आदेश (रिट) मागता येतो. मूलभूत हक्कांचे संरक्षण आणि अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासारी हा अत्यंत महत्वाचा हक्क आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कलम ३२ हे संविधानातील सर्वांत महत्वाचे कलम असून हे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

कलम नसल्यास संविधान शून्यवत होईल. तसेच हे कलम संविधानाचा आत्मा असून त्याचे स्थान हे संविधानाच्या हृदयस्थानी आहे असे या हक्काचे महत्त्व विषद केलेले आहे.

मूलभूत हक्कांची सध्यस्थिती आणि आव्हाने :

मूलभूत हक्क लोकशाहीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत परंतु त्यांची सध्यस्थिती गुंतागुंतीची असून अनेक महत्त्वपूर्ण आव्हानेदेखील मूलभूत हक्कांसमोर आलेली दिसतात. विशेषतः न्यायपालिकेने या हक्कांचा विस्तार करण्यासाठी आणि त्यांचा अर्थ लावण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली असली तरी त्यांची अंमलबजावणी अनेकदा सामाजिक आणि राजकीय घटकांमुळे बाधित झालेली दिसून येते. न्यायपालिका मूलभूत हक्कांच्या मूळ मजकुराच्या पलीकडे जाऊन अर्थविस्तार करण्यात महत्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसते. मूलभूत हक्क न्यायप्रविष्ट असल्याने नागरिकांना त्याचे उल्लंघन झाल्यास थेट सर्वोच्च न्यायालयात जाता येते. त्यामुळे ते राज्यसत्तेच्या गैरवापराविरुद्ध व नागरी स्वातंत्र्याच्या उल्लंघनाविरुद्धचे एक शक्तिशाली साधन बनले आहे.

आव्हाने :

कायदा आणि सुव्यवस्थेचे आव्हान :

काही वेळा राजकीय दबावामुळे तपास यंत्रणांचा गैरवापर होऊन मानवी हक्कांवर गदा आणलेली दिसून येते. तसेच बेकायदेशीरपणे करण्यात येणारी अटक आणि अटकेतील व्यक्तीच्या हक्कांचे होणारे उल्लंघन अजूनही मोठ्या प्रमाणात होताना दिसते. पोलिस कोठडीमध्ये अमानुषपणे केला जाणारा व्यक्तीचा छळ यासारख्या गंभीर समस्या आजही असल्याचे दिसून येते.

अंमलबजावणीतील असमानता :

आजही समाजातील आदिवासी, दलित, अल्पसंख्याक तसेच काही दुर्बल घटक यांना त्यांच्या हक्कांचे उल्लंघन होत असताना योग्य न्याय मिळत नसल्याचे दिसते. सामाजिक, आर्थिक असमानतेमुळे गरीब व वंचित घटकांना कायद्याची माहिती अल्प असते परिणामी त्यांना कायदेशीर मदत घेण्यात अनेक अडचणी येतात यावरून कायद्याचा लाभ सर्वापर्यंत समानपणे पोहचत नसल्याचे आढळते.

सामाजिक आणि धार्मिक भेदभाव :

संविधानाने धर्म, वंश, जात, लिंग अथवा जन्मस्थान यावर आधारित भेदभाव करण्यास सक्त मनाई केली असली तरी समाजात अजूनही जातीय तसेच धार्मिक तणावामुळे भेदभावाचे प्रकार घडताना दिसतात. जातीय भेदभावाबरोबरच जातीवाचक शिवीगाळ व मानहानीकारक वक्तव्येदेखील अस्पृश्यता वाढीस कारणीभूत ठरत आहेत. त्याचबरोबर ॲट्रोसिटीसारख्या गंभीर गुन्हांचा वाढलेला गैरवापर पण आव्हान ठरते.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील मर्यादा :

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात मूलभूत हक्कांवरील आव्हाने बदलली आहेत. डिजिटल देखरेख करणे तसेच इंटरनेट सेवा बंद केल्यामुळे गोपनीयतेचा अधिकार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर प्रश्न निर्माण होताना दिसतात. राजकीय द्वेषापोटी सरकारकडून राजद्रोह, सार्वजनिक सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा संबंधित कायद्याचा गैरवापर झाल्याचे दिसते. खोटी बातमी, द्वेषपूर्ण भाषण तसेच सांस्कृतिक दहशतवाद पसरवणारी वाचाळवीर वक्तव्ये यांसारख्या बाबींमुळे या हक्काचा गैरवापर झाल्याचे दिसून येते.

निष्कर्ष :

१) भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांना स्वातंत्र्यपूर्व काळातील ऐतिहासिक वारसा असल्याचे आढळून आले.
२) न्यायव्यवस्थेने वेळोवेळी मूलभूत हक्कांचे संरक्षण केलेले आढळते.
३) संविधानाच्या ७५ वर्षांमध्ये समाजाच्या बदलत्या गरजांनुसार मूलभूत हक्कांची वाढलेली व्यापकता दिसते.
४) तंत्रज्ञानाचे युग तसेच वाढती लोकसंख्या यामुळे दिवसेंदिवस मूलभूत हक्कांसमोरील आव्हांनामध्ये वाढ झालेली दिसते.

संदर्भसूची :

1. Austin Granville, (1999), 'The Indian Constitution Cornerstone of a Nation', Oxford University Press Publication, Delhi.
2. Singh Pramod, Singh Sanju, (2023), 'Fundamental Rights and Civil Liberties', Whitemann Publication, New Delhi.
3. Basu. D. D., (2024), 'Introduction to the Constitution of India', LexisNexis Publication, New Delhi.
4. The Constitution of India, Part III, Fundamental Rights, Retrieved from https:// knowindia.india.gov.in/profile/fundamental-rights.php
5. Second Administrative Reforms Commission Reports, Retrieved from https://darpg.gov.in/en/arc-reports
6. The Hindu, (2022), India at 75 Fundamental rights and their expansion since Independence, Retrieved from https://www.thehindu.com

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मानसिक आरोग्याला चालना देण्यात भारतीय संविधानाची भूमिका

डॉ. समीर पाचोरे[1], डॉ. सौ. विजयमाला चौगुले[2]
[1]सहयोगी प्राध्यापक श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली
[2]प्राध्यापक जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
Email: sspkwc09@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170935
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 177-182
Sept. 2025

Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

जगभरात सार्वजनिक धोरण आणि कायदेशीर चर्चेत मानसिक आरोग्य हे समग्र कल्याणाचा एक आवश्यक घटक म्हणून वाढत्या प्रमाणात ओळखले जात आहे आणि भारतही त्याला अपवाद नाही. भारतीय संविधान, मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वांच्या मजबूत चौकटीसह, सर्व नागरिकांच्या मानसिक आरोग्याचे संरक्षण आणि प्रगती करण्याच्या राष्ट्राच्या कर्तव्याला आधार देते. मानसिक रुग्णांच्या काळजीपासून ते हक्क-आधारित, रुग्ण-केंद्रित दृष्टिकोनापर्यंतचा विकास संवैधानिक हमींमध्ये रुजलेला आहे - प्रामुख्याने कलम १४, १५ आणि २१ मध्ये नमूद केलेल्या समानता, प्रतिष्ठा आणि जीवनाचे अधिकार. सर्वोच्च न्यायालयाच्या विस्तृत व्याख्यांमुळे मानसिक आरोग्याचा समावेश जीवनाच्या अधिकाराच्या कक्षेत हळूहळू होत गेला आहे, ज्याचा शेवट अलिकडेच सुकदेब साहा विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य)२०२५(सारख्या निकालांमध्ये झाला आहे, ज्यात मानसिक आरोग्य हा संवैधानिक अधिकार म्हणून पुष्टी देण्यात आली आहे. त्याचबरोबर, मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७ सारखे कायदे आणि २०१४ च्या राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरणासारखी धोरणे मानसिक आरोग्यसेवेसाठी भेदभावरहितउपलब्धता प्रदान करून, आत्महत्येच्या प्रयत्नाला गुन्हेगारीमुक्त करण्याची अंमलबजावणी करून आणि रुग्णाची स्वायत्तता आणि प्रतिष्ठा ओळखून या संवैधानिक आदेशांना कार्यान्वित करतात. तरीही, सामाजिक कलंक, संसाधनांची कमतरता आणि अपुरी समुदाय-आधारित पायाभूत सुविधा यासारख्या सततच्या आव्हानांमुळे संवैधानिक आदर्श आणि व्यावहारिक अंमलबजावणीमध्ये अंतर कायम आहे. हा शोधनिबंध मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय संविधानाची भूमिका, बलस्थाने आणि मर्यादा, अलिकडे कायद्यात झालेली प्रगती, न्यायालयीन निर्णयांचा परिणाम आणि सर्व भारतीयांसाठी एक प्रामाणिक संवैधानिक वचन म्हणून मानसिक आरोग्याची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी भविष्यातील दिशानिर्देशांवर चर्चा करतो.

मुख्यशब्द: *मानसिक आरोग्य, भारतीय संविधान, कलम 14, 15 आणि 21, जीवनाचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार, मानसिक आरोग्य सेवा कायदा 2017, राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण 2014, सुकदेब साहा प्रकरण 2025, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय, न्यायिक दृष्टिकोन, मानवी हक्क, सामाजिक न्याय.*

प्रस्तावना

एकेकाळी आरोग्यसेवेच्या अगदी जवळ असलेले मानसिक आरोग्य आता आधुनिक संवैधानिक लोकशाहीमध्ये वैयक्तिक प्रतिष्ठेचे आणि सामाजिक कल्याणाचे केंद्रस्थान मानले जाते. भारतीय कायदेशीर व्यवस्था ही बदल प्रतिबिंबित करते, जी संविधानाच्या न्याय, मानवी हक्क आणि समावेशक विकासाच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शित आहे. हा शोधनिबंध भारतातील मानसिक आरोग्याला आधार देणाऱ्या संवैधानिक चौकटीचे विश्लेषण करतो, त्याची उत्पत्ती, न्यायालयीन उत्क्रांती, वैधानिक रचना आणि भविष्यातील शक्यतांचा मागोवा घेतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
समीर पाचोरे, सौ. विजयमाला चौगुले, सहयोगी प्राध्यापक श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली.

How to cite this article:
पाचोरे, . समीर ., & चौगुले, . विजयमाला. (2025). मानसिक आरोग्याला चालना देण्यात भारतीय संविधानाची भूमिका. Journal of Research & Development, 17(9(IV)), 177–182. https://doi.org/10.5281/zenodo.17721170

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17721170
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

मानसिक आरोग्य म्हणजे एखाद्या व्यक्तीचे भावनिक, मानसिक आणि सामाजिक कल्याण होय. ते लोकांच्या दैनंदिन जीवनात विचार, भावना आणि वर्तनावर परिणाम करते. मानसिक आरोग्य व्यक्तीच्या निर्णय घेण्यावर, तणाव व्यवस्थापनावर आणि नातेसंबंधांवर देखील परिणाम करते. जागतिक आरोग्य संघटनेच्या)WHO) मते, मानसिक आरोग्य ही मानसिक कल्याणाची एक अवस्था आहे जी लोकांना जीवनातील ताणतणावांना तोंड देण्यास, त्यांच्या क्षमता ओळखण्यास, चांगले शिकण्यास आणि चांगले काम करण्यास आणि त्यांच्या समुदायात योगदान देण्यास सक्षम करते.मानसिक आरोग्याला चालना देण्यात भारतीय संविधान महत्त्वाची भूमिका बजावते, मानसिक आरोग्यासाठी दूरदर्शी कायदेशीर पाया आणि कृतीयोग्यतेची हमी देते. प्रस्तुत शोधनिबंधात संवैधानिक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे ऐतिहासिक निर्णय, वैधानिक सुधारणा आणि कायदेशीर चौकटी या मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी कशा प्रकारे पाठबळ देतात यावर भाष्य केले आहे

विषयाचे महत्व

मानसिक आरोग्य हा विषय भारतात नेहमीच दुर्लक्षिलेला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने याबाबत भारतावर ताशेरे ओढले.कोविड महामारी दरम्यानच्या काळात मानासिक आरोग्य या विषयाचे महत्व सर्वसामान्य नागरिकांनाही समजले. जीवन जगत असताना शारीरिक आरोग्याइतकेच मानासिक आरोग्यची सुस्थिती महत्वाची आहे. मानसिक आरोग्य हे दैनंदिन जीवनाला आकार देण्यामध्ये, आव्हानांना कसे तोंड द्यावे लागते, नातेसंबंध कसे तयार होतात आणि वैयक्तिक ध्येये कशी साध्य होतात यावर प्रभाव पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. चांगले मानसिक आरोग्य व्यक्तींना ताणतणावाचा सामना करण्यास, बदलांशी जुळवून घेण्यास आणि दैनंदिन अनुभवांमध्ये समाधान आणि अर्थ शोधण्यास सज्ज करते.प्रभावी मानसिक आरोग्य भावनिक संतुलन, लवचिकता आणि सकारात्मक दृष्टिकोन वाढवते, जे दैनंदिन परिस्थितीतील चढ-उतार व्यवस्थापित करण्यासाठी आवश्यक आहेत. ते स्पष्ट निर्णय घेण्याची क्षमता, उत्पादक काम आणि अभ्यास आणि मजबूत, निरोगी संबंधांना सक्षम करते. चांगले मानसिक आरोग्य असलेले लोक सामान्यतः अधिक आत्मविश्वासू, प्रेरित आणि त्यांच्या समुदायांशी जोडलेले असतात, ज्यामुळे चांगले सामाजिक संबंध आणि समर्थन प्रणाली निर्माण होतात. याव्यतिरिक्त, चांगले मानसिक आरोग्य अनेकदा निरोगी जीवनशैली निवडींकडे नेत असते, जसे की चांगली झोप, नियमित व्यायाम आणि संतुलित आहार, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य दोन्ही वाढते. याउलट, खराब मानसिक आरोग्यामुळे एखाद्याच्या कामावर किंवा शाळेत काम करण्याच्या क्षमतेवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, नातेसंबंध बिघडू शकतात, प्रेरणा कमी होऊ शकते आणि हृदयरोग किंवा झोपेचा त्रास यासारख्या शारीरिक आरोग्य समस्यांचा धोका वाढू शकतो.आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे, कारण ते लोकांना त्यांच्या क्षमतेची जाणीव करून देण्यास, समाजात अर्थपूर्ण योगदान देण्यास आणि दैनंदिन जीवनात एकंदर आनंद आणि समाधान राखण्यास सक्षम करते.भारतीय संविधानातील अनेक कलमे व्यक्तीच्या मानसिक आरोग्याला पाठबळ देण्याचे काम करतात. या लेखात भारतातील मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाच्या व्यापक रचनेत मानसिक आरोग्याचे स्थान देतो.

उद्दिष्ट्ये:

१. भारतातील मानसिक आरोग्य हक्कांना पाठिंबा देणारी संवैधानिक चौकट आणि कायदेशीर उत्क्रांतीचे विश्लेषण करणे.

२. कायदेविषयक चौकटी आणि धोरणात्मक उपक्रमांद्वारे संवैधानिक आदेशांच्या अंमलबजावणी आणि प्रभावीतेचे मूल्यांकन करणे.

३. पद्धतशीर अडथळे दूर करण्यासाठी आणि समावेशक मानसिक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्यासाठी संवैधानिक तरतुदींच्या भूमिकेचा शोध घेणे.

४. मानसिक आरोग्य संवर्धनात संवैधानिक अंमलबजावणीसाठी समकालीन आव्हाने आणि भविष्यातील दिशानिर्देशांचे मूल्यांकन करणे.

शोधनिबंधाचीपद्धती

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम स्त्रोतावरआधारित आहे ज्यामध्येसंविधानातील कलमे, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि महत्त्वाचे कायदेविषयक बदल, विविध ग्रंथ, पुस्तके, लेख, इंटरनेट ,वर्तमानपत्र इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

मानसिक आरोग्यासाठी संवैधानिक पाया (Constitutional Foundations for Mental Health)

मूलभूत हक्क आणि मानसिक आरोग्य (Fundamental Rights and Mental Health)

कलम २१: जीवनाचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार

कलम २१ हा मानसिक आरोग्याला संवैधानिक संरक्षणाशी जोडणारा आधारस्तंभ आहे. सर्वोच्च न्यायालय जीवनाच्या अधिकाराचा अर्थ प्रतिष्ठा, स्वायत्तता आणि कल्याण यांचा समावेश आहे, ज्यामुळे मानसिक आरोग्य हा न्याय्य अधिकार बनतो.शत्रुघ्न चौहान विरुद्ध

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारतीय संघ आणि नवतेज सिंग जोहर विरुद्ध भारतीय संघ यासारख्या उदाहरणांनी स्पष्ट केले आहे की मानसिक सचोटी आणि अपमानास्पद वागणुकीपासून मुक्तता हे कलम २१ चे अविभाज्य घटक आहेत.

कलम १४: कायद्यासमोर समानता

कलम १४ कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत याची हमी देते, मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्यांसाठी भेदभाव न करण्याचे समर्थन करते.

कलम १५: भेदभाव न करणे

हे अपंगत्वासह कारणांवर आधारित भेदभाव प्रतिबंधित करते, अशा प्रकारे मानसिक आरोग्य स्थिती असलेल्या व्यक्तींना संरक्षण देते.

निर्देशक तत्वे - कलम ३९, ४१, ४७

हे राज्याला असुरक्षित लोकसंख्येचे रक्षण करण्यास आणि मानसिक आरोग्य सेवांसह सार्वजनिक आरोग्य प्रदान करण्यासाठी उपाययोजना करण्यास उद्युक्त करतात.

न्यायिक दृष्टिकोन (The Judicial Approach)

मानसिक आरोग्याचा समावेश करण्यासाठी संवैधानिक हमींची व्याप्ती वाढविण्यात भारतीय न्यायव्यवस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.महत्त्वपूर्ण निर्णय मानसिक आरोग्याला जीवन आणि स्वातंत्र्याचा एक भाग म्हणून स्पष्टपणे ओळखतात आणि राज्याला सुलभ, मानवीय मानसिक आरोग्य सेवा प्रदान करण्याचे निर्देश देतात. सर्वोच्च न्यायालयाने, अलिकडच्या निकालांमध्ये, मानसिक आरोग्यसेवेसाठी सक्रिय राज्य कृती करणे, धर्मादाय म्हणून नव्हे तर एक संवैधानिक बंधन म्हणून अनिवार्य केले आहे.

कायदेविषयक घडामोडी:

भारतीय वेडेपणा कायदा, १९१२ हा एक ब्रिटिशकालीन कायदा होता, जो वेडेपणाशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण आणि सुधारणा करण्यासाठी बनवला गेला. या कायद्याने मानसिक आजार असलेल्या लोकांच्याकाळजी आणि उपचारांसाठी कायदेशीर चौकट तयार केली होती, तसेच वैद्यकीय चाचण्या आणि न्यायालयीन आदेशांवर आधारित व्यक्तींना असायलम)मनोरुग्णांसाठी असलेले इस्पितळ(दाखल करण्याच्या प्रक्रियेची रूपरेषा दिली होती. भारतीय वेडेपणा कायदा, १९१२ आणि मानसिक आरोग्य कायदा, १९८७ सारख्या सुरुवातीच्या नियामक चौकटींमध्ये कस्टोडियल, संरक्षणवादी प्रवृत्ती होती, ज्यामुळे अनेकदा मानसिक आजार असलेल्या व्यक्तींना स्वायत्तता किंवा प्रतिष्ठेपासून वंचित ठेवले जात असे.हा कायदा वैद्यकीय शास्त्रातील प्रगती आणि मानवी दृष्टिकोन बदलल्यामुळे आता कालबाह्य झाला आहे आणि त्याऐवजी मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७ लागू आहे.

मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७

मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७)MHCA) हा देशभरातील मानसिक आरोग्य सेवा आणि उपचारांचे नियमन करणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. तो एक महत्त्वपूर्ण अधिकार-आधारित दृष्टिकोन स्वीकारतो, ज्यामुळे सरकार आणि व्यावसायिकांवर मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी येते. हा कायदा सर्व व्यक्तींसाठी समानता, स्वायत्तता, प्रतिष्ठा, पूर्ण सहभाग आणि भेदभाव न करणे यासारख्या मूलभूत तत्त्वांची रूपरेषा देतो, ज्यामध्ये त्यांच्या मानसिक आरोग्यसेवेबद्दलचे निर्णय समाविष्ट आहेत. हे स्वीकृत वैद्यकीय मानकांनुसार मानसिक आजार म्हणजे काय हे स्पष्ट करते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, एखाद्या व्यक्तीची ओळख, श्रद्धा किंवा उपचारांचा भूतकाळातील इतिहास यासारख्या मानसिक आजाराला काय मानले जात नाही हे परिभाषित करते.

हक्क-आधारित दृष्टिकोन

हा कायदा संविधानाच्या वचनाचे पालन करतो, मानसिक आरोग्याला कलम २१ शी स्पष्टपणे जोडतो. तो प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक आरोग्यसेवेच्या अधिकारांना मान्यता देतो, ज्यामध्ये उपचार, सामुदायिक जीवन, गोपनीयता आणि अमानवी वागणुकीपासून संरक्षण यांचा समावेश आहे.

प्रमुख तरतुदी

- परवडणाऱ्या आणि दर्जेदार मानसिक आरोग्यसेवेची उपलब्धता हा हक्क आहे.
- मानसिक आजारांसाठी विमा समतेसह भेदभावरहित सेवा.
- रुग्णांची स्वायत्तता टिकवून ठेवण्यासाठी आगाऊ निर्देश आणि नियुक्त प्रतिनिधी.
- आत्महत्येच्या प्रयत्नांना गुन्हेगारीमुक्त करणे, गुन्हेगारी हेतूपेक्षा मानसिक त्रास मान्य करणे.
- काही कालबाह्य पद्धती जसे की सुधारित न केलेल्या इलेक्ट्रोकन्व्हल्सिव्ह थेरपीवर बंदी.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

- अनादर, क्रूर वागणूक आणि अनैच्छिक संस्थात्मकीकरणाविरुद्ध मजबूत संरक्षण.

अंमलबजावणी आव्हाने

सैद्धांतिक हमी असूनही, पायाभूत सुविधांचा अभाव, निधी आणि कलंक यामुळे कमतरता कायम आहेत. अंमलबजावणी विसंगत आहे आणि उपेक्षित गटांना अजूनही अप्रमाणित भार सहन करावा लागतो.

इतर संबंधित कायदे आणि धोरणे

राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण)२०१४(:

राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण)National Mental Health Policy) हे केंद्र सरकारने ऑक्टोबर २०१४ मध्ये सुरू केले आहे. मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देणे, मानसिक आजारांना प्रतिबंध करणे, व्यक्तींना बरे होण्यास मदत करणे, मानसिक आजारांशी संबंधित कलंक आणि वेगळेपणा कमी करणे, मानसिक आजार असलेल्या व्यक्तींना समाजात सामील करणे. सर्वांसाठी सुलभ, परवडणाऱ्या आणि दर्जेदार मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मानसिक आजारांबद्दल असलेला नकारात्मक दृष्टिकोन)कलंक(कमी करणे ही राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरणाची उद्दिष्ट्ये आहेत. मानवी हक्क-आधारित दृष्टिकोन आणि एकात्मिक आणि समग्र दृष्टीकोन या तत्वावर हे धोरण आधरित आहे या धोरणाला पूरक म्हणून, मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७, मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कायदेशीर चौकट प्रदान करतो. थोडक्यात, राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण)२०१४(हे भारतामध्ये मानसिक आरोग्याच्या सेवा सुधारण्यासाठी आणि मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण)IRDAI) मार्गदर्शक तत्त्वे:भारतात, मेंटल हेल्थकेअर कायदा २०१७)Mental Healthcare Act, 2017) आणि भारतीय विमा नियामक व विकास प्राधिकरण)IRDAI) यांनी केलेल्या नियमांमुळे सर्व आरोग्य विमा कंपन्यांना मानसिक आजारांच्या उपचारांसाठी संरक्षण देणे बंधनकारक आहे. आता सर्व आरोग्य विमा पॉलिसी मानसिक आजारांसाठीचा खर्च जसे की औषधोपचार, वैद्यकीय सल्ला आणि रुग्णालयात दाखल करणे यासाठी आर्थिक मदत करतात, ज्यामुळे लोकांना मानसिक आरोग्याच्या उपचारांसाठी विमा संरक्षण मिळते.या कायद्यांमुळे, मानसिक आरोग्याच्या उपचारांचा खर्च आता विमा पॉलिसीमध्ये समाविष्ट आहे, ज्यामुळे रुग्णांना योग्य आणि वेळेवर उपचार मिळण्यास मदत होते.
होते.

सर्वोच्च न्यायालयाचे अलीकडील निकाल: थेट परिणाम

जुलै २०२५ मध्ये सुकदेब साहा विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य या खटल्यातील निकाल हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो मानसिक आरोग्याचा अधिकार कलम २१ मध्ये अंतर्भूत आहे आणि त्यासाठी राज्याकडून निष्क्रिय नव्हे तर सक्रिय प्रोत्साहनाची आवश्यकता आहे याची पुष्टी करतो.सुकदेब साहा विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य)२०२५(या प्रकरणात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने मानसिक आरोग्याचा अधिकार हा घटनेच्या अनुच्छेद २१ अन्वये जीवनाच्या हक्काचा अविभाज्य घटक म्हणून मान्यता दिली आहे, आणि देशभरातील सर्व शैक्षणिक संस्था व कोचिंग सेंटर्ससाठी मानसिक आरोग्यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या निकालाच्या पार्श्वभूमीवर, NEET परीक्षेची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय विद्यार्थ्याच्या संशयास्पद मृत्यूची केंद्रीय अन्वेषण ब्युरो)CBI) मार्फत चौकशी करण्याचे आदेशही देण्यात आले. यामुळे मानसिक आरोग्य सेवेची पुनर्विचार करताना ही धर्मादायाचीनव्हे तर सार्वजनिक आणि संवैधानिक चिंतेची बाब म्हणून झाली आहे, राज्याच्या जबाबदाऱ्यांचा विस्तार झाला आहे आणि पुढील जनहित याचिका आणि सरकारी धोरण आणि सेवांच्या न्यायालयीन तपासणीसाठी दार उघडले आहे.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण आणि कार्यक्रम

राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण आणि कार्यक्रमांतर्गत, भारताने १९८२ मध्ये मानसिक आजारांचा समाजातील प्रचंड भार आणि त्यासाठी असलेल्या अपुऱ्या सेवा लक्षात घेऊन राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम)NMHP) सुरू केला. नजीकच्या भविष्यात सर्वांसाठी, विशेषतः लोकसंख्येच्या सर्वात असुरक्षित आणि वंचित घटकांसाठी किमान मानसिक आरोग्यसेवेची उपलब्धता,सामान्य आरोग्यसेवा आणि सामाजिक विकासात मानसिक आरोग्य ज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे ,मानसिक आरोग्य सेवा विकासात समुदायाच्या सहभागाला प्रोत्साहन देणे आणि समुदायात स्वयं-मदत करण्याच्या प्रयत्नांना चालना देणे या उद्देशाने हा कार्यक्रम सुरु केला गेला. या कार्यक्रमांतर्गत, जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम)DMHP) आणि राष्ट्रीय टेली-मानसिक आरोग्य कार्यक्रम)टेली मानस(यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे, ज्यामुळे मानसिक आरोग्य सेवा लोकांपर्यंत अधिक सुलभरीतीनेउपलब्धझाल्या आहेत.जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम)DMHP) १९९६ मध्ये)नवव्या पंचवार्षिक योजनेत(NMHP अंतर्गत सुरू करण्यात आला. DMHP खालील

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

घटकांसह 'बेलारी मॉडेल' वर आधारित होता. सामान्य आरोग्यसेवेत मानसिक आरोग्य सेवांचा समावेश करणे या उद्देशाने या कार्यक्रमाला सुरवात झाली. यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांना मानसिक आजार ओळखण्यासाठी आणि त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशिक्षित केले गेले. तसेच टेली मानस कार्यक्रम देशभरात 10 ऑक्टोबर 2022 रोजी सुरू झाले ज्याचे उद्दिष्ट देशभरात २४/७ मोफत मानसिक आरोग्य सेवा प्रदान करणे असे आहे. राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक)14416 / 1800-89-14416) याद्वारे मानसिक सेवा उपलब्ध आहेत .

राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण)२०१४(आणि त्यानंतरचे कार्यक्रम संवैधानिक दृष्टिकोनाचे कार्यकारी दृष्टीने स्पष्टीकरण देतात, ज्यामध्ये खालील गोष्टींवर लक्ष केंद्रित केले आहे:

• सार्वत्रिक प्रवेश आणि समुदाय-आधारित मानसिक आरोग्य सेवा.

• सामान्य आरोग्यसेवेशी एकात्मता.

• कलंक कमी करणे आणि मानसिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे.

• कायदेशीररित्या अंमलात आणता येणारे अधिकार आणि जबाबदारी यंत्रणा.

हे कार्यक्रम आणि धोरणे मिळून देशातील नागरिकांसाठी मानसिक आरोग्य सेवा सुधारण्यासाठी आणि मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तथापि, अर्थसंकल्पीय आणि पद्धतशीर अडचणींमुळे मूर्त परिणामांमध्ये रूपांतर हळूहळू होते.

सामाजिक अडथळ्यांना तोंड देणे:

कलंक, अपंगत्व आणि न्याय

संवैधानिक आणि वैधानिक चौकटी सर्वसमावेशक, हक्क-आधारित दृष्टिकोन स्वीकारतात, तर भारत मानसिक आरोग्याच्या समस्या असलेल्यांना खोलवर रुजलेल्या कलंक आणि दुर्लक्षित करण्याच्या समस्येचा सामना करतो.

भेदभावापासून संरक्षण:

अपंग व्यक्तींच्या हक्क कायद्यासोबत वाचलेले कलम १४ आणि १५, मानसिक सामाजिक अपंगत्व असलेल्या लोकांसाठी संरक्षण अधिक मजबूत करतात.

कायदेशीर क्षमता आणि स्वायत्तता:

मानसिक आरोग्य सेवा कायद्यातील आगाऊ निर्देश, नामांकित प्रतिनिधी आणि पुनरावलोकन आयोगांसाठीच्या तरतुदी वैयक्तिक एजन्सी आणि कायदेशीर क्षमता यांचे समर्थन करतात, जे संवैधानिक न्यायाची गुरुकिल्ली आहे.

अंमलबजावणी आणि पद्धतशीर आव्हाने

• विशेषतः ग्रामीण भागातप्रशिक्षित व्यावसायिकांचा आणि पायाभूत सुविधांचा अभाव.

• कमी जागरूकता आणि सामाजिक कलंक यामुळे मदत मागण्याची वृत्ती कमी होत आहे.

• वाटप केलेल्या निधीचा कमी वापर आणि अनियमित विमा संरक्षण.

• कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य आणि मुख्य प्रवाहातील शिक्षण उपक्रमांमधील तफावत.

शिफारसी

• बळकट अंमलबजावणी:

न्यायिक देखरेख आणि वैधानिक आयोगांनी ऑडिट केले पाहिजे आणि अनुपालनाची अंमलबजावणी केली पाहिजे.

• समुदाय आणि शाळा-आधारित उपक्रम:

सार्वजनिक मोहिमा आणि अभ्यासक्रम एकत्रीकरणाद्वारे लवकर हस्तक्षेप, मनोशिक्षण आणि लवचिकता निर्माण करण्यास प्रोत्साहन द्या.

• धोरणांची व्याप्ती वाढवणे:

कामगार, शिक्षण आणि सामाजिक न्याय धोरणांमध्ये मानसिक आरोग्य प्रोत्साहन एकत्रित करणे.

• संसाधन वाटप:

व्याप्ती वाढविण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद आणि टेलिमेडिसिनचा वापर वाढवणे.

• कलंक कमी करणे:

कायदेशीर आदेश दृष्टिकोन बदलण्यासाठी वकिलीशी जुळले पाहिजेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निष्कर्ष

भारतीय संविधान मानसिक आरोग्याच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी एक सक्षम चौकट प्रदान करते, जी न्यायिक सर्जनशीलता आणि प्रगतीशील कायद्याद्वारे विकसित केली जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालांनी आणि मानसिक आरोग्य कायदा, २०१७ ने भारताच्या सन्मान, समानता आणि कल्याणाच्या संवैधानिक दृष्टिकोनात मानसिक आरोग्याला ठामपणे स्थान दिले आहे.शेवटी, या संवैधानिक हमींची पूर्तता मजबूत अंमलबजावणी, आंतर-मौलिक सहकार्य आणि कलंकाचा सामना करण्यासाठी सतत प्रयत्नांवर अवलंबून असते. संवैधानिक कायदा हा त्याचा पाया असल्याने, भारतातील मानसिक आरोग्यासाठी हक्कांवर आधारित, समावेशक आणि मानवीय दृष्टिकोन एक अनिवार्य आणि पूर्ण पूर्ततेची वाट पाहणारे वचन आहे.

संदर्भ :

1. https://nhrc.nic.in/sites/default/files/MENTAL HEALTH BOOK (23-6-2023)_02_0.pdf
2. https://ijrpr.com/uploads/V6ISSUE6/IJRPR48068.pdf
3. https://www.scobserver.in/supreme-court-observer-law-reports-scolr/sukdeb-saha-v-state-of-andhra-pradesh-mental-health-integral-component-of-right-to-life/
4. https://nhm.gov.in/images/pdf/National_Health_Mental_Policy.pdf
5. https://www.indiacode.nic.in/bitstream/123456789/2249/1/A2017-10.pdf
6. https://blog.ipleaders.in/legal-rights-of-persons-with-mental-illness/
7. https://ijme.in/articles/section-377-and-the-mental-healthcare-act-2017-breaking-barriers/
8. https://iris.who.int/bitstream/handle/10665/43286/9241562943_eng.pdf?sequence=1
9. https://www.sciencedirect.com/science/article/pii/S2666560322001141

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधान आणि 73 वी घटनादुरुस्ती: एक अभिमानाचा प्रवास

अभिमान अरुण ढाणे[1], डॉ. प्रदीप जगताप[2]
[1]राज्यशास्त्र विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
[2]लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

Manuscript ID:
JRD -2025-170936
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 183-184
Sept. 2025
Submitted: 15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश :-

26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटना स्वीकार करण्यात आली. तसेच 26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली. आपल्या भारतीय राज्यघटनेला 75 वर्ष पूर्ण झाले. भारतीय राज्यघटनेतील विविधतेत एकता आणि सर्वांसाठी न्याय, धर्मनिरपेक्षता, समाजवाद हे देशाच्या विकासाचे प्रतीक आहेत. राज्यघटनेच्या 75 वर्षाच्या कालखंडात लोकशाही व्यवस्थेला दिशा देणारा भारतीय संविधान हा एक ग्रंथ आहे. बदलत्या काळामध्ये भारतापुढे उद्भवणारे आव्हाने आणि त्यातील सुधारणा करणे आणि भारताच्या भवितव्यासाठी योग्य दिशा निश्चित करणे ही तितकेच महत्त्वाचे आहे. 73 वी घटना दुरुस्ती पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देणारी महत्त्वाची ठरली. यामुळे ग्रामीण स्वराज्य संस्थांना रचनात्मकता आली. यातून तीन स्तरीय व्यवस्था आली. स्थानिक स्वराज्य संस्थेचे सक्षमीकरण झाले. महिलांचा 50% सहभाग वाढला. प्रशासकीय विकेंद्रीकरण झाले म्हणजेच 73 व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना बळ मिळाले. भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्ष (अमृत महोत्सव) वर्षांमध्ये 73 वी घटनादुरुस्ती तितकीच महत्त्वाची आहे. भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था असताना दिसतात. परंतु भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये पंचायत राज व्यवस्था अधिक भक्कम करण्यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या होत्या. परंतु ही व्यवस्था आपणास असक्षम असताना दिसते. ही व्यवस्था सक्षम करण्यासाठी 1992 मध्ये 73 वी घटना दुरुस्ती संसदेने मंजूर केली आणि ती 24 एप्रिल 1993 पासून अमलात आली. खऱ्या अर्थाने 73 व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज संस्थांना संविधानिक दर्जा देण्यात आला.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, 73 वी घटनादुरुस्ती, पंचायतराज व्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, त्रिस्तरीय रचना, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महिलांचे आरक्षण, वित्त आयोग, अकरावी अनुसूची, लोकशाही सशक्तीकरण, ग्रामीण विकास, सामाजिक न्याय.*

मुख्य उद्देश:-

लोकशाहीची मुळे खोलवर रुजवणे आणि ग्रामीण विकासास चालना देणे. यासाठी ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत करण्यात आली.

73 व्या घटना दुरुस्तीतील मुख्य घटक :-

1) संविधानिक दर्जा:-

73 व्या घटना दुरुस्तीमुळे संविधानात भाग 9 व 11 वी अनुसूची जोडण्यात आली. यामुळे पंचायतराज संस्थांना संविधानिक दर्जा मिळाला.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
अभिमान अरुण ढाणे, राज्यशास्त्र विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

How to cite this article:
ढाणे, . अभिमान . अरुण ., & जगताप, . प्रदीप . (2025). भारतीय संविधान आणि 73 वी घटनादुरुस्ती: एक अभिमानाचा प्रवास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 183–184. https://doi.org/10.5281/zenodo.17721273

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17721273
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

2) त्रिस्तरीय रचना:-

या घटनादुरुस्तीने पूर्ण देशात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था सुरू करणे बंधनकारक करण्यात आले.

1) ग्रामपंचायत
2) पंचायत समिती
3) जिल्हा परिषद

3) नियमित निवडणुका: -

प्रत्येक पाच वर्षासाठी निवडणुका घेणे बंधनकारक करण्यात आले.

4) आरक्षण:-

जातीनुसार SC,ST, महिलासाठी 33% आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. 2011 नंतर महिलांना 50% आरक्षण कायद्याने वाढवण्यात आले.

5) वित्त आयोग:-

राज्य सरकारने प्रत्येक पाच वर्षांनी एक वित्त आयोग नेमला पाहिजे. तो पंचायतीच्या आर्थिक समितीचा आढावा घेऊन निधी वाटपाची व्यवस्था करेल.

6) अकरावी अनुसूची:-

पंचायतीच्या अधिकाराखालील 29 विषयाची यादी या अनुसूचित करण्यात आली.

महत्व:-

स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत झाली. वंचित घटक आणि महिलांना संधी मिळाली. पूर्ण देशात लोकशाही व्यवस्था सक्षम झाली.

निष्कर्ष:-

भारतीय राज्यघटनेला 75 वर्षे पूर्ण होत आहेत आणि या 75 वर्षांमध्ये पंचायती राज संस्थेमध्ये अनेक नाविन्यपूर्णता आणण्यात आली. 73 वी घटनादुरुस्ती ही आपल्या देशाच्या लोकशाहीतील मैलाचा दगड ठरत आहे. यामुळे खेड्यापर्यंत स्वराज्य हे लोकांचे स्वप्न न राहता त्याला संविधानिक हक्काचे व्यासपीठ निर्माण झाले. ग्रामीण विकासाच्या सामाजिक आर्थिक विकासास गती मिळाली.
सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्यामुळे लोकशाहीच्या मुळापर्यंत पोहोचणे शक्य झाले. आरक्षणाच्या व्यवस्थेमुळे वंचित घटकाचा सहभाग वाढला. स्थानिक स्तरावर गरजा नुसार वेगवेगळ्या योजना पोहोचवणे शक्य झाले. स्थानिक प्रश्न स्थानिक पातळीवरच सोडवणे शक्य झाले.ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांचा प्रत्यक्ष सहभाग वाढला.

संदर्भसूची (References)

1. श्री.वास्तवअरूण - भारतमेपंयायतीराज
2. पळसीकर/सुहासनितिनबिरमल-महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ
3. प्रा.यमल वाड गोविंद-स्थानिक स्वराज्य संस्था२००१
4. विभूते भालबा पंचायत राजव्यवस्था मनोविकास प्रकाशन मुंबई .
5. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. भारताचे संविधान आणि लोकशाही विचार. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन, १९५५.
6. गुहा, रामचंद्र. India After Gandhi. नवी दिल्ली: पिकाडोर, २००७.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधान आणि मानव अधिकार

डॉ. कमलाकर शरद इंगळे
विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, श्री. शेठ मुरलीधरजी मानसिंगका
साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा
Email: ksingale1@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170937
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 185-188
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश :-

भारतीय राज्यघटनेचे उद्देशपत्रिकेची सुरुवातच आम्ही भारताचे लोक'अशी करण्यात आलेली आहे. भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य, घडवून भारताच्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता व सर्व भारतीयांमध्ये एकात्मता प्रवर्धित करणारी बंधुता या मूल्यांवर भारतीय संविधान आधारलेले आहे हीच मूल्य खऱ्या अर्थाने मानवाधिकार आहेत. या तत्त्वामुळे माणसाला माणूस म्हणून जगता येते म्हणूनच भारताचे संविधाना खऱ्या अर्थाने मानवाधिकाराचा स्रोत तथा खजिना आहे.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, मानव अधिकार, मूलभूत अधिकार, राज्याची मार्गदर्शक तत्वे, लोकशाही मूल्ये, कलम 12 ते 35, समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, आर्थिक न्याय, धर्मनिरपेक्षता, मानवी प्रतिष्ठा, महिलांचे अधिकार, अल्पसंख्याक संरक्षण, पर्यावरण संरक्षण, संयुक्त राष्ट्र संघ.*

प्रस्तावना :-

भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया डिसेंबर १९४६ पासून सुरू झाली होती. संयुक्त राष्ट्र संघाने मानव अधिकाऱ्यांना १० डिसेंबर १९४८ रोजी मान्यता दिली. भारतीय राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी लिहून तयार करण्यात आली. राज्यघटनेचा स्वीकार २६ जानेवारी १९५० पासून करण्यात आला. मानव अधिकाऱ्यांना वैश्विक मान्यता प्राप्त होण्याअगोदर भारतीय संविधान निर्मिती प्रक्रिया सुरू झाली होती. व मानवाधिकाऱ्यांना जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त झाल्यानंतर संविधान निर्मितीची प्रक्रिया पूर्ण झाली. मानवाधिकार म्हणजे सर्व जगातील मानवांना)स्त्री व पुरुषांना(मानव म्हणून प्राप्त होणारे अधिकार होय. सगळ्या जगातील मानवांना माणूस म्हणून जे अधिकार मिळायला हवे. ते अधिकार मानवाधिकार म्हणून ओळखले जातात.विविध राष्ट्रांनी आपल्या देशातील नागरिकांना मानव म्हणून आदर्श जीवन व्यतीत करण्यासाठी विविध उपाययोजना व अधिकारांची देणगी दिलेली असते. अनेक लोकशाही राष्ट्रांनी आपल्या देशातील नागरिकांना काही नागरी अधिकार बहाल केलेले आहेत. त्याला मूलभूत अधिकार असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेच्या कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकाराची तरतूद आहे. तसेच मानवी कल्याणासाठी मानवाधिकाराला मूर्तरूप प्राप्त होईल. अशी दुसरी आणि अत्यंत महत्त्वपूर्ण तरतूद म्हणजे राज्याची मार्गदर्शक तत्वे होय.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. कमलाकर शरद इंगळे, विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग, श्री. शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा

How to cite this article:
इंगळे, . कमलाकर . शरद . (2025). भारतीय संविधान आणि मानव अधिकार. Journal of Research & Development, 17(9(IV)), 185–188. https://doi.org/10.5281/zenodo.17721407

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17721407
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

या आधारे राज्य देशातील जनतेच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक तसेच आंतरराष्ट्रीय विकासासाठी उपाययोजना करेल म्हणजेच लोकांना, नागरिकांना माणूस म्हणून चांगले जीवन जगण्यासाठी योग्य असे वातावरण निर्माण करून देईल.

उद्दिष्ट्ये :-

१) मानव अधिकाराची संकल्पना सखोल समजून घेणे.
२) भारतीय संविधानातील मानवी अधिकाराची मूल्य अभ्यासणे.

गृहितके :-

१) मानव अधिकार जगातील सर्व मानवांच्या कल्याणाची संकल्पना आहे.
२) भारतीय संविधानाच्या तत्त्वांमध्ये मानव अधिकाऱ्याची मूल्य आहेत.

संशोधन पद्धती :-

मानवी अधिकाराची तत्वे भारतीय संविधानातील मानव अधिकाराची मूल्य समजून घेण्यासाठी भारतीय संविधान व मानव अधिकार या विषयावर संशोधन करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. भारतीय संविधान आणि मानवाधिकार या विषयावर संशोधन करण्यासाठी संशोधन साधने म्हणून वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ तसेच इंटरनेट वरील प्राप्त माहितीचा उपयोग करण्यात येईल.

मानव अधिकार :-

मानव अधिकार हा अखिल मानव जातीच्या सर्वांगीण हित व कल्याणाचा दस्ताऐवज आहे. "मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र... हे संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिस येथे स्वीकारलेले घोषणापत्र आहे. हे घोषणापत्र दुसऱ्या महायुद्धात जगाने अनुभवलेल्या नृशंस अत्याचाराचा परिणाम म्हणून अस्तित्वात आले. सर्व मानवांच्या जन्मसिद्ध मानवाधिकाराची पहिली जागतिक अभिव्यक्ती म्हणून या घोषणा पत्राकडे पाण्यात येते. यात एकूण ३० कलमे असून त्याचा सविस्तर अर्थ नंतर झाल्या अनेक जागतिक करारामधून, राष्ट्रीय घटना आणि कायदे यातून आणि स्थानिक मानव अधिकार संघटनांकडून लावण्यात आला आहे. या घोषणापत्रावर आधारित 'मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीय विधेयक' १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत मांडण्यात आले. १९७६ मध्ये पुरेशा सदस्य राष्ट्राच्या पाठिंब्यानंतर त्यास आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले."[१] अशाप्रकारे जगात मानवाधिकार अस्तित्वात आलेले आहेत.

मानवाधिकराच्या निर्मितीस मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. जगातील विविध भागात प्राचीन काळापासून लोकांना छोट्या-मोठ्या प्रमाणात अधिकारांची प्राप्ती होत गेली. आहे. "इंग्लंडने १६८८ मध्ये हक्काचे विधेयक)Bill of Rights) ला मान्यता दिली. फ्रान्सने १७८९ मध्ये मानवी हक्काचा जाहीरनामा)Declaration of Rights of Man) तर अमेरिकेने १७९१ मध्ये हक्काचा जाहीरनामा स्वीकारून त्याचा राज्यघटनेत समावेश केला. तेव्हाच्या सोव्हिएत संघराज्यानेही 'नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्य' (Fundamental Rights and Duties of Citizen) घोषित करून १९३६ च्या तथाकथित राज्यघटनेत समाविष्ट केले.... जर्मनीत सांघिक गणराज्याने १९४९ साली 'मुलभूत हक्काचे विधेयक' स्वीकारले.... भारताने 'नागरिकांचे मूलभूत हक्क' आणि 'धोरण विषयक मार्गदर्शक तत्वे'.... राज्यघटनेत समाविष्ट केली आहे."[२] भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार व राज्याची नीती निर्देशक तत्वे ही खऱ्या अर्थाने मानव अधिकाराची मुलाधार आहेत.

भारतीय संविधानातील मानवाधिकराबाबतच्या तरतुदी :-

भारताच्या संविधान निर्मात्यांनी सर्व नागरिकांचा म्हणजे राष्ट्रातील सर्व मानवांचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक तरतुदी केलेले आहेत त्यातील काही महत्त्वपूर्ण तरतुदी

१) मूलभूत अधिकार :-

भारतीय संविधानात भारताच्या सर्व नागरिकांना त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकारांची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम १४ - कायद्यापुढे समानता
कलम १५ - धर्म वंश जात लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभावस विरोध
कलम १६ - समान संधी
कलम १७ - अस्पृश्यता निवारण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

कलम १८ - पदव्या व किताब नष्ट करणे
कलम १९ - अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्काचे रक्षण
कलम २० - अपराधा बद्दलच्या दोष सिद्धी बाबत संरक्षण
कलम २१ - जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य रक्षण)कलम २१ क शिक्षणाचा हक्क(
कलम २३ - माणसांचा व्यापार आणि वेटबिगारीच मनाई
कलम २४ - बालकामगार मनाई
कलम २५ - धर्म स्वातंत्र्य
कलम २६ - धार्मिक व्यवहाराची व्यवस्था पाहणे
कलम २७ - धर्मसंवर्धनासाठी देणगी देण्याची स्वातंत्र्य
कलम २८ - धार्मिक शिक्षणात व धार्मिक उपासनेस उपस्थित राहण्याचे स्वातंत्र्य.
कलम २९ - अल्पसंख्याकांचे संवर्धन.
कलम ३० - शैक्षणिक संस्था स्थापण्याचा हक्क.
कलम ३१ - संविधानिक उपाय योजनेच्या हक्काचे अंमलबजावणी.

राज्यघटनेचे कलम १२ ते ३५ मध्ये नमूद मूलभूत अधिकाराच्या भागातील कलम १४ ते ३१ मधील सर्व कलमांच्या तत्त्वांमध्ये मानवाधिकाराचे मूलतत्त्व असल्याचे दिसून येते.

थोडक्यात "जनतेचे कल्याण करणे आणि जनहिताचे संवर्धन व संरक्षण करणे याची हमी मूलभूत हक्कच देतात."[३] थोडक्यात मानव अधिकाराच्या माध्यमातून सर्व जगातील मानवांना जन्मसिद्ध अधिकार देऊन सर्व मानव जातीचे कल्याण अभिप्रेत आहेत. तोच संदेश भारतीय संविधान मूलभूत अधिकाराच्या माध्यमातून देते. मूलभूत अधिकारासमवेदच संविधानाच्या चौथ्या भागात राज्याची मार्गदर्शक तत्वे स्पष्ट केलेली आहेत त्यातही मानवाधिकाराची तत्वे अंतर्भूत आहेत.

कलम ३८ - राज्याने लोककल्याणासाठी समाजव्यवस्था निर्माण करणे.
कलम ३९ - क समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य.
कलम ४१ - कामाचा शिक्षणाचा आणि विवक्षित बाबतीत लोकसाहाय्याचा हक्क.
कलम ४२ - कामाबाबत न्याय व प्रस्तुती बाबत सहाय्य.
कलम 43 - कामगारांना निर्वाह वेतन.
कलम ४५ - सहा वर्षापेक्षा लहान बालकाची देखभाल व शिक्षणाची तरतूद.
कलम ४६ - अनुसूचित जाती जमाती व इतर दुर्बलांचे शैक्षणिक व आर्थिक हिताची तरतूद.
कलम ४८ - वने व जीवसृष्टीचे रक्षण.

कलम ३१ मध्ये लोककल्याणासाठी समाजव्यवस्था निर्माण करावी, कलम ३९ क मध्ये समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य राज्याने द्यावे, काम व शिक्षणाबाबत लोकसहाय्यक कलम ४२ मध्ये, कामगारांना निर्वाह वेतन कलम ४५ मध्ये, सहा वर्षाखालील बालकांची देखभाल व त्यांच्या शिक्षणाविषयीची तरतूद कलम ४६ मध्ये अनुसूचित जाती जमाती व इतर दुर्बलांचे शैक्षणिक व आर्थिक हित कलम ४८ क मध्ये जीवसृष्टीचे रक्षण इत्यादी मानवाच्या कल्याणा बाबतच्या विशेष तरतुदी भारतीय संविधानात करण्यात आलेले आहेत.

निष्कर्ष :-

१) भारतीय संविधानाने नागरिकांना स्वतंत्र जीवन व्यथित करण्यासंबंधीच्या मानवाधिकाराच्या तत्त्वाला मान्यता दिली आहे.
२) मानव अधिकारात महिलांना माणूस म्हणून जगता यावे म्हणून महिलांसाठी विशेषत्वाने तरतुदी आहेत. तशाच विशेष तरतुदी स्त्री- पुरुष समतेसाठी भारतीय संविधानात केलेल्या आहेत.
३) मानव अधिकारात अल्पसंख्यांकांची विशेष काळजी घेणे आवश्यक मानण्यात आले. आहे. तसेच विशेषत्वाने काळजी अल्पसंख्याकांची करण्याच्या तरतुदी भारतीय संविधानात केलेल्या आहे.
४) मानव अधिकारात अखिल मानव जातीचे कल्याण अभिप्रेत आहे. तशाच प्रकारचे सर्वांचे कल्याण भारतीय संविधानाला अभिप्रेत आहे.
५) मानव अधिकाराची सर्वच मूल्य व तत्वे संविधानात स्वीकारून ती तत्वे व मूल्य भारतीय नागरिकांपर्यंत संविधानाच्या माध्यमातून पोहोचत आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भ सूची :-

१) google.com-https:llen. wikipedia.org १८/०९/२०२५, २१.०७PM.
२) शिंदे डॉ. ज.रा., अमृतकर डॉ. प्रशांत- समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. ११८,११९.
३) घांगरेकर प्रा. चि. ग.- भारतीय राज्यघटना स्वरूप व राजकारण, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, पूर्णपणे संशोधित आवृत्ती २०१६ पृ.क्र. ३२,३३.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मानवी मूल्ये आणि वंचित समुदायाचे मानसिक आरोग्य

डॉ. चैत्रा राजाज्ञा
सहयोगी प्राध्यापक न्यू कॉलेज, कोल्हापूर
Email: cvrajadnya@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170938
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 189-192
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

Abstract

मानसिक आरोग्य हे प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत मानवी हक्क मानले जाते. तथापि, वंचित समुदायांमध्ये (अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जाती, धार्मिक व लैंगिकअल्पसंख्याक, स्थलांतरित कामगार इ.) सामाजिक-आर्थिक असमानता, भेदभाव, आणि मानवी हक्कांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात आढळतात. या घटकांचा मानसिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. या लेखात विविध संशोधन अभ्यास, अहवाल आणि धोरणांचा आढावा घेऊन वंचित समुदायांच्या मानसिक आरोग्य संवर्धनात मानवी हक्कांची भूमिका विशद केली आहे. चर्चा भागात मानसिक आरोग्यसेवा, पूर्वग्रह, कायदे व धोरणांचा प्रभाव या मुद्द्यांचा विचार केला आहे. मानसिक आरोग्याला मानवीहक्कांच्या चौकटीतून समजल्यास संवर्धन अधिक प्रभावी होऊ शकते. धोरणात्मक सुधारणा, सेवा विस्तार, वंचित गटांमध्ये जनजागृती आणि समुदाय-आधारित हस्तक्षेपही काळाची गरज आहे.

Keywords: *मानसिक आरोग्य, मानवी हक्क, वंचित समुदाय, मानसिक आरोग्यसेवा, मानसिक आरोग्य कायदा 2017*

प्रस्तावना (Introduction)

भारतीय समाज हा बहुविध संस्कृती आणि भाषा असणाऱ्या अनेक समुदायांनी मिळून बनलेला आहे आणि या प्रत्येक समुदायाचे भारत देशाच्या विकासात वैशिष्ठ्यपूर्ण असे योगदान राहिलेले आहे. परन्तु दुर्दैवाने यातील काही समुदायांना शैक्षणिक, राजकीय, सामाजिक संधी मिळण्यापासून वंचित ठेवले गेलेआणि याचे अनेक विपरीत परिणाम अश्या वंचित समुदायातील अनेक सदस्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर झाले. हे समुदाय मानसिक आरोग्य सेवांच्या पासून देखील वंचित राहिल्याने त्यांच्या समस्यांची तीव्रता अधिकच वाढते. मानसिक आरोग्य हे व्यक्तीच्या संपूर्ण विकासाचे आणि सन्मानाने जगण्याचे महत्त्वाचे अधिष्ठान आहे. जागतिक आरोग्य संघटना (WHO) मानसिक आरोग्याला मूलभूत मानवी हक्क मानते. उत्तम मानसिक आरोग्य असणाऱ्या व्यक्ती या अधिक उत्पादनशील,सर्जनशील आणि कार्यक्षम असतात. म्हणूनच कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता त्या समाजातील प्रत्येक व्यक्तीचे मानसिक आरोग्य उत्तम असणे हे वैयक्तिकच नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून देखील महत्त्वाचे आहे. तथापि, वंचित समुदायातील व्यक्तींना समाजातील इतर व्यक्तींच्या तुलनेत सामाजिक-आर्थिक असमानता, भेदभाव, बहिष्कार आणि हिंसा यांचा सामना अधिक प्रमाणात करावा लागत असल्याने मानसिक आरोग्याशी निगडीत समस्या आणि मानसिक विकारांचे प्रमाण वंचित समुदायातील व्यक्तींमध्ये अधिक असण्याची शक्यता आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. चैत्रा राजाज्ञा, सहयोगी प्राध्यापक न्यू कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
राजाज्ञा, . चैत्रा . (2025). मानवी मूल्ये आणि वंचित समुदायाचे मानसिक आरोग्य. Journal of Research & Development, 17(9(IV)), 189–192. https://doi.org/10.5281/zenodo.17721533

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17721533
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारतीय संविधानामध्ये उल्लेखिलेल्या मानवी हक्कांची जोपासना योग्यरितीनेकेली गेल्यास वंचित समुदाय सदस्यांच्या मानसिक आरोग्य संवर्धनास मोठा हातभार लागू शकतो.प्रस्तुत संशोधन पर लेखाचा उद्देश वंचित समुदायांच्या मानसिक आरोग्य संवर्धनात मानवी हक्कांची भूमिका अभ्यासणे हा आहे.

उद्दिष्टे (Objectives)

1. वंचित समुदायातील मानसिक आरोग्य समस्या आणि त्यांची कारण मीमांसा समजून घेणे.
2. मानवी हक्कांच्या चौकटीतून मानसिक आरोग्य संवर्धनाचे महत्त्व विशद करणे.
3. उपलब्ध कायदे, धोरणे व आंतरराष्ट्रीय करारांचा आढावा घेणे.
4. मानसिक आरोग्य संवर्धना साठी शिफारसी मांडणे.

अभ्यास पद्धत)Methodology(

प्रस्तुत शोधानिबंधाकरिता वर्णनात्मक अभ्यासपद्धतीचा अवलंब केलेला असून प्रकाशित झालेले शोधनिबंध, अहवाल, लेख यांसारख्या दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

आशय विश्लेषण)ContentAnalysis(

मानवी हक्क संकल्पना

मानवी हक्क ही संकल्पना नैसर्गिक हक्क या संकल्पनेतून जन्माला आली. मानवी हक्क किंवा मानवी अधिकार ही संकल्पना 'मनुष्य हा जन्माला येतानाच काही हक्क घेऊन जन्माला येतो' या गृहितकावर आधारित आहे. मानवी हक्क हे सार्वत्रिक असून देश, भाषा, धर्म, वंश,लिंग, जात, जमात, इत्यादींच्या पलीकडे जाऊन जगभरातील प्रत्येक व्यक्तीकरिता समान असतात. राष्ट्रसंघाच्या परिषदांनुसार आणि संकेतांच्या नुसार कोणत्याही देशात कोणत्याही प्रकारची राजकीय, सांस्कृतिक, किंवा आर्थिक पद्धती अस्तित्त्वात असली तरी सर्व मानवी हक्कांचा आदर करणे, संरक्षण करणे व त्यांची जोपासना करणे हे तेथील राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे.

देशातील नागरिकांना तीन प्रकारचे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत- मानवी हक्क,मुलभूत हक्क आणि कायदेशीर हक्क. मानवी हक्कांमध्ये हक्क आणि कर्तव्य हे दोन्ही समाविष्ट आहे. मानवी हक्क अश्या हक्कांशी संबंधित आहेत ज्याद्वारे एखादी व्यक्ती न्याय्य,निष्पक्ष आणि मुक्त जीवन जगू शकते. १९४८ मध्ये स्वीकारण्यात आलेल्या मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणापत्रात)UDHR(एकूण ३० कलमे असून यात जीवन, स्वातंत्र्य, सुरक्षिततेचा अधिकार,गुलामगिरीतून मुक्तता, समानता, गोपनीयता,राष्ट्रीयत्त्वाचा अधिकार, मालमत्तेचा अधिकार, काम करण्याचा आणि नोकरी निवडण्याचा अधिकार, विश्रांती आणि फुरसतीचा अधिकार इत्यादींचा समावेश होतो. १९६६ मध्ये स्वीकारण्यात आलेल्या नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करार आणि सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करार यामध्ये एकूण ५३ कलमे असून यात शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा अधिकार देखील समाविष्ट आहे.

भारतात मानवी हक्क संरक्षण, १९९३ अस्तित्त्वात आला. हा कायदा ४३ कलमांसह ८ प्रकरणांमध्ये विभागला गेला आहे आणि हा अधिनियम मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुध्द व्यक्तीस सुरक्षितता प्रदान करतो. श्रद्धा आणि धर्माचे स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य, संघटन करण्याचे स्वातंत्र्य हे भारतीय संविधानाने वर्गीकृत केलेले काही इतर अधिकार आहेत.

मानसिक आरोग्य संकल्पना

मानसिक आरोग्य ही मानसिक कल्याणाची अशी स्थिती आहे जी लोकांना जीवनातील ताणतणावाना तोंड देण्यास, त्यांच्या क्षमता ओळखण्यास, चांगले शिकण्यास आणि चांगले काम करण्यास आणि त्यांच्या समुदायात योगदान देण्यास सक्षम करते.

वंचित समुदायातील व्यक्तींचे मानसिक आरोग्य

जे समुदाय ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय कारणांमुळे समाजाच्या मुख्य प्रवाहात नाहीत आणि ज्यांना शिक्षण,आरोग्यसेवा, रोजगार आणि संसाधने यांसारख्या मुलभूतसुविधांच्यापासून वंचित ठेवले जाते अश्या समुदायांना वंचित समुदाय म्हणून ओळखले जाते. भारतामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जाती, धार्मिक अल्पसंख्याक, स्थलांतरित कामगार, LGBTQ+ गट, दिव्यांगआणि काही अंशी महिला इ. समुदायांचा समावेश वंचित समुदायांच्या मध्ये होतो.

वर्मा आणि इतर सहकारी)२०२३(यांनी अनुसूचित जमातीमधील मानसिक आरोग्यविषयक समस्यांचा शोध घेणाऱ्या विविध शोधनिबंधाच्या घेतलेल्या आढाव्यातून व्यसनाधीनता, विशेषतः मद्यपान ही समस्या सर्वाधिक असल्याचे दिसून आले. रश्मी आणि सहकारी)२०२२(यांनी दुय्यम स्त्रोतांचा वापर करून केलेल्या रिग्रेशन विश्लेषणात अनुसूचित जमातीमधील वृद्धांच्या मध्ये अनुसूचित

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

जमातीत समाविष्ट नसणाऱ्यावृद्धांच्या तुलनेत तीव्र अवसाद विकृतीचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले.याव्यतिरिक्त काही जमातींच्या मध्ये आत्महत्या प्रयत्नाचे प्रमाण सर्वसामान्य लोकसंख्येच्या तुलनेत अधिक असल्याचेही दिसून आले आहे तर इतर मानसिक आजार समस्यांच्या मध्ये अवसाद विकृती, चिंतेची लक्षणे आणि खाण्याचे विकार हे आजार आढळून आले)सिंग आणि इतर, २०१३(.गुप्ता आणि कॉफे)२०२०(यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या प्रदात्ताच्या आधारे केलेल्या तुलनात्मक अभ्यासात त्यांना असे दिसून आले की, उच्च जातीय हिंदूंच्या तुलनेत वंचित समुदाय असणाऱ्या अनुसूचित जाती आणि मुस्लीम लोकसंख्येत मानसिक आरोग्य विषयक समस्यांचे प्रमाण अधिक आहे. उमर आणि सिंग)२०२४(यांनी दिल्ली येथील केंद्रीय विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्यामुस्लीम विद्यार्थ्यांच्या केलेल्या सर्वेक्षणात ४७.८% विद्यार्थ्यांच्या मध्ये ताण, २०% विद्यार्थ्यांमध्ये तीव्र चिंता, तर ४.४% विद्यार्थ्यांच्या मध्ये तीव्र नैराश्य आढळून आले.

वरील सर्व संशोधने या तथ्याकडे निर्देश करतात की, वंचित समुदायात इतर प्रबळ समुदायांच्या तुलनेत प्रामुख्याने ताण, चिंता,अवसाद विकृती, आत्महत्या, आणि व्यसनाधीनता या मानसिक आरोग्य विषयक समस्या प्रकर्षाने आढळतात. वंचित समुदायातील सदस्यांना समाजात असलेला दुय्यम दर्जा, मिळत असणारी दुय्यम वागणूक आणि त्यांच्या बाबतीत केला जात असणारा भेदभाव यामुळे त्यांच्या आत्मसन्मानास ठेच पोहोचू शकते. याशिवाय अश्या समुदायांच्या विषयी अस्तित्त्वात असणाऱ्या पूर्वग्रहांच्यामुळे शाळा, महाविद्यालये,विद्यापीठे, नोकरी-व्यवसाय अश्या अनेक ठिकाणीसामावून घेतले जात नाही. यातून एकटेपणाची भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ शकते. पूर्वग्रहातून काही वेळा या समुदायातील सदस्यांच्या विरोधात अनेक हिंसात्मक घटना देखील घडल्या आहेत. यातून या समुदायातील सदस्यांच्या मध्ये असुरक्षिततेची आणि ताणाची भावना मोठ्या प्रमाणात निर्माण होताना दिसून येते. समान संधींच्या अभावी वैफल्य , नैराश्य आणि यातून मनात येणारे आत्महत्येचे विचार आणि केले जाणारे आत्महत्येचे प्रयत्न देखील वंचित समुदाय सदस्यांच्यामध्ये अधिक आढळतात.

- **मानसिक आरोग्य आणि मानवी हक्क**

आंतरराष्ट्रीय करार (UDHR 1948, UNCRPD 2006) व जागतिक अहवालांमध्ये मानसिक आरोग्य हा मानवी हक्क म्हणून अधोरेखित केला आहे .भारतामध्ये मानसिक आरोग्य सेवा कायदा 2017 ने मानसिक आरोग्य सेवा ही हक्क म्हणून मान्य केली. सन्मानाने जगण्याचा अधिकार, समानसंधी, आरोग्य सेवा मिळवण्याचा अधिकार हे वंचित समुदायाच्या मानसिक आरोग्य संवर्धनासाठी अत्यावश्यक आहेत .शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा योजना यामुळे वंचित समुदायाच्या मानसिक आरोग्याला पाठबळ मिळू शकते.

शिफारसी (Recommendations)

1. धोरणात्मक सुधारणा: मानसिक आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य यंत्रणेत एकत्रित करणे.
2. मानवीहक्क अंमलबजावणी: वंचित गटांसाठी आरोग्यसेवा सुलभ आणि परवडणारी करणे.
3. समुदाय-आधारित उपक्रम: सपोर्टग्रुप, काउन्सेलिंग सेवा, समुदायने त्यांचा सहभाग.
4. जनजागृती आणि कलंक कमी करणे: शाळा, महाविद्यालये, ग्रामपातळीवर मोहिमा.
5. संशोधन आणि डेटा संकलन: वंचित गटांच्या मानसिक आरोग्यावर नियमित राष्ट्रीय अहवाल प्रकाशित करणे.

निष्कर्ष (Conclusion)

मानसिक आरोग्य हे फक्त वैद्यकीय नव्हे तर मानवी हक्कांचे प्रश्न आहे. वंचित समुदायांना आरोग्य सेवा, समान संधी आणि सन्मान न मिळाल्या सत्यांच्या मानसिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. मानवी हक्कांच्या चौकटीतून विचार केल्यास वंचित समुदायाच्या सदस्यांचे मानसिक आरोग्य संवर्धन अधिक प्रभावी होऊ शकते. त्यामुळे धोरणात्मक सुधारणा, सेवाविस्तार, आणि सामाजिक संवेदन शीलता ही काळाची गरज आहे.

संदर्भ

1. Umar. A. &Singh, A. K. (2024). Mental Health Issues and Coping Strategies in Religious Minority: A Study of Muslim Students in Higher Education. *The International Journal of Indian Psychology, 12*)4(, DIP: 18.01.144.20241204, DOI: 10.25215/1204.144 https://www.ijip.in
2. Brinda, E. M., Attermann, J., Gerdtham, U. G., & Enemark, U. (2016). Socio-economic inequalities in health and health service use among older adults in India: results from the WHO Study on Global AGEing and adult health survey. *Public health*, 141, 32–41. https://doi.org/10.1016/j.puhe.2016.08.005
3. Gupta, A., & Coffey, D. (2020). Caste, Religion, and Mental Health in India. *Population research and policy review, 39*(6), 1119–1141. https://doi.org/10.1007/s11113-020-09585-9

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

4. Rashmi, R., Srivastava, S., Muhammad, T. et al.)২০২২(. Indigenous population and major depressive disorder in later life: a study based on the data from Longitudinal Ageing Study in India. *BMC Public Health,* 22, 2258 (2022). https://doi.org/10.1186/s12889-022-14745-x
5. Singh P.K., Singh R.K., Biswas A., Rao V.R.)২০১৩(. High rate of suicide attempt and associated psychological traits in an isolated tribal population of North-East India, *Journalof Affective Disorder,* 151, 673-678.
6. World Health Organization (2017). Mental health and human rights. Geneva: WHO.
7. United Nations (1948). Universal Declaration of Human Rights.
8. Government of India (2017). Mental Healthcare Act, 2017.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

NEP 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य: गरजा आव्हाने व संधी

आरती प्रमोद क्षीरसागर[1], डॉ. शिवाजी बापू पाटील[2]
[1]सहाय्यक प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ एजुकेशन,
जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
[2]प्राचार्य, वसंतराव नाईक कॉलेज ऑफ एजुकेशन,
कळंबा, कोल्हापूर

Manuscript ID:
JRD -2025-170939
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 193-197
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०)*NEP* 2020) शिक्षण क्षेत्रात सर्वांगीण बदल घडवून आणण्यावर भर देते, ज्यात संवादकौशल्याचा महत्त्वाचा भाग आहे. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक संभाषण कौशल्यांचा विकास शिक्षणाची गुणवत्ता व परिणामकारकता वाढवतो. प्रभावी संवादामुळे आत्मविश्वास, सहकार्य, व नेतृत्वगुण विकसित होतात. विविध प्रशिक्षण, कार्यशाळा व तंत्रज्ञानाचा वापर करून संवादकौशल्ये विकसित केली जाऊ शकतात. त्यामुळे शिक्षकांचे सशक्तीकरण व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो.

महत्वाचे शब्द : *NEP 2020*, व्यावसायिक संभाषण कौशल्य

प्रस्तावना

आजच्या एकविसाव्या शतकात अध्यय व तंत्रज्ञानाचा वापर करणारी पिढी आहे त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात आणि त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी शिक्षक अध्यायावत असणे अत्यंत आवश्यक आहे जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होत आहेत तेव्हा अशा बदलासाठी शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही सज्ज आहेत या बदलांमध्ये इंग्रजी भाषेचे महत्त्वाचे स्थान आहे एकीकडे मातृभाषेवरची आत्मीयता आणि दुसरीकडे जागतिकीकरणाच्या दुनियेत भक्कमपणे उभे राहण्याची क्षमता या दोन्ही टोकांचा समतोल साधत शिक्षक आणि विद्यार्थी नवनवीन पद्धतीचा वापर करत आहेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **NEP** 2020 चे मुख्य महत्त्व हे आहे की हे धोरण भारताच्या शिक्षण प्रणालीत सर्वांगीण बदल घडवून आणण्यासाठी आहे याचा उद्देश एक सर्वसमावेशक कौशल्य आधारित आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षण प्रणाली निर्माण करणे आहे. या धोरणाने 1986 च्या धोरणाची जागा घेतली असून बालपणीचे शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरावर सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत.

NEP 2020 चे मुख्य मुद्दे आणि महत्त्व

- सर्वसमावेशक आणि लवचिक शिक्षण
- 5+3+3+4 शिक्षण रचना
- उच्च शिक्षणात सुधारणा
- तंत्रज्ञान आणि कौशल्य शिक्षकांचे सक्षमीकरण

जबाबदारी आणि गुणवत्ता समान संधी आणि सर्वसमावेशक शिक्षण

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
आरती प्रमोद क्षीरसागर, सहाय्यक प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ एजुकेशन, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.

How to cite this article:
क्षीरसागर, . आरती . प्रमोद ., & पाटील, . शिवाजी . बापू . (2025). NEP 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य: गरजा आव्हाने व संधी. Journal of Research & Development, 17(9(IV)), 193–197. https://doi.org/10.5281/zenodo.17721709

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17721709
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

व्यावसायिक संभाषण कौशल्याचे महत्त्व

व्यावसायिक संभाषण कौशल्ये (Professional Communication Skills) कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रभावी संवाद केवळ माहिती देण्यासाठीच नव्हे, तर सकारात्मक संबंध निर्माण करणे, सहकार्य वाढवणे आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो.

1. स्पष्ट आणि प्रभावी संवाद साधता येतो

व्यावसायिक संभाषण कौशल्यामुळे आपले विचार, सूचना आणि भावना इतरांना प्रभावीपणे व्यक्त करता येतात. यामुळे गैरसमज टाळले जातात आणि काम अधिक सुसूत्रपणे पार पडते.

2. आत्मविश्वास वाढतो

योग्य संभाषण कौशल्यांमुळे व्यक्तीला आत्मविश्वास मिळतो. संभाषण करताना भीती किंवा संकोच वाटत नाही, त्यामुळे कोणत्याही ठिकाणी विचार मांडणे सोपे होते.

3. नातेसंबंध आणि सहकार्य सुधारते

व्यवसायिक जगतात सहका़र्यांसोबत चांगले नाते निर्माण करणे महत्त्वाचे असते. प्रभावी संवादामुळे परस्पर समज वाढते, विश्वास निर्माण होतो आणि टीमवर्क सुधारते

4. समस्या सोडवण्यासाठी मदत होते

संवाद कौशल्य चांगले असल्यास समस्या योग्य पद्धतीने हाताळता येतात. स्पष्ट संवादामुळे कोणतीही समस्या समजून घेता येते आणि तिला योग्य तोडगा काढता येतो.

5. नेतृत्वगुण विकसित होतात

एक प्रभावी नेता हा उत्तम संभाषण कौशल्य असलेला असतो. स्पष्ट संवाद, प्रेरणा देण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे नेतृत्वगुण वाढतात.

6. करिअरच्या संधी वाढतात

व्यावसायिक संभाषण कौशल्ये चांगली असल्यास मुलाखती, सादरीकरणे, ई-मेल संवाद, बैठकांमधील सहभाग आणि ग्राहकांशी संवाद या सर्व ठिकाणी यश मिळण्याची शक्यता वाढते.

7. ग्राहक आणि क्लायंट यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित होतात

व्यवसायात ग्राहकांशी चांगला संवाद ठेवणे आवश्यक असते. स्पष्ट, विनम्र आणि विश्वासार्ह संवादामुळे ग्राहक समाधान वाढते आणि व्यवसायाची वृद्धी होते.

8. तणाव आणि द्वंद्व टाळता येतात

योग्य संभाषण कौशल्यांमुळे गैरसमज, वाद आणि तणाव निर्माण होण्याची शक्यता कमी होते. संवादातील पारदर्शकता आणि सहानुभूतीमुळे समस्यांचे निराकरण करता येते. व्यावसायिक संभाषण कौशल्य हे प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक आहे. प्रभावी संभाषण केल्याने आत्मविश्वास वाढतो, नातेसंबंध सुधारतात आणि करिअरच्या उत्तम संधी निर्माण होतात. त्यामुळे हे कौशल्य विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. **NEP** 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य यातील आव्हाने व संधी यांचा शोध घेणे.
2. **NEP** 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य याबाबतीत शाळा व महाविद्यालयीन शिक्षकांची सद्यस्थितीचा शोध घेणे.
3. शिक्षक व विद्यार्थी यांच्या व्यावसायिक संभाषण कौशल्य वरील धोरणाचा परिणाम अभ्यासणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

कार्यात्मक व्याख्या

NEP 2020: - "राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020(म्हणजे भारत सरकारने 2020 साली जाहीर केलेले शिक्षण क्षेत्रातील सर्वसमावेशक धोरण होय. या धोरणाद्वारे शालेय व उच्च शिक्षण प्रणालीत गुणात्मक बदल घडवून आणणे, कौशल्याधिष्ठित, बहुविषयक, समावेशक व नवनिर्मितीक्षम शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा उद्देश आहे."

व्यावसायिक संभाषण कौशल्य :- "व्यावसायिक संभाषण कौशल्य म्हणजे कार्यक्षेत्रात प्रभावी संवाद साधण्यासाठी आवश्यक असलेली वाचन, लेखन, ऐकणे व बोलणे ही भाषिक कौशल्ये व त्यांचा सुयोग्य, नम्र, औपचारिक व परिणामकारक वापर करण्याची क्षमता."

संदर्भ साहित्याचा आढावा

निष्ठा या पुस्तकाच्या 18 व्या घटकात शाळा पूर्व व्यावसायिक शिक्षण या घटक संचात भारतातील कौशल्य विकासाच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण केले आहे हा घटक संच हे कौशल्य विकास तसेच शालेय व्यावसायिक शैक्षणिक कार्यक्रमाची सध्याची स्थिती आणि भारतातील व्यवसाय आधारित शिक्षणाच्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचे सर्वकष पुनरावलोकन करण्यासाठी विकसित केले आहे

डॉक्टर पाटील राहुल अशोक यांनी संभाषण कौशल्य स्वरूप आणि महत्त्व या विषयावर लेख चिकित्सा आहे त्यात त्यांनी संभाषणाचे स्वरूप आणि संकल्पना स्पष्ट केली आहे त्याचबरोबर आजच्या युगात असलेली संभाषणाची उपयुक्तता आवश्यकता व महत्त्व स्पष्ट केले आहे या लेखात संभाषणात येणारे अडथळे कोणते यासंबंधी मत मांडले आहे संभाषण प्रभावी करण्यासाठी उपाय हे सुचवले आहेत

व्यावसायिक संभाषण कौशल्याचे महत्त्व

Kaul (2000) यांच्या *Effective Business Communication* या पुस्तकात असे म्हटले आहे की, प्रभावी व्यावसायिक संवाद कौशल्य कोणत्याही व्यवसायासाठी महत्त्वाचे आहे, विशेषतः शिक्षकांच्या बाबतीत. व्यावसायिक संभाषणाच्या वेळी आत्मविश्वास, स्पष्टता, आणि श्रोत्यांशी योग्य संवाद साधण्याची क्षमता महत्त्वाची भूमिका बजावते

Bovee आणि Thill (2016) यांनी व्यावसायिक संवाद कौशल्य हे फक्त भाषेचा वापर नसून, प्रभावीपणे संवाद साधण्याची एक कला असल्याचे सांगितले आहे. शिक्षकांसाठी याचा सराव विद्यार्थ्यांसोबत आणि सहकाऱ्यांशी चांगले नाते निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा असतो.

संशोधन पद्धती

सदर संशोधनात वर्णनात्मक व विशेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे नमुना म्हणून प्राथमिक माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरातील शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे सदर संशोधनाकरिता प्रश्नावली या साधनांचा वापर करण्यात आला आहे माहिती विश्लेषणासाठी आलेख टक्केवारी सरासरी या तंत्रज्ञानाचा वापर तंत्राचा वापर करण्यात आला आहे

NEP 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य यांचा सहसंबंध

NEP 2020 (National Education Policy 2020) आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य)Professional Communication Skills) यांचा संबंध अत्यंत जवळचा आहे. खालील मुद्द्यांमध्ये तो स्पष्ट होतो —

१. भाषा व संवादकौशल्यावर NEP 2020चा भर

बहुभाषिकता)Multilingualism) : NEP 2020 नुसार तिसरीपर्यंत, शक्यतो पाचवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर आहे. मातृभाषेत भक्कम पाया घातल्याने विद्यार्थ्यांचे विचार मांडण्याचे व संवाद साधण्याचे कौशल्य दृढ होते.
भाषा समृद्धी : धोरणात किमान दोन ते तीन भाषांवर प्रभुत्व मिळवण्यावर जोर आहे. व्यावसायिक पातळीवर बहुभाषिक संवादकौशल्य रोजगारसंधी वाढवते.

२. २१व्या शतकातील कौशल्ये

NEP 2020 ने "21st Century Skills" मध्ये critical thinking, creativity, collaboration आणि communication यांना मूलभूत मानले आहे. यातले "communication" म्हणजेच

स्पष्ट, परिणामकारक बोलणे,

श्रोत्याला समजेल असे लेखन,

डिजिटल साधनांतून संवाद साधणे.

ही सर्व कौशल्ये व्यावसायिक संभाषणाची पायाभूत गरज आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

३. उच्च शिक्षण व व्यावसायिक शिक्षण

हायर एज्युकेशनमध्ये 'Skill Development' : NEP 2020 अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम)इंजिनिअरिंग, व्यवस्थापन, शिक्षक शिक्षण(यामध्ये Communication Skills अनिवार्य घटक करण्याची शिफारस आहे.

इंटर्नशिप व प्रॅक्टिकल ट्रेनिंग : उद्योग, संशोधन संस्था यांच्याशी संलग्न इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांचे प्रेझेंटेशन, टीम कम्युनिकेशन, ई-मेल ड्राफ्टिंग इत्यादी कौशल्य विकसित होते.

४. डिजिटल युगाशी सांगड

NEP 2020 डिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन देते (ऑनलाईन कोर्स, MOOCs).

ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आभासी मीटिंग्स, ई-कॉन्फरन्सेस, वेबिनार्स यासाठी व्यावसायिक संवादकौशल्य आवश्यक आहे—स्पष्ट उच्चार, नेटिक्वेट्स, लिखित डिजिटल कम्युनिकेशन.

५. शिक्षक व प्रशिक्षकांसाठी

धोरणात शिक्षक प्रशिक्षणात Effective Communication हे महत्त्वाचे अंग मानले आहे. शिक्षक व्यावसायिक संवादकौशल्याने सज्ज असतील तर विद्यार्थ्यांमध्येही तेच कौशल्य विकसित होऊ शकते.

थोडक्यात संबंध

NEP 2020 = कौशल्य आधारित शिक्षण

व्यावसायिक संभाषण कौशल्य = त्या कौशल्यांचा मध्यबिंदू

NEP 2020 ने दिलेली बहुभाषिकता, 21st Century Skills, डिजिटल शिक्षण आणि उद्योग-शैक्षणिक समन्वय या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व जागतिक पातळीवर प्रभावी व्यावसायिक संवादक बनवतात.

म्हणूनच NEP 2020 चे यश प्रत्यक्षात आणण्यासाठी Professional Communication Skills विकसित करणे हे अत्यावश्यक आहे; दोन्ही घटक परस्पर पूरक आहेत.

विश्लेषण

- NEP 2020 बद्दल योग्य ज्ञान आहे 57.1% लोकांचे काही प्रमाणात ज्ञान आहेत व 42.97% लोकांना खूप चांगल्या पद्धतीने ज्ञान आहे
- NEP 2020 मधील बहुभाषिकता व एकविसाव्या शतकातील कौशल्य संकल्पना बाबत 50 टक्के लोकांनी प्रशिक्षण घेतलेले आहे पण 28.6% लोकांनी प्रशिक्षण घेतलेली नाही व 21.4% प्रतिसाद त्यांनी नियोजनात आहे असे मत नोंदवले आहे
- डिजिटल शिक्षण व ई लर्निंग मुळे आपली संवाद शैली बदलली आहे याबाबतीत 35.7 प्रतिसादकांनी होकारार्थी उत्तर दिले आहे
- शिक्षकांच्या व्यावसायिक संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी संस्थेत कोणते ठोस उपाय सुचवाल? या बाबतीत प्रशिक्षण, परिपाठ, सांस्कृतिक उपक्रम, आंतरवासिता व व्यक्तिमत्व शिबिर मध्ये विविध उपक्रम राबवून व तज्ज्ञ मार्गदर्शक कडून कार्यशाळा आयोजित करणे, संभाषण कौशल्य प्रक्षिक्षणात सातत्य असावे, विविध तंत्र नाविन्यपूर्ण असावे, स्पेशली व्यवसाय शिक्षणासाठी मार्गदर्शन पूरक अभ्यासक्रम ,प्रात्यक्षिके इत्यादी उपाय यावरती आहेत त्याची सुरुवात इयत्ता आठवी पासून करावी, Arrange more trainings and school visit, संवाद प्रशिक्षण देण्यात यावे विविध साधनांचा वापर करून अध्यापन करण्यासाठी प्रयत्न करावे, प्रशिक्षण, शिबिर, कार्यशाळा त्याचबरोबर विविध विषयावर गटचर्चा, वादविवाद स्पर्धा, कोडी चित्र तक्ते यावरती सविस्तर माहिती सांगणे, व्यवहारिक भाषेमध्ये संवाद साधने, सकारात्मक भाषा वापरणे, समोरच्या व्यक्तीचे मत त्याचं विचार समजून घेणे, प्रत्येकाच्या मताचा स्वीकार करणे, डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करणे, व्हिडिओ ऑडिओ क्लिप्स यांचा अध्यापनामध्ये उपयोग करणे. बघितलेल्या व्हिडिओ वरती त्यांच्या स्वतःच्या शब्दांमध्ये मत मांडण्यास सांगणे. वरील सर्व बाबी या शिक्षकांच्या व्यवसायिक संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी खूप उपयोगी आहेत. असे प्रतिसाद आले आहेत.
- NEP 2020 च्या उद्दिष्टपूर्तीसाठी शिक्षकांची संवादकौशल्ये का आणि कशी महत्त्वाची आहेत, यावर आपले विचार लिहा. याबाबतीत नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात कसा करता येईल. शिक्षकांमधील वेगवेगळ्या कल्पनाचा वापर अध्यापनात कसा करता येईल यासाठी संवादकौशल्य महत्त्वाची आहेत. शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया साठी संवाद कौशल्य आवश्यक आहे, विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास साधता येते, मार्गदर्शन करता येते. पिढी तंत्र स्नेही असल्याने

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संवेदनशीलता निर्माण करणयासाठीव बहुभाषिक असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षा केवळ थेरॉटिकल नॉलेज न घेता प्रॅक्टिकल नॉलेज घेतल्यास विद्यार्थ्यांची व्यवसायाची उद्दिष्टपूर्ती होईल. मुक्त वातावरणामध्ये अभ्यासक्रम राबविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. NEP 2020 च्या उद्दिष्टपुरर्ततेनुसार शिक्षकांना संवाद कौशल्य प्रभावी असणे खूप महत्त्वाचे आहे कारण शिक्षक प्रभावी संवाद करतील तरच मुले प्रभावीपणे संवाद करणे शकतील आणि आजच्या युगात संवाद हे खूप महत्त्वाचे माध्यम झाले आहे विद्यार्थी केंद्रीय शिक्षण, बऊभाषिकता, चिंतन व सर्जनशील विचार प्रक्रियेसाठी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या फल निश्चितीसाठी विद्यार्थ्यांचे वयोमानानुसार त्यांच्याशी एकरूप होण्यासाठी मानसिकतेचा विचार करून संवाद साधणे आवश्यक आहे नविन संकल्पना शिकवणं आहे त्यासाठी विविध साधनांचा वापर करताना वेगवेगळया पद्धतीने संवाद साधणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संवाद कौशल्य महत्त्वाचे आहे. योग्य निर्णय घेणे, समस्या निराकरण करणे ,सर्जनशील विचार करणे, चिंतनशील विचार करणे ,चिकित्सक विचार करणे या उच्च दर्जाच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी संवाद कौशल्य महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे प्रोत्साहन देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे त्यांना सक्षम नागरिक बनवणे, ज्ञानाचं सोप्या पद्धतीने हस्तांतरण करणे एखादी माहिती सोपी करून विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेमध्ये सांगणे या सर्व प्रक्रियेसाठी शिक्षकांमध्ये संवाद कौशल्य उत्तम असणे महत्त्वाचे आहे. असे प्रतिसाद दिले आहेत

निष्कर्ष :

1. NEP 2020 मुले शिक्षक आणि विद्यार्थ्यांना बहुभाषिक व्यावसायिक डिजिटल संवाद कौशल्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे
2. वरील विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शिक्षण प्रणालीत मूलभूत बदल घडवून आणणारे धोरण असून, त्यात संवाद कौशल्यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षकांचे व्यावसायिक संभाषण कौशल्य सुधारल्यास विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासास चालना मिळते. नव्या तंत्रज्ञानाचा वापर, बहुभाषिकता आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षणपद्धतीमुळे प्रभावी संवाद अधिक आवश्यक ठरतो.
3. विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्यासाठी व्यावसायिक संभाषण कौशल्यावर प्रभुत्व असणे हि काळाची गरज आहे त्यामुळे त्याची आमल बजावणी होत आहे.

शिफारसी:

1. शिक्षकांसाठी नियमित संवाद कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित कराव्यात.
2. शाळांमध्ये संवादाधारित उपक्रम जसे वादविवाद, गटचर्चा, नाटक इ. राबवावेत.
3. शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात "प्रोफेशनल कम्युनिकेशन" हा अनिवार्य घटक करावा.
4. डिजिटल माध्यमांचा वापर करून संवाद कौशल्य विकासासाठी विविध ई-लर्निंग साधने वापरावीत.
5. विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य वाढवण्यासाठी आठवीपासून संवादकेंद्रित शिक्षण सुरू करावे.

संदर्भ सूची

1. Government of India. (2020). National Education Policy 2020. Ministry of Human Resource Development, New Delhi.
2. Kumar, K. (2021). NEP 2020: Transforming Indian Education. New Delhi: Sage Publications.
3. Raman, M. & Sharma, S. (2019). Technical Communication: Principles and Practice. Oxford University Press.
4. Kaul, A. (2015). Effective Business Communication. PHI Learning Pvt. Ltd.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

21 वी सदीं की हिंदी कविता में अभिव्यक्त संवैधानिक मूल्य (सामाजिक समता के परिप्रेक्ष्य में)

डॉ.सागर रघुनाथ कांबळे
श्री शिव –शाहू महाविद्यालय,सरूड
Email: sagarkam24@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170940
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 198-202
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

शोध सारांश :

'संवैधानिक मूल्य' एक परिवर्तनशील विचार है। जिसमें रूढियों, परंपराओं, विचारों और व्यवस्थाओं में परिवर्तन करने की शक्ति हैं। इसने समूचे क्षेत्रों में परिवर्तन लाने का महत्वपूर्ण कार्य किया हैं। जिससे मनुष्य के विचारों में परिवर्तन हुआ है। सदीयों से पशु से भी हीन दशा में जीवन जीने वाले पिछड़े वर्ग में परिवर्तन की ज्वाला सुलगाई हैं। साथ ही उनमें 'स्वाभिमान' भी जाग्रत किया है। जिस कारण पिछडा वर्ग आज शिक्षित हो गया है। संगठित होकर अन्याय, अत्याचार का विरोध कर रहा हैं। उनमें एक नई चेतना निर्माण हुई है, जो उसे परंपरागत धर्म व्यवस्था के खिलाफ विद्रोह करने की प्रेरणा देती हैं। इसके लिए साहित्य का क्षेत्र भी अपवाद नहीं है। 'संवैधानिक मुल्यों' का प्रतिबिंब हमें आज पिछडे वर्ग के साहित्य में दिखाई देता हैं। 'संवैधानिक मूल्य' ही पिछडे वर्ग के साहित्य की ऊर्जा है, चेतना है। जो व्यक्ति के विचारों को अभिव्यक्त करने के लिए स्वतंत्रता प्रदान करती है। इसलिए डॉ. बाबासाहेब आंबेडकर के विचारों से प्रभावित इक्कीसवीं सदी की हिंदी कविता का मूल संवैधानिक मूल्य ही है।

बीजशब्द: *21 वी सदीं की हिंदी कविता, संवैधानिक मूल्य, समता |*

पिछडे वर्ग के कवि सामाजिक 'समता' की बात को महत्वपूर्ण मानते है। उनके अनुसार हर राज्य में समूचे लोगों में समता हो। कोई भी किसी को पराया ना समझें। किसी का समाज में शोषण ना हों। जाति-पांति की भावना को पीछे छोडकर सभी लोग एक-दूसरे का आदर करें। वह मानते है, कि ऐसा भी समय आएगा जब भारतीय समूचा समाज एक होकर जाति, धर्म की सीमाओं को तोडकर समता स्थापित करेगा।

वर्ण तथा जाति का विरोध:

शुरूआत में व्यक्ति के साथ जाति, वर्ण, धर्म का कोई भेद नहीं था। मगर थोडा-थोडा जाति का जहर भारतीय समाज में ढाला गया। धार्मिक आडंबर तथा कर्मकांडों ने मनुष्य को मानसिक गुलाम बनाने को मजबूर किया। मनुष्यों को अन्याय, अत्याचार का पक्षधर बना दिया गया। इसी जाति, धर्म के आडंबरों ने मानवता को कमजोर बनाया। कवि सोहनलाल 'सुबुद्ध' अपने 'हे संकीर्ण मनुष्य' कविता में इसे उजागर करते है-

"हे संकीर्ण मनुष्य!
तू ने
निंद्य निष्ठाओं से घिर कर
बच्चों में भर दिया
छुआछूत का जहर।"[1]

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ.सागर रघुनाथ कांबळे, श्री शिव –शाहू महाविद्यालय ,सरूड

How to cite this article:
कांबळे, . सागर . रघुनाथ . (2025). 21 वी सदीं की हिंदी कविता में अभिव्यक्त संवैधानिक मूल्य (सामाजिक समता के परिप्रेक्ष्य में). Journal of Research & Development, 17(9(IV)), 198–202.
https://doi.org/10.5281/zenodo.17721843

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17721843
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

उपर्युक्त पंक्तियों में कवि वर्ण और जाति व्यवस्था के प्रति अपने विचार व्यक्त करते हैं। साथ ही 'संवैधानिक मुल्यों' के ;समता', 'न्याय', मानवता को भी समाज के लिए महत्वपूर्ण मानते हैं। जिसे अपनाकर भारतीय समाज व्यवस्था का भेदभाव खत्म हो जाए।

वर्ण व्यवस्था के प्रति नकारात्मकता:

इक्कीसवीं सदीं के कवि समाज में स्थित चातुर्वर्ण्य व्यवस्था को जड से उखाड फेंककर एक नई व्यवस्था बनाना चाहते हैं। जिसमें एक-दूसरे के साथ आदरभाव, भाईचारा हो। साथ ही उस व्यवस्था में शोषित पिछडे वर्ग, उपेक्षित को आदर सम्मान हों। कवि सुदेश कुमार 'तनवर' अपनी 'चेतना' कविता में इस बात को स्पष्ट करते हुए कहते है-

"मैं नहीं रहा
तुम्हारे पुरखों के
टुच्चे दिमाग की
वर्ण-जाति-व्यवस्था का
पैरोकार।"[2]

इन पंक्तियों में कवि समाज में स्थित चातुर्वर्ण्य व्यवस्था का विरोध और पिछडे वर्ग के प्रति आदर भाव रखने की इच्छा प्रकट करते हैं। इस में 'संवैधानिक मूल्य' के स्वाभिमान, बौद्धिकता, मानवतावाद के तत्व परीलक्षित होते हैं।

मनु की वर्ण व्यवस्था से पीडित समाज बदतर जीवन जीता आया हैं। मनुवादी विचारकों ने कभी पिछडे वर्ग का दु:ख, दर्द नही समझा हैं। उन्होंने निरंतर पिछडे वर्ग को गुलामी का जीवन जीने को मजबूर किया हैं। पिछडे वर्ग के लोगों ने उच्च जाति को अपने से हमेशा से ही स्वतंत्र माना है। कवि डॉ. धीरजभाई वणकर अपने कविता संग्रह 'हौसलों की उडान' अपनी कविता 'हौसलों की उडान' में इसी बात को रखते है-

"वह एक बहिष्कृत है
इसलिए आपने
उसे मनुष्य माना ही नहीं
और सदियों तक हक जमाते रहें।"[3]

प्रस्तुत पंक्तियों से कवि ने वर्ण व्यवस्था के घिनौनेपन को दर्शाया हैं। जिससे पिछडे वर्ग का सदीयों से हो रहे शोषण के प्रति आक्रोश दिखाई देता हैं। इस कविता में मूलत: 'संवैधानिक मुल्यों' के प्रमुख तत्व 'सामाजिक समता' के प्रति छटपटाते वर्ग की ओर इशारा किया हैं। साथ ही "संवैधानिक मुल्यों" के 'स्वाभिमान', 'मानवतावाद' तत्वों का प्रभाव भी दिखाई देता हैं।

'संवैधानिक मूल्य' से प्रभावित इक्कीसवीं सदीं के कवि अपने अंर्तमन की पीडा को उजागर करते हुए कहते है, कि समाज की व्यवस्था के नाम पर जो अन्याय, अत्याचार पिछडे वर्ग के लोगों ने सहा हैं, वह साधारण समाज नही हो सकता है। जिस सामाजिक व्यवस्था में पानी के विभाजन पर जाति की मुहर लगी हुई थी। कवि संतराम देशमुख 'विमल' अपनी कविता 'टिमटिमाते जल' में इसी बात को स्पष्ट करते है-

"सारा जग करे उपहास
जलते जा हर पल
फिर भी दीपक जल
तू धीरे-धीरे जल।"[4]

उपर्युक्त पंक्तियों में कवि ने पिछडे वर्ग की यथार्थ दशा को पाठकों के सामने रखा हैं। जिससे 'संवैधानिक मूल्य' के 'संघर्ष' तत्व को हम प्रमुखता से देख सकते हैं।

कवि अपने समाज के दु:ख, दर्द को बखुबी समझते हैं। वें शोषक वर्ग से उसी दु:ख, दर्द, अत्याचार को सहने की बात करते हैं। शोषक वर्ग यदि इस पीडा, अत्याचार को अनुभव कर लेता है, तो वें जान सकेंगे की अन्याय क्या होता हैं। कवि डॉ. जी. वी. रत्नाकर अपनी 'बुद्ध की हिंसा' कविता में उपर्युक्त बात को रखते हुए कहते है-

Journal of Research and Development
कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिकदृष्ट्या समृद्ध प्रदेश असून पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रस्तुत अभ्यासात कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासाचे भौगोलिक घटकांशी असलेले संबंध आणि त्या विकासासमोरील विविध आव्हाने यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. भौगोलिक दृष्टिकोनातून जिल्ह्याचे स्थान, भूप्रदेश, हवामान, नद्या आणि सांस्कृतिक वारसा या घटकांचा पर्यटनावर होणारा परिणाम तपासण्यात आला आहे. संशोधनात गुणात्मक पद्धतीचा अवलंब करून विविध अहवाल, सांख्यिक माहिती आणि दुय्यम स्रोतांचा अभ्यास केला गेला आहे. निष्कर्षानुसार, जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक, नैसर्गिक आणि ग्रामीण पर्यटनाची मोठी क्षमता असूनही पूर, भूस्खलन, हंगामी अवलंबित्व आणि प्रदूषण यांसारखी आव्हाने अस्तित्वात आहेत. शाश्वत पर्यटनासाठी स्थानिक समुदायाचा सहभाग, अवसंरचनात्मक सुधारणा आणि पर्यावरणीय व्यवस्थापन यांवर भर देणे आवश्यक आहे. या माध्यमातून कोल्हापूरचा पर्यटन विकास अधिक टिकाऊ आणि सर्वसमावेशक होऊ शकतो.

मुख्यशब्द: *कोल्हापूर जिल्हा, पर्यटन विकास, भौगोलिक घटक, शाश्वत पर्यटन, धार्मिक पर्यटन, नैसर्गिक वारसा, भूस्खलन, पूर व्यवस्थापन, सांस्कृतिक वारसा, पर्यावरणीय आव्हाने*

प्रस्तावना

कोल्हापूर जिल्ह्याचा संक्षिप्त ओळख:

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण भागात, पंचगंगा नदीच्या काठावर वसलेला एक ऐतिहासिक व धार्मिक जिल्हा आहे, जो 'दक्षिण काशी' म्हणून ओळखला जातो. येथे आई अंबाबाईचे प्रसिद्ध मंदिर आहे आणि या जिल्ह्याला समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभला आहे. कोल्हापूर हे ऊस उत्पादनासाठी, गुळाच्या बाजारपेठेसाठी आणि अद्वितीय खाद्यसंस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. जिल्ह्यामध्ये पन्हाळा व विशाळगड यांसारखे ऐतिहासिक किल्ले तसेच राधानगरी धरण आणि दाजीपूर अभयारण्य यांसारखी निसर्गरम्य स्थळे आहेत .कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण-पश्चिम भागातील एक सुविख्यात ऐतिहासिक व सांस्कृतिक केंद्र आहे. 'दक्षिण काशी' म्हणून ओळखला जाणारा हा प्रदेश पश्चिम घाटाच्या पायथ्याशी वसला असून, त्याची सीमा कर्नाटक राज्याला लागून आहे. जिल्ह्याची भौगोलिक स्थिती ही त्याच्या समृद्ध पर्यटन क्षमतेचा पाया आहे. पंचगंगा नदीचे खोरे, सुपीक जमीन, आणि डोंगराळ प्रदेश यामुळे येथे विविध प्रकारचे पर्यटनासाठी आकर्षणे निर्माण झाली आहेत. कोल्हापूर ऐतिहासिक महालक्ष्मी मंदिर, कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर, कोल्हापुरी चपला, कुस्ती, मांसाहारी जेवण आणि कोल्हापुरी गूळ या गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. येथील मसालेदार पाककृतीही तिखटपणासाठी भारतभर प्रसिद्ध आहेत.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. राजेंद्र लक्ष्मण कोळी, सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.

How to cite this article:
कोळी, . राजेंद्र . लक्ष्मण ., & घाटगे, . टी . जी . (2025). कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन विकास आणि आव्हाने: एक भौगोलिक अभ्यास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 231–235. https://doi.org/10.5281/zenodo.17722833

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.17722833


Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

या भागातील भरपूर नद्या आणि सुपीक जमीन यामुळे मुख्यत: शेतीवर आधारित उद्योग असूनही कोल्हापूर दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत आघाडीच्या जिल्ह्यांमध्ये गणला जातो. आध्यात्मिक इतिहास आणि त्याच्या महालक्ष्मी मंदिराच्या प्राचीनतेमुळे, ज्याला अंबाबाई म्हणून ओळखले जाते. हा प्रदेश कोल्हापुरी चप्पल नावाच्या प्रसिद्ध हस्तकला आणि वेणीच्या चामड्याच्या चप्पलच्या उत्पादनासाठी ओळखला जातो, ज्याला २०१९ मध्ये भौगोलिक संकेत पदनाम मिळाले. हिंदू इतिहासातील एका राक्षस कोल्हासुराच्या नावावरून कोल्हापूर हे नाव पडले आहे. पौराणिक कथेनुसार, लोकांना त्रास दिल्याबद्दल देवांनी त्याच्या मुलांना मारल्यानंतर कोल्हासुर या राक्षसाने तपस्वीपणाचा त्याग केला. त्याने महालक्ष्मीला प्रार्थना केली आणि तिला शंभर वर्षांसाठी हा परिसर त्याच्याकडे सोडण्याची विनंती केली. या काळात त्याने असंख्य गुन्हे केले, जोपर्यंत शंभर वर्षे पूर्ण झाल्यानंतर देवी परत आली आणि त्याच्या पापांसाठी त्याला मारले. कोल्हासुरची शेवटची इच्छा होती की त्या जागेचे नाव त्याच्या नावावर ठेवावे, ती विनंती मान्य झाली आणि त्या भागाचे नाव कोल्हापूर ठेवण्यात आले. 'कोल्हा' हा शब्द कोल्हासुरचे प्रतिनिधित्व करतो आणि 'पूर' हा संस्कृत शब्द आहे, ज्याचा अर्थ 'शहर' असा होतो. ८ ते १२ शतकापर्यंत या प्रदेशावर राज्य करणाऱ्या शिलाहार राज्याच्या शिलालेखांवर या भागाचा उल्लेख 'क्षुल्लकपूर' (जैन भिक्षूंचा पहिला टप्पा) आणि 'कालापुरी' असा आहे, जे सुंदर कोरीवकाम असलेली मंदिरे असलेले शहर आहे. ही ऐतिहासिक माहिती शिलाहार काळातील प्राचीन जैन मठ आणि अंबाबाई मंदिराजवळील मंदिरांमध्ये जतन केलेली आहे

कोल्हापूर जिल्याचे भौगोलिक स्थान

कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील शेवटचा जिल्हा असुन त्याच्या पश्चिम-नैर्ऋत्येला सिंधुदुर्ग जिल्हा, पश्चिम-वायव्येला रत्नागिरी जिल्हा, उत्तर-ईशान्येला सांगली जिल्हा तर दक्षिणेला कर्नाटकमधील बेळगाव जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेला सह्याद्रीची रांग असून तेथील भाग डोंगराळ आहे. भौगोलिकदृष्ट्या जिल्ह्याचे पश्चिम रांग , मध्य रांग आणि पूर्व रांग असे तीन विभाग मानले जातात. मध्य आणि पूर्व भागातील माती अग्निजन्य खडकापासून बनली असल्याने काळ्या रंगाची आहे तर पश्चिम भागात घाटातील डोंगराळ भागातील जांभ्या खडकापासून बनलेली लाल माती आहे. या भागातील बहुतेक जमीन जंगलाने व्यापली आहे.कोल्हापूर व रत्नागिरीला जोडणारा आंबा घाट, सिंधुदुर्ग जिल्ह्याला जोडणारा करूळ व फोंडा घाट, तसेच सावंतवाडीला जोडणारा आंबोली घाट हे पश्चिम महाराष्ट्र व कोकणाला जोडणारे प्रमुख घाट या जिल्ह्यात आहेत. या घाटांचा फक्त घाटमाथ्याच कोल्हापूर जिल्ह्यात आहे. कोल्हापूर - मिरज हा एकमेव लोहमार्ग जिल्ह्यातून जातो. पुणे, मुंबई ही राज्यातील महत्त्वाची शहरे लोहमार्गाद्वारे कोल्हापूरला जोडली गेली आहेत.

जिल्ह्यात पंचगंगा, वारणा, दुधगंगा, वेदगंगा, भोगावती, हिरण्यकेशी नदी आणि घटप्रभा या प्रमुख नद्या आहेत. या नद्या पश्चिम घाटात उगम पावून पूर्वेकडे वाहतात. पंचगंगा नदी कासारी, कुंभी, तुळशी सरस्वती(गुप्त नदी) आणि भोगावती या उपनद्यांपासून बनली आहे. कृष्णा नदी जिल्ह्याच्या पूर्व सीमेवरून वाहते तर तिल्लारी नदी पश्चिम सीमेवरून वाहते.



Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संशोधनाचे उद्देश आणि महत्त्व:

या संशोधनाचा मुख्य उद्देश कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासाचे भौगोलिक घटकांशी असलेले नाते समजून घेणे आणि या विकासासमोर उभारलेली आव्हाने ओळखणे हा आहे. भौगोलिक आभास (Geospatial Perspective) म्हणजे केवळ स्थानाचा अभ्यास नसून, तिथील भूप्रदेश, हवामान, जलस्रोत, सांस्कृतिक भूदृश्य आणि मानवी हस्तक्षेप यांच्या परस्परसंबंधांचा विचार करणे. हा अभ्यास महत्त्वाचा आहे कारण त्याद्वारे शाश्वत पर्यटन धोरणे ठरवण्यासाठी आवश्यक असलेली भौगोलिक माहिती उपलब्ध होते.

संशोधन पद्धती व कोल्हापूर जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी

1. **स०ंशोधन पद्धती:**

हा अभ्यास गुणात्मक विश्लेषणावर आधारित आहे. दुय्यम डेटा संकलनासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची अहवाल, जिल्हा प्रशासकीय अहवाल, इतर संशोधन पेपर्स आणि विश्वासार्ह ऑनलाइन स्रोत यांचा वापर करण्यात आला आहे. भौगोलिक माहितीच्या विश्लेषणासाठी नकाशे आणि उपग्रहीय चित्रे यांचा अभ्यास केला गेला.

2. **स०्थानिक व भौतिक गुणधर्म:**

कोल्हापूर जिल्हा पश्चिम घाटाच्या 'सह्याद्री' पर्वतरांगेच्या पूर्व उतारावर वसला आहे. यामुळे जिल्ह्यात उंच डोंगर, खोरे, आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ५४० मीटर से ९४० मीटर उंचीचे प्रदेश आढळतात. हे भौगोलिक स्वरूप नैसर्गिक स्थळे (जसे की जयगड किल्ला, राधानगरी अभयारण्य) आणि खेळयाळ हवामान यासाठी कारणीभूत ठरते.

3. **स०ा०ंस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा:**

कोल्हापूर हे एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. महालक्ष्मी मंदिर हे येथील मुख्य आकर्षण आहे, जे भव्य शिल्पकलेसाठी प्रसिद्ध आहे. छत्रपती शाहू महाराजांचे राज्यकारभार, नवरात्र उत्सव, आणि कोल्हापूरी चपलांसारख्या हस्तकले यांनी या प्रदेशाला एक विशिष्ट सांस्कृतिक ओळख दिली आहे. ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे स्थळे जसे की पन्हाळा किल्ला, प्रतापगड किल्ला (जिल्ह्याच्या सीमेजवळ) यांचा पर्यटनावर मोठा प्रभाव आहे.

4. **नैसर्गिक आणि निसर्गरम्य स्थळे:**

कोल्हापूर जिल्ह्यात निसर्ग सौंदर्य नटलेली अशी विविध पर्यटन स्थळे आपणाला पहावयास मिळतात. त्यामध्ये प्रामुख्याने तिलारी, रामलिंग मंदिर, राऊतवाडी धबधबा, राधानगरी धरण, रामतीर्थ धबधबा, आंबोली, कावळेसाद, त्यानंतर आंबा घाट, गगनबावडा असे विविध आपल्याला निसर्गांना नटलेला ही पर्यटन स्थळे आपणाला मोहित करतात म्हणून कोल्हापूर जिल्ह्याची एक पर्यटन क्षेत्रांमध्ये एक वेगळीच ओळख आहे. पश्चिम घाटामुळे समृद्ध जैवविविधता आणि नैसर्गिक सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करते.

पर्यटन विकासाचे विश्लेषण व आव्हाने

1. **सध्याची स्थिती आणि प्रवाह:**

कोल्हापूर जिल्हा हा तसा ऐतिहासिक आहे राजश्री शाहू महाराजांनी या जिल्ह्याचे एक वेगळं पण आपल्याला दाखवून दिलेला आहे. त्यांच्या कारकिर्दीमध्ये एक मोठे धरण त्यांनी उभारून या कोल्हापूर जिल्ह्याला जे पाण्याची सोय केली तसेच नद्यांच्या पात्रांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे बंधारे बांधून स्थानिक गावांमध्ये पाण्याचे नियोजन केलं त्याचे महत्व उल्लेखनीय आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे धार्मिक केंद्र देखील आपल्याला पाहायला मिळतात त्यामध्ये दत्त मंदिर, खिद्रापूरचं कोपेश्वर मंदिर , महालक्ष्मी मंदिर , जोतिबा मंदिर , त्यामुळे अशा धार्मिक पर्यटन केंद्रांना दरवर्षी लाखो भावी या ठिकाणी भेट देतात व यातून धार्मिक पर्यटन हे मोठ्या पद्धतीने या ठिकाणी दिसून येतात . कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पन्हाळा, विशाळगड यासारखे ऐतिहासिक काही किल्ला, पावनखिंड पाहाव्यास मिळतात सर्व माहिती घेण्यासाठी महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील सर्व पर्यटक विशेष करून या पावनखिंडीला भेट देतात त्यामुळे या ठिकाणी स्थानिक रोजगार देखील खूप मोठ्या पद्धतीने उपलब्ध झालेला आहे अलीकडच्या काळामध्ये प्रवासाची सोय अत्यंत चांगल्या पद्धतीने झाली असल्याने या ठिकाणी पर्यटकांची गर्दी आहे ती मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली आहे . कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गुळाची एक मोठी बाजारपेठ पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे. कोल्हापुरी चप्पल देखील भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचे महत्त्व आहे. त्यामुळे देखील या कोल्हापूर जिल्ह्याची जी काय वेगळीच ओळख आपणाला पहावयास मिळते. कोल्हापूर जिल्ह्याच्या जवळच पश्चिम घाट असल्याने या ठिकाणी जैव विविधता आपल्याला पाहावयास मिळते आणि त्याचे देखील आकर्षण या पर्यटकांना भुरळ घालते त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यामध्ये क्षेत्र ही विकसित झालेली आहेत आणि अलीकडच्या काळामध्ये ऍग्रो टुरिझम हा एक नवीन संकल्पना आल्याने तोही या कोल्हापूर जिल्ह्याच्या पर्यटन विकासामध्ये एक वेगळीच भर घातलेली दिसून येते. शिवाय, धार्मिक व ग्रामीण पर्यटन, आणि अलीकडे वाढत जाणारे निसर्गरम्य पर्यटन यांना चालना मिळाली आहे.

2. भौगोलिक आव्हाने: भौतिक आव्हाने

1.1 जलविषयक आव्हाने.

कोल्हापूर जिल्हा हा पश्चिम घाटात येत असल्याने या भागांमध्ये पावसाचे प्रमाण हे अतिशय जास्त असतं त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात कृष्णा, वारणा आणि प्रामुख्याने पंचगंगा या नद्यांचा मोठ्या क्षेत्र असल्याने या नद्यांना महापूर येतो. या काळामध्ये पर्यटकांचा या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

जिल्ह्यात भेट देण्याचे जे प्रमाण आहे ते अतिशय कमी होतं कारण या पावसाच्या काळामध्ये बहुतेक रस्ते हे जलमय होतात त्यामुळे पर्यटना मधला सर्वात मोठा अडथळा निर्माण होतो 2005, 2019 व 2021 मध्ये मोठ्या प्रमाणात महापूर या जिल्ह्याला आलेला होता. त्यामुळे त्या काळामध्ये लोकांचे आर्थिक नुकसान खूप मोठ्या पद्धतीने झाले त्याचबरोबर या महापुरामुळे रोगराई देखील पसरते तेव्हा अशा काळामध्ये पर्यटकांचा ओघ अतिशय कमी दिसतो, कारण प्रवासी या काळात भेट देणे टाळतात.

1.2 भूविज्ञान संबंधी आव्हाने:

कोल्हापूर जिल्ह्यातला बराचसा भाग डोंगराळ असल्याने या भागात किल्ले पाहण्यासाठी आलेले पर्यटक हे पावसाळ्यामध्ये कमी येतात कारण या ठिकाणी भूस्खलनाचा जो काही धोका आहे तो धोका पहावयास मिळतो त्यामुळे हा अडथळा यामध्ये आपणाला सांगता येईल

1.3 सांस्कृतिक आणि सामाजिक आव्हाने:

प्रचंड गर्दी: कोल्हापूर जिल्ह्यात धार्मिक सनादरम्यान होणारी प्रचंड गर्दीमुळे स्थानिक लोकांचे दैनंदिन जीवनात अडचणी निर्माण होतात व पर्यटकांचा हिरमोड झालेले दिसून येतो. कारण उदा. नवरात्रीमध्ये अंबाबाई व जोतिबाला जाणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड असते या काळात लोकांना गर्दीचा सामना करावा लागतो तसेच वाहतुकीच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक आव्हाने देखील या ठिकाणी आपणास पहावयास मिळतात.

सांस्कृतिक अधोगती: अतिपर्यटनामुळे ऐतिहासिक इमारतींचे ऱ्हास होण्याचा धोका असतो. स्थानिक संस्कृतीवर पर्यटनाचा होणारा प्रभाव हे एक गंभीर आव्हान आहे.

हंगामी पर्यटन: पर्यटन हे विशेषतः सणांवर आणि हिवाळ्यात केंद्रित असल्याने वर्षभर नियमित रोजगार निर्मिती होत नाही.

पर्यावरणीय आव्हाने:

प्रदूषण: पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे. पवित्र मानल्या जाणाऱ्या स्थळांवर होणारे प्रदूषण ही एक गंभीर समस्या आहे.

नैसर्गिक साधनसंपत्तीवर दबाव: नैसर्गिक जलस्रोत आणि अरण्यप्रदेशावर पर्यटनामुळे दबाव वाढत आहे, ज्यामुळे स्थानिक पारिस्थितिकीय तंत्रावर परिणाम होऊ शकतो.

शिफारसी आणि निष्कर्ष

1. शाश्वत पर्यटनासाठी धोरणे:

1. **हंगामनिरपेक्ष पर्यटनाचा विकास:** स्पा पर्यटन, आरोग्य पर्यटन, ग्रामीण पर्यटन आणि शैक्षणिक पर्यटनासारख्या नवीन उत्पादनांवर भर देऊन हंगामी अवलंबित्व कमी करता येईल.
2. **अवसंरचनात्मक सुधारणा:** पूर नियंत्रणासाठी पायाभूत संरचना मजबूत करणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे आणि दूरच्या पर्यटन स्थळांसाठी मार्गदर्शन आणि सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे.
3. **समुदाय-आधारित पर्यटन:** स्थानिक समुदायाला पर्यटन विकासात सहभागी करून घेणे, ज्यामुळे आर्थिक फायदा होईल आणि सांस्कृतिक वारसा जोपासला जाईल.
4. **पर्यावरणीय व्यवस्थापन:** कचरा व्यवस्थापन प्रणाली सक्तीची करणे, जलसंधारण प्रकल्प राबवणे आणि पर्यटन स्थळांवर वाहनांचे प्रदूषण नियंत्रित करणे.

2. भौगोलिक साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर:

कोल्हापूरच्या डोंगराळ भूप्रदेशाचा फायदा घेऊन ट्रेकिंग, कॅम्पिंग आणि साहसी पर्यटनास चालना द्यावी. नैसर्गिक जलस्रोतांचा वापर जलक्रीडा पर्यटनासाठी करता येईल, पण त्यासाठी पर्यावरण संवर्धनाचे नियम काटेकोरपणे लागू करावे लागतील.

निष्कर्ष:

कोल्हापूर जिल्ह्यात पर्यटनाची प्रचंड क्षमता आहे, पण ती भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहे. पूर, भूस्खलन, हंगामी अवलंबित्व आणि पर्यावरणीय ऱ्हास ही मुख्य आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करून कोल्हापूरचा पर्यटन क्षेत्रात सर्वांगीण विकास करण्यासाठी, भौगोलिक घटकांचा पूर्ण विचार करून शाश्वत धोरणे आखणे अत्यावश्यक आहे. केवळ अशाच पद्धतीने कोल्हापूरचा सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा जपत जपत तेथील पर्यटन क्षेत्राचा टिकाऊ विकास साधता येईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भग्रंथ (References)

1. Maharashtra Tourism Development Corporation (MTDC) Annual Reports.
2. District Census Handbook, Kolhapur.
3. Kolhapur District Gazetteer.
4. Patil, S. B. (2018). "Sustainable Tourism Development in Western Maharashtra: Challenges and
a. Opportunities." Journal of Hospitality & Tourism.
5. Sawant, M. R. (2020). "Geographical Analysis of Floods in Kolhapur City." International Journal of
a. Scientific Research.
6. Directorate of Tourism, Government of Maharashtra.
7. Various articles and data from credible online sources like Maharashtra Times, Sakal.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मराठी साहित्यात वारकरी संप्रदायातील स्त्री संतांचे योगदान

डॉ.निता र. तोरणे
मराठी विभाग प्रमुख, समन्वयक पद्व्युत्तर
आणि संशोधन केंद्र संत सोहिरोबानाथ आंबिये
महाविद्यालय आणि संशोधन केंद्र विर्नोडा, पेडणे

Manuscript ID:
JRD -2025-170949
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 236-239
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश :

मराठी संतसाहित्य हे समाजाच्या आध्यात्मिक आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरले आहे. वारकरी संप्रदायातील स्त्री संतांनी भक्तीमार्गाच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचा गौरव करत समानतेचा संदेश दिला. मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा आणि बहिणाबाई या संतकवयित्रींनी स्त्रीच्या श्रमजीवनाला अध्यात्मिक उंची दिली आणि समाजातील अन्याय, अस्पृश्यता, दारिद्र्य, व लिंगभेदाविरुद्ध आवाज उठविला. त्यांच्या रचनांमधून स्त्रीचा आत्मसन्मान, आत्मभान आणि भक्तिभाव प्रकर्षाने जाणवतो. या संतकवयित्रींचे साहित्य केवळ भक्तीपर न राहता स्त्री-अस्मिता, समाजजागृती आणि समानतेचा संदेश देणारे आहे. त्यांनी स्त्रीला धर्म, अध्यात्म आणि समाज या तिन्ही क्षेत्रांत आपले स्थान प्रस्थापित करण्याची प्रेरणा दिली.

मुख्यशब्द: *मराठी संतसाहित्य, वारकरी संप्रदाय, स्त्री संत, मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, स्त्री-अस्मिता, भक्ती आंदोलन, समानता, समाजपरिवर्तन. Is this conversation helpful so far?*

प्रस्तावना

महाराष्ट्रात मध्ययुगीन काळात निर्माण झालेले मराठी संतसाहित्य हा तत्कालीन समाजमनाचा आरसा मानला जातो. या संतांनी धर्माच्या माध्यमातून समाजोन्नतीचे कार्य करून वर्ण, जाती, लिंग या संदर्भातील भेद अमान्य करून धर्मक्षेत्रात समानता आणली. वैदिक धर्माच्या प्रभावाखाली न्यूनगंडाने पछाडलेल्या समाजातील खालच्या स्तरातील लोकांत आणि विशेषकरून स्त्रीवर्गात एक नवा आशावाद निर्माण केला. आपल्या समाजवादी विचारांतून-आचारांतून-लोकभाषेतून तत्कालीन समाजाच्या धर्मभावनेला अध्यात्म विचारांची ठाम बैठक प्राप्त करून दिली. प्रपंचात राहून मोक्ष प्राप्ती मिळू शकते. त्यासाठी भक्तीमार्गाचा उपदेश करण्यासाठी संतांनी सोप्या, सुबोध, प्राकृत भाषेतून ओवी, अभंग, किर्तन, भारुडे या प्रकारच्या साहित्य रचनेतून समाज प्रबोधनाचे कार्य केले. या साहित्याने मराठी समाजात स्वतःची भाषा, सामर्थ्य, साहित्य आणि आध्यात्मिक दृष्टिकोनाबरोबर सांप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वर यांनी रचला. पुढे संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम आदी संतांनी या सांप्रदायाचा विस्तार केलेला दिसून येतो. या संतपरंपरेमध्ये मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, बहिणाबाई या संतकवयित्रींनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मराठी साहित्यातून अमूल्य असे योगदान दिलेले आहे. त्याहीपूर्वी यादवकालीन चक्रधरप्रणीत महानुभाव सांप्रदायातील संतकवयित्री, बालविधवा महदंबा किंवा महादाइसा किंवा रुपाइसा यांनी 'कृष्णरुक्मिणी स्वयंवराचे' आख्यान ज्याला 'धवळे' (धव-नवरा, धवळे- लग्नात नवरदेवाला उद्देशून गायिलेली वरगाणी) या नावाने ओळखले जाते. ह्या मराठीतील पहिल्या स्त्रीच्या अक्षराच्या पाउलखुणा आहेत. तसेच ते पहिले मराठी कथा-काव्य)Narrative Poem) असल्याने आद्य कवयित्रीचा मान महादाइसेला दिला जातो. आद्य कवयित्री म्हणून तिचे मराठी साहित्यात योगदान अतुलनीय आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ.निता र. तोरणे,मराठी विभाग प्रमुख , समन्वयक पद्व्युत्तर आणि संशोधन केंद्र संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालय आणि संशोधन केंद्र विर्नोडा,पेडणे

How to cite this article:
तोरणे, . निता . र . (2025). मराठी साहित्यात वारकरी संप्रदायातील स्त्री संतांचे योगदान. Journal of Research & Development, 17(9(IV)), 236–239. https://doi.org/10.5281/zenodo.17722978

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17722978
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

वारकरी संप्रदायातील निवृत्ती-ज्ञानेश्वर-सोपान या अलौकिक संतांची लहान तेजस्वी बहीण मुक्ताई किंवा मुक्ताबाई, वारकरी पंथाचे प्रवर्तक संत नामदेव यांची शिष्या आणि दासी 'दळीता कांडिता' अभंग गाणारी कर्मयोगिनी जनाई उर्फ जनाबाई या अनाथ आणि शुद्र होत्या. संत चोखामेळा यांची पत्नी संत सोयराबाई, समाजात दुर्लक्षित जीवन जगणाऱ्या गणिका कुळात जन्म घेऊन केवळ विठ्ठल भक्तीच्या बळावर संतपद प्राप्त झालेली संत कान्होपात्रा, संत चोखामेळा यांची पत्नी सोयराबाई, संत चोखामेळा यांची धाकटी बहीण निर्मळा, संत तुकाराम यांची शिष्या आत्मसाक्षात्कारी बहिणाबाई, या सर्व संतकवयित्रींच्या रचनांमध्ये भक्तिभावासोबतच तत्कालीन समाजवास्तव, स्त्रीच्या श्रमजीवनाचा गौरव, असमानतेविरुद्ध प्रतिकार आणि आत्मसन्मानाची प्रखर जाणीव प्रकट झालेली दिसून येते.

संतपरंपरा आणि स्त्रीः

प्राचीन मराठी वाङ्मयात संत कवयित्रींनी मोलाचे योगदान दिलेले आहे. भक्ती आंदोलनाच्या काळात स्त्रीची भूमिका केवळ घरगुती कामापुरतीच मर्यादित होती. परंतु संतकवयित्रींनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून तत्कालीन समाजातील स्त्रीचे स्थान अधोरेखित केले. त्यांच्या रचना घर, शेत, स्वयंपाकघर, श्रम आणि भक्ती यांचा एकात्म अनुभव देताना दिसते.

संतकवयित्रींचे योगदान

१) संत मुक्ताबाई

मराठी संतसाहित्याच्या इतिहासात जन्मापासून बहिष्कृत जीवन जगणाऱ्या मुक्ताबाई हे एक विलक्षण व्यक्तिमत्व आहे. असामान्य भावंडांची लहान बहीण, तसेच ब्राह्मण असूनही कुल्भष्ट म्हणून जातिप्राप्त कर्मापासून वंचित असलेली मुक्ताबाई ही श्रेष्ठ कवयित्री असून, अत्यंत तरुण वयात अध्यात्ममार्गावर प्रगल्भ विचार व्यक्त करणारी संत कवयित्री म्हणून ओळखली जाते. वयाने लहान असूनही संतमंडळीमध्ये मोठे स्थान आणि अध्यात्मिक अधिकार प्राप्त असलेली कवयित्री आहे. 'पंढरीमाहात्म्य', 'नाममहात्म्य' व 'संतसमागम',परमार्थाचा उपदेश आणि आत्मस्थितीपर अभंग हे त्यांच्या अभंगाचे विषय असून त्यांनी काही ' कूट-अभंग' रचना देखील केलेल्या आहेत. एका विशिष्ट प्रसंगातून मुक्ताबाई यांनी रचलेले 'ताटीचे अभंग' महत्त्वपूर्ण आहेत. एका प्रसंगी समाजनिंदेने होरपळलेले ज्ञानेश्वर व्यथित होऊन रागाने झोपडीची ताटी बंद करून स्वत:ला कोंडून घेतात. त्यांच्या दु:खात सहभागी झालेली मुक्ताई कळवळून त्यांची समजूत घालते आणि उपदेश देखील करताना दिसते.

योगी पावन मनाचा। साही अपराध जनाता।।

विश्व झाले रागे वन्ही। संत सुखे व्हावे पाणी।।

मुक्ताईजवळ श्रेष्ठ अध्यात्मिक अधिकार आहे. ज्याच्या बळावर तिने भक्तीचा अहंकार असलेल्या नामदेवांचे आणि आपल्या सिद्धीचा अधिकार असलेल्या हटयोगी चांगदेवाचे गर्वहरण केलेले दिसून येते. चांगदेवाने ज्ञानदेवांना कोरे पत्र पाठवले.तो कोरा कागद पाहून मुक्ताईने चांगदेवाचे कोरेपण ओळखून पुढील ओळींची रचना केलेली दिसते.

चौदाशे वरुषे शरीर केले जतन। बोधवीण क्षीण वाढविला।।

नाही गुरुमंत्र नाही उपदेश। परमार्थाशी दोष लावियला।।

'मुक्ताई चांगदेव संवादा'च्या माध्यमातून मुक्ताबाई यांनी चांगदेवाला केलेल्या उपदेशातून योगिक साक्षात्काराची आणि आध्यात्मिक अधिकाराची जाणीव होते. मुक्ताबाईच्या अभंगांत स्त्री ही भाविक, भक्त, ज्ञाता, साधिका आणि तत्त्ववेत्ता म्हणूनही प्रकट होते. त्यांच्या काव्यातून स्त्रीचा, आत्मविश्वास , आत्मसन्मान आणि आध्यात्मिक स्वातंत्र्य व्यक्त होते. श्री संत मुक्ताबाईंच्या अभंगांतून व्यक्त झालेली स्त्री-जाणीव ही मध्ययुगीन समाजरचनेला एक मोठे आव्हान होती त्यांच्या काव्यातून स्त्रीला अध्यात्म आणि तत्त्वज्ञान या क्षेत्रात समान हक्क प्राप्त असल्याची जाणीव दृढ होते. त्यामुळे मुक्ताबाईंची कविता ही स्त्री-अस्मितेच्या अभ्यासासाठी एक अमूल्य ठेवा ठरते.

२. संत जनाबाई

"स्त्रीजन्म म्हणुनि न व्हावे उदास" असे म्हणणाऱ्या संत जनाबाई मोठ्या ताकदीने आपल्या स्त्रीविषयक जाणिवा व्यक्त करताना दिसतात. जनाबाई स्वतः नामदेवांच्या घरी दासी म्हणून राहत होत्या. नामदेवाची दासी जनी 'दळीता कांडिता' असे अभंग गाणारी आपल्या श्रमाला कमी लेखत नाहीत उलट त्याला आध्यात्मिक साधनेचे रूप देतात. याचा प्रत्यय पुढील अभंगातून येतो.

"ओटी पुसें झाडू घेइं,

नाम गाउ पंढरीनाथा।

झाडीतां झाडीतां होय

हृदयशुद्धी आत्मतथा।।"या अभंगात स्त्रियांच्या वाट्याला आलेली घरातील कामे म्हणजे घर झाडणे, पुसणे-ही नेहमीची कामे असून तीच कामे नामस्मरणासह केल्यास आत्मशुद्धी साधता येते, असे त्यांनी मांडलेल आहे. स्त्रीच्या श्रमाला अध्यात्मिक मूल्य जोडून जनाबाईंनी त्या काळातील स्त्रीला आत्मसन्मान दिला.

जनाबाईंच्या अनेक अभंगांतून स्त्रीचे दैनंदिन दु:ख, उपासमार, पुरुषप्रधान समाजातील दुय्यम स्थान व्यक्त होते. त्या एका ठिकाणी म्हणतातः

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

"जनाई म्हणे माझे काम,

घास घासे उपसावे नाम।

मज दासीचे जिणे दारिद्र्यग्रस्त,

विठोबासी लाजविणे वस्त्र।।"

येथे त्यांनी स्वतःच्या दारिद्र्यग्रस्त स्थितीचे वर्णन केलेले आहे. वस्त्रहीन होण्याची लाज, पण त्याचवेळी नामस्मरणाची आसक्ती-यातून स्त्रीच्या दुःखाला आध्यात्मिक उंची दिली आहे.

जनाबाई ही नामदेवाची शिष्या व दासी. तिच्या अभंगांतून स्त्रीश्रम आणि भक्ती यांचे अप्रतिम मिश्रण दिसते.

"ओवी वाचावी पांडुरंगा,

दळुनी कांडुनी गातसे गा"

या अभंगातून ती दैनंदिन काम करतानाही पांडुरंगांचे स्मरण करते. श्रमाला ती अध्यात्माशी जोडताना दिसते.

मराठी संतकवयित्रींच्या काव्यात स्त्री-जाणीव अनेक स्तरांवर उमटवताना दिसते. सर्वप्रथम जनाबाईंच्या रचनांत श्रमांचे महत्त्व आणि त्याला आध्यात्माशी जोडलेली दृष्टी प्रकर्षाने आढळते. त्या स्वयंपाक, दळण, कांडण अशा दैनंदिन श्रमांमध्ये विठ्ठलाला आपल्या मदतीस बोलावून त्यांनी आपल्या श्रमांना भक्तिरुप दिले. त्यांच्या अभंगांतून स्त्रीचे श्रम हे केवळ कौटुंबिक जबाबदारी न राहता भक्तीसाधनेचे साधन ठरतात. त्यामुळे स्त्रीच्या आयुष्यातील कठोर श्रमांना अध्यात्मिक प्रतिष्ठा प्राप्त होते. दारिद्र्य, उपेक्षा, एकाकीपणा यांनी दबून, चिरडून न जाता उलट स्वसामर्थ्याच्या बळावर संतत्व प्राप्त करताना दिसते.

३. संत कान्होपात्रा

तत्कालीन समाजात जातव्यवस्था इतकी प्रबळ होती की त्या काळात समाज गणिकेकडे अगदी तुच्छ नजरेने पाहात असे. अशा दुर्लक्षित जीवन जगणाऱ्या गणिकेच्या घरात संत कान्होपात्रा यांचा जन्म झाला.संत कान्होपात्रा यांनी आपल्या उत्कट भक्तीने स्वतःला विठ्ठलाच्या चरणी पूर्णपणे समर्पित केले. त्यांच्या भक्तीची साक्ष देणारे 'पांडुरंग दर्शन', 'संत महात्म्य', 'नामस्मरण महात्म्य' या विषयावर त्यांनी अभंग रचना केलेली आहे.

४. संत सोयराबाई

स्वतःला चोख्याची महारी म्हणण्यात धन्यता मानणारी वारकरी संप्रदायातील संत चोखामेळा यांची पत्नी. सोयराबाईंच्या अभंगांत स्त्री-पुरुष समानतेची ठाम जाणीव दिसते. कोणत्याही प्रकारचे पोषक सामाजिक वातावरण नसताना, अशिक्षित, अस्पृश्य, दारिद्र्य आणि स्त्री असून केवळ विठ्ठलभक्तीच्या बळावर अभंगरचना केल्याचे दिसून येते. ईश्वरचरणी मोक्षप्राप्तीसाठी स्त्री-पुरुष असा भेद करणे महत्त्वाचे नाही. स्त्रीलाही समान हक्क आहे, असा आशय व्यक्त करणारा अभंग पुढीलप्रमाणे आहे.

"हरीची दासी हरीस भावे,

दास्यासही मोक्ष मिळे"

चोखोबांवर झालेल्या अन्याय, अत्याचार यामुळे सोयराबाई यांच्या जीवाची झालेली तळमळ,त्यांच्या वेदना त्यांच्या अभंगातून आविष्कृत होतात. वारकरी संप्रदायात त्या भक्तिरसाने ओतप्रोत भरलेल्या असल्या तरी त्यांनी स्त्रीच्या आध्यात्मिक अधिकाराच्या आग्रह धरला आहे. त्यांच्या मते, हरीभक्तीत स्त्री-पुरुष भेदभावाला स्थान नाही. स्त्री हरीची दासी होऊन त्याचप्रमाणे मोक्षाच्या मार्गाला पोहचू शकते. हे विधान त्याकाळच्या समाजात स्त्रीला धार्मिक आचारविचारांत दुय्यम स्थान देणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध एक प्रकारचा विरोध होता.

५. संत बहिणाबाई

वारकरी संप्रदायातील अखेरच्या संतकवयित्री म्हणून संत बहिणाबाई यांचे व्यक्तित्त्व वैशिष्ट्यपूर्ण ठरते. संत तुकाराम महाराजांच्या शिष्येच्या नात्याने त्यांना अध्यात्म मार्गाची प्रेरणा लाभली. तरीही त्यांचे सांसारिक जीवन दुःख, संघर्ष आणि ओढाताणीने व्यापलेले होते. शके १५५० मध्ये देवगाव रंगारी येथे जन्मलेली ही कवयित्री अल्पवयातच वयोवृद्ध रत्नाकर पाठक यांच्या पत्नी झाल्या, त्यांच्या कठोर, संशयी स्वभावामुळे बहिणाबाईंना मानसिक व शारिरीक क्लेष भोगावे लागले. तथापि या प्रतिकुल परिस्थितीतही त्यांनी भक्तिभावाने प्रेरित वैविध्यपूर्ण काव्यनिर्मिती केली. विठ्ठलभक्ती, संतस्तवन, गुरुमहिमा, आत्मचरित्रपर चिंतन, भारुडे, रुपकरचना, टोणप्याचे अभंग अशा विविध काव्यप्रकारांतून त्यांनी आपल्या अनुभवांचे आध्यात्मिक रुपांतर घडवून आणले. त्यांच्या कवितेत पातिव्रत्याची निष्ठा, करुणावृत्ती, जीवसृष्टीशी आत्मियता आणि आत्मप्रकाशाचा अखंड शोध प्रकर्षाने दिसून येतो. एक सामान्य स्त्री असूनही छळ सहन करताना आत्मशोधाचा मार्ग शोधणाऱ्या बहिणाबाई संत परंपरेतील अद्वितीय काव्यस्वर ठरतात.

बहिणाबाईंचा काळ (१६२८-१७००) हा मुघल सत्तेचा अस्त व स्वराज्याचा उदयाचा होता. पण त्यांच्या कवितेत शिवाजी महाराजांचे कार्य किंवा संभाजी महाराजांचे बलिदान अशा ऐतिहासिक घटनांचा उल्लेख नाही. त्यांचे गाव औरंगजेबाच्या ताब्यात असल्याने त्यांना अशांत, जुलमी परिस्थितीत जीवन जगावे लागले. समाजात ब्राह्मणांचे अधःपतन, दुराचार, भोंदू संत, ढोंगी साधू, व्यसन, अनिती यांचा सुळसुळाट होत होता. या भ्रष्टाचारावर बहिणाबाई निर्भिडपणे कोरडे ओढतात व ब्राह्मणवर्णाच्या अधःपतनाची खंत व्यक्त करतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

त्यांच्या काळात रामदासी विचारांचा प्रभाव दिसतो. जातीभेद व कौटुंबिक छळ यांना न जुमानता त्यांनी आपल्या भुमिकेवर ठाम राहून मूक सत्याग्रह केला. गुरूची छाया न मिळता त्यांनी स्वतःच स्वतःला घडवले. म्हणून त्या 'स्वयंसिद्धा' ठरतात. त्यांची विद्वत्ता, ज्ञानलालसा व विवेकशक्ती अद्वितीय होती. त्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या विठ्ठलभक्ती, संत स्तुस्ती, गुरुमहात्म्य आणि आत्मचरित्रपर यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे वेद, उपनिषदांचा अभ्यास करण्याची त्यांची जिज्ञासा आणि योगसाधनेतील प्रगती यामुळे त्या इतर कवयित्रींपेक्षा वेगळ्या ठरतात.

समारोप :

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात यादवकाळ हा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.या काळात वारकरी संप्रदायाचा उदय झाला.या पंथाने समाजातील भेद नष्ट करून सर्वांना भक्तीचा मार्ग मोकळा केला. या संत कवयित्रीं समाजातील विविध स्तरातून आलेल्या असून त्यांना लाभलेला संत सहवास आणि आध्यात्मिक गुरु यामुळे त्यांचा भक्तीमार्ग सुकर झाला. या संप्रदायातील संत कवयित्रींचे साहित्य हे भक्तीच्या आविष्कारातून निर्माण झाल्याचे दिसून येते. त्याकरता त्यांनी विविध साहित्य प्रकार आणि नवनवीन रचना प्रकार य्यांची निर्मिती केली. मराठी साहित्यात संत कवयित्रींचे हे योगदान फार वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

संदर्भग्रंथः

1. 'स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊल खुणा' (संत कवयित्री), 'इंदुमती शेवडे', पॉप्युलर प्रकाशन, १९८९.
2. 'संत साहित्य मीमांसा' (भाषा संप्रदाय आणि संशोधन) संपादक: डॉ. न. ब. कदम, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. २०१७.
3. 'भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा', (इसवी सन १८५० ते २००० खंड दुसरा), संपादक: डॉ. मंदा खांडगे, प्रकाशन साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे २००७.
4. 'जनाबाई, जनाबाईंचे अभंग', संपादकः प्रा. शंकर पाटील, पुणे, वारकरी प्रकाशन, १९८५.
5. 'मुक्ताबाई, चांगदेव पासष्टी, संपादकः रा. चिं. ढेरे, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, १९८७.
6. 'सोयराबाईंचे अभंग, संपादकः शंकर पाटील, पुणे, वारकरी साहित्य मंडळ, १९८५.
7. 'बहिणाबाई चौधरी', बहिणाबाईंच्या ओव्या. पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९९२.
8. 'संत जनाबाई', सुहासिनी हिर्लेकर- महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पुणे, २००२.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क

डॉ. वंदना अरुण सातपुते
भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली.
राज्यशास्त्र विभाग
Email: vandanasatpute15@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170950
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 240-244
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

मानवी हक्क हे प्रत्येक मनुष्याचे नैसर्गिक आणि अविभाज्य हक्क आहेत. लोकशाही समाजात व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी हे हक्क अत्यावश्यक ठरतात. भारतीय राज्यघटनेत कलम १२ ते ३५ पर्यंत मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. हे हक्क व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करतात आणि शासनाच्या सत्तेवर नियंत्रण ठेवतात. समतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणविरोधी, धार्मिक स्वातंत्र्याचा, सांस्कृतिक व शैक्षणिक आणि घटनात्मक उपाययोजनेचा हक्क या सहा प्रमुख प्रकारांद्वारे नागरिकांच्या हक्कांचे रक्षण केले जाते. न्यायालये आणि मानवी हक्क आयोग यांच्या माध्यमातून या हक्कांचे संरक्षण अधिक दृढ करण्यात आले आहे. तथापि, समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर केल्याशिवाय या हक्कांचे संपूर्ण फलित साध्य होऊ शकत नाही.

मुख्यशब्द: *मानवी हक्क, भारतीय राज्यघटना, मूलभूत हक्क, न्यायालयीन संरक्षण, लोकशाही, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता, राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे.*

प्रास्ताविक

आधुनिक काळातील राजकीय जीवनातील एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे हक्कांची संकल्पना होय. आधुनिक लोकशाही समाजामध्ये व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक स्थिती निर्माण करणे हे हकाच्या संकल्पनेमागील मूळ हेतू आहे. व्यक्तीच्या हक्काशिवाय लोकशाही शासनाची कल्पनाच करता येत नाही. सामाजिक विकासासाठी आवश्यक व्यक्तीच्या हक्काद्वारे जसे एका बाजूला व्यक्तीचा विकास साध्य करता येतो तसेच दुसऱ्या बाजूला समाजाची प्रगतीही साधता येते. हकांच्या तरतुदींमुळे घटनात्मक निबंधांद्वारे शासनाच्या सत्तेवर मर्यादा आणून व्यक्तीस्वातंत्र्याची हमी दिली जाते. हेरॉल्ड लास्कीच्या मते, "हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी अवस्था असते ज्याशिवाय कोणतीही व्यक्ती आपल्या परिपूर्ण विकासाची अपेक्षा करू शकत नाही. म्हणूनच हक्क ही नागरिकाच्या सर्वांगीण विकासाची पूर्वअटच ठरते. संयुक्त राष्ट्रसंघांनी स्वीकारलेल्या मानवी हक्काविषयी सार्वत्रिक जाहीरनामाचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेवरही पडल्याचे दिसून येते. घटनाकारांचा मानवी मूल्यावर पूर्ण विश्वास होता. लोकशाही नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्थेचे मुख्य आधार होत हे देखील ते ओळखून होते म्हणूनच त्यांनी मानवी हक्काचा पुरस्कार करून त्यांचा समावेश भारतीय राज्यघटनेत केला.

भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क-

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ या कलमांमध्ये मूलभूत हक्कांची तरतूद केली आहे. मूलभूत हक्कांच्या यादीमध्ये कोणत्या हक्कांचा समावेश करावा, हे घटनासमितीपुढे फार मोठे आव्हान होते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
वंदना अरुण सातपुते, भारती विद्यापीठाचे , डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली.

How to cite this article:
सातपुते, . वंदना . अरुण . (2025). भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क. Journal of Research & Development, 17(9(IV)), 240–244. https://doi.org/10.5281/zenodo.17723043

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17723043
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

मूलभूत हक्कांची निर्मिती करताना अमेरिकेच्या हक्कांच्या सनदेचा (Bill of Rights) मोठा प्रभाव घटनाकारांवर होता. तसेच त्यांना आधुनिक राज्यसंस्थेचे बदललेले स्वरूपाची देखील जाणीव होती. भारतीय समाजातील विषमता, भेदभाव आणि शोषणात्मक वास्तवाचेही त्यांना भान होते. राज्यसंस्थेच्या मर्यादा विचारात घेऊन घटनाकारांनी काही हक्क 'मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट करून त्यांना न्यायप्रविष्ट हक्कांचा दर्जा प्रदान केला तर काही हक्क न्यायप्रविष्ट नसलेल्या 'राज्यधोरणाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये (Directive Principles of State Policy) समाविष्ट केले.

मूलभूत हकांची वैशिष्ट्ये-

१. प्रस्तुत हक्क भारतीय संविधानाचा भाग आहेत. ते घटनेच्या कलम १२ ते ३५ अन्वये देण्यात आले आहेत. काही हक्क व्यक्तीबरोबरच गटांनाही प्रदान केले आहेत.

२. हे हक्क न्यायप्रविष्ट आहेत म्हणजेच हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्याविरूद्ध सर्वोच्च व उच्च न्यायालयात दाद मागता येते. थोडक्यात, हक्कांना न्यायालयीन संरक्षण दिलेले आहे.

३. हक्क न्यायप्रविष्ट असले तरीही ते अनिर्बंध स्वरूपाचे नाहीत. सार्वजनिक हितासाठी हक्कांवर बंधने वा मर्यादा घालता येतात. राज्यघटनेतच हक्कांवर काही मर्यादा नमूद केल्या आहेत आणि संसदीय कायद्याद्वारे नवीन मर्यादाही घालता येतात.

४. राज्यघटनेतील काही हक्क सकारात्मक तर काही हक्क नकारात्मक आहेत.

५. हक्क हे सर्व अधिसत्तांवर बंधनकारक आहेत. उदा. केंद्र, घटकराज्य शासनपासून ते स्थानिक स्वराज्य संस्थापर्यंत या अधिसत्तांना मूलभूत हकांचा भंग करता येत नाही.

६. संसदेला हक्कांमध्ये घटनादुरुस्ती करता येते परंतु सर्वोच्च न्यायालयाने 'काही हक्क मौलिक संरचनेचा भाग आहेत', असा निर्णय दिल्यामुळे अश्या हक्कांमध्ये दुरुस्ती करता येत नाही.

७) आणीबाणीच्या काळात काही मूलभूत हक्क स्थगित होतात तर काही हक्क स्थगित करता येतात.

मूलभूत हक्कांचे वर्गीकरण-

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ या कलमांमध्ये मूलभूत हक्कांची तरतूद केली आहे. भारतीय राज्यघटनेने सात प्रकारचे हक्क दिलेले होते. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीत मालमत्तेच्या हक्काचाही (कलम ३१वे) समावेश करण्यात आला होता परंतु १९७८ सालच्या ४४ व्या घटनादुरुस्तीने संपत्तीचा हक्क वगळण्यात आल्याने सध्या भारतीय राज्यघटनेत सहा प्रकारचे मूलभूत हक्क आहेत ते पुढीलप्रमाणे-

१. समतेचा हक्क- कलम १४ ते १८
२. स्वातंत्र्याचा हक्क- कलम १९ ते २२
३. पिळवणुकीविरुद्धचा हक्क- कलम २३ ते २४
४. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क- कलम २५ ते २८
५. सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क- कलम २९ ते ३०
६.घटनात्मक उपायांचा हक्क- कलम ३२

समतेचा हक्क-

१) कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण-

सर्व व्यक्ती कायद्यापुढे समान असतील आणि प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण प्राप्त होईल अशी हमी राज्यघटनेने दिली आहे.

२) भेदभावाचा अभाव-

धर्म, वंश, जात, लिंग,जन्मस्थान यांपैकी कोणत्याही आधारे राज्य नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही.

३) संधीची समानता-

कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, वास्तव्याचे ठिकाण या किंवा यापैकी कोणत्याही एका कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील पद मिळविण्यास अपात्र ठरविले जाणार नाही.

४) अस्पृश्यता पाळण्यास बंदी-

राज्यघटनेने अस्पृश्यता पाळण्यास बंदी घातली आहे.

५) पदव्या देण्यास बंदी-

राज्याकडून नागरिकांना सन्मानदर्शक पदव्या दिल्या जाण्याच्या प्रथेला राज्यघटनेने बंदी घातली आहे.

स्वातंत्र्याचा हक्क:-

राज्यघटनेने मूलभूत हक्कांच्या यादीत स्वातंत्र्याच्या हक्कालाही स्थान दिले असून भारतीय नागरिकांना पुढील सहा प्रकारच्या स्वातंत्र्याचे हक्क बहाल केले आहेत-

१) भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य
२) शांततापूर्वक व शस्त्र न बाळगता एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

३) संस्था किंवा संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य
४) भारतीय प्रदेशात सर्वत्र मोकळेपणाने संचार करण्याचे स्वातंत्र्य
५) भारतीय प्रदेशात कोठेही राहण्याचे किंवा कायम वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य
६) कोणताही व्यवसाय, रोजगार आणि व्यापार वा उद्योग करण्याचे स्वातंत्र्य

शोषणाविरुद्धचा हक्क:-

राज्यघटनेने माणसांचा क्रयविक्रय करणे किंवा एखाद्याकडून वेठबिगाराप्रमाणे सक्तीने काम करवून घेणे अशा प्रकारांवर बंदी घातली आहे त्याचबरोबर चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा अन्य जोखमीच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास मनाई केली आहे.

धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क:-

राज्यघटनेने सर्व व्यक्तींना आपल्या सदसद्विवेकबुद्धीनुसार वागण्याचे आणि आपल्या धर्माचे पालन व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क:-

भारताच्या कोणत्याही प्रदेशात वा कोणत्याही भागात वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना स्वतःची स्वतंत्र भाषा, लिपी किंवा संस्कृती अबाधित राखण्याचा हक्क असेल व धार्मिक, भाषिक अशा सर्व प्रकारच्या अल्पसंख्याकांना स्वतःच्या शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा व त्या चालविण्याचा हक्क नागरिकांना दिला आहे.

घटनात्मक उपाययोजनेचा हक्क:-

नागरिकांना आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी न्यायालयाकडे दाद मागता येते. त्यावर त्या व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालय पुढील पाच प्रकारचे आदेश काढू शकते-

(१) बंदी प्रत्यक्षीकरण
(२) परमादेश
(३) प्रतिषेध
(४) अधिकारपृच्छा
(५) उत्प्रेक्षण

राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे:-

भारतीय घटनाकारांनी राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश केला असला तरी मूलभूत हक्कांच्या यादीत व्यक्तीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या काही हक्कांचा समावेश केलेला नाही याची त्यांना जाणीव होती म्हणून काही हक्काच्या संदर्भातील त्यासंबंधीची जाणीव राज्यकर्त्यांना करून देण्याच्या हेतूने घटनाकारांनी राज्याच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केला आहे.

मार्गदर्शक तत्त्वांपैकी काही तत्त्वे ही मूलभूत हक्कांप्रमाणेच आहेत. त्या दोहोंमधील फरक एवढाच की मूलभूत हक्कांना कायद्याचे पाठबळ आहे मात्र मार्गदर्शक तत्त्वांना कायद्याचे पाठबळ नाही. मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यासंबंधी कायदेशीर नसले तरी नैतिक बंधन राज्यकर्त्यांवर आहे. व्यक्तिविकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असलेली काही मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे-

१) लोककल्याणासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय असेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करून ती टिकविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
२) जनतेमधील दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची राज्य विशेष काळजी घेईल आणि त्यांचे सामाजिक अन्याय व शोषण यांपासून संरक्षण करील.
३) राज्य आपल्या जनतेच्या आहाराच्या पौष्टिकता वाढविण्याकडे आणि तिच्या राहणीमानाचा दर्जा उंचाविण्याकडे लक्ष देईल.
४) स्त्री-पुरुष सर्व नागरिकांना उपजीविकेची पुरेशी साधने उपलब्ध होण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी राज्याकडून प्रयत्न केला जाईल.
५) ज्यामुळे सर्वांचे कल्याण साध्य होईल अशा पद्धतीने समाजाच्या भौतिक साधनांची मालकी आणि नियंत्रणे यांचे वाटप करण्यात येईल.
६) राज्य आपली आर्थिक क्षमता आणि विकास यांच्या मर्यादेत काम मिळण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वृद्धत्व, आजारपण, अपंगत्व अशा अवस्थेतील लोकांसाठी सार्वजनिक मदत मिळण्याचा हक्क हे हक्क नागरिकांना मिळवून देण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करील.
७) शेती, उद्योगधंदे व इतर सार्वजनिक क्षेत्रांतील कामगारांना पुरेसे काम, वेतन, राहणीमानाचा योग्य दर्जा आणि विश्रांती तसेच सामाजिक व सांस्कृतिक संधी यांची हमी देणारी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्याची दक्षता राज्य घेईल.
८) स्त्री व पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

९) राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून दहा वर्षांच्या आत चौदा वर्षांखालील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था राज्य करील.
१०) स्त्री-पुरुष कामगारांचे आरोग्य आणि शक्ती तसेच मुलांचे कोवळे वय यांचा दुरूपयोग केला जाणार नाही याची काळजी घेतली जाईल.
११) कामाच्या ठिकाणी न्याय्य व माणुसकीची परिस्थिती निर्माण करण्याची आणि प्रसूतिसाहाय्य मिळवून देण्याची व्यवस्था राज्य करील.
१२) आर्थिक गरजेपोटी नागरिकांना त्यांचे वय व शक्ती यांस न पेलणारा व्यवसाय करणे भाग पडणार नाही असा प्रयत्न राज्याकडून केला जाईल.

मूलभूत हक्कांचे संरक्षण:-

भारतीय राज्यघटनेतच नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यघटनेतील ३२ व्या कलमात मूलभूत हक्कांना घटनात्मक संरक्षण देण्याची तरतूद आहे. त्यानुसार जर व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर अतिक्रमण झाले किंवा तिच्या मूलभूत हक्कांचा संकोच करण्याचा प्रयत्न झाला तर, संबंधित व्यक्तीला किंवा तिच्यावतीने इतरांनाही न्यायालयाकडे दाद मागता येते. त्यावर न्यायालय बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, अधिकारपृच्छा व उत्प्रेक्षण अशा पाच प्रकारचे आदेश काढू शकते याव्दारे राज्यघटनेने नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची तरतूदकेली आहे म्हणून राज्यघटनेतील ३२ व्या कलमाला अतिशय महत्त्व दिले जाते. या कलमाचे महत्त्व विशद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे म्हटले होते की, "ज्या कलमावाचून घटना निरर्थक ठरली असती असे या घटनेतील सर्वांत महत्त्वाचे कलम कोणते? असे जर मला कोणी विचारले तर प्रस्तुत कलमाशिवाय दुसऱ्या कोणत्याही कलमाचा निर्देश मला करता येणार नाही."

मूलभूत हक्कांच्या रक्षणातील न्यायालयाची भूमिका:-

नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याच्या कामी भारतातील न्यायालयांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील मूलभूत हक्कांना नेहमीच प्राधान्य देण्याच्या धोरणाचा अवलंब केला आहे त्यामुळे त्या न्यायालयापुढे आलेल्या अनेक खटल्यांच्या सुनावणीत निवाडा देताना केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्याकडून नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा संकोच केला जाणार नाही हे पाहण्याचे काम न्यायालयाने केले आहे. राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या तरतुदींचा अर्थ लावताना सर्वोच्च न्यायालयाने नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्याची भूमिका घेतली आहे त्यामुळे कार्यकारी मंडळाच्या एकाधिकारशाही वृत्तीला आळा बसला आहे. मूलभूत हक्कांचा संकोच करणारे कायदे सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविले आहेत. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्कांच्या यादीत महत्त्वपूर्ण भर घातली आहे. अलीकडील काळात सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्याबाबत न्यायालये अधिक क्रियाशील झाली आहेत. काही बाबतीत नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालयांनी स्वतःच पुढाकार घेतला आहे. यालाच 'न्यायालयीन सक्रियता' असे म्हटले जाते. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याची आपली प्रमुख जबाबदारी आहे असे समजून न्यायालये या प्रश्नाकडे पाहू लागली आहे.

सार्वजनिक हिताच्या रक्षणासाठी न्यायालयापुढे दाखल केलेल्या याचिकांना 'सार्वजनिक हित याचिका' असे संबोधले जाते. सार्वजनिक हितासाठी आता कोणीही नागरिक न्यायालयाकडे दाद मागू शकतो. अशा प्रकारच्या याचिकांद्वारे मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही नागरिकाला न्यायालयाकडे जाणे आता शक्य झाले आहे. अशा प्रकारे न्यायसंस्थेने 'नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे व स्वातंत्र्याचे संरक्षक' ही आपली भूमिका यशस्वीरीत्या पार पाडली आहे असे म्हणावे लागेल.

मानवी हक्क संरक्षण कायदा (१९९३)-

अलीकडील काळात शिक्षणाचा वाढता प्रसार, प्रसारमाध्यमांचा वाढता प्रभाव, राजकीय सहभागाचे वाढते प्रमाण, सर्वसामान्य लोकांमधील राजकीय जागरूकता, आंतरराष्ट्रीय संघटनेची मानवी हक्कांप्रती सतर्कता इत्यादी कारणांमुळे मानवी हक्कांच्या रक्षणाकडे अधिक लक्ष दिले जाऊ लागले आहे. मानवी हक्कांच्या रक्षणासाठी भारतीय संसदेने १९९३ साली मानवी हक्क संरक्षण कायदा' मंजूर केला. मानवी हक्क संरक्षण कायद्यात राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग आणि मानवी हक्क न्यायालये यांच्या स्थापनेची तरतूद केली आहे.

सारांश:

मानवी हक्क हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक आहेत असे म्हटले जाते. मनुष्य म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक प्राण्याला हे हक्क स्वाभाविकपणे लाभलेले असतात. लोकशाहीच्या दृढीकरणासाठी आवश्यक व्यक्तीला आवश्यक भित्र स्वरुपाचे हक्क किती प्रमाणात उपभोगता येतात यावर लोकशाहीचे यश या अपयश अवलंबून असते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा अधिकाधिक विकास होणे हे लोकशाहीचे उद्दिष्ट असते आणि तिचे व्यक्तिमत्त्व अविभक्तपणे हकांशी निगडित असते. लोकशाही व्यवस्था राज्यसंस्थेचे अस्तित्व धोक्यात न आणता व्यक्ती हकांची हमी देतात म्हणूनच सर्वसाधारणपणे लोकशाही व्यवस्था असणाऱ्या देशांच्या राज्यघटनेमध्ये मूलभूत हकांचा समावेश केलेला असतो आणि कार्यकारी व कायदेमंडळ यांकडून त्याचे उल्लंघन होणार नाही अशी हमी दिलेली असते. एका बाजूला मूलभूत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

हक्कांमुळे व्यक्तीस्वातंत्र्याचे संवर्धन होऊन कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळाच्या अनियंत्रित सत्तेवर अंकुश ठेवून जबाबदार, लोकाभिमुख शासनाचा मार्ग सुकर करता आला असे म्हणावे लागेल तर दुसऱ्या बाजूला अजूनही राज्यसंस्थेचे स्वरूप व आत्मा खऱ्या अर्थने लोकाभिमुख झालेला नाही. परिणामी, प्रस्तुत हक्क सत्ताधारी वर्गच उपभोगत आहे आणि दुर्बल घटक यांपासून वंचित असल्याचे चित्र दिसून येते त्यामुळे भारतीय राज्याची भूमिका व भारतीय समाजाचे स्वरूप पाहता हक्कांची हमी देण्यासाठी हक्कांना निव्वळ न्यायालयीन संरक्षण देऊन पुरेसे ठरणार नाही त्यासाठी सामाजिक-आर्थिक परिवर्तन घडून येणे अत्यावश्यक आहे.

संदर्भ सूची:

१) प्रा. पाटील व्ही. बी. – 'मानवी हक्क,' के सागर पब्लिकेशन्स, पुणे.
२) भोळे भा. ल.- भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपाळापुरे प्रकाशन, नागपूर.
३) डॉ. वी. मा. बाचल- 'भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार', के सागर पब्लिकेशन्स, पुणे.
४) जाधव तुकाराम व शिरापूरकर महेश – 'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया' युनिक पब्लिकेशन्स, पुणे.
५) के. सागर व प्रा. पाटील व्ही. बी – मानव संसाधन विकास', के सागर पब्लिकेशन्स, पुणे.
६) जोशी पियुषा व शिरापूरकर महेश- 'भारतीय राज्यघटना: तत्व व व्यवहार', युनिक पब्लिकेशन्स, पुणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विषयक विचारांची समकालीन प्रस्तुतता

डॉ. विकास मोहन सरनाईक
इतिहास विभाग,
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव
Email: sarnaik.viki@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170951
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 245-249
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवारा

विसाव्या शतकाच्या शेवटी जगभरातील बहुतांश राष्ट्रामध्ये लोकशाहीच्या विस्ताराला सुरुवात झाली. लोकशाहीच्याया विस्तारालाच सॅम्युअल पी हॅटिंगटन हा 'लोकशाहीची तिसरी लाट' असा उल्लेख करतो. तर फ्रान्सिस फुकुयामा या कालखंडाचे वर्णन 'इतिहासाचा अंत' (*End of History*) असे करतो. फुकुयामाच्या मते, 'भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या कुशीत असणारे उदारमतवादी लोकशाही व्यवस्था हीच भविष्यातील एकमेव सार्वत्रिक व्यवस्था असेल' मात्र पुढे जाऊन एकविसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकातच जगभरातील लोकशाही राजवटीचा आणि मूल्यांचा ऱ्हासहोताना दिसत आहे. लोकशाहीची जागा हुकूमशाही प्रवृत्तीचे राज्यकर्ते लोकशाही मार्गाने व्यापत आहेत. परिणामतः जगभरातील ६८% जनता ही एकाधिकारशाही असलेल्या राजवटीमध्ये वास्तव्य करत आहे. तर केवळ १४% लोक लोकशाही राजवटीमध्ये राहत आहेत. जगातील जवळपास १/३ देशांमध्ये एकाधिकारशाही वाढत आहे. ब्राझील, भारत, तुर्की, पोलंड, अमेरिका या देशांमध्येही एकाधिकारशाही वाढत आहे. आशिया खंडातील श्रीलंका, बांग्लादेश आणि नेपाळ सारख्या भारताच्या शेजारी देशामधील लोकशाहीचा अंत होताना दिसत आहे.लोकशाहीतील ही एकाधिकारशाही व्यक्तीपुजेतून निर्माण होते. म्हणून शेवटी बाबासाहेबांनी भारतीय लोकशाहीबद्दल भीती व्यक्त केली होती कि, 'भक्ती किंवा ज्याला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो, किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही.इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अधपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो. या सर्व पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचारांचा अभ्यास करून त्यांची समकालीन प्रस्तुतता तपासण्याचा प्रयत्न केला आहे.

मुख्यशब्द: *डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाही, समकालीन प्रस्तुतता, सामाजिक समता, आर्थिक विषमता, हुकूमशाही, व्यक्तीपूजा, विरोधी पक्ष, नैतिकता, सार्वजनिक नीतिविवेक, भारतीय राज्यघटना, उदारमतवादी लोकशाही, सामाजिक न्याय, मानवाधिकार, राष्ट्रवाद.*

प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या शेवटी जगभर लोकशाहीच्या विस्ताराला सुरुवात झाली. या विस्तारालाच सॅम्युअल पी हॅटिंगटन हा 'लोकशाहीची तिसरी लाट' असा उल्लेख करतो. तर फ्रान्सिस फुकुयामा या कालखंडाचे वर्णन 'इतिहासाचा अंत' (End of History) असे करतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या कुशीत असणारे उदारमतवादी लोकशाही व्यवस्था हीच एकमेव सार्वत्रिक व्यवस्था असेल असे फुकुयामाचे मत होते.[१]भारतानेही लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. ही लोकशाही नेमकी कशी असावी याबाबत खल झाला. शेवटी अतिशय परिश्रमाने अनेकांच्या वैचारिक आणि अभ्यासपूर्ण मांडणीतून भारताची लोकशाही रचना व मूल्ये निश्चित केली. त्यामध्ये प्राधान्यक्रमाने नाव येते ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होय. आंबेडकरांच्या नजरेतून लोकशाही व्यवस्थेचा विचार करता, लोकशाही म्हणजे फक्त बहुमताचे राज्य नव्हे, तर अल्पसंख्यकांचे संरक्षण, विचारांची विविधता आणि नैतिकता या सर्वांचा समतोल साधणे होय.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. विकास मोहन सरनाईक, इतिहास विभाग, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव

How to cite this article:
सरनाईक, . विकास . मोहन . (2025). डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विषयक विचारांची समकालीन प्रस्तुतता. Journal of Research & Development, 17(9(IV)), 245–249. https://doi.org/10.5281/zenodo.17732049

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732049
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

युरोप किंवा अमेरिकेप्रमाणे भारतातील लोकशाहीचे स्वरूप राबवता येणार नाही, कारण भारतातील सामाजिक, सांस्कृतिक आणि भौतिक परिस्थिती ही युरोप किंवा अमेरिकेपेक्षा वेगळी आहे. म्हणून आंबेडकरांनी भारतातील विविधता, परस्पर संवाद, आचार-विचारांची देवाण-घेवाण आणि समाजात वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय संस्था स्थापन करण्यावर जोर दिला.भारतीय लोकशाहीत परस्परांत संवाद न करणारे, स्वतःला बंद कप्प्यात कोंडून घेणारे लोक आंबेडकरांना नको होते तर, मुक्त परस्पर संवादावर आधारलेला नागरी समाज त्यांना भारतात स्थापन करावयाचा होता.[२]

एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पहिल्या-दुसऱ्या दशकात जगभरातील लोकशाही राजवटीचा आणि मूल्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. लोकशाहीची जागा हुकूमशाही प्रवृत्तीचे राज्यकर्ते लोकशाही मार्गानेचा व्यापत आहेत. परिणामी आज जगभरातील ६८% जनता ही एकाधिकारशाही असलेल्या राजवटीमध्ये वास्तव्यास आहे, तर केवळ १४% लोक लोकशाही राजवटीमध्ये राहत आहेत. जगातील जवळपास १/३ देशांमध्ये एकाधिकारशाही वाढत आहे. ब्राझील, भारत, तुर्की, पोलंड, अमेरिका या देशांमध्येही एकाधिकारशाही वाढत आहे. आशिया खंडातील श्रीलंका, बांग्लादेश आणि नेपाळ सारख्या भारताच्या शेजारी देशामधील लोकशाहीचा अंत होताना दिसत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचारांचा अभ्यास करून त्यांची समकालीन प्रस्तुतता तपासण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. आंबेडकरांचा लोकशाहीबाबतचाइशारा:

डॉ. आंबेडकर यांनी लोकशाही बाबत घटना समितीत इशारा देताना म्हटले होते की,'भारतात आज आपण राजकीय लोकशाही आणत आहोत, मात्र आर्थिक आणि सामाजिक पातळीवर ही लोकशाही झिरपली नाही तर, राजकीय, सामाजिक व आर्थिक पातळीवर विसंगती निर्माण होऊन आर्थिक गुलामगिरीचा सामना करणारे लोक राजकीय लोकशाही मोडून काढतील.'[३]म्हणूनच त्यांनी भारतासारख्या देशासाठी उदारमतवादी लोकशाहीचा पुरस्करकेला. भारतात लोकशाहीच्या मार्गाने सामाजिक आणि आर्थिक समता स्थापन करता येईल असे त्यांचे मत होते. लोकशाही हा केवळ एक शासन प्रक्रिया नसून ती जीवनपद्धती आहे, ती सर्वांनी एकत्र सहकार्याने राहण्याचे व आपले विविध जीवनानुभव संज्ञापित करण्याची व्यवस्था आहे असे ते मानत.[४] तसेच लोकशाही ही शासन करण्याची अशी पद्धत आहे, जिच्याद्वारे लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात क्रांतिकारी बदल रक्तपात न करता घडवून आणता येतात.[५]एकूणच डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीचा पुरस्कार केला. मात्र लोकशाही टिकवण्यासाठी सर्वांगीण विकासाची भूमिका घेणे आवश्यक असल्याचा इशारा त्यांनी दिला, तो गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकरांचेलोकशाही टिकण्यासाठीचे पूर्वसंकेत/इशारा आणि आजचे वस्तव:

२२ डिसेंबर १९५२ रोजी पुणे बार असोसिएशनच्या ग्रंथालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना बाबासाहेबांनी भारतात लोकशाही यशस्वी करण्यासाठी कोणते संकेत पाळले पाहिजेत याचे विश्लेषणकेले. त्यावेळी त्यांनी काही पुर्वसंकेतांची मांडणीही केली होती,मात्र आजच्या समकालीन परीस्थित या संकेतांची पायमल्ली भारतातील राजकीय नेते आणि पक्ष यांच्याकडून सातत्याने होताना दिसत आहे. डॉ. आंबेडकरांनी सांगितलेल्या अनेक गोष्टी अमलात आणल्याच नाहीत, उलटपक्षी त्यांच्या या संकेताकडे दुर्लक्ष करणे भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. याचा उहापोह येथे करण्याचा प्रयत्न केलेला आहे...

१) समाजात मोठ्या प्रमाणात विषमता नसली पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांच्या मते, ज्या समाजात मोठ्या प्रमाणात विषमता आहे त्या समाजात लोकशाही रुजू शकत नाही. कारण लोकशाही समानतेवर आधारलेली आहे व विषमतेमुळे निर्माण होणारे वर्गावर्गातील संघर्ष तिला अस्थिर करतील. समाजातील श्रीमंत लोकांनी आपले विशेषाधिकार सोडले पाहिजेत. मात्र आजचे चित्र खूप वाईट आहे. सन २००० पासून भारतीय समाजामध्ये सामाजिक विषमतेचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे असे दिसते.[६]राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या (NSSO) अहवालातही आय.टी.सारख्या क्षेत्रात जाती आधारित असमानता असल्याचे स्पष्ट होते.[७] आरक्षणाच्यानावाखाली जाती-जाती मध्ये संघर्ष सुरु आहेत. देशभर अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. राष्ट्रातील २९ सप्टेंबर २००६ चे खैरलांजी प्रकरण असो वा मणिपूर येथील ३ मे २०२३ ते २०२४ इतका प्रदीर्घ काळ चाललेला जातीय व वांशिक संघर्षात शेकडो लोकांचा बळी गेला.[८] १७ जानेवारी २०१६ रोजी रोहित वेमुला या हैदराबाद विध्यापिठातील पीएच .डी.विध्यार्थ्याने जातीय त्रासाला कंटाळून आत्महत्या केली .महारष्ट्रात मराठा-ओबीसी आरक्षण वाद, धनगरांचा एसटी प्रवर्गासाठी, मांग समाजाचा स्वतंत्र एससी आरक्षण मागणी या अशा शेकडो घटना देशभर घडत असल्याने लोकांची लोकशाहीवरील निष्ठा कमी होत आहे .जातीय संघर्षाबरोबर धार्मिक संघर्षाचा भडका वाढतच आहे. 75 वर्षे पूर्ण केलेल्या भारतीय लोकशाहीमध्ये अल्पसंख्यांक मुस्लिम, दलित, आदिवासी यांना नक्षलवादी व दहशतवादी ठरवून ठार मारले जाते. त्यांच्या नागरी हक्काच्या चळवळी दडपल्या जात आहेत. परिणामतः भारतीय समाजात जातीय व धार्मिक टोकदारपणा वाढत आहे. अद्यापही भारतीय समाजात जातीव्यवस्था अस्तित्वात असल्याने लोकशाही समाजातून हद्दपार होते कि काय असे चित्र दिसत आहे. मुळात लोकशाही प्रशासन व्यवस्था ही आधुनिकेतून आलेली आहे मात्र, दुर्दैवाने या देशातील आधुनिकता सुद्धा जातीच्या कोंदणातून साकारताना दिसते. त्यामुळेच भारतातील समाजशास्त्रज्ञाने या आधुनिक्तेला 'फ्रॅक्चर्ड मॉडर्निटी' असे संबोधले आहे. यामुळे समाजाचे लोकशाहीकरण घडतच नाही, शिवाय सहिष्णू आणि एकात्म असा समाजाच उभा राहत नाही. हे चित्र भारताच्या लोकशाहीसाठी खुपच विदारक आहे.[९]

२) लोकशाहीत कार्यक्षम असे विरोधी पक्ष असले पाहिजेत.

सत्ताधारी सरकार अयशस्वी ठरले तर पर्यायी सरकार देणारा विरोधी पक्षाची गरज लोकशाहीत असते. सरकारच्या चुकीच्या निर्णयांना व धोरणाला विरोध व टीका विरोधी पक्षाने केली पाहिजे. वर्तमानपत्रांनीही विरोधी पक्षांने केलेल्या टीकेला बातम्यांमध्ये

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

स्थान दिले पाहिजे.मात्र भारतातील कॉंग्रेस पक्षाच्या इंदिरा गांधी यांच्या सरकारने 'देशभक्ती-देशद्रोह' या संदर्भात नवीन व्याख्यानुसार सरकार म्हणजे देश आणि या सरकार विरुद्ध जो बोलेल तो देशद्रोही, 'इंदिरा इज इंडिया' यासारख्या वक्तव्याने या प्रक्रियेला एकाधिकारशाहीला खतपाणीच घातले.[१०] हाच कित्ता पुढे जाऊन भाजपच्या सरकारच्या काळामध्ये गिरवला जात आहे. या सरकारनेही लोकशाही परंपरांचे उल्लंघन केले. संसदेतील सभापतींनी पक्षपातीवर्तन केले. विरोधी पक्षाच्या नेत्यावर खटले भरले गेले, आणि ऐन निवडणुकीच्या काळात विरोधी पक्षाचे खाते गोठवले गेले.[११]एक देश, एक पक्ष, एक नेता याही पुढे जाऊन एक धर्म अशा दिशेने सर्व मार्गक्रमण सुरु आहे. जो देशाला एकाधिकारशाहीकडे नेणारा आहे.

३) सर्व नागरिक कायद्यासमोर समान असले पाहिजेत

कायद्याची अंमलबजावणी करतानाकोणत्याही प्रकारचा पक्षपात केला जाऊ नये. त्याचप्रमाणे सरकारने देखील सर्व नागरिकांना समान लेखले पाहिजे. शासनाच्या रोजच्या कामामध्ये मंत्र्यांनी हस्तक्षेप करू नये असा स्पष्ट संकेत असतनाही आज सर्रासपणे मंत्रीमहोदय हस्तक्षेप करताना दिसत आहेत. न्याय व्यवस्था, पोलिस प्रशासन, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था अशा विविध सर्व शासकीय संस्था व आस्थापनामध्ये मंत्र्यांचा हस्तक्षेप वाढत आहे. शासकीय अधिकाऱ्यावर दबाव आणला जात आहे.

४) लोकशाही म्हणजे बहुमताचे अधिराज्य नव्हे

लोकशाहीत बहुतेक निर्णय एकमताने वा सहमतीने घेतले गेले पाहिजेत. लोकशाहीत अल्पसंख्याकांच्या मताला मान दिला पाहिजे. कायदेमंडळात, अल्पमतात असणाऱ्या विरोधी पक्षांना विरोध करण्याची, मते मांडण्याची संधी दिली पाहिजे. तशी संधी दिली नाही तर त्यांच्या मनात संसदीय पद्धतीबद्दल तिरस्कार निर्माण होऊ शकतो.हे वास्तव नाकारून चालणार नाही कारण लोकशाहीची अवस्था काय झाली आहे बघा असे म्हणण्याची वेळ विरोधी पक्षनेता असलेल्या कॉंग्रेसच्या राहुल गांधी यांच्यावर आली. ते म्हणतात, '३०० खासदार निवडणूक आयोगाला भेटण्याची इच्छा व्यक्त करतात. आम्ही सगळे येऊन तुम्हाला निवेदन देतो पण, आयोग त्यांना भेटण्यास तयार नाही. ३०० खासदार भेटले तर सत्य बाहेर येईल ही भीती आयोगाला वाटते'.[१२] ही आवस्था देशातील विरोधीपक्षनेते यांची असेल तर सर्वसामान्य जनतेची काय असेल हे ओळखणे दुरापास्त नाही. या देशातील अल्पसंख्याकांच्या बाबतीत तर खुपच दैनीय स्थिती आहे. उदा. अल्पसंख्याकांची बाजू मांडतील आणि त्यासंबंधाने प्रश्न विचारतील यास्तव आज महाराष्ट्राच्या विधानसभेत फक्त १० मुस्लीम सदस्य आहेत. मागील (२०१४-२०१९) विधानसभेत हा आकडा ९ असा होता. राज्याच्या एकूण ११.२४ कोटी लोकसंख्येमध्ये १.३ कोटी लोक मुसलमान आहेत. त्या तुलनेत हे प्रमाण अत्यल्प आहे.विधान परिषदेत तर एकही मुस्लीम आमदार नाही. पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याचं द्विगृही विधिमंडळ अस्तित्वात आल्यापासून असं पहिल्यांदाच घडलं आहे की वरिष्ठ सदनात एकही मुसलमान आमदार नाही.[१३] यावरून लक्षात येते की लोकशाहीला राक्षसी बहुमतापासूनही धोका असल्याचे आंबेडकर यांनी म्हटले होते. त्यामुळे एकाद्या राजकीय पक्षाला बहुमत असले तरी त्याने लोकशाहीचे संकेत समोर ठेऊन कारभार केला पाहिजे.

५) लोकशाहीत नैतिकता महत्त्वाची असते

संविधानाने नागरिकांना पूर्ण स्वातंत्र्य प्रदान करण्यात केले असले तरी, या स्वातंत्र्याचा उपभोग घेत असताना योग्य वेळी कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी कायदा मोडणे चुकीचे आहे. समाजाच्या नैतिक आचरणावरच लोकशाहीची इमारत उभी असते.आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या बाबतीत तर गेल्या पाऊण शतकात भारतात राज्यकर्त्यांनी काहीही केलेले नाही. उलट ही विषमता दिवसेंदिवस वाढतच जात आहे. 'ऑक्सफॅम इंडिया'च्या २०२३ च्या अहवालानुसार वरच्या ५% लोकांजवळ देशाची ६० % संपत्ती आहे, तर खालच्या ५० % लोकांजवळ केवळ ३% संपत्ती आहे. तसेच २०१२ ते २०२१ दरम्यान देशात निर्माण झालेल्या संपत्तीचा ४० % वाटा हा केवळ वरच्या १% लोकांच्या घशात गेला आणि खालच्या ५० % लोकांना केवळ ३% वाटा मिळाला. उपाशीपोटी झोपावे लागणाऱ्यांची संख्या २०१८ च्या एक कोटी ९० लाख वरून२०२२ पर्यंत ३ कोटी ५० लाखांवर पोहोचली आहे. याउलट खालच्या ५०% लोकांकडून ६४ % जीएसटी सरकारी तिजोरीत जमा होतो. तर वरच्या १० % लोकांकडून केवळ ४% जीएसटी जमा होतो. पण यासंदर्भात कोणीही बोलायला तयार नाही, याचे एकमेव कारण म्हणजे जनतेची आर्थिक निरक्षरता आणि आर्थिक मुद्द्यांना जाती-धर्मासारखे भावनिक संबध नाही. त्यामुळे ते मुद्दे घेऊन निवडणुकीत यश मिळण्याची शाश्वती नेत्यांना वाटत नाही. उलट आर्थिक उन्नतीच्या किंवा सामाजिक न्यायाच्या नावाने फुकट योजनांचे सध्या फार पेव फुटलेले आहे.[१४]याठिकाणी राजकीय नेत्यांनी नैतिकता ठेवून आपली जबाबदारी इमानदारीने पार पडल्यास निश्चितपणे राज्यांची पर्यायाने देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

६) सार्वजनिक नीतिविवेक

डॉ. आंबेडकरांचे असे मत होते की, आपल्या सार्वजनिक जीवनात सरकारकडून वा समाजातील बलवान वर्गाकडून काही अभागी वर्गावर अन्याय होतात. या अन्यायाविरुद्ध उभा राहून प्रतिकार करण्याच्या वृत्तीला बाबासाहेब 'नीतिविवेक' म्हणतात. सद्सद्-विवेकबुद्धी जागृत ठेवून आपला वर्ग, जात, वंश यांचा विचार न करता जे लोक अन्यायाविरुद्ध उभे राहतात ते लोकशाहीचे समर्थक आहेत. भारतात जातिव्यवस्थेमुळे अस्पृश्य-वर्गाविरुद्ध होणाऱ्या अन्यायाविरुद्ध फार थोडे लोक उभे राहिले. पण लोकांनी असे उभे राहणे गरजेचे आहे. आपल्या भाषणाचा समारोप करताना डॉ. आंबेडकर म्हणाले की, 'आपण आता स्वतंत्र झालो आहोत! आपण राज्यघटना तयार केली आहे. पण लोकशाहीचे रोपटे सगळीकडेच रुजेलच असे नाही. ते इंग्लंड, अमेरिकेत रुजले, पण फ्रान्समध्ये खुरटले. व्हर्सायच्या करारानंतर अनेक लोकशाही सरकारे स्थापन झाली व कोसळलीही. दुसऱ्या महायुद्धानंतर सीरिया, इराण, इजिप्त येथे लष्करी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

हुकूमशाह्या आल्या. त्यामुळे लोकशाहीचे रोप व्यवस्थितरित्या रुजवणे, आपल्या वाटेतील दगड-धोंडे दूर करणे आवश्यक आहे.[१५]मात्र भारतीय लोकशाहीचे रखवालदार समजणारे राजकीय नेते मात्र लोकशाहीच्या वाटेत विस्तव टाकत असल्याचे वास्तव दिसत आहे. जनतेच्या जातीय आणि धार्मिक भावना जाणीवपूर्वक टोकदार बनवल्या जात आहेत. जहाल राष्ट्रवादाला प्रोस्ताहन दिले जात आहे. जहाल राष्ट्रवादामुळे लोकशाही धोक्यात आलेली आहे. या राष्ट्रवादाला अल्बर्ट आईन्स्टाईनने गोवर या वेगाने पसरणाऱ्या संसर्गजन्य आजाराची उपमा दिली होती. वर्तमान भारतात जहाल राष्ट्रवादाचा ज्वर एखाद्या संसर्गजन्य आजाराप्रमाणे पसरत आहे. जगभरातील उजव्या विचारांच्या नेत्यांनी राष्ट्रवादावर मक्ता प्रस्थापित केला असून त्यांचा राष्ट्रवाद हा वांशिक स्वरूपाचा आहे. या राष्ट्रवादातून सांस्कृतिक दृष्ट्या संकुचित आत्मप्रेमी आणि स्वप्नाळू भावना निर्माण करून त्या, अल्पसंख्यांक आणि स्थलांतरित यांच्या विरोधात द्वेष वाढवण्यासाठी वापरल्या जात आहेत. अशा स्वरूपाचा वांशिक राष्ट्रवाद भारत, चीन, तुर्की, अमेरिका या देशांमध्ये निर्माण होताना दिसत आहे.[१६]

समारोप:

भारतीय लोकशाहीच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अविस्मरणीय आहे. लोकशाही ही केवळ राजकीय व्यवस्था नसून ती सामाजिक समता, बंधुता आणि न्यायावर आधारित जीवनपद्धती आहे. लोकशाही व्यवस्था तेव्हाच यशस्वी ठरते जेव्हा समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी, अधिकार आणि प्रतिष्ठा मिळते. ही लोकशाही टिकवण्यासाठी तितक्याच ताकदीचे शिक्षण असावे लागते. त्यामुळे राज्याने सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून द्यावे. तसेच सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही ही अपूर्ण आणि धोकादायक ठरते. म्हणूनच त्यांनी समाजरचनेतील विषमता दूर करण्यासाठी राज्यघटनेच्या माध्यमातून मूलभूत अधिकार, आरक्षण, धर्मस्वातंत्र्य आणि समान संधी यांचा पुरस्कार केला. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगातही आंबेडकरांचे लोकशाहीविषयक विचार अत्यंत समकालीन आहेत. भ्रष्टाचार, धार्मिक ध्रुवीकरण, जातीय असमानता, स्त्री-पुरुष विषमता, आर्थिक दरी, बेरोजगारी आणि सामाजिक न्यायाचा अभाव या प्रश्नांनी लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना आव्हान दिले आहे. परिणामी सध्या २०२५मध्ये जगभर लोकशाही राजवटीचा आणि मूल्यांचा ऱ्हास होत असून तो अवकाश हुकूमशाही प्रवृत्तीचे राज्यकर्ते लोकशाही मार्गाने भरून काढत आहेत. हे वास्तव व्ही डेम या स्वीडन मधील विद्यापीठाच्या लोकशाही विषयक अहवालात दिसते. या अहवालानुसार जगातील ६८% जनता ही एकाधिकारशाही असलेल्या राजवटीमध्ये वास्तव्यास आहे. गेल्या दशकभरात उदारमतवादी लोकशाही राजवटीत वाढ झालेली आहे. जगातील केवळ १४%लोक लोकशाही राजवटीमध्ये राहत आहेत. जगभरातील १/३ देशांमध्ये एकाधिकारशाही वाढत आहे, केवळ ४% नागरी हे लोकशाही वृद्धिकच होणाऱ्या देशांमध्ये वास्तव्य करत आहेत. ब्राझील, भारत, तुर्की, पोलंड, अमेरिका या देशांमध्येही एकाधिकारशाही वाढत आहे.[१७] ही एकाधिकारशाही व्यक्तीपुजेतून निर्माण होते. म्हणून शेवटी बाबासाहेबांनी भारतीय लोकशाही बद्दल भीती व्यक्त केली होती कि, 'भक्ती किंवा ज्याला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो, किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही.इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अधपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.[१८]एकुणचसमकालीन परिस्थितीत भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने आहेत. या पार्श्वभूमीवर आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार मार्गदर्शक ठरतात. डॉ. आंबेडकर यांच्या कल्पनांनुसार आजची धोरणे व प्रणालींमध्ये सुधारणा केली तरच भारतीय लोकशाही दीर्घकाळ टिकू शकेल.

संदर्भ:

1. मुक्त शब्द,मुबई, जुलै २०२५, पृष्ठ १४.
2. समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर, ऑक्टो.-डिसें.-२०१६ पृष्ठ ९४.
3. समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर, ऑक्टो-डिसें.२०१७,पृष्ठ ५६.
4. Ambedkar, B. R. (1979) Dr. BabasahebAmbedkar Writings and Speeches, Education Vol. I, Dept. Govt. of Maharashtra, Mumbai.2013 pp43.
5. कित्ता, P 475.
6. Business Standard 14 Sept. 2022. https://www.business-standard.com/article/current-affairs/findings-from-a-new-report-show-social-inequality-has-increased-in-india-122090201190_1.html
7. The Hindu 25 Dec. 2024 https://www.thehindu.com/opinion/op-ed/myth-of-meritocracy-caste-based-disparities-in-it-sector/article69023582.ece
8. https://hi.wikipedia.org/wiki/%E0%A4%AE%E0%A4%A3%E0%A4%BF%E0%A4%AA%E0%A5%81%E0%A4%B0_%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%82%E0%A4%B8%E0%A4%BE_2023
9. साधना साप्ताहिक, पुणे, शनिवार २७ऑगस्ट २०२२पृष्ठ २७.
10. समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर, ऑक्टोंबर- डिसेंबर २०१७पृष्ठ ५१.
11. समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर, एप्रिल-मे-जून २०२४पृष्ठ ७.
12. दैनिक लोकसत्ता, १२ सेप्टेम्बर २०२५.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

13. दैनिक लोकसत्ता ८ऑक्टोबर २०२४.
14. दैनिक लोकसत्ता ९ऑक्टोबर २०२४.
15. Rao Raghvendra. K, “Dr. Babasaheb Ambedkar”,Sahitya Akademi, New Delhi, 2003, PP 473-86.
16. मुक्त शब्द, मुंबई, जुलै २०२५पृष्ठ १६.
17. कित्ता,पृष्ठ १४.
18. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, भाग-३, १९४६ ते १९५६.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधानाची ७५ वर्षे : चिंतन, सुधारणा आणि भावी दिशा

डॉ. विजय जालिंदर देठे
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
Email: dethevijay11@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170952
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 250-253
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

भारतीय संविधान हे लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि प्रजासत्ताक या मूल्यांवर आधारित असून २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले. या संविधानाने भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाला दिशा दिली आहे. ७५ वर्षांच्या प्रवासात संविधानाने अनेक सुधारणा आणि दुरुस्त्यांद्वारे काळानुरूप परिवर्तन स्वीकारले आहे. न्याय, समता आणि स्वातंत्र्य या मूल्यांचा अंगीकार करताना लोकशाहीची स्थिरता, न्यायालयीन भूमिका, सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक सुधारणा यांचा ठसा उमटला. तथापि, भ्रष्टाचार, धर्मनिरपेक्षतेवरील प्रश्न, प्रशासकीय अकार्यक्षमता व न्यायदानातील विलंब ही आव्हाने आजही कायम आहेत. भावी काळात निवडणूक सुधारणा, न्यायप्रक्रियेचे सुलभीकरण, संविधान शिक्षण आणि पर्यावरण संरक्षण या दिशेने सुधारणा आवश्यक आहेत. भारतीय संविधान हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून सामाजिक परिवर्तनाचे सशक्त माध्यम आहे, ज्याद्वारे समतामूलक आणि न्याय्य भारताची निर्मिती शक्य आहे.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, लोकशाही, सुधारणा, न्याय, समता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, दुरुस्ती, आव्हाने, भावी दिशा.*

प्रस्तावना

भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले. "We, the people of India..." या जनसत्ताक भूमिकेवर आधारित हे संविधान जगातील सर्वात मोठ्या लोकशाही व्यवस्थेला दिशा देणारे आधारग्रंथ आहे. हे संविधान लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि प्रजासत्ताक मुल्यावर आधारलेले आहे.जगातील सर्वात मोठया लोकशाही व्यवस्थेला दिशा देणारे हे संविधान भारताच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक आयुष्याचे मार्गदर्शक तत्वज्ञान ठरले आहे. २०२५ मध्ये संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना, या कालावधीत त्याचे सखोल चिंतन, झालेल्या सुधारणा आणि भावी दिशेबाबतचे आकलन करणे आवश्यक आहे. संविधानाने भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनाला घडविले आहे; परंतु बदलत्या काळात उद्भवणाऱ्या आव्हानांमुळे सुधारणा करणे आणि भविष्यासाठी योग्य दिशा निश्चित करणेही तितकेच गरजेचे ठरते.

उद्दिष्टे

1) संविधानाचा ऐतिहासीक आढावा घेणे.

2) संविधानाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

3) संविधानाचा घटनात्मक प्रवास अभ्यासणे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. विजय जालिंदर देठे, सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

How to cite this article:
देठे, . विजय . जालिंदर . (2025). भारतीय संविधानाची ७५ वर्षे: चिंतन, सुधारणा आणि भावी दिशा. Journal of Research & Development, 17(9(IV)), 250–253.
https://doi.org/10.5281/zenodo.17732151

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732151
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

4) संविधानातील महत्वाच्या दुरुस्त्याचा अभ्यास करणे.

5) आव्हाने आणि उणीवा यांचा अभ्यास करणे.

6) अभ्यासंती सुधारणाची भावी दिशा सांगणे.

वरील वेगवेगळ्या उद्देशाच्या आधारे प्रस्तुत संशोधन पेपर ची मांडणी करण्यात आली आहे.

१. भारतीय संविधानाचा ऐतिहासिक संदर्भ

भारतीय संविधानाची निर्मिती ही दीर्घकाळ चाललेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्रामाचे फलित आहे. ब्रिटिश वसाहती राजवटीत भारतीय समाजाला अनुभवावे लागलेले अन्याय, शोषण, असमानता, आर्थिक व राजकीय अन्याय सहन करावे लागले या सर्वांनी संविधान रचनेस दिशा दिली. या स्थितीमध्ये भारतीय संविधानाने न्याय, समता आणि स्वातंत्र्य यांची हमी दिली.

संविधान सभेची स्थापना : १९४६ मध्ये संविधान सभेची स्थापना झाली. अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद आणि मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २ वर्षे ११ महिने १८ दिवस काम करून संविधान तयार झाले.(1)

प्रेरणास्थाने : भारताच्या संविधानाने अमेरिका, इंग्लंड, आयर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इ. देशांच्या घटनांमधील सर्वोत्तम तत्त्वे आत्मसात केली(2), परंतु त्यांना भारतीय सामाजिक-आर्थिक परिस्थितीनुसार रूप दिले.

घोषणापत्र : प्रस्तावनेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची स्थापना करण्यात आली, ज्यामुळे संविधानाचे सामाजिक न्यायाभिमुख स्वरूप अधोरेखित झाले.परिणामी आधुनिक भारताचा बौद्धिक पाया रचण्यात आला.

२. संविधानातील प्रमुख वैशिष्ट्ये

भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे व लिखित संविधान आहे. त्यातील काही महत्त्वाची

वैशिष्ट्ये-

1. लिखित व सर्वसमावेशक स्वरूप
2. संघराज्य व्यवस्था परंतु केंद्राभिमुखता
3. मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये
4. स्वतंत्र न्यायपालिका, न्यायिक पुनरावलोकन (Judicial Review)
5. संविधान दुरुस्तीची लवचिक व ताठर प्रक्रिया
6. धर्मनिरपेक्षता व लोकशाही व्यवस्था
7. समाजवादाभिमुख धोरणे

या सर्व घटकांनी भारतात लोकशाही व्यवस्थेला बळकटी दिली.

३. ७५ वर्षांचा घटनात्मक प्रवास : चिंतन

संविधानाच्या ७५ वर्षांच्या प्रवासात भारताने अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली.

अ) लोकशाही स्थिरता: अनेक राजकीय बदल, आपत्कालीन परिस्थिती, युद्धे व सामाजिक उलथापालथ असूनही भारताची लोकशाही टिकून राहिली(3).

ब) न्यायालयीन भूमिका : न्यायपालिका ही संविधानाची संरक्षक ठरली. केशवानंद भारती खटला (१९७३) ने संविधानाच्या मूलभूत रचनेचा सिद्धांत मांडला(4).

क) सामाजिक परिवर्तन : आरक्षण धोरण, दलित, स्त्रिया व वंचित घटकांच्या हक्कांसाठी अनेक सुधारणा घडल्या.

ड) आर्थिक सुधारणा : १९९१ नंतरच्या उदारीकरण धोरणांनी संविधानातील समाजवादाच्या संकल्पनेला नवीन परिमाण दिले.

इ) राजकीय अडचणी : भ्रष्टाचार, गुन्हेगारीकरण, प्रादेशिक असमतोल व जातीय-धार्मिक तणाव ही आव्हाने ठळकपणे पुढे आली.

४. संविधानातील दुरुस्त्या व सुधारणा

संविधान हे एक जीवंत दस्तऐवज असल्याने बदलत्या काळानुसार त्यात दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यातील काही महत्वाच्या दुरुस्त्या-

अ) पहिली दुरुस्ती (१९५१) : अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर काही मर्यादा.

ब) २४ वी व २५ वी दुरुस्ती (१९७१) : संसदेला मूलभूत अधिकारांमध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

क) ४२ वी दुरुस्ती (१९७६) : "मिनी संविधान" म्हणून ओळखली जाते; समाजवाद, धर्मनिरपेक्षता हे शब्द प्रस्तावनेत आणले .
ड) ४४ वी दुरुस्ती (१९७८) : आणीबाणीच्या काळानंतर लोकशाही हक्कांचे संरक्षण.
इ) ७३ वी व ७४ वी दुरुस्ती (१९९२) : पंचायतराज व महानगरपालिका संस्थांना घटनात्मक दर्जा.
ई) १०३ वी दुरुस्ती (२०१९) : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना १०% आरक्षण.(5)
आजपर्यंत (२०२५ पर्यंत) १०८ हून अधिक दुरुस्त्या झाल्या आहेत.

५. आव्हाने आणि उण

७५ वर्षांच्या अनुभवातून काही ठळक समस्या पुढे आल्या आहेत -

1. राजकारणाचे गुन्हेगारीकरण
2. निवडणूक प्रणालीच्या खर्चातील पारदर्शकतेचा अभाव
3. धर्मनिरपेक्षतेवरील प्रश्नचिन्ह
4. संघराज्य व्यवस्थेतील केंद्र-राज्य संघर्ष
5. भ्रष्टाचार व प्रशासकीय कार्यक्षमतेचा अभाव
6. मूलभूत कर्तव्यांविषयी जागृतीचा अभाव
7. न्यायप्रक्रियेतील विलंब व न्यायप्रवेशाची असमानता

ही आव्हाने संविधानाच्या उद्दिष्टपूर्तीसमोर अडथळे ठरतात.

६. भावी दिशा

भारतीय संविधानाने दिलेले मूल्याधिष्ठान कायम ठेवून काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे -

1. निवडणूक सुधारणा व अधिकार– गुन्हेगारांना निवडणुकीपासून दूर ठेवणे, निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवणे. निवडणूक आयोगाला अधिक अधिकार व पारदर्शक बनवणे.
2. संविधानातील मूलभूत कर्तव्यांची जाणीव व जागृती करून नागरिकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.
3. न्यायप्रक्रिया सुलभ करणे– तंत्रज्ञानाचा वापर करून जलद न्यायदान. उदा. ई-कोर्टस
4. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सबलीकरण– स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक आर्थिक व कायदेशीर अधिकार देऊन खऱ्या अर्थाने ग्रामस्वराज्य घडवणे.
5. समावेशक विकास धोरणे– सामाजिक-आर्थिक विषमता कमी करण्यासाठी ठोस उपाय.
6. संविधान शिक्षण– शालेय व महाविद्यालयीन पातळीवर संविधान अभ्यास अनिवार्य करणे.
7. पर्यावरण संरक्षण– भावी पिढ्यांसाठी शाश्वत विकासाला घटनात्मक बळ देणे.
8. डिजिटल लोकशाही– माहिती-तंत्रज्ञानाचा लोकशाही प्रक्रियेत योग्य वापर.

निष्कर्ष

भारतीय संविधान हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून, भारताच्या सामूहिक जीवनाचे मार्गदर्शक तत्वज्ञान आहे. ७५ वर्षांच्या प्रवासात संविधानाने अनेक आव्हाने पेलली, सुधारणा आत्मसात केल्या आणि लोकशाही टिकवली.जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीला स्थिरता दिली. तथापि अजूनही सामाजिक विषमता, राजकीय भ्रष्टाचार, न्यायदानातील विलंब, धर्मनिरपेक्षतेचा प्रश्न आणि प्रशासकीय अकार्यक्षमता ही आव्हाने आहेत. म्हणूनच संविधानाच्या मूल्यांना धरून सुधारणा घडवणे आणि न्याय, समता, स्वतंत्र्य व बंधूभाव निर्माण करून भावी पिढ्यांसाठी सबल, समतामूलक व न्याय्य भारत घडवणे हीच खरी भावी दिशा ठरते.

टिप्पण्या (Footnotes)

1. बॅशीर अहमद, Constituent Assembly Debates, खंड -१२, १९४६-४९.
2. एम. एल. सिन्हा, Comparative Constitutional Law, दिल्ली: ईस्टर्न बुक कंपनी, २०१०.
3. रामचंद्र गुहा, India After Gandhi, नवी दिल्ली: पिकाडोर, २००७.
4. Kesavananda Bharati vs State of Kerala, AIR 1973 SC 1461.
5. The Constitution of India, Government of India, Ministry of Law and Justice, २०२५ आवृत्ती.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भसूची (References)

1. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. भारताचे संविधान आणि लोकशाही विचार. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन, १९५५.
2. बॅशीर अहमद. Constituent Assembly Debates. दिल्ली: लॉ मिनिस्ट्री ऑफ इंडिया, १९४६-४९.
3. सिन्हा, एम. एल. Comparative Constitutional Law. दिल्ली: ईस्टर्न बुक कंपनी, २०१०.
4. गुहा, रामचंद्र. India After Gandhi. नवी दिल्ली: पिकाडोर, २००७.
5. Government of India. The Constitution of India (Bare Act with Amendments). Ministry of Law and Justice, २०२५.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय संविधानातील भूमिका

प्रा. डॉ. साखरे दत्तात्रय यशवंत
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव
Email: dattatraysakhare15@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170953
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 254-257
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

या लेखात प्रा. डॉ. साखरे दत्तात्रय यशवंत यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय संविधानातील भूमिका" या विषयावर सविस्तर विवेचन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील शोषित, पिडीत आणि वंचित घटकांना आत्मभान, स्वाभिमान आणि समानतेचे भान देऊन सामाजिक क्रांती घडवून आणली. भारतीय संविधानाच्या निर्मितीची पार्श्वभूमी, घटना समितीची स्थापना, मसुदा समितीतील त्यांची भूमिका आणि जगातील इतर देशांच्या संविधानाशी तुलना या सर्व बाबींचा तपशीलवार आढावा येथे घेण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांनी ३९५ कलमांचा जगातील सर्वात मोठा लिखित संविधान अल्पावधीत तयार करून भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी केली. संविधानामुळे भारतात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समता प्रस्थापित झाली. मात्र आजही जात, पैसा, भ्रष्टाचार आणि अन्याय यांसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी संविधानातील मूल्यांची अंमलबजावणी आवश्यक असल्याचे लेखक नमूद करतात.

मुख्यशब्द: *डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान, मसुदा समिती, सामाजिक न्याय, समानता, लोकशाही, घटना समिती, संविधान निर्मिती.*

प्रस्तावना :

अज्ञानाच्या अंधाराच्या काळोखात युगानुयुगे खितपत पडलेल्या उपेक्षित- दुर्लक्षित माणसाला आत्मभानाची, स्वाभिमानाची, सन्मानाची, मानवतेची शिकवण देणारा महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब... ज्यांचे नाव दलितांच्या अस्तित्वाचे, अस्मितेचे प्रतीक ठरले, ज्यांच्यासाठी आजही लाखो माणसे आत्मसर्पणासाठी रस्त्यावर येतात तो महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब... हजारो वर्षापासून ज्या समाजाला ज्ञानापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले त्याच समाजातील माणूस आज Symbol of Knowledge)ज्ञानाचे प्रतीक(म्हणून संपूर्ण जगात ओळखले जाते तो प्रकांडपंडित म्हणजे डॉ. बाबासाहेब... आपल्या एकूण उत्पन्नापैकी निम्म्यापेक्षा अधिक उत्पन्न ग्रंथ खरेदी करण्यात खर्च करून केवळ पुस्तकासाठी घर)राजगृह (बांधणारा, कोणत्याही भौतीक सुखात न रमता उपाशीपोटी राहून सातत्याने १७-१८ तास विद्याभ्यासात रममान होणारा विश्ववंदनीय महामानव म्हणाजे डॉ. बाबासाहेब... सर्वोत्तम भुमिपुत्र गौतम बुध्द, राष्ट्रसंत कबीर, राष्ट्रपिता म.ज्योतिबा फुले यांना गुरु मानून सामाजिक न्याय, समता, मानवतेसाठी रक्ताचा एक थेंबही न सांडता जगप्रसिध्द सामाजिक क्रांती घडविणारा महामानव महणजे डॉ बाबासाहेब... उपाशीपोटी रहा पण ज्ञान संपादन करा, स्वउध्दारासाठी खेडी सोडून शहराकडे चला,विज्ञानवादी, मानवतावादी शांततावादी बौध्द धर्माचा स्विकार करा असा मोलाचा संदेश देणारा महान प्रज्ञावंत म्हणजे डॉ. बाबासाहेब... समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि विज्ञान या त्रिसुत्रांचा महासागर म्हणजे डॉ. बाबासाहेब... होय.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. साखरे दत्तात्रय यशवंत , विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग , रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव

How to cite this article:
यशवंत, . साखरे . दत्तात्रय . (2025). डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय संविधानातील भूमिका. Journal of Research & Development, 17(9(IV)), 254–257. https://doi.org/10.5281/zenodo.17732236

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732236

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

बुध्दीप्रामान्यवादी विव्दान पडीत, कर्तुत्वान, बुध्दीचा सम्राट, विज्ञाननिष्ठ, शोषितांचे मुक्तीदाते, रक्तविहीन कांतीचा महानायक, कोटयावधी दिन - दलितांचा पिचलेल्यांचा महानायक, राष्ट्रहित जोपासनारा थोर देशभक्त भारतीय राज्यघटनेचा शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आबेडकर याच्या कार्य कर्तुत्वाची संपूर्ण जगाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरानी नोंद घेतली जाते.

भारतीय संविधानाची निर्मीतीची पार्श्वभुमी :

भारतीय संविधानाच्यानिर्मीतीसाठी भारतातील स्वातंत्र्य लढयातील महान देशभक्तांचा गौरवशाली वारसा लाभला असून भारतीय संविधानाच्या निर्मातीसाठी पुढील काही महत्वाच्या नोंदी विचारात घ्याव्या लागतात.

१. १९२४ साली मोतीलाल नेहरु यांनी केंद्रीय विधीमंडळात भारतासाठी संविधान असावे अशी मागणी केली.

२. १९२७ मध्ये काँग्रेस अधिवेशनात भारतासाठी संविधानाचा आराखडा तयार करावा यावर भर देण्यात आला.

३. २६ नोवोंबर १९२७ रोजी इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान स्टेनले बाल्डविन यांनी भारतासाठी संविधान आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष महणून सर जॉन सायमन होते. सायमन कमिशन भारतात आल्यावर काँग्रेसने त्यास विरोध केला. या कमिशनपुढे डॉ. बाबासाहेबानी विद्येच्या व्यासंगीपणामुळे भारतीय संविधानाच्या निर्मीतीसासाठी प्रांतीक विधीमंडळाची रचना कशी असावी ? या विषयी अभ्यासपूर्ण माहिती दिली यामुळे डॉ. बाबासाहेबांना गोलमेज परिषदेचे शासकीय निमंत्रण मिळाले.

४. १९२९ ला लाहोर येथील काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडून घटना समीतीच्या निर्मातीवर भर दिला.

५. डॉ. बाबासाहेबानी ७ नोव्हेंबर १९३२ मध्ये इग्लडमध्ये जावून भारतीय स्वातंत्र्याची मागणी केली. (कदाचित असे करणारे डॉ. बाबासाहेब हे पहिले देशभक्त असतील(एवढेच नन्हे तर भारताची राज्यघटना कशी असावी याबाबत अभ्यासपूर्ण विचार मांडले पुढे दुस-या व तिस-या गोलमेज परिषदेत संघराज्याची संरचना, अल्पसंख्याकाचे अधिकार अशा महत्वपूर्ण घटनावर विचार मांडले.

६. १९३३ मध्ये पंडीत नेहरुनी भारतासाठी एक घटनात्मक समीती असावी असे मत मांडले.

७. १९३४ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसने घटना समीतीच्या मागणीचा प्रस्ताव तयार केला.

८. १९४० मध्ये ब्रिटीश सरकारने भारतीय घटना निर्मातीसाठी घटना समीती अस्त्रावी असे मत मांडले.

९. १९४२ ला क्रिप्स मिशनने भारतीय संविधान निर्मान करण्याची जबाबदारी ही संपूर्ण भारतीयांची असेल असे मान्य केले.

१०. १९४६ ला कॅबिनेट मिशनच्या शिफारशीने घटना समीती तयार केली.

घटना समीती स्थापना आणि कार्य :

१९४६ च्या कॅबिनेट मिशनच्या शिफारशीने भारताची घटना समीती तयार केली. प्रत्येक प्रांतानी लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व दयावे, विविध जमातीने आपले प्रतिनिधी निवडावे विविध संस्थानाचे प्रतिनिधी लोकसंख्येच्या प्रमाणात घ्यावे, घटनासमितीसाठी जूलै १९४६ मध्ये निवडणूका झाल्यां यात ३८९ प्रतिनिधींची निश्चिती करण्यात आली. पुढे ऑगस्ट १९४७ मध्ये भारताची फाळणी झाल्यामुळे ऑक्टोबर १९४७ च्या बैठकीत घटना समीतीची सदस्य संख्या २९९ झाली. ९ डिसेबर ते २३ डिसेंबर १९४७ रोजी घटना समीतीची पहिली बैठक संविधान सभागृह (सेंट्रल हॉल दिल्ली) मध्ये झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. भारताला राज्यघटनेची अधिकृत समीती म्हणून घटना समीतीला स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला व ९ डिसेंबर १९४६ ते २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत म्हणजेच २ वर्ष ११ महिने १८ दिवस घटनासमीतीचे कामकाज चालले, घटना परिषदेच्या एकूण ११ बैठका झाल्या घटनेच्या मसुद्यवर ११४ दिवस चर्चा झाली यासाठी ६३,९६,७२९ रुपये खर्च झाला.

डॉ. बाबासाहेब याची घटना समीतीवर निवड :

१९ जुलै १९४६ रोजी मागास बहुलअसलेल्या बंगाल प्रांतातील ज्स्सोर व खुलना या मतदार संघातून डॉ. बाबासाहेब संविधान सभेचे सदस्य म्हणून निवडून आले. परंतु बंगालची फाळणी झाल्यामुळे बाबासाहेबांचे सदस्य रद्द्द झाले. तत्कालीन कांही मंडळींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना घटना समितीचे सदस्य मिळू नये असा प्रयत्न केला.परिणामी डॉ. बाबासाहेबांनी १९४७ मध्ये इंग्लंड मध्ये जावून तेथील ब्रिटीश नेत्यांना म्हणाले की, भरतल स्वातंत्र्य देताना मुस्लिमांना विचारात घेतले, परंतु मागास्वर्गीयाना फारसे महत्व दिले जात नाही याची जाणीव ब्रिटिशांना करून दिली, परिणामी कोणत्याही परस्थितीत डॉ. बाबासाहेबांना संविधान सभेत निवडून पाठवा असे इंग्रजांनी पं. नेहरुंना कळविले आणि मुंबई मधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना समितीवर सदस्य म्हणून निवड झाली.

मसुदा समीती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

घटना समीतीच्या यशस्वी कार्यासाठी एकूण २२ समीत्या स्थापन झाल्या त्यापैकी मसुदा समिती ही घटना समीतीतील सर्वांत महत्वाची समीती मानली जाते ही समीती २९ ऑगस्ट १९४७ रोजी स्थापन झाली. देशाच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे काम या समतीकडे होते या समीतीमध्ये एकूण सात (७) सदस्य होते यामध्ये अल्लादी कृष्णास्वामी अय्यर (पूर्व अॅडव्होकेट जनरल मद्रास) एन. गोपालस्वामी अय्यंगार (प्रधानमंत्री जम्मू काश्मीर), के. एम. मुन्शी (पूर्व गृहमंत्री मुंबई राज्य), बी. एल. मित्तर (पूर्व अॅडव्होकेट जनरल

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

ब्रिटीश भारत), सय्यद मोहम्मद सादुल्ला खान (पुर्व मुख्यमंत्री, आसाम व मुस्लीम लिगने सभासद), डी. बी. खेतान (तत्कालीन प्रसिध्द वकील), बी. एल. मित्तर यांनी राजीनामा दिलानंतर माधवराव आणि डी. बी. खेतान यांच्या मृत्यूनंतर टी. टी. कृष्णम्माचारी यांची घटना समीतीवर नेमणूक झाली.

मसुदा समीतीचे कामकाज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका :

डॉ बाबासाहेबांना कायद्याचे, घटनेचे पुरेपूर ज्ञान होते. त्यानी इंग्लड, अमेरिका सो. रशिया, फ्रान्स, जर्मनी, आयर्लंड, कॉनडा अशा विविध देशांच्या कायद्यांचा राज्यघटनेचा अभ्यास केला. ३० ऑगस्ट १९४७ रोजी घटना निर्मातीच्या कार्याला सुरवात करुन २१ फेब्रुवारी १९४८ साली संविधानाचा मसुदा तयार केला. त्यात ३९५ कलमे ८ परिशिष्टे होती, २१ फेब्रुवारी पासून ८ महिने लोकांची मते जाणून घेण्यासाठी मसुदा रुपी घटना जनतेसाठी खुली करण्यात आली. यात ७६३५ दुरुस्त्या सुचविल्या त्यापैकी २४७३ दुसस्त्यावर विचार करण्यात आला शेवटी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाचा स्विकार करण्यात आला. यासाठी ६३.९६.७२९ रुपये खर्च झाला मसुदा समीतीचे कामकाज २ वर्षे ११ महिने १८ दिवस चालले घटना समीतीची एकूण ११ अधिनेशने झाली त्यामध्ये एकूण १६५ दिवस कामकाज चालले. २६ जानेवार १९५० या ऐतिहासिक दिनी भारत एक प्रजासत्ताक सार्वभौम देश बनला, भारताची मूळ राज्यघटना बंगालमधील शांतीनिकेतनच्या बिवोहार येथील राममनोहर सिन्हा आणि नंदलाल बोस व इतर कारागीरांनी सुवाच अक्षरात लिहून पूर्ण केली.

जगातील विविध देशांच्या संविधानाचा आढावा :

अमेरिकेची राज्यघटना ही केवळ सात कलमांची असून २५ ते १७८७ ते १७ सप्टेंबर १७८७ या चार महिन्याच्या कालावधीत हि घटना जेफरसन यांनी तयार केली. आस्ट्रेलियाची राज्यघटना हि १२८ कलमांची असून मार्च १८९२ ते ९ जुलै १९०० या नऊ वर्षांच्या काळात ही घटना लिहिली. कॅनडाच्या राज्यघटनेत १४७ कलमे असून १० ऑक्टोंबर१८६४ ते मार्च १८६७ मध्ये २ वर्ष ५ महिन्यात ही घटना पूर्ण झाली. अफ्रिकाची राज्यघटनेत १५३ कलमे असून सप्टेंबर १९०८ ते २० ऑक्टोबर १९०९ एक वर्षात राज्यघटना तयार झाली. स्विझर्लंडच्या राज्यघटनेत १२३ कलमे असून १८४८ साली या देशाची राज्यपना तयार झाली. चीनच्या राज्यघटनेत १०६ कामे असून सप्टेंबर १९५० सप्टेंबर ते या चार वर्षात चीनची राज्यघटना पूर्ण झाली. १९५४ पूर्ण झाली. अशा विविध देशाच्या राज्यघटनेच्या अभ्यासातून डॉ. बाबासाहेबांनी अत्यंत कमी कालावधीत २ वर्षे ११ महिने १८ दिवसात ३९५ कलमाचे सर्वात मोठे लिखीत संविधान तयार केले.

निष्कर्ष समारोप

भारतीय संविधान केवळ कायद्याचा कलमांना ग्रंथ नसून तो भारतातील सर्व जाती धर्माच्या नागरिकांना जीवणाचा मार्ग दाखवणारा पवित्र असा राष्ट्रीय ग्रंथ आहे. शोषणमुक्त, धर्मनिरपेक्ष लोकशाही शासन प्रणालीचा दिपस्तंभ आहे. भारतीय संविधान लिहून विषमतावादी, सनातनी, मनुवाद्याच्या पराभव आपल्या गौरवशाली लेखणीच्या बुध्दीमतेच्या जोरावर केला आहे. देशातील सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना स्वातंत्र, समता, बंधुता, न्याय, एकात्मता यांची हमी देणारी जगातील एक सर्वश्रेष्ठ राज्यघटना म्हाणून जगभर ओळखले जाते.

भारताच्या राजघटनेच्या मसुदा तयार करण्याची संधी डॉ. बाबासाहेबांना मिळाली यामुळे हाजारो वर्षापासून अंधार युगात, गुलामगीरीत जीवन जगणा-या समाजाचा सर्वांगीन विकासासाठी हे सविधान अत्यंत मोलाची भुमिका बजावत आहे. केवळ संविधानामुळेच शोषित, पिडित, त्रासलेल्या, वंचित समाजाला अंधारांकडून प्रकाशाकडे जाण्याचा नवा मार्ग मिळाला. प्रत्येक मानसाला आत्मविश्वासाने, स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगण्यासाठी देशात समतेचे, न्यायाने, मानवतेसाठी पोषक वातावरण निर्माण केले. कामालीची वैविधता असलेला भारत केवळ संविधानामुळे एकसंध असून सामाजिक समता हाच भारतीय संविधानाचा आधार स्तंभ आहे या देशातील भिकारी, मजूर आणि देशाचा राष्ट्रपती पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री प्रशासकीय अधिकारी या सर्वांना समान पातळीवर आणून एक व्यक्ती, एक मत, एक मुल्य ही समानतेची संकल्पना संविधानाच्या आधारे डॉ बाबासाहेब आबेडकरांनी देशात अमलांत आणली. वर्षांनुवर्षे कोणताही अपराध नसतांना केवळ अस्पृश्य म्हणून गावकुसाच्या बाहेर पशुवत दुर्लक्षीत जीवन जगणारा, अन्याय अत्याचार आणि शोषणाने उध्वस्त झालेल्या बंचित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानप्रकाशात आणले. संविधानामुळे त्यांना न्यायाने, सन्मानाने जिवन जगता येत आहे. एकेकाळी गावची म्हारकी, पाडीवारकी, येस्कर गावकी, तराळकी, गाव राखन करणारा अस्पृश्य माणूस आज अनेक मान सन्मानाची पडे भूषवित आहे. उकिरड्यावर फेकलेल्या ऊस्टया अन्नातून आपली भूकेची आग भागविणारा , पाण्यावाचून तडफडणारा, माणूस आज ऐश्वर्य संपन्न जगतो तो केवळ डॉ. बाबासाहेबांच्या संविधानामुळे... अन्याय अत्याचारात उध्वस्त झालेला, ण्यासाठी भिक मागणारा बहुजन माणूस आज सर्वोच्य न्यायाधीश म्हणून सर्वांना न्याय देत आहे. तो. डॉ. बाबासाहेबांच्या संविधानामुळे.. ष्शुप्रमाने जीवन जगणारासामान्य माणूस मतदानाच्या माध्यमातून लोकशाही देशाचा राजा (राष्ट्रपती(बनतो तो केवळ संविधानामुळेच, एवढेच नव्हे तर चहावाला सुद्धा पंतप्रधान बनतो तो केवळ डॉ. बाबासाहेबांच्या संविधानामुळेच.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

असे आपले तरी आज देशात अनेक समस्या भेडसावत आहेत सविधानाने माणूस आज सुखी, समाधानी आनंदी बनला का ? याचे उत्तर काही प्रमाणात होय असले तरी ही आज जात व पैसा यावर माणसांची श्रीमंती ठरवून त्यांची राजकारणात दिवसेंदिवस झुंडशाही वाढत आहे. जात, धर्म, पैसा याचा मोठ्या प्रमाणात वापर करुण ठराविक वर्ग, घराणेशाहीनी सत्ता हस्तगत करून राजकीय व सामाजिक नितीमत्तेला काळीमा फासत आहेत. ज्या सविंधानाने महिलाना मानसन्मान दिला तरी आज खैरलांजी ते कोपर्डी सारख्या माणूसकीला काळीमा फासणा-या घटना आज वाढत आहेत. देशाचे भावी आधारस्तंभ असणारा तरूण वर्ग बेरोजगारांच्या समस्यांनी त्रस्त असून आर्थिक स्थिरतेसाठी नक्षलवाद, अनैतिकता अराजकता अशा अमानवी प्रवृतीकडे चालला आहे. या सर्व समस्याची उत्तरे भारतीय संविधानात असून ही प्रस्थापित राजकारणी सुस्तावले आहेत सत्तेतून भष्टाचार आणि भ्रष्टारातून सत्ता मिळवण्यातच व्यस्त आहेत यामुळेच असंख्य समस्याना आज तोंड दयावे लागत आहे. यावर उपाय म्हणजे राज्यकर्त्यानी राजकीय नितीमता जोपासून आपले सर्वस्व पणाला लावून संवैधांनीक तत्वाची योग्य जोपासणा करून काटेकोरपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे कारण संविधान हे मानवी जीवन मुल्यांचा पुरस्कार करणारा महान दस्तऐवज आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीत संविधाने मोलाची भूमीका बजावत आहे महणून डॉ. आबेडकराना केवळ संविधानांचेच नव्हे तर आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून वैश्वीक स्तरावर संबोधले जाते.

संदर्भ सूची :

१. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. शासन व संविधान. मुंबई: सरकार प्रकाशन, १९४९.

२. केशवराव जगताप. भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन, २०१०.

३. वसंतराव सप्रे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान. नागपूर: विदर्भ प्रकाशन, २००५.

४. शंकरराव खरात. आंबेडकर आणि सामाजिक क्रांती. मुंबई: लोकप्रिय प्रकाशन, १९९५.

५. ग्रंथालय विभाग, भारत सरकार. Constituent Assembly Debates (Vol. 7–12). नवी दिल्ली: भारत सरकार प्रकाशन, १९५०

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

हंसा मेहता यांचे भारतीय संविधान निर्मितीतील कार्य : एक अभ्यास

सुशांत शंकर कदम
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Manuscript ID:
JRD -2025-170954
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 258-262
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

या संशोधनात हंसा जीवराज मेहता यांच्या भारतीय संविधान निर्मितीतील बहुआयामी योगदानाचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. त्या भारतीय संविधान सभेतील १५ महिला सदस्यांपैकी एक असून त्यांनी स्त्री-समानता, समान नागरी संहिता आणि मूलभूत हक्कांसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी संविधानातील लैंगिक-तटस्थ भाषेचा आग्रह धरला आणि समाजातील असमानतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित नसून, संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयोगात त्यांनी "All men are born free..." ऐवजी "All human beings are born free..." असा बदल करून आंतरराष्ट्रीय स्तरावरही लिंग-समानतेचे तत्त्व स्थापित केले. शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे त्या भारतातील प्रगत विचारांच्या प्रतीक ठरल्या. हंसा मेहता यांचे कार्य भारतीय संविधानातील समानता, मानवाधिकार आणि स्त्री-सशक्तीकरणाच्या मूल्यांचे प्रतीक मानले जाते.

मुख्यशब्द: *हंसा मेहता, भारतीय संविधान, महिला अधिकार, समान नागरी संहिता, मानवाधिकार, स्त्री-समानता, संयुक्त राष्ट्र, शिक्षण सुधारणा, सामाजिक परिवर्तन, संविधान सभा.*

प्रस्तावना :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक अग्रणी व्यक्तिमत्व आणि भारतीय संविधान सभेच्या १५ महिला सदस्यांपैकी एक असलेल्या हंसा जीवराज मेहता यांचे योगदान बहुआयामी आणि महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा जीवनप्रवास केवळ एक स्वातंत्र्य सेनानी आणि समाजसुधारक म्हणून मर्यादित नव्हता, तर भारतीय संविधानाचा पाया रचणाऱ्या एक दूरदृष्टीच्या विचारवंत आणि प्रतिनिधी, भारतातील एक सुधारणावादी, सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षिका, स्वातंत्र्य कार्यकर्त्या, स्त्रीवादी आणि लेखिका म्हणूनही तो महत्त्वाचा होता. हंसा मेहता यांच्या घटना समितीतील कार्याचे, त्यांनी मांडलेल्या मूल्यांचे आणि भारतीय संविधानाच्या निर्मितीवरील त्यांच्या चिरस्थायी प्रभावाचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या भूमिकेचे ऐतिहासिक आणि वैचारिक महत्त्व पुढीलप्रमाणे अधोरेखित करण्यात आले आहे

पार्श्वभूमी आणि वैचारिक पाया :

हंसा मेहता यांचा जन्म ३ जुलै १८९७ रोजी सुरत , आताच्या गुजरात येथे एका नागर ब्राह्मण कुटुंबात झाला . मेहता यांनी मुलींच्या हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले होते, त्यावेळी त्यांच्या अंदाजा नुसार, फक्त २ टक्के भारतीय महिला साक्षर होत्या. १९१८ मध्ये त्यांनी तत्वज्ञानाची पदवी घेतली . त्यांनी इंग्लंडमध्ये पत्रकारिता आणि समाजशास्त्रा चा अभ्यास केला .

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सुशांत शंकर कदम, संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
कदम, . सुशांत . शंकर . (2025). हंसा मेहता यांचे भारतीय संविधान निर्मितीतील कार्य: एक अभ्यास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 258–262.
https://doi.org/10.5281/zenodo.17732424

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732424
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

१९१८ मध्ये, इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असताना त्यांची सरोजिनी नायडू यांच्याशी भेट झाली नायडू एक मार्गदर्शक म्हणून काम करतील आणि त्यांना १९२० च्या जिनिव्हा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला मताधिकार आघाडी परिषदेत घेऊन जातील . १९२२ मध्ये महात्मा गांधी भारतात तुरुंगात असताना त्यांची भेट झाली . १९२३ मध्ये, मेहता उच्चशिक्षणासाठी असलेल्या संस्थांना भेट देण्यासाठी अमेरिकेत आल्या जिथे त्यांना अमेरिकेतील महिला शिक्षणाबद्दल माहिती मिळाली. १९३० मध्ये, जेव्हा त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत महिलांना सामील होण्याचे आवाहन केले तेव्हा त्यांची गांधींना पुन्हा भेट झाली .त्यांनी तत्त्वज्ञानात पदवी प्राप्त केल्यानंतर इंग्लंडमध्ये पत्रकारिता आणि समाजशास्त्राचा अभ्यास केला. त्यांच्या विचारांवर महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा खोलवर प्रभाव पडला, ज्यामुळे त्यांच्या जीवनात मोठे बदल झाले. त्यांनी गांधीजींच्या सल्ल्यानुसार स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला, ज्यात विदेशी कपड्यांवर बहिष्कार टाकणे आणि दारूच्या दुकानांवर निदर्शने (पिकेटिंग) आयोजित करणे यांचा समावेश होता. त्यांच्याया सक्रियतेमुळे त्यांना १९३२ आणि १९४० मध्ये तुरुंगवासही झाला. हंसा मेहता यांच्या वैचारिक पायावर त्यांचे वैयक्तिक जीवन आणि त्यातील संघर्ष यांचा मोठा प्रभाव दिसून येतो. त्यांचा विवाह जीवराज नारायण मेहता यांच्याशी झाला होता, जे एक प्रख्यात डॉक्टर आणि प्रशासक होते आणि गुजरातचे पहिले मुख्यमंत्री होते आणि अखेर युनायटेड किंग्डममध्ये भारतीय उच्चायुक्त होते. हंसा मेहता यांचा संघर्ष केवळ एक वैयक्तिक नव्हता, तर त्या काळातील सामाजिक नियमांना आव्हान देणारी एक क्रांतिकारक कृती होती. या अनुभवामुळे त्यांना समाजातील असमानता आणि कुप्रथांचा थेट अनुभव आला. परिणामी, संविधान सभेत मूलभूत अधिकार आणि सामाजिक सुधारणांसाठी त्यांची वकिली केवळ सैद्धांतिक नव्हती, तर ती त्यांच्या वैयक्तिक अनुभवांवर आधारित होती. त्यांच्या या भूमिकेला त्यांच्या आयुष्यातील संघर्षांमुळे अधिक बळ आणि दृढता मिळाली, ज्यामुळे भारतीय संविधान निर्मितीतील त्यांचा सहभाग केवळ औपचारिकता नसून, वैयक्तिक कटु अनुभवांवर आधारित एक दृढ संकल्प बनला.

घटना समितीतील भूमिका आणि सहभाग :

भारतीय संविधान निर्मितीमध्ये १५ महिलांनी सक्रिय सहभाग घेतला होता आणि हंसा मेहता या संविधान सभेच्या सर्वात प्रमुख सदस्यांपैकी एक होत्या, ज्यांचे वर्णन 'भारतीय प्रजासत्ताकाच्या संस्थापक जननीं असे केले जाते. संविधान सभेवर निवडून आल्यावर त्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या (AIWC) अध्यक्षा होत्या. डिसेंबर १९४५ मध्ये AIWC अध्यक्षा म्हणून, त्यांनी किट्टी शिवाराव, रेणुका रे, कमलादेवी चट्टोपाध्याय आणि हन्ना सेन यांनी एकत्रितपणे तयार केलेल्या भारतीय महिला हक्क आणि कर्तव्यांच्या सनदेचा मसुदा तयार करण्यास सुरुवात केली आणि त्याचे अध्यक्षपद भूषवले. ऑगस्ट १९४६ मध्ये जेव्हा त्या आंतरराष्ट्रीय महिला आघाडीच्या उपाध्यक्ष म्हणून निवडून आल्या तेव्हा त्यांनी इंटरलेकन काँग्रेसमध्ये सनदेचे सादरीकरण केले होते. त्यांनी कॅबिनेट मिशन आणि महिलांच्या स्थितीवरील संयुक्त राष्ट्रांच्या उप-आयोगासह इतर अनेक संस्थांनाही सनदेचे सादरीकरण केले होते. संविधान सभेच्या निवडणुकीसाठी स्त्रीवादी मोहिमेच्या नेत्यांना हंसा मेहता निवडून यावी अशी इच्छा होती कारण संविधान भविष्यातील मूलभूत हक्कांची रचना करेल. अखेर, ती राजकुमारी अमृत कौर यांच्यासह भारतीय संविधान सभेच्या मूलभूत हक्क उपसमितीवर निवडून आली आणि त्यांच्या चर्चेदरम्यान त्यांनी काही महत्त्वाचे हस्तक्षेप केले. हंसा मेहता आणि राजकुमारी अमृत कौर यांनी लिहिलेल्या असहमतीच्या नोंदींमध्ये सक्तीच्या लष्करी सेवेवरील त्यांचा आक्षेप, धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य आणि देशाच्या शासनासाठी राज्य धोरणात मूलभूत बनवण्याची मागणी यांचा समावेश आहे. या नोंदी संविधान सभेच्या प्रभावी प्रवचनांद्वारे मर्मा 3/8 पर केलेला दृढ नकार' या अभिव्यक्ती म्हणून मानल्या जातात. हंसा मेहता यांनी संविधान सभेच्या विधिमंडळाच्या अधिवेशनात हिंदू कोड बिलावरील चर्चेत भाग घेतला. प्रस्तावित विधेयकातील दत्तक घेण्याच्या तरतुदींवर टीका करताना त्यांनी संविधान सभेला आठवण करून दिली की "आपण एक धर्मनिरपेक्ष राज्य आहोत. आपल्याला एक धर्मनिरपेक्ष राज्य राहायचे आहे. हिंदू कायद्यात दत्तक घेणे हे धार्मिक हेतूंसाठी आहे. धर्मनिरपेक्ष राज्याचा धार्मिक प्रथेशी काही संबंध का असावा?" स्वातंत्र्यानंतर लगेचच, त्यांची मुंबई विधानपरिषदेवर निवड झाली. संविधान सभेत त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. त्या सल्लागार समिती (Advisory Committee) आणि मूलभूत हक्कांच्या उपसमिती (Sub-Committee on Fundamental Rights) च्या सदस्य होत्या. या समित्यांनी भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांवर काम केले, ज्यामुळे हंसा मेहता यांना त्यांच्या कायदेशीर आणि वैचारिक योगदानाचा पाया रचण्याची संधी मिळाली. घटना समितीतील त्यांच्या भूमिकेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी महिलांसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण किंवा सांप्रदायिक विभक्त मतदारसंघांना पाठिंबा दिला नाही. हा दृष्टिकोन तत्कालीन महिला नेत्यांच्या दूरदृष्टीचा आणि सर्वसमावेशक विचारसरणीचा पुरावा आहे. त्यांचा हा विरोध दोन प्रमुख तत्त्वांवर आधारित होताः पहिले, समतेचे तत्त्व. त्यांचे स्पष्ट मत होते की महिलांना पुरुषांपेक्षा वेगळे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

किंवा कमी मानले जाऊ नये. आरक्षणामुळे त्यांना 'विशेष गट' म्हणून ओळख मिळेल, ज्यामुळे समानतेच्या मूलभूत तत्त्वाचाच भंग होईल. दुसरे, राष्ट्रीय एकात्मता. विभक्त मतदारसंघांमुळे समाजात विभाजन होईल, असे त्यांचे मत होते, जे गांधीजींच्या विचारधारेनुसार योग्य नव्हते. हा विचार तात्कालिक राजकीय लाभापेक्षा सार्वत्रिक समतेला अधिक महत्त्व देणारा होता आणि त्यांच्या नेतृत्वाची खोली दर्शवतो.

मूलभूत अधिकार आणि लैंगिक समानतेची वकिली :

हंसा मेहता यांनी भारतीय संविधानात लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांचे प्रतिबिंब दोन प्रमुख मागण्यांमध्ये दिसून येतेः समान नागरी संहिता आणि समान मालमत्ता हक्क. १९४५ मध्ये, त्यांनी महिलांशी संबंधित एक चार्टर तयार केला, ज्यात समान नागरी संहितेची (Uniform Civil Code) जोरदार शिफारस करण्यात आली. त्यांचे मत होते की राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी संहिता आवश्यक आहे, ज्यामुळे धर्मावर आधारित वैयक्तिक कायद्यांतील असमानता संपुष्टात येईल. त्याचप्रमाणे, हिंदू कोड बिलावरील चर्चेदरम्यान, त्यांनी मुलगा आणि मुलगी या दोघांनाही पित्याच्या संपत्तीत समान हक्क असावा, असा आग्रह धरला. या दोन्ही मागण्यांचे मूळ त्यांचे लिंग-समानतेचे तत्त्वज्ञान आहे. समान नागरी संहिता सर्व नागरिकांसाठी समान वैयक्तिक कायदे आणण्याचा प्रस्ताव देते, तर मालमत्ता हक्कांची वकिली कौटुंबिक कायद्यातील लैंगिक असमानता दूर करण्याच्या दिशेने एक पाऊल होते. या दोन्ही मागण्या एकत्र पाहिल्यास हे स्पष्ट होते की त्यांचा उद्देश केवळ तात्पुरत्या सुधारणा करणे नसून, भारतातील कायद्याची मूलभूत रचना लिंग-तटस्थ बनवणे हा होता, ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला कोणत्याही भेदभावाशिवाय समान न्याय मिळेल.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानवाधिकारांचे योगदान :

हंसा मेहता यांचे योगदान केवळ राष्ट्रीय स्तरावर मर्यादित नव्हते, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांनी मानवाधिकारांच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्या संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगात अमेरिकेच्या एलिनॉर रूझवेल्ट यांच्या व्यतिरिक्त एकमेव महिला प्रतिनिधी होत्या. त्यांचे सर्वात महत्त्वाचे योगदान मानवाधिकारांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्यात (Universal Declaration of Human Rights - UDHR) दिसून येते. या जाहीरनाम्याच्या कलम १ मध्ये मूळतः "All men are born free and equal..." (सर्व पुरुष स्वतंत्र आणि समान जन्माला येतात...) असे वाक्य होते. हंसा मेहता यांनी या वाक्यांशात "men" ऐवजी "human beings" असा बदल करण्याची मागणी केली. त्यांच्या या महत्त्वपूर्ण वकिलीमुळे मानवाधिकार जाहीरनाम्याची भाषा अधिक सर्वसमावेशक बनली आणि मानवाधिकार फक्त पुरुषांपुरते मर्यादित नसून, संपूर्ण मानवजातीसाठी आहेत, हे तत्त्व प्रस्थापित झाले. त्यांचे हे कार्य भारतीय संविधान निर्मितीतील त्यांच्या भूमिकेशी थेट जोडलेले आहे. भारतीय संविधानात लैंगिक-तटस्थ भाषा समाविष्ट करण्यावर त्यांनी जो भर दिला, त्याचेच प्रतिबिंब जागतिक स्तरावर दिसून आले. त्यांचे हे योगदान भारतीय संविधानातील समानता आणि मानवाधिकाराच्या तरतुदींना आंतरराष्ट्रीय नैतिक पाया देण्याचे काम करते. संयुक्त राष्ट्राचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी डिसेंबर २०१८ मध्ये त्यांच्या योगदानाची प्रशंसा करताना म्हटले होते की, हंसा मेहता यांच्या योगदानाशिवाय आपण केवळ 'पुरुषांच्या अधिकारांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्या'बद्दल बोलत असतो, 'मानवाधिकारांबद्दल' नाही. त्यांच्या योगदानामुळेच त्यांना 'फर्स्ट लेडी ऑफ द वर्ल्ड' असेही संबोधले जाते. हंसा मेहता १९५० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयोगाच्या उपाध्यक्ष झाल्या. त्या युनेस्कोच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या देखील होत्या. संयुक्त राष्ट्र संघ त्यांच्या नावाने डॉ. हंसा मेहता संवाद या चर्चा मालिकेचे आयोजन करते. पहिला भाग २०२१ मध्ये झाला आणि तो कोविड-१९ साथीच्या आजारानंतर महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर केंद्रित होता. या मालिकेचा उद्देश जागतिक जागरूकता वाढवणे आणि लिंग समानता, महिला आणि मानवी हक्कांबद्दल संभाषण करणे आहे.

सामाजिक व शैक्षणिक सुधारणा :

हंसा मेहता यांचा सामाजिक सुधारणेचा आणि शैक्षणिक सुधारणेचा दृष्टिकोन अत्यंत व्यापक होता. त्यांनी केवळ कायदेशीर हक्कांसाठीच नाही, तर समाजातील कुप्रथांच्या निर्मूलनासाठीही कायदेशीर हस्तक्षेपाची गरज मांडली. त्यांनी देवदासी प्रथा, बालविवाह आणि बुरखा पद्धत यांसारख्या सामाजिक वाईट गोष्टींवर बंदी घालण्यासाठी संविधानात तरतुदी समाविष्ट करण्यावर भर दिला. त्यांनी हे ओळखले की केवळ कायदेशीर हक्क पुरेसे नाहीत, तर सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती ही देखील समानतेसाठी आवश्यक आहे. या दूरदृष्टीचाच एक भाग म्हणून त्यांनी मुला-मुलींसाठी १४ वर्षांपर्यंत मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची शिफारस केली, ज्याला 'हंसा मेहता समितीच्या सूचना' म्हणून ओळखले जाते. त्यांचा हा समग्र दृष्टीकोन दर्शवतो की त्या केवळ एक घटनात्मक मसुदा तयार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

करणारा नसून, एक व्यापक सामाजिक सुधारक म्हणून काम करत होत्या, ज्यांनी कायद्याचा उपयोग सामाजिक बदलाचे साधन म्हणून केला. त्यांचे हे योगदान समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे होते. १९४६ ते १९४८ पर्यंत, हंसा मेहता यांनी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कार्य केले आणि १९४९ ते १९५८ पर्यंत बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम केले. त्यामुळे त्या भारतीय सह-शैक्षणिक विद्यापीठात या भूमिकेत काम करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. बडोद्यातील एमएस विद्यापीठाच्या फॅकल्टी सदस्य असताना त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतलेल्या अनेक लाभार्थ्यांपैकी प्रख्यात भारतीय समाजशास्त्रज्ञ एमएन श्रीनिवास हे एक होते. हंसा मेहता "एक असामान्य व्यक्ती" होती ज्यांना "बडोदा विद्यापीठ हे उत्कृष्टतेचे केंद्र असावे आणि इतर भारतीय विद्यापीठांपेक्षा वेगळे असावे अशी इच्छा होती.

साहित्यातील योगदान :

हंसा मेहता या शास्त्रीय भारतीय साहित्याच्या समर्पित वाचिका होत्या. एमएस युनिव्हर्सिटी बडोदाच्या कुलगुरू म्हणून, हंसा मेहता यांनी भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे यांनी संपादित केलेल्या महाभारताच्या समीक्षात्मक आवृत्तीच्या धर्तीवर रामायणाच्या समीक्षात्मक आवृत्तीच्या तयारी आणि प्रकाशनातही रस घेतला होता. १९५१ मध्ये त्यांनी विद्यापीठाच्या ओरिएंटल इन्स्टिट्यूटमध्ये रामायण विभागाच्या उद्घाटनाचे अध्यक्षपद भूषवले. १९५४ मध्ये, त्यांनी संस्थेत रामायणासाठी संकलन विभागाचे उद्घाटन केले. त्यानंतर, १९६१ मध्ये जेव्हा वाल्मिकी रामायणाच्या समीक्षात्मक आवृत्तीची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली तेव्हा ती त्यांना समर्पित करण्यात आली. रामायणाव्यतिरिक्त, त्यांनी एमएस युनिव्हर्सिटी बडोदाला शास्त्रीय भारतातील इतर स्मारकीय कामे प्रकाशित करण्यासाठी प्रकल्प हाती घेण्याची खात्री केली. मेहता यांनी गुजराथी भाषेत अनेक बालपुस्तके लिहिली, ज्यात अरुणू अदभूत स्वप्न (1934), बबलना पराक्रमो (1929), बालवर्तावली भाग 1-2 (1926, 1929) यांचा समावेश आहे. त्यांनी वाल्मिकी रामायणातील काही पुस्तकांचा अनुवाद केला: अरण्यकांड, बालकांड आणि सुंदरकांड त्यांनी गुलिव्हर ट्रॅव्हल्ससह अनेक इंग्रजी कथांचे भाषांतर केले. त्यांनी शेक्सपियरच्या काही नाटकांचे रुपांतरही केले होते. त्याचे निबंध संग्रहित करून केतलक लेख (1978) या नावाने प्रकाशित झाले.

हंसा मेहताः संविधान निर्मितीतील एक प्रतीक :

१५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, हंसा मेहता यांनी भारतीय महिलांच्या वतीने डॉ. राजेंद्र प्रसाद यांना राष्ट्रध्वज सुपूर्द केला. हा क्षण केवळ एक औपचारिक हस्तांतरण नव्हता, तर भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात महिलांनी दिलेल्या योगदानाचा आणि नव्या भारताच्या निर्मितीत त्यांच्या सक्रिय सहभागाचा तो एक शक्तिशाली आणि प्रतीकात्मक क्षण होता. हे एकप्रकारे संविधान सभेत महिलांना मिळालेल्या प्रतिनिधित्व आणि आदराचे प्रतीक होते. हंसा मेहता यांचा वारसा केवळ कायद्याच्या पानांपुरता मर्यादित नाही, तर तो लैंगिक समानता, मानवाधिकार आणि सामाजिक सुधारणेच्या मूल्यांमध्ये समाविष्ट आहे. त्यांचा लढा हा केवळ संविधान सभेतील एक अध्याय नसून, आजच्या काळातही सामाजिक चळवळींसाठी एक प्रेरणास्रोत आहे. त्यांचा दृष्टीकोन कायद्याच्या चौकटीपलीकडचा होता, ज्यामुळे त्यांचा वारसा आजही अनेक क्षेत्रांमध्ये मार्गदर्शक ठरत आहे.

निष्कर्ष :

हंसा मेहता यांचे भारतीय संविधान निर्मितीतील योगदान बहुआयामी आणि महत्त्वपूर्ण होते. मूलभूत हक्क उपसमितीच्या सदस्य म्हणून, त्यांनी लैंगिक-तटस्थ भाषेचा आग्रह धरला आणि समान नागरी संहिता तसेच समान मालमत्ता हक्कांची वकिली केली. त्यांचे काम केवळ कायद्याच्या निर्मितीपुरते मर्यादित नव्हते, तर सामाजिक कुप्रथा दूर करण्याच्या आणि शिक्षणाच्या प्रसाराच्या त्यांच्या प्रयत्नांनी त्याला एक व्यापक रूप दिले. आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवाधिकार जाहीरनाम्यात त्यांनी केलेली सुधारणा त्यांच्या जागतिक दृष्टीकोनाचा पुरावा आहे. त्यांच्या योगदानाने केवळ महिलांचा संविधान निर्मितीतील सहभाग दर्शवला नाही, तर एक मजबूत, सर्वसमावेशक आणि न्याय्य राष्ट्र निर्माण करण्याच्या त्यांच्या दूरदृष्टीचाही तो पुरावा आहे. त्यांचे कार्य आजही अनेक क्षेत्रांमध्ये मार्गदर्शक ठरत आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. त्रिवेदी , श्रद्धा (२००२).गुजराती विश्वकोश (गुजराती विश्वकोश). खंड १५. अहमदाबाद:गुजराती विश्वकोश ट्रस्ट.पृष्ठ ५४०.
२. वोल्पर्ट, स्टॅनली (५ एप्रि ल २००१). गांधीजींची आवड: महात्मा गांधींचे जीवन आणि वारसा . ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. पृष्ठ १४९.
३. श्री वास्तव, गौरी (२००६). महिला आदर्श: समकालीन भारतातील काही प्रख्यात महिला. संकल्पना प्रकाशन कंपनी . पृष्ठे १४–१६.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

४. अदामी , रेबेका (२०१९). महिला आणि मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा . न्यूयॉर्क
आणि लंडन: रूटलेज. पृष्ठे ६३–७३ .
५. 12. जैन, देवकी (२००५). महिला, विकास आणि संयुक्त राष्ट्रसंघ, ब्लूमिंग्टनः इंडियाना युनिव्हर्सिटी प्रेस. पृष्ठ २०.
६. चौधरी, रघुवीर, दलाल, अनिला, एड्स. (2005). "लेखिका परिचय" [स्त्री लेखकांचा परिचय]. वीसभी भेनाऽन गुराती नारीले५ [20 सेंच्युरी वुमेन्स रायटिंग्ज इन गुजराती) (गुजरातीमध्ये) (पहिली आवृत्ती). नवी दिल्ली: साहित्य अकादमी. पृ ३५0.
७. रविचंद्रन, प्रियदर्शिनी (१३ मार्च २०१६), "आपल्या संविधानाचा मसुदा तयार करण्यात मदत करणाऱ्या महिला, ६ नोव्हेंबर २०१७ रोजी पुनर्प्राप्त.
८. वत्सल, राधा (३१ मे २०२४). "आता दुर्लक्षित राहिले नाही: हंसा मेहता, ज्यांनी भारतात आणि त्यापलीकडे महिला समानतेसाठी लढा दिला" द न्यू यॉर्क टाइम्स. आयएसएसएन ०३६२-४३३१, १० जुलै २०२४ रोजी पुनर्प्राप्त.
९. धनोआ, बेलिंदर (1997). बडोद्यातील समकालीन कला, तुलिका. पृ २६७.
१०. एमएन श्रीनिवास, इंडियन सोसायटी थ्रू पर्सनल रायटिंग्ज, दिल्लीः ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९९८, पृष्ठ २६.
११. अच्युत चेतन, भारतीय प्रजासत्ताकाच्या संस्थापक माताः संविधानाच्या चौकटीचे लिंग राजकारण, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, २०२३, पृष्ठ ९१.
१२. “हंसा जीवराज मेहता", प्रफुल्ल ठक्कर यांची भारतीय स्वाक्षरींची थीमॅटिक गॅलरी १९ जून २०१६ रोजी पुनर्प्राप्त.
१३. अच्युत चेतन, उपरोक्त पृष्ठ १२९.
१४. अच्युत चेतन, उपरोक्त पृष्ठ १२४, १४५.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील समता आणि संविधानातील समानता : एक अभ्यास

सोनाली संभाजी पाटील
एम,ए,.नेट,.जे,आर,एफ.
(सहा. प्राध्यापक मराठी विभाग)
स. ब खाडे महाविद्यालय, कोपार्डे.

Manuscript ID:
JRD -2025-170955
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 263-268
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश:

या शोध निबंधात संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील समतेच्या तत्त्वांचा आणि भारतीय संविधानातील समानतेच्या हक्काचा सखोल तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. सतराव्या शतकातील तुकोबांनी जातीभेद, दांभिकता, कर्मकांड आणि सामाजिक विषमता यांवर प्रहार करून मानवतावाद, सामाजिक समता व बंधुत्व यांचा पुरस्कार केला. त्यांचे "भेदाभेद अमंगळ" हे तत्त्व संविधानातील कलम १५, १६ व १७ मध्ये दिसून येते. तुकोबांच्या विचारांचा प्रभाव पुढे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधाननिर्मितीमध्ये प्रकर्षाने जाणवतो. या वैचारिक प्रवासातून तुकोबांची अध्यात्मिक क्रांती संविधानिक क्रांतीत परिवर्तित झाली. तुकोबांचा संदेश आजही संविधान समता दिंडीसारख्या उपक्रमांद्वारे जिवंत आहे, जो सामाजिक सौहार्द, समता आणि मानवतेच्या आदर्शांचा प्रसार करतो.

मुख्यशब्द: संत तुकाराम महाराज, अभंग, समता, समानता, संविधान, सामाजिक न्याय, मानवतावाद, भेदाभेद अमंगळ, अस्पृश्यता निर्मूलन, भारतीय लोकशाही, वारकरी संप्रदाय, फुले-आंबेडकर विचारधारा.

प्रस्तावना :

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. कारण भारतातील इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्राला फार मोठी संत परंपरा लाभलेली आहे. संतांची वाङ्मयीन संपत्तीही मोठी आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' या उक्तीप्रमाणेच संतांचे कार्य हे जगाचे हीत व्हावे या उद्देशानेच सुरू झालेले असते. याला अनुसरूनच संत तुकाराम महाराजांनीही अभंगगाथेच्या माध्यमातून जगाला कल्याणाचा मार्ग दाखविला आहे. आडरानांनी भरलेल्या जगाला स्वच्छ मार्गदर्शन करण्यासाठीच ते जन्माला आले होते. संत तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेमधून अनन्य अशी विठ्ठलभक्ती व या विठ्ठलभक्तीच्या जोरावरच ते हा संसाररूपी भवसागर सहजपणे तरुण गेले आहेत. पण हा संसाररुपी भवसागर प्रत्येक संसारी माणसाला तरुण जाणे कसे सोपे आहे याचे सूत्रच त्यांनी अभंगगाथेच्या माध्यमातून सांगितले आहे भारतीय संविधानातील समानतेचा हक्क हा केवळ एक कायदेशीर अधिकार नाही, तर तो शतकानुशतके चाललेल्या सामाजिक आणि वैचारिक मंथनाचा परिपाक आहे. या मंथनामध्ये, सतराव्या शतकातील महान संत तुकाराम महाराज यांचे योगदान अनमोल आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सोनाली संभाजी पाटील, एम, ए,.नेट,.जे,आर,एफ.(सहा. प्राध्यापक मराठी विभाग) स. ब खाडे महाविद्यालय, कोपार्डे.

How to cite this article:
पाटील, . सोनाली . संभाजी . (2025). संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील समता आणि संविधानातील समानता: एक अभ्यास. Journal of Research & Development, 17(9(IV)), 263–268. https://doi.org/10.5281/zenodo.17732548

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732548
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

तुकाराम महाराज आणि भारतीय संविधान यांच्या निर्मितीमध्ये जरी शेकडो वर्षांचे अंतर असले, तरी त्यांच्या विचारांतील समानता आणि दार्शनिक तत्त्वे एक सलग वैचारिक परंपरा दर्शवतात. या शोध निबंधचा मुख्य उद्देश संत तुकाराम महाराजांच्या सामाजिक-दार्शनिक योगदानाचा आणि त्यांच्या कार्याचा थेट संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेवर काय परिणाम झाला, याचा सखोल अभ्यास करणे आहे. संत तुकाराम महाराजांनी ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, ती वैचारिक भूमी नंतरच्या काळात महात्मा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या समाजसुधारकांसाठी प्रेरणास्थान ठरली. यामध्ये संत तुकारामांच्या अभंगवाणीतील समानतेचे तत्त्वज्ञान, भारतीय संविधानातील संबंधित कलमांचे स्वरूप, आणि या दोन्हीमधील वैचारिक दुवा हे विश्लेषण तुकोबांनी सुरू केलेल्या सामाजिक बदलाच्या प्रक्रियेचा आणि तिचा कळस संविधानाच्या रुपात कसा साधला गेला, याचा मागोवा घेण्यात आला आहे.

संत तुकाराम महाराजांचे सामाजिक-दार्शनिक कार्य:

सतराव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत अस्थिर होता. परधर्मीय आक्रमणे, दुष्काळ आणि रोगराई यांनी सामान्य माणसाचे जीवन विस्कळीत झाले होते. या बाह्य संकटांबरोबरच, तत्कालीन समाजात अंतर्गत अराजकताही पसरली होती. बाराव्या शतकापासूनच जात, वंश, लिंग आणि वर्ण यांसारख्या समस्यांनी समाजव्यवस्थेत खोलवर विषमता निर्माण केली होती. धर्माचे कार्यक्षेत्र केवळ यज्ञयाग, कर्मकांडे, व्रतवैकल्ये आणि दान-दक्षिणा यांसारख्या बाह्य आचरणांपुरते मर्यादित राहिले होते, ज्यामुळे धर्माला एक प्रकारची मरगळ आली होती. तत्कालीन धर्मसंस्थेत समाजाला प्रेरणा देण्याचे किंवा मार्गदर्शन करण्याचे बळ उरले नव्हते. या परिस्थितीला केवळ धार्मिक निष्क्रियताच नव्हे, तर धार्मिक वर्चस्ववादी प्रवृत्तीही तितकीच जबाबदार होती. पुरोहित वर्गाने धर्मशास्त्र, कर्मवाद आणि जन्मसिद्ध जातीप्रथेचा आधार घेऊन आपले धार्मिक आणि आर्थिक वर्चस्व प्रस्थापित केले होते. या व्यवस्थेमुळे व्यक्तीच्या विकासाला कोणताही वाव मिळत नव्हता. या सर्व सामाजिक आणि धार्मिक अडथळ्यांमुळे समाजातील बहुजन वर्ग ज्ञानापासून आणि आत्मिक उन्नतीपासून वंचित राहिला होता. अशा परिस्थितीत, संत तुकाराम महाराज आणि इतर संतांनी दिलेले समतेचे विचार केवळ तात्कालिक उपदेश नव्हते, तर ते तत्कालीन सामाजिक-धार्मिक व्यवस्थेविरुद्धचे एक मूलभूत बंड होते. त्यांनी बहुजन समाजाच्या बौद्धिक कुचंबणेची कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. समाजामध्ये शांतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी विठ्ठलभक्तीच योग्य होती. त्यासाठी संत तुकाराम महाराजांनी सामाजिक समतेचा आणि बंधुत्वाचा पुरस्कार केला. म्हणूनच रामकृष्ण लहवितकर महाराज म्हणतात, "अशा काळात जन्मलेल्या आणि अशा परंपरेत आयुष्य कंठलेला श्री तुकोबारायांनी बाह्यरूपापेक्षा, अंतःकरणशुद्ध करण्याचा उपदेश समाजाला केला आणि ते आपल्या काळातील सर्वाधिक आदरणीय विभुती बनले." १

संत तुकोबांचा विद्रोही दृष्टिकोन:

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणी आणि कीर्तनातून तत्कालीन समाजातील रूढी, कर्मकांड आणि विषमतेवर कठोर प्रहार केला. त्यांचे विचार केवळ आध्यात्मिक नव्हते, तर ते सामाजिक, आर्थिक आणि नैतिक क्रांतीची बीजे पेरणारे होते. जातिव्यवस्थेवरील प्रहार: तुकोबांनी व्यक्तीचे महत्त्व तिच्या जातीवर नसून तिच्या भक्ती आणि गुणांवर असते, हे ठामपणे मांडले. "वैष्णवांची याती वाणी जो आपण । भोगी तो पतन कुंभापाकी" या अभंगातून त्यांनी जात नव्हे, तर माणसाचे कर्म त्याला उच्च किंवा नीच ठरवते, हे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे, "तुका म्हणे मी न वजें यातीवरी । पूज्यमान करीं वैष्णवांसी" या अभंगातून त्यांनी जातीच्या आधारावर पूज्य मानण्याऐवजी भक्ती आणि सदाचारावर आधारित व्यक्तीचा सन्मान करण्याचे आवाहन केले. "भेदाभेद अमंगळ" हे त्यांचे तत्त्वज्ञान थेट जातीय विषमतेवर प्रहार करणारे होते, जे सर्व प्रकारच्या भेदांना अशुभ मानत होते. २ कर्मकांड आणि दांभिकपणाविरुद्ध लढा: तुकोबांनी देवाच्या नावाखाली चालणाऱ्या दांभिकपणावर आणि अंधश्रद्धांवर अत्यंत परखड टीका केली. "ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ॥ अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ॥" या अभंगातून त्यांनी ढोंगी साधू आणि त्यांच्या पापाचरणांवर हल्ला चढवला. त्यांनी बाह्य कर्मकांडांना गौण मानले. "तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं" या अभंगाद्वारे त्यांनी तीर्थयात्रा आणि इतर विधींऐवजी माणसातील सद्भक्ती आणि मानवतावाद हेच खरे देवत्व आहे, हे लोकांना समजावून सांगितले. भोळ्या भाबड्या लोकांच्या अज्ञानयुक्त श्रद्धेचा फायदा पुरोहितवर्ग घेत होता. यामुळे समाजामध्ये कर्मकांडाचा सुळ सुळाट झाला होता. संत तुकारामांनी समाजात परसलेल्या देवासंबंधीच्या अडाणी, कल्पना व अंधश्रद्धा घालविण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात की पंढरीनाथ हाच एक देवांचा देव आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

"नव्हे जाखाई जोखाई। मायराणी मेसाबाई ।।
बळिया माझा पंढरिराव। जो या देवांचा ही देव ।।"

आर्थिक आणि सामाजिक समता: तुकोबांचे कार्य केवळ आध्यात्मिक मर्यादेपुरते नव्हते. त्यांनी समाजातील गरजू आणि पीडित लोकांसाठी प्रत्यक्ष कृती केली. त्यांनी कर्जदारांची कर्जे माफ करणारा जगातील पहिला संत म्हणून ओळख मिळवली. हे केवळ वैयक्तिक उदारतेचे उदाहरण नव्हते, तर तत्कालीन सावकारी व्यवस्थेवरील एक नैतिक प्रहार होता. त्यांची "जगामध्ये समता नांदावी" ही मनोभूमिका त्यांच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला अधोरेखित करते. त्यांनी "जोडोनिया धन उत्तम व्यवहारे" असे सांगून प्रामाणिक श्रम आणि उद्योगाचे महत्त्व प्रतिपादित केले. त्यांनी माणुसकी आणि दीन-दुबळ्यांची सेवा हेच ईश्वरभक्तीचे खरे स्वरूप मानले. नामस्मरणामुळेच माणसाच्या मनातील 'मी' नष्ट होतो. तसेच नामस्मरणामुळे जन्म-मरणाच्या फेऱ्यातूनही माणसाची सुटका होते. संत तुकाराम महाराजांनी नामस्करणाला जीवनामध्ये अनन्य महत्त्व दिले आहे. प्रत्येक वेळी ते आपल्या अनुभवाद्वारे बोलतात. त्यांच्या नामसाधना मार्गाचे महत्त्व सांगताना शं. दा. पेंडसे म्हणतात, "समाजातील वरिष्ठ वर्गापासून अगदी कनिष्ठ वर्गांपर्यंत सर्वांचा सारखाच उद्धार करणारे असे हे ईश्वर नामस्मरण व नामोच्चारण असल्यामुळे भागवत धर्मातील या 'ईश्वर' महत्त्वाचे साधनाचा स्वानुभवाने सविस्तर प्रपंच तुकोबांनी केला आहे." अशाप्रकारे, तुकोबांनी आध्यात्मिक क्रांतीची सुरुवात केली, जी पुढे सामाजिक आणि आर्थिक क्रांतीत रुजली.

लोकप्रबोधनाचे साधन म्हणून अभंगवाणी:

संत तुकाराम महाराजांनी त्यांचे विचार आणि ज्ञान सामान्य लोकांना समजेल अशा साध्या, सोप्या आणि स्थानिक भाषेत अभंगवाणीद्वारे मांडले. त्यांनी वेद, शास्त्रे आणि पुराणे यांसारख्या अनाकलनीय ग्रंथांशिवायही पारमार्थिक उन्नती साधता येते, असा सोपा मार्ग दाखवला. त्यांच्या अभंगामुळे समाजातील बहुजन वर्गामध्ये स्वाभिमान निर्माण झाला आणि धर्मभोळेपणा व चुकीच्या समजुती दूर करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला. या लोकप्रबोधनाच्या कार्यामुळेच त्यांच्या अभंगांना "अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच" अशी लोकप्रियता मिळाली. संत तुकाराम महाराजांनी 'बुडता हे जन न देखवे डोळा' ही भूमिका घेतली. लहवितकर महाराज म्हणतात, "त्यांचे काही अभंग पुरोगामी विचारांनी ओतप्रोत भरलेले आहेत. अनेक अभंगातून कालबाह्य रूढी, अंधश्रद्धा यावर घणाघाती प्रहार करुन त्यांनी दैववाद व निराशावाद यांचा धिक्कार केला, परंतु प्रयत्नवाद व आशावादाचा पुरस्कार केला. तीक्ष्ण वाग्बाणाचा प्रागतिक विचार प्रस्तुत करण्यासाठीच शूरत्वाने वापर केला. कोणाचीही भीड ठेवली नाही, "[४]

भारतीय संविधानातील समानतेचे तत्त्व: संविधानाची पायाभूत मूल्ये

भारतीय संविधानाची निर्मिती स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या पायाभूत मूल्यांवर आधारित आहे. संविधानाच्या तिसऱ्या भागात (अनुच्छेद १२ ते ३५) नागरिकांसाठी मूलभूत अधिकार समाविष्ट आहेत. यापैकी, समानतेचा अधिकार (अनुच्छेद १४ ते १८) हा सर्वाधिक महत्त्वाचा मूलभूत अधिकार आहे, जो प्रत्येक नागरिकाला समानतेची हमी देतो आणि विविध कारणांवरून होणाऱ्या भेदभावावर प्रतिबंध घालतो.

समानतेचा अधिकार (कलम १४-१८)

भारतीय संविधानाने समानतेच्या तत्त्वाला अनेक कलमांद्वारे कायदेशीर बळ दिले आहे.

कलम १४ - कायद्यासमोर समानता: हे कलम भारतीय हद्दीतील कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोर समानता किंवा कायद्यांचे समान संरक्षण नाकारले जाणार नाही, याची हमी देतो. याचा अर्थ, कायद्याच्या दृष्टीने सर्व व्यक्ती समान आहेत आणि समान परिस्थितीत त्यांच्यावर एकसमान कायद्याचा वापर केला जाईल. [५]

कलम १५ - भेदभाव प्रतिबंध: हे कलम राज्याला केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या आधारावर कोणत्याही नागरिकाविरुद्ध भेदभाव करण्यास मनाई करते. या कलमामध्ये महिला, मुले आणि सामाजिक किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी विशेष तरतुदी करण्याची परवानगी दिली आहे, ज्यामुळे प्रत्यक्ष समानतेला प्रोत्साहन मिळते. "अठरा पगड जाती सकळी वैष्णव । दुजा नाही भाव पंढरीशी ।" आपण कोणत्याही जातीमध्ये, कुळामध्ये जन्माला आलो तरी आपण सारे एकच आहोत, पंढरीनाथ दुजाभाव करत नाही. यामधून संत तुकाराम महाराजांनी सामाजिक क्षेत्रातील जातीभेदावर प्रहार करून व्यक्ती व्यक्तितील समभावाचा संदेश दिला आहे. संत तुकाराम महाराजांच्या सामाजिक कार्याचे विवेचन करतांना प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, "ज्या ज्या वेळी विषमतेबद्दलची चीड अनावर झाली, त्या त्या वेळी त्यांनी रूढ कल्पनांचे वाभाडे काढण्यास कमी केले नाही. सर्वमान्य संकेत आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

स्वतंत्र प्रेरणा यांच्या ह्या झगड्यात तुकारामांच्या जीवनाचे सार सर्वस्त आहे." समाजातील सर्व जाती धर्मामध्ये एकत्वाची भावना जागृत करण्याच्या दृष्टीने संत तुकाराम महाराजांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. [६]

कलम १६ - सार्वजनिक नोकरीत संधीची समानता: हे कलम सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत सर्व नागरिकांना समान संधी देते. कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात, लिंग, वंश किंवा जन्मस्थान या कारणांवरून सरकारी नोकरीसाठी अपात्र ठरवता येणार नाही.[७]

कलम १७ - अस्पृश्यतेचे निर्मूलन: हे कलम अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करते आणि कोणत्याही स्वरूपात त्याचे आचरण करण्यास सक्त मनाई करते. अस्पृश्यतेमुळे उद्भवणारी कोणतीही अक्षमता कायद्याने दंडनीय ठरवली आहे.[८]

संत तुकाराम महाराजांनी जी नैतिक तत्त्वे आपल्या अभंगांतून सांगितली, त्याच तत्त्वांना संविधानाने कायदेशीर बळ दिले. "भेदाभेद अमंगळ" हे नैतिक तत्त्व कलम १५ मध्ये "भेदभाव प्रतिबंध" म्हणून तर "यातीचा कोण आहे?" हा विचार कलम १७ मध्ये "अस्पृश्यता निर्मूलन" म्हणून रूपांतरित झाला. हा प्रवास सामाजिक क्रांतीच्या नैतिक पायापासून कायदेशीर आणि संवैधानिक बळापर्यंतचा एक महत्त्वाचा टप्पा दर्शवतो.

संत तुकोबांच्या विचारांचा संविधानिक समानतेवर पडलेला प्रभाव:

वारकरी संतपरंपरेची सामाजिक क्रांती

महाराष्ट्रातील संत परंपरा ही केवळ एक धार्मिक चळवळ नव्हती, तर ती एक समन्वयवादी, सामाजिक क्रांतीची चळवळ होती. या परंपरेतील संत विविध जाती आणि व्यवसायांमधून आले होते. संत नामदेव (शिंपी), संत सावता माळी (माळी), संत नरहरी सोनार (सोनार), संत चोखामेळा (महार) यांनी आपल्या व्यवसायाचा आणि सामाजिक जीवनाचा अनुभव अभंगांतून मांडला. त्यांच्या अभंगांतून सामाजिक हेटाळणी आणि अवहेलनेचे चित्रण दिसते. या संतांनी आपल्या वैयक्तिक अनुभवांना व्यापक मानवतावादी आणि समतावादी रूप दिले. तुकोबांसारख्या संतांनी याच अनुभवांना अधिक व्यापकता दिली, ज्यामुळे वैयक्तिक वेदना सामूहिक संघर्षाचे आणि त्यानंतर वैचारिक क्रांतीचे कारण बनली. ही वैचारिक क्रांती नंतरच्या पिढ्यांसाठी समाजसुधारणेचा पाया ठरली.[९]

संत तुकोबांचा छ. शिवाजी महाराज व महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीवरील प्रभाव:

तुकाराम महाराजांची कीर्तने ऐकणे, त्यांना सन्मानाचे प्रतीक म्हणून दिवट्या, छत्री, घोडे देऊ करणे हे शिवाजीच्या मनातील सत्पुरूषांबद्दल वसत असणाऱ्या आदर भावनेशी व भोसले घराण्याच्या परंपरेशी सुसंगतच म्हंटले पाहिजे. तसेच सत्ताधिशांनी सत्पुरूषांचा आदर करायचा या येथील राज्यव्यवहाराला मान्य झालेल्या संकेतालाही ते धरूनच होते. जेंव्हा हा प्रसंग घडला तेंव्हा शिवराय अगदी लहान म्हणजे सतरा अठरा वर्षाचे होते."" असे सदानंद मोरे यांनी आपल्या 'तुकाराम दर्शन' या ग्रंथात म्हंटले आहे. [१०] महात्मा फुले यांनी १८७३ साली स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा ब्राह्मणवादाच्या जोखडाविरुद्ध आणि शूद्रातिशूद्र समाजाच्या मुक्तीसाठी उभारलेला एक संघटित प्रयत्न होता. या चळवळीमध्ये तुकाराम तात्या पडवळ यांसारख्या तुकोबांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या व्यक्तींचा सहभाग होता. तुकोबांनी ज्याप्रमाणे "ऐसे कैसे झाले भोंदू" असे म्हणून तत्कालीन दांभिकतेवर हल्ला केला, त्याचप्रमाणे फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून ब्राह्मणी विचारांचे जोखड झुगारून देण्याचे आवाहन केले. तुकोबांनी सुरू केलेला वैचारिक विद्रोह महात्मा फुले यांनी संस्थात्मक रूपात पुढे नेला. तुकोबांनी अभंगांद्वारे केलेल्या लोकप्रबोधनाला फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म सारख्या ग्रंथांद्वारे आणि शिक्षण चळवळीद्वारे एक निश्चित दिशा दिली. अशा प्रकारे, तुकोबांच्या वैचारिक बंडाचे संस्थात्मक रूप महात्मा फुले यांच्या चळवळीत दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत तुकोबांचा वैचारिक वारसा:

महाराष्ट्राला संत तुकाराम महाराजांपासून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत समाजसुधारकांचा समृद्ध वारसा लाभला आहे, डॉ. आंबेडकरांच्या समाजसुधारणेच्या कार्यावर संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रत्येक कृतीतून समानतेचे धडे दिले आणि जातीय उतरंडीविरुद्ध त्यांच्या मनात विलक्षण चीड होती. तुकोबांनी जो वैचारिक पाया घातला, तो फुले यांनी चळवळीच्या माध्यमातून पुढे नेला आणि त्याचा कळस डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये साधला. तुकोबांचा "भेदाभेद अमंगळ" हा विचार डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या कलम १५, १६ आणि १७ मध्ये एक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

कायदेशीर तरतूद बनवला. तुकोबांनी समानतेसाठी दिलेला नैतिक लढा डॉ. आंबेडकरांनी कायद्याच्या माध्यमातून न्याय्य बनवला. अशाप्रकारे, तुकोबांनी लावलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या रोपट्याचे संविधानात वटवृक्षात रूपांतर झाले.

संत तुकोबांचे विचार आणि संविधानिक कलमांमधील समांतरता:

तुकोबांच्या अभंगवाणीतील अनेक तत्त्वे आणि भारतीय संविधानातील समानतेच्या तरतुदी यांच्यात स्पष्ट समांतरता दिसून येते. यातील काही प्रमुख समानता खालीलप्रमाणे स्पष्ट होतात:

तुकोबांचे प्रमुख विचार - संबंधित अभंग

•जातिव्यवस्था आणि भेदभाव नाकारणे -

"भेदाभेद अमंगळ" संविधानातील प्रतिरूप (कलम) कलम १५ (धर्म, वंश, जात, लिंग यांवरून भेदभावाचा प्रतिबंध).

•अस्पृश्यतेवर प्रहार -

"माझ्या बोलिला तुका... यातीचा कोण आहे?" निम्न जातीतील व्यक्तीची सेवा. कलम १७ (अस्पृश्यता निर्मूलन)

•सर्वांसाठी ज्ञानाचे दरवाजे खुले - "यारे यारे लहान थोर। याती भलत्या नारीनर" कलम १६ (सार्वजनिक रोजगारात संधीची समानता)

•मानवतावाद आणि सामाजिक न्याय -

"जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले" प्रस्तावना आणि कलम ३८ (सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय सुनिश्चित करणे)

आर्थिक समता,कर्जमुक्ती,प्रस्तावना (सामाजिक आणि आर्थिक न्याय) आणि राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे इ. अशाप्रकारे संविधानातील कलमे व संत तुकारामांचे तत्कालीन विचार यामध्ये समांतरता आढळून येते. [११]

तुकोबांनी सांगितलेल्या मानवतावादी आणि समतावादी विचारांनी सामाजिक व्यवहारांतील कटुता कमी केली. त्यांनी नैतिक आणि वैयक्तिक परिवर्तनावर लक्ष केंद्रित केले, तर संविधानाने त्याच परिवर्तनाला कायदेशीर चौकट दिली. तुकोबांचा भेदाभेद अमंगळ हा विचार सामाजिक सद्भावनेवर आधारित होता, तर कलम १५, १६ आणि १७ ने त्याच सद्भावनेला कायद्याच्या कठोरतेने संरक्षित केले. तुकोबांनी जे का रंजले गांजले या विचारातून सामाजिक न्यायाची भावना प्रकट केली, जी थेट संविधानाच्या प्रस्तावनेत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय म्हणून समाविष्ट आहे. अशा प्रकारे, तुकोबांच्या आध्यात्मिक क्रांतीचा वारसा संविधानाच्या कायदेशीर क्रांतीमध्ये परिणत झाला.

तुकोबांच्या कार्याचा वर्तमानातही चिरंतन प्रभाव: समता भूमी ते संत भूमी.

संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा प्रभाव आजही विविध सामाजिक उपक्रमांतून दिसून येतो. संविधान समता दिंडी हा असाच एक महत्त्वाचा उपक्रम आहे, जो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता भूमी पासून सुरू होऊन तुकोबांच्या संत भूमी पर्यंत जातो. हा प्रवास केवळ भौगोलिक नसून, तो एका वैचारिक प्रवासाचे प्रतीक आहे, जो तुकोबांचे विचार आणि संविधानाची मूल्ये यांच्यातील अविभाज्य संबंध दर्शवतो. हा उपक्रम केवळ तुकोबांच्या कार्याचा गौरव करत नाही, तर तो संविधानाची मूल्ये लोकांपर्यंत पोहोचवण्याचे एक प्रभावी साधन बनला आहे, हे दर्शवते की तुकोबांच्या विचारांचे महत्त्व काळाच्या ओघात कमी झाले नसून, ते आजही समाजाला मार्गदर्शन करतात. भागवत धर्माचा कळस म्हणजे संत तुकाराम, त्यांनी बहुजन समाजामध्ये पसरलेली धर्म कर्मकांडाची जळमटे आपल्या कीर्तनातून पुसून टाकली. अभंगवाणी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये वसली, अभंगवाणीतून सत्यथर्माची शिकवण जगाला संत तुकाराम यांनी दिली. सामाजिक परिवर्तनाची वादळ सर्वत्र पसरले. या वादळाला थोपविण्यासाठी सनातनी धर्ममार्तंडांनी कल्लोळ केला, कटकारस्थाने रचली अशा अनेक संकटातून नव्हे तर अग्निदिव्यातून जात असताना अभंग सतत गर्जत राहिला. जाती-धर्माची उतरंड त्यांनी मोडून काढली. गुलामगिरीची चौकट मोडली. बहुजन समाजामध्ये स्वाभिमान निर्माण केला. [१२]

तुकोबांच्या विचारांचे महत्त्व

तुकोबांनी अभंग वाणी कीर्तनाच्या माध्यमातून राष्ट्र धर्माची शिकवण दिली. त्यांनी सांगितलेला राष्ट्रधर्म हा केवळ धार्मिक किंवा भौगोलिक संकल्पना नव्हती, तर तो सामाजिक सौहार्द, समता आणि मानवतेवर आधारित होता. भेदाभेद अमंगळ या तत्त्वावर आधारित हा राष्ट्रधर्म जातीय भेदाभेद, दांभिकपणा आणि शोषण नाकारतो. अशाप्रकारे, तुकोबांचा समतावादी विचार हा कोणत्याही आधुनिक, समावेशक राष्ट्रवादाचा पाया आहे. त्यांचा हा चिरंतन वारसा आजही सामाजिक आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व समाजाला पटवून देत आहे, जो कोणत्याही लोकशाही राष्ट्रासाठी आवश्यक आहे.समाजातील अनिष्ट प्रवृत्तीवर व मानसिकेतवर प्रहार करतानाच ते

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

उपहासात्मक बोलतात. त्यांची समाजप्रबोधनाची ही वेगळीच पद्धत आहे. यू.म. पठाण म्हणतात, "परमात्म्याचा साक्षात्कार झाल्यानंतर तुकोबा केवळ आपल्यावर 'उपकार' करण्याकरिताच व त्यांच्याप्रमाणेच आपलाही उद्धार करण्याकरिताच जगतात. समाजप्रबोधन हा त्यांच्या संतत्वाचाच एक तेजस्वी पैलू आहे. त्यामुळचं त्यांच्या संतत्वातच एक तेजस्वी परखड समाज प्रबोधनकार दडला आहे. नि त्यांच्यामधील समाज प्रबोधनाकारा मध्येच एक तेजस्वी 'मेणाहूनि मऊ' संत दडला आहे." समाज प्रबोधनासाठी त्यांचे समाजनिरीक्षण वाखानण्याजोगे होते. तुकोबांनी समाजातील अति सामान्यांपासून ते अगदीच उच्चभ्रू लोकांपर्यत सर्वांचाच चिकित्सक विचार अभंगवाणीच्या साह्याने मांडला आहे. [१३]

निष्कर्ष:

या शोध निबंधाच्या विश्लेषणातून हे स्पष्ट होते की, संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा भारतीय संविधानातील समानतेच्या तत्त्वावर थेट ऐतिहासिक प्रभाव नसला, तरी तो एक दूरगामी आणि अप्रत्यक्ष असा वैचारिक प्रभाव होता. तुकोबांनी सतराव्या शतकात विषमतेच्या विरोधात जे वैचारिक बंड पुकारले, त्याने महाराष्ट्रात आणि नंतर संपूर्ण भारतात सामाजिक परिवर्तनाची लाट निर्माण केली. महात्मा फुले यांनी ही लाट संघटित चळवळीत रूपांतरित केली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याच विचारांना कायदेशीर स्वरूप देऊन भारतीय संविधानात स्थान दिले. तुकोबांनी रुजवलेली समानतेची मूल्ये आणि संविधानाने दिलेला कायदेशीर आधार हे दोन्ही एकमेकांचे पूरक आहेत. तुकोबांनी दाखवलेला आध्यात्मिक आणि नैतिक मार्ग हा संविधानाने दिलेल्या कायदेशीर हक्कांना अधिक अर्थपूर्ण बनवतो. तुकोबांचा चिरंजीव वारसा आजही संविधान समता दिंडी सारख्या उपक्रमांतून जिवंत राहिला आहे, जो मानवतेच्या आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांवर आधारित एका आदर्श समाजाची कल्पना करतो. तुकोबांनी सुरू केलेल्या वैचारिक प्रवासावर चालतच भारतीय लोकशाही अधिक न्याय्य आणि समतावादी होऊ शकते, हेच या ऐतिहासिक प्रवासातून सिद्ध होते.

संदर्भ ग्रंथसूची:

1. लहवितकर रामकृष्ण 'संत तुकाबोरायांचा लोकसंवाद : तत्त्वज्ञान आणि काव्यशैली' लहवितकर ट्रस्ट प्रकाशन, आवृत्ती-दुसरी पृ. १७८
2. लाड पु.म. (संपादक) 'श्री तुकारामबाबांच्या अभंगांची गाथा' शासकीय प्रत द्वितीय आवृत्ती - १९५५, दुसरे पुनर्मुद्रण-१९९१, पृ. ७
3. पेंडसे शं.दा. 'साक्षात्कारी संत तुकाराम' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती-२००८, पृ.८२
4. लहवितकर रामकृष्ण उ.नि.पृ. २१०
5. लक्ष्मीकांत.एम, इंडियन पॉलिटी, मॅकग्रा हिल एज्युकेशन 'के' सागर पब्लिकेशन. पृ ९९
6. सरदार गं. बा. 'संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती' आवृत्ती-आठवी २०१०, लोकवाङ्मयगृह प्रकाशन - मुंबई पृ.११५
7. भारत सरकार, विधि व न्याय मंत्रालय, भारताचे संविधान. महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाद्वारे अनुवादित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित २०१४. पृ ५
8. भारत सरकार, विधि व न्याय मंत्रालय, भारताचे संविधान. महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाद्वारे अनुवादित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित २०१४. पृ ७
9. सरदार गं. बा. उ.नि.पृ. ११०
10. मोरे सदानंद. 'तुकाराम दर्शन' गाज प्रकाशन. अहमदनगर, द्वितीया वृत्ती २००१ - पृ. ३५
11. लक्ष्मीकांत. एम इंडियन पॉलिटी, मॅकग्रा हिल एज्युकेशन 'के' सागर पब्लिकेशन. पृ १०३
12. संपादक घुले, पांडुरंग अनाजी ह, भ, प (२०१७). श्री संत तुकाराम महाराजांची गाथा. श्री क्षेत्र आळंदी श्री संत तुकाराम महाराज वा्ड;मय प्रकाशन संस्था
13. मोळक शैलजा ज्ञानेश्वर, 'जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ' प्रथमावृत्ती २००९ लेख. समाज प्रबोधन तुकोबाच पठाण यु.म. पृ.२८

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

आधुनिक हिंदी नाटक और संवैधानिक मूल्य

डॉ. प्रतिभा आनंदराव जावळे
जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर
ता.शिरोळ जि.कोल्हापूर

Manuscript ID:
JRD -2025-170956
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 269-271
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

शोध सारांश:

दलित साहित्य और संविधान" इस शोधपत्र में दलित साहित्य की सामाजिक, राजनीतिक तथा मानवीय भूमिका का विश्लेषण किया गया है। दलित साहित्य केवल अभिव्यक्ति का माध्यम नहीं, बल्कि सामाजिक न्याय, समानता और मानवाधिकारों के लिए चलने वाला एक आंदोलन है। यह साहित्य उन दलित वर्गों की पीड़ा, शोषण और संघर्ष को उजागर करता है जो सदियों से सामाजिक असमानताओं के शिकार रहे हैं। संविधान ने दलितों को समानता, स्वाभिमान और अधिकारों का संरक्षण दिया, परंतु वास्तविक जीवन में अभी भी भेदभाव और अन्याय जारी है। डॉ. भीमराव आंबेडकर और जोतिबा फुले की विचारधारा से प्रेरित यह साहित्य समाज में समतामूलक चेतना और अस्मिता के पुनर्निर्माण का प्रयास करता है। इस प्रकार दलित साहित्य और संविधान दोनों मिलकर सामाजिक परिवर्तन, न्याय तथा मानव गरिमा की स्थापना के मूल आधार बनते हैं।

बीजशब्द: *दलित साहित्य, संविधान, समता, अस्मिता, मानवाधिकार, शोषण, अन्याय, डॉ. आंबेडकर, समानता, सामाजिक न्याय.*

भारत में संविधान सर्वोपरि है| किसी भी देश का शासन सुचारू रूप से चलाने के लिए उसे किसी न किसी प्रकार के संविधान की जरूरत होती है उसके बिना राजकाज चलता नहींऔर इसलिए हर विकसित देश में किसी न किसी प्रकार का संविधान का अस्तित्व होता है| भारतीय संविधान में समता, स्वतंत्रता, बंधुत्व, न्याय,धर्मनिरपेक्षता जैसे मूल्यों स्थान दिया गया हैं|ये मूल्य मनुष्य के सर्वांगीण विकास को लक्ष्य बनाकर उपलब्ध कराए गए हैं |"मूल्य मनुष्य के विकासशील जीवन के लक्ष्य और उसकी उपलब्धि है|"1समाज के विकास के लिए मूल्य का होना जरूरी है इसलिए डॉ. बाबासाहेब आंबेडकर जी ने संविधान की मूल नींव मूल्यों के आधार पर बनाई है|"मूल्याश्रित पुरुष स्वत: और विश्वात्मा अमर असत्तु रूप होमभूमा का अनुसंधान करता है| वही मूल्य का स्वरूप है उसी में मनुष्य की चरितार्थता, उसके जीवन की सुरक्षित भूमिका से सुसंवाद प्राप्त करती है| अच्छे मूल्य की धारणा से ही आदर्श की स्थापना होती है| आधुनिक युग में भी यही मूल्य मानवीय दृष्टिकोण को नहीं सोच और ऊर्जा देकर जीवन की बंजर और भयावह वह भूमि सिंचन और जोतने की शक्ति प्रदान कर रहे हैं |डॉ बाबासाहेब ने कहा था कि हमारे संविधान के सिद्धांत यदि सर्वमान्य नहीं होते तो यह दुनिया के किसी भी संविधान से टकरा भी नहीं सकता था|" स्वातंत्रोत्तर युग में साहित्य की विभिन्न विधाओं में प्रतिभाशाली लेखकों ने जीवन मूल्यों के प्रति सजाकता दिखाई है| साहित्य की प्रमुख विधाओं के अंतर्गत नाटक ऐसी विधा है, जिसमें जीवन मूल्य पर विशेष बल दिया है| समाज में रूढी, परंपरा, सामाजिक विषमता, मनुष्यगत प्रवृत्ति के कारण मूल्यों को अपने ही पैरोंतले रौंद कर देश की अखंडता धर्मनिरपेक्षता में बाधा उत्पन्न की है,इसलिए भारत स्वतंत्र होने के बाद जिन मूल्यों पर संविधान की बुनियाद रची है,

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. प्रतिभा आनंदराव जावळे ,जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, ता.शिरोळ जि.कोल्हापूर

How to cite this article:
जावळे, . प्रतिभा . आनंदराव . (2025). आधुनिक हिंदी नाटक और संवैधानिक मूल्य. Journal of Research & Development, 17(9(IV)), 269–271. https://doi.org/10.5281/zenodo.17732703

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732703

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

वही हमारा आदर्श है डॉ.वीणा गौतम लिखती है–"भारत के आचार-विचार, चिंतन - मनन को यदि वर्तमान में कोई बात झिझोंड रही है तो वह है मूल्यों की जीवन से बेमेल या खो जाना अन्यविधाओं के समान नाट्य साहित्य का प्रयन्त एक नए आकाश की ओर बढ़ते हुए समाज के नई स्वरूप को तलाशकर नए जीवन मूल्यों को अपनाने में अपनी अहम भूमिका निभा रही है|"3हिंदी के कई नाटक ऐसे हैं जिसमें संवैधानिक मूल्य की परंपरा विकसित हुई है|

भारतीय संविधान जिन मूल्यों को प्रमुख मानता है, वह इस प्रकार है---

- न्याय- सामाजिक आर्थिक और राजनीतिक समानता |
- स्वतंत्रता - विचार अभिव्यक्ति, विश्वास, धर्म और उपासना की स्वतंत्रता
- समानता - सभी नागरिकों को समान अवसर और अधिकार
- बंधुत्व- सभी में भाईचारा और राष्ट्रीय एकता
- लोकतंत्र - जनता की भागीदारी और अधिकारों की रक्षा

आधुनिक हिंदी नाटक की विशेषताएं

स्वातंत्रोत्तर हिंदी नाटक)1946 के बाद से) में सामाजिक यथार्थ लोकतांत्रिक मूल्यों और जन-सरोकारों से जुडा हुआ है,इसकी विशेषताएं इस प्रकार है---

- अन्याय और असफलता के खिलाफ संघर्ष करना -
- लोकतांत्रिक चेतना और जन अधिकार
- स्त्री पुरुष समानता और दलित विमर्श
- धर्मनिरपेक्ष और सांप्रदायिक सदभाव

प्रस्तुत सभी विशेषताएं नाटकों में चित्रित है| आधुनिक हिंदी नाटक समाज का दर्पण है|'अंधा युग' धर्मवीर भारती द्वारा लिखित नाटक में कुरुक्षेत्र का युद्ध केवल सैनिकों का संघर्ष नहीं रहा बल्कि उसने पूरे समाज और संस्कृति को नष्ट कर दिया| इस नाटक में दिखाया गया है की प्रतिशोध और स्वार्थ के कारण धर्म, न्याय और करुणा जैसे मानवीय मूल्य नष्ट हो गए|युद्ध से उत्पन्न नैतिक पतन,अमानवीता और मूल्यहीनता समाज को गहरे अंधकार में धकेल देती है। इस नाटक के अंतिम दृश्य में कृष्ण की उपस्थिति आदर्श और आशा का प्रतीक है| धर्मवीर भारती जी इस नाटक से संदेश देते हैं की आदर्श और बाहरी विजय में नहीं बल्कि मानवता करुणा और शांति की खोज में है| शंकर शेष लिखित 'बाढ़ का पानी'(1980) नाटक एक मौलिक नाटक कृति है| जिसमें लेखक ने जाति भेद के ऊपर उठकर नाटक का नायक पढ़ा लिखा चंदन गांव में बाढ़ आने पर सवर्णों के प्राण बचाता है, उन्हें अपने आश्रय देकर भाईचारे की सीख देता है|नाटक में बाढ़ जैसी प्राकृतिक आपदा की पृष्ठभूमि पर आधारित है| ऐसी स्थिति में जाति, वर्ग और धर्म के भेद और प्रासंगिक हो जाते हैं और सबसे बड़ा आदर्श मानवता बन जाता है| बाढ़ के समय अमीर -गरीब, उच्च- नीच सब समान स्तर पर आ जाते हैं| यह नाटक संविधान में निहित समानता के मूल्य की याद दिलाता है| इसके साथ ही बाढ़ जैसी स्थिति में अकेला व्यक्ति बच नहीं सकता सबको मिलकर रहना होता है| यह आदर्श सामूहिकता, सहयोग और सहानुभूति की भावना को व्यक्त करता है| नाटककार विष्णु प्रभाकर लिखित 'अब और नहीं'(1981)नाटक की नायिका मंजरी के माध्यम से अन्याय, शोषण और अत्याचार को अब और नहीं सहा जा सकता| स्त्री का सम्मान करना उसे अन्य अत्याचार के खिलाफ लड़ने की शक्ति प्रदान करता है, इसके साथ प्रगतिशील सोच और सामाजिक सुधार की प्रेरणा देता है| लक्ष्मीनारायण लाल का नाटक 'अंधा कुआं' समाज में व्याप्त अंधविश्वास रूढ़ियों और सामाजिक शोषण की ओर संकेत करता है| इस नाटक में सुधारवादी दृष्टिकोण सामने आया है| इस नाटक में शोषण और असफलता का विरोध करते हुए न्याय और समानता का संदेश देता है| जयप्रकाश कर्दम का 'मुक्तिबोध' नाटक में दलित समाज को बराबरी का दर्जा देने की मांग की गई है| प्रस्तुत नाटक में व्यक्ति को स्वतंत्र होकर अपनी पहचान बनाने का अधिकार ही नाटक का मुख्य आदर्श है|समाज में व्याप्त अन्याय, शोषण और उत्पीड़न के विरुद्ध न्याय पूर्ण समाज- व्यवस्था की मांग नाटक का मुख्य स्वर है| "सूखा सरोवर(1961) यह लक्ष्मीनारायण लाल का मुल्यों की स्थापना की दृष्टि से सार्थक नाटक है| वीणा गौतम की मान्यता है की 'सूखा सरोवर' कई स्तरों पर सुखा सरोवर कथ्य,वस्तु,पात्र,चरित्र ,घटनाएं अनेकार्थी होकर वर्तमान में अपनी गूंज देते है| जलदेवता आत्मा है| सरोवर जो भारतीय संविधान को व्याख्यायित करता है और सरोवर भारतीय लोकतांत्रिक चेतना का पर्याय है| इसमें अनेक सत्याक्षित अर्थ खलते चलते है|"4 सरोवर पानी ही पानी नहीं प्यास भी है अपनी ही नहीं सारी नगरी की |" राजा भी हमारी तरह व्यक्ति है हम समाज है एक से एक मिलकर इसलिए हर व्यक्ति राजा है|"5 पानी मनुष्य के लिए आवश्यक है| इस पानी के लिए डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलितों को न्याय देने के लिए आंदोलन करते है|संविधान में समानता के मूल्य को महत्त्व है| उपर्युक्त आलोच्य नाटकों का अध्ययन करने से पता चलता है कि संवैधानिक मूल्य की स्थापना में हिंदी नाटकों की बड़ी भूमिका रही है| मूल्य यह शब्द भले ही साहित्य का शब्द ना हो साहित्य में जीवन मूल्यों का स्थान शुरू से ही रहा है| साहित्य जीवन से निकलता है अतः जीवन के मूल्यों को भी कोई नकार नहीं सकता| मानव मूल्य यह मानव को मानवता या मनुष्यत्व को इंसानियत को सिद्ध करनेवाले ऐसे गुण अथवा तत्व है| जिसके अभाव में उन तत्वों की महत्ता या उपयोगिता कम नहीं होती बल्कि बढ़ जाती है| यही मूल्य हमारे आदर्श है।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

"संविधान है हमारे देश की शान
समानता और न्याय इसका है मान
धर्म जाति भाषा से ऊपर उठाता
हर नागरिक को हक दिलाता"

संदर्भ

1. गोविंद चंद्र पांडे,मूल्य-मीमांसा - पृष्ठ 35
2. वही पृष्ठ– 35
3. डॉ.वीणा गौतम, हिंदी नाटक, पृष्ठ 197
4. लक्ष्मी नारायण लाल, सूखा सरोवर, पृ.13
5. वही पृष्ठ– 14

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

मराठी संतांच्या रचनेतील सार्वभौमत्व: संविधानातील सार्वत्रिक मूल्यांचा आध्यात्मिक पाया

डॉ. संदीप रंगनाथ तापकीर
मराठी विभाग, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
Email: Sandiptapkir12@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170957
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 272-276
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

शोध सारांश:

सदर संशोधन निबंधात मराठी संतपरंपरेतील विचारांचा भारतीय संविधानाशी असलेला आध्यात्मिक व मूल्याधिष्ठित संबंध स्पष्ट केला आहे. महाराष्ट्रातील संत—ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ आदींच्या वाङ्मयात समाजातील समानता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय आणि मानवता यांसारख्या लोकशाही मूल्यांचे बीज सापडते. या संतांनी धर्माला मानवी जीवनातील नैतिकतेचा केंद्रबिंदू मानून समाजरचनेत परिवर्तन घडवले. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून त्यांनी वर्ण, जात, लिंगभेद यांचा विरोध करत सर्वांसाठी समत्वभाव मांडला. मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई आदी संतकवयत्रींनी स्त्री-स्वातंत्र्य आणि आत्मभानाचा नवा अध्याय रचला. गुरुतत्त्वाच्या लोकशाहीकरणातून वारकरी परंपरेने सामाजिक समतेची नवी मांडणी केली. अशा प्रकारे संतवाङ्मय हे भारतीय संविधानातील मूलभूत तत्त्वांचे—स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय—यांचे आध्यात्मिक अधिष्ठान असल्याचे सिद्ध होते.

बीजशब्द: *मराठी संतपरंपरा, भारतीय संविधान, लोकशाही मूल्ये, वारकरी संप्रदाय, समता, बंधुता, स्वातंत्र्य, स्त्री-आध्यात्मिकता, मानवतावाद, सामाजिक न्याय.*

प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्थेचा इतिहास हा केवळ राजकीय घडामोडींचा दस्तऐवज नसून, तो एक गहन सांस्कृतिक, धार्मिक आणि तात्त्विक प्रवाह देखील आहे. या प्रवाहाचा एक मूलस्रोत म्हणजे भारतीय संतपरंपरेतील विचारधारा आहे. विशेषतः महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायातील संतांनी व्यक्त केलेले जीवनमूल्यांचे चिंतन होय . संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ,संत तुकाराम आदी संतांच्या अभंगवाङ्मयामध्ये मानवतावादी, समतावादी, आणि नैतिक मूल्यांची अभिव्यक्ती आढळते. ही मूल्ये केवळ आध्यात्मिक किंवा धार्मिक उन्नतीपुरती मर्यादित नसून, ती समाजातील प्रत्येक घटकासाठी समान न्याय, बंधुता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचा आग्रह धरतात. हेच मूल्ये स्वतंत्र भारताच्या संविधानातही केंद्रस्थानी आहेत.

भारतीय संविधान हे आधुनिक भारताचे नैतिक, सामाजिक आणि राजकीय जीवनाचे मूळ असणारा ग्रंथ आहे. महत्वाचे म्हणजे या आधुनिक ग्रंथाच्या मुळाशी असलेली मूल्यदृष्टी, सद्भावना आणि नैतिक अधिष्ठान हे प्राचीन भारतीय आध्यात्मिक परंपरेतून, विशेषतः संतवाङ्मयातून आलेली दिसते. संत साहित्यातील 'वसुधैव कुटुंबकम्' सारखी लोककल्याणाची संकल्पना वैश्विक दृष्टिकोन, सर्वधर्मसमभाव, कर्मयोग व या संविधानातील मूलभूत तत्त्वांना एका अर्थाने अधोरेखित करणारी आहे,म्हणूनच मराठी संतवाङ्मय हे फक्त अध्यात्माचा अभिव्यक्तिपर ठेवा न राहता, भारतीय लोकशाहीच्या मूल्याधिष्ठानाचा गाभा म्हणूनही त्याकडे पाहता येते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. संदीप रंगनाथ तापकीर, मराठी विभाग, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर

How to cite this article:
तापकीर, . संदीप . रंगनाथ . (2025). मराठी संतांच्या रचनेतील सार्वभौमत्व: संविधानातील सार्वत्रिक मूल्यांचा आध्यात्मिक पाया. Journal of Research & Development, 17(9(IV)), 272–276. https://doi.org/10.5281/zenodo.17732825

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732825
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून आपण मराठी संतांच्या वाङ्मयातील सार्वभौम मूल्यांचा शोध घेणार आहोत आणि त्यामधून भारतीय संविधानातील सार्वत्रिक मूल्यांची आध्यात्मिक अधिस्थाने शोधण्याचा प्रयत्न करणार आहोत. सामाजिक समतेचा आग्रह, व्यक्तिस्वातंत्र्याची ओळख, बंधुभावाचे संकेत आणि न्यायाचे अधिष्ठान ही मूल्ये संतकाव्याने किती खोलवर रुजवली आहेत, याचे तात्त्विक विश्लेषण या अभ्यासाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

तत्त्वज्ञानाची आणि आध्यात्मिक साधनेची भूमी म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. या प्रदेशाने नाथ, महानुभाव, जैन, दत्त आणि वारकरी संप्रदायांसारख्या विविध धार्मिक व आध्यात्मिक चळवळी जन्माला घातल्या. यासर्व संप्रदायांचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी केवळ वैयक्तिक मोक्ष साधनेचा आग्रह न धरता, समाजरचनेचे नैतिक भरणपोषण करून कालानुरूप समाजात पसरलेले अवगुण बाजूला करण्यसाठी प्रयत्न केले आणि एका समृद्ध आणि निर्मळ समजाची पुनर्रचनाही आपल्या ध्येयात अंतर्भूत केली. त्यामुळे महाराष्ट्रातील संतपरंपरा ही केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक,अध्यात्मिक,पारमार्थिक आणि नैतिक क्रांतीची वाहक ठरलेली आहे .नाथ संप्रदायाने शरीरशुद्धी आणि आत्मानुभूतीवर भर देत साधकाच्या अंतर्मनाचा विकास साधला, तर महानुभाव संप्रदायाने वर्णभेद, जातिभेद यांना ठाम नकार देऊन सामाजिक समतेचा पुरस्कार केला. जैन संप्रदायाने अहिंसा, अपरिग्रह व संयम या तत्त्वांद्वारे नैतिक जीवनाचा आदर्श मांडला. दत्त संप्रदायाने योग, भक्ती आणि ज्ञान यांचा समन्वय साधत आध्यात्मिक अनुशासनाची शिकवण दिली. आणि वारकरी संप्रदायाने 'नामस्मरण' व 'सर्वांठायी भगवंत' ही समत्वाची भावना जनमानसात रुजवली. या सर्व संप्रदायांची सामूहिक ध्येयधोरणे एकत्रित केल्यास स्पष्ट होते की, त्यांच्या प्रयत्नांचा मूळ हेतू म्हणजे व्यक्तीच्या आचारविचारांत नैतिक परिवर्तन घडवून आणणे आणि अशा सदाचरणशील व्यक्तींच्या समूहातून एक सुसंस्कृत, समताधिष्ठित आणि बंधुत्वनिष्ठ समाज उभारणे हा होता.

आध्यात्मिक चळवळींचे वैशिष्ट्य असे की त्यांनी धर्माचे राजकीय किंवा विधीप्रधान स्वरूप न स्वीकारता, त्याला मानवी जीवनाशी संबंधित नैतिक व चारित्र्यशील मूल्यांचा केंद्रबिंदू मानले. त्यामुळे हे संप्रदाय म्हणजे केवळ धार्मिक मतप्रवाह नव्हे, तर समाजमनातील नैतिक ऊर्जेचे स्रोत आहेत. भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत असलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांना आधीच रुजवून ठेवणारे बीजमंत्र या संप्रदायांनी त्यांच्या सांप्रदायीक साहित्यातून आणि आचरणातून प्रसृत केलेले दिसते.

महाराष्ट्रातील जनमानसाच्या धार्मिक भावविश्वात "पंढरीचा विठ्ठल" हे आराध्य दैवत केवळ एक दैविक प्रतीक नाही, तर एक सामाजिक आणि आध्यात्मिक संकल्पना आहे. या विठ्ठलाला साक्षी मानून वारकरी संप्रदायाने ज्या प्रकारे 'समत्व', 'सार्वभौमत्व', आणि 'मानवतेचा धर्म' या संकल्पना रुजवल्या, त्या भारतीय संविधानातील सार्वत्रिक मूल्यांची पायाभरणी होती हे मान्य करायला हवे.वारकऱ्यांचा 'विठोबा' हा केवळ वैष्णव भक्तांचा देव नाही तर तो सर्व समाजघटकांना समानतेच्या पातळीवर आणणारा, उच्चनीचतेच्या सीमारेषा ओलांडणारी , आणि भक्तीच्या आधारे मानवतेचा नवा धर्म घडवणारा देवस्वरूप सखा आहे .

'भक्त विठोबाचे भोळे त्यांचे पायी ज्ञान लोळे
भक्तीवीण शब्दसान व्यर्थ अवघे ते जाण'[१]

ज्ञानेश्वर आणि नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या गाभ्यात 'समत्वभाव' ठामपणे रुजवला. त्यांनी मानवी अस्मितेची व्याख्या वर्ण, जात, लिंग, अथवा कर्मानुसार न करता, ती ईश्वराशी जोडलेल्या आत्म्याच्या सत्त्वानुसार केली. त्यांच्या अभंग, ओव्या आणि हरिपाठात देवाच्या दृष्टीने सर्व जीव समान आहेत, हे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.सर्व माणसे सारख्याच तोलामोलाची असून वारकऱ्यांचा देवही स्वतःला भक्तांच्या मांदियाळीतील एक सखा मानतो. ही विचारधारा आजच्या मानवाधिकार संकल्पनांचेच बीज आहे.

वेदांनी जिथे शुद्रादिकांना धार्मिक अधिकार, शिक्षण, किंवा सामाजिक प्रतिष्ठेपासून वंचित ठेवले, तिथे संत नामदेवांनी अत्यंत धाडसाने "नको शास्त्रबोध" असे म्हणून पारंपरिक वेदशास्त्रांवर कठोर टीका केली. "नामाचे प्रबंध पाठ करा" असा संदेश देताना त्यांनी वैदिक एकाधिकाराविरोधात समतावादी आणि लोकाभिमुख अध्यात्म मांडले. हे विचार फक्त धार्मिक पातळीवर न थांबता, ते समाजपरिवर्तनाचे घोष बनले.

'न पढावे वेद ,नको शास्त्र बोध 1 नामाचे प्रबंध पाठ करा 11
नव्हे ब्रम्हज्ञान न होय वैराग्य 1 साचा भक्तिभाग्य संतसंगे11'[२]

संत चोखामेळा यांचे जीवन तर हाच सार्वभौमत्वाचा सुखद अनुभव आहे . त्यांनी आपल्या भक्तीने जातीबाह्यतेच्या रूढ संकल्पनांना छेद दिला. 'चोखा चोखट, चोखा चोखट' हे फक्त त्यांचे व्यक्तिनाम नव्हते, तर ते दलित आत्म्याचे विठ्ठलाच्या चरणी असलेले आत्मसमर्पण होते. त्यांच्या मृत्यूनंतर संत नामदेवांनी त्यांच्या अस्थींची प्राणप्रतिष्ठा थेट विठोबा मंदिराच्या महाद्वारात करून, ती जागा केवळ पवित्रतेची नव्हे तर सामाजिक न्यायाची साक्ष देणारी ठरवली. ही कृती म्हणजे प्रतीकात्मक न्याय होता. जिथे अखंड जीवितकाळात महाद्वाराच्या आत जाता न आलेल्या भक्ताच्या स्मृतीला देवाच्या प्रवेशद्वारी स्थान देण्यात आले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

वारकरी संप्रदायाच्या परंपरेचा इतिहास म्हणजे लोकशाही मूल्यांचे आध्यात्मिक उद्घोष आहे. या संतांनी सामाजिक समतेचे जे बीज पेरले, तेच पुढे संविधानात 'समानता', 'बंधुता', आणि 'स्वातंत्र्य' या मूल्यांच्या रूपात अंकुरले. त्यामुळे, विठ्ठलभक्ती ही केवळ भावनेची अभिव्यक्ती राहिली नाही तर, ती भारतीय समाजजीवनाला एका उच्च नैतिक स्तरावर नेणारी अध्यात्मातून जन्मलेली सार्वभौम संकल्पना बनलेली दिसते.

भारतीय सामाजिक इतिहासात मध्ययुग हे स्त्रीविरोधी दृष्टिकोन, रूढी, आणि अन्यायकारक बंधनांचे पर्व मानले जाते. स्त्रीला 'पतिव्रता', 'गृहलक्ष्मी' अशा संकुचित भूमिकांमध्ये अडकवून तिच्या स्वत्वाचा, प्रतिभेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा संकोच करणारा हा काळ होता. अशा परिस्थितीत वारकरी संप्रदायाने स्त्रीच्या आत्मभानाचा नवा सूर छेडला. 'माणूस म्हणून माणसाचे मोल' ही वारकरी विचारसरणी स्त्री-पुरुष भेदभावाच्या पारंपरिक चौकटींना मोडणारी ठरली.

वारकरी संतांनी केवळ तत्त्वज्ञानाच्या पातळीवरच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून स्त्रीला पुरुषांच्या समकक्ष स्थान बहाल केले. मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मला, कान्होपात्रा आणि बहिणाबाई यांसारख्या संत काव्यत्रींनी आपल्या काव्यातून केवळ भक्तिभावच नव्हे तर अस्मिता, आत्मनिर्भरता आणि आध्यात्मिक स्वातंत्र्याचे दर्शन घडवले. वारकरी संतकाव्यत्रींची परंपरा म्हणजे स्त्रीच्या मानसिक मुक्ततेचा आणि आध्यात्मिक आत्मविश्वासाचा जाहीरनामा म्हणायला हवा.उदाहरणार्थ, मुक्ताबाईचे "तीळ तीळ सांडीले अंग" हे आत्मत्यागाचे वर्णन असले तरी त्यामध्ये आत्मसाक्षात्काराची तीव्र झळाळी आहे. जनाबाई आपल्या ओव्यांतून घरकामाच्या साध्या अनुभवांतूनही विठ्ठलाशी गप्पा मारते, म्हणजेच तिला देवाशी थेट आणि सघन संवाद साधण्याचे स्वातंत्र्य आहे – हेच स्त्री-आध्यात्मिक स्वायत्ततेचे मूर्त रूप आहे. सोयराबाई या लौकिक अर्थाने हिनदिन गणल्या गेलेल्या ज्ञातीतील असूनही त्यांच्या अभंगांत भक्ती, तत्त्वज्ञान आणि सामाजिक समतेचा गहिरा सूर जाणवतो. 'कोण तो सोवळा,कोण तो ओवळा,दोन्हीच्या वेगळा विठ्ठल माझा' असे म्हणून त्यांनी वर्णाश्रमी व्यवस्थेला धक्का दिला. कान्होपात्रा ही एका गावाबाहेरच्या वस्तीत राहणाऱ्या गणिकेची मुलगी असूनसुद्धा तिने आपल्या काव्यातून विठ्ठलाशी प्रेमसंबंध प्रकट केले. तिच्या जीवनकथेने, स्त्रीच्या नैतिकतेचे मापदंड पुन्हा मांडले. बहिणाबाईंच्या ओव्या श्रमजीवी स्त्रीच्या आत्मिक विश्वाचे दर्शन घडवितात. या संत काव्यात्रींचे अभंग म्हणजे भक्ती आणि वास्तव यांचा सुंदर संगम आहेत.वारकरी संप्रदाय स्त्रीला केवळ 'भक्त' मानत नव्हता, तर ती 'मानव' म्हणून स्वतंत्र अस्तित्व असलेली आहे, ही जाणीव तिच्यात निर्माण करत होता. त्या काळात जिथे स्त्रीला 'चूल आणि मूल' एवढ्याच विश्वापुरते मर्यादित केले गेले होते, तिथे वारकरी परंपरेने तिच्या आतल्या आवाजाला महत्त्व दिले, तिला आत्मभान दिले आणि धर्माच्या माध्यमातून सामाजिक सन्मान बहाल केला.

वारकरी संप्रदायातील स्त्री-पुरुष समतेचा आग्रह हा आधुनिक भारतीय संविधानातील लिंग-समतेच्या तत्त्वांचा आध्यात्मिक आधार ठरतो. संविधानाने दिलेले 'लैंगिक समानतेचे मूलभूत अधिकार' हे वारकरी संप्रदायातील आत्मभान जागृत करणाऱ्या भक्तिसंप्रदायाच्या इतिहासातील गूढ झळाळीचे आधुनिक स्वरूप म्हणता येईल.

भाषिक तथा सांस्कृतिक उद्घोष :

मराठी संतपरंपरेचा विचार करताना एका गोष्टीकडे लक्ष वेधले जाते,या संतांनी केवळ अध्यात्मिक जागृती केली नाही, तर मराठी भाषेला संस्कारित, समृद्ध आणि समाजाभिमुख बनवले. संत सावता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी यांसारख्या संतांनी त्यांच्या नावासोबत आपल्या जातिवाचक ओळखीचा स्वीकार करत, त्या ओळखीला अध:पात न करता उलट तीच ओळख त्यांच्या काव्यातील आत्मभानाचा स्रोत बनवली. आज जेव्हा जाती आणि व्यवसाय ही लपवून ठेवायची बाब मानली जाते, तेव्हा हे संत अभिमानाने स्वतःची जात आणि व्यवसाय उद्घोषित करतात. ही केवळ सामाजिक क्रांती नसून, ती एक भाषिक विस्ताराची आणि सांस्कृतिक विकासाची घोषणाही आहे.

संतांनी आपल्या व्यवसायाशी निगडित असलेल्या रूपकांचा, उपमांचा आणि प्रतीकांचा वापर आपल्या काव्यनिर्मितीत केला. गोरा कुंभार मृत्तिकाशिल्पातून साधनेसाठी मृदूता आणि कठोरता यांचे तत्त्व सांगतात , तर नरहरी सोनार सुवर्णशुद्धीच्या प्रक्रियेतून आत्मशुद्धीचे दर्शन घडवितात . सावता माळी शेतकऱ्याच्या परिश्रमातून भक्तीची प्रक्रिया समजावतो. अशा या प्रतीकांनी मराठी भाषेला ग्रामीण अनुभवविश्वाची उंची दिली आणि तिच्या अभिव्यक्तीचा कक्षा अधिक व्यापक केली.विशेष म्हणजे, आज भारतीय संविधानात जे भाषासंवर्धनाचे आणि प्रादेशिक भाषांच्या सन्मानाचे तत्त्व स्पष्टपणे मांडले आहे, त्याचे मूर्त स्वरूप संतांनी बाराव्या शतकातच आपल्या कृतीतून आणि लेखनातून दाखवून दिले. त्यांनी मराठी भाषेला मंदिराच्या पंक्तीतून रस्त्याच्या पायरीपर्यंत आणले. त्यामुळेच त्यांच्या योगदानाकडे फक्त धार्मिक परंपरेच्या चौकटीत न पाहता भाषिक समतेच्या ऐतिहासिक प्रक्रियेचा भाग म्हणूनही पाहिले पाहिजे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

या संतांच्या कृतीमुळे मराठी ही केवळ बोलीभाषा न राहता आत्मविष्काराची, समतेची आणि सामाजिक संवादाची सशक्त माध्यम बनली. त्यांच्या काव्याच्या माध्यमातून मराठी भाषेचा सामाजिक पट अधिक समृद्ध झाला आणि उपेक्षित घटकांना भाषिक आत्मभान प्राप्त झाले.

गुरुतत्त्व, समता आणि वारकरी परंपरेतील अंतर्निहित सामाजिक क्रांती

भारतीय अध्यात्मपरंपरेत गुरु ही संकल्पना केवळ वैयक्तिक उद्धाराची नसून ती समाजव्यवस्थेतील सत्तासंपत्तीच्या हस्तांतरणाचीही एक पद्धत होती. पारंपरिक वेदविहित व्यवस्थेनुसार 'गुरुशिवाय मोक्ष नाही' ही मान्यता होती, पण *गुरु होण्याचा अधिकार* केवळ वर्णव्यवस्थेतील विशिष्ट घटकांपुरता मर्यादित होता. तथाकथित 'पापयोनी' ठरवले गेलेल्यांना ना वेदाधिकार होता, ना गुरु मिळवण्याचा हक्क. अशा स्थितीत वारकरी संतपरंपरेतील *परस्पर गुरु-शिष्यत्व* ही एक अपूर्व सामाजिक क्रांती ठरते.

वारकरी संप्रदायाने गुरुशिष्य परंपरेचा जो पुनर्विचार केला, त्यामध्ये केवळ अध्यात्म नव्हे, तर *सामाजिक समतेची अधोरेखित रचना* होती. संत नामदेव, गोरोबा, चोखामेळा, सोयराबाई, सेना महाराज, विसोबा खेचर यांच्यातील संबंध पाहिले तर लक्षात येते की या परंपरेने जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व नाकारले आणि आध्यात्मिक पात्रतेला प्रधानता दिली. गोरोबांनी नामदेवांना "कच्चं मडकं" म्हणून घोषित केल्यावर संत ज्ञानेश्वरांनी त्यांना विसोबा खेचर यांच्याकडे पाठवले — हा प्रसंग केवळ एक अध्यात्मिक प्रबोधन नाही, तर *गुरुतत्त्व democratize करणारा* निर्णायक क्षण ठरतो. हे संबंध केवळ पारमार्थिक नव्हते, तर एक *प्रबुद्ध सामाजिक रचना* होते. नामदेवांनी स्वतः गुरु बनून चोखामेळा, सोयराबाई, निर्मळा, बंका यांना अध्यात्मिक दीक्षा दिली. ही कृती म्हणजे सामाजिक बहिष्कृतांना *आध्यात्मिक अधिपत्य* देण्याची एक प्रगल्भ राजकीय कृती होती. या संतांनी एकमेकांना सन्मान दिला, केवळ तोंडी नव्हे तर *धार्मिक-अधिकार-हस्तांतराच्या* प्रक्रियेतून दिला.

अशा प्रकारे वारकरी संतपरंपरेने सामाजिक अंतराची दारे फोडून आध्यात्मिक समतेचे दरवाजे उघडले. त्यांनी गुरुतत्त्वात अंतर्भूत असलेल्या *अधिकार, प्रतिष्ठा आणि परंपरा* या मूल्यांची पुनर्व्याख्या केली आणि ती "सर्वांच्या उन्नतीसाठी" खुली ठेवली. ही उघडलेली दारेच पुढे *लोकशाही आणि संविधानिक समानतेचे* मूलगामी बीज बनली.

संतांची शिकवण ही केवळ आध्यात्मिक नव्हती, तर ती एक प्रगल्भ सामाजिक न्यायाची भूमिका होती. त्यांनी धार्मिक प्रतीकांचा आधार घेत लोकांना समजेल अशा भाषेत, लोकसंगीत आणि लोकभाषेच्या माध्यमातून, सामाजिक परिवर्तनाचे बीज पेरले. त्यांनी दिलेला 'भक्तीमधील समत्व' हा विचार आजच्या 'लोकशाहीतील नागरिक समत्वा'शी तत्त्वतः सुसंगत आहे.

त्यामुळे संतवाङ्मय हे केवळ भक्तिपंथाचे साहित्य नसून, भारतीय समाजाच्या लोकशाही संक्रमणाच्या प्रक्रियेला खऱ्या अर्थाने दिशा देणारे मूल्यग्रंथ मानावे लागेल. संतांची शिकवण म्हणजे संविधानातील समतेच्या मूल्यांचे ऐतिहासिक भाष्य आहे ,असे म्हटले तर वावगे ठरू नये.

समारोप

भारतीय लोकशाहीची जडणघडण ही केवळ पाश्चात्त्य लोकशाहीच्या संकल्पनांवर आधारित नसून तिच्या मुळाशी संतपरंपरेतील मानवतावादी व समतावादी विचारांचा गहिरा ठसा आहे. महाराष्ट्रातील संतांनी आपल्या अभंग ओव्या व कीर्तन,प्रवचनातून जेव्हा 'सर्व जीव समान'आहेत ही संकल्पना जनमानसात रुजवली, तेव्हा त्यांनी समाजातील जात,धर्म,लिंगभेद यांच्या कृत्रिम सीमा मोडून काढल्या. विठ्ठलभक्तीच्या माध्यमातून त्यांनी समत्व,बंधुता आणि करुणेचा धर्म शिकवला. संतकवयत्रींनी स्त्रीच्या आत्मभानाला अभिव्यक्ती दिली.तर वारकरी परंपरेतील गुरु-शिष्य परंपरेने आध्यात्मिक आणि सामाजिक लोकशाहीची बीजे पेरली.याच मूल्यांची प्रगल्भ जाणीव पुढे भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकारांत आणि उद्देशिकेत उमटली. स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्याय या तत्त्वांचे बीज शतकांपूर्वी संतांनी आपल्या वाङ्मयातून रोवले होते. म्हणूनच संतपरंपरा ही केवळ भक्तीची परंपरा नसून ती भारतीय लोकशाहीचा आध्यात्मिक पाया आहे,असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रयुगाच्या पार्श्वभूमीवरही संतांचे विचार अधिकाधिक महत्त्वाचे ठरतात. कारण ते आपल्याला स्मरण करून देतात,खरी लोकशाही ही केवळ कायद्याच्या चौकटीत नसून ती समाजमनात रुजलेल्या समानतेच्या बंधुत्वाच्या आणि करुणेच्या भावनेत असते. त्यामुळे मराठी संतवाङ्मयाचा अभ्यास हा केवळ साहित्यिक वा धार्मिक नव्हे तर लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि समाजातील मानवतेचा पाया भक्कम करण्यासाठी अत्यावश्यक ठरतो.

निष्कर्ष :

मराठी संतवाङ्मयाने मानवता, समता, बंधुता व स्वातंत्र्य ही लोकशाहीची बीजे शतकांपूर्वी रुजवली, म्हणूनच भारतीय संविधानातील सार्वत्रिक मूल्यांचा खरा आध्यात्मिक पाया संतपरंपरेतच आढळतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भ:

1. नामदेव अ.क्र.२०२२,समा.सकलसंत गाथा,र.रा.गोसावी प्रत,सारथी प्रकाशन,पुणे,२०००
2. नामदेव अ.क्र.२०३८,समा.सकलसंत गाथा,र.रा.गोसावी प्रत,सारथी प्रकाशन,पुणे,२०००

साधन ग्रंथ :

1. गं.बा.सरदार,' संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती ,मराठी साहित्य परिषद प्रकाशित ,जानेवारी-१९७०
2. र.बा.मंचरकर,"धर्म संप्रदाय आणि मराठी वाङ्मय" ,प्रतिमा प्रकाशन,प्रथम आवृत्ती,पुणे,डिसेंबर-२०००
3. ल.रा.पांगारकर,"मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड-१"विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,आवृत्ती दुसरी,पुणे-१९७२
4. ज.र.आजगावकर,श्री.संत नामदेव महाराज आणि त्यांचे समकालीन संत",मुंबई,१९२५
5. सं.रं.तापकीर,"संतांचे भक्ती आंदोलन",स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे,प्र.आवृत्ती -२०१३

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

संत साहित्य व भक्ती चळवळीविषयी भिन्न विचारप्रवाह

सहा. प्रा. नील जनार्धन नागभिडे
इतिहास विभाग रामकृष्ण परमहंस
महाविद्यालय, धाराशिव
Email: nagbhide.nil@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170958
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 277-280
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

गोषवारा

तेराव्या शतकातील संत ज्ञानेश्वरापासून प्रारंभ झालेली वारकरी भक्तीचळवळ सतराव्या शतकातील संत तुकारामाच्या कालखंडात सर्वोच्च स्थानी होती. संतसाहित्याचा प्रमुख उद्दिष्ट समाजात समता, बंधुता, धर्मनिरपेक्षतासह पारमार्थिक कल्याण निर्माण करणे हे होते. मात्र या संत चळवळींनी स्वकालीन सामाजिक व धार्मिक बदल प्रत्यक्षात निर्माण केलेले दिसून येत नाही, उदा. वारकरी वारीच्या दरम्यान जातीपाती विसरून एकमेकांच्या भेटी घेतात मात्र हेच वारकरी त्यांच्या मूळ गावी गेले असता जातव्यवस्थेचे कठोर पालन करताना दिसून पडतात. तेव्हा या पार्श्वभूमीवर समकालीन परिस्थितीतील प्रश्नांना सोडविण्यासाठी संतांनी कोणता प्रयत्न केला आहे, याविषयी वेगवेगळ्या विचारप्रवाहांनी सातत्याने प्रश्न विचारला आहे तद्नुषंगिक टीका करताना, 'संतचळवळीने प्रस्थापित व्यवस्थेलाच मजबूत करणाचे काम केले आहे', 'संतांनी टाळ कुटण्याशिवाय कोणतीही जागृती घडवून आणली नाही', तर काही अभ्यासकांनी 'संतचळवळीच्या साहित्याच्या माध्यमातून छ. शिवाजी राजे यांच्या राज्यस्थापनेची पार्श्वभूमी तयार झाली.' या व अशा दोन टोकाची भूमिका आपणास संतचळवळीचे अवलोकन करताना प्रकर्षाने दिसून पडते, तेव्हा या भिन्न विचारप्रवाहांचा संक्षिप्त विश्लेषण या लेखात करण्याचा हेतू आहे.

महत्त्वाचे शब्द :- वारकरी, भक्ती, पारमार्थिक, समन्वयवादी, बहुजनवाद जातीसंस्था, अस्पृश्यता, सामाजिक समता, शूद्रातिशूद्र, चातुर्वर्ण्यव्यवस्था, अव्दैतपंथ, जहाल राष्ट्रवादी

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील वारकरी संतपरंपरेचा उदय तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात यादवांच्या राजवटीत झाला.[१] हा कालखंड ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत विशेष तेजस्वी स्वरुपात आढळते. पुढच्या संतांनी संतसंप्रदाय चालू ठेवला, त्यात मौलिक भर घातली नाही त्यामुळे संतचळवळीच्या साधारणतः तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतच्या कालखंडास तेजस्वी व उज्वल कालखंड संबोधल्या जाते. संत ज्ञानेश्वराच्या एक शतक आधी कर्नाटकातील संत बसवेश्वर आणि चक्रधर स्वामी यांनी समाजजीवनातील चातुर्वर्ण्यव्यवस्थेविरोधात बंड केले होते म्हणजेच साधारणतः बारावे शतक वैचारिक संक्रमण, परिवर्तनाच्या पूर्वसूचनेचा भावी काळ होता. हे वैचारिक परिवर्तन केवळ महाराष्ट्र किंवा हिंदुस्थान मध्येच घडत होते असे नव्हे तर ह्या प्रकिर्येचा प्रारंभ युरोपमध्ये देखील झालेले आढळते. जॉन वायक्लिफने बिर्टनमध्ये धर्मसंस्थेला आव्हान देऊन बायबलचे इंग्रजी भाषेत भाषांतर केले तर महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांनी मराठीभाषेत ज्ञानेश्वरी लिहिली. जर्मनीत जॉन हस, मार्टीन ल्यूथर यांनी धर्मसंस्थेतील भ्रष्ट आचरविचारावर टीका करून त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला तर इथे संत नामदेव, संत तुकाराम आक्रमक भूमिका घेताना दिसून येते, असे जरी असले तरी मध्ययुगीन महाराष्ट्रातील समकालीन परिस्थितीच्या मर्यादा त्यांनासुद्धा लागू पडतात तेव्हा संतचळवळीत चातुर्वर्ण्यावर आघात करावा, जातीव्यवस्था नष्ट करावी अशाप्रकारची सामाजिक क्रांती अभिप्रेत नव्हती तर सामान्य बहुजनांना ब्राह्मणी व्यवस्थेच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणे अभिप्रेत होते. परिणामी संतचळवळ व संतसाहित्य पारमार्थिक समानता आणि व्यवहार यात भेद करते म्हणून, या अनुषंगाने पुढील काळात म्हणजेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकात संतसाहित्य व संतचळवळीविषयी विभिन्न वैचारिक प्रवाह उदयास येऊन त्यांनी या संदर्भात काही विशिष्ट भूमिका मांडलेली

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सहा. प्रा. नील जनार्धन नागभिडे, इतिहास विभाग रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव

How to cite this article:
नागभिडे, . नील . जनार्धन . (2025). संत साहित्य व भक्ती चळवळीविषयी भिन्न विचारप्रवाह. Journal of Research & Development, 17(9(IV)), 277–280. https://doi.org/10.5281/zenodo.17732909

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17732909
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

आढळते त्या भूमिकेचा संक्षिप्त आढावा या लेखात घेण्याचा प्रयत्न आहे.

संतसाहित्य व महात्मा फुले :-

मध्ययुगीन वारकरी भक्तीचळवळ आणि संतसाहित्याकडे सामाजिक परिप्रेक्ष्यातून बघण्याचा प्रारंभ साधारणतः एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाले. या कालखंडात ब्रिटिश वासाहतिक राजवटीच्या धोरणांचा परिणाम स्वरूप एतद्देशीय सामान्यजनासाठी इंग्रजी माध्यमातील शिक्षण उपलब्ध करून देण्यास प्रारंभ झाला याचा परिणामस्वरूप समाजातील उपेक्षित, वंचितसमूहापर्यंत शिक्षणाचा प्रवाह पोहचणे आणि या शिक्षणातून आत्मभान आलेल्या व्यक्तीसमूहाकडून प्रस्थापित धर्मग्रंथ, आचारविचार पद्धतीसह मध्ययुगीन वारकरी संतचळवळीने सामाजिक जीवनातील अमानुष प्रथा, परंपरा नष्ट करण्यासाठी कोणते कार्य केले, याचे मूल्यमापन करण्याचा प्रारंभ साधारणतः एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले यांच्या लेखनातून झाल्याचे आपणास प्रकर्षाने निदर्शनास आणता येईल.

महात्मा फुल्यांच्या लिखाणाची काही वैशिष्ट्ये नोंद करताना आपणास असे लक्ष्यात येते की, त्यांनी जे काही लिखाण केले ते लिखाण मुळात कोणाच्या आदेशाने किंवा मार्गदर्शनाखाली न करता, त्यांच्या डोळ्यासमोर जी सामान्य माणसे होती म्हणजेच शूद्र - अतिशूद्र व स्त्री समूह यांच्या प्रश्नांना उघड्या डोळ्यांनी बघून त्याविषयी विचारचिंतन करून, त्याची पानेमूळं शोधण्याचा प्रयत्न तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात ब्राह्मणी वर्चस्वाच्या शोषणात्मक व्यवस्थेच्या विरोधात करताना दिसतात. म. फुल्यांच्या लिखाणासंदर्भात हे नोंद करण्याचा मथितार्थ एवढाच की, त्यांना कोणी गुरू, प्रेरक शक्ती वा मार्गदर्शक नव्हता. त्यांचे जे काही लिखाण उपलब्ध आहे, ते त्यांच्या वेगवेगळ्या टप्प्यावर प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान आणि शूद्र – अतिशूद्र यांच्यात जागृती, आत्मभान आणण्याच्या गरजेतून निर्माण झाले आहे.

या प्रक्रियेचा भाग म्हणून त्यांनी वारकरी संतचळवळ व संतसाहित्याचे सामाजिक परिप्रेक्ष्यातून मूल्यमापन करताना 'शेतकऱ्याचा असूड - १८८३' व 'सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक – १८९१' या ग्रंथात आपणास त्यांची भूमिका पाहावयास मिळते. 'आर्य मुगुटमण्यातील महाधूर्त शंकराचार्यांनी बौद्ध धर्मी सज्जनाबरोबर नानाप्रकारचे वितंडवाद घालून त्यांचा हिंदुस्थानात मोड करण्याविषयी दीर्घ प्रयत्न केला..... बौद्ध धर्माचा पाडाव झाल्यानंतरच्या काळात हजरत महंमद पैगंबराचे जहामर्द शिष्य, आर्य भटांचे कृतिर्‌मि धर्मासहित सोरटी सोमनाथासारख्या मूर्तीचा तरवारीचे प्रहारांनी विध्वंस करून, शूद्र शेतकऱ्यांस आर्यांचे ब्रह्मकपटांतून मुक्त करू लागल्यामुळे, भटब्राह्मणांतील मुकुंदराज व ज्ञानोबांनी भागवतबखरीतील काही कल्पित भाग उचलून त्यांचे प्राकृत भाषेत विवेकसिंधु व ज्ञानेश्वरी या नावांचे डावपेची ग्रंथ करून शेतकऱ्यांची मने इतकी भ्रमिष्ट केली की, ते कुराणासहित महमदी लोकांस नीच मानून त्यांचा उलटा व्देष करू लागले. नंतर थोडा काळ लोटल्यावर तुकाराम या नावाचा साधु शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला. तो शेतकऱ्यांतील शिवाजीराजास बोध करून त्याचे हातून भटब्राह्मणांच्या कृतिर्‌मी धर्माची उचलबांगडी करून शेतकऱ्यास त्यांच्या पाशातून सोडवील, या भयास्तव भटब्राह्मणांतील अट्टल वेदांती रामदासस्वामींनी महाधूर्त गागाभटाचे संगन्मताने अक्षरशून्य शिवाजीचे कान फुंकण्याचे सट्टल ठरवून, अज्ञानी शिवाजीचा व निस्पृह तुकारामबुवांचा पुरता स्नेहभाव वाढू दिला नाही...'[२] अशा प्रकारे ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व समाजजीवनावर कायम ठेवण्यासाठी व ओघाने जातीव्यवस्था आणि तदनुषंगिक सांस्कृतिक शोषणात्मक व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी संतसाहित्य कारणीभूत झाले आहे, अशी संतसाहित्याच्या सामाजिक कार्याची मीमांसा महात्मा फुले करताना निदर्शनास येते. या सोबतच पुढे 'सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक' यामध्ये – '...पुढे काही काळाने जेव्हा जाहामर्द मुसलमान लोकांचे या देशात राज्य झाले तेव्हा अज्ञानी शुद्रादि अतिशूद्र पवित्र कुराणातील सार्वजनिक सत्य पाहून मुसलमान होऊ लागतील, या भयास्तव धूर्त देशस्थ आळंदीकर ज्ञानोबाने तो गीतेतील बोध उचलून त्याच्यावर ज्ञानेश्वरी नावाचा ग्रंथ केला. तो सर्व अक्षरशः वाचून पाहिल्याबरोबर धूर्त आर्य धर्माचे पाचपेची आंधळे भारूड सर्व लोकांच्या ध्यानात सहज येईल.'[३] महात्मा फुले यांनी संतसाहित्याविषयी ही भूमिका घेतली असली तरी त्यांच्या या दृष्टिकोणासंदर्भात आपणास ग. बा. सरदार यांच्या 'संत वाङ्.मयाची सामाजिक फलश्रुति' या पुस्तकातील भूमिका नोंद करता येईल की, 'महात्मा फुले यांची धर्म, राष्ट्र या विषयीची एक विशिष्ट भूमिका आहे व सोबतच समाजातील वंचित, उपेक्षित असलेल्या शूद्रातिशूद्र समूहाची मुक्तता करण्याचे त्यांचे उद्दिष्टे असल्यामुळे संतसाहित्य व इतिहास याविषयी काहीसे अपवाचन करून संतसाहित्याच्या सामाजिक कार्याविषयीचे हे निष्कर्ष काढले आहे असे म्हणता येईल.'[४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर - संतांची सामाजिक समता :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भक्ती संप्रदायातील संताच्या योगदानासंदर्भात विचार व्यक्त करताना असे नोंद करतात की, या देशातील अस्पृश्यता नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा पहिला प्रयत्न प्राचीन कालखंडात गौतम बुद्धाने केला त्यांनी आपल्या भिक्षुवर्गात सर्व जातीच्या लोकांस प्रवेश दिले होते. 'उदा. स्थविर नावाच्या एका भंग्यास बुद्धाने आपल्या भिक्षुवर्गात घेतल्याची कथा सुप्रसिद्ध आहे'.[५] परंतु बौद्ध धर्माचा पाडाव झाल्यानंतर सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या कार्याची पिछेहाट होऊन – अव्दैतपंथाची स्थापना करणाऱ्या शंकराचार्यांनी व्यावहारिक व पारमार्थिक असे आचरणाचे दोन भेद करून समतेचा प्रकार हा केवळ पारमार्थिक स्थितीपुरता मर्यादीत केला, अशा प्रकारे समता या तत्त्वावर मर्यादा लादल्यामुळे व्यावहारिक जीवनात भेदाभेद वाढत गेला. कालौघात श्रीरामानुजाचार्य यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या कार्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे, उदा. चांडाळ स्त्रीस आणि धनुर्दास ह्या अस्पृश्यास आपल्या पंथाची दीक्षा दिली होती. तसेच यादवगिरीवर नारायणाचे देऊळ जेव्हा बांधिले तेव्हा त्यात सर्व अस्पृश्य लोकांचा प्रवेश व्हावा अशी योजना करून ठेवली होती.'[६] व मंदिर जवळच्या तळ्यात सर्व अस्पृश्यांना स्नान करण्याची परवानगी होती. तर आचार्य रामानंद यांनी अस्पृश्यतानिवारणविषयी बरिचशी कामगिरी केली. आपल्या बारा शिष्यांच्या माध्यमातून त्यांनी जो कार्यक्रम राबविला होता ते सर्व शिष्य निम्न जाती समूहातून आलेले होते. आचार्य रामानंदाप्रमाणेच चैतन्य महाप्रभू यांनी स्पर्शास्पर्श भेद नष्ट करण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून त्यांनी पुरीमधील जगन्नाथाचे मंदिर अस्पृश्यांना प्रवेशासाठी मोकळे केले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भक्तीसंप्रदायातील वरिल संतांनी अस्पृश्यता नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असला तरी तत्कालीन समाजाच्या काही एक मर्यादांची चौकट त्यांना पूर्णत: नष्ट करता येत नव्हते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या योगदानासंदर्भात 'पुढे सोळाव्या शतकात साधुसंतांनी सत्यशोधकी कुऱ्हाडीचे किती तरी घाव घातले तरी अस्पृश्यतारूपी फोफावलेला वृक्ष त्यांच्या हातून तोडला गेला तर नाहीच पण त्याचे पान सुध्दा त्यांच्याने हलले नाही.'[७] असे मत व्यक्त करताना दिसून पडतात.

वि. का. राजवाडे यांची संतसाहित्यविषयक भूमिका :-

'निबंधमाला'कार विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या विचाराच्या प्रभावातून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जहाल राष्ट्रवादी विचारसरणीचा उदय महाराष्ट्र होऊन स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश याविषयीची अस्मिता सामान्यजनात जागृत करण्याचे प्रयत्न या कालखंडात एतद्देशीय बुद्धीजीवी वर्गाकडून सुरू झाले आणि या प्रयत्नाचा भाग म्हणून मराठ्यांच्या इतिहासाची साधने संकलित करण्याचे प्रयत्नांना अधिक प्रमाणात चालना मिळून सन.१८९८ मध्ये 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड स्वरुपात प्रकाशित करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. या खंडांना लिहिलेल्या प्रस्तावनेत विशेषत: खंड ४ मध्ये वि. का. राजवाडे यांनी संतसाहित्याच्या सामाजिक कार्याविषयी जे मत, विचार व्यक्त केले त्यामुळे संत साहित्याच्या सामाजिक योगदानासंदर्भात विभिन्न विचारप्रवाह उदयास आल्याचे नोंद करता येईल. ते टीकात्मक विचार पुढील प्रमाणे- 'ह्या भक्तीपंथाची स्थापना महाराष्ट्रात तेराव्या शतकात झाली. संताळयांची ही स्थापना झाल्यावर काही काळाने देवगिरी येथील मराठ्यांचे राज्य नष्ट झाले व यवनांची सत्ता महाराष्ट्रात तीनशे वर्षे म्हणजे १२४० ते १५४० .....या तीन शतकात संताळयांचे प्राबल्य महाराष्ट्रात फार होते. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगुपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच होय. संताला खाणे नको, पिणे नको, वस्त्र नको. एक विठोबा मिळाला म्हणजे सर्वकाही मिळाले. ऐहिक सुख दु:खे, ऐहिक सुखोपभोग, ऐहिक व्यवहार यात मन घालने संतांचे काम नव्हे. इहलोक हा संतांचा नव्हेच.... ह्या संतमंडळींच्या हाती विचाराच्या दिशा जाऊन महाराष्ट्र पंगू बनत राहिले.'[४] इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या या भूमिकेचा साररूपाने अर्थ असा होता की, भक्तीपंथीय वारकरी संतांनी समाजाला टाळकुटे बनवून वास्तव परिस्थितीला समोर न जाता, पलायनवादी मार्ग स्विकारण्याच्या प्रवृत्तीचा प्रारंभ या संतसाहित्यातून झाल्याचे सांगू पाहतात. वि. का. राजवाड्यांच्या भूमिकेचा सूर पु. ग. सहस्त्रबुध्दे, द. के. केळकर, यशवंत मनोहर, रावसाहेब कसबे यांसारख्या अभ्यासकांच्या संतसाहित्याच्या मूल्यमापनात पुढेही उमटत राहिलेले लक्षात येते.

न्या. रानडे – समन्वयवादी भूमिका :-

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील ब्रिटिश वसाहतवादी राजवटीच्या राजकीय वर्चस्वाच्या प्रभावातून महाराष्ट्रातील सुशिक्षित बुध्दिजीवी मध्यमवर्गात पुनरूज्जीवनशील राष्ट्रवादाचे महत्त्व वाढत होते, एवढेच नव्हे तर तत्कालीन आधुनिक संकल्पना ऐतिहासिक व्यक्ती, घटना व चळवळ यावर लादण्याची प्रवृत्ती वृद्धिंगत होत होती याचा परिणाम या प्रवाहामधील व्यक्तींना छ. शिवाजी राजे स्वातंत्र्यवादाचा प्रणेता आणि संत रामदास राष्ट्रवादाचे प्रवक्ते वाटत होते, तर संत तुकारामाचे 'तुका म्हणे तोची संत। सोशी जगाचे आघात' यासारख्या सहिष्णूता व सहानुभूतीच्या शिकवणीपेक्षा 'मराठा तितुका मेळवावा। आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा', 'सामर्थ्य आहे चळवळींचे। जो जो करील तयांचे' यासारखी पराक्रमाची आणि प्रतिकाराची शिकवण सर्वांना अधिक प्रेरणादायी वाटत होती.

अशा या पार्श्वभूमीवर न्या. महादेव गोविंद रानडे यांनी सामाजिक जीवनव्यवहारात भक्तीपंथीय वारकरी संत व संतसाहित्याची फलश्रुति काय आहे? संतांनी केवळ पारमार्थिक सुखाकडेच विचार केंद्रीत केले होते काय? महाराष्ट्रातील वारकरी भक्ती पंथ वा चळवळ आणि युरोपातील धर्म सुधारणा चळवळ याच्यात तुलना करून त्यातील साम्य व भेद निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करताना इतिहासाचे पुनर्मूल्यमापन करावयचे आहे, पुनर्रचना करावयाचे नाही ही गोष्ट दृष्टिआड होऊ न देता समतोल मांडणी करताना दिसून पडतात.

न्या. रानडे यांच्या मतान्वये तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतच्या महाराष्ट्रामधील भक्ती चळवळीने आध्यात्मिक गुणाची मंद गतीने वाढ करीत एकमेकांना कमी लेखणाऱ्या जातीभेदाची तीव्रता पुष्कळशी कमी केली सोबतच बहुजन समाजातील व्यक्तींना वारकरी चळवळीत समावेश करून त्यांना अध्यात्मिक पुण्याई, सामाजिक महत्त्व आणि संताचा दर्जा प्राप्त करून दिला. तसेच संत चळवळ आणि युरोपमधील प्रोटेस्टंट धर्मसुधारणा चळवळ यांची तुलना करताना 'खिर्स्तीधर्माने मानव जातीच्या पापांच्या परिशमनार्थ दु:खभार वाहणारा दयावंत अवतार येशू खिर्स्ताच्या रूपाने उभा केला... तर संताचा देव हा माता, पिता, बंधू, सखा आहे.' [९] असा उल्लेख करून दोन्ही चळवळीमधील समान धागा म्हणजे या चळवळींनी पुरोहितशाहीविरूध्द बंड केले, प्राचीन अभिजन भाषांमधील धर्मग्रंथ लोकांच्या भाषेत उपलब्ध करून, सामान्यजनांना धर्माचे खरं स्वरूप आणि धर्माची द्वारे मोकळी करून दिली. असे असले तरी युरोपमधील धर्मसुधारणा चळवळीमधील सुधारकांनी स्वत:ची धर्मपीठे स्थापन केली आणि सामान्यजनांच्या विवेकबुद्धीला धर्मपीठाला बांधून ठेवली तर संत चळवळीने सामन्यांच्या विवेकबुद्धीला स्वतंत्र ठेवले. युरोपीय धर्मसुधारकांची इतर धर्म संप्रदायाविषयी असहिष्णु प्रवृत्ती आढळते तर महाराष्ट्रीय संतांमध्ये प्रकर्षाने परधर्म सहिष्णु प्रवृत्ती दिसून पडते. एकंदरित न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारात समन्वयवादी भूमिका आढळते.

निष्कर्ष :-

वारकरी संतचळवळ आणि साहित्यासंदर्भातील भिन्न विचारप्रवाहांचा आढावा घेतल्या नंतर आपणास या निष्कर्षाप्रत येता येईल, की कोणत्याही चळवळीस वा साहित्यास स्वकालीन काळाच्या सीमा, मर्यादा असतात. तेराव्या शतकाचा उत्तरार्ध हा वैदिक संस्कृतीच्या दृष्टिने धर्मऱ्हास व सामाजिक अवनतीचा कालखंड होता. तेव्हा अशा परिस्थितीत सांस्कृतीक अध:पतनाला तोंड देण्यासाठी हिंदुस्थानच्या भिन्न भिन्न प्रदेशात लोकभाषेतून भक्तीमार्गाचा प्रचार करणारे संत उदयास आले होते. समाजजीवनातील अभिजन व बहुजन तटबंदीत विभागलेल्या व्यक्तीसमूहास समन्वयवादी भूमिकेतून उदात्त जीवनमूल्याची शिकवण दिली. संतचळवळीच्या साहित्यातून पारमार्थीक उद्दिष्ट्यासह समाजातल्या अपप्रवृत्तींवर प्रकाश टाकून त्यापासून दूर राहण्याचा आणि सत्प्रवृत्ती जोपासण्याचा, जीवनव्यवहात अंमलात

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

आणण्याचा उपदेश केला गेला आहे. तेव्हा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकात काही भिन्न विचारांचा टीकात्मक प्रवाह दृष्टिस येत असला तरी प्रत्येक विचार हा स्वकालीन परिस्थितीतून उद्भवत असतो आणि त्या विचारास तत्कालीन परिस्थितीच्या काही मर्यादा असतात, असे शेवटी आपणास या निष्कर्षाप्रत येता येईल.

संदर्भ ग्रंथ :-

1. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे)संपा.(,: 'मराठ्यांचा इतिहास', खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. क्र.७०.
2. फडके य. दि. (संपा.)महात्मा फुले : समग्र वाङ्मय – शेतकऱ्याचा असूड', आवृत्ती पाचवी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१. पृ. क्र. २६६.
3. कित्ता - पृ. क्र. ४७३.
4. सरदार ग. बा. : 'संत वाङ्.मयाची सामाजिक फलश्रुती', आवृत्ती चौथी, लोकवाङ्.मय गृह मुंबई,१९८२, पृ. क्र. अकरा (प्रस्तावना).
5. नरके हरी, म. ल. कासारे.,(संपा.): 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १९ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२० ते १९२८', डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र - साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृ. क्र.१५१.
6. कित्ता - पृ. क्र.१५२.
7. कित्ता - पृ. क्र.१५३.
8. राजवाडे वि. का. (संपा.),: 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', खंड ४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, प्रस्तावना (पृ. क्र. २६९).
9. सुंठणकर बा. रं.,: 'महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य', पॉप्युलर बुक डेपो, आवृत्ती दुसरी, मुंबई, १९९४, पृ. क्र. ३०.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधानातील आर्थिक न्याय:- सिंहावलोकन

प्रा. बर्वे सिद्धार्थ भागाजी
सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग,
महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा

Manuscript ID:
JRD -2025-170959
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 281-284
Sept. 2025

सारांश:

भारतीय स्वातंत्र्याची *75* वर्षे पूर्ण होत असताना या अमृत महोत्सवी वर्षात भारतीय लोकशाहीने स्वातंत्र्यपूर्व काळात निर्धारित केलेली आणि भारतीय संविधानात नमूद केलेली कोणती उद्दिष्ट पूर्ण केली हे जाणून घेणे आवश्यक ठरते. मानवी जीवनात अमुलाग्र स्वरूपाचे बदल घडून आले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये *1991* सालापासून आजवर कोणत्या स्वरूपाचे बदल देशात घडून आले, त्याचा भारतीय लोकशाहीवर तसेच लोकशाही मूल्यांवर झालेला परिणाम अभ्यासणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, आर्थिक न्याय, लोकशाही, सामाजिक न्याय, कल्याणकारी राज्य, जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, मिश्र अर्थव्यवस्था, भांडवलशाही, समाजवाद, सार्वभौमत्व, संविधान सभा, समानता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय.*

Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

प्रस्तावना:

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या दिमाखाने साजरा झाला. लोकशाही प्रजासत्ताकाची 75 वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने लोकशाहीच्या 75 वर्षांच्या वाटचालीचा मागोवा घेणे यथोचित ठरू शकते. एखाद्या देशातील 75 वर्षांची वाटचाल अभ्यासणे त्या राष्ट्राच्या दृष्टिकोनातून वास्तव ठरू शकते कारण, 75 वर्षांचा कालखंड त्या अर्थाने यथायोग्य कालखंड ठरू शकतो. म्हणून भारतात लोकशाही व्यवस्था स्थापन झाल्यापासूनच इतिहासाची समीक्षा करणे आवश्यक ठरते.

75 वर्षांच्या ऐतिहासिक काळाचा मागोवा घेऊन त्याची समीक्षा करणे ही जरी जिकीरीची प्रक्रिया असली तरी समीक्षा किंवा परीक्षण करताना बदलत्या परिस्थितीचे भान ठेवून तटस्थपणे टीकात्मक परीक्षण करून विषयाला न्याय देता येऊ शकतो.

संविधानाची पार्श्वभूमी :

भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या 75 वर्षांच्या वाटचालीचे विश्लेषण करणे अगोदर तिची पार्श्वभूमी अभ्यासणे आवश्यक आहे आणि म्हणून लोकशाही व्यवस्थेचा ऐतिहासिक मागोवा घेतल्याशिवाय आजच्या लोकशाही व्यवस्थेचे विश्लेषण आणि मूल्यमापन करणे अवघड ठरू शकते भारतीय लोकशाहीची पाळेमुळे ही प्राचीन इतिहासामध्ये आढळून येतात आज आपण जी लोकशाही व्यवस्था अभ्यासतो तिच्या वाटचालीचा आढावा घेता घेता त्या व्यवस्थेचा सिद्धांत व व्यवहार तपासणी आणि त्याच व्यवस्थेचा सिद्धांत आणि प्रत्यक्ष व्यवहारिक वाटचाल तपासणी क्रमप्राप्त ठरते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. बर्वे सिद्धार्थ भागाजी, सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा

How to cite this article:
बर्वे, . सिद्धार्थ . भागाजी . (2025). भारतीय संविधानातील आर्थिक न्याय:- सिंहावलोकन. Journal of Research & Development, 17(9(IV)), 281–284. https://doi.org/10.5281/zenodo.17733157

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17733157
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारतीय लोकशाहीची उगमस्थाने:

भारतीय लोकशाहीची वर्तमान स्थिती आणि प्राचीन भारतातील वर उल्लेख केलेली भारतीय प्राचीन परंपरा आणि ग्रीसमधील नगर राज्य गणराज्य यांचा आधुनिक लोकशाहीशी कोणताही संबंध नाही.

भारतीय लोकशाहीची मिमांसा करताना तिची पूर्वपिटिका समजून घेणे आवश्यक ठरते त्यासाठी संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, मौलाना आझाद यांच्यासह संविधान सभेतील सर्व विद्वान सभासदांचे मोलाचे योगदान राहिले आहे. आज भारतीय संविधानाच्या संदर्भात टीका टिप्पणी करणारे संविधान सभेतील कार्यपद्धती तेथे संपन्न झालेली चर्चा, पारित झालेले ठराव, वैचारिक भेद, मूल्य संघर्ष यांचा दोन वर्षे 11 महिने 18 दिवसाचा बौद्धिक वैचारिक मूल्यात्मक संघर्ष न अभ्यासता उथळपणे टिप्पणी करतात ही अत्यंत खेदाची बाब आहे. भारतीय लोकशाहीचा आधार भारतीय संविधान आहे. जगातील सर्वात मोठे संविधान भारतासारख्या खंडप्राय देशासाठी की ज्या देशात सर्वार्थाने विविधता आहे. ज्या देशात प्रस्थापित मूल्य, विषमता, भेदभाव, वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद, धर्मभेद, अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, बुरसटलेले विचार अनेक धर्म, अनेक पंथ, सरंजामी विचारव्यवस्था, एकाच वेळी प्राचीन मध्य आणि आधुनिक युगाचे वास्तव दर्शन घडवणारी प्रस्थापित व्यवस्था अशा जुलमी व्यवस्थेला झुगारून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यावर आधारित अखंड भारताची एकात्मता राखून धर्मनिरपेक्ष व्यवस्था जी नवीन मूल्यावर आधारित असेल अशी व्यवस्था प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान संविधानकर्त्यांनी स्वीकारले होते.

संविधानातील तरतुदी:

संघराज्य रचना, एकेरी नागरिकत्व, मूलभूत अधिकार, व्यक्ती स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, अल्पसंख्यांकांचे संरक्षण, आदर्शतत्वे, कर्तव्य, संसदीय शासन व्यवस्था आधिकाराच्या विभागणीत केंद्रास दिलेले झुकते माप, स्वतंत्र न्यायव्यवस्था, स्वतंत्र निवडणूक आयोग, प्रौढ मताधिकार, सार्वभौम रचना, संसद, एक घटक राज्य विधिमंडळे, मंत्रिमंडळाची रचना, इत्यादी भारतीय संविधान प्रक्रिया, तरतुदी, संविधान सभेतील चर्चा, याचा परामर्ष घेतल्याशिवाय भारतीय लोकशाहीचे आकलन पुढे जाऊ शकत नाही.

भारतीय लोकशाहीच्या 75 वर्षातील वाटचालींचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी उद्दिष्टांचा ठराव मांडताना दिलेले आश्वासन, नियतीशी केलेला करार, संविधान सभेत व्यक्त केलेला विचार, संविधानाच्या पहिल्याच पानावर मांडलेली प्रस्तावना किंवा सरनामा त्याद्वारे दिलेले अभिवचन, संविधानाच्या मुख्य गाभा म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय स्थापित करण्याचे अभिवचन, राष्ट्रीय एकात्मता तसेच दुसऱ्या विभागात दिलेला नागरिकत्वाचा अधिकार, सहकार तत्वावर आधारित संघराज्य त्याचप्रमाणे 11 व्या कलमात दाखविलेले संविधानातील हक्क, मूल्य, रूढी, परंपरा, कायदे व्यवस्था इत्यादी रद्दबादल करण्यासंबंधीची तरतूद, मूलभूत अधिकार, समता, व्यक्तिला केंद्रीभूत मानून स्थापित नवीन व्यवस्था व्यक्ति स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्ष, अल्पसंख्यांकांचे हक्क, न्यायालयीन उपाय योजना, आदर्श तत्वांची अंमलबजावणी, नव्याने जोडण्यात आलेली कर्तव्य इत्यादीचा विचार करावा लागतो.

संविधानाची 75 वर्षे आणि आर्थिक न्याय:

मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून भारताने कमकुवत अर्थव्यवस्थेला व भांडवलदारांना मदत करून सरकारनेच पुढाकार घेऊन मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून हरितक्रांती घडविण्यात यश मिळवले आहे. मिश्र अर्थव्यवस्था तत्कालीन परिस्थितीवर मात करण्याचा एकमेव उपाय होता. याउलट, ज्या देशांनी साम्यवाद व भांडवलशाहीचा आधार घेतला त्या व्यवस्था , कोलमडल्या गेल्या. त्यांनी मोठे प्रकल्प उभारले. कृषी क्षेत्रात प्रगती केली. हरितक्रांतीची यशस्वी वाटचाल केली. सहकार नावाचा अधिकार गाजवून ग्रामीण अर्थव्यवस्था स्थापित करून ग्रामीण नेतृत्वाला पुढे आणले. संसदेत विरोधी पक्ष अल्पसंख्यांक असताना त्यांना सन्मानाने वागवले. त्यांचे प्रश्न समजून घेतले, वेळे प्रसंगी त्यांना मदत केली व काँग्रेस पक्षांतर्गत लोकशाही प्रक्रियेची सुरुवात केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हिंदू कोड बिल नंतर स्वीकारून सामाजिक बदलांना प्रोत्साहन दिले.

श्रीमती इंदिरा गांधींच्या काळात म्हणजे 1970 च्या दशकात देशात अनेक सामाजिक चळवळी पुढे आल्या. विद्यार्थी आंदोलन, पर्यावरणवादी चळवळ, जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन, शेतकरी आंदोलने, दलित चळवळी उदयाला आल्या.

श्रीमती इंदिरा गांधींनी गरिबी हटावचा नारा दिला. भाषावार प्रांतरचनेतून नवीन प्रादेशिक पक्षाचा उदय झाला. श्रीमती इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण, दलितांच्या जमिनींचे हस्तांतरण, इंदिरा आवास योजना, संस्थानिकांचे प्रश्न, 1942 ची घटना दुरुस्ती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

करून समाजवादी धर्मनिरपेक्षता भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात समाविष्ट करून संविधानाची मूलभूत चौकट मजबूत केली. मूलभूत हक्कासोबतच मूलभूत कर्तव्याला आदर्श स्थान देण्यात आले. श्रीमती इंदिरा गांधींनी देशाची सद्य:स्थिती पाहून संपूर्ण देशात आणीबाणी घोषित केली.

खाऊजा-नवीन व्यवस्था:

आर्थिक सुधारणांचा कालखंड म्हणजे 1991 नंतर देशात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या तीन संकल्पना उदयास आल्या. जागतिकीकरणाच्या वादळात भारतीय सार्वभौमत्व लोकशाही गणराज्य उभे आहे. हे अर्थपूर्ण असले तरी जागतिकीकरण विरुद्ध लोकशाही, भांडवलशाही विरुद्ध लोकशाही असा संघर्ष सुरू आहे. कारण जागतिकीकरणाची प्रक्रिया आणि त्यातून स्थापित वित्तीय भांडवलशाहीची बाजारपेठ व्यवस्था ही लोकशाहीची पायाभूत तत्वे समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय तसेच व्यक्तीचा दर्जा, प्रतिष्ठा, संधीची समानता, राष्ट्राची एकात्मता ही लोकशाही मूल्य प्रभावीपणे नाकारते. ज्या पद्धतीने लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो ते मार्ग जागतिकीकरणाला नको असतात. जागतिकीकरण मानवी जीवनाला असुरक्षित करत आहे. याउलट लोकशाही व्यवस्था मानवी जीवनात स्थैर्य, सुरक्षितता प्रदान करण्याचा प्रयत्न करते. व्यक्ती हा लोकशाही व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असतो.

भांडवलशाहीच्या जोरावर जागतिकीकरणाने माणसाला बाजारपेठेत उभे केले आहे. विक्री योग्य बनवले आहे. याउलट लोकशाही व्यवस्थेत बाजारपेठ ही माणसासाठी असते. खाजगीकरण हे जागतिकीकरणाचे ब्रीद आहे. तर सम्यक सार्वत्रिकीकरण हे लोकशाहीचे उद्दिष्ट आहे.

लोकशाही विरुद्ध भांडवलशाही, समाजवाद विरुद्ध भांडवलशाही, कल्याणकारी राज्य विरुद्ध भांडवलशाही, वर्ग व्यवस्था विरुद्ध वर्ण व्यवस्था, जात, धर्म असा संघर्ष उभा ठाकला आहे. भारतीय संविधानातील संकल्पना जागतिकीकरणाला विरोध करते. त्याला सार्वभौमत्व ही संकल्पना मान्य असते. त्यांना बंधन मुक्तता हवी असते. त्यामुळे भारताचे सार्वभौमत्व धोक्यात आले आहे. वास्तविक पाहता, सार्वभौमत्व हे राज्याची स्वाभिमानी कमान असते. बहुराष्ट्रीय कंपन्या ते मान्य करत नाहीत. भांडवलशाही केंद्रीकरणावर भर देते. तर लोकशाही विकेंद्रीकरणावर भर देते. जागतिकीकरणाला लोकशाही नको असते. त्यांना भांडवलदारांचे शासन हवे असते. ही व्यवस्था मानवाचे स्वातंत्र्य हिरावून घेते. मानवाला जाहिरातींचा गुलाम बनवते व माध्यमे त्यांचे गुलाम असतात.

मोदी कालखंड:

वरील परिस्थितीचा फायदा घेऊन नवा पर्याय म्हणून एकमुखी सक्षम नेतृत्व, गुजरात मॉडेल, अमेरिकेतील अध्यक्ष निवडणूक पद्धतीचा अवलंब, निवडणूक प्रक्रियेच्या आधीन राहून प्रधानमंत्री पदाचा उमेदवार निवडणे, सशक्त नेतृत्वाची हमी, हिंदुराष्ट्रवाद, राष्ट्रभक्ती,, कार्यमुक्त भारत एक देश एक कर प्रणाली, राज्य व्यापारी नव्हे खाजगीकरणावर भर, एक देश एक निवडणूक, सांस्कृतिक राष्ट्रवाद, युवक वर्गाला आकर्षित करण्यात यश, भावनिक राजकारण, रामराज्य, जय श्री रामाचा, बजरंग बलीचा वापर, माध्यमांचा प्रभाव, विदेशांशी मैत्रीचे कायमचे संबंध, धर्मवादाचा प्रभावी अवलंब, बहुसंख्यांकवादाचा प्रभाव, विभूती पूजा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभावी प्रसार आणि प्रचार, अन्य संघटना इत्यादी धोरणांचा प्रभावीपणे वापर करून 2014 च्या लोकसभा निवडणुकीत यश मिळवून संमिश्र सरकारची परंपरा खंडित केली आणि संविधानाला विरोध करणारे एका अर्थाने सत्तेच्या सोपानापर्यंत पोहोचले.

सामाजिक न्याय:

देशातील लोकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय देणे हे कल्याणकारी राज्याचे प्रमुख ध्येय असते, उद्दिष्ट असते आणि कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे, संविधानाचे प्रमुख आणि अंगभूत असे ध्येय असते यावरून हे स्पष्ट होते की, भारतीय संविधानाचा उद्देश हा कल्याणकारी राज्य निर्मिती करून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाची स्थापना करणे हा आहे. या एकूण पार्श्वभूमीवर मागील 75 वर्षांच्या काळात राज्यकर्त्यांनी वेळोवेळी आवश्यक ती पावली उचलून लोकांची गरजपूर्ती करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे.

परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 44 वर्षानंतर भारतीय परिस्थितीच्या रेट्यामुळे समायोजन कार्यक्रमाचा स्वीकार करून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या संकल्पनेला स्वीकारावे लागले. त्यानंतर भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत व्यापक स्वरूपाचे बदल घडून आले.

शेतीचे प्रश्न, श्रमिकांचे ढासळते जीवनमान, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, शिक्षणव्यवस्था, तिचे समकालीन स्वरूप या सर्व बाबी लक्षात घेता भारतीय राज्यघटनेने निर्धारित केलेल्या आकृतीबंध पासून भारतीय राजकारण, भारतीय समाज दूर जात आहे असे दिसते..

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भसूची

१. दादासाहेब इंगळे (2001): जागतिकीकरण भारतापुढील आव्हाने, धम्मदीना प्रकाशन, पुणे.

2. परुळेकर भूषण (2004): जागतिकीकरण आणि भारतीय इतिहास

3. रसाळ राजेंद्र (2014): भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस प्रकाशन, पुणे.

4. खतू गजानन (2001): जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, पुणे.

5. स्वराला पन्नालाल (2002): भारत राष्ट्राची जबाबदारी, सुगावा प्रकाशन, पुणे.

6. दत्त, सुंदरम (2006): इंडियन इकॉनोमी, एस चांद, न्यू दिल्ली.

7. श्रीरंग राजन, (2006): रिस्पॉर्डिंग टू ग्लोबलायझेशन इंडिया स्मृती व्याख्यान, अहमदाबाद मॅनेजमेंट असोसिएशन, अहमदाबाद.

8. मिरज (2002): जागतिकीकरण आणि गुलामगिरी, विद्या प्रकाशन, पुणे.

9. पठारे रंगनाथ (2003): जागतिकीकरण आणि देशीवाद, लोकवाङ्मय, मुंबई

10. कांबळे उत्तम (२००२) जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, 16 प्रकाशन, पुणे

11. वनराई (2006): जागतिकीकरण व भारतीय शेती, पुणे

12. ब्रह्मसुलभा (2001) भारतीय संदर्भात जागतिकीकरण, समाज प्रबोधन पत्रिका.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय संविधानाची 75 वर्षे आणि मानवी अधिकारांच्या नजरेतून विमुक्त भटक्या जमातीच्या अधिकारांचे रक्षण, विशेष महिलांच्या बाबतीत

Dr. Deelip Harsing Rathod[1], Smt.Vaishali Gulabrao Sawant[2]
[1]Political science Rani Laxmibai Mahavidyalaya Parola, Jalgaon, Maharashtra.
[2]Assistant teacher Dr.V. M. Jain Highschool parola, Jalgaon
Email: rdilip4767@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170960
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 285-290
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांच्या प्रवासात मानवी हक्क आणि सामाजिक न्याय या संकल्पनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर विमुक्त आणि भटक्या जमातींच्या — विशेषतः महिलांच्या — अधिकारांचे रक्षण, संवर्धन आणि त्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठीच्या प्रयत्नांचा अभ्यास या लेखात करण्यात आला आहे. ब्रिटिश काळातील "गुन्हेगार जमाती कायदा १८७१" मुळे या समाजावर अन्याय झाला आणि स्वातंत्र्यानंतरही या जमाती सामाजिकदृष्ट्या मागे राहिल्या. संविधानाने दिलेल्या आरक्षण, कल्याणकारी योजना आणि मानवी हक्क आयोगांच्या प्रयत्नांनंतरही त्यांचा सर्वांगीण विकास अपेक्षेइतका झालेला नाही. शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवारा आणि राजकीय सहभाग या सर्व क्षेत्रांत अद्याप असमानता दिसून येते. या परिस्थितीत विमुक्त आणि भटक्या जमातींचे हक्क प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन आणि समाज दोघांनीही जबाबदारीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, मानवी हक्क, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, महिला हक्क, सामाजिक न्याय, आरक्षण, शिक्षण, रोजगार, विकास, समानता.*

प्रस्तावना:

जागतिक मानव अधिकार आयोगाची निर्मिती अतिशय उत्कृष्ट हेतू डोळ्यासमोर ठेवून झालेली आपणास पाहावयास मिळते. अखिल मानव जातीच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणारे महत्त्वपूर्ण आयोग म्हणून याकडे पाहिले जाते. या आयोगाची कार्ये, ध्येय धोरणे, उद्दिष्टे, सीमा, कायदे तथा नियमावली निश्चित करण्यात आलेली आहे. मानवी हक्क म्हणजे काय? येथून निर्माण झालेला प्रश्न, मानवी हक्कांचे उल्लंघन केल्यास कोणती शिक्षा करावी? इथपर्यंत या आयोगाच्या कार्याची व्याप्ती निश्चित झालेली आहे. कारण मानवी हक्क आयोगाच्या निर्मितीचा उद्देश मानवाचे संविधानाने दिलेले अधिकारांचे रक्षण आणि संवर्धन करणे हाच आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
Dr. Deelip Harsing Rathod, Political science Rani Laxmibai Mahavidyalaya Parola, Jalgaon, Maharashtra.

How to cite this article:
Rathod, D. H., & Sawant, V. G. (2025). भारतीय संविधानाची 75 वर्षे आणि मानवी अधिकारांच्या नजरेतून विमुक्त भटक्या जमातीच्या अधिकारांचे रक्षण, विशेष महिलांच्या बाबतीत. Journal of Research & Development, 17(9(IV)), 285–290. https://doi.org/10.5281/zenodo.17733382

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17733382
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

त्यामुळे या आयोगाकडे कोणत्या व्यक्तीविरुद्ध, कोणत्या संस्थेविरुद्ध, संघटने विरुद्ध तक्रार करावी, याचेही स्पष्टपणे उल्लेख केलेले आहेत. भारतात देखील राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची निर्मिती झालेली असून देशात सर्वत्र राष्ट्रीय मानवाधिकार आयोग कार्यरत आहे पर्यायाने राज्यात आणि जिल्ह्यात देखील मानवाधिकार आयोग सक्रिय आहेत.

उद्देश:

1. भारतातील आणि पर्यायाने महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांना मानवाधिकार आयोगाने अधिकार विषयक दिलेले बळ तपासून पाहणे.
2. भटक्या व विमुक्तांना राष्ट्राच्या जडणघडणीत सामील करून घेणे राष्ट्र बांधणी कार्यात सह भागी करून घेणे.
3. विमुक्त व भटक्या जमातीला मिळालेल्या अधिकारांची चाचपणी करणे.
4. त्यांना कायद्याचे अभय देणे.
5. त्यांचा सर्वांगीण विकास साधणे.
6. त्यांचे घटनात्मक आरक्षण अबाधित राखणे.

भारतीय राज्यघटनेत आरक्षणाची तरतूद केलेली आहे. त्यात मागासलेल्यांसाठीची आरक्षणात्मक तरतूद अत्यंत महत्त्वाचे आहे. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विमुक्त व भटक्या जमाती या सर्वांची परिस्थिती आजही काही अपवाद वगळता एकसारखीच आहे. 75 वर्षे भारताला स्वतंत्र होऊन झाली. लोकसंख्येचा भस्मासुर दिवसेंदिवस वाढत आहे. याही जमातीमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसून येते. सर्वांचा सर्वांगीण विकास साधला जावा, यासाठी शासन प्रयत्नरत आहे. पण लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वांचा विकास व्हावा, ही अपेक्षा सर्वांचीच आहे. मात्र तसेच झालेले दिसून येत नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळ:

स्वातंत्र्यपूर्व काळात अधिकार नसलेला समाज म्हणजे, सर्वच मागासवर्गीय समाज मानला जातो. कारण या काळात हा मागासलेला समाज पूर्णतः दिशाहीन, अशिक्षित, अडाणी, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यामध्ये गुरफटलेला होता. मांत्रिक, तांत्रिक, भगत, भोंदू यांच्या विचारांनी प्रभावित झालेला होता. त्यामुळे यांना चांगल्या वाईटाची कल्पनाही नव्हती. त्यातही ब्रिटिशांनी कायदा आणि सुव्यवस्थेचा धाक दाखवून "गुन्हेगार जमाती कायदा 1871" लागू केला. जणू हा विमुक्त आणि भटक्या समाज भारता ऐवजी ब्रिटनमध्ये राहत होता. त्यांच्या देशामध्ये चोरी, डकैती, लुटमारी, दरोडे टाकत होता. त्यामुळे त्यांना हा कायदा लागू करणे आवश्यक वाटले. ते हे विसरूनच गेले की आपण ब्रिटनमध्ये नसून भारतात आहोत. त्यामुळे त्यांनी हा कायदा करणे योग्य मानले. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात ब्रिटिशांनी बरीचशी विकास कामे केले. त्याचा परिणाम या भटक्या विमुक्त जमातीच्या जीवनपद्धतीवर विपरीत पणे झाला. कारण ब्रिटिशांनी जेव्हा भारतात रेल्वे, रस्ते, वाहतूक, टपाल, दळणवळणाची साधने आणली. त्यामुळे या जमातींचा परंपरागत व्यवसाय उद्योग, बंद पडले. उपासमारीला हा समाज कंटाळून शेवटी चोरी करणे, दरोडे टाकने, या मार्गांचा वापर करून उदरनिर्वाह चालवू लागला. ब्रिटिशांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावावर या जमातीला 1871 साली "गुन्हेगार जमाती कायदा" पास करून या देशातील 198 जमातींना कायदेशीर आणि अधिकृत गुन्हेगार बनवण्यात आले. त्यांनी चोरी केली अथवा नाही केली, तरीही त्यांना जन्मजात गुन्हेगार समजण्यात आले. त्यांच्या भ्रमंतीवरही बंधने आणलीत. जणू 'शिक्षा भोगण्यासाठी जन्म आपूला', अशी परिस्थिती त्यावेळी निर्माण झालेली होती. त्यामुळे 871 ते 1952 म्हणजे तब्बल 82 वर्षे या जमातीला गुन्हेगार म्हणून मिळालेली वागणूक किती कठोर होती, याची कल्पना करणे अवघड आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांना स्वतंत्र भारतात स्वातंत्र्य नव्हते. त्यासाठीही त्यांना तब्बल पाच वर्षे वाट पाहावी लागली. या अवस्थेत त्यांना शिक्षण, उदरनिर्वाहाचे साधन तर दूरच, पुन्हा गुन्हेगार म्हणून ब्रिटिशांचा धाक. त्यांनी कसे जगावे, संसार कुटुंब कसा सांभाळावा, हा मोठा प्रश्न त्या काळात निर्माण झालेला होता. देशात त्यांच्यासाठी ना वस्ती, ना गाव, ना शेती, ना व्यवसाय. अशा परिस्थितीत गुरढोरे पाळणे, दारू गाळणे, गावात मजुरी करणे आणि ब्रिटिशांचा धाक वागवणे. डोंगर दऱ्यांमध्ये वास्तव्य करणे, जंगलाच्या दुर्गम भागात वस्ती करून राहणे, अशी अवस्था या विमुक्त, भटक्या जमातींची होती. इंग्रजांमुळे आपला पारंपारिक व्यवसाय बुडाला. या जातीवर जंगलात राहण्यासही बंधने लादली. आर्म्स ऍक्ट आणि फॉरेस्ट ऍक्ट यामुळे इंग्रजांविरुद्ध असंतोष वाढला. त्यातून दरोडेखोरी, रेल्वे फोडणे, कचेरी जाळणे, इत्यादी कृत्यास त्यांनी सुरुवात केली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

देशातील इतर बांधवांनी देखील त्यांना कोणत्याही प्रकारची मदत केली नाही. कारण जातीभेद, वर्ग भेद, वर्णभेद हा त्या काळात तर विकसित होताच .परंतु आजही आमच्या मनातून जात नाही ही खरी खेदाची बाब आहे. त्यातही यांच्या अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरेवर या समाजाचा मोठा विश्वास होता. आजारी पडल्यास औषधोपचार करण्याऐवजी देवीचा कोप, करणी करणे, मूठ मारली, अशा मांत्रिकांच्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवून गंडा, दोरा, धागा यांचा आधार घेऊन औषधोपचार न करता रोग बरा झाल्यास बोकड बळी, कोंबडा बळी, मेंढी बळी देण्यास मांत्रिक सांगतील तसे ते करत.विमुक्त व भटक्या समाज हा दिशाहीन भटकत राहिला. शिक्षण, रोजगार, व्यापार, याचा कोणत्याही प्रकारचा गंध नसलेला. मिळेल ते काम करणे, मिळेल तेवढी मजुरी मिळवून अर्ध पोटी, उपाशीपोटी जीवन जगत राहिला. त्यातही ब्रिटिशांनी जे हाल केलेत, ते अवर्णनीयच.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही गुन्हेगार जमाती म्हणून उपेक्षीलेला हा समाज 1952 पर्यंत गुन्हेगार म्हणून जगत राहिला, वावरत राहिला. म्हणजे 1871 ते 1952 एवढ्या कालावधीपर्यंत गुन्हेगार म्हणून अपराधी म्हणून जीवन जगत असताना, जे हाल झाले, जी वागणूक मिळाली, याची कल्पनाही करवत नाही. रानावनात, डोंगर दर्यांमध्ये दिवस काढावे लागले. शिक्षणाची व्यवस्था नाही. व्यवसायाची व्यवस्था नाही. व्यापार उद्योग नाही आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील तब्बल पाच वर्षांनी यांना गुन्हेगार जमाती कायदा रद्द करून विमुक्त करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळ: स्वातंत्र्योत्तर काळात देखील यांची खूप मोठी प्रगती झाली, असे मुळीच नाही. कारण स्वातंत्र्यानंतरही संपूर्ण देशाला जसे स्वातंत्र्य मिळाले, तसे विमुक्त भटक्या जमातीला ही स्वातंत्र्य मिळाले असे नव्हे. उद्योग, व्यवसाय, व्यापार यापासून दूर असलेला समाज हा अडाणी, निरक्षर, देवधर्म, कर्मकांड, भगत, भोंदू बाबा यांच्या आहारी गेलेला समाज तात्काळ पुढारलेला कसा होणार? कारण भारतात प्राचीन काळापासून समाजरचना, धर्मरचना, वर्णव्यवस्था, प्रादेशिकता याचे महत्त्व टिकून आहे. श्रमतत्व, आधिवास जीवनपद्धतीवरून भारतीय समाज रचनेचे चार प्रकार आढळून येतात, ती म्हणजे,

1. भारतात कोणत्याही भागात स्थिर वास्तव्य करणारा, ज्याला आपण गाव असे म्हणतो. आपली काही कामे इतरांकडून स्वतःसाठी करून घेणारा आणि वर्णव्यवस्थेप्रमाणे उच्च वर्णीय समजला जाणारा स्पृश्य समाज.
2. दुसरा समाज म्हणजे, स्थिर वास्तव्य करीत आहे. परंतु गावाबाहेर राहतो. ज्याला कनिष्ठ स्वरूपाची कामे करावी लागतात.
3. तिसरा समाज म्हणजे, जो डोंगर कपारीत दऱ्याखोऱ्यांमध्ये राहतो, तो आदिवासी समाज.
4. समाजातील चौथा वर्ग म्हणजे, स्वतःचे वास्तव्याचे ठिकाण नाही. जो चरितार्थासाठी भटकतोय सातत्याने भटकंती करतो. गुरेढोरे पशुपालन रानोमाळ भटकणारा आणि निश्चित असे कोणतेही गाव नसलेला, हा भटका समाज होय.

विमुक्त व भटक्या जमातीत बेरड, बंजारा, छप्पर बंद, वडार, बेस्तर, रामोशी, संचल, नाईकवाडी, तलवार, वाल्मिकी, गिरणी, वडार, कामाठी, पाथरवट, टकारी, उचले, घंटी चोर, या जमातींचा समावेश होतो. याबरोबरच धनगर, वंजारी, जोशी, काशी, काकडी, गोपाळ, हेळवे, गारुडी, घिसाडी, कोल्हाटी, नंदीवाले, वासुदेव, गोसावी, बेलदार, भराडी, चित्रकथी, घिसाडी या जमातींचाही समावेश होतो. काही उपजाती, पोट जाती देखील आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात जवळपास विमुक्त व भटक्या जमाती ह्या 44 तर उपजाती ह्या दोनशेच्या जवळपास आहेत.

स्थिर वास्तव्यास असलेल्या समाज जीवनापासून हा विमुक्त व भटक्या समाज कायम दूर राहिला. त्यांची जीवन पद्धती, वेशभूषा, राहणीमान, उपजीविकेची साधने ही देखील भटकंतीला पूरक ठरतील एवढीच. अल्प समाधानी असलेला हा समाज तुटपुंज्या मिळकतीवर जगणारा, कोणत्याही वस्तू अथवा संपत्ती ची अभिलाषा न बाळगणारा मिळेल त्यावर जगणारा, कोणताही लोभ नसलेला हा समाज. कालांतराने भारतात औद्योगीकरणाचा विकास झाल्यानंतर यांचे कामाचे स्वरूप थोडेसे बदलले, जसे साखर कारखाने, कापड गिरणी, बांधकाम व्यवसाय, रस्ते बांधणे अशा ठिकाणी ऊस तोडी, करणे, खडी फोडणे, वीट भट्टीवर काम करणे, दगड मातीचे काम करणे, सिमेंटच्या कारखान्यांवर मजूर म्हणून काम करणे एवढेच यांचे चरितार्थाची साधने होत.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात ब्रिटिशांनी बरीचशी विकास कामे केली. त्यांचा परिणाम या विमुक्त भटक्या जमातींच्या समाज जीवनावरही झाला. कारण ब्रिटिशांनी जेव्हा भारतात रेल्वे, वाहतूक, टपाल, दळणवळणाची साधने आणल्यामुळे या जमातींचा परंपरागत व्यवसाय उद्योग बंद पडले. उपासमारीला हा समाज कंटाळला शेवटी चोरी दरोडे या मार्गांचा उदरनिर्वाहासाठी वापर होऊ लागला. ब्रिटिशांनी कायदा व सुव्यवस्थेच्या नावावर या जमातीला 1871 साली गुन्हेगार जमाती कायदा पास करून देशातील 198

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

जमातींना कायदेशीर आणि अधिकृत गुन्हेगार बनवण्यात आले. त्यामुळे 1871 ते 1952 म्हणजे तब्बल 82 वर्षे या जातीला गुन्हेगार म्हणून मिळालेली वागणूक किती कठोर होती, याची कल्पनाही केली जाऊ शकत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळ:

1947 साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांना स्वतंत्र भारतात स्वातंत्र्य नव्हते. त्यासाठीही त्यांना तब्बल पाच वर्षे वाट पहावी लागली. या अवस्थेत त्यांना शिक्षण, उदरनिर्वाहाचे साधन तर दूरच पुन्हा गुन्हेगार म्हणून ब्रिटिशांचा धाक होता. त्यांनी जगावे कसे, संसार कुटुंब कसे सांभाळावे? हा मोठा प्रश्न होता. देशात ना वस्ती, ना गाव, ना शेती, ना अभ्यास, गुरेढोरे पाळणे, दारू गाळणे, गावात मजुरी करणे, एवढे कार्य त्यांनी स्वीकारले. इतर बांधवांनीही त्यांना मदत केली नाही कारण जातीभेद, वर्णभेद आजही आमच्या मनातून जात नाही. त्याकाळीही जातीभेद, वर्णभेद मोठ्या प्रमाणात होता. भगत, तांत्रिक मांत्रिकांचा अंधश्रद्धा अनिष्ट रूढी परंपरेवर या समाजाचा मोठा विश्वास.

भारतीय राज्यघटनेचा आधार:

भारतीय राज्यघटनेचा आधार या जमातीला मिळाला. हे सूर्यप्रकाशा इतके सत्य आहे. पण जे डोंगर दर्यात राहतात, रानावनात राहतात, तांडा वस्तीवर राहतात, जेथे आजही बसगाडी जात नाही वृत्तपत्रे जात नाही शाळा व शिक्षणाची पुरेशी व्यवस्था नाही. विजेची व्यवस्था नाही. शहरांपासून कोसो दूर असलेला हा समाज अजूनही 100% साक्षर नाही. आपल्या हक्कांप्रती जागरूक नाही. भारतीय संविधानाची प्रत त्यांच्यापर्यंत पोहोचलेली नाही. बऱ्याच जणांना संविधानाची माहिती नाही. मानव अधिकार काय आहे, हे अजूनही पुरुषांना कळालेले नाही. स्त्रीया या अधिकारांपासून खूपच दूर आहेत. शासनाकडे रोजगार मागणे, नोकरी मागणे, व्यवसायासाठी अर्ज विनंती करणे, या गोष्टींपासून अजूनही हा विमुक्त व भटका समाज कोसो दूर आहे.

जे लोक साक्षर आहेत. त्या सर्वांना नोकरी आहेच, असे नाही. बेरोजगारीचे प्रमाण भयंकर वाढलेले आहे. त्यातही जिल्हा परिषदेच्या शाळा आणि विद्यार्थी संख्या यांची तर इतकी दुरावस्था झालेली आहे की, ती बघवत नाही. तांडा वस्तीवरील शाळेत जाणारा शिक्षक शहरात राहतो. फक्त नोकरी करणे एवढेच जणू त्याचे कार्य आहे. विद्यार्थी घडवणे, हा विषयच राहिलेला नाही. माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना मोठे गाव किंवा शहराकडे यावे लागते. त्यांची शिक्षण घेण्याची ऐपत नसल्याने एक तर शिक्षण अर्धवट सोडून रोजगार शोधणे, एवढाच पर्याय उरतो. काही विद्यार्थ्यांची घरची परिस्थिती बरी असेल तर, शहरापर्यंत पोहोचतात. त्यातही काही मुली आणि महिला ह्या अजूनही शिक्षणापासून वंचितच आहे. हे खेदाने सांगावे लागते.

ग्रामपंचायती देखील गावांची स्वतंत्र नाही, तर कुठे ग्रुप ग्रामपंचायत तर कुठे स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. ज्या ठिकाणी ग्रुप ग्रामपंचायत आहे, त्या ठिकाणी मोठ्या गावांचा विकास साधला जातो, तर छोटी खेडी तांडा वस्ती याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जाते. याबरोबर स्वतंत्र ग्रामपंचायत असतील, तर त्यांच्याकडे तर खऱ्या अर्थाने दुर्लक्ष केले जाते. तांडा वस्ती कडे जाणारा रस्ता कधीही व्यवस्थित नसतो. विजेची व्यवस्था नाही. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, सांडपाणी, स्वच्छतागृह, रोजगाराचा प्रश्न, प्राथमिक शाळांची अवस्था, वर्गातील अनुपस्थिती, पुढच्या वर्गात ढकलणे, असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. शौचालय शासनाकडून पुरवले गेलेत, पण त्याचा सर्वे होणे आवश्यक आहे. घरकुल योजना कोणासाठी सुरू केलेली आहे, एकदा शासनाने चौकशी करावीच.

केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या अनेक योजना राबविल्या जातात. त्या त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही. कारण त्याविषयीचे ज्ञानही यांना नाही. कागदपत्रांचा अर्थ त्यांना कळत नाही. शासकीय योजना ह्या दूरदर्शन, वृत्तपत्रे आणि ऑनलाईन या प्रसार माध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोचविल्या जातात. पण ही प्रसार माध्यमे त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही. त्यातही शासनाबद्दलची उदासीनता यांच्या मनात आहेच.

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून योजना घोषित केल्या जातात. निवडणुका संपल्या की योजना ही संपून जातात. त्यामुळे राष्ट्रीय प्रवाहात खऱ्या अर्थाने त्यांना आणले जात नाही. निवडणूक काळात गैरमार्गांचा अवलंब करणे सर्व दूर झालेले आहेत. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. जणू विमुक्त आणि भटक्या अनुसूचित जाती जमाती अडाणी, निरक्षर हे फक्त मते मिळवण्यासाठी एक हमीची बँक मानली जाते. त्यामुळे त्यांचे राष्ट्रीय प्रवाहात येण्याचा, त्यांचा सर्वांगीण विकास होण्याचा प्रश्नच येत नाही. शासन स्वतः स्थिर नाही. शासनाचेच अनेक प्रश्न सुटलेले नाहीत, तर शासनास या विमुक्त आणि भटक्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ तरी आहे का?

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

विमुक्त आणि भटक्या जमातींच्या आरक्षणामध्ये इतर जातींची घुसखुर्णी मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. आधीच राज्यघटनेने दिलेल्या आरक्षणातील काही वाटा दुसऱ्या जातीला दिल्याने विमुक्त घटका जमातीच्या आरक्षणाची टक्केवारी कमी झाली. त्यांना विमुक्त भटक्या जमातीच्या आरक्षणातील हिस्सा दिला. तो मुळातच पुढारलेला समाज. तो रानोमाळ, डोंगरदऱ्यांमध्ये राहणारा समाज नाही. तरी त्यांना आरक्षणातील काही टक्केवारी देण्यात आली. उदाहरणार्थ राजपूत समाज हा सरसकट विमुक्त भटक्या जमातीमध्ये घुसखोरी करताना दिसत आहे. हाही समाज शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक दृष्ट्या पुढारलेला आहे. विमुक्त भटक्या जमातीची बोलीभाषा आणि शिक्षणाची बोलीभाषा वेगवेगळ्या आहेत. त्यांना महाराष्ट्रात मराठीतून शिक्षण घ्यावे लागते, तर इतर राज्यात हिंदी आणि आता इंग्रजीतून शिक्षण घ्यावे लागत आहे. बऱ्याच लोकांचा बोली भाषेचा प्रश्न आहे. भाषा समजून शिकून घेण्यास वेळ लागतो. त्यातही आता तंत्रज्ञानाचे युग आहे. मुळात 1871 ते 1952 दरम्यान स्वातंत्र्य नसलेला हा समाज आणि 1952 ते आजतागायत स्वातंत्र्य असले तरी त्यांच्यात स्वातंत्र्याची जाणीव जागृत होण्यासाठी हा काळ अपुरा आहे. त्यामुळे या मागे पडलेल्या जमा केला सर्वांसोबत आणण्यासाठी काही काळ आणि विशेष सवलती द्याव्या लागतील.

बहुतांश राज्यात ही जमात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मध्ये, इतर मागासवर्गीय जातींमध्ये वर्ग करण्यात आलेली आहे.त्यांना केंद्र सरकारच्या सोयी सवलती सुविधा मिळतात. ही जमात महाराष्ट्रात विमुक्त व भटक्या जमाती वर्गात गणली जाते. त्यामुळे केंद्र सरकारच्या इतर मागास वर्गांमध्ये ते स्पर्धा करू शकत नाही. आरक्षणदृष्ट्या तांत्रिक गोंधळ या समाजापुढे व जमाती पुढे निर्माण झालेला आहे.

वास्तविक पाहता बंजारा जमाती कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओरिसा या राज्यांमध्ये अनुसूचित जमाती या प्रवर्गात मोडली जाते, तर इतर राज्यांमध्ये आणि विशेष म्हणजे दिल्लीमध्ये बंजारा जमात ही अनुसूचित जातीमध्ये गणली जाते. संपूर्ण देशभर आणि जगभर देखील बंजारा जमातीचे लोक एकच बोलीभाषा, एकच संस्कृती, भौगोलिक ओळख, प्राचीन व्यापार, सण, उत्सव, जन्म, मृत्यू, विवाह, संस्कार, लोकगीते, भजन, लडी, लेंगी, गीते गातात. हा समाज निसर्ग पूजक असलेला, डोंगरदऱ्यांमध्ये राहणारा, सिंधू संस्कृतीपासून आजतागायत हा समाज पृथ्वी, अग्नी, जल, वायू, सूर्य, वृक्ष, वेली इत्यादींची पूजा, आराधना करतो.

भारतीय संविधानाच्या कलम 342 अन्वये अनुसूचित जमातीसाठी असलेले निकष बंजारा जमातीसाठी पूर्ण रूपाने लागू होतात. सोबतच हैदराबाद गॅझेट 1920 चा पुरावा आणि भारतीय राज्यघटनेने दिलेले 342 कलम बंजारा समाजास अनुसूचित जमातीत वर्ग करण्यासाठी पुरेसा पुरावा आहे. 'एक देश एक जात एक आरक्षण म्हणजेच वन नेशन वन कॉस्ट अँड वन रिझर्वेशन'हा कायदा संपूर्ण देशभर लागू करण्यात यावा, तरच खऱ्या अर्थाने भारतातील विमुक्त व भटक्या जमातींना न्याय मिळेल आणि मूलभूत हक्कांचे व मानव अधिकारांचे रक्षण होईल. तेव्हाच त्यांना मिळालेल्या अधिकारांची चाचपणी झाली, असे म्हणता येईल.

विमुक्त आणि भटक्या जमाती वर लादलेला गुन्हेगार जमातीचा कलंक कागदावरून नष्ट झाला असला तरी, अजूनही तो मनातून जात नाही. याचे अनेक उदाहरणे आहेत. फेरीवाले, नंदीबैलवाले, गारोडी, भटकंती करणारे यांच्याकडे अजूनही संशयाने पाहिले जाते. प्रसंगी लहान मुले चोरणारी टोळी म्हणून त्यांना हिणवले जाते. त्यांना मारझोड होते. प्रसंगी मारून टाकले जाते. गोदरी येथे भटक्या जमातीच्या मुलांना विहिरीत पोहण्याच्या कारणावरून धर्म बाटला, असे म्हणून त्यांना मारझोड करण्यात आली. अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यामुळे कायदा हा संरक्षणासाठी आहे की, गुन्हा नसतानाही शिक्षा देण्यासाठी आहे. अशी परिस्थिती या विमुक्त व जमातीच्या लोकांपुढे निर्माण झाली आहे. म्हणून त्यांना कायद्याचे अभय देणे आणि अन्याय करणाऱ्यांवर कायदेशीर व न्यायालयीन वचक निर्माण करणे आवश्यक आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळवून 75 वर्षे पूर्ण झाली. आपण स्वातंत्र्याचे अमृत वर्ष साजरे केले. पण यांना स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष खरोखर झालेत का? यांचा सर्वांगीण विकास झाला का? या लोकांमध्ये शैक्षणिक सामाजिक राजकीय आर्थिक बाबतीत प्रगती आणि जाणीव जागृती झाली का? उद्योग व्यवसाय पुरेशी मिळाले का? लोकसंख्या आणि आरोग्य विषयक समस्या दूर झाल्या का? पिण्याचे पाणी, सांडपाणी, दिवाबत्ती, स्वच्छता, राहणीमान, त्यांचा व्यवसाय आणि तांडा वस्तीचा सर्वांगीण विकास झाला का? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

विमुक्त व भटक्या जमातीस भारतीय संविधानाने आरक्षण दिले, हे खरे असले तरी, त्यांना त्याचा मिळालेला फायदा तपासून पाहणे, शासकीय योजनांचा लाभ कितपत मिळाला हेही तपासून पाहणे आवश्यक आहे. शासकीय योजना पोहोचवणाऱ्या यंत्रणा किती तत्पर आहे, हेही तपासून पाहणे महत्वाचे आहे. तसेच या जमातीचे लोक नोकरी व्यवसायासाठी शहरात आले, त्यापैकी आपल्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

वस्तीकडे किती लोक परतले. जे शहरात गेले, ते तिथेच स्थायिक झाले. आणि जे खेड्यात तांडा, वस्ती डोंगरदऱ्यात, वास्तव्यास होते, ते तिथेच खितपत पडून आहेत. तेही त्या अवस्थेतून बाहेर पडण्यास तयार नाही. शासनाप्रती जागृत नाही. आपल्या हक्कात प्रती जागृत नाही. त्यामुळे सर्वांगीण विकास विषयक संकल्पना जरी दूतर्फी असावी, असे वाटत असले तरी, ती एकतर्फी होऊन बसली आहे. असेही खेदाने म्हणावे लागते.

निष्कर्ष:

विमुक्त आणि भटक्या जमातीचा गेल्या अनेक वर्षांपासूनचा प्रागतिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक विकासाचा आलेख पाहिला असता, आजही इतरांच्या तुलनेत आवश्यक तसा कोणत्याही प्रकारच्या विकास झालेला दिसून येत नाही. तुलनात्मक दृष्ट्या त्यांचा राजकारणातील सहभाग, नोकरी, उद्योग, व्यवसाय, व्यापार, शिक्षण अशा सर्वच बाबतीत त्यांची तिचे हाल झालेले दिसून येते. यामध्ये केवळ शासनाचे नाकर्तेपणा नाही तर, हा विमुक्त आणि भटका समाज देखील शासनाच्या कार्यास पूर्णतः प्रतिसाद देण्यास, शासकीय योजनांचा पुरेपूर उपभोग घेण्यास अपुरा पडताना दिसून येतो. त्याचे कारण त्यांच्यातील शैक्षणिक जाणीव जागृतीचा अभाव दिसून येतो.

समारोप:

भारतीय राज्यघटनेची 75 वर्षांचा अमृत महोत्सव साजरा करताना मनस्वी खूप आनंद होत आहे मात्र भारतीय राजकारणातील कूटनीतीला तिलांजली देऊन संपूर्ण देशाच्या सर्वांगीण विकासाकडे विवेकाच्या आधारे लक्ष दिल्यास केवळ एका व्यक्तीचा किंवा व्यक्ती गटाचा विकास न होता, सर्वांचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहणार नाही. विशेष महिला, माता-भगिनी त्यातही या मागासलेल्या समाजातील माता भगिनींचा सर्वांगीण विकास व्हावा. त्यांना उद्योग व्यवसाय मिळावे. राष्ट्राच्या बांधणीत त्यांची भूमिका महत्त्वाची ठरावी. शिक्षणाच्या व्यवस्थेबरोबरच नोकरी, रोजगार व व्यवसाय देखील त्यांना उपलब्ध व्हावा. त्या स्वतःच्या बळावर स्वावलंबी व स्वाभिमानी जीवन त्यांना प्राप्त व्हावे, असे या चर्चासत्रातून देशातील माता भगिनींच्या विकासासाठी या चर्चासत्रातून देशभर संदेश पाठवावा हाच माझा प्रामाणिक हेतू आहे.

संदर्भसूची:

लेखक पुस्तक प्रकाशान वर्ष
1 कांबळे उत्तम. भटक्यांचे लग्न. मेहता पब्लिशिंग. 1988
2 काळदाते सुधा भारतीय समाज रचना भारत मुद्रक 1976
3 पाटील बळीराम आलेख समाज प्रगतीचा. किनवट. 1996
4 राठोड मोतीराज भटक्या विमुक्तांचा जाहीरनामा. 1988
5 राठोड हरिभाऊ लमाण बंजारा आणि वंजारी संबोधी 1994
6 राठोड मोतीराज गुन्हेगारी जमाती कायदा वपरिणाम 2004
7 पवार प्रमोद. बंजारा समाज अथर्व पब्लि. धुळे. 2016
8 जाधव प्रेमसिंह बंजारा जागृती की रेखाये औरंगाबाद 1996
9 जाधव प्रेमसिंह बंजारा जागृती के दीपस्तंभ औबाद. 1996

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क

डॉ. राहूल दत्ता मांडणीकर[1], दत्तात्रय वसंत पाटील[2]
[1]राज्यशास्त्र विभाग प्रमुख शहाजी कॉलेज कोल्हापूर
[2]संशोधक विदयार्थी राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विदयापीठ कोल्हापूर
Email: mandanikard@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170961
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 291-293
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी आणि लिखित राज्यघटना असून, २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली. या राज्यघटनेने लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि प्रजासत्ताक या मूलभूत मूल्यांचा स्वीकार केला आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला मानवी हक्कांचे संरक्षण देण्यासाठी सहा प्रकारचे मूलभूत अधिकार दिले आहेत —समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुद्धचा अधिकार, धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आणि घटनात्मक उपायांचा अधिकार. या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी न्यायालयांना विशेष अधिकार दिले गेले आहेत. त्याचबरोबर नागरिकांवर काही मूलभूत कर्तव्यांची जबाबदारीही सोपविण्यात आली आहे, ज्यामुळे समाजात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता टिकून राहते. राज्याच्या धोरणातील मार्गदर्शक तत्वांद्वारे समाजकल्याण आणि सामाजिक न्याय साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. भारतीय राज्यघटनेमुळे देशात विषमता कमी होऊन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समता प्रस्थापित झाली आहे.

मुख्यशब्द: *भारतीय राज्यघटना, मानवी हक्क, मूलभूत अधिकार, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्ये, सामाजिक न्याय, लोकशाही.*

प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते तर डॉ. राजेंद्रप्रसाद हे भारतीय घटना समितीचे अध्यक्ष होते. जगामध्ये ज्या राज्यघटना आहेत त्यामध्ये भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी आणि लिखीत राज्यघटना आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्य घटना आमलात आली. या राज्यघटनेने लोकशाही, समाजवाद, धर्म-निरपेक्षता, प्रजासत्ताक, न्याय, स्वातंत्र, समता बंधुता या मुल्यांचा स्विकार केलेला आहे. भारतीय राज्यघटनेने समाजातील प्रत्येक व्यक्तीला तीच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत हक्क बहाल केले आहेत हे हक्क भक्तीच्या सन्मान, स्वातंत्र आणि विकासासाठी अत्यावश्यक आहेत. भारतीय राज्यघटनेने नागरीकांना मूलभूत अधिकारी व कर्तव्ये देऊन मानवी हक्कांची हमी दिली आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी जे अधिकार आवश्यक व महत्वाचे असतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. राहूल दत्ता मांडणीकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख शहाजी कॉलेज कोल्हापूर

How to cite this article:
मांडणीकर, . राहूल . दत्ता ., & पाटील, . दत्तात्रय . वसंत . (2025). भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क. Journal of Research & Development, 17(9(IV)), 291–293. https://doi.org/10.5281/zenodo.17733488

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17733488
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

त्यांना मूलभूत अधिकार असे म्हणतात, प्रो. लास्की यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीला तिचा राजकिय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास साधता आला पाहिजे. अशी परिस्थिती ती राज्याने निर्माणे केली पाहिजे.

उददेश:-

समाजात राहणा-या व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी विशिष्ट परिस्थितीची आवश्यकता असते, विशिष्ट अशा राजकिय व सामाजिक परिस्थितीत व्यक्ती स्वत:चा विकास घडवून आणू शकते व्यक्तीला विशिष्ट अधिकार असल्याशिवाय स्वत:चा विकास साधता येत नाही. व्यक्तीच्या जीवताची आणि वित्ताचे संरक्षण होणे हा व्यक्तीचा हक्क आहे. आणि त्यासाठी आवश्यक अशी परिस्थिती निमार्ण हे राज्यसंस्थेची जबाबदारी आहे. प्रजेचे अधिकार सुरक्षित ठेवणे हे राज्याचे कर्तव्य असते.

मानवी हक्कांची संकल्पना:-

भारतीय राज्यघटनेच्या तिस-या विभागात मुलभूत हक्कांचा समावेश केलेला आहे. कारण भारताने सार्वभौम लोकशाही गणराज्य निमार्ण करण्याचे उदिष्ट स्विकारलेले आहे. भारतात लोकशाही ख-या अर्थाने स्थिर व यशस्वी करावयाची असेल तर व्यक्ती स्वातंत्र्य जोपासले पाहिजे. अर्थात व्यक्ती स्वातंत्र्य जोपासण्यासाठी ते सुरक्षित ठेवण्यासाठी व्यक्तीला काही मुलभुत हक्क, अधिकार देणे क्रम प्राप्त ठरते. घटनांकरांनी मुलभूत हक्कांचे हे महत्व ओळखून त्यांचा समावेश राज्यघटनेत केलेला आहे.

प्रो. हॉलंड:- "समाजाचे मत आणि बल यांच्या सहाय्याने एका व्यक्तीची दुस-या व्यक्तीच्या वागणूकीवर प्रभाव पाडण्याची जी प्रात्रता असते तिला अधिकार असे म्हणतात."

प्रा. लास्की:- "व्यक्तीला आपल्या कुवतीनुसार सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे समाधान मिळेल अशी सामाजिक परिस्थिती असणे यास अधिकार असे म्हणतात."

विषय स्पष्टीकरण –

भारतीय राज्यघटना व मानवी हक्क -

Fundamental Human Rights

"२६ जानेवारी १९५० रोजी भारताच्या राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाली भारतीय घटनेने नागरिकांना सहा प्रकारचे मुलभूत अधिकार दिलेले आहेत. भारतीय राज्य घटनेच्या तिस-या विभागात कलम १२ ते ३५ या कलमात मुलभूत अधिकार देण्यात आलेले. आहेत.

१. समतेचा अधिकार (Right to Equality) (कलम १४ ते १८)

२. स्वातंत्र्यांचा अधिकार (Right to Freedom) (कलम १९ ते २२)

३. शोषणाविरुध्दचा अधिकार (Right to Against Exploitation) (कलम २३ ते २४)

४. धार्मिक स्वातंत्र्यांचा अधिकार (Right to Freedom of Religion) (कलम २५ ते २८)

५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (Cultural and Educational Right) (कलम २९ व ३०)

६. घटनांत्मक उपायांचा अधिकार (सनदशीर इलाजाचा अधिकार) (Right to Constitutional Remedies) (कलम ३२)

भारतीय राज्यघटनेत जे नागरिकांचे मुलभूत अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यांच्या संरक्षणासाठी घटनेच्या ३२ व्या कलमाल तरतुद केलेली आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाला सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाकडे अर्ज करुन आपल्या हक्कांवर झालेले आक्रमण दुर करता येते. नागरिकांना दिलेल्या मुलभूत अधिकारांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी न्यायालयाकडे दाद मागता येते. मुलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी व्यक्ती जेव्हा न्यायालयाकडे अर्ज करते तेंव्हा न्यायालयाला पुढील पाच आदेश काढता येतात.

१. बंदी प्रत्यक्षीकरण (Hebeas Corpus)

२. परमादेश (Mandamus)

३. प्रतिषेध (Prohibition)

४. अधिकार पृच्छा (Quo-Warranto)

५. उत्प्रेषण (Certiorari)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे:-

(Directive Principles of State Policy)

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणासंबंधीची मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत. राज्याचे ध्येय धोरण व योजना यांना मार्गदशन करण्यासाठी आणि राज्यकारभारासाठी अधिक चांगल्या प्रकारचा मार्ग दाखवण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आवश्यक ठरतात. राज्याचे धोरण ठरविताना योग्य व चांगला मार्ग कोणता आहे हे सांगण्याचे महत्वपूर्ण कार्य मार्गदर्शक तत्वे करतात. राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांना नितिनिर्देशक तत्वे असेही संबोधले जाते. भारत हे समाजवादी कल्याकारी राज्य आहे. तेव्हा राज्यांने कोणत्या मार्गांचा अवलंब करावा. हे सागण्यांचे कार्य मार्गदर्शक तत्वे करीत असतात. नागरिकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी राज्याचे धोरण आदर्श असले पाहिजे.

मुलभूत कर्तव्ये (Fundamental Duties)

समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीला जसे हक्क प्राप्त होतात. तसेच सामाजिक बांधिलकी या दृष्टीने व्यक्तीला काही कर्तव्ये पार पाडावी लागतात. स्वत:चा विकास घडवून आणताना इतरांच्या हक्कावर, स्वातंत्र्यावर आघात होणार नाही या विषयी व्यक्तीला काही कर्तव्ये पार पाडावी लागतात. समाज हिताचा, समाज विकासाचा विचार करुन राज्य व्यक्तीवर काही कर्तव्य लादते. व्यक्तीच्या कृतीवर, वर्तनावर काही बंधने लाधते एखादी कृती व्यक्तीने करावी कि करु नये. या विषयी राज्य व्यक्तीवर बंधने लादते. अशी बंधने नैतिक दृष्या व कायदेशीर दृष्टया व्यक्तीला बंधनकारक असतात. व्यक्तीने ही बंधने, कर्तव्ये पाळून समाज विकासाला हातभार लावणे आवश्यक असते. स्वत:चा विकास करण्यासाठी हक्कांचा उपभोग घेताना व्यक्तींने कर्तव्यांची पुर्ती होणे आवश्यक असते. उदा. राज्याच्या कायदयांचे पालन करणे, मतदान करणे, कर भरणे, सार्वजनिक सेवा करणे अशी कर्तव्ये व्यक्तीला पार पाडावी लागतात.

निष्कर्ष

भारतीय संविधानाने 'एक व्यक्ती एक मत एक मुल्य' हे मुलभूत तत्व स्विकारत राजकीय समाता प्रस्थापित केली आहे. सामाजिक व आर्थिक समाता निर्माण करण्याचे उदिष्टय समोर ठेवले आहे. विषम समाज व्यवस्थेची समतेच्या तत्वावर पुनर्बांधणी करुन समृध्द असे सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाही गणराज्य निर्माण होत असल्याचे संविधान ज्या दिवशी देशाने स्विकारले त्याच दिवशी जाहिर केले. २६ जानेवारी १९५० रोजी देशात प्रजासत्ताक राज्य निर्माण झाले. लोकांना व्यक्ती स्वातंत्र्यांची तसेच मुलभूत हक्कांची संविंधानिक हमी मिळाली. विषम समाज व्यवस्थेला नाकारून समता मुलक समाज व्यवस्थेची मांडणी संविधांनातुन झाली मोठयाप्रमाणात जात व लिंग भेदावर आधारलेला समाज संविधान निती मुळे समतेच्या पातळीवर आला. भारतीय संविधानाने देशाच्या इतिहासात प्रथमच देशातील सर्व नागरिंकाना धर्म, वंश, पंथ, वर्ण, जात, लिंग, भाषा व प्रदेश यांच्या विषमतेच्या भिंती नष्ट करुन समान स्वरुपात कायदेशीर हक्क आणि अधिकार मिळाले. सामाजिक जागृती, शिक्षण, कायदयाची अंमलबजावणी आणि मानवी मुल्यांचा आदर केल्यासच मानवी हक्कांचा खरा लाभ प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचू शकतो.

संदर्भ सुची

१. महाराष्ट्र शासनाचे प्रकाशन "भारताचे संविधान"
२. प्रा. बी.बी. पाटील "भारतीय राज्यघटना व शासन" फडके पब्लिकेशन, कोल्हापूर
३. रंजन कोळंबे "भारताची राज्यघटना आणि प्रशासन" भगीरथ प्रकाशन, पुणे
४. तुकाराम जाधव, डॉ. महेश शिरापुरकर "राजकिय सिदधांत संकल्पना व भारतीय राज्यघटना" युनिक ॲकॅडमी पुणे पहिली आवृत्ती २०२२
५. डॉ. विजय काळेबाग "संविधानाचे विरोधक" प्रज्ञादिप पब्लिकेशन, कोल्हापूर
६. प्रा.बी.बी.पाटील "भारतीय शासन आणि राजकारण" फडके प्रकाशन, कोल्हापूर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

संविधानिक मूल्ये आणि मराठी नाटक

नितीन गणपती खांडेकर
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: nitinkhandekar.dtis@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170962
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 294-298
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

मराठी नाट्यसृष्टी ही केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून ती सामाजिक, राजकीय आणि संविधानिक मूल्यांच्या प्रसाराचे प्रभावी साधन ठरली आहे. भारतीय संविधानाने ज्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चिरंतन मानवी मूल्यांचा स्वीकार केला आहे, त्यांचे प्रतिबिंब मराठी नाटकांत ठळकपणे आढळते. अनेक मराठी नाटककारांनी समाजातील विषमता, जातिभेद, लिंगभेद आणि अन्याय यावर टीका करून समता व न्यायाची गरज अधोरेखित केली आहे. दलित साहित्य प्रवाहातील नाटकांनी वंचित समाजाच्या संघर्षांना केंद्रस्थानी ठेवून संविधानिक मूल्यांचा जागर करण्याचा प्रयत्न केला आहे. थांबा रामराज्य येतंय!, खेळीया, वाटा पळवाटा, उजळल्या दिशा, सूर्यास्त इत्यादी नाटकांतून सामाजिक परिवर्तन, मानवी हक्क, आणि लोकशाही मूल्यांचा प्रचार झाला आहे. अशा प्रकारे मराठी रंगभूमीने भारतीय संविधानाच्या मूल्यव्यवस्थेचा आवाज लोकांपर्यंत पोहोचवून समाजजागृतीचे कार्य केले आहे.

मुख्यशब्द: *संविधानिक मूल्ये, मराठी नाटक, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, सामाजिक परिवर्तन, दलित साहित्य, लोकजागृती.*

प्रस्तावना:

मराठी नाटकांच्या उगमापासून मराठी नाटककारांनी मनोरंजनासोबतच सत्तासंघर्ष व मूल्यसंघर्ष आपल्या नाटकांमध्ये अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मानवी जीवनाला समृद्ध बनवणारी मूल्य व्यवस्था, आणि या मूल्य व्यवस्थेला बसणारे हादरे, मूल्यांची घसरण आणि त्यातून निर्माण होणारे मानवी नात्यांमधील, दोन विचारधारांमधील ताणतणाव, संघर्ष सातत्याने नाटकांचा विषय झालेले आहेत. मानवी मूल्यांचा मराठी नाटकांशी व एकूणच कला व्यापाराशी घनिष्ठ संबंध आलेला आहे.मराठी साहित्य व्यवहारात भाषा, रूपबंध,तंत्र या गोष्टींना जसे महत्त्व आहे तसेच साहित्याचा आशय, साहित्यातील सामाजिकता, राजकीयता, विचार व विचार प्रणाली आणि मानवी मूल्यांनाही महत्त्वाचे स्थान असते. कोणत्याही साहित्य प्रकाराच्या परिपूर्णतेसाठी ते गरजेचेही असते. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही चिरंतन मानवी मूल्ये प्रत्येक साहित्य कृतीत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अंतर्भूत झालेली असतात.मराठी नाटकातही त्याचा प्रत्यय येत राहतो. मराठी नाटकातील विविध पात्रे अन्यायाविरुद्ध झगडताना दिसतात, न्यायाच्या प्रतीक्षेत संघर्ष करताना दिसतात. स्वातंत्र्यासोबत समतेचाही आग्रह धरताना दिसतात. बंधूभावाची संकल्पना नाटकांच्या माध्यमातून बिंबवताना दिसतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
नितीन गणपती खांडेकर, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
खांडेकर, . नितीन . गणपती . (2025). संविधानिक मूल्ये आणि मराठी नाटक. Journal of Research & Development, 17(9(IV)), 294–298. https://doi.org/10.5281/zenodo.17733594

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17733594
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारतीय संविधानानेही या चिरंतन मानवी मूल्यांना महत्त्वाचे स्थान दिल्याचे दिसते. किंबहुना न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मानवी मूल्यांच्या पायावरच संपूर्ण भारतीय संविधान रचले गेले आहे.

मराठी रंगभूमीवर अर्थात मराठी नाटककारांनी भारतीय समाजात आणि राजकारणात घडलेल्या बदलांचे विशेषतःसमाजातील विविध समस्यांचा, संघर्षांचा आणि संविधानिक मूल्यांच्या जागृतीचे चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय संविधानात अंतर्भूत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मूल्यांचा उहापोह मराठी नाटकातील काही घटना आणि प्रसंगातून झालेला दिसतो.

प्रस्तुत शोधनिबंधात काही निवडक मराठी नाटकांच्या आधारे त्यामध्ये आलेल्या संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उद्दिष्टे:

1. संविधानिक मूल्ये ही संकल्पना स्पष्ट करणे.
2.संविधानिक मूल्ये आणि मराठी नाटक यांचा अनुबंध तपासणे.

गृहीतके:

1. मराठी नाटकात संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब पडलेले आहे.
2. संवेदनशील मराठी नाटककारांनी आपल्या नाटकांमधून न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता तसेच लोकशाही या संविधानिक मूल्यांचा प्रभावीपणे जागर करण्याचा प्रयत्न केला आहे.

संविधानिक मूल्ये:

न्याय, स्वातंत्र्य, समता, व बंधुता ही आपली आजची भारतीय संविधानाने घोषित केलेली मानवी मूल्ये आहेत. संविधानाच्या प्रास्ताविकामध्ये या मूल्यांचा केवळ उल्लेख आहे असे नाही तर त्यांच्या परिपुर्ततेची तरतूदही घटनाकर्त्यांनी करून ठेवलेली आहे.

भारतीय संविधान हे भारताच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थांचे मार्गदर्शन करणारे प्रमुख दस्तावेज आहे. भारतीय संविधानामध्ये सामाजिक, आर्थिक न्यायासाठी समाजवाद, राजकीय न्यायासाठी लोकशाही तर सर्वच नागरिकांकडे समतेच्या भूमिकेतून पाहण्यासाठी धर्मनिरपेक्षता या मूल्यांचा स्वीकार करण्यात आला आहे.घटनेच्या प्रास्ताविकेत स्वातंत्र्य, समता,सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, बंधूभाव, धर्मनिरपेक्षता इत्यादी आधुनिक मूल्यांचा उल्लेख आहे. ही आजची आपली अधिकृत मूल्ये आहेत.

मानवी प्रतिष्ठेसाठी स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय हे तिन्ही अनिवार्य असतात. मानवी प्रतिष्ठेसाठीच आर्थिक पातळीवर निर्बंध व सक्ती पाहिजे, तर आत्मप्रकटीकरणाच्या स्तरावर स्वातंत्र्याला महत्वाचे स्थान आहे. प्रत्येकाच्या मूलभूत जैविक गरजांची पूर्तता करणे हे समता तत्वाचेच एक अंग आहे. यासाठी आर्थिक समता व आर्थिक न्याय मिळाला पाहिजे. स्वातंत्र्य उपभोगाची मूलभूत अट म्हणजे आर्थिक समता आहे.

भारताचे संविधान म्हणजे एक आधुनिक मूल्य व्यवस्थाच आहे. घटनेच्या चौकटीत ही मूल्ये विविध ठिकाणी समाविष्ट केलेली आहेत.काही मूल्ये प्रास्ताविकेत आहेत.त्यांना राष्ट्रीय अंतिम साध्य किंवा राष्ट्रीय संस्कृतीची आदर्शवादी चौकट असे म्हणता येईल. यातील किमान काही मूल्ये राज्य संस्थेने कार्यान्वित केली पाहिजेत. राज्यसंस्थेने बंधनकारक म्हणून कार्यान्वित करावयाच्या कार्यक्रमाचे दिग्दर्शन मार्गदर्शक तत्त्वात घटनाकर्त्यांनी केलेले आहे. समताधिष्ठित समाज रचनेच्या निर्मितीसाठी संविधानाच्या प्रास्ताविकेत ही मानवी मूल्ये सांगितलेली आहेत.

भारतीय लोकशाहीची व्याख्या संविधानाच्या प्रास्ताविकातच सापडेल. ही राज्यघटना आपल्या नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांची आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा निर्धार करते. खरे तर भारतीय राज्यघटना ही भारतीय लोकशाहीचे संकल्पचित्रच आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

मराठी नाटक आणि संविधानिक मूल्यांचा अनुबंध:

भारतीय संविधानाची अंमलबजावणी 26 जानेवारी 1950 पासून सुरू झाली. त्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1960 साली झाली. भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना सामाजिक, राजकीय आर्थिक न्यायाची तसेच स्वातंत्र्य, समता व बंधुतेवर आधारित समाजाची हमी दिली आहे. परंतु भारतीय समाज हा विषमतेने ग्रासलेला असून संविधानाची अंमलबजावणी होत असताना देखील समाजात विषमतेची बिजे समाज व्यवहारात आढळून येतात. त्यामुळे संविधानाला अपेक्षित अशी समाज रचना निर्माण होण्यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत. मराठी साहित्यानेही याची कमी अधिक प्रमाणात दखल घेतलेली दिसून येते. मराठी साहित्याच्या अनुषंगाने मराठी नाटककारांनीही त्यांच्या नाट्यकृतींच्या माध्यमातून विषमतेवर नेमकेपणाने बोट ठेवत संविधानिक मूल्यांचा जागर करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

मराठी नाटककारानी आपल्या नाटकामधून समाजातील गरीब, वंचित आणि शोषितांच्या समस्या मांडून सामाजिक न्यायाची, स्वातंत्र्य, समता व बंधुतेची गरज वेळोवेळी अधोरेखित केलेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात काही निवडक मराठी नाटकांच्या संहितांचा आधार घेऊन त्यामध्ये संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी रंगभूमीवर आलेल्या थांबा रामराज्य येतय! (१९८२) या प्रकाश त्रिभुवन लिखित नाटकात भारतीय समाज जातीय व्यवस्थेने किती पोखरला गेलाय आणि सद्य परिस्थिती देखील ग्रामीण भागात असलेले जातीव्यवस्थेचे प्रस्थ यावर नाटककारांनी प्रकाश टाकला आहे. नाट्य लेखकाने पुराणातील घटनांचे दाखले देत आजपर्यंत शूद्रांवर ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्यानी केलेला अन्याय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.या नाटकात जातीव्यवस्थेमुळे न्याय किती दुरापास्त होत आहे हे पदोपदी जाणवत राहते.

आमदार सौभाग्यवती (१९९५) या श्रीनिवास जोशी लिखित नाटकात राजकारणाच्या अवकाशात होणारी एका कुटुंबाची वाताहत मांडण्याचा प्रयत्न नाटककारांनी केला आहे. प्रस्थापित राजकारणी व्यक्तीची पत्नी आमदार म्हणून राजकारणात आल्यानंतर एक स्त्री म्हणून होणारी तिची घुसमट आणि तिला मिळत असलेले दुय्यमत्व या नाटकात अधोरेखित करण्यात आलेले आहे .राजकारणात स्त्रीला संधी मिळाली तर ती निश्चितपणे जनतेला न्याय देऊ शकते. या नाटकातील सुमित्रा हे सिद्ध करुन दाखवते.

समाजातील जातिभेद, लिंगभेद आणि इतर सामाजिक भेदभावांवर भाष्य करून सर्व नागरिकांना समान संधी मिळायला हव्यात, हे मूल्य नाटकांच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले जाते. रत्नाकर मतकरी यांच्या इंदिरा (२०१६) या नाटकातही संविधानिक मूल्यांचा विचार आलेला आहे. नाट्य लेखकाने या नाटकात इंदिरा गांधींच्या आयुष्यातील शेवटची नऊ वर्षे म्हणजे आणीबाणी पासून ते त्यांच्या हत्येपर्यंतचा कालखंड घेतलेला आहे.इंदिरा गांधींनी आपल्या पंतप्रधान पदाच्या काळात म्हणजे १९७५ साली भारतावर आणीबाणी लादली होती. या निर्णयाच्या विरोधात देशभरात संतापाची लाट उसळली होती. त्याचे पडसाद इंदिराजींच्या कुटुंबातही पडलेले होते.

दत्ता भगत लिखित वाटा पळवाटा (१९८८) या नाटकातही संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाने भारावलेल्या तीन पिढ्यांचे चित्रण या नाटकात आहे.भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मूल्यांचे कट्टर समर्थक होते. भारतीय संविधान हे याच मानवी मूल्यांवर आधारित, आणि मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी समर्पित आहे, असे जाणवते. या नाटकातही या मूल्यांचा सातत्याने प्रत्यय येत राहतो.

पडघम(२०१४) हे अरुण साधू यांनी लिहिलेले नाटक असून समाजकारण, राजकारण आणि सत्ताकारण यांचे जहाल मिश्रण असलेले युवानाट्य आहे.या नाटकात प्रवीण नेर्लेकर हा चळवळया तरुण आणि त्याचे पीएच.डी.चे मार्गदर्शक प्रोफेसर हर्षे यांच्या संवादातून संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. आम्ही देशाचे मारेकरी (१९८२) या टेक्सास गायकवाड यांनी लिहिलेल्या नाटकात जातीयतेचे आणि धर्मांधतेचे विष या देशाच्या एकात्मतेला कसे मारक आहे. विषमतेचे तत्त्वज्ञान पोसणाऱ्या प्रवृत्ती कशा पद्धतीने विषमता पसरवतात हे या नाटकात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

व्यक्ती आणि समाजाच्या स्वातंत्र्याला महत्त्व देऊन, संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची गरज मराठी नाटकांतून दर्शवली जाते. विविध धर्मांच्या लोकांमध्ये सलोखा राखण्याची आणि कोणत्याही एका धर्माला प्राधान्य न देण्याची शिकवण नाटकांतून दिली जाते. मराठी रंगभूमीवर आलेले उजळल्या दिशा (२००१) हे डॉ. सदानंद मोरे लिखित मराठी नाटकात बौद्ध तत्त्वज्ञान,बुध्द चरित्र, पालीभाषा,संस्कृत भाषा, दलित चळवळ, मार्क्सवादी चळवळ, पुरोगामी चळवळ, आंबेडकरी तत्त्वज्ञान,आंबेडकरी चळवळ, डॉ.आंबेडकरांचे चरित्र,त्यांचा जीवन संघर्ष, भारतीय राजकारण आदी विषयांचा अभ्यास करून एका उच्चशिक्षित प्राध्यापक कार्यकर्त्याला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

समोर ठेवून लिहिलेले आहे. या नाटकात स्वातंत्र्य या मूल्याविषयी चर्चा घडलेल्या आहेत.या नाटकातील नायक हा दलित असून तो उच्चशिक्षित प्राध्यापक आहे.प्राध्यापक नागसेन आणि त्याची पत्नी प्रियवंदा यांच्यातील संवादामधून या संविधानिक मूल्यांचा संदर्भ येतो.

जयवंत दळवी लिखित सूर्यास्त (१९७८) या नाटकात स्वातंत्र्याच्या प्रेरणेने भारावलेले व गांधीवादाचा प्रचंड पगडा असलेले एक व्यक्तिमत्व म्हणजेअप्पाजी.भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत विशेषता गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अनेक आंदोलनात आप्पाजींनी उडी घेतली होती. स्वातंत्र्य या मूल्यांविषयी या नाटकात चर्चा घडवून आणण्यात आली आहे. लोकांचा सहभाग आणि लोकांकडून चालवल्या जाणाऱ्या शासनाचे महत्त्व, तसेच व्यक्ती-केंद्रित दृष्टिकोन नाटकांमध्ये प्रतिबिंबित होतो. समाजात एकोपा आणि ऐक्य राखण्याची गरज, तसेच एकमेकांना मदत करण्याची भावना मराठी नाटकांतून व्यक्त होते.

दलपतसिंग येती गावा (२०२३) हे नाटक अरुणा रॉय यांनी माहितीच्या अधिकारासाठी दिलेल्या लढ्यावर आधारित आहे. मूळ पटकथा मकरंद साठे यांनी लिहिलेली आहे. त्यांनी अतुल पेठे व राजकुमार तांगडे यांना सोबत घेऊन या पटकथेतून हे नाटक साकारले आहे.आजचे गाव पातळीवरील राजकीय व सामाजिक ताणतणाव त्यात पकडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या नाटकात राजस्थानातील भुरा नामक जमीनदाराने गावच्या गायरानाचा कब्जा घेऊन गावकऱ्यांवर सत्ता गाजवण्यातून झालेल्या संघर्षाची कहाणी घेतलेली आहे. या नाटकात वेळोवेळी लोकशाही मूल्ये, लोकांचा सहभाग, लोकांकडून चालवल्या जाणाऱ्या शासनाचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे.

प्रा. दत्ता भगत यांच्या खेळीया (१९८२) या नाटकात दलित समाजातील नेतृत्वाचे सवर्ण समज बाहुले बनवून आपल्या तंत्राप्रमाणे त्यास नाचवीत असतात. ज्यावेळी दलित नेतृत्व आपल्या मनाप्रमाणे मताप्रमाणे वागू लागते त्यावेळी ही गोष्ट सवर्णांना सहन होत नाही. दलित नेतृत्वाच्या विरोधात उभे राहून त्यास संपवले जाते ही वस्तुस्थिती या नाटकात मांडली आहे. यातील दलित नेतृत्वाने जो संघर्ष केला त्या संघर्षातून अस्पृश्य समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुतां आणि न्याय मिळवून देण्यासाठी त्यांने संघर्ष केलेला दिसतो.

इ.स.सन १९६० नंतर निर्माण झालेल्या दलित साहित्य प्रवाहात दलित रंगभूमीनेही आपल्या माध्यमातून या संविधानिक मूल्यांचा उद्घोष केलेला दिसतो. त्यामध्ये नाटककार रामनाथ चव्हाण यांच्या साक्षीपुरम (१९८२), बामनवाडा (१९९१), पारध (२००३) तसेच प्रेमानंद गज्वी यांच्या देवनवरी (१९८०), वांझमाती (१९८२) किरवंत (१९९१), तनमाजोरी (१९८३) यासारख्या नाटकांमधून मानवी मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. आंबेडकरी चळवळीने संविधानिक मूल्ये समाजात रुजवण्यासाठी संघर्ष केला पण येथील दलितांना उपरोक्त मूल्ये अनुभवायला मिळत नाहीत. आपण दलितांपेक्षा श्रेष्ठ आहोत ही श्रेष्ठत्वाची भावना येथील सवर्णांच्या मनात रुजलेली आहे. त्यामुळे प्रस्थापित सवर्ण दलितांना दुय्यम वागणूक देताना त्यांच्यावर गुलामी लादत असतात. त्यामुळे त्यांना सामाजिक समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि न्याय ही मूल्ये अनुभवायला मिळत नाहीत याचे चित्रण किरवंत, खेळिया, भूमिपुत्र, थांबा! रामराज्य येतंय! या नाटकांमधून करण्यात आले आहे.त्याचा प्रत्यय संपूर्ण नाटकात येत राहतो. याच मालिकेत कमलाकर डहाट, नामदेव व्हटकर, टेक्सास गायकवाड, प्रभाकर दुपारे, प्रकाश त्रिभुवन, रुस्तुम अचलखांब, बाबुराव कांबळे, संजय पवार यासारख्या अनेक नाटककारांनी संविधानिक मूल्यांचा अंतर्भाव आपल्या नाट्य लेखनात केलेला दिसतो. अशा पद्धतीने अनेक संवेदनशील मराठी नाटककारांनी आपल्या नाटकांच्या माध्यमातून भारतीय विषमतेवर थेट भाष्य केलेले असून भारतीय संविधानाला अपेक्षित असलेल्या नवसमाज रचनेतील अडथळे दर्शवण्याचा प्रयत्न केलेला आहे. संविधानिक मूल्यांचा वेळोवेळी जागर केलेला आहे.

सारांश:

मराठी रंगभूमीवर आलेल्या बहुतांशी मराठी नाटकांमध्ये विशिष्ट रूढी-परंपरांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून संविधानाने नाकारलेल्या अशा परंपरांना आव्हान दिलेले दिसते.सामाजिक आणि राजकीय बदलांवर आधारित नाटकांतून, नागरिकांनी आपल्या हक्कांसाठी आणि कर्तव्यांसाठी कसे उभे राहावे, याचे चित्रण केलेले दिसते.समाजातील वंचित घटकांना केंद्रस्थानी ठेवून, त्यांचे प्रश्न मांडण्यातून आणि त्यांच्या हक्कांसाठी लढण्यातून संविधानिक मूल्यांचे महत्त्व स्पष्ट केल्याचे दिसते.

थोडक्यात, मराठी नाटके केवळ मनोरंजन करत नाहीत, तर ती भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना प्रत्यक्ष जीवनात आणण्याचा आणि ती रुजविण्याचा एक मूलगामी आणि महत्त्वाचा प्रयत्न करताना दिसतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निष्कर्ष:

१. भारतीय संविधान हे चिरंतन मानवी मूल्यांवर अर्थात न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्या पायावर उभे आहे.

२. भारतीय समाजातील विषमतावादी व्यवस्थेमुळे निर्माण झालेले प्रश्न संवेदनशील मराठी नाटककारांनी आपल्या नाटकांमधून मांडलेले आहेत.

३. हे मांडत असताना संविधानिक मूल्यांशी विसंगत मानवी वर्तन नाट्य आशयाच्या माध्यमातून नाटककारांनी समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केलेला दिसतो.

४. मराठी नाटकांमध्ये संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

संदर्भसूची:

1. चौधरी राजेश (सं.) 2017, भारताचे संविधान, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव / पुणे.आठवी आवृत्ती
2. साधू अरुण, 2014 पडघम, ग्रंथाली प्रकाशन मुंबई.द्वितीय आवृत्ती.
3. मोरे सदानंद, 2001, उजळल्या दिशा, अक्षर प्रकाशन मुंबईत प्रथम आवृत्ती.
4. भगत दत्ता, 1988, वाटा पळवाटा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती.
5. दळवी जयवंत, 1978, सूर्यास्त, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई. प्रथम आवृत्ती.
6. भगत दत्ता, 1982, खेळीया, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.प्रथम आवृत्ती.
7. जोशी श्रीनिवास, 1995, आमदार सौभाग्यवती,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे.प्रथम आवृत्ती
8. मतकरी रत्नाकर, २०१६, इंदिरा, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे.प्रथम आवृत्ती.
9. त्रिभुवन प्रकाश, 1982, थांबा रामराज्य येतंय!, दलित थिएटर प्रकाशन, औरंगाबाद.प्रथम आवृत्ती.
10. डॉ.जोशी बी.आर. 2017, भारतीय राज्यघटनेतील मूल्यव्यवस्था, सुनिधी पब्लिशर्स, पुणे. प्रथम आवृत्ती.
11. डॉ.कांबळे महावीर, २०१५, साठोत्तरी मराठी नाटक आणि दलित नाटक एक चिकित्सक अभ्यास, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

वारकरी संत साहित्य : लोकशाहीच्या बळकटीसाठी महत्त्वाचे

डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली
Email: sheetalgorde12345@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170963
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 299-302
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय समाजजीवनात संत साहित्याने सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले. वारकरी संप्रदायातील संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत बहिणाबाई यांसारख्या संतांनी अध्यात्माच्या आडून समाजातील विषमता, अस्पृश्यता, लिंगभेद, अन्याय यांना प्रखर विरोध केला. त्यांच्या वाणीतून लोकमानसात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यांची पेरणी झाली. समता या मूल्याच्या दृष्टीने संतांनी जातिभेद नाकारून "सर्वभूतांत देव आहे" हा संदेश दिला. उच्च-नीच भेद मान्य न करता प्रत्येकाला ईश्वरभक्तीचा अधिकार दिला. स्वातंत्र्य या संकल्पनेत त्यांनी रूढी-परंपरा, कठोर कर्मकांड व धर्माधिष्ठित बंधनांपासून मुक्त होऊन मुक्त, व्यक्तिगत भक्तीची ग्वाही दिली. बंधुता या मूल्याचा अवलंब करून "वसुधैव कुटुंबकम्" ही कल्पना प्रत्यक्षात आणली. भक्तीमार्ग सर्वांसाठी खुला असल्याने समाजातील तुटलेपणा कमी करण्यास मदत झाली. न्याय या संकल्पनेत संतांची भूमिका महत्त्वाची ठरली. शोषित, वंचित, स्त्रिया व दलित यांच्या बाजूने त्यांनी आवाज उठवून समाजात न्याय्य व समताधिष्ठित व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

ही मूल्येच नंतर भारतीय राज्यघटनेत आधुनिक लोकशाहीची पायाभूत तत्त्वे बनली. संत साहित्याने लोकमानस तयार केले, सामाजिक समतेचा विचार रुजवला आणि पुढील काळातील लोकशाही विचारवंतांना बौद्धिक आधार दिला. त्यामुळे संत साहित्य हे केवळ अध्यात्मिक न राहता सामाजिक, मानवतावादी आणि लोकशाही प्रवासाला दिशा देणारे ठरले. आजच्या काळात जातीयवाद, धार्मिक ध्रुवीकरण, विषमता या समस्या समोर असताना संतांचा समतेचा व मानवतेचा संदेश लोकशाही बळकट करण्यासाठी तितकाच आवश्यक व उपयुक्त आहे.

मुख्यशब्द: *वारकरी संत साहित्य, लोकशाही मूल्ये, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, सामाजिक समता, भारतीय राज्यघटना, मानवता, सामाजिक न्याय.*

प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्थेच्या घडणीत संत साहित्याला फार मोठे स्थान आहे. संत कवींच्या वाङ्मयातून प्रकटलेले विचार केवळ भक्तिपर नसून ते समाजाभिमुख, लोकाभिमुख आणि मूल्याभिमुख आहेत. समाजातील जातिभेद, अस्पृश्यता, स्त्री-पुरुषातील असमानता, आर्थिक विषमता, अंधश्रद्धा व अन्यायकारक प्रथा यांविरुद्ध संतांनी आवाज उठवला. त्यांनी आपल्या अभंग, ओव्या, भारुडे, गवळणी यांतून सामान्य माणसाचे जीवन उलगडले. संतांचे तत्त्वज्ञान हे 'सर्वात्मभाव' या संकल्पनेवर आधारलेले होते. हीच एकात्मता पुढे लोकशाही मूल्यांचा पाया ठरते.

लोकशाही ही फक्त शासनपद्धती नाही, तर ते एक जीवनमूल्य आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही तिची मूलतत्त्वे आहेत. भारताच्या लोकशाही परंपरेचा विचार केला असता, बौद्ध-जैन धर्म, भक्ती चळवळ, संत साहित्य आणि पुढील समाजसुधारक चळवळी या टप्प्याटप्प्याने विकसित झालेल्या दिसतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली

How to cite this article:
गोर्डे-पाटील, . शीतल . सचिन . (2025). वारकरी संत साहित्य: लोकशाहीच्या बळकटीसाठी महत्त्वाचे. Journal of Research & Development, 17(9(IV)), 299–302.
https://doi.org/10.5281/zenodo.17733681

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17733681

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संत साहित्यानेच प्रथम समाजाला सांगितले की 'देव सर्वांचा आहे, भक्ती सर्वांसाठी आहे' आणि 'अध्यात्मिक अनुभूतीसाठी कोणत्याही जाती-धर्म, लिंग किंवा पंथाचा अडसर नाही'. हेच लोकशाहीचे तत्त्वज्ञान आहे.

विषय विवेचन-

वारकरी संप्रदाय ही संत साहित्याची प्रात्यक्षिक अभिव्यक्ती आहे. यातून लोकशाहीचे स्वरूप दिसून येते. वारकरी पंढरपूरच्या यात्रेत जात-धर्म, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, शेतकरी-कामगार सर्वजण एकत्र येतात. अभंगगायन, कीर्तन, प्रवचन, चर्चा या प्रकारांतून लोकपरंपरेत विचारांची देवाणघेवाण घडते. यामध्ये सहभागी होणाऱ्या सर्वांना समान अधिकार आहे. हे लोकशाही मूल्यांच्या सरावाचेच एक रूप मानता येते.

आधुनिक भारतीय लोकशाहीच्या घडणीत संत साहित्याचा अप्रत्यक्ष परंतु भक्कम वाटा आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांना संत साहित्याची प्रेरणा मिळाली. समता, बंधुता, न्याय यांची पायाभरणी संतांनी केली आणि त्याचा प्रभाव पुढील सुधारक चळवळींवर पडला. भारतीय संविधानातील मूल्ये आणि संत साहित्याची तत्त्वे यामध्ये मूलभूत साधर्म्य आढळते. आजच्या काळात भारतीय लोकशाही अनेक आव्हानांना सामोरी जाते. जातीयता, धार्मिक दुरावा, असमानता, स्त्रीविरोधी प्रवृत्ती, हिंसाचार इत्यादी. या पार्श्वभूमीवर संत साहित्य अधिकच महत्त्वाचे ठरते. कारण संतांचे विचार समाजाला एकत्र बांधणारे, लोकशाहीची जडणघडण करणारे आणि मानवी मूल्यांना अधोरेखित करणारे आहेत. म्हणूनच "वारकरी संत साहित्य लोकशाहीच्या बळकटीसाठी महत्त्वाचे" हा विषय शोधनिबंधाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त व प्रासंगिक ठरतो. या संशोधनातून संत साहित्याचा लोकशाही मूल्यांवरील परिणाम, आधुनिक काळातील संदर्भ आणि भावी समाजरचनेतील उपयुक्तता यांचा शोध घेणे शक्य होईल.

संत साहित्य व आधुनिक लोकशाही मूल्य : समता -

लोकशाहीचे पहिले व प्रमुख तत्त्व म्हणजे समता. धर्म, जात, लिंग, भाषा, प्रांत, वंश यांचा विचार न करता प्रत्येक माणूस कायद्यापुढे समान आहे, ही धारणा भारतीय राज्यघटनेने मान्य केली आहे. विशेष म्हणजे, ही मूल्ये आधुनिक भारताच्या राज्यघटनेत आली असली तरी त्यांची सांस्कृतिक पायाभरणी संत साहित्याने मध्ययुगातच केली होती. महाराष्ट्रातील संतांनी "सर्व जीव हे परमात्म्याचे अंश आहेत" अशी भूमिका घेत सामाजिक व धार्मिक क्षेत्रात समतेचा पाया घातला.

"आतां विश्वात्मके देवे..." या ओवीत विश्वातील प्रत्येक जीव हा त्या परमात्म्याचा भाग आहे, असे ज्ञानेश्वर सांगतात. त्यांनी वर्णव्यवस्था, जातिभेद, उच्च-नीच भेद नाकारून आत्मज्ञानाने सगळे समान आहेत ही धारणा रुजवली. नामदेवांच्या अभंगात जात-धर्माचा आग्रह नाही. ते म्हणतात, "कुणाच्या जाती पाहू नये, हरी सर्वांमध्ये वसे". भजन-कीर्तन परंपरेत शूद्र, स्त्री, परधर्मीय सर्वांना समान सहभाग दिला. अस्पृश्य असलेल्या चोखामेळ्याने स्वतःच्या दुःखद जीवनातून सामाजिक विषमतेचा विरोध केला. "आम्ही जाती हीन, आम्हांला दीन..." असे ते म्हणतात. त्यांच्या वाणीने सामाजिक न्यायासाठी जनचळवळीस चालना दिली. जनाबाईने "देव माझा झाडतो झाडू" असे सांगून देवही स्त्री-पुरुष भेद मानत नाही, हे स्पष्ट केले. संत परंपरेत स्त्रियांनाही मुक्तीचा हक्क आहे, हा समतेचा विचार आहे. "आळविती विठोबा अवघ्या जातीं" असे सांगून तुकारामांनी वारकरी संप्रदाय सर्वांसाठी खुला ठेवला. ते म्हणतात, "जेथ भूतांशी प्रेम, तेथे देवाचे नाम". म्हणजेच जात-धर्मभेद न करता सर्वांशी प्रेम करणे हेच खरी समता आहे.

भारतीय राज्यघटनेने अनुच्छेद १४ ते १८ मध्ये समतेचे हक्क दिले आहेत. कायद्यापुढे समानता, संधीची समानता, अस्पृश्यता नष्ट करणे ही सर्व तत्त्वे संत साहित्याच्या सामाजिक व धार्मिक समतेच्या विचाराशी थेट जोडलेली आहेत. संत परंपरा समाजाला समतेची मानसिक व सांस्कृतिक जडणघडण देत होती. लोकशाहीने त्याचे राजकीय आणि कायदेशीर रूप दिले. संतांच्या वाणीतली समता लोकशाहीतल्या "Equality before law" या तत्त्वाशी जुळते.

संत साहित्य व आधुनिक लोकशाही मूल्य : स्वातंत्र्य -

लोकशाहीचा एक मूलभूत पाया म्हणजे स्वातंत्र्य. भारतीय राज्यघटनेत विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तीस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, आचरणस्वातंत्र्य या सर्व गोष्टींचा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु हे स्वातंत्र्य फक्त कायदेशीर नाही; त्याला आध्यात्मिक व सांस्कृतिक अधिष्ठानदेखील आहे. महाराष्ट्रातील संत साहित्यात मानवी आत्म्याच्या मुक्तीची आकांक्षा, बंधनांविरुद्धचा संघर्ष व प्रत्येकाला आपल्या मार्गाने देवाशी एकरूप होण्याचा अधिकार याचे दर्शन घडते. हेच विचार आधुनिक लोकशाही मूल्यांतील स्वातंत्र्याशी साधर्म्य दर्शवतात.

ज्ञानेश्वरांनी "आत्मज्ञानाने मनुष्य बंधनांतून मुक्त होतो" असे सांगितले. त्यांनी वेद-श्रुतीच्या बंधनात न राहता 'ओवी' या लोकभाषेत गीतेचे भाष्य केले. हे भाषिक व विचारस्वातंत्र्याचे उदाहरण आहे. नामदेव म्हणतात, की देवाचा दरबार सर्वांसाठी खुला आहे. कोणत्याही धार्मिक बंधनात न अडकता भक्ती करता येते. अस्पृश्यतेच्या जुलूमाविरुद्ध चोखामेळा उभे राहिले. ते देवाशी संवाद साधताना सामाजिक बंधनांविरुद्ध आवाज उठवतात. त्यांच्या वाणीने सामाजिक गुलामीतून मुक्त होण्याचा संदेश दिला. स्त्रीही

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

स्वातंत्र्याने भक्ती करू शकते, ही जनाबाईची ठाम भूमिका होती. तुकारामांनी "सर्व सुखें अनंतें स्वान्त सुखें" असे सांगून अंतःकरणाच्या मुक्तीला महत्त्व दिले. त्यांच्या अभंगात कर्मकांड, अंधश्रद्धा, जातिभेद या बंधनातून बाहेर पडून थेट देवाशी संवाद साधण्याचे स्वातंत्र्य आहे.

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९ मध्ये प्रत्येक नागरिकाला विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्थापनेचे स्वातंत्र्य, वावरण्याचे व व्यवसायाचे स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य ही तत्त्वे संतांच्या विचारांशी अगदी जुळणारी आहेत. संतांनी लोकांना विचार, श्रद्धा आणि आचरण यांत मुक्तता दिली.

संत साहित्य व आधुनिक लोकशाही मूल्य : बंधुता -

भारतीय लोकशाहीची पायाभरणी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या चार मूल्यांवर झाली आहे. यात बंधुता म्हणजे परस्परांतील आपुलकी, बंधुत्वभाव, सहजीवनाची जाणीव आणि सर्व मानव एकाच कुटुंबाचे घटक आहेत ही भावना. संत साहित्यानेही हाच संदेश दिला आहे. संतांनी मानवी समाजातील जातिभेद, उच्चनीचतेची दरी, स्त्री-पुरुष भेद दूर करून सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य केले. त्यामुळे संत साहित्य हे लोकशाहीतील बंधुतेचे सांस्कृतिक अधिष्ठान ठरते.

ज्ञानेश्वर म्हणतात "अखंडिते ब्रह्मांड ते माझे घर". ते सर्व समाजाला "विश्वबंधुत्व" शिकवतात. त्यांच्या विचारात त्यांनी कुणालाही परका मानले नाही. नामदेवाच्या अभंगांमध्ये देव सर्वांचा आहे, सर्व जीव एकच आहेत ही भावना स्पष्ट होते. ते म्हणतात, "आपुले घर सर्वांना ठावे, देव एकचि आहे". हीच बंधुतेची लोकशाही दृष्टी आहे. चोखामेळा हे अस्पृश्य असूनही वारकरी परंपरेत सर्वांना समानतेने जोडतो. त्याच्या अनुभवकथनात मानवता हेच धर्म म्हणून प्रतिपादन केले आहे. सर्व समाजात सामावून घेण्याची हाक म्हणजेच बंधुता. जनाबाईच्या काव्यात दैनंदिन जीवनातील दुःख, परंतु त्यातही देवाशी आणि वारकरी समाजाशी नाते आहे. ती स्वतःला व सर्व भक्तांना विठोबाची मुले मानते. स्त्रिया-पुरुष, उच्च-नीच सर्वांना समानपणे बांधणारी तिची दृष्टी बंधुतेशी सुसंगत आहे. तुकारामांनी सर्वांना भाऊ मानले. "आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने" ही ज्ञानवाटणी म्हणजे बंधुतेचे श्रेष्ठ उदाहरण. त्यांनी वाद, स्पर्धा, भेदभाव याऐवजी सहअस्तित्वाचे मूल्य दिले.

भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बंधुतेला विशेष स्थान दिले. बंधुता शिवाय समता व स्वातंत्र्य टिकू शकत नाही. सर्व धर्म, जाती, भाषांना समान सन्मान देणे ही बंधुतेची आधुनिक व्याख्या आहे. विविधतेत एकता हे भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे, जे संत साहित्याच्या भावनेशी थेट जुळते.

संत साहित्य व न्यायाची संकल्पना-

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत सांगितले की, परमेश्वर सर्वत्र समान आहे. त्यांनी सांगितले, "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले", यात दीनदलितांच्या बाजूने न्यायाचा आधार आहे. समाजातील दुर्बल घटकांना सहानुभूती आणि न्याय्य स्थान देणे हेच त्यांचे ध्येय. नामदेवांनी भक्ति व देवाची कृपा सर्वांसाठी समान असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी उच्च-नीच भेद नाकारून "देव सर्वांचा" ही न्याय्य संकल्पना मांडली. देवापुढे कोणी श्रेष्ठ-निम्न नाही, हे ते वारंवार सांगतात. तो अस्पृश्य समाजातील असून, आपल्या कवितेत अन्यायकारक सामाजिक प्रथांचा निषेध करतो. "आम्ही जातीअडाणे, हाकलिले देऊळाबाहेर" अशा वेदना व्यक्त करताना तो न्याय मागतो. त्याचे साहित्य दलित न्यायचळवळीचा पाया मानले जाते. जनाबाई दासी असूनही आपल्या कवितेत स्त्रियांच्या दैन्यावस्थेवर प्रकाश टाकते. स्त्रियांच्या समान मान्यतेसाठी आणि न्याय्य वागणुकीसाठी तिचा काव्यस्वर महत्त्वाचा आहे. तुकारामांचे अभंग "सर्वे जन सुखिनो भवंतु" या भावनेला पोषक आहेत. त्यांनी लोभ, फसवणूक, शोषण यावर कठोर प्रहार केला. गरीब, शेतकरी, वंचित यांच्या जीवनातील अन्यायाविरुद्ध त्यांनी निर्भीड भूमिका घेतली.

भारतीय राज्यघटनेत न्याय ही मूलभूत संकल्पना आहे. जात, धर्म, लिंग यांच्या आधारावर कोणावरही अन्याय होऊ नये. संपत्तीची समान विभागणी, संधींची समता. प्रत्येकाला मताधिकार, प्रतिनिधित्व व निर्णय प्रक्रियेत सहभाग.

अशा प्रकारे संतांच्या विचारांतून उभ्या राहिलेल्या या मूल्यांनी पुढे भारतीय राज्यघटनेतील लोकशाही मूल्यांना सांस्कृतिक पायाभूत आधार दिला. संतांची वाणी ही फक्त अध्यात्मिक नव्हती, तर सामाजिक व मानवतावादी होती. म्हणूनच संत साहित्य आजही समाजाच्या लोकशाही प्रवासाला प्रेरणा देणारे, बळकटी देणारे आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निष्कर्ष

१. संत साहित्याचा मूलस्वर हा मानवतेचा आहे.
२. जात, धर्म, लिंग, वर्ण या कृत्रिम भेदांच्या पलीकडे जाऊन त्यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांची घोषणा केली. हीच मूल्ये आधुनिक भारतीय लोकशाहीची आधारशिला आहेत.
३. संतांनी उच्च-नीच, अस्पृश्य-स्वच्छ असे भेद तोडून देव सर्वांचा असल्याचे प्रतिपादन केले.
४. त्यांनी धर्मग्रंथातील कठोर बंधने व रूढींपेक्षा मुक्त, व्यक्तिगत भक्तीला प्राधान्य दिले.
५. 'वसुधैव कुटुंबकम्' या भावनेला अनुसरून सर्व मानवांना बंधुभावाने जोडले.
६. शोषित, वंचित, स्त्री, अस्पृश्य यांच्या हक्कांचा आवाज बनून त्यांनी सामाजिक न्यायाची संकल्पना प्रस्थापित केली.
७. लोकशाहीपुढील आजच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी संत साहित्याचे पुनर्पठण आवश्यक आहे.
८. संतांचा समतावादी दृष्टिकोन लोकशाही मूल्यांना नवी ऊर्जा प्रदान करतो.
९. वारकरी संत साहित्य हे लोकशाहीची पायाभरणी मजबूत करणारे प्रभावी साधन आहे.

संदर्भ

१. केतकर, शं. वा. संतसाहित्याचा इतिहास. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९७३.
२. दांडेकर, र. ना. मराठी संतसाहित्याची परंपरा. पुणे: श्रीविद्या प्रकाशन, १९८२.
३. कुलकर्णी, वि. स. ज्ञानेश्वरीतील लोकशाही मूल्ये. औरंगाबाद: लोकमंगल प्रकाशन, १९९५.
४. देशमुख, वि. का. तुकारामांचे अभंग : एक अभ्यास. मुंबई: पद्मगंधा प्रकाशन, २००१.
५. बोरकर, प्र. के. संत चोखामेळा : जीवन व साहित्य. पुणे: साहित्य संगम, १९९९.
६. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान. मुंबई: सिद्धार्थ प्रकाशन, १९५०.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

दलित साहित्य आणि संविधानः संविधान हक्क आणि अस्तित्व

प्रा. यादव धोंडू मोरे
सोनोपंत दांडेकर कला, व्ही. एच. आपटे वाणिज्य आणि
एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय पालघर जि. पालघर
Email: yadaomorey05@gmail.con

Manuscript ID:
JRD -2025-170964
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 303-305
Sept. 2025

सारांश

दलित साहित्य हे भारतीय समाजातील जातीभेद, विषमता, अन्याय आणि शोषणाविरुद्ध उभे राहिलेले सशक्त साहित्यप्रवाह आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीवर आधारित हे साहित्य केवळ विद्रोहाचे नव्हे तर मानवतेच्या प्रतिष्ठेचे आणि संविधानिक हक्कांच्या जाणीवेचे द्योतक आहे. भारतीय संविधानाने दिलेल्या समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे प्रतिबिंब दलित साहित्यात स्पष्टपणे दिसते. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा लाभ सर्व समाजघटकांना मिळावा, अस्पृश्यता आणि भेदभाव नाहीसे व्हावेत, या उद्देशाने हे साहित्य लढा देत राहते. दलित साहित्य आणि संविधान हे दोन्ही समानतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी परस्परपूरक आहेत. सामाजिक न्याय, अस्मिता आणि मानवी हक्क यांचे रक्षण करण्यासाठी हे साहित्य एक प्रभावी साधन ठरते.

मुख्यशब्द: *दलित साहित्य, भारतीय संविधान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समानता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, अस्मिता, सामाजिक न्याय, हक्क, विद्रोह, अस्पृश्यता निर्मूलन.*

Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

प्रास्ताविक

कोणत्याही भाषेतील जीवंत साहित्यात नवे नवे प्रवाह उदयाला येत असतात. नवे प्रवाह साहित्य समृद्ध करीत असतात आणि साहित्यातले चैतन्य टिकवीत असतात. नवे प्रवाह निर्माण झाले नाही तर ते नि सत्व, दुबळे होते. स्वातंत्र्य पाप्तीनंतर नवनव्या जाणिवेतून चे लेखन झाले त्यामुळेच तर मराठी साहित्य समृद्ध होत चालले आहे असे आपल्याला वाटते. इंग्रजी राजवटीच्या कालखंडात, मराठीतील बहुसंख्य लेखक पांढरपेशा मध्यमवर्गातून पुढे आलेले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हे चित्र बदलत चालले आहे. लिहिणे आणि बोलणे हे व्यवसाय आता एका विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहिले नाहीत. शिक्षण जसजसे समाजात फैलावत चालले आहे तसतसे समाजातले उपेक्षित स्तर जागे होत आहेत. आपापले अनुभव व्यक्त करण्याचे ओढ समाजाच्या सर्व स्तरातून निर्माण होऊ लागली आहे. है मराठी साहित्याच्या दृष्टीने केवढे मोठे शुभचिन्ह आहे! स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जे आजवर दबले गेले होते. दडपडले गेले होते, पिळले गेले होते किंबहुना विशिष्ट प्रकाराच्या समाज व्यवस्थेमुळे पशूपेक्षाही हीन जीवन जगत होते त्यांचा स्वर, त्यांची वेदना, त्यांचा विद्रोह त्यांच्याच लेखनातून व्यक्त होत आहे याचे मराठी माणसाने स्वागत केले पाहिजे. दलित साहित्य हा समाज जीवनातील मराठी साहित्यातला एक नवा प्रवाह आहे. त्याचे रूप जाणून घेतले पाहिजे, त्याचे स्वरूप शोधले पाहिजे, त्याच्या मागील प्रेरणा शोधल्या पाहिजे आणि त्यातून नव संस्कृतीचा अथवा नव समाजाचा आकृतीबंध प्रकट होईल का तेही अभ्यासले पाहिजे.

कोणत्याही साहित्यात ज्या ज्या वेळी नवा प्रवाह उद्‌यास येतो त्या त्या वेळी त्या साहित्याचे स्वागत करणारा वर्ग अल्पसंख्याक असतो. पण तो प्रवाह चैतन्य युक्त असेल, त्याच्या अंगी सामर्थ्य असेल तर त्याचा विचार करावा लागतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. यादव धोंडू मोरे, सोनोपंत दांडेकर कला, व्ही. एच. आपटे वाणिज्य आणि एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय पालघर जि. पालघर

How to cite this article:
मोरे, . यादव . धोंडू . (2025). दलित साहित्य आणि संविधानः संविधान हक्क आणि अस्तित्व. Journal of Research & Development, 17(9(IV)), 303–305. https://doi.org/10.5281/zenodo.17733796

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.17733796

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

दलित साहित्य हा नवा प्रवाह ही एक तात्कालिक घटना नाही; तर 'मानवत्वाची प्रतिष्ठा' हे सर्वश्रेष्ठ मूल्य शिरोधार्य मानणाऱ्या एका विराट आंदोलनातून जन्मलेले आहे आणि ते इतिहास, मानवाने निर्माण केलेल्या समाज व्यवस्थाचे, धर्मव्यवस्थेचे मूल्यमापन करू इच्छित आहेत. दलित साहित्य हे सूडवाद्याचे साहित्य नव्हे तर ते माणुसकीसाठी लढणाऱ्याचे शसाहित्य आहेत. आपण दलित आहोत हे निर्मयपणे स्वीकारण्यांचे पण आता या पुढे माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्रस्थापित करुन पाहणाऱ्यांच्या ते साहित्य आहे. दलित साहित्य हे या देशाच्या मातीतून उद्यास झालेला साहित्य आहे.

दलित साहित्यमागील प्रेरणांचा व त्यात आढळणाऱ्या प्रवृतींचा जेव्हा मी विचार करु लागलो तेव्हा माझ्या समोर उभे राहते ते नागपूरचे दीक्षा मैदान, बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेला पाच सहा लाखांचा जनसमुदाय, बौद्ध धम्माची दीक्षा देण्यासाठी आलेले भिक्कू महाथेरो चंद्रमणी आणि त्यांचे सहकारी देश-विदेशातील पाहुणे, सुगंधी फुलांच्या माळानी सजविलेला रंगमंच आणि एक ऐतिहासिक निर्णय होऊन दलितांच्या मुक्ती संग्रामाच्या नव्या पर्वाचा आरंभ करणारे धीर गंभीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! सुवर्ण दिवस मी कसा विसरु शकेन? भव्यरंगमंचावर प्राचार्य म.भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे नाटक लाखो लोकांच्या उपस्थित आम्ही सादर केले होते. दलितांच्या वेदनेचा अर्थ या मंचावर मूर्त होत होता धर्मांतरातरांची ही ऐतिहासिक घटना म्हणजे दलितांच्या मुक्तीसंग्रामातील नव्या पर्वाची नांदी होती. इ.स. १९२० सालापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी जे वैचारिक आआंदोलन आणि मुक्तीलढा सुरु केला होता त्याचे फळ या दीक्षाभूमीवर दिसत होते. डॉ. बाबासाहेबांच्या बौद्ध धर्म स्वीकारासंबंधी श्री पंडित पद्मनारायण शास्त्री पाल्ये लिहितात. दलित साहित्याच्या उदयाने मराठी साहित्य एक नवे अनुभवीविश्व व संवेदनविश्व निर्माण झाले आहे. दलित साहित्य भारतीय साहित्य झाले. विश्वसाहित्य झाले.

दलित या शब्दाचा पारंपारिक अर्थः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दलित या शब्दाचा अर्थ २३ ऑक्टोंबर १९२८ या दिवशी सायमन कमिशनच्या केंद्रीय समितीने व मुंबई प्रांतिक समितीच्या सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुणे येथे साक्षी घेतल्या. अनेक प्रश्न विचारले. नंतर सर हरिसिंग गौर आणि डॉ. बाबासाहेब आबेडकर यांची दलित वर्ग व अस्पृश्यवर्ग या विषयावर चर्चा झाली. प्रश्नोतरे झाले.

डॉ. बाबासाहेब आबेडकरांना दलित वर्ग आणि अस्पृश्यवर्ग हे दोन्ही शब्द समानार्थी वापरता काय? असा प्रश्न विचारला डॉ. बाबासाहेब होय म्हणाले. याचा अर्थ असा आहे की, दलित कोण? या प्रश्नाचे उत्तर आर्थिक दृष्टीने पिळला गेलेला वर्ग असे नाही तर भारतीय समाजरचनेतील धार्मिक आर्थिक, शैक्षणिक व राजकीय दृष्टीने पिवळा गेलेला वर्ग हा अस्पृश्य वर्ग आहे..

पडित पाल्ये लिहितात की अस्पृश्यता निवारण्यासाठी गेल्या १९३० सालापासून बरेच प्रयत्न झाले. हे प्रयत्न म्हणजे अस्पृश्यांना सार्वजनिक पानव्ट्यावर पाणी भरू द्यावे एवढेच होते. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांचा विटाळ मानू नये अशा त-हेचे प्रयत्न झाले. पण या प्रयत्नाने अस्पृश्य गणला जाणारा, राखला जाणारा, मानहानीचा धार्मिक हीनतेचा दोष कमी होणार नव्हता. अस्पृश्यांच्या बाबतीत दद्या एवढाच त्यातील प्रश्न होता. मूळ असणारे धर्ममूलक, भेदमूलक समाज पद्धती बदलणे या दृष्टीने सामाजिक क्रांती, समाजातील जातीभेदातील अनिष्ट समृद्धीचे उच्चाटन या चळवळीत नव्हते ह्या चळवळी दिखाऊ होत्या.

सन १९३५ साली प. पू. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली १९५६ सालापर्यंत त्यांनी हिंदू समाजातील सर्व स्तरातील सामाजिक राजकीय व कायदेशीर दृष्ट्या प्रयत्न करून परकाष्ठा करून पाहिली. परंतु हिंदू जाती व त्यातील अस्पृश्यांच्या बाबतीत धार्मिक हीनभाव नाहीसा होण्याऐवजी वाढत जाऊ लागला. हिंदू समाजाच्या धर्मात अस्पृश्य म्हणून राहणे भारतीय लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने आठ कोटी जनतेच्या विकासाच्या दृष्टीने अन्याय होते. धर्म माणसासाठी असतो. ज्या धर्मात अस्पृश्यांना पशु पेक्षाही हीनपणे वागण्यात येते त्या धर्मात का म्हणून राहावे. मला न्याय हवा आहे. दयेची सहानुभूतीची भीक मागण्याची त्यांची वृतींच नव्हती. ज्या धर्मात माणुसकीने जवळ घेतले जात नाही त्या धर्माच्या नावाने शंख करीत रडण्यापेक्षा ज्या धर्मात माणुसकी, शील, चारित्र्य, संघटना, शिस्त, सौजन्य यांचा सर्वव्यापी लाभ संपादन करता येईल अशा बौद्ध धर्माचा स्वीकार करणे डॉ. आंबेडकरांना योग्य वाटले. अस्पृश्यतेचे निर्मूलन केवळ राजकीय हक्क मिळवून होईल असे वाटत नव्हते. आर्थिक आणि सामाजिक समतेशिवाय लोकशाहीचा डोलारा उभा राहणार नाही अशी त्यांची श्रद्धा होती म्हणून धर्मातर म्हणजे नवा मुक्तीचा मार्ग वाटला. या धर्मातरामुळे दलित वर्गासमोर नव्या समस्या उभ्या राहिल्या. त्यांच्यावर गावगाड्यात नवी संकटे कोसळली. माणूस म्हणून स्वतंत्रभारतात नवे जीवन जगणाऱ्या स्वाभिमानी समाजाला सर्व बाजूने दडपण्याचा वेग वाढतच चालला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या महाड तळ्याच्या पहिल्या सत्याग्रहापूर्वी (१९२७) अस्पृश्य मूकपणे अत्याचार, छळ शोषितच होते. महाडच्या चवदार इतर माणसाप्रमाणे अस्पृश्यांना पाणी भरण्याचा हक्क आहे तो बजावण्यासाठी डॉ. बाबासाहेब पाण्यात उतरले तेव्हा सवर्ण हिंदूंच्या परंपरा, हितसंबंध यांना प्रचंड हादरा बसला. याचबरोबर महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले. त्यानंतर नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह आरंभिला. या एका मागोमाग घडणाऱ्या घटनांनी डॉ. बाबासाहेब अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे सामर्थ्य वाढवीत होते. शेकडो वर्ष सवर्ण हिंदूंनी आम्हाला माणुसकीच्या हक्कापासून दूर ठेवले तेच हिंदू आम्हाला माणुसकीची हक्क देणार का? असे अनेक प्रश्न मांडले गेले.

सायमन कमिशनच्या आगमनामुळे भारतात ब्रिटिश सतेविरुद्ध प्रचंड क्षोभ उसळला. यावर एक उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने पहिली गोलमेज परिषद लंडन येथे बोलविले. १९३०) भारताचे भवितव्य घडविण्यासाठी नवीन राज्यघटना तयार करण्यासाठी प्रमुख जाती जमाती मोठे पक्षप्रमुख यांना गोलमेज परिषदेसाठी आमंत्रित केले होते. कॉग्रेसने या परिषदेवर बहिष्कार टाकला. भारतीय अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय हक्काची कैफियत मांडली. ते म्हणाले की, अस्पृश्यता नष्ट करून नागरिकत्वाचा समान दर्जा प्रस्थापित करण्यासाठी मूलभूत हक्क द्यावेत व त्यांचा निर्वेध उपयोग करता यावा. अस्पृश्यता म्हणणाऱ्यांना कठोर शिक्षा द्याव्या. स्पृश्य अस्पृश्य यांना समान संधी, समान न्याय द्यावा, आणि अस्पृश्यांना कायदेमंडळात, सरकारी नोकऱ्यात पुरेशा जागा द्याव्यात इत्यादी मागण्या डॉ. आंबेडकरांनी आपले अनुयायात आपणही हक्कासाठी स्वतंत्रपणे ही जाणीव निर्माण केली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

गोलमेज परिषदेपासून अस्पृश्यांच्या प्रश्नावर गांधी आंबेडकर संघर्ष उग्ररूप धारण करू लागला.डॉ. बाबासाहेब व गांधींजी १९३२ च्या ब्रिटिश सरकारच्या जातीनिवाडयानुसार सरकारने अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला व मताधिकार दिला. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे संस्कार ज्या संवेदनशील तरुण लेखकावर झाले त्याने साहित्य निर्मिती केली आहे हे विसरून चालणार नाही. पहिल्या पिढींची वैचारिक घडण वैचारिक डॉ. बाबासाहेबांनी केली आहे म्हणून प्रत्येक लेखकाने डॉ. आंबेडकरांच्या चरणी आदरांजली वाहिली आहे.

दलित साहित्य हे जातीभेद आणि विषमतेचा विरोध करणारे साहित्य आहे. जे भारतीय संविधानाने दिलेल्या समान हक्काची आणि मानवी प्रतिष्ठेची मागणी करते. हे साहित्य दलित समाजाच्या अनुभवांना संघर्षांना आणि त्यांच्या वेदनेला वाट मोकळी करून देते. ज्यामुळे न्याय, शिक्षण, समानता आणि स्वातंत्र्यासारखे मूलभूत अधिकार मिळवता येतील.

१) दलित साहित्याची भूमिका: आक्रोशाने वेदनेचे प्रकटीकरण दलित साहित्य दडपशाही आणि भेदभाव मुळे निर्माण झालेला आक्रोश आणि वेदना व्यक्त करते...

२) विद्रोहाचे माध्यम:- शतकानुशतके चालू असलेल्या सामाजिक अन्यायाला विरोध करण्यासाठी साहित्य हे एक प्रभावी हत्यार बनले आहे, असे साहित्यप्रवाहाचे मत आहे.

३) हक्काची मागणी: भारतीय संविधानाने नागरिकाना दिलेले मूलभूत हक्क, जसे की समानता, न्याय, शिक्षण आणि स्वतंत्र्याचा उपभोग घेण्यास दलित समाजाला सक्षम करणे हे या साहित्याचे मुख्य उद्दिष्ट आहे

४) संविधान आणि दलित हक्क: अस्पृश्यतेवर बंदी भारतीय संविधानातील कलम १७ अस्पृश्यता नष्ट करणे आणि सामाजिक समानता प्रस्थापित करते.

५) भेदभाव प्रतिबंधक कायदा:-अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचान प्रतिबंधक कायदा १८८९ हा कायदा दलितावरील अत्याचारांना रोखण्यासाठी आहे. असे SLIC नमूद करते.

६) समानतेची हमी:- भारतीय संविधान धर्म, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी प्रवेश प्रतिबंधित करण्यावर बंदी घालते आणि समाजातील दुर्बळ घटकांना विशेष अधिकार देते.

७) अस्मितेचा संघर्ष:-दरी साहित्य हे दरी समाजाच्या अस्मितेच्या संघर्षातून जन्माला आलेले आहे आणि ते त्यांच्या हक्कासाठी लढते.

८) अनुभव आणि विद्रोह: हे साहित्य दलित लोकांच्या वेदना, अन्याय, आणि शोषणाच्या अनुभवाचे प्रतिबिंब आहे, तसेच त्याने व्यवस्थेविरुद्ध केलेला नकार आणि विद्रोह त्यात व्यक्त होतो.

९) संविधान, समता, न्याय आणि स्वतंत्र्याची संकल्पना समानता संविधान समतेचा पुरस्कार करते आणि दलित साहित्य या समानतेच्या अधिकाऱ्यांची मागणी करते. सामाजिक न्याय हा संविधानाचा आणि दलित साहित्याचा गाभा आहे. जो दलितांना त्यांचे हक्क आणि सन्मान मिळून ठेवण्याची अपेक्षा ठेवतो.

पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

१)दलित साहित्य आणि संविधान एकमेकांना पूरक आहेत हे सिद्ध होते.
२) दलित साहित्य हे दलितांच्या हक्कासाठी आवाज उठवते तर संविधान हे हक्कांना कायदेशीर आधार देते हे स्पष्ट होते.
३)समाजातील विषमतेचा नायनाट करून समानता आणि न्यायावर आधारित समाज निर्माण करण्यासाठी एकत्र काम करते हे संविधानातून स्पष्ट झालेले आहे.
४) संविधान समतेचा पुरस्कार करते आणि दलित साहित्य या समानतेच्या अधिकाऱ्यांची मागणी करते हे यातून स्पष्ट होते.
५) न्याय सामाजिक न्याय हा संविधानाचा आणि दलित साहित्याचा गाभा आहे. जो दलितांना त्यांचे हक्क आणि सन्मान मिळून देण्याची अपेक्षा ठेवतो है यावरून व्यक्त झालेले आहे.

संदर्भ:-

१) दलित साहित्य वेदना व विद्रोह: डॉ. भालचंद्र फडके
२) मराठी कथा उगम आणि विकास: डॉ. इंदुमती शेवडे
३) दलित कथा उगम आणि विकास: डॉ. प्रकाश खरात
४) अस्मितादर्श कालखंड: डॉ. गंगाधर पानतावणे
५) मराठी कथा विसावे शतक: के. ज. पुरोहित
६) मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद: दा. वि. कुलकर्णी.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

जूठन आत्मकथा में चित्रित सामाजिक संवेदना

शितल सचिन खैरमोडे
शोधछात्र (हिंदी अधिविभाग)
शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापूर

Manuscript ID:
JRD -2025-170965
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 306-308
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

शोध सारांश

ओमप्रकाश वाल्मीकि की आत्मकथा "जूठन" हिंदी दलित साहित्य की एक महत्वपूर्ण कृति है, जिसमें दलित समाज की पीड़ा, संघर्ष और अस्मिता का यथार्थ चित्रण किया गया है। इस आत्मकथा में लेखक ने जातीय उत्पीड़न, सामाजिक अन्याय, और मानवीय अपमान की घटनाओं को आत्मानुभव के माध्यम से प्रस्तुत किया है। "जूठन" केवल व्यक्तिगत जीवन की कहानी नहीं, बल्कि पूरे दलित वर्ग की सामाजिक स्थिति और मानसिक वेदना का दस्तावेज है। इसमें लेखक ने शिक्षा, सामाजिक भेदभाव, गरीबी, अपमान और असमानता के विरुद्ध उठे प्रतिरोध और जागरूकता के स्वर को प्रखर रूप में अभिव्यक्त किया है। यह आत्मकथा दलित समाज में जागृत होती नई चेतना, आत्मसम्मान और हक की मांग को सशक्त रूप से सामने लाती है। ओमप्रकाश वाल्मीकि का यह लेखन सामाजिक अन्याय के विरोध में विद्रोह का प्रतीक बनकर उभरता है और समतामूलक समाज की स्थापना का आह्वान करता है।

बीजशब्द: *दलित साहित्य, जूठन, ओमप्रकाश वाल्मीकि, सामाजिक संवेदना, जातीय उत्पीड़न, अस्मिता, आत्मकथा, अन्याय, संघर्ष, विद्रोह, चेतना, आत्मसम्मान.*

दलित साहित्य में सदियों से उच्च वर्णीयो द्वारा दलितो पर किए अन्याय को पूरे आक्रोश के साथ अभिव्यक्त किया गया है। इसमें कोई निवेदन नहीं होता मन को झकझोर करनेवाले दर्दनाक भयानक अनुभव का यथार्थ चित्रण होता है। किसी भी मानव प्राणी के साथ और अमानवीय व्यवहार करना ही उसका शोषण करना है। यह शोषण आर्थिक, धार्मिक, राजनीतिक, सामाजिक, सांस्कृतिक किसी भी प्रकार का हो सकता है। दलित साहित्य, समाज की पीड़ा तथा संघर्ष का एक सच्चा और हृदय विदारक दस्तावेज है. यह सिर्फ एक व्यक्ति की नही अपितु एक वर्ग की कहानी है। सदियों से चली आ रही जातीय भेदभाव और शोषण का जीता जागता प्रमाण है. इस साहित्य के माध्यम से कई गंभीर दलित समस्याओं को उजागर किया गया है। आज भी समाज में मौजूद दलित साहित्य है जो दलितों के पीडा को उजागर करता है। दलित शब्द को व्यापक अर्थ में लिया जाए तो दलित वर्ग में वे सभी लोग आते हैं जो समाज व्यवस्था के द्वारा रौंदे गए हो। हिंदी साहित्य के जाने माने लेखक ओमप्रकाश वाल्मिकी ने दलित साहित्य पर अपनी लेखनी चलाई है. उनकी जूठन आत्मकथा दलित समाज की पीड़ा और संघर्ष का सच्चा उदाहरण है।

दलित शब्द का अर्थ एवं परिभाषा

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
शितल सचिन खैरमोडे, शोधछात्र (हिंदी अधिविभाग) शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापूर

How to cite this article:
खैरमोडे, . शितल . सचिन . (2025). जूठन आत्मकथा में चित्रित सामाजिक संवेदना. Journal of Research & Development, 17(9(IV)), 306–308. https://doi.org/10.5281/zenodo.17733924

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17733924
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संस्कृत हिंदी इंग्लिश कोश में दी गई दलित की परिभाषा

"दलित: दला गया, मर्दित, पीसा गया ।"1

हिंदी शब्दकोशो में दलित शब्द का अर्थ इस प्रकार दिया गया है_

"मसाला हुआ, रौंदा हुआ, खंडित, विनिष्ट किया हुआ ।"2

मानक हिंदी कोश में दिया गया दलित शब्द का अर्थ

"जिसका दलन हुआ हो या जिसे पनपने या बढ़ाने ना दिया गया हो । ध्वस्त या नष्ट किया हुआ ।"3

ओम प्रकाश वाल्मीकि प्रज्ञा साहित्य अंक में अपनी बात को स्पष्ट करते हुए लिखते हैं कि

"वर्ण व्यवस्था से उपजी घोर अमान्यता, स्वतंत्रता, समताविरोधी, सामाजिक अलगाव की पक्षधर सोच को परिवर्तित कर बदलाव की प्रक्रिया को तेज करना दलित साहित्य की मूलभूत संवेदना है ।"4

उपर्युक्त परिभाषाओं से स्पष्ट होता है कि दलित साहित्य का मतलब है हर अर्थ से कुचले गये इन्सान की कर्म कहानी!

ओमप्रकाश वाल्मीकि की आत्मकथा जूठन हिंदी दलित साहित्य की महत्वपूर्ण कृति है ।यह केवल एक व्यक्ति के जीवन की कहानी नहीं है अपितु पूरे दलित वर्ग की समस्याओं का चित्रण है । उन्होंने अपनी आत्मकथा के माध्यम से भारतीय समाज में व्याप्त जातिवाद और अमानवीयता को उजागर किया है । वाल्मीकि ने दलितों के जीवन के यथार्थ को दर्शाया है । जिसमें जातिगत भेदभाव, शोषण ,गरीबी ,अपनापन शामिल है । उनका साहित्य सिर्फ दलितों की व्यथा तक सीमित नहीं है बल्कि समतामूलक समाज की स्थापना का लक्ष्य रखता है । जूठन आत्मकथा में ओम प्रकाश वाल्मीकि ने दलित विमर्श को कई आयामों में प्रस्तुत किया है उसके कुछ बिंदु इस प्रकार से है _____

जातीय उत्पीड़न और अपमान

जूठन में लेखक ने अपने बचपन के कड़वे अनुभवों को व्यक्त किया है । जब उन्हें स्कूल में झाड़ू लगाने और स्वर्ण के घरों में काम करने के लिए मजबूर किया जाता था ।उन्हें "चुहड़े "कहकर बुलाया जाता था और उनके साथ बुरा व्यवहार किया जाता था । यह आत्मकथा उसे क्रूर और अमानवीय समाज व्यवस्था को दर्शाती है जो दलितों के प्रति असंवेदनशील है .इस संदर्भ में स्कूल में मास्टर का ओमप्रकाश का नाम जानने के बाद का बर्ताव देखिये - "ठीक है ------ वह जो सामने शीशम का पेड़ खड़ा है, उसे पर चढ़ जा और टहनियां तोड़कर झाड़ू बणा ले । पत्तों वाली झाड़ू बणाना और पूरे स्कूल कू ऐसा चमका दे जैसा सीसा । तेरा तो यों खानदानी काम है । जा------- फटाफट लग जा काम पे ।"5

स्कूल में उच्च वर्ण के बच्चों के साथ बड़े प्यार दुलार से पेश आया जाता था ओर लेखक के साथ भेदभाव किया जाता था. साफ-सुथरे कपड़े पहनकर अगर कक्षा में जाओ तो साथ के लड़के कहते थे,"अब चूहड़े का नए कपड़े पहन कर आया है "6 और अगर मिले पुराने कपड़े पहन कर स्कूल में जाओ तो कहते हैं कि,"अबे चुहड़े के दूर हट बदबू आ रही है"7

उपर्युक्त कथन से स्पष्ट होता है कि स्कूल में उनके साथ अपमानजनक व्यवहार किया जाता था । सिर्फ इसलिए कि वे चुहड़े जाति के थे । शिक्षा जैसे मूलभूत अधिकार से भी दलित बच्चों को वंचित रखा जाता था ।

जूठन की प्रथा,जागरूकता और प्रतिरोध

आत्मकथा का शीर्षक जूठन दलितों के अपमानजनक जीवन को दर्शाता है । शादी ब्याह के मौके पर दलितों को स्वर्ण के खाने के बाद बची हुई झूठी पत्तलों को उठाकर इकट्ठा करना पड़ता था । इस जूठन को सुखाकर कई दिनों तक खाया जाता था । यह प्रथा मानवीय गरिमा का सबसे बड़ा अपमान था । यहां लेखक दलित समाज में आई हुई नई चेतना को दिखाया है सुखदेव सिंह त्यागी को लेखक की मां जूठी पत्तले उठाने के बाद खाना मांगती है तो वह कहता है कि - "टोकरा भर तो जूठन ले जा रही है ..... ऊपर से जातकों के लिए खाना मांग री है अपनी औकात में रह चूहडी ! उठा टोकरा और दरवाजे से चलती बन ।"8 यह बात सुनकर उनकी मां की आंखों में दुर्गा उतर आई और उन्होंने टोकरा वही बिखेर दिया और सुखदेव सिंह से कहा " इसे ठाके अपने घर में धर ले । कल तड़के बारातियों को नाश्ते में खिला देना ।"9

इससे स्पष्ट होता है कि यह बात नई दलित चेतना को दर्शाती है । दलितों में जागृत होती हुई आत्म-सम्मान और हक के एहसास को दर्शाती है । प्रस्तुत आत्मकथा दलितों को अपनी अस्मिता और अधिकारों के लिए संघर्ष करने की प्रेरणा देती है।

विद्रोह और आक्रोश

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

उनके साहित्य में दलितो पर होनेवाले अत्याचारों के प्रति तीव्र आक्रोश और विरोध का स्वर मुखर है। वे दलितों को आत्मसम्मान और अधिकारों के लिए लड़ने के लिए प्रेरित करते है। ओमप्रकाश वाल्मीकि का आत्मकथनात्मक उपन्यास जूठन दलित विमर्श का एक सशक्त और मार्मिक दस्तावेज है। यह उपन्यास लेखक के अपने जीवन के अनुभव पर आधारित है जो भारतीय समाज में दलितों पर होने वाले अन्याय , अत्याचार और मानवीय व्यवहार, शोषण और संघर्ष को उजागर करता है। इस संदर्भ में प्रस्तुत कथन देखिए --- एक दिन जब ओमप्रकाश वाल्मीकि के पिताजी स्कूल के पास से जा रहे थे तब उन्होंने देखा कि लेखक झाड़ू लगा रहे थे तो उन्होंने बाहर से आवाज देकर बोले " मुंशीजी, यो क्या कर रा है ? "10 तब रोते - रोते लेखक ने सब बातें अपने पिताजी से बताएं तो पिताजी ने उनके हाथ से झाड़ू छीनकर दूर फेंक दी। उनकी आंखों में आग की गर्मी उतर आई और वह गुस्से से बोले ---- "कौन- सा मास्टर है वो द्रोणाचार्य की औलाद, जो मेरे लड़के से झाड़ू लगवाई हैं ---- "11

इससे स्पष्ट है कि, जिंदगी जीने की यह पीड़ा पूरी धरती की है। वह धरती जो आदमी को जीने का तमाम हक देता है और वह आसमान जो उनको उनके हिस्से का आसमा देती है लेकिन सामंती व्यवस्था और समाज संरचना में पनपी हुई गुलामी गरीबी और जातिवाद में आज आम आदमी को भेदभाव की हालत में पहुंचा दिया है।

इस संदर्भ में डॉक्टर सोहन पाल लिखते हैं "दलित साहित्य आक्रोश, चीख, वेदना, पीड़ा, चुभन, घुटन और छटपटाहट से युक्त साहित्य से कहते है"12

संदर्भ

1. संस्कृत हिंदी इंग्लिश कोश संपादक: सूर्यकांत, पृ.265
2. संक्षिप्त हिंदी शब्दसागर - संपादक - रामचंद्र ,पृष्ठ क्र.468
3. मानक हिंदी कोश , प्रधान संपादक , रामचंद्र वर्मा ,पृष्ठ क्र.35
4. भारतीय दलित साहित्य , पृष्ठ क्र. 46
5. ओमप्रकाश वाल्मीकि जूठन पृष्ठ क्र. 15
6. वहीं पृष्ठ क्र. 13
7. वही पृष्ठ क्र. 13
8. वही पृष्ठ क्र.21
9. वही पृष्ठ क्र. 21
10. वही पृष्ठ क्र.16
11. वही पृष्ठ क्र.16
12. हिंदी साहित्य में दलित अस्मिता - डॉ. कालीचरण 'स्नेही' पृष्ठ क्र.26

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क

डॉ. प्रा. विद्याताई निवासराव जगताप
सहाय्यक प्राध्यापक
श्री शिव शाहू महाविद्यालय सरूड
Email: vidyapavitra2@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170966
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 309-311
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

मानवी हक्क हें मानवी जीवनाचे अविभाज्य घटक आहेत.मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क आवश्यक असतात यावर सर्वांचेच एकमत आहे.म्हणूनच आधुनिक काळात मानवी हक्कांचा विशेष आग्रह धरला जातो. मानवी हक्क व्यक्तीच्या व्यक्तीत्वाचा अविभाज्य भाग होत. मानवाचे व्यक्तिमत्व गुणवत्ता सद्सद्विवेकबुद्धी यांच्या विकासासाठी हक्क आवश्यक असतात. व्यक्तीचा अंतरिक विकास तसेच भौतिक विकास या दोघांचाही आधार हक्क हेच असतात काळाच्या ओघात अनेक राजकीय तत्त्वज्ञानाने ही मानवी हक्कांच्या संकल्पनेचे प्रभावीपणे तात्विक विश्लेषण करून त्यांची गरज प्रतिपादन केली त्यामुळे वेगवेगळ्या नविन स्वतंत्र देशांच्या संविधानांमध्ये मानवी हक्कांना समाविष्ट करण्यात आले व त्यांना मुक्त स्वरूप प्राप्त झाले अमेरिका,फ्रान्स, इंग्लंड इत्यादी देशांच्या संविधानात मानवी हक्कांचा समावेश झाला व जगाच्या पातळी मानवी हक्कांची संकल्पना प्रस्थापित झाली. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानामध्ये या मानवी हक्कांचा समावेश वेगवेगळ्या कलमाअंतर्गत करण्यात आला यावरून निसंकोचपणे भारतीय संविधान मानवी हक्कांच्या अंमलबजावणी करते हे पष्ट होते.कारण मानवी हक्क सनद व भारतीय संविधानातील अनेक तत्वामध्ये समानता करण्यात असलेले दिसून येते भारतीय संविधानातील उद्देश पत्रिका,मूलभूत अधिकार, राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्वे यांचा बदलची संबंध माननीय हक्कांचे अंमलबजावणी करणे हा असलेला दिसतो.

मुख्यशब्द: *भारतीय राज्यघटना, मानवी हक्क, मूलभूत अधिकार, स्वातंत्र्य, समता, न्याय, लोकशाही, मानवाधिकार, सार्वभौमत्व, संयुक्त राष्ट्रसंघ, मानवता, नागरिक हक्क, संविधानिक मूल्ये.*

प्रस्तावना:

विसाव्या शतकात मानवी हक्कांचा आणि मानव अधिकारांचा जोरदार पुरस्कार करण्यात आला असला तरी मानवी हक्कांची संकल्पना प्राचीन काळातील ग्रीक नगर राज्यात अस्तित्वात होती. त्यावेळी अनेक विचारवंतांनी मानवी हक्कांचा पुरस्कार केला होता त्यांच्यामते " प्रत्येक व्यक्तीला मनुष्यप्राणी या नात्याने काही गोष्टी निसर्गतः प्राप्त झालेल्या असतात म्हणून हक्क हे निसर्गदत्त आहेत". असे प्रतिपादन केले त्यानंतर फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य,समता व बंधुभाव या मुद्द्यांचा पुरस्कार करून मानवी हक्कांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने 10 डिसेंबर 1948 ला मानवी हक्काचा सार्वत्रिक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तसेच अमेरिकेनेही आपल्या राज्यघटनेत ' बिल ऑफ राईट 'चा समावेश केला संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्काचे रक्षण करणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे घोषित केले. तसेच सर्व मानवांना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण होणे हा जगातील स्वातंत्र्य न्याय व शांतता यांचा पाया आहे या मानवी हक्कातील मूल्यांचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेवर पडलेले आहे. यानुसारच भारतीय घटनाकारांनी मानवी हक्क यांचा पुरस्कार करून त्याचा घटनेत समावेश केला आहे.

मानवी हक्क:

मानव अधिकार म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जन्मत: मिळालेली अशी हक्क स्वातंत्र्य जी त्यांच्या मानवी अस्तित्वासाठी आवश्यक आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. प्रा. विद्याताई निवासराव जगताप सहाय्यक प्राध्यापक श्री शिव शाहू महाविद्यालय सरूड

How to cite this article:
जगताप, . विद्याताई . निवासराव . (2025). भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क. Journal of Research & Development, 17(9(IV)), 309–311. https://doi.org/10.5281/zenodo.17734413

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17734413
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

हे हक्क कोणत्याही धर्म, राज्य, जात, लिंग यापैकी कोणत्याही सामाजिक परिस्थितीच्या बंधनात अडकत नाहीत. ही आंतरराष्ट्रीय स्तरावर लागू केली जातात. व्यक्ती कोणत्याही देशातील नागरिक असला तरी त्याला मानवी हक्क हे प्राप्त होतात. मानवी हक्कांचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे मानव जातीच्या सर्व घटकांना म्हणजे सर्व व्यक्तींना ते समानतेने प्राप्त झालेले असतात.हक्कांच्या बाबतीत व्यक्तीमध्ये कोणताही प्रकारचा भेदभाव असू शकत नाही.मानवी हक्क अशा प्रकारे व्यक्तींच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना राज्याच्या कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे या दृष्टीने त्यांचा समावेश प्रत्येक देशाने आपल्या राज्यघटनेत केला आहे.त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकार या नात्याने मानवी हक्कांचा समावेश केला आहे. मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील पहिले वाक्य असे आहे की जगातील स्वातंत्र्य, न्याय आणि शांतता यांचा पाया म्हणजे मानवी हक्क आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर हा आहे.म्हणून हे जे हक्क जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात त्या हक्कांना मानवी हक्क मानले आहेत.ते वैश्विक स्वरूपाचे आहेत.कोणताही भेदभाव न करता माणूस आहे म्हणून समस्त मानव जातील हे हक्क उपलब्ध आहेत. मात्र मूलभूत हक्कांची व्याप्ती राष्ट्रीय असते.राज्यघटनेच्या मानवी हक्कांना प्रारंभिक स्थान आहे त्याना मूलभूत हक्क असे म्हणतात सर्व मूलभूत हक्क हे मानवी हक्क असतात परंतु सर्व मानवी हक्क हे मूलभूत हक्क नसतात. उदाहरणात, भारतीय संदर्भात कामाचा हक्क स्वयम निर्णयाचे हक्क इत्यादी हे मानवी हक्क आहेत परंतु ते मूलभूत हक्क नाहीत.

मूलभूत हक्क:

देशाच्या राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या हक्कांना मूलभूत हक्क म्हणतात. म्हणजेच घटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीमध्ये नसलेल्या इतर कोणत्याही हक्काला मूलभूत हक्काचा दर्जा प्राप्त होत नाही. मूलभूत अधिकार किंवा हक्क हे न्यायप्रविष्ठ असतात. त्यांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयात त्याच्याबद्दलची दात मागता येते. आणि ते पुन्हा प्राप्त करण्यात येतात. मूलभूत हक्क हे मानवाचे स्वाभाविक हिरावून घेता येणार नाहीत असे पवित्र हक्क आहेत. या हक्कांना मूलभूत हक्क म्हणून संबोधले जाते हे अधिकार सर्व प्रकारच्या सार्वजनिक प्राधिकाऱ्यांवर बंधनकारक असतात.

मूलभूत हक्कांचे महत्व:

मूलभूत अधिकार हे सर्व नागरिकांचा मूलभूत शारीरिक, मानसिक,नैतिक,अध्यात्मिक विकास सुनिश्चित करतात. त्यामध्ये अशा मूलभूत स्वातंत्र्याचा समावेश असतो.ज्यामुळे जीवन जगण्या योग्य बनते.त्याचप्रमाणे मूलभूत अधिकार हे बहुसंख्यांकांच्या राज्यकारभारासाठी 'लोकशाहीजन्य नीतिमान्यते' चा आराखडा निर्माण करतात मात्र त्याचबरोबर देशातील अल्पसंख्यांकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करतात.कोणतीही लोकशाही व्यवस्थेत कोणती लोकशाही व्यवस्था भाषण व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यासारख्या हक्काविना अस्तित्वात राहू शकत नाही.मूलभूत अधिकार देशातील राजकीय लोकशाहीचा आदर्श प्रस्थापित करतात. ते देशात एकाधिकारशाही, जुलमी सत्ता प्रस्थापित होण्यास प्रतिबंध करून राज्यसंस्थेच्या आक्रमणापासून जनतेच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करतात. तसेच कार्यकारी मंडळाच्या मनमानी कृतीवर आणि कायदेमंडळाच्या असंगत कायद्यांवर मर्यादा घालण्याचे ही कार्य करतात. एवढेच काय तर थोडक्यात सांगायचे तर कायद्याचे शासन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न मूलभूत हक्कामार्फत होतो अशा प्रकारे मूलभूत हक्क हे मानवी विकासासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

भारतीय राज्य घटनेतील मूलभूत हक्क:

भारतीय राज्यघटनेच्या भाग तीन मधील कलम 12 ते 35 पैकी कलम 14 पासून 32 पर्यंत मूलभूत हक्क दिलेले आहेत.

मूळच्या राज्यघटनेत मूलभूत हक्कांचे सात प्रकार सांगण्यात आलेले आहेत. परंतु संपत्तीचा हक्क 44 व्या घटना दुरुस्तीने(1978)मूलभूत हक्कांच्या यादीतून वगळण्यात आला आहे आणि तो भाग 12 मधील प्रकरण सहा मधील कलम 300 ए मध्ये टाकून एक कायदेशीर हक्क म्हणून घोषित करण्यात आला त्यामुळे सध्या घटनेत मूलभूत हक्क सहा प्रकारचे आहेत.

1) समतेचा हक्क: कलम 14 ते 18

1. कलम 14: कायद्यासपुरे समानता

2. कलम 15: वंश धर्म जात लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई.

3.कलम 16: सार्वजनिक रोजगार बाबत समान संधी. 4.कलम 17: अस्पृशता नष्ट करणे.

5. कलम 18: किताब नष्ट करणे.

2). स्वातंत्र्याचा हक्क: कलम 19 ते 22

1. कलम 19: भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, एकत्र जमण्याचे, मुक्त संचाराचे, संघटना स्थापनेचे, भारतीय परिक्षेत्रात वास्तव्याचे, व्यवसायाचे स्वातंत्र्य इत्यादींच्या विवक्षित हक्काचे संरक्षण.

2.कलम 20: अपराधाबद्दलच्या दोषी सिद्धी बाबत संरक्षण.

3.कलम 21: जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य याचे संरक्षण.

4.कलम 21 ए: शिक्षणाचा हक्क. (राज्यसंस्थेतील सहा ते 14 वर्षापर्यंतच्या मुलांना कायद्याने ठरवल्यानुसार मोफत व अनिवार्य शिक्षण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

उपलब्ध करून देणे)

5.कलम 22: विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यापासून संरक्षण

3). शोषणाविरुद्धचा हक्क कलम 23 व 24

कलम 23 :माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई.

कलम 24: कारखाने इत्यादीमध्ये बालकामगारांना कामाला ठेवण्यास मनाई.

4). धर्म स्वातंत्र्याचा हक्क कलम 25 ते 28

1. कलम 25: सतत विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण आचरण व प्रचार.

2. कलम 26: धर्मनिरपेक्ष व्यवहारांची व्यवस्था पाहण्याची स्वातंत्र्य.

3.कलम 27: एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरिता कर देण्याविषयी स्वातंत्र्य.

4. कलम 28: विवक्षित शैक्षणिक संस्था धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याविषयी स्वातंत्र्य.

5). सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क कलम 29 व 30

1. कलम 29: अल्पसंख्यांक वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण.

2. कलम 30: अल्पसंख्यांक वर्गाचा शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क.

6). घटनात्मक उपायांचा अधिकार.

1. कलम 32: ने प्रदान केलेले हक्क बजावण्याचा उपाय

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात विस्तृत लोकशाही संविधान आहे ज्यात मानवाधिकाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी सविस्तर तरतुदी केलेल्या आहेत.

मानवी हक्कांचे महत्त्व व आवश्यकता याची आता सर्वांनाच पुरेशी जाणीव झाली असली तरी त्याबाबत आणखी जनजागृती घडवून आणणे महत्त्वाचे आहे कारण विविध भागातील बऱ्याच व्यक्तींना मानवी हक्कापासून वंचित राहावे लागत आहे ही वस्तुस्थिती नाकारली जाऊ शकत नाही हुकूमशाही किंवा एखादी एकारशाही राष्ट्रांची तर गोष्टच वेगळी आहे येथील राज्यकर्ते मानवी हक्क पायदळी तुडवण्यातच धन्यता म्हणतात मात्र लोकशाही पद्धतीचा स्वीकार केलेल्या सर्वच राष्ट्रातील मानवी हक्कांची परिस्थिती समाधानकारक आहे असा दावा करता येणार नाही. अनेक लोकशाही देशातील मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसते. समाजातील काही घटकांना मानवी हक्कापासून वंचित राहावे लागल्यामुळे कोणत्याही देशांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात.मानवी हक्कापासून वंचित राहण्याची निगडित असलेल्या समस्या व्यक्तींचे जीवन तर प्रभावित करतातच पण त्याचबरोबर राष्ट्राच्या समाजाच्या जीवनातही गंभीर स्वरूपाच्या उलटापालती घडवून आणण्याच्या कारणीभूत होतात.

निष्कर्ष:

भारतीय राज्यघटना ही मानवाधिकारांचे संरक्षण व प्रोत्साहन देणारी प्रभावी साधन आहे. लोकशाही ची खरी ताकद नागरिकांच्या हक्कांच्या सन्मानात आहे.जनतेचे सार्वभौमत्व हे लोकशाहीचे प्रमुख तत्व होय.जनतेच्या सार्वभौमत्वाविषयी आग्रही राहताना समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास साधण्याची संधी उपलब्ध करून दिली गेली पाहिजे. यावरही लोकशाही विशेष भर देते.म्हणजेच व्यक्तिविकास हा लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा मुद्दा ठरतो लोकशाहीच्या सर्वच पुरस्कार कर्त्यांनी व्यक्तींचे स्वातंत्र्य व तिचा सर्वांगीण विकास या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या आहेत.म्हणून मानवी हक्कांना भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले आहे. भारतात लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारण्यात आलेली आहे. नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्थेचे मुख्य आधार आहेत. म्हणून नागरिकांच्या मूलभूत हक्कांना संरक्षण मिळायला खेरीज लोकशाही व्यवस्थेला बळकटी येऊ शकत नाही.हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आपल्या हक्काचा उपभोग घेताना इतरांच्या हक्कावर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. म्हणूनच भारतीय घटनाकारांनी घटना निर्मिती करताना राज्यघटनेत हक्कांना वैधानिक दर्जा प्राप्त करून दिला आहे आणि त्याचबरोबर कर्तव्यांचेही स्पष्टीकरण दिले आहे आजच्या परिस्थितीत नागरिकांना हक्काप्रमाणे कर्तव्याची जाणीव असणे गरजेचे आहे

संदर्भसूची:

1. भारतीय संविधानात संविधानात्मक तरतुदी आणि वास्तव, प्रा. सुभाष गवळी,श्रीनाथ प्रकाशन नागपूर.

2. भारतीय शासन आणि राजकारण, डॉ. राजशेखर सोलापूर आणि म्हेत्रे डी.जी.,अरुणा प्रकाशन लातूर

3. मानवी हक्क, प्रा. व्ही.बी पाटील,के सागर प्रकाशन

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय राज्यघटनेचा सरनामा व आजचे वास्तव

डॉ. एन. एल. गायकवाड
श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरुड राज्यशास्त्र विभाग

Manuscript ID:
JRD -2025-170967
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 312-315
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारताने संसदीय लोकशाही शासन पद्धती स्वीकारलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतावरती अनेक आक्रमणे झाली यामध्ये मोघल, डच, पोर्तुगीज, व ब्रिटिश या परकीयांनी नेहमी फोडा व झोडा हीच रणनीती अवलंबली होती. याचा परिणाम एकसंध भारतामध्ये कधी झालाच नाही. परंतु स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये जहाल मतवादी व मवाळ मतवादी हे प्रवाह सक्रिय झाले व त्यांनी अखंड भारताचे स्वतंत्र्य निर्माण व्हावे यासाठी सक्रिय प्रयत्न केले. यातूनच अखंडित भारताचे स्वातंत्र्य मिळण्यासाठी 15 ऑगस्ट 1947 हे साल उजाडले. स्वातंत्र्य चळवळीचे स्वप्न हे संविधानामध्ये समर्पकपणे साकार करण्याचे काम भारतीय संविधान सभेने अर्थात घटना परिषदेने व घटना मसुदा समितीने अतिशय कौशल्यपूर्वक सत्यात उतरवण्याचे महान कार्य केले आहे. जगातील सर्वात मोठी राज्यघटना राष्ट्रामधील विविधता एकत्रितरित्या बांधण्याचे काम या संविधानाने केले आहे. संविधानांचे पहिले पृष्ठ म्हणजेच भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा त्या संविधानामध्ये काय आहे याचा गोषवारा आहे. आज जी 75 वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचे सर्व श्रेय त्या सरनाम्यास जाते. कारण त्यातील प्रत्येक शब्द विचारपूर्वक व अर्थपूर्ण व चिरंतन आहे. त्याविषयी मला लिहावेसे वाटले.

मुख्यशब्द: *भारतीय राज्यघटना, सरनामा, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्याय, संविधान मूल्ये, राजकीय वास्तव, भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, संविधान संरक्षण.*

प्रस्तावना:-

भारतीय संविधान हे आधुनिक काळातील जिवंत दस्तऐवज आहे. या संविधानाच्या आधारे देशाचा राज्यकारभार चालतो. विविधतेत एकता निर्माण करण्याची हमी हे संविधान देते. म्हणजेच आम्ही भारताचे लोक आमच्या संविधानाची काळजी घेतो. व लोकशाही मार्गाने संरक्षण करतो. संविधानाच्या विरोधी कृती करणाऱ्या शक्तींना नेस्तनाबूत करण्यासाठी आम्ही भारतीय लोक नेहमी तत्पर असतो. संविधान हे आम्हा भारतीयांना कोणकोणत्या गोष्टीची शाश्वती देते. हे आमच्या संविधानाच्या पहिल्या पानावर 'सरनामा' यामध्ये शाश्वती मिळते. याचाच ऊहापोह पुढील प्रमाणे.

सरनामा:-

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य,दर्जाची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन,आमच्या संविधान सभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949 रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत', असा हा सरनामा आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. एन. एल. गायकवाड, श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरुड राज्यशास्त्र विभाग

How to cite this article:
गायकवाड, . एन . एल . (2025). भारतीय राज्यघटनेचा सरनामा व आजचे वास्तव. Journal of Research & Development, 17(9(IV)), 312–315. https://doi.org/10.5281/zenodo.17734557

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17734557
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

स्वातंत्र्यलढ्याची हेतूपूर्ती व सरनामा:-

"आम्ही भारतीय लोक" अशी सुरुवात करून ही घटना आम्हास अर्पण करीत आहोत ', असे म्हणणारा हा सरनामा आहे. 'आम्ही भारतीय लोक' हीच भारताची खरी शक्ती आहे हे स्पष्ट करतो. भविष्यकालीन वाटचालीसाठी मार्गदर्शक ठरणारी मूलभूत मुल्ये सरनाम्याच्या मध्यभागी आढळतात.संपूर्ण स्वातंत्र्य, लोकांची सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही आणि संघराज्य एकात्मता ही ती मुल्ये आहेत. सरनामा म्हणजे घटनेची प्रास्ताविका.... राज्य घटनेतील तरतुदी कडे जाण्यासाठी दिशा दाखवणारी ही कमान आहे. त्यामुळे या प्रवेशद्वारावर दाखवलेल्या मार्गाने जाणे आपली जबाबदारी आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये मर्यादीत स्वातंत्र्याची मागणी करणारे अनेक टप्पे आले. इंग्रजांकडून होणाऱ्या अन्यायी कारभाराविषयी असंतोष होता हे खरेच, पण त्यांची सत्ता अबाधित ठेवून आपल्याला थोडेफार स्वातंत्र्य मिळावे अशी मागणी करणाऱ्या अनेक चळवळी झाल्या. अर्थातच हे मर्यादित स्वातंत्र्य इंग्रजांच्या दयाबुद्धीवरच असणार हे उघड होते. त्याऐवजी स्वतःच्या लोक बळावर संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून समाजवादी समाजरचना आणण्याचे उद्दिष्ट कम्युनिस्ट शहीद भगतसिंग यांची नौजवान सभा, सुभाष बाबूंच्या फॉरवर्ड ब्लॉक इत्यादींनी घोषित केले होते.इतरही अनेक गट तयार होते. या पार्श्वभूमीवर आपला स्वातंत्र्य लढा जसजशा अधिकाधिक लोकबळ संघटित करू लागला, तसतशी इंग्रजांची ही दडपशाही झुगारून देण्याचा व नवी राज्यव्यवस्था आणण्याचे लोकमानस तयार होऊ लागले. त्यातूनच 1929 साली काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. अर्थातच संपूर्ण स्वातंत्र्यामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक स्वातंत्र्य गृहीत धरलेले होते. भारतीय राज्यघटनेचा सरनाम्यातील संपूर्ण स्वातंत्र्याची संकल्पना ही हीच आहे. थोडक्यात कोणत्याही गोष्टीचा निर्णय करण्याचे अंतिम म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य भारतात आर्थिक स्वावलंबना शिवाय संपूर्ण स्वातंत्र्याची संकल्पना परिपूर्ण होत नाही, हे खरेच आहे.

घटना समितीच्या सभेत 25 नोव्हेंबर 1949 रोजी म्हणजे राज्यघटना मंजूर होण्याच्या आदल्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "भारतीय समाजात आज दोन गोष्टींची कमतरता दिसून येते. त्यापैकी एक समता होय. सामाजिक क्षितिजावर आज टप्प्यानुसार असमानता आहे. त्यात काही वरिष्ठ आणि उरलेले बरेच एक कनिष्ठ पातळीवर आहेत.

आर्थिक क्षितिजावर मूठभर लोक गर्भश्रीमंत आहेत, तर बहुसंख्य अतिशय दारिद्र्याने पिचलेल्या आहेत 26 जानेवारी 1950 रोजी या घटनेचा अंमल करतानाच आपण एका विरोधाभासाच्या नव्या युगात प्रवेश करणार आहोत. राजकीय क्षेत्रात सर्वत्र समता असेल, तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात असमानता असेल... अशा विरोधात्मक परिस्थितीत आपण किती काळ राहू शकणार आहोत? किती काळ आपण सामाजिक व आर्थिक समता नाकारू शकणार आहोत.जर आपण फार काळ हे चालू देणार असलो तर राजकीय लोकशाहीला विनाशाकडे नेणार आहोत. जर आपण लवकरात लवकर विरोधाभासाचे वातावरण दूर करू शकलो नाही, तर घटना समितीने परिश्रमपूर्वक तयार केलेली राजकीय लोकशाहीची इमारत जे विषमतेचे बळी ठरतील त्यांच्याकडून उखडली गेल्याशिवाय राहणार नाही. आज 75 वर्षांनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या द्रष्टेपणाने केलेल्या इशाऱ्याकडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे. हे स्वातंत्र्य आणि समता मिळवण्यासाठी वाटचाल करावी हे घटनेने सांगितले आहे.अर्थात ते आपोआप मिळत नाही, तर ते मिळवण्याची व संभाळण्याची जबाबदारी लोकांवरच आहे. शेवटी संपूर्ण स्वातंत्र्याची संकल्पना ही सापेक्ष आहे, ती निरपेक्ष नाही. ती सामाजिक आर्थिक परिस्थितीशी निगडित आहे.

सत्ताधारी पक्ष काँग्रेस व सरनामा:-

स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी दीड दशकांहून अधिक काळ कार्यरत राहत नव भारताची उभारणी केली. गेल्या 75 वर्षातील अर्धशतकाहून अधिक काळ स्वातंत्र्य चळवळीची मध्यवर्ती विचारधारा असलेल्या काँग्रेस पक्षाने देशाची सत्ता उपभोगली काँग्रेसच्या देश उभारणीच्या योगदानाकडे दुर्लक्ष करणे ही मोठी प्रतारणा ठरेल.पक्षीय वैचारिक मतभेद अग्रक्रमाने प्रश्न याबाबत मतभेद असले तरी काँग्रेसच्या सत्ताकाळात काहीच झाले नाही, त्यामुळे काँग्रेस मुक्त भारत अशी मांडणी करणे ही राष्ट्रीय कृतघ्नता आहे. आज काँग्रेससह डाव्या समाजवादी राजकीय पक्षांचेही पतन झाले आहे हे खरे पण सर्वसामान्य जनतेचे उत्पादन व्हायचे असेल तर या मध्यवर्ती विचारधारा बलिष्ठ होणे व पुन्हा केंद्रस्थानी येणे गरजेचे आहे.

भारतातील सर्व राजकीय पक्षांमध्ये स्वातंत्र्य आंदोलनाचे मध्यवर्ती नेतृत्व केलेला व स्वातंत्र्यानंतरही सक्रिय असलेला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वाधिक नेते विचारवंत देणारा सर्वात जुना -जाणता सर्वाधिक काळ रुजलेला व जनाधार मिळवलेला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

भारताच्या सर्वांगीण विकासात मौलिक स्वरूपाची भागीदारी केलेला, भारताची प्रतिमा जागतिक स्तरावर ऊंचवणारा काँग्रेस पक्षाच आहे गेली काही वर्षे भारतीय राजकारणात काँग्रेस पक्षाचा संस्थात्मक संकोच होत आहे.

स्वातंत्र्यापूर्वी 62 वर्षे आणि स्वातंत्र्यानंतरची 75 वर्षे काँग्रेस कार्यरत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांना जागृत व संघटित करून ब्रिटिशांच्या राजकीय व आर्थिक प्रश्न विरुद्ध आवाज उठवण्याचे एक मिशन म्हणून काँग्रेसने भूमिका बजावली. सर्वसामान्य जनतेमध्ये ब्रिटिशविरोधी जाणीव-जागृती पासून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यापर्यंत नेतृत्व काँग्रेसने केले. मोठ्या प्रमाणात राजकीय जागृती करून लोकमत संघटित केले. भारतीय राष्ट्रवादाची राष्ट्रीय भावना तयार करण्याचे काम केले.जात, पात,पंथनिरपेक्ष असे संघटना शास्त्र अवलंबले लोकाभिमुख दृष्टिकोन घेऊन राजकीय आर्थिक मागण्या केल्या.त्यासाठी लोक चळवळी उभारल्या. स्वातंत्र्यलढा बहुआयामी करण्यात काँग्रेसने मोठे यश मिळवले.

सत्ताधारी पक्ष भाजपा व सरनामा:-

सत्ताधारी पक्ष भारतीय भारतीय जनता पक्ष हा लालकृष्ण अडवाणी व अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातील पक्ष व नरेंद्र मोदी व अमित शहा व योगी आदित्यनाथ यांच्या काळातील पक्ष असे दोन विभाग पडतात अटल बिहारी वाजपेयी हे सर्वांना सोबत घेऊन जाणारे. व जनतेमध्ये लोकप्रिय असणारे राजकारणातील कुटील डावापासून अलिप्त असणारे व लोकशाहीवर प्रचंड श्रद्धा असणारे असे नेतृत्व होते त्यांनी भारताच्या संविधानाचा नेहमीच सन्मान केला. गोध्रा हत्याकांडाचा निषेध केला. त्या वेळचे गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी स्वतःच्या पक्षाचे असून सुद्धा त्यांचा निषेध केला व राष्ट्रद्रोही कृत्यास त्यांनी कधीही पाठीशी घातले नाही. 2014 नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसमुक्त भारत अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. वास्तविक विरोधी पक्ष ही तेवढाच महत्त्वाचा असतो. की जो लोकशाही भक्कम करत असतो. मात्र हिंदुत्वाचा पुरस्कार व इतर धर्मियांना नगण्य स्थान निवडणूक जिंकण्याच्या हेतूने लोकशाहीचा गळा आवळणे अशी कृत्य निवडणूक आयोग, इडी, सीबीआय यांचा स्वतःच्या स्वार्थासाठी विरोधी पक्षांना धाक दाखवून भ्रष्ट मंत्री अथवा सदस्य आपल्या पक्षांमध्ये घेणे त्यानंतर त्यांच्यावरील आरोप व त्यांचा भ्रष्टाचार याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणे. असे वर्तन लोकशाहीच्या हिताचे नसते. भांडवलधार्जीने वर्तन करणे यामुळे लोकांचा लोकशाही वरील विश्वास डळमळीत होतो. तसेच निवडणूक आयोगास आपल्या सोयीप्रमाणे वागण्यास भाग पाडणे, निवडणूक प्रक्रियेमध्ये सध्या अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. इंडिया आघाडी व राहुल गांधी वोटचोर गद्दी छोड अशा घोषणा देऊन भारतीय जनता पक्षाचा बुरखा फाडताना दिसत आहे. म्हणजेच भारतीय जनता पक्ष व त्यांची धोरणे लोकशाही भक्कम करण्याऐवजी दुर्लक्षित करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. हे भारतीय संविधानासमोर मोठे आव्हान आहे. तसेच भारतातील इतर राजकीय पक्ष सुद्धा येनकेन प्रकारे दुबळे होताना दिसत आहे.

भारतीय राजकारणात माकप, भाकप या डाव्या पक्षांची पुनर्बांधणी होणेही गरजेचे आहे.आप ने दोन राज्य काबीज करून राजकीय आघाडी घेतली. चळवळी पद्धतशीरपणे क्षीण केल्या जात आहेत नवमध्यमवर्ग एका वेगळ्याच सुस्तीत व काहीशा मस्तीत आहे. अशा वेळी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात स्वतंत्र ज्यासाठी आपण मिळवले त्या मूल्यापासून दूर जात आहोत का? याचा विचार करण्याची नितांत गरज आहे. जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवून जनतेशी नाळ अधिक घट्ट पणे जोडणे गरजेचे आहे. अशा शक्यतांचे अवकाश परिस्थितीने तयार केले आहेत. राजकीय पक्षांनी नेते व कार्यकर्ते यांच्यातील अंतर कमी कमी करत आणण्याची गरज आहे. आणि सत्तेपासून दूर होण्याचे वाढते प्रमाण यामुळे सुस्तावलेल्या व धास्तावलेल्या पक्ष कार्यकर्त्यांत विश्वास निर्माण करण्यासाठी कार्यपद्धतीत मूलभूत बदल करण्याची तातडीची गरज आहे. यासाठी मध्यमवर्ग सामान्य वर्ग यांनी नेपाळ व बांगलादेश येथे हिंसाचाराच्या आधारे सत्तेमध्ये परिवर्तन केले. तसे भारतामध्ये करता येणे शक्य नाही. ती आपली भारतीय संस्कृती नाही. आपणच आपल्या राष्ट्राचा विनाश करणारे नाही. आपला लोकशाही वरती विश्वास आहे. फक्त लोकशाही द्वेष्टे नेते व पक्ष यांना येणाऱ्या निवडणुकांमध्ये बदनाम करून सत्तेपासून दूर ठेवणे व भारतीय संविधानाचे रक्षण म्हणजेच सरनाम्याचे रक्षण करून पुढच्या पिढीकडे सकस व सक्षम लोकशाही हस्तांतरित करूया.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निष्कर्ष:-

भारतीय संविधान म्हणजे. भारतीय जनतेचा श्वास आहे. भारतीय जनतेचे जिने जगणे आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा हेतू आहे. भारतीय लोकशाही अधिक वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने भारतीय जनतेने लोकशाही समोर संकट उभा करणारे लोकशाहीवर गैरविश्वास दाखवणारे समाज गट, राजकीय पक्ष, दबाव गट यांचे वेळीच हेतू ओळखून. त्यांना सत्तेपासून दूर ठेवणे. आधुनिक लोकशाहीचे आम्ही भारतीय जनतेने संविधानाच्या माध्यमातून संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ:-

1. D. D. Basu- introduction to constitution of India
2. R. C. Majumdar: - History of modern India
3. दैनिक लोकसत्ता

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास (२०१४-२०२४)

मोसिम राजअहमद पठाण
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: mrp.rs.polsc@unishivaji.ac.in

Manuscript ID:
JRD -2025-170968
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 316-320
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

महाराष्ट्रातील राजकारण केंद्रीय राजकारणावर प्रभाव टाकणारे आहे. महाराष्ट्र राज्याचे राजकारण प्रामुख्याने शेती, उद्योग, प्रादेशिक अस्मिता या घटकांच्या प्रभावातून आकाराला आलेले आहे. महाराष्ट्राच्या तत्कालीन नेतृत्वाने स्वीकारलेले विकासाचे आर्थिक प्रारूप हे भारतीय संघराज्याच्या आर्थिक प्रारूपाचे अनुकरण करून म्हणजेच मिश्र अर्थव्यवस्थेचे व कल्याणकारी राज्याची कल्पना मान्य करणारे असे ठरवले गेले. महाराष्ट्रामध्ये शेती व उद्योग यावर आधारलेली अर्थव्यवस्था असल्यामुळे अर्थव्यवस्थेचे मिश्र प्रारूप व कल्याणकारी राज्याची कल्पना महाराष्ट्रामध्ये स्वीकारण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे सामजिक प्रारूप सर्वसमावेशक व बहुलतावादी असे स्वीकारण्यात आले. त्याचबरोबर राजकीय प्रारूप केंद्रीय प्रारुपाप्रमाणे विकेंद्रित संघराज्याची कल्पना, बहुपक्ष स्पर्धात्मक पक्षपद्धतीचे व सामजिक न्याय, धर्मनिरपेक्षता व सामाजिक समतेच्या दृष्टीने विकसित होणाऱ्या राजकीय समाजाचे प्रारूप स्वीकारण्यात आले. निवडणुकांचे राजकारण घडत असताना या प्रारूपांमध्ये काळानुरूप बदल घडत गेले. परंतु प्रामुख्याने २०१४ साली झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीनंतर विशेष बदल या तीनही प्रारुपांमध्ये आपल्याला दिसतात. सदर प्रारुपांमधील बदलांचा परिणाम म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात घडलेले बदल यांचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

संकेत शब्द: बहुपक्ष पद्धती, संघराज्य, भाषिक चळवळ, द्विध्रुवीय सत्ता स्पर्धा, बहुध्रुवीय सत्ता स्पर्धा, कल्याणकारी राज्य, भांडवली अर्थव्यवस्था.

संशोधनाचे उद्देश :

१) २०१४-२०२४ या कालखंडातील महाराष्ट्राच्या राजकीय प्रारूपाच्या बदलाचा अभ्यास करणे.

२) २०१४ नंतर महाराष्ट्रातील बदललेल्या राजकारणाचा आढावा घेणे.

विषय विवेचन :

महाराष्ट्र राज्य स्थापनेला संयुक्त महाराष्ट्र चळवळ व मराठी भाषिक राज्य चळवळीची पार्श्वभूमी राहिली आहे. 'महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य आहे' ही महाराष्ट्राच्या स्थापनेमागची प्रेरणा होती. महाराष्ट्र राज्य निर्मितीला जातीय किंवा धार्मिक प्रेरणा नव्हती तर ती प्रामुख्याने भाषिक प्रेरणा होती. याच प्रेरणेतून महाराष्ट्राचे सामाजिक- सांस्कृतिक प्रारूप आकाराले आले. महाराष्ट्राचे सामाजिक सांकृतिक प्रारूप हे सर्वसमावेशक जरी घडले असले तरी जातीय प्रेरणांचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणाला आकार देण्यासाठी महत्वाचा ठरला आहे.

आर्थिक प्रारूप हे केंद्रीय राजकारणाचे अनुकरण करून परंतु प्रादेशिक गरजा लक्षात घेऊन स्वीकारण्यात आला.त्यामध्ये नियोजित अर्थव्यवस्था, कल्याणकारी राज्य यांचा समावेश आहे. राजकीय प्रारूपामध्ये स्पर्धात्मक राजकारणाचा स्वीकार करण्यात आला. राजकारणातील पक्षीय स्पर्धा ही लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असते. महाराष्ट्राच्या राजकारणात लोकशाही व्यवस्थेला अधिक मजबूत करणारे सर्वसमावेशक प्रारूप स्वीकारण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या एकूण राजकीय प्रवासामध्ये अनेक राजकीय मन्वंतरे घडून आली आहेत. प्रत्येक बदलातून महाराष्ट्राच्या राजकारणाला नवे वळण मिळत गेले.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
मोसिम राजअहमद पठाण, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
पठाण, . मोसिम . राजअहमद . (2025). महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास (२०१४-२०२४). Journal of Research & Development, 17(9(IV)), 316–320.
https://doi.org/10.5281/zenodo.17734706

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17734706
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

परंतु २०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांची युती सत्तेत आली. विशेषतः भारतीय जनता पार्टी च्या नेतृत्वातील सरकार केंद्रात व राज्यात सत्तेवर आल्यानंतर महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय प्रारूपामध्ये मुलभूत बदल होण्याची प्रक्रिया गतिमान झाल्याचे दिसते.

१९६० पासून महाराष्ट्राचे राजकारण हे प्रामुख्याने काँग्रेस पक्षाच्या प्रभावाचे राहिले आहे. परंतु अगदी १९६० पासून काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाचे राजकारण जरी राहिले असले तरी काँग्रेस वर्चस्वाचा काळ हा सर्वंकष वर्चस्वाचा नव्हता. शेतकरी कामगार पक्ष, डाव्या विचारधारेचे पक्ष, आंबेडकरी विचारधारेचे पक्ष यांचा प्रभाव व नियंत्रण काँग्रेस वर्चस्वावर होते.१९७५ साली देशात लागू झालेली आणीबाणी नंतर मात्र काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला ज्या पद्धतीने केंद्रात धक्का बसला तसाच महाराष्ट्राच्या राजकारणात ही बसला. १९७८ साली जनता पार्टीच्या प्रयोगासारखे पुलोद आघाडीची स्थापना महाराष्ट्रात झाली व डॉ.रजनी कोठारी यांच्या मते अस्तित्वात असणारी 'काँग्रेस व्यवस्था' महाराष्ट्रात संपुष्ठात आली.

तद्नंतर विविध वैचारिक व राजकीय भूमिकांच्या आघाड्यांचे राजकारण महाराष्ट्रात घडायला सुरुवात झाली. प्रामुख्याने १९६६ साली स्थापन झालेली शिवसेना व १९८० साली स्थापन झालेला भाजप यांची १९८९ साली लोकसभेच्या निवडणुकीत हिंदुत्वाच्या मुद्द्यावर आघाडी झाली. परंतु त्यांना निवडणुकीच्या राजकारणात अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. तरीदेखील महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचे संकेत मिळाले असे म्हणता येईल. १९८९ सालापर्यंत प्रामुख्याने महाराष्ट्रातील सत्तास्पर्धा ही काँग्रेस पक्ष किंवा काँग्रेस पक्षाची विचारधारा मानणाऱ्या नेतृत्वाच्या ठिकाणी केंद्रित झाली होती. एका अर्थाने विचारधारेच्या अनुषंगाने एकध्रुवीय सत्ता स्पर्धा अस्तित्वात असल्याचे म्हणता येते. मात्र शिवसेना व भाजप यांच्या युती मुळे द्विध्रुवीय सत्ता स्पर्धेला सुरुवात झाल्याचे दिसते.
१९९० साली झालेल्या निवडणुकीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्रमांक १

Party / Group	Seats Contested	Seats Won (of 288)	Votes Polled	Vote Share (%)
Indian National Congress (INC)	276	141	11,334,773	38.17
Shiv Sena (SHS)	183	52	4,733,834	15.94
Bharatiya Janata Party (BJP)	104	42	3,180,482	10.71
Janata Dal (JD)	214	24	3,776,737	12.72
Independents	2,286	13	4,036,403	13.59
Peasants & Workers Party of India (PWP)	40	8	719,807	2.42
Communist Party of India (Marxist) (CPI-M)	13	3	258,433	0.87
Communist Party of India (CPI)	16	2	219,080	0.74
Indian Congress (Socialist) (IC(S))	71	1	290,503	0.98
Indian Union Muslim League (IUML)	9	1	150,926	0.51
Republican Party of India (Khobragade)	18	1	147,683	0.50
Total / Turnout	3,764 candidates	288 seats	29,693,838 votes	62.26% turnout

(**source**- http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_1990/StatRep_MT_90.pdf)

वरील आकडेवारी वरून महाराष्ट्राच्या राजकारणातील द्विध्रुवीय स्पर्धा स्पष्ट व्हायला मदत होते. यानंतर पुढे १९९५ साली झालेल्या निवडणुकीत मात्र काँग्रेस आघाडीला पराभूत करून शिवसेना – भाजप युतीची सत्ता महाराष्ट्रात स्थापन झाली. महाराष्ट्राच्या स्थापनेपासून राजकारणातील सर्वात मोठे बदल १९९५ साली झालेल्या या निवडणुकीच्या निकालानंतर घडून आले. पहिल्यांदा हिंदुत्वाची विचारधारा असणाऱ्या पक्षांची सत्ता महाराष्ट्रात स्थापन झाली होती. या निवडणुकीमुळे महाराष्ट्रातील सत्ता स्पर्धा आता दीर्घकाळासाठी द्विध्रुवीय राहणार यावर शिक्कामोर्तब झाले होते.
१९९५ साली झालेल्या निवडणुकीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्रमांक २

Party / Group	Seats Won (of 288)	Votes Polled	Vote Share (%)
Indian National Congress (INC)	**80**	11,941,832	31.00
Shiv Sena (SHS)	**73**	6,315,493	16.39
Bharatiya Janata Party (BJP)	**65**	4,932,767	12.80
Total / Turnout	**288 seats**	**38.5 million votes**	**62–64% turnout.**

(**source**- http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_1995/StatRep_MT_95.pdf)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

यानंतर मात्र सलग तीन निवडणुकांमध्ये म्हणजेच १९९९, २००४ व २००९ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वातील सत्ता महाराष्ट्रामध्ये स्थापन झाली. या तीनही निवडणुकांमध्ये काँग्रेस आघाडीचे वर्चस्व जरी राहिले असले तरी शिवसेना – भाजप युतीला सुद्धा लक्षणीय जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे महाराष्ट्रातील आघाड्यांची द्विध्रुवीय स्पर्धा कायम राहिल्याचे आपल्याला दिसते.

अनुक्रमे १९९९, २००४ व २००९ सालच्या निवडणुकांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्रमांक ३

Party / Group	Seats Won (of 288)	Votes Polled	Vote Share (%)
Indian National Congress (INC)	**75**	8,937,043	27.20
Shiv Sena (SHS)	**69**	5,692,812	17.33
Nationalist Congress Party (NCP)*	**58**	7,425,427	22.60
Bharatiya Janata Party (BJP)	**56**	4,776,301	14.54
Independents	**12**	3,116,564	9.49
Total / Turnout	**288 seats**	**32,856,693 votes**	**60.95% turnout.**

(**source**- http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_1999/StatRep_MT_99.pdf)

तक्ता क्रमांक ४

Party / Group	Seats Won (of 288)	Votes Polled	Vote Share (%)
Indian National Congress (INC)	**69**	8,810,363	21.06
Nationalist Congress Party (NCP)	**71**	7,841,962	18.75
Shiv Sena (SHS)	**62**	8,351,654	19.97
Bharatiya Janata Party (BJP)	**49**	5,717,287	13.67
Total / Turnout	**288 seats**	**41,829,645 votes**	**63.44% turnout.**

(**source**- http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_2004/StatRep_MT_04.pdf)

तक्ता क्रमांक ५

Party / Group	Seats Won (of 288)
Indian National Congress (INC)	**82**
Nationalist Congress Party (NCP)	**61**
Shiv Sena (SHS)	**45**
Bharatiya Janata Party (BJP)	**46**
Total / Turnout	**288 seats**

(**source**- http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_2009/StatRep_MT_09.pdf)

२०१४ ते २०२४ या काळातील महाराष्ट्राचे बदलेले राजकारण :

२०१४ साली महाराष्ट्रात काँग्रेस आघाडी पराभूत झाल्यामुळे भाजप – शिवसेना आघाडीची सत्ता स्थापन झाली. २०१४ साली महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा बदल घडून आला तो म्हणजे आघाड्यांचे राजकारण बाजूला सारून महाराष्ट्रातले प्रमुख पक्ष स्वतंत्रपणे निवडणुकीला सामोरे गेले. यामध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला त्यानंतर अनुक्रमे शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व इतर पक्षांना जागा मिळाल्या. २०१४ सालची निवडणूक निकालानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात द्विध्रुवीय सत्ता स्पर्धे ऐवजी बहुध्रुवीय सत्ता स्पर्धा सुरु झाली. परंतु बहुमताच्या गरजेपोटी पुन्हा आघाड्यांचे राजकारण आकाराला आले व भाजप-शिवसेना युतीचे सरकार स्थापन करण्यात आले. त्यामुळे बहुध्रुवीय सत्ता स्पर्धा पुन्हा एकदा दोन आघाड्यांमध्ये केंद्रित होऊन ती द्वीध्रुवीयच राहिली.

२०१४ साली झालेल्या निवडणुकीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:

तक्ता क्रमांक ६

Party / Group	Seats Won (of 288)	Votes Polled	Vote Share (%)
Bharatiya Janata Party (BJP)	**122**	14,709,276	27.81
Shiv Sena (SHS)	**63**	10,235,970	19.35
Indian National Congress (INC)	**42**	9,496,095	17.95
Nationalist Congress Party (NCP)	**41**	9,122,285	17.24
Total / Turnout	**288 seats**	**52,901,326?**	**63.08% turnout**

(**source**- http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_2014/StatRep_MT_14.pdf)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

२०१९ साली शिवसेना – भाजप व काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या आघाडीमध्ये प्रमुख लढत झाली. त्याचबरोबर महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी कामगार पक्ष व इतर प्रादेशिक पक्षांनीही परिणामकारक सहभाग नोंदवला. निवडणूक निकालामध्ये भाजप–शिवसेना युतीला बहुमत प्राप्त झाले परंतु भाजप–शिवसेनेतील सत्ता वाटपाची चर्चा फिस्कटल्यामुळे शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व इतर पक्षांची महाविकास आघाडी निर्माण झाली व या आघाडीने शिवसेनेच्या नेतृत्वात सत्ता स्थापन केली. या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट म्हणजे वैचारिक भूमिकेच्या पलीकडे जावून समान कृती कार्यक्रमावर आधारित आघाडीचे राजकारण महाराष्ट्रात आकाराला आले. वैचारिक भिन्नता असताना देखील विकासाच्या समान कृती कार्यक्रमाच्या आधारे नवीन आघाडी जन्माला आली. यामुळे विचारधारेच्या मर्यादेपलीकडे जाणारे राजकारण आकारले आले असे म्हणता येईल.

२०१९ साली झालेल्या निवडणुकीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्रमांक ७

Party / Group	Seats Won (of 288)	Votes Polled	Vote Share (%)
Bharatiya Janata Party (BJP)	**105**	14,199,375	25.75
Shiv Sena (SHS)	**56**	9,049,789	16.41
Nationalist Congress Party (NCP)	**54**	9,216,919	16.71
Indian National Congress (INC)	**44**	8,752,199	15.87
Total / Turnout	**288 seats**	**55 million votes**	**61.44% turnout**.

(**source** http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_2019/StatRep_MT_19.pdf)

२०१९ साली झालेल्या महाविकास आघाडीच्या प्रयोगामुळे महाराष्ट्रातील राजकारणात मोठे बदल घडून आले. पक्षीय स्पर्धा ही विचारधारेच्या मर्यादेपलीकडे गेली. प्रादेशिक अस्मितेचे राजकारण या आघाडीच्या माध्यमातून घडत होते. परंतु २०२२ साली या आघाडीत फुट पडली. शिवसेना व राष्ट्रवादी पक्षातील एक मोठा गट बाहेर पडून भाजपशी युती करून सत्ता परिवर्तन करण्यात आले आणि शिवसेनेच्या)एकनाथ शिंदे(नेतृत्वात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)अजित पवार (या पक्षांनी युती करून महायुतीची सत्ता स्थापन केली. तद्नंतर २०२४ साली झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडी व महायुती यांच्यामध्ये महायुतीला बहुमत प्राप्त झाले व महायुतीने पुन्हा एकदा महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली.

२०२४ साली झालेल्या निवडणुकीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

Party / Group (Alliance)	Seats Won (of 288)	Votes Polled	Vote Share (%)
Maha Yuti — BJP	**132**	17,293,650	26.77
Maha Yuti — Shiv Sena	**57**	7,996,920	12.38
Maha Yuti — NCP	**41**	5,816,566	9.01
Maha Vikas Aghadi (MVA) — INC	**16**	8,020,921	12.42
MVA — Shiv Sena UBT	**20**	6,433,013	9.96
MVA – NCP SP	**10**	7,287,797	11.28
Total / Turnout	**288 seats**	**64,130,622 total votes reported on page**	**(vote share total 100%)**

(**source**- http://eci.nic.in/eci_main/statisticalreports/SE_2024/StatRep_MT_24.pdf)

२०१४ ते २०२४ या काळामध्ये महाराष्ट्रातील राजकारणात घडलेली स्थित्यंतरे अतिशय महत्वाची आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील ऐतिहासिक टप्पे व वैशिष्ट्यांना छेद देवून नव्याने त्यांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न या काळात महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी केला असे म्हणता येईल.

निष्कर्ष :

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अनेक स्थित्यंतरे घडून आली आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रारूपाची मुलभूत चौकट बदलणारे राजकारण २०१४ ते २०२४ या काळात घडले असे म्हणता येईल. द्विध्रुवीय सत्ता स्पर्धा चे रुपांतर बहुध्रुवीय सत्ता स्पर्धेत झाले त्याचबरोबर विचारधारोत्तर राजकारण आकाराला आल्याचे दिसते. काँग्रेस वर्चस्वाच्या राजकारणाला या काळामध्ये शह बसला व काँग्रेसेतर राजकारण अधिक मजबूत झाल्याचे दिसते. थोडक्यात २०१४ ते २०२४ या काळातील महाराष्ट्रातील राजकारण पारंपारिक चौकट बदलणारे ठरले आहे असे म्हणता येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भसूची :

1. पळशीकर सुहास (२०१४), "देश-प्रदेश – प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा" युनिक अकॅडेमी, पुणे.
2. पळशीकर सुहास (दुसरी आवृत्ती २०१३), "राजकारणाचा ताळेबंद", साधना प्रकाशन, पुणे.
3. पळशीकर सुहास, बिरमल नितीन (२००४), "महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ", प्रतिमा प्रकाशन, पुणे.
4. Kothari Rajani, (2nd Edition, 2020), "Politics in India", Orient Black Swann, Hyderabad.
5. Website - https://eci.gov.in

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारतीय निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि उत्तरदायित्व; प्रत्यक्ष व्यवहार व आजचे वास्तव

प्रा. डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर
राज्यशास्त्र विभाग प्रमुख जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
तालुका-शिरोळ, जिल्हा-कोल्हापूर (महाराष्ट्र)
Email: kdkhaladkar1@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170969
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 321-336
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. या लोकशाहीच्या यशात भारतीय निवडणूक आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. संविधानातील कलम 324 ते 329 अंतर्गत स्थापन झालेला हा आयोग देशातील निवडणुकांचे संचालन स्वच्छ, पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने करण्यासाठी जबाबदार आहे. तथापि, गेल्या काही वर्षांत आयोगाच्या कार्यपद्धतीवर, राजकीय दबावापासून मुक्त असण्यावर आणि निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संविधानाने आयोगाला स्वायत्त दर्जा दिला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्याच्या निर्णयांवर राजकीय हस्तक्षेप, नियुक्ती प्रक्रियेत अपारदर्शकता आणि आर्थिक अवलंबित्व यांसारख्या बाबींकडे लक्ष वेधले जात आहे. त्यामुळे आयोगाची स्वायत्तता आणि उत्तरदायित्व या दोन्हींच्या मर्यादा तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रस्तुत संशोधनात भारतीय निवडणूक आयोगाची स्वायत्तता व उत्तरदायित्व यांचा घटनात्मक, प्रशासकीय आणि व्यावहारिक संदर्भातून अभ्यास केला असून, भविष्यात आयोगाच्या स्वायत्ततेच्या बळकटीसाठी आवश्यक उपाययोजना सूचविल्या आहेत.

मुख्यशब्द: *भारतीय निवडणूक आयोग, स्वायत्तता, उत्तरदायित्व, संविधान, राजकीय हस्तक्षेप, पारदर्शकता, नियुक्ती प्रक्रिया, न्यायालयीन निर्णय, निवडणूक सुधारणा.*

प्रस्तावना :

भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. आणि या लोकशाहीच्या यशामध्ये भारतीय निवडणूक आयोग या संविधानिक संस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. 'निर्भय (भयमुक्त), निष्पक्षपाती व न्याय्य वातावरणात निवडणुकांचे पर्यवेक्षण (देखरेख व व्यवस्थापन) होणे ही लोकशाहीची पूर्व अट मानली जाते. 'सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पारपाडल्या नाहीत तर केवळ सार्वजनिक यंत्रणा कुचकामी ठरतात असे नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते असे मत प्रसिद्ध राज्यशास्त्रज्ञ पोलॉक यांनी नोंदवले, ज्यातून लोकशाही व्यवस्थेतील निवडणुकांचे महत्त्व स्पष्ट होते.' सार्वत्रिक निवडणुका हे नागरिकांमध्ये सार्वजनिक व्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम असते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर तालुका-शिरोळ, जिल्हा-कोल्हापूर (महाराष्ट्र)

How to cite this article:
खळदकर, . खंडेराव . ज्ञानदेव . (2025). भारतीय निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि उत्तरदायित्व; प्रत्यक्ष व्यवहार व आजचे वास्तव. Journal of Research & Development, 17(9(IV)), 321–336. https://doi.org/10.5281/zenodo.17734768

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17734768
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

लोकांनी निवडणुकांमधून दिलेला कौल राज्य व शासनसंस्थेस (सरकारला) अधिमान्यता मिळवून देतो, तसेच शांततामय व सनदशीर मार्गाने सत्तांतर घडवून आणतो. त्यामुळे न्याय्य व प्रभावी निवडणूक यंत्रणा ही प्रातिनिधिक शासनाची आधारशिला ठरते. ही व्यवस्था किती स्वायत्त, कार्यक्षम, निष्पक्षपाती व निर्भयपणे काम करते यावरच देशाच्या लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते.(जाधव,शिरापूरकर, 2024; पृष्ठ.485)भारतीय निवडणूक आयोग ही एक संविधानिक संस्था आहे, जी भारतातील स्वच्छ ,पारदर्शक व स्वतंत्र निवडणुकांची जबाबदारी पार पाडते.संविधानातील कलम-324 अंतर्गत स्थापन झालेला हा आयोग भारतीय लोकशाही प्रक्रियेचा संरक्षक मानला जातो. निवडणूक आयोग देशातील निवडणुकांचे संचालन स्वच्छ ,पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीने पार पाडण्याचे कार्य करतो. परंतु गेल्या काही वर्षापासून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर ,राजकीय दबावापासून मुक्त असण्यावर आणि निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. याचाच अर्थ आज आयोगाच्या स्वायत्ततेबाबत आणि उत्तरदायित्वाच्या मर्यादांबाबत अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. संविधानाने आयोगाला स्वायत्त दर्जा दिला असला तरी प्रत्यक्षात त्याच्या निर्णयांवर राजकीय हस्तक्षेप, नियुक्ती प्रक्रियेतील अपारदर्शकता, तसेच आर्थिक आणि प्रशासकीय निर्भरता (अवलंबित्व) याबाबतीत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.परिणामी आयोगाची स्वायत्तता आणि उत्तरदायित्वाची मर्यादा तपासली जाणे आवश्यक ठरते.म्हणून " भारतीय निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि उत्तरदायित्व ; प्रत्यक्ष व्यवहार आणि आजचे वास्तव " या प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोग या घटनात्मक स्वायत्त संस्थेचा गेल्या 75 वर्षातील स्वायत्तता आणि उत्तरदायित्व या अनुषंगाने प्रत्यक्ष व्यवहार व आजचे वास्तव स्वरूप काय आहे? भविष्यातील निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेच्या अनुषंगाने कोणत्या उपाययोजना करता येतील,या अनुषंगाने विश्लेषणात्मक पद्धतीने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टे :

1) भारतीय निवडणूक आयोगाचे घटनात्मक स्थान व स्वायत्ततेसंबंधीच्या घटनात्मक तरतुदी अभ्यासणे.
2) भारतीय निवडणूक आयोगाचे उत्तरदायित्व अथवा जबाबदारी अभ्यासणे.
3) भारतीय निवडणूक आयोगाचा प्रत्यक्ष व्यवहार व आजचे वास्तव स्वरूप अभ्यासणे.
4) भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेबाबत आणि उत्तरदायित्व बाबतच्या मर्यादांचा, आव्हानांचा अभ्यास करणे.
5) भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेसाठीच्या उपाययोजना अभ्यासणे.

वरील उद्देशांच्या आधारे प्रस्तुत संशोधन पेपरची विश्लेषणात्मक पद्धतीने मांडणी करण्यात आलेली आहे. ती पुढील प्रमाणे-

1)**भारतीय निवडणूक आयोगाची स्वायत्तता (Autonomy of Election Commission of India)**:

घटनात्मक अधिष्ठान :

निवडणुकांचे प्रशासन निवडणूक प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास टिकून राहावा व वाढावा अशा पद्धतीने व्हायचे तर त्यासाठी ' पक्षीय ' सरकारच्या हस्तक्षेपापासून व नियंत्रणापासून मुक्त असलेल्या यंत्रणेकडे ते सोपवलेले असणे गरजेचे ठरते. यासाठी निष्पक्ष व कार्यक्षम निवडणूक यंत्रणेची गरज भासते. भारतीय संविधान निर्माण कर्त्यांना याची जाणीव होती. म्हणून त्यांनी देशांमध्ये निवडणुका घेण्याकरिता अथवा निवडणुकांची कार्यवाही थेटपणे भयमुक्त व नाय्य वातावरणात आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी संविधानाच्या 15 व्या भागात कलम 324 ते 329 अंतर्गत निवडणूक आयोग या स्थायी आणि स्वतंत्र, स्वायत्त अशा संस्थेची, यंत्रणेची निर्मिती केली आहे. हा संविधानिक निवडणूक आयोग सर्व स्तरावरील लोकप्रतिनिधींची निवड नाय्य व भयमुक्त निवडणुकांच्याद्वारे होईल याची हमी भारतीयांना देतो.(भोळे ,2003 पृष्ठ -373) निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य आणि निपक्षपातीपणे अबाधित राहील याची काळजी त्याची रचना ठरविताना संविधानकरानी घेतली आहे. निवडणूक आयोग राजकीय प्रभावापासून तसेच कार्यपालिकेच्या (राष्ट्रपती ,पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ) हस्तक्षेपापासून मुक्त असलेली एक स्वायत्त संस्था आहे. तिचे स्वरूप अखिल भारतीय आहे.राज्य सरकारांना राज्यातील धार्मिक, भाषिक व सांस्कृतिक अल्पसंख्यांकांची नावे मतदार याद्या मधून काढून त्यांचा मताधिकार हिरावून घेता येऊ नये म्हणून संपूर्ण भारतासाठी एकच एक निर्वाचन आयोगाची तरतूद संविधानकराने केली आहे.(भोळे 2003 पृष्ठ -374) निवडणूक आयोग स्थानिक प्रभवापासून मुक्त राहावा आणि देशभरातील निवडणूक यंत्रणेवर त्याचे सर्वसमावेशक व प्रभावी नियंत्रण असावे यासाठी त्यांनी ही व्यवस्था केली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

निवडणूक आयोगाच्या स्वायत्तते संबंधी संरक्षण देणाऱ्या घटनात्मक तरतुदी :

भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेसंबंधी कलम - 324 ते 329 अंतर्गत घटनात्मक संरक्षण देणाऱ्या महत्त्वपूर्ण तरतुदी पुढीलप्रमाणे -

1) देशामध्ये न्याय्य आणि भयमुक्त वातावरणात निष्पक्षपणे निवडणुका घेण्यासाठी राज्यघटनेने कलम -324(1) मध्ये स्थायी आणि स्वायत्त (स्वतंत्र)अशा संस्थेची म्हणजेच निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे.कलम 324 नुसार संसद,राज्य विधिमंडळे, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती या पदांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण(Superintendence) दिशादिग्दर्शन, मार्गदर्शन(Direction) आणि नियंत्रण (Control) ,आयोजन करण्याचे अधिकार भारतीय निवडणूक आयोगाला असतील. (जाधव ,शिरापूरकर ,2024 पृष्ठ.क्र. 485) (1992 च्या 73 व्या व 74 व्या घटनादुरुस्ती कायद्यानुसार राज्यपातळीवरील ग्रामपंचायत आणि नगरपरिषदांच्या निवडणुका घेणे ही भारतीय निवडणूक आयोगाची जबाबदारी नसून याकरता भारतीय राज्यघटनेमध्ये स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची तरतूद केलेली आहे (एम.लक्ष्मीकांत 2024 पृष्ठ 426).

2) कलम 324 (2) नुसार, निवडणूक आयोगामध्ये एक मुख्य निर्वाचन आयुक्त आणि त्याखेरीज राष्ट्रपती वेळोवेळी निश्चित करतील एवढे आणखी काही निवडणूक आयुक्त नियुक्त केले जातील.या आयुक्तांच्या नेमणुकीसाठी संसदेने केलेल्या कायद्याच्या अधीन राहून राष्ट्रपती त्यांची नेमणूक करतात. (जाधव, शिरापूरकर; 2024 पृष्ठ.492) सध्या भारतीय निवडणूक आयोगामध्ये एक मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर दोन निवडणूक आयुक्त आहेत.

3) कलम 324 (3) नुसार, जेव्हा राष्ट्रपतीद्वारे इतर निवडणूक आयुक्तांची नेमणूक केली जाईल तेव्हा मुख्य निवडणूक आयुक्त निवडणूक आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहतील. (जाधव, शिरापूरकर 2024;पृष्ठ 492)

4) कलम 324 (5) नुसार, संसदेने केलेल्या कायद्याच्या अधीन राहून राष्ट्रपती मुख्य निर्वाचन आयुक्तांसह इतर आयुक्त आणि प्रादेशिक आयुक्तांचा कार्यकाळ व सेवाशर्ती यासंबंधी नियम तयार करतील. (जाधव, शिरापूरकर 2024; पृष्ठ -492,493), मुख्य निवडणूक आयुक्तांचा कार्यकाळ सुनिश्चित असतो.मुख्य निवडणूक आयुक्तांचा कार्यकाल कार्यपालिकेच्या इच्छेवर अवलंबून नसतो.सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश आणि मुख्य निवडणूक आयुक्त यांना पदच्युत करण्याची प्रक्रिया आणि कारणे एक समान असतात.म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश ज्या कारणामुळे आणि ज्या पद्धतीने पदच्युत /पदभ्रष्ट केले जाते ,त्याच कारणास्तव व त्याच पद्धतीने निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तानाही पदभ्रष्ट करता येते. म्हणजेच सिद्ध झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा अकार्यक्षमतेच्या (असमर्थता) निकषांच्या आधारे अथवा या कारणावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांनी विशेष बहुमताने म्हणजे दोन तृतीयांश (2/3) बहुमताने त्याच्याविरुद्ध पदच्युत करण्याचा ठराव पारित केला तरच राष्ट्रपतीद्वारे मुख्य निर्वाचन आयुक्ताला पदच्युत करता येते,पदावरून काढता येते.(भोळे ,2003; पृष्ठ 374) तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्थी त्याच्या नेमणुकीनंतर त्या पदाला नुकसानकारक होतील अशा रितीने बदलता येत नाहीत.(एम.लक्ष्मीकांत, 2024 ;पृष्ठ.427) थोडक्यात; मुख्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक राष्ट्रपती करत असले तरी त्यांच्या मर्जीनुसार त्याला पदच्युत करता येत नाही.

5) कलम - 324 नुसार कोणत्याही निवडणूक आयुक्ताला किंवा क्षेत्रीय /प्रादेशिक आयुक्ताला मुख्य निवडणूक आयुक्तांच्या शिफारशी शिवाय राष्ट्रपतीला पदच्युत करता येत नाही. (एम.लक्ष्मीकांत, 2024; पृष्ठ, 427)

वरील प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाप्रमाणे मुख्य निवडणूक आयुक्तांनाही कालावधी व सेवाशर्थी याबाबतची सुरक्षितता दिली गेली आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांना त्याची कामे निर्भयपणे ,निष्पक्षपातीपणे व स्वतंत्रपणे/स्वायत्तपणे करता यावीत आणि कार्यपालिकेला किंवा सत्तारूढ पक्षाला त्याच्यावर दबाव, दडपण वा दहशत टाकता येऊ नये हा या तरतुदीमागील मुख्य हेतू आहे.

6) कलम 327 संसदेचा विधानमंडळाच्या निवडणुकांबाबत तरतूद करण्याचा अधिकार :- भारतीय संविधानाच्या 327 व्या कलमाअन्वे संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या आणि राज्य कायदेमंडळाच्या निवडणुका संबंधीच्या सर्व बाबी विषयी घटनेच्या अधीन राहून कार्य करण्याचा अधिकार भारतीय संसदेला देण्यात आला आहे.या अधिकारांमध्ये मतदार याद्या तयार करणे ,निवडणूक क्षेत्रांचे परिसिमंन करणे (मतदार संघाची आखणी करणे),सभागृहाचे व्यवस्थित गठण होण्यासाठी आवश्यक ते उपाय योजने आणि इतर सर्व संबंधित विषयावर कायद्याद्वारे तरतुदी केल्या जाऊ शकतात.(अष्टेकर शरद, 2024; पृष्ठ -214) संविधानाने दिलेल्या या अधिकाराचा वापर करून संसदेने पुढील कायदे केले आहेत अ) लोकप्रतिनिधित्व अधिनियम -1950 ब) लोकप्रतिनित्व अधिनियम -1951 क) परिसिमंन आयोग अधिनियम – 1952

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

7) कलम -329 (a) नुसार, राज्यघटनेने घोषित केले आहे की, मतदार संघाचे परिशिमन किंवा मतदार संघासाठी केलेल्या जागा वाटपाशी संबंधित कोणत्याही कायद्याच्या वैद्यतेबाबत कोणत्याही न्यायालयात प्रश्न उपस्थित करता येणार नाही. त्यामुळे परिशिमन (Delimitation) आयोगाने जारी केलेले आदेश हे अंतिम असून त्यांना कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही. (जाधव, शिरापूरकर, 2024; पृष्ठ - 486)

कलम 329(b) नुसार समर्पक कायदेमंडळाने नमूद केलेल्या अधिसत्तेकडे आणि स्वरूपामध्येच सादर केलेल्या निवडणूक याचिकेद्वारेच संसद आणि राज्य विधिंडळाच्या निवडणुकीबाबत प्रश्न उपस्थित करता येतो .अन्य कोणत्याही पदस्थाकडे व मार्गाने असा प्रश्न उपस्थित करता येणार नाही. 1966 पासून केवळ उच्च न्यायालयामध्ये निवडणूक याचिकांची सुनावणी केली जाते. तथापि यासंदर्भातील अपीलाचे अधिकारक्षेत्र केवळ सर्वोच्च न्यायालयाकडे आहे.(जाधव,शिरापूरकर,2024; पृष्ठ - 486) थोडक्यात ,कलम 327 ,329 अंतर्गत मतदार संघाचे पुनर्विभाजन,मतदारसंघाची रचना किंवा अशा मतदारसंघासाठी केलेल्या जागा वाटप आदी बाबींमध्ये न्यायालयीन हस्तक्षेप रोखून आयोगाच्या निर्णयांना प्राधान्य दिलेले दिसून येते.

भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्तेला पुष्टी / बळ देणारे न्यायालयीन निवाडे:

सर्वोच्च न्यायालयातील काही प्रमुख न्यायालयीन खटल्यातील निवाड्यानी भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेला कायदेशीर बळ दिलेले आहे, यामध्ये –

1) एन.पी. पोन्नू स्वामी विरुद्ध रिटर्निंग ऑफिसर, नमक्कल मतदारसंघ (1952),

2) Mohinder Singh Gill V/s CEC (1978); या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या कलम - 324 अंतर्गत प्रशासकीय क्षमतेवर न्यायालयाने भर दिला.आणि आयोगाच्या व्यापक अधिकारांची पुष्टी केली.

3) लक्ष्मीचरण सेन विरुद्ध एकेएम हसन उज्जमान (1985) -या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचे आदेश उच्च न्यायालय देत आहेत याची अयोग्यता अधोरेखित केली.

4) S.S. Dhanoa V/s.Union of India (1991); या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्तांना (CEC) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशासमान घटनात्मक संरक्षणाचा दर्जा दिला.

5) दिग्विजय मोटे विरुद्ध भारतीय संघ (1993).

6) T.N. Seshan V/s. Union of India (1995); या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेची पूर्नस्थापना केली,

7) अनुग्रह नारायण सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य (1996).

8) सी. सुब्रमण्यम विरुद्ध के. रमणजनेयुल्लू (1998)

9) भारतीय निवडणूक आयोग विरुद्ध अशोक कुमार खटला - (2000): 30 ऑगस्ट 2000 रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाडयात मतदान मोजणी प्रक्रिया निश्चित करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार कायम ठेवला.

10) PUCL V/s. Union of India. (2013); या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने NOTA (None of the Above) नियम लागू करून भारतीय निवडणूक आयोगाचा (ECI) पारदर्शकता - वर्धक दृष्टिकोन अधोरेखित केला. NOTA च्या अधिकारामुळे आयोगाच्या पारदर्शकतेला चालना दिली.

11) **अनुप बरनवाल विरुद्ध भारत सरकार खटला (2023)**: या खटल्याच्या न्यायनिवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाची स्वायत्तता व निष्पक्षपातीपणा अबाधित ठेवणारा निर्णय दिला.

वरीलप्रमाणे उपस्थित झालेल्या खटल्यातील न्यायनिवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वाच्या निर्णयामुळे निवडणूक आयोगाच्या स्वायत्तेला पुष्टी (बळ) मिळाली आहे.

अनुप बरनवाल विरुद्ध भारत सरकार खटला (2023) आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती:

भारतीय राज्यघटनेच्या कलम 324 (2) अन्वये संसदेने केलेल्या कायद्यानुसार मुख्य निर्वाचन आयुक्त व इतर आयुक्तांची राष्ट्रपतीद्वारे नेमणूक केली जाईल. 2023 पर्यंतच्या संसदीय कायद्यात आयुक्तांच्या सेवाशर्ती विषयी तरतुदी होत्या. मात्र नियुक्ती विषयी तरतुदींचा अभाव होता, त्यामुळे राष्ट्रपती म्हणजे केंद्रशासनाद्वारेच निर्वाचन आयुक्तांच्या नेमणुका केल्या जात होत्या.यापार्श्वभूमीवर 2015 मध्ये अनुप बरनवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून "न्यायालयाने निर्वाचन आयुक्तांच्या निवडीसाठी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

स्वतंत्र अशा मंडळाची स्थापना करण्यासाठी शासनास निर्देश द्यावेत " अशी विनंती केली.(जाधव ,शिरापूरकर,2024; पृष्ठ -493) सर्वोच्च न्यायालयाने या खटल्याचा न्यायनिवाडा 2 मार्च 2023 रोजी दिला, या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य (स्वायत्तता) आणि तटस्थता सुनिश्चित करण्यासाठी खालील निर्देश दिले. सर्व बाह्य राजकीय आणि कार्यकारी हस्तक्षेपापासून मुक्त ;

1) मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांची नियुक्ती - अ) पंतप्रधान, आ) लोकसभेतील विरोधी पक्षनेता (लोकसभेत विरोधी पक्ष नेता नसेल तर संख्याबळाच्या दृष्टीने सर्वात मोठ्या विरोधी पक्षाचा नेता), आणि ई) भारताचे सरन्यायाधीश अशा तीन सदस्य समितीच्या शिफारशीनुसार केली जाईल. 2) राज्यघटनेच्या कलम 324 अन्वये तरतूद केल्याप्रमाणे मुख्य निवडणूक आयुक्तांच्या शिफारशीच्या अधीन राहून इतर निवडणूक आयुक्तांना हटविण्याचे निकष मुख्य निवडणूक आयुक्ताप्रमाणेच म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून असणे पात्र आहे. 3) इतर निवडणूक आयुक्तांच्या सेवेच्या अटी नियुक्तीनंतर त्यांना गैरसोयीच्या होतील अशा पद्धतीने बदलता येणार नाहीत. (एम.लक्ष्मीकांत, 2024; पृष्ठ - 427, 428) सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार जोपर्यंत संसद घटनेच्या कलम 324 च्या अनुषंगाने कायदा करत नाही, तोपर्यंत वरील निर्देश लागू राहतील. हा अनुप बरनवाल प्रकरणात न्यायालयाने आयोगाच्या स्वायत्ततेच्या अनुषंगाने दिलेल्या निकालाचा अन्वयार्थ आहे.

मुख्य आणि इतर निर्वाचन आयुक्त (नेमणूक, पदाच्या स्थिती आणि अटी) कायदा -2023 :

वरीलप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने अनुप बरनवाल विरुद्ध भारत सरकार खटल्यात दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर भारतीय संसदेने (भारत सरकारने) पुढील कायदा केला.

मुख्य व इतर निर्वाचन आयुक्त (नेमणूक, पदाच्या स्थिती आणि अटी) कायदा -2023:

संसदेच्या राज्यसभा (12 डिसें.) व लोकसभा(21 डिसेंबर) या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक पारित केल्यानंतर भारताच्या राष्ट्रपतींनी 28 डिसेंबर 2023 रोजी या विधेयकावर स्वाक्षरी केली व या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. आणि 2 जानेवारी 2024 पासून हा कायदा प्रत्यक्षात लागू झाला.(https://en.wikipedia.org) या भारत सरकारच्या कायद्यानुसार निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेता आणि पंतप्रधानाद्वारे नियुक्त एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री यांचा समावेश असलेली एक निवड समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली.(जाधव, शिरापूरकर ,2024; पृष्ठ -493) या कायद्यातील तरतुदीवरुन हे स्पष्ट होते की ,सर्वोच्च न्यायालयाने अनुप बरनवाल विरुद्ध भारत सरकार खटला -2023 या खटल्याच्या न्यायनिवाड्यात निश्चित केलेल्या निवड समितीतील सरन्यायाधीशांच्या सहभागाच्या तरतुदीस रद्द केलेले आहे. परिणामी निर्वाचन आयुक्तांच्या निवडीत केंद्र शासनाचाच निर्णायक अधिकार राहणार हे निश्चित आहे. यामुळे आयोगाची स्वायत्तता, निष्पक्षता धोक्यात आल्याचा आरोप होत आहे. एकंदरीत , निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांची आणि इतर आयुक्तांची नियुक्तीची प्रक्रिया पूर्णतः कार्यकारीसत्तेच्या अधीन असल्यामुळे निवडणूक आयोगाची स्वायत्तता अधोरेखित होऊ शकते का ? असा प्रश्न निर्माण होतो. यामुळे निवडणूक आयोगाच्या अधिकार व कार्यात कार्यपालिकेचे नियंत्रण वां हस्तक्षेप वाढण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

II) भारतीय निवडणूक आयोगाचे उत्तरदायित्व (Accountability):

भारता सारख्या लोकशाही व्यवस्थेत निवडणूक आयोगावर स्वायत्ततेसह उत्तरदायित्वाची जबाबदारी असते. या उत्तरदायित्वाच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाला विविध स्वरूपाची प्रमुख कार्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात त्याची चर्चा पुढीलप्रमाणे-

1) **निवडणुकांचे पर्यवेक्षण व व्यवस्थापनाचे कार्य / जबाबदारी :**

हे निवडणूक आयोगाचे प्रमुख कार्य अथवा उत्तरदायित्व वा जबाबदारी मानली जाते.भारतात संरचित प्रक्रियेद्वारे निवडणुकांच्या पर्यवेक्षणाची (देखरेख व नियंत्रण) वा व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी केवळ निवडणूक आयोगाकडे आहे. भारतीय संविधानाच्या कलम - 82 नुसार प्रत्येक जनगणनेनंतर म्हणजे 10 वर्षांनी मतदार संघाचे परिसिमन (मतदारसंघ पुनर्रचना) करणे ,पात्र मतदारांच्या नावांची मतदार यादी तयार करणे, निवडणुकीची अधिसूचना आणि निवडणूक निर्णय अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे ,सार्वत्रिक निवडणुकांचे आयोजन करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असून सर्व घटनात्मक व विधिवत तरतुदींना विचारत घेऊन आयोगाद्वारे निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले जाते.निवडणुकांची घोषणा झालेल्या दिवसापासून प्रारूप (निवडणूक) आचारसंहिता(Model Code of Counduct -MCC) लागू करणे व त्यावर देखरेख ठेवणे. निवडणूक वेळापत्रकानुसार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

उमेदवारी अर्ज दाखल करणे, उमेदवारी अर्ज छाननी करणे ,उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची तारीख, वेळ ठरविणे , पक्ष चिन्हांचे वाटप करणे, (राष्ट्रीय ,प्रादेशिक पक्ष व अपक्ष उमेदवारांना पक्ष चिन्हांचे वाटप),मतदारांना स्पष्टता यावी यासाठी राजकीय पक्षांची ओळख व प्रतिकांचे वाटप करणे, मान्यता प्राप्त राजकीय पक्षांना निवडणुका बाबतचे आपले निवेदन करण्यासाठी आकाशवाणी आणि दूरदर्शनवर निश्चित असा कालावधी देणे. प्रत्यक्ष मतदानाचा ,मतमोजणी व निकाल याबाबतच्या तारखा,दिवस व वेळ निश्चित करणे.निवडणूक प्रचार योग्य पद्धतीने व्हावा आणि मतदारांना भयमुक्त वातावरणात मतदान करता यावे याची हमी देण्यासाठी निवडणूक आयोग विविध प्रकारच्या निरीक्षकांची (Observes) नियुक्ती करतो .निवडणूक खर्च निरीक्षक निवडणुकीतील पक्ष व उमेदवार यांच्या खर्चावर मर्यादा घालतो. मतदानापूर्वी व नंतर मतपेट्या सुरक्षित ठेवणे.प्रत्यक्ष मतदान व प्रत्यक्ष मतमोजणी आणि निकाल घोषित करणे. (जाधव ,शिरापूरकर ,2024; पृष्ठ - 488, 489)ही वरील सर्व निवडणूक प्रक्रिया संबंधित प्रमुख कार्य अथवा जबाबदारी पार पाडणे हे भारतीय निवडणूक आयोगाचे उत्तरदायित्व मानले जाते.

2) निवडणूक आयोगाकडून लोकशाहीतील मूलभूत अपेक्षा:

लोकशाही व्यवस्थेत निवडणूक आयोगाच्या उत्तरदायित्व बाबत मूलभूत अपेक्षा व्यक्त केली जाते. निवडणूक आयोगावर स्वायत्ततेसह उत्तरदायित्वाचीही जबाबदारी आहे. निवडणूक आयोगाने सार्वत्रिक निवडणुकांची प्रक्रिया स्वच्छ, पारदर्शक व तटस्थपणे आणि निष्पक्षपातीपणे राबविणे, निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करवून घेणे आणि सर्व पक्षांना समान वागणूक देणे हे लोकशाही व्यवस्थेत निवडणूक आयोगाकडून जनतेला अपेक्षित असते.निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयाबद्दल स्पष्टीकरण द्यावे लागते आणि ते न्यायालयीन परीक्षणास देखील पात्र ठरतात .उदा.बिहारमध्ये ऑक्टों./ नोव्हों -2025 मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने मतदार याद्याचे पुनर्निरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू केली.त्यावेळी आयोगाने मतदार यादीत नाव नोंदणीसाठी भारतीय नागरिक असणाऱ्यांचीच नाव नोंदणी मतदार यादीत करण्यासाठी जे नियम व पात्रता, अटी लावल्या होत्या, त्या नियम व अटी पूर्ण न करणाऱ्या हजारो नागरिकांच्या नोंदी मतदार यादीत न झाल्याने आयोगाच्या या निर्णयाविरुद्ध नागरिकांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये दाद मागितली. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने मतदार यादीत पात्र नागरिकांच्या नाव नोंदीसाठी निवडणूक आयोगाने तयार केलेल्या पात्रता,नियम व अटीमध्ये काही बदल सुचवून पुन्हा मतदार नाव नोंदणी यादी तयार करण्याचे आदेश(ऑगस्ट 2025) आयोगाला दिले. त्यानुसार आयोगाने नव्याने मतदार यादी पुनर्निरीक्षण प्रक्रिया राबविली व पात्र नागरिकांच्या नोंदी मतदार यादीत समाविष्ट केल्या. त्या अनुषंगाने आपली जबाबदारी व उत्तरदायित्व योग्यरीत्या आयोगाने निभावलेले दिसून येते.

3) मतदार जागरूकता आणि सार्वजनिक सहभाग वाढीवर भर देणे:

भारतात राजकीय लोकशाही अधिकाधिक सशक्त करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेमध्ये सार्वजनिक सहभाग जास्तीत जास्त कसा वाढेल यावर भर देणे.यामध्ये SVEEP,CVIGIL,VVPAT,NERPAP यासारखे प्रकल्प प्रभावीपणे राबविणे. या माध्यमातून मतदारांनमध्ये आपल्या राजकीय हक्कांबाबत जागरूकता निर्माण करणे. आणि जास्तीत जास्त नागरिकांना मतदानाच्या प्रक्रियेत समाविष्ट करून घेणे ही निवडणूक आयोगाची महत्त्वाची जबाबदारी अथवा उत्तरदायित्व ठरते.

4) तांत्रिक व प्रशासकीय उपायोजना:

निवडणूक प्रक्रियेसंबंधी तांत्रिक व प्रशासकीय उपायोजना करणे ही निवडणूक आयोगाची प्रमुख जबाबदारी व उत्तरदायित्व असते. भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे EVM (Electronic Voting Machine)आणि VVPAT (Voter Verifiable Paper Audit Trail)यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून निवडणूक प्रक्रिया जलद व पारदर्शक बनवण्याचा प्रयत्न झाला आहे. निवडणूक सुधारणांना गती देणारे एक साधन म्हणून EVM व VVPAT कडे पाहिले जाते. पूर्वीच्या वेळखाऊ पारंपारिक मतदान व्यवस्थेत वापरल्या जाणाऱ्या मतपत्रिका आणि मतपेट्या यांच्या ऐवजी मतांची नोंद व पडताळणी करण्यासाठी EVM व VVPAT चा वापर केला जात असल्याने मतदान करणे व मतमोजणी करणे ही प्रक्रिया जलद व पारदर्शक बनली आहे. परिणामी EVMआणि VVPAT या तंत्रज्ञानामुळे मतदान प्रक्रियेत सुरक्षितता आणि पारदर्शकता वाढीस लागते याबाबतची जाणीवजागृती मतदार व राजकीय पक्षांमध्ये करण्याची जबाबदारी , उत्तरदायित्व निवडणूक आयोगाचे असते. यामुळे मतदारांमध्ये व राजकीय पक्षांमध्ये निवडणूक आयोगाच्या पारदर्शकता, निष्पक्षपातीपणा व तटस्थपणा यावरील विश्वास वाढण्यास मदत होईल. एकंदरीतच मतदारांमध्ये व राजकीय पक्षांमध्ये निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास अधिकाधिक वृदिगत होण्यास मदत होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

5) मतदार यादीतील शुध्दीकरण (NERPAP):

मतदार याद्यांचे वेळोवेळी शुद्धीकरण (NERPAP) करणे ही भारतीय निवडणूक आयोगाची जबाबदारी अथवा उत्तरदायित्व ठरते. कलम-324(1),लोकप्रतिनिधित्व अधिनियम -1950, लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1951, मतदार नोंदणी नियम -1960, आणि निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचना व नियमांच्या आधारे मतदार याद्यांचे वेळोवेळी शुद्धीकरण करून दोष मुक्त, पात्र मतदारांच्या मतदार याद्या पारदर्शक , निष्पक्षपातीपणे तटस्थपद्धतीने तयार करण्याची जबाबदारी व उत्तरदायित्व हे निवडणूक आयोगाचे असते.

6) निवडणूक अभियान, प्रशिक्षण, सुरक्षितता:

लोकशाही प्रक्रियेची अखंडता कायम राखण्यासाठी वेळोवेळी निवडणूक अभियान(Election Campaign) राबवणे हे निवडणूक आयोगाचे उत्तरदायित्व ठरते. निवडणूक आयोग वेळोवेळी विविध माध्यमातून निवडणूक अभियान (Election Campaign) राबविते जसे की,पात्र व अपात्र मतदारांची अद्यावत यादी तयार करणे, तसेच मतदान वाढीसाठी टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रे, मॅगझिन्स, होर्डिंगज आदी माध्यमातून जाहिरात करणे.याशिवाय सोशल मीडिया (फेसबुक ,ट्विटर/X, इन्स्टाग्राम ,युट्युब) आयोगाची वेबसाईट , व्हॉटसॲप ग्रुप आदी माध्यमातून डिजिटल प्रचार करणे इत्यादी. मतदारांना EVM, VVPAT मशीन हाताळण्याची माहिती व प्रशिक्षण देणे. याशिवाय निवडणूक कामी आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे ,मतदान केंद्र ,मतदान साहित्य ,मतदान निकाल यांची सुरक्षितता यावर लक्ष देणे.निवडणूक प्रक्रिया योग्यरीत्या पार पाडण्यासाठी विविध निवडणूक अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे नियोजन करणे. निवडणुक साहित्याच्या सुरक्षेची व्यवस्था करणे इत्यादी जबाबदारी निवडणूक आयोगाला पार पाडावी लागते. ते आयोगाचे उत्तरदायित्व आहे.

III) **निवडणूक आयोगाचा प्रत्यक्ष व्यवहार व आजचे वास्तव:**

भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1950 रोजी झाली. तर भारतीय संविधानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी 26 जानेवारी 1950 पासून सुरू झाली.त्याला यावर्षी 75 वर्षे पूर्ण होत आहेत. या अनुषंगाने भारतीय निवडणूक आयोगाचे व भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाच्या गेल्या 75 वर्षातील कार्याचे तटस्थपणे मूल्यामापन करणे आवश्यक ठरते.

अ) निवडणूक आयोगाची सकारात्मक बाजू :

1) विविध आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करत निवडणुकांचे आयोजन:

भारतीय निवडणूक आयोगाने सन -1951-52 च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकी पासून ते आजपर्यंतच्या केंद्र व राज्य पातळीवरील सर्व निवडणुकांचे भारतीय परिस्थितीतील विविध आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करत यशस्वी आयोजन केले आहे. दिवसेंदिवस निवडणुकीत मतदानाची टक्केवारीही वाढताना दिसत आहे .आज दलित, कनिष्ठ जाती,अल्पसंख्यांक समूह आणि सीमांत सामाजिक गट यांच्यात मतदानाचे प्रमाण वाढण्यामागे जी अनेक कारणे आहेत ,त्यातील एक महत्त्वाचे कारण म्हणजे मतदान केंद्रावरची कमालीची सुधारलेली सुरक्षा व्यवस्था हे आहे. उच्च जातीयांनी निम्न जातीयांवर निवडणुकांच्या वेळी गाजवलेली धाकदपटशा पूर्वी होता आणि आजही थोडाफार आहे.पण निवडणूक आयोगाने केलेल्या विविध कायदेशीर उपाययोजनांमुळे पूर्वीपेक्षा बऱ्याच प्रमाणात कमी झाला आहे. 1990 च्या दशकात व त्यानंतरच्या काळात निवडणूक आयोगाने स्वीकारलेल्या विविध सुधारणामुळे हा बदल झालेला आहे. (जाधव, शिरापूरकर, 2024; पृष्ठ 496) थोडक्यात, निवडणूक आयोगाने भारतातील विविध आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब करून विविध कायदेशीर सुधारणा व उपाययोजना केल्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढवून लोकशाहीची प्रक्रिया अधिक सशक्त व गतिमान होण्यास मदत झाली.

2) प्रातिनिधिक लोकशाहीच्या औपचारिक चौकटीला बळकटी:

सार्वत्रिक निवडणुकांचे पर्यवेक्षण करणाऱ्या निवडणूक आयोगाने प्रातिनिधिक शासन आणि सहभागी लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या औपचारिक चौकटीत स्थैर्य बहाल करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. विशेषतः टी.एन.शेषन मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यानंतर प्रारूप आचारसंहिते संदर्भातील जे उपाय अमलात आले त्यामुळे निवडणूक आयोगाचे स्थान व महत्त्व प्रकाश झोतात आले. टी. एन. शेषन यांच्यानंतरच्या अनेक आयुक्तांनी या प्रक्रियेस चालना दिली .भारतीय राजकीय प्रक्रियेचे सुप्रसिद्ध अभ्यासक रुडॉल्फ आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

रुडॉल्फ यांच्या मते,1990 च्या दशकात जेव्हा निवडणूक प्रक्रियेस गुन्हेगारीकरण, हिंसाचार आणि भ्रष्टाचार, बंदूक खांद्यावर बाळगणाऱ्या उमेदवारांच्या दूरदर्शनवरील मुलाखती अशी भीषण गंडांतरे भेडसावत होती, अशावेळी मुक्त आणि न्याय्य निवडणुका चालू ठेवणारी एक राष्ट्रीय महाशक्ती म्हणून निर्वाचन आयोगाला महत्त्व प्राप्त झाले. तसेच ' सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज ' या दिल्लीच्या संस्थेने 1996 साली केलेल्या एका सर्वेक्षणाचा निष्कर्ष असा होता की, भारतातील कोणत्याही राजकीय संस्थेपेक्षा निवडणूक आयोगावर लोकांचा अधिक विश्वास आहे . आयोगाने राजकारणी,सरकारी अधिकारी व पोलिसांचा भ्रष्टाचार आणि बेकायदेशीर वर्तन उघड्यावर आणल्याबद्दल शहरी मध्यमवर्गाचा आयोगाला मोठा पाठिंबा प्राप्त झाला. निवडणूक आयोगाने बजावलेल्या सक्रिय भूमिकेमुळेच हे शक्य झाले. (जाधव, शिरापूरकर; 2024 पृष्ठ. 497) एकंदरीत, भारतीय निवडणूक आयोग वेळोवेळी करत असलेल्या सकारात्मक व प्रभावी निवडणूक सुधारणामुळे भारताच्या प्रातिनिधिक लोकशाहीच्या औपचारिक चौकटीस बळकटी मिळण्यास मदत होत आहे.

3) प्रारूप निवडणूक आचारसंहितेची अंमलबजावणी:

भारतीय निवडणूक आयोगाने 1996 पासून राजकीय पक्षांना आचारसंहिता आचरणात आणणे भाग पाडले. आचारसंहितेत सर्वसाधारण वर्तणूक, बैठका ,मिरवणुका, मतदानाचा दिवस, मतदान केंद्रे, निरीक्षक आणि सत्तारूढ पक्षांसाठी नियमावली याबाबी संबंधी आचरणाचे नियम नमूद केले आहेत.

प्रारूप आचारसंहितेला कायद्याचे अधिबलन(पाटबळ) नाही. तथापि, या संहितेतील काही तरतुदींची अंमलबजावणी भारतीय दंड संहिता(1960), फौजदारी कायदेप्रक्रिया संहिता (1973)आणि लोकप्रतिनिधी कायदा (1951) यासारख्या अन्य कायद्यांद्वारे वा कायद्यांतर्गत करता येऊ शकते. (जाधव, शिरापूरकर; 2024; पृष्ठ -497) वरील कायद्याच्या साह्याने निवडणूक आयोग प्रारूप आचारसंहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी करून निवडणुक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडताना दिसून येत आहे.

4) राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि भ्रष्टाचारावर अंकुश:

भारतीय निवडणूक आयोगाने 1997 साली एका आदेशाद्वारे राजकारणातील गुन्हेगारीकरणास प्रतिबंध घालण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले, ज्याअंतर्गत सिद्धपराध व्यक्तींना - जरी त्यांचे अपील वरिष्ठ न्यायालयापुढे प्रलंबित असले तरी -त्यांचा अपराध सिद्ध झालेल्या दिवसापासून निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवले.पुढे 2002 साली आणखी एका आदेशाद्वारे प्रत्येक उमेदवाराने निवडणूक अर्ज भरताना शपथेवर काही माहिती देणे बंधनकारक केले. अ) उमेदवाराला एखाद्या गुन्ह्यासाठी शिक्षा झाली आहे काय ? असल्यास शिक्षेचे स्वरूप काय आहे ? अर्ज भरण्यापूर्वी सहा महिन्यांच्या काळात दोन किंवा त्याहून अधिक वर्षे शिक्षा होऊ शकेल अशा गुन्ह्याचा आरोप ठेवला आहे काय ? अथवा न्यायालयाने त्याची दखल घेतली आहे काय? ब)उमेदवाराने आपला पती/पत्नी तसेच त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबीयांच्या नावे असलेली स्थावर व जंगम मालमत्ता तसेच त्यांच्या बँक खात्यांचा तपशील .क)उमेदवारांच्या उत्पन्नाची साधने ड) उमेदवाराचे वित्तीयदायित्व, विशेषत: सार्वजनिक वित्तीय वा सरकारी संस्थांची देणे. ई)उमेदवाराची शैक्षणिक पात्रता इत्यादी.(जाधव, शिरापूरकर; 2024, पृष्ठ - 497) वरीलप्रमाणे निवडणूक आयोगाने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी केलेल्या प्रभावी उपाययोजनामुळे राजकारणातील गुन्हेगारीकरणास प्रतिबंध बसण्यास आणि भ्रष्टाचारावर अंकुश लावण्यास काही प्रमाणात मदत झाल्याचे दिसून येत आहे.

5) EVM व VVPAT तंत्रज्ञानामुळे मतदान प्रक्रियेत सुरक्षितता व पारदर्शकता:

पूर्वीच्या पारंपरिक वेळखाऊ मतदान व्यवस्थेत वापरल्या जाणाऱ्या मतपत्रिका आणि मतपेट्या यांच्य ऐवजी मतांची नोंद करण्यासाठी EVM (Electronic Voting Machine) या विद्युत उपकरणाचा वापर केला जातो.त्याचे काही फायदे आहेत जसे की, 1)अवैद्य आणि संदिग्ध मतांच्या शक्यतेचे उच्चाटन झाले, 2)मतमोजणीची प्रक्रिया अधिक जलद झाली .3) मतपत्रिकांसाठी वापरण्यात येणाऱ्या कागदांचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे ही प्रक्रिया पर्यावरणाभिमुख ठरते. 4) आता एका मतदान केंद्रासाठी एकाच मतपत्रिकेची आवश्यकता असल्याने छपाईचा खर्च नगण्य झाला. (जाधव,शिरापूरकर ; 2024 , पृष्ठ- 503) तर VVPAT (Voter Verifiable Paper Audit Trial) या तंत्र साधनाच्या माध्यमातून मतदाराने टाकलेल्या मताची पडताळणी करता येते. यामुळे मतदाराला आपण कोणास मतदान केले याची खात्री पटते.एकंदर,भारतीय निवडणूक आयोगाद्वारे EVM व VVPAT यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून निवडणूक प्रक्रिया जलद व पारदर्शक बनवण्याचा प्रयत्न झाला आहे. या तंत्रज्ञानामुळे मतदान प्रक्रियेत सुरक्षितता, गतिमानता व पारदर्शकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

ब) निवडणूक आयोगाच्या स्वायत्तते समोरील आव्हाने: (Challenges Before Autonomy):

भारतीय निवडणूक आयोग हा भारतातील निवडणुकांच्या स्वच्छ ,पारदर्शक आणि मुक्त वातावरणात आयोजनासाठी जबाबदार असलेली एक स्वायत्त(Autonomous) घटनात्मक संस्था आहे .मात्र गेल्या काही वर्षांमध्ये आयोगाच्या स्वायत्ततेविषयी प्रश्न निर्माण झाले आहेत.भारतीय निवडणूक आयोगाचा गेल्या 75 वर्षातील प्रत्यक्ष व्यवहार व त्याची आजची वास्तव परिस्थिती पाहता निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर काही प्रश्नचिन्ह उपस्थित होताना दिसतात. त्याची चर्चा पुढीलप्रमाणे -

1) **नियुक्ती, कार्यकाळ व सेवाशर्ती बाबत अस्पष्टता:**

भारतीय संविधानाने निवडणूक आयोग स्वायत्त आणि निष्पक्षपाती असला पाहिजे याची खबरदारी घेतली असली तरी, त्या तरतुदीमध्ये काही त्रुटी आहेत :- i) राज्यघटनेने निवडणूक आयोग सदस्यांच्या (कायदेशीर, शैक्षणिक, प्रशासकीय किंवा न्यायिक) पात्रता निश्चित केलेल्या नाहीत. ii) राज्यघटनेने निवडणूक आयोग सदस्यांच्या मुदती (कार्यकाळ) निश्चित केलेल्या नाहीत. iii) राज्यघटनेने निवृत्त होणाऱ्या निवडणूक आयुक्ताला शासनाकडून होणाऱ्या अन्य कोणत्याही नेमणुकी करता अपात्र ठरवलेले नाही. (एम. लक्ष्मीकांत, 2024; पृष्ठ - 427) थोडक्यात, संविधानाने निवडणूक आयोगाच्या सदस्यांची पात्रता निश्चित केली नाही, तसेच त्यांचा कार्यकाळ अस्पष्ट आहे, याशिवाय आयुक्तांच्या सेवा निवृत्तीनंतर अन्य शासकीय, प्रशासकीय पदावर अथवा एखाद्या आयोगाचे सदस्य,अध्यक्ष म्हणून नियुक्तीची शक्यता अजूनही खुली आहे.परिणामी निवडणूक आयोगाचे सदस्य स्वायत्त आणि निष्पक्षपातीपणे आपली जबाबदारी व कर्तव्य पार पाडण्याची शक्यता दुसर दिसते. हे एक निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेसमोरील मोठे आव्हान आहे.

2) निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव:

राज्यघटनेच्या कलम- 324 (2) नुसार संसदेने केलेल्या कायद्यानुसार मुख्य निर्वाचन आयुक्त व इतर आयुक्तांची राष्ट्रपतीद्वारे नेमणूक केली जाईल. त्यामुळे राष्ट्रपती म्हणजे केंद्रशासनाद्वारेच (वास्तवात पंतप्रधानाद्वारेच) निर्वाचन आयुक्तांच्या नेमणुका केल्या जात आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रश्न निर्माण होतो.निवडणूक आयोगाची स्वायतता व निवडणूक आयुक्तांची नियुक्ती या अनुषंगाने 2015 मध्ये अनुप बरनवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. या याचिकेत न्यायालयाने निर्वाचन आयुक्तांच्या निवडीसाठी स्वतंत्र अशा मंडळाची स्थापना करण्यासाठी केंद्र शासनास निर्देश द्यावेत अशी विनंती केली. अनुप बरनवाल विरुद्ध केंद्रीय कायदा मंत्रालय आणि केंद्र सरकार खटला - 2023 .या खटल्याचा न्यायनिवाडा 2 मार्च 2023 रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिला. न्यायालयाने या खटल्याच्या न्यायनिवाड्यात स्पष्ट केले की ,मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांची नियुक्ती त्रिसदस्ययीय समितीच्या शिफारशीनुसार करावी.या समितीत पंतप्रधान ,लोकसभेतील विरोधी पक्षनेता (लोकसभेत विरोधी पक्ष नेता नसेल तर संख्याबळाच्या दृष्टीने सर्वात मोठ्या विरोधी पक्षाचा नेता) आणि भारताचे सरन्यायाधीश अशा तीन सदस्ययीय समितीद्वारे निर्वाचन आयुक्तांची निवड व्हावी, अशा निवाडा दिला.(जाधव, शिरापूरकर 2024 पृष्ठ - 493) सदर खटल्याच्या न्यायनिवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य (स्वायत्तता) आणि तटस्थता सुनिश्चित करण्यासाठी वरील निर्देश दिले,त्याचबरोबर सर्व बाह्य राजकीय आणि कार्यकारी हस्तक्षेपापासून निवडणूक आयोग मुक्त राहावा हाही या न्यायनिवाड्या मागचा प्रमुख उद्देश होता.

मात्र केंद्रशासनाने "मुख्य आणि इतर निर्वाचन आयुक्त (नेमणूक, पदाच्या स्थिती आणि अटी) विधेयक - 2023 " हे विधेयक संसदेच्या राज्यसभा (12 डिसेंबर) व लोकसभा (21डिसेंबर) या दोन्ही सभागृहांनी पारित केले. त्यानंतर राष्ट्रपतींनी 28 डिसेंबर 2023 रोजी या विधेयकावर स्वाक्षरी केली व त्याचे कायद्यात रूपांतर झाले आणि 2 जानेवारी 2024 पासून या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्यात निर्वाचन आयुक्तांच्या निवडीसाठी तीन सदस्ययीय समितीची तरतूद केलेली आहे. त्यानुसार निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी पंतप्रधान,लोकसभेतील विरोधी पक्षनेता आणि पंतप्रधानाद्वारे नियुक्त एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री यांचा समावेश असलेली एक निवड समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. (https://en.wikipedia.org) या कायद्यातील तरतुदी वरून हे स्पष्ट होते की, सर्वोच्च न्यायालयाने अनुप बरनवाल विरुद्ध भारत सरकार या खटल्याच्या न्यायनिवाड्यात निश्चित केलेल्या निवड समितीतील सरन्यायाधीशांच्या सहभागाच्या तरतुदीस रद्द केलेले आहे. परिणामी निर्वाचन आयुक्तांच्या निवडीत केंद्र शासनाचाच निर्णयक अधिकार राहणार हे सुस्पष्ट आहे. यामुळे राजकीय हस्तक्षेपाची शक्यता वाढते.परिणामी निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेवर ,स्वायत्तता व निष्पक्षपतीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.एकंदरीत,निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांची आणि इतर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

आयुक्तांची नियुक्तीची प्रक्रिया पूर्णतः कार्यकारी सत्तेच्या आधीन असल्यामुळे निवडणूक आयोगाची स्वायत्तता अधोरेखित होऊ शकते का? असा प्रश्न निर्माण होतो. यामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यात कार्यपालिकेचे नियंत्रण, हस्तक्षेप वाढण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

3) प्रारूप आचारसंहितेचं (Model Code of Counduct) उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यावर मर्यादा:

प्रारूप आचारसंहिता म्हणजे मुक्त आणि न्याय्य निवडणुकांची हमी देण्यासाठी निवडणूक आयोगाद्वारे जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा असा संच, ज्याद्वारे निवडणुकीच्या काळातील (निवडणुकांची घोषणा ते निवडणुकांचा निकाल) राजकीय पक्ष आणि उमेदवारांचे वर्तन नियंत्रित केले जाते.आयोगद्वारे निवडणुकांची घोषणा झालेल्या दिवसापासून प्रारूप आचारसंहिता लागू होते. प्रारूप आचारसंहितेत सर्वसाधारण वर्तन - व्यवहार, बैठका, निवडणूक प्रचार फेरी, मतदानाचा दिवस, मतदान केंद्र ,निरीक्षक, सत्ताधारी पक्ष आणि निवडणूक जाहीरनामा अशा 8 घटकासंबंधी मार्गदर्शक तत्वे समाविष्ट केलेली आहेत. अर्थात, प्रारूप आचारसंहिता म्हणजेच निवडणूक आचारसंहिता ही कायद्याने बंधनकारक अशी बाब नाही.(जाधव ,शिरापूरकर; 2024 पृष्ठ - 488) म्हणजेच निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या काळात लागू केलेल्या प्रारूप आचारसंहितेचे सत्ताधारी पक्ष, विरोधी पक्ष आदींकडून उल्लंघन झाल्यास त्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यास पूर्णपणे अधिकार व स्वायत्तता निवडणूक आयोगाला नाही. म्हणजेच Model Code of Counduct ला कायदेशीर पाठबळ नाही. त्यामुळे त्याच्या उल्लंघनावर कठोर कारवाई करण्यास निवडणूक आयोगावर मर्यादा पडताना आज दिसून येत आहे.

4) आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे स्वायत्तता नाही (आर्थिक अवलंबित्व):

संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या, राज्य विधिमंडळाच्या व केंद्रशासित प्रदेशांच्या निवडणूक आयोजनांसाठी येणाऱ्या खर्चासंबंधी स्वतंत्र अशी आर्थिक तरतूद नाही. म्हणजेच निवडणूक आयोजनाचा मुख्य खर्च संबंधित घटक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाच्या अर्थसंकल्पांमध्ये प्रतिबिंबित होतो. लोकसभेच्या निवडणुकांसाठी येणारा खर्च पूर्णपणे केंद्र सरकार करते तर राज्य विधानसभेसाठी होणाऱ्या निवडणुकांचा खर्च पूर्णपणे संबंधित राज्य सरकार करते. मात्र एकाच वेळी लोकसभा व राज्य विधिमंडळासाठी निवडणूक होणार असेल तर केंद्र आणि इतर घटक राज्यांमध्ये खर्चाची समान विभागणी करण्यात येते.(जाधव, शिरापूरकर ;2024, पृष्ठ - 498) याचाच अर्थ संसदेची दोन्ही सभागृहे ,राज्य विधिमंडळ ,केंद्रशासित प्रदेशांच्या निवडणुकांचे आयोजन करण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी स्वतंत्र अशी अर्थसंकल्पीय तरतूद केलेली दिसत नाही. परिणामी निवडणूक आयोगाकडे आर्थिक दृष्ट्या सक्षमता व स्वायत्तता नसल्याचे दिसून येते .घटक राज्य पातळीवरही अनेक राज्यनिवडणूक आयुक्तांना आर्थिक -प्रशासकीय स्वायत्तता नाही. उदा. पश्चिम बंगालमध्ये राज्य, निवडणूक आयुक्ताला (CEO) आर्थिक - प्रशासकीय स्वायत्तता नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाचे कार्य प्रभावीपणे होताना दिसत नाही. एकंदरीत वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, निवडणूक आयोगाला निवडणूक खर्चाच्या संबंधित आर्थिक स्वायत्तता कमी असल्याचे दिसून येते. निवडणुका संबंधी करण्यात येणारा खर्च सरकारच्या बजेटवर अवलंबून असतो.आज Consolidated Fund of India (संचित निधी -यामध्ये केंद्र- राज्य सरकारे निधी जमा करतात) मधून निवडणूक खर्च करण्यात येतो. वर्तमानात निवडणुका संबंधी खर्च करण्याच्या बाबतीत निवडणूक आयोगाला पूर्ण स्वातंत्र्य नसल्याचे दिसून येते. याचे मुख्य कारण वित्तीय अवलंबित्व हे आहे.

5) निवडणूक प्रक्रियेतील अनिष्ट बाबींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात आयोग अपयशी:

निवडणूक काळात सोशल मीडियाचा मतदारावर प्रभाव पाडण्यास होणारा गैरवापर, निवडणुकात उमेदवाराकडून मतदारांना प्रलोभन दाखवण्यासाठी पैशांचा होणारा प्रचंड वापर,तंत्रज्ञानाच्या साह्याने बनावट प्रचार व फेक न्युजच्या माध्यमातून विरोधी उमेदवाराच्या विरुद्ध चुकीचा खालच्या पातळीवर जाऊन होणारा प्रचार, यासारख्या निवडणूक काळात होणाऱ्या अपप्रचारावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात निवडणूक आयोग अपुरा पडत आहे. अशी टीका निवडणूक आयोगावर होताना दिसत आहे. त्यासाठी आवश्यक कायदेशीर अधिकार निवडणूक आयोगाला दिलेले नाहीत. त्यामुळे निवडणूक आयोगाला प्रभावीपणे कार्यवाही करता येत नाही.त्यामुळे त्याच्या स्वायत्ततेवर आज प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे .हे आजचे वास्तव आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

6) निवडणुका आयोगाचे पक्षपातीवर्तन:

गेल्या काही वर्षापासून निवडणूक आयोगावर काही वेळा पक्षपाती वर्तन केल्याचे आरोप झाले आहेत. निवडणूक आयोगावर प्रारूप आचारसंहितेचे पालन पक्षपातीपणे व भेदभावाने केल्याचे आरोप होत आहेत.उदा. निवडणुकीच्या काळात आचारसंहिता लागू झाल्यावर एक तर सत्ताधारी पक्ष्यांच्या नेत्यांवर आचारसंहितेचे उल्लंघन केले तरी कारवाई होत नाही. अथवा सत्ताधारी पक्षाकडून, नेत्यांकडून आचारसंहितेचे उल्लंघन झाले तरी आयोगाची कारवाई सौम्य स्वरूपात मंदगतीने किंवा उशिराने होते. तर विरोधी पक्षाच्या नेत्यांवर, उमेदवारांवर तात्काळ व कठोर स्वरूपाची कारवाई होते. याशिवाय निवडणूक आयोगाचे काही निर्णय पक्षपाती असल्याचा आरोप होत आहे.उदा. प्रचार बंदीचे वेळ सत्ताधारी पक्षासाठी अधिक व विरोधी पक्षाला कमी देणे .तसेच सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून धार्मिक व जातीय तेढ,द्वेष पसरविणाऱ्या भाषणावर कठोर कार्यवाही न करणे. याउलट विरोधी पक्षाच्या नेत्यांवर तत्काळ व कठोर कार्यवाही करणे.सन. 2014 ते 19 च्या काळात प्रारूप आचारसंहितेच्या असा उल्लंघनावर आयोगाची प्रतिक्रिया सत्ताधारी पक्षाच्या बाबतीत संथ आणि विरोधी पक्षाच्या बाबतीत तीव्र होती, अशी चिंताजनकधारणा जनमानसामध्ये निर्माण झाली आहे.2014 मध्ये मुख्य निवडणूक आयुक्त व्ही. एस. संपथ यांनी कलम 324 अंतर्गत एका दिशानिर्देशाद्वारे Transparency Normलागू केले. पण त्यावर नकारात्मक राजकीय प्रतिक्रिया आली.परिणामी निवडणूक आयोगाचे वर्तन भेदभावाचे व पक्षपाती असल्याचा आरोप होत आहे. हे निवडणूक आयोगाच्या स्वायत्तते समोर आव्हान आहे. हे एक आजचे वास्तव आहे.

7) मतदार यादीतील दोष: (अस्पष्ट कार्यपद्धती आणि माहितीचा अभाव):

मतदार यादी मध्ये मतदारांची दुहेरी नोंदी असणे, तर काही मतदारांच्या नोंदी मतदार यादीमध्ये समाविष्ट नसणे, मृत मतदारांची नोंद मतदार यादीत कायम असणे.मतदाराविषयी अपूर्ण, अस्पष्ट व संदर्भहीन माहिती मतदार यादी मध्ये असणे. आयोगाच्या कार्यप्रणालीमध्ये गुप्तता आणि पक्षपाताची आशंका काही निर्णययातून दिसते. उदा. सार्वत्रिक लोकसभा निवडणूक - 2024, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ऑक्टों -2024 मध्ये वापरण्यात आलेल्या मतदार याद्या मध्ये राजकीय दबावाला बळी पडून मतदारांच्या दुहेरी नोंदी व बोगस मतदार नोंदणी आयोगाने करून सत्ताधारी पक्षाला लाभ होईल असे निर्णय घेतल्याचा आरोप आज लोकसभेतील व राज्यविधानसभा मधील विरोधी पक्ष नेत्यांकडून होत असल्याचे दिसून येत आहे. एकंदरीत आज आयोगाच्या कार्यपद्धतीचा निवडणूक मतदार यादी पासून बहुतेक कामी अस्पष्ट व खराब दर्जा असून समाजातील असुरक्षित गट (उदा. गरीब,स्थलांतरित कामगार, दलित ,आदिवासी, तृतीयपंथी, अल्पसंख्यांक समूह इत्यादी) मतदार सुचीच्या बाहेर राहतात याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे.यामुळे आज निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर , उत्तरदायित्वावर, वैद्यतेवर, निष्पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

8) लोकांचा विश्वास कमी होणे:

आज भारतीय जनमानसामध्ये निवडणूक आयोग हा सत्ताधारी पक्षाच्या दबावाला व हस्तक्षेपला बळी पडून चुकीचे निर्णय घेत असल्याची भावना वाढीस लागली आहे. परिणामी निवडणूक आयोगावरील जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे दिसून येत आहे. निवडणूक आयोग आपली घटनात्मक स्वायत्तता अबाधित ठेवून आपले उत्तरदायित्व योग्यरीत्या निभावत नसल्याची भावना जनमानसामध्ये वाढीस लागली आहे.

लोकसंख्याशास्त्रीय सर्वेक्षणानुसार 2019 नंतर लोकांचा निवडणूक आयोगावरचा विश्वास घाटला आहे.निवडणूक आयोगावर 2019 पर्यंत लोकांचा जास्त विश्वास होता. मात्र 2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर केवळ 25 % लोकांचाच निवडणुक आयोगावर विश्वास आहे . उर्वरित 75 % लोकांचा विश्वास कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे . आपली स्वायत्तता व अधिकार अबाधित ठेवून लोकांचा विश्वास पुन्हा संपादन करणे हे निवडणूक आयोगासमोरील आजचे मोठे आवाहन आहे.

9) अभियांत्रिकी व प्रत्यक्ष निरीक्षण:

निवडणुक आयोगाने EVM / VVPAT मधील LOT - based फेरवारी कमी करून त्यात विसंगती असल्यासही सविस्तर तपास करू नये असे धोरण ठेवले आहे. विशेषत: जिथे मतांमधील फरक जिंकण्याच्या मार्जिन पेक्षा कमी आहे तेथे तपास सुटल्याचे आरोप झाले आहेत . उदा. लोकसभा निवडणूक २०२४ कर्नाटकातील बंगरूळ मध्य मतदारसंघातील महादेवापुरा विधानसभा मतदार संघातील 'मतघोटाळा' काही ठिकाणी फॉर्म 17C (बूथ लेव्हल मतदान डेटा) आणि अंतिम निकालात विसंगती असल्याचे खुलासे झाले आहेत. जसे की 2024 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अचानक मतदान यंत्रावरील आकडे गायब झाले अथवा अतिरिक्त दाखवले गेले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

10) प्रशासनिक आणि वित्तीय स्वायत्ततेतील कमतरता:

निवडणूक आयोगाच्या सचिवालयाचे स्वतंत्र अस्तित्व नाही. निवडणूक आयोगाला सरकारच्या कर्मचारी वर्गावर आणि संसाधनावर अवलंबून राहावे लागत आहे. निवडणूक आयोगाचा स्वतःचा असा स्वतंत्र नोकरवर्ग नाही. वित्तीयदृष्ट्याही आयोगाचा खर्च Consolidated Fund of India मधून केला जातो. परंतु 'Chartered Expenditure' स्वरूपात न देता सुरुवात केली जाते. ज्यामुळे आयोगाला प्रशासकीय व आर्थिक बाबतीत कार्यकारी सत्तेवर अवलंबून राहावे लागत आहे. याचा आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रभाव पडत आहे.

11) राजकीय दबाव व हस्तक्षेप:

सत्ताधारी पक्षाकडून आयोगावर दबाव टाकण्याचे आरोप अनेक वेळा झाले आहेत.सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली येऊन निवडणूक प्रक्रिया राबवली जात असल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून,स्वयंसेवी संस्था, संघटना कडून होताना दिसतो. काही वेळा निवडणूक आयोगाच्या अधिकारांमध्ये, निर्णयप्रक्रियेमध्ये सत्ताधारी पक्षाकडून दबाव टाकून हस्तक्षेप होत असल्याचा आरोप होत आहे. उदा. निवडणूक आचारसंहिता लागू करणे,निवडणूक तारखा, निवडणूक मतदानाचे टप्पे ,निवडणूक निकालाची तारीख याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे.मात्र या निर्णय प्रक्रियेमध्ये सताधरी पक्षाकडून त्यांच्या सोयीनुसार हस्तक्षेप करून प्रसंगी आयोगावर राजकीय दबाव टाकून निर्णयप्रक्रियेमध्ये बदल केले जात असल्याचा आरोप होत आहे. तसेच निवडणूक आयोगाचे काही निर्णय पक्षपाती असल्याचा आरोप होत आहे. एकंदरीत, सत्ताधारी पक्ष वा त्यांचे नेते निवडणूक आयोगावर दबाव टाकून व त्याच्या निर्णयप्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करून बेकायदेशीर कृती करण्यास भाग पाडत असल्याने आज निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

12) मर्यादित अधिकार आणि संसाधन:

भारतीय निवडणूक आयोगाला काही बाबतीत स्वायत्त निर्णय घेण्याचे कायदेशीर अधिकार कमी आहेत.उदा.राजकीय पक्षांची मान्यता रद्द करणे , उमेदवारांची अपात्रता ठरवणे, निवडणूक काळात धार्मिक, वांशिक,जातीय, भाषिक द्वेष, तेढ निर्माण करणारे, हिंसाचाराला प्रवृत्त करणारे वक्तव्य केल्याने अथवा मतदारांना पैसे वाटप केल्याचे सिद्ध झाल्यावर त्याची उमेदवारी रद्द करण्याचा मर्यादित अधिकार असणे इत्यादी.तसेच निवडणूक प्रक्रिया प्रभावीपणे राबवण्यासाठी अपुरी संसाधने असणे व त्यासाठी केंद्र - राज्य सरकारवर अवलंबून राहावे लागणे. याबाबी निवडणूक आयोगाच्या स्वायत्तेला व उत्तरदायित्वाची भूमिका प्रभावीपणे निभावण्याच्या मार्गातील अडथळा ठरताना दिसतात.हे आज आयोगाच्या स्वायत्तेसमोरील वास्तव आव्हान आहे.

13) माध्यम व प्रचार व्यवस्थेवरील नियंत्रणातील मर्यादा:

वर्तमान आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात निवडणूक आयोगासंबंधी चुकीच्या व फेक बातम्या आणि डिजिटल भ्रम मोठ्या प्रमाणात पसरवण्यात येत आहे. हे आधुनिक काळातील निवडणूक आयोगासमोरील मोठे आव्हान आहे. मात्र सोशल मीडियावर फेक न्यूज, डिजिटल भ्रम आणि निवडणुकीत चुकीची माहिती प्रसारित करणाऱ्यांवर त्वरित कार्यवाही करण्यासाठी आयोगाकडे पूर्ण अधिकार नाहीत. परिणामी निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर व स्वतंत्र निर्णय घेण्याच्या अधिकारावर मर्यादा येताना दिसून येत आहेत.

14) निवडणूक आयोगाच्या विश्वसनीयतेवरील शंका:

काही वेळा आयोगाच्या निर्णयावर जनतेत आणि माध्यमांमध्ये प्रश्न उपस्थित होतात, जे आयोगाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवतात .उदा.मतदानोत्तर मतदान प्रक्रियेविषयी विरोधकांनी शंका उपस्थित केल्यास व त्यांनी संबंधित मतदार संघातील मतदानाविषयी अथवा विशिष्ट मतदान केंद्रातील मतदान प्रक्रियेविषयी सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली असता गोपनीयतेच्या नावाखाली ती न देणे. निवडणूक आयोगाच्या अशा निर्णयामुळे आयोगाच्या विश्वसनीयतेवर जनतेत आणि माध्यमांमध्ये प्रश्न व शंका उपस्थित केली जाते. परिणामी निवडणूक आयोगाची प्रतिष्ठा धोक्यात येत आहे.

वरील प्रमाणे आज भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्तता व उत्तरदायित्व समोरील आव्हाने दिसून येत आहेत. ती आव्हाने दूर करण्यासाठी कायदेशीर उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

IV) भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेसाठीच्या उपाययोजना:

भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्तेसाठी व उत्तरदायित्वाची भूमिका प्रभावीपणे निभावण्यासाठी काही कायदेशीर व प्रभावी सुधारणात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.ज्यामुळे निवडणुक आयोगाची घटनात्मक स्वायत्तता अबाधित राहिल्याने निवडणूक आयोग पारदर्शक व निष्पक्षपाती राहण्यास मदत होईल. व योग्यरित्या आपले घटनात्मक उत्तरदायित्व पार पाडेल.निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेसाठीच्या सुधारणात्मक उपाययोजनांची चर्चा पुढीलप्रमाणे –

1) निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची प्रक्रिया पारदर्शक करणे:

भारताचा निवडणूक आयोग स्वायत्त,तटस्थ व निष्पक्ष ठेवण्यासाठी, तसेच तो सर्व बाह्य राजकीय आणि कार्यकारी हस्तक्षेपापासून मुक्त ठेवण्यासाठी मार्च 2023 मध्ये अनुप बरनवाल विरुद्ध भारत सरकार खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाडयानुसार पंतप्रधान,लोकसभेतील विरोधी पक्षनेता व भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेल्या तीन सदस्यीय निवड समितीद्वारे निवडणूक आयोगातील मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्तांची निवड व्हावी. यामुळे राजकीय हस्तक्षेप कमी होईल. निवडणूक आयुक्तांची नियुक्ती प्रक्रिया पारदर्शक होईल आणि या नियुक्ती प्रक्रियेवर जनतेचा विश्वास बसेल. तसेच आयोगातील सर्व सदस्यांना Same Removal Protection देऊन निष्पक्षता वाढवावी.

2) घटनात्मक संरक्षण वाढवणे:

निवडणूक आयोगाच्या अधिकारांना घटनेद्वारे अधिक कायदेशीर संरक्षण द्यावे, जेणेकरून कोणत्याही राजकीय दबावाला ते बळी पडणार नाहीत. उदा.निवडणूक आयोगाचे निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली येतील अशी तरतूद करणे.

3) आयोगाला अधिक अधिकार प्रदान करणे:

निवडणूक आयोगाला राजकीय पक्षांच्या प्रचारावर नियंत्रण, उमेदवारांचे खर्च, आचारसंहिता उल्लंघन इत्यादी बाबतीत वेळेत आणि अधिक कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार दिले जावेत. निवडणूक आयोगाची कार्यपद्धती कार्यक्षम आणि निष्पक्ष असावी. आचारसंहिता उल्लंघनावर वेळेत आणि कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच आयोगाकडून सर्व पक्षांना समान वागणूक दिली जावी.

4) आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे:

निवडणूक आयोगाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून ई -गव्हर्नन्स,डेटा अँनालिटिक्स, डिजिटल मॉनिटरिंगद्वारे मतदार यादी, खर्चाचे ऑडिट आणि सोशल मीडियावर नियंत्रण ठेवता येऊ शकते. मात्र यासाठी आवश्यक ते अधिकार व मूलभूत संसाधने आयोगाला शासनाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहेत.

5) जनजागृती आणि लोकसहभाग:

मतदारांमध्ये आयोगाच्या कामकाजाविषयी प्रबोधन व जनजागृती करणे, आणि त्यांच्याकडून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर,निवडणूकप्रक्रियेवर नजर ठेवण्याचा अधिकार सुनिश्चित करणे. यामाध्यमातून निवडणूक प्रक्रियेत सकारात्मक लोकसहभागाला प्रोत्साहन देणे .

6) निवडणूक आयोगाचा स्वतंत्र अर्थसंकल्प असावा:

भारतीय निवडणूक आयोगासाठी स्वतंत्र बजेट विभाग तयार करावा. याद्वारे आयोगाची आर्थिक निर्भरता कमी होईल.सध्या निवडणूक आयोगाचा अर्थसंकल्प केंद्र सरकारच्या नियंत्रणात असतो. आयोगाला स्वतंत्र अर्थसंकल्प दिल्यास, ते स्वतंत्र निर्णय घेऊ शकतील. निवडणूक आयोगाचा खर्च Consolidated Fund of India मध्ये 'Chartered Expenditure' स्वरूपात स्वतंत्र केला जावा.

7) प्रशासनिक स्वायत्तता:

निवडणूक आयोगाला आर्थिक स्वायत्ततेप्रमाणेच प्रशासनिक स्वायत्तता असावी. भारतीय निवडणूक आयोगासाठी स्वतंत्र सचिवालय आणि स्वतःचा स्वतंत्र कर्मचारी विभाग असावा. सध्या निवडणूक आयोग निवडणुकीच्या कामकाजासाठी पूर्णतः शासनाच्या नोकर वर्गावर अवलंबून आहे .हे अवलंबित्व कमी करण्यासाठी सध्याच्या सार्वजनिक सेवेतून वेगळा असा स्वतंत्र नोकरवर्ग निर्माण करणे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

गरजेचे आहे. थोडक्यात,निवडणूक आयोगाचे स्वतंत्र सचिवालय, स्वतःचे कर्मचारी असावेत. आयोगाचे सरकारी(शासकीय) अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे.

8) प्रत्येक बूथच्या निकालांसाठी पारदर्शकता:

निवडणूक निकालात पारदर्शकता आणण्यासाठी मतदानाचा प्रत्येक बूथ स्तरावरील Form 17C चा डेटा सर्वांसाठी उपलब्ध करणे. मतदानाचा प्रत्येक बूथ स्तरावरील डेटा प्रकाशित करणे. निवडणूक निकाला संबंधी आलेल्या तक्रारींचे तत्काळ निवारण करून आयोगावरील विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी VVPAT- EVM चे पूर्ण मिळून 100% पडताळणी(Tallying) करावी. दुरुस्थ मतदान(Remote Voting) व VVPAT चे पूर्ण तपासणी (100%) लागू करण्याचे तांत्रिक उपाय(AI -Powered VVPAT Counter) विचारात घेतले जावेत.

9) प्रारूप आचारसंहितेला (Model Code of Counduct) कायदेशीर दर्जा देणे:

भारतीय निवडणूक आयोगाच्या अनुषंगाने प्रारूप आचारसंहितेचे (MCC) कायदेशीर समर्थन व कारवाईची पद्धत सुनिश्चित करणे. प्रारूप आचारसंहितेला कायदेशीर स्वरूप , दर्जा दिल्याने तिचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे शक्य होईल.भारतीय निवडणूक आयोगाला राजकीय पक्षांची वित्तीय तपासणी,निधी स्त्रोत आणि संभाव्य गुन्हे तपासण्यासाठी अधिक अधिकार मिळावेत. राजकीय पक्ष आणि प्रचार व्यवस्थेवर नियमन करणे,खर्चावर पारदर्शकता,डिजिटल माध्यमांत नियंत्रणे आवश्यक आहेत. यासारख्या उपाययोजनांच्या माध्यमातून आयोगाच्या नियमनात्मक अधिकारांची माजबुतता वाढविणे .

10) आधुनिक तंत्रज्ञानचा वापर आणि जागरूकता वाढवणे:

निवडणूक आयोगाद्वारे VVPAT,EVM आणि आधुनिक तंत्रज्ञान (उदा. ब्लॅकचेन), SVEEP,CVIGIL यांचा विस्तारीत वापर करणे. डिजिटल सुरक्षा आणि भ्रम निवारण करण्यासाठी सोशल मीडिया व्यवस्थापन, Deepfake व Missinformation वर कायदेशीर उपाययोजना करणे आवश्यक आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाला अधिक कायदेशीर अधिकार व स्वायत्तता देणे आवश्यक आहेत.

11) आयोगाची जबाबदारी निश्चित करणे:

आयोगाच्या निर्णयांचे वार्षिक परीक्षण संसदेच्या समितीकडून करणे,माहिती अधिकार कायद्याअंतर्गत अधिक माहिती खुली करणे. यामाध्यमातून निवडणूक आयोगाची जबाबदारी अथवा उत्तरदायित्व निश्चित करणे.

12) नागरिक सहभाग व संवाद:

ट्रस्टी फाउंडेशन, सीव्हींसी(CVC), जन उपस्थापन संस्था , Association for Democratic Reforms(ADR) यासारख्या संघटना यांना निवडणूक आयोगाशी संलग्न करणे .डिजिटल माध्यमांवरून मतदारांना सुलभ प्रक्रिया (जसे Online Enrolment, SIR मध्ये विरोध नोंदविणे) उपलब्ध करून देणे. या माध्यमातून निवडणूक आयोगाच्या निर्णय प्रक्रियेत नागरी सहभाग व संवाद वाढण्यास मदत होईल. यामुळे निवडणूक आयोग अधिक निष्पक्ष व तटस्थपणे कार्य करेल.

13) मतदान सुचित विविध असुरक्षित गटांचा समावेश करणे:

निवडणूक आयोगाने मतदार नोंदणी प्रक्रिया राबवताना मतदार यादीतील दोष, अस्पष्टता दूर करून निर्दोष मतदार याद्या तयार करणे. समाजातील विविध असुरक्षित गट (उदा. गरीब,स्थलांतरित कामगार,दलित, आदिवासी, विविध धार्मिक ,वांशिक, भाषिक व सांस्कृतिक अल्पसंख्यांक समूह, भटके- विमुक्त समाज गट ,तृतीयपंथी इत्यादी) मतदार यादीच्या बाहेर राहू नयेत याची जबाबदारी व उत्तरदायित्व निवडणूक आयोगाचे आहे. मतदार यादी मधून मतदारांच्या दुहेरी नोंदी रद्द करणे, मृत मतदारांच्या नोंदी रद्द करणे. सर्व पात्र मतदारांच्या नोंदी मतदार यादी मध्ये समाविष्ट करणे, समाजातील विविध असुरक्षित गटांचा मतदार यादी मध्ये समावेश करावा. त्यासाठी निवडणूक आयोगाला मतदान नोंदणी प्रक्रिया राजकीय हस्तक्षेप अथवा राजकीय दबावाला बळी न पडता स्वायत्त, तटस्थ, निष्पक्षपतीपणे राबविता यावी यासाठी संपूर्ण अधिकार व स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

14) निवृत्तीनंतर निवडणूक आयुक्तांना लाभाचे पद देऊ नये:

भारतीय संविधानाने निवृत्त होणाऱ्या निवडणूक आयुक्तांला शासनाकडून होणाऱ्या अन्य कोणत्याही नेमणुकीकरता अपात्र ठरवलेले नाही.निवृत्तीनंतर निवडणूक आयुक्तांना अन्य सार्वजनिक किंवा शासकीय - प्रशासकीय पदावर अथवा एखाद्या आयोगाचे सदस्य ,अध्यक्ष म्हणून नियुक्तीची शक्यता अजूनही खुली आहे .परिणामी निवडणूक आयुक्तपदावर असताना भविष्यातील लाभाच्या पदाच्या अभिलाषाने सत्ताधारी राजकीय पक्षांच्या दबावाला , हस्तक्षेपाला बळी पडून चुकीचे, अयोग्य निर्णय घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.परिणामी आयोग आपले घटनात्मक स्वायत्तता व उत्तरदायित्व योग्यरीत्या निभावण्याची शक्यता दुसर ठरते. त्यामुळे निवडणूक आयोगाची स्वायत्तता धोक्यात येते. म्हणून निवृत्तीनंतर निवडणूक आयुक्तांना कोणत्याही लाभाच्या पदावर नियुक्ती करू नये यासाठी संसदेने घटनादुरुस्ती करणे आवश्यक आहे. भारतीय निवडणूक आयोगातील खालील काही मुख्य निवडणूक आयुक्त किंवा इतर आयुक्त आहेत ज्यानी निवृत्तीनंतर सार्वजनिक पद किंवा राजकीय पद किंवा वैधानिक / सरकारी पद स्वीकारली किंवा निवडणुकीत भाग घेतला आहे.त्याची खालील काही उल्लेखनीय उदाहरणे आहेत. उदा.-1) टी. एन. शेषन हे भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त (1990 ते 96) होते.निवृत्तीनंतर त्यांनी 1997 साली राष्ट्रपती पदासाठी उमेदवारी अर्ज भरला होता. त्यानंतर त्यांनी 1999 मध्ये लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर गांधीनगर मधून निवडणूक लढवली होती. उदा -2) व्हीं.एस. रामदेवी यांनी निवडणूक आयोगाचे पद सोडल्यानंतर राज्यसभा सचिव (SecretaryGeneral,Rajyasabha) चे पद भूषविले आणि नंतर ते हिमाचल प्रदेशचे राज्यपाल आणि नंतर कर्नाटकचे राज्यपाल झाले. उदा.-3) अशोक लवासा हे निवडणूक आयोगाचे आयुक्त होते.त्यांनी निवडणूक आयोग सोडल्यानंतर Asian Development Bank (ABD) मध्ये उपाध्यक्ष (Vice- President) पद स्वीकारले. वरील काही उदाहरणावरून असे म्हणतात येईल की, निवडणूक आयुक्तांना निवृत्तीनंतर कोणतेही सार्वजनिक किंवा राजकीय लाभाचे पद देऊ नये. ज्यामुळे निवडणूक आयोगाची स्वायत्तता व उत्तरदायित्व धोक्यात येईल यासाठी घटनात्मक व कायदेशीर उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

समारोप :

वरील प्रमाणे भारतीय निवडणूक आयोगाची घटनात्मक स्वायत्तता आणि उत्तरदायित्व ,त्याचा प्रत्यक्ष व्यवहार व आजचे वास्तव स्वरूप ,आयोगाच्या स्वायत्तता व उत्तरदायित्वा बाबतच्या मर्यादा, आव्हाने यांचा विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, भारतीय निवडणूक आयोग हा लोकशाहीचा एक अत्यंत महत्त्वाचा पाया आहे. त्याची स्वायतता, पारदर्शकता व कार्यक्षमतेवर भारतीय लोकशाहीची विश्वासार्हता अवलंबून आहे. भारतीय निवडणूक आयोगाची स्वायत्तता ही केवळ घटनात्मक नव्हे तर नैतिक आणि सामाजिक दृष्ट्या ही अत्यंत महत्त्वाची आहे.पण ही स्वायत्तता व्यवहारात खरी उतरावी यासाठी उत्तरदायित्व,पारदर्शकता आणि कार्यक्षमतेची गरज आहे. आजच्या घडीला आयोगाचे कार्य समाधानकारक असले तरी लोकशाहीतील अधिक विश्वासाहर्ता मिळवण्यासाठी काही ठोस सुधारणांची नितांत गरज आहे. यामध्ये निवडणूक आयोगाला निर्णयनिर्धारण व अंमलबजावणीच्या बाबतीत संपूर्ण स्वायत्तता व अधिकार देणे, प्रशासकीय व वित्तीय स्वायत्तता बहाल करणे ,आयुक्तांच्या नियुक्तीप्रक्रियेत सुधारणा करून तिच्यात अधिक निष्पक्षता आणि पारदर्शकता वाढवण्याची गरज आज अतिशय तातडीची आहे. कारण जुलै,ऑगस्ट - सप्टेंबर 2025 च्या दरम्यान बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार याद्यांचे विशेष सखोल पूनर्निरीक्षण (SIR - Special Intensive Revision) प्रकरणाच्या संघर्षांनी याची आवश्यकता अधिक अधोरेखित केली आहे. याशिवाय EVM,VVPAT संबंधी जनतेच्या मनामध्ये असणाऱ्या शंकांचे त्यासंबंधी असलेल्या तांत्रिक त्रुटी दूर करून निराकरण करणे गरजेचे आहे. याशिवाय प्रारूप निवडणूक आचारसंहितेला (MCC) कायदेशीर बळ देऊन निवडणूक आयोगाचे अधिकार व कार्यक्षमता वाढविणे,निवडणूक आयोगाला त्याच्या उत्तरदायित्वाची भूमिका कार्यक्षम व पारदर्शकपणे निभाविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे.डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगातील संभाव्य धोके टाळण्यासाठी आयोगाला अधिकचे कायदेशीर अधिकार देणे आवश्यक आहे. भारतीय जनतेच्या मनात आयोगावरील कमी झालेला विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी वरील प्रमाणे त्वरित व ठोस सुधारणा व उपाययोजना कराव्या लागतील. एकंदर, भारतीय निवडणूक आयोगाला संविधानिक संरक्षण,व्यापक अधिकार आणि आदर्श धोरणे आहेत. तरीही व्यवहारात स्वायत्तता व उत्तरदायित्व अधोरेखित करण्यासाठी वरील प्रमाणे बऱ्याच सुधारणा करणे आवश्यक आहेत.आजच्या आधुनिक परिस्थितीत भारतीय निवडणूक आयोगाने लोकशाहीचा रक्षणकर्ता म्हणून अधिक विश्वासहार्यता , निष्पक्षता, तटस्थता, पारदर्शकता आणि जबाबदारी जोपासली पाहिजे हेच भारतीय निवडणूक आयोगाचे अंतिम उत्तरदायित्व आहे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

संदर्भ सूची:

1. जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश, (2024); भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया, खंड-1, युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स, प्रा. लि. पुणे ,सहावी आवृत्ती
2. एम. लक्ष्मीकांत, (2024); इंडियन पॉलिटी, मॅकग्रो हिल, एज्युकेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, चेन्नई, सातवी आवृत्ती.
3. पठाण नुरखा, (2024); आपले संविधान, प्रियदर्शनी पब्लिकेशन कल्याण (पूर्व) मुंबई, चौथी आवृत्ती.
4. अष्टेकर शरद (प्रकाशक), (मे 2024); भारताचे संविधान, मधुश्री पब्लिकेशन, पुणे.
5. भोळे भास्कर लक्ष्मण, (2003); भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

वेबसाईट्स :

1. https://www.casemine.com (निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेची पुष्टी करणारे न्यायालयी निवाडे -31 ऑगस्ट 2000)
2. www.https://en.wikipedia.org (अनुप बरनवाल विरुद्ध भारत सरकार खटला -2023)
3. https://www.lawctopus.com (अनुप बरनवाल विरुद्ध युनियन: मुख्य निवडणूक आयुक्तांचे स्वातंत्र्य…)
4. https://www.mahamts.com
5. https://www.bbc.com (Bihar SIR Case)
6. https://mr.wikipedia.org (भारतीय निवडणूक आयोग-विकिपीडिया)
7. https://ceoelection.Maharashtra.gov.in.(निवडणूक विषयक कायदे)
8. https://www.orfonline.org (लेख - E. Shridharan ,Milan Vaishnav ; निवडणूक आयोगाची पंच्चाहत्तरी, 18 ऑगस्ट 2022)
9. https://www.maxmaharashtra.com
10. (स्वायत्त आणि निष्पक्ष निवडणूक आयोगासाठी सर्वोच्च न्यायालय आग्रही -सुभाष वारे)
11. https://www.britannica.com (भारतीय निवडणूक आयोग (ECI) | भूमिका, कार्य, आव्हाने आणि पुढाकार - 23 ऑगस्ट 2025)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

भारताच्या संविधान निर्मिती प्रक्रियेवर महात्मा फूले, शाहू महाराज आणि महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव

श्री. प्रकाश हणमंत देवकर
Assistant Professor Department of History, GKGKM College, Jaysingpur
Email: prakashd23rk@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170970
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 337-338
Sept. 2025
Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

सारांश

भारतीय संविधान हे सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित व निर्मित आहे. या मूल्यांच्या निर्मितीत महात्मा फूले, शाहू महाराज आणि महात्मा गांधी यांच्या बरोबरच भारतीय समाज सुधारकांचा ही फार मोठा सहभाग व कार्य आहे. महात्मा फूले यांनी स्त्री शिक्षण,स्त्री समानता व अस्पृशता निर्मूलनावर विशेष कार्य केले. यांच्या कार्याची दखल घेत संविधान निर्माणकर्त्यांनी अनुच्छेद 14, 15, 17 आणि शिक्षणाचा अधिकार (21*A)* तरतूद केली. राजर्षि शाहू महाराज यांनी तर आजचा जो आरक्षणाचा ज्वलंत मुद्दा आहे तो त्यांनी 1902 मध्येच गोरगरीब जनतेसाठी आरक्षण जाहीर करून, मागासवर्गीयांना आरक्षणाच्या छत्रछायेखाली प्रगती करून घेण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला. याचीही घटनाकारांनी अनुच्छेद 15(4), 16(4) मध्ये तरतूद केली. ज्यांनी खेड्याकडे चला असा नारा दिला ते महात्मा गांधी, यांनी अहिंसा, सत्याग्रह, बहुजन उन्नती व ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली व पुढे गावांचाही विकास शहराबरोबरीने झाला पाहिजे ही भूमिका मांडून त्यांनी त्या साठी मार्गदर्शनही केले. याचा प्रभाव म्हणूनच की काय पुढे अनुछेद 40 ची (ग्रामपंचायत) ची निर्मिती झाली. या तिनही महारथींचे कार्य कर्तृत्व येणाऱ्या ज्वलंत समस्येवर उपाय म्हणून बघावे लागेल.

मुख्यशब्द: *भारतीय संविधान, महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, सामाजिक न्याय, समानता, अस्पृश्यता निर्मूलन, आरक्षण, ग्रामस्वराज्य, शिक्षणाचा अधिकार, अहिंसा, सत्याग्रह.*

प्रस्तावना :-

भारताचे संविधान हे आधुनिक काळातील सुधारित व संशोधनात्मक आहे. यात समानता, बंधुता, सामाजिक-आर्थिक-न्याय व धर्मनिरपेक्षता या मूल्यांचा पाया आहे. संविधान निर्मिती प्रक्रियेवर 60 देशांच्या घटनांचा अभ्यास व आलेल्या समस्या व उपाय यांचा परिणाम दिसून येतो. महात्मा फूले, राजर्षि शाहू महाराज आणि महात्मा गांधी यांच्या सुधारणावादी, पुरोगामी कार्यकुशलतेचे महापुस्तक म्हणजे संविधान निर्मिती होय.

महात्मा फूले यांचे तत्वज्ञान व संविधानावर प्रभाव :-

19 व्या शतकातील वेगवेगळे धर्म, जात-पात, पंथ, रंगभेद व उच्चवर्णीय प्रस्थापितांचे गोरगरीब सर्वसामान्यावर होणारे अन्याय, अत्याचार यावर महात्मा फूले यांनी पहिल्यांदा निर्भीडपणे प्रखर विरोध दर्शविला. आपल्या लेखणीतून आणि वाणीच्या सामर्थ्यातून महात्मा फूलेंनी सर्वसामान्यांची जनजागृती करण्यासाठी अनेक ग्रंथ लिहिले.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
श्री. प्रकाश हणमंत देवकर, Assistant Professor Department of History, GKGKM College, Jaysingpur

How to cite this article:
देवकर, . प्रकाश . हणमंत . (2025). भारताच्या संविधान निर्मिती प्रक्रियेवर महात्मा फूले, शाहू महाराज आणि महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव. Journal of Research & Development, 17(9(IV)), 337–338. https://doi.org/10.5281/zenodo.17734870

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17734870
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

त्यामध्ये "गुलामगिरी" (1873) व "शेतकऱ्यांचा आसूड" हे दोन ग्रंथ तर त्याकाळात शेतकरी आणि सर्वसामान्यावर होणाऱ्या त्रासाचे आणि अन्यायाची वास्तविकता उघड करणारे ठरले. महात्मा फूलेंनी या दोन ग्रंथातून त्या काळातील शेतकरी आणि सर्वसामान्यावर होणाऱ्या अन्यायाची आणि त्रासाची दाहकता आणि भीषणता अगदी निर्भीडपणे मांडली.

महात्मा फूलेंनी सार्वत्रिक शिक्षणासाठी भरघोस प्रयत्न केले. स्त्री-पुरुष, दलित, वंचित सर्वांना शिक्षण मिळावे याकरिता शाळा काढल्या. प्रसंगी सावित्रीबाई फूलेंना शिक्षित करून त्यांना सुद्धा समाजकार्याला प्रेरित केले. त्यांनी अस्पृश्यता कधीही पाळली नाही. उच्च-नीच भेदभाव न करता पाण्यासाठी चाललेला बहुजन समाजाचा संघर्ष स्वत:च्या घरातील पाण्याचा हौद रिकामा करून बहुजन समाजाला दिला.

स्त्री ही घरची लक्ष्मी असते व ती चूल आणि मूल ह्या संकल्पनेशी मर्यादित न ठेवता स्त्रीयांचे सक्षमीकरण केले. मुलींची पहिली शाळा काढली व ती चालविली. विधवांना हक्काचे घर मिळवून दिले. महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. शेतकरी व श्रमिकांच्या हक्कासाठी त्यांनी संघर्ष करून शेतकरी व श्रमिकांना त्यांचा हक्क मिळवून दिला.

महात्मा फूले यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव भारतीय संविधानावर तर पडलेला आहेच पण त्याला कायद्याचा पोलादी आकार प्राप्त झाला आहे. त्यामध्ये अनुच्छेद 14, 15, 17 समानता, भेदभाव विरोध व अस्पृश्यता निर्मूलन, 21A शिक्षणाचा मूलभूत अधिकाराला इतके महत्व आहे की, दीडशे वर्षापूर्वी त्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागत होता.

राजर्षि शाहू महाराज यांचे तत्वज्ञान व संविधानावर प्रभाव :-

शाहू महाराज नुसते राजेपद घेऊन राज्यकारभार करणारे नव्हते तर ते कोल्हापूर संस्थानचे पितामह होते. आपल्या प्रजेला काय हवे आणि काय गरजेचे आहे हे ओळखून सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देणारे किमयागार होते. समाजातील उच्चवर्गीयच फक्त नोकरी, शैक्षणिक ठिकाणी जातात. पण माझी गोरगरीब रयत पण नोकरी शैक्षणिक ठिकाणी पोहोचली पाहिजे यासाठी शाहू महाराजांनी आरक्षण धोरण (1902) साली मागासवर्गीयांसाठी 50% नोकरी-आरक्षण दिले. जातीय आधारे मिळणारे विशेष अधिकार शाहू महाराजांनी रद्द केले. शेतकऱ्यांना व श्रमिकांना हक्क व अधिकार दिले पाहिजेत यासाठी पाऊले उचलली.

शाहू महाराजांच्या कार्यकाळातील सुधारणांचा पुढे अभ्यास करून भारतीय संविधानामध्ये त्यांचे काही विशेष मोलाचे कार्य व उपक्रमांना साचेबद्ध संविधानात सामील करून घेतले. त्यामध्ये अनुच्छेद 15 (4), 16 (4) मागासवर्गीयांसाठी विशेष आरक्षण दिले आणि समाज उपयोगी राज्यकारभार असावा अशी संकल्पना मांडली.

महात्मा गांधी यांचे तत्वज्ञान व संविधानावर प्रभाव :-

भारतीय स्वातंत्र्य लढ्याला योग्य मार्गदर्शक लाभल्यामुळे पुढील काही वर्षातच भारताला स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करून दिला. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा, सर्वहीत (sarvodaya) ही त्यांची मूल्ये आज घरा-घरापर्यंत पोहोचली. महात्मा गांधींनी जगाला हे दाखवून दिले कि फक्त युद्धखोर नीतीने दुसऱ्यावर विजय मिळविता येतो ही मांडणी खोडून काढली व त्या जागी अहिंसा व सत्याग्रह या ही मार्गाने कोणत्याही पद्धतीची जीवित हानी न होता लढा उभारला जाऊ शकतो हे संपूर्ण जगाला दाखवून दिले. बहुजन समाजासाठी महात्मा गांधींनी बहुजन उद्धारक कार्यक्रम, उपक्रम राबविले. फक्त येणारी पिढी शहरातील विकासाकडे बघून हर्षून जाते. पण तोच विकास खेड्यांचाही व्हायला हवा त्यासाठी त्यांनी खेड्यांकडे चला हा नारा दिला. शहरातल्या सर्व सोयी-सुविधा खेड्यात सुद्धा असायला हव्यात याची मांडणी केली. महात्मा गांधी म्हणत कि साधे आचार आणि उच्च विचार ठेऊन मूल्यांची जपणूक प्रत्येकाने केले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. महात्मा गांधींच्या खेड्याकडे चला या नाऱ्याचा अर्थपूर्ण गांभीर्य लक्षात घेऊनच अनुच्छेद 40 प्रमाणे ग्रांपचायतींची स्थापना केली. हे त्यांचे विलक्षण विचार आज संविधानात मोलाचे योगदान देत आहेत.

निष्कर्ष :-

भारतीय संविधानात महात्मा फूले, शाहू महाराज महात्मा गांधी ह्या तिन्ही त्रिमूर्तींचे आजचे स्थान हे देवळातल्या मूर्तीसारखे न हलणारे आहे आणि न विसरणारे नामस्मरण आहे. महात्मा फूलेंनी शिक्षण हा समाजाचा अविभाज्य घटक आहे याची जाणीव समाजाला करून दिली. शाहू महाराजांनी उच्च वर्णियांकडून बहुजन शोषित वर्गाला दिल्या जाणाऱ्या न्यायाला सामाजिक न्यायात रूपांतरित करून घेतले. महात्मा गांधींनी युद्धखोर वृत्तीला आळा घालत अहिंसा प्रवृत्तीस जागृत केले.

संदर्भ सूची (References) :-

1) महात्मा गांधी – हिंद स्वराज Young India लेखमाला.
2) ज्योतीराव फूले – गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड.
3) डी. डी. बसू - Introduction To The Constitution of India.
4) आर. सी. मजुमदार – History of Modern India.
5) बी. एल. ग्रोवर – Modern India Political Thought.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

संविधान के 75 साल भारतीय साहित्य में संवैधानिक विमर्श

श्रीमती. विजया माणिक पाटील
हिंदी विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड
Email: vijayapatil012@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-170971
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 339-341
Sept. 2025

सारांश

यह शोध पत्र भारतीय संविधान के पिछले *75* वर्षों के सफर और इस दौरान हिंदी साहित्य में आए बदलावों के बीच के संबंध का विश्लेषण करता है। हमारा उद्देश्य यह समझना है कि भारतीय लेखकों और कवियों ने संविधान द्वारा स्थापित मूल्यों, जैसे न्याय, समानता, स्वतंत्रता और बंधुत्व को अपनी रचनाओं में किस प्रकार दर्शाया और उनकी व्याख्या की है। यह शोध पत्र इस बात पर प्रकाश डालेगा कि कैसे संविधान ने साहित्य के लिए एक वैचारिक आधार प्रदान किया, और बदले में, साहित्य ने इन संवैधानिक मूल्यों को समाज के विभिन्न वर्गों तक पहुँचाने का काम किया। इस शोध के माध्यम से हम साहित्य में संवैधानिक चेतना के विकास, संवैधानिक आदर्शों पर साहित्यिक प्रतिक्रियाओं और संविधान के *75* वर्षों के सफर के साथ-साथ साहित्यिक विमर्श में आए उतार-चढ़ाव की पड़ताल करेंगे।

बीजशब्द: *भारतीय संविधान, हिंदी साहित्य, संविधानिक मूल्य, सामाजिक न्याय, समानता, स्वतंत्रता, बंधुत्व, साहित्यिक विमर्श, स्त्रीवाद, दलित साहित्य, लोकतंत्र.*

Submitted:15 Aug. 2025
Revised: 25 Aug. 2025
Accepted: 10 Sept. 2025
Published: 30 Sept. 2025

उद्देश्य

1.साहित्य में संवैधानिक मूल्यों की पहचान उन साहित्यिक कृतियों और लेखकों की पहचान करना जिन्होंने भारतीय संविधान द्वारा प्रतिपादित सिद्धांतों (जैसे धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय और लोकतंत्र) को अपनी रचनाओं का केंद्र बनाया।

2.साहित्य और समाज के बीच संबंध का विश्लेषण यह समझना कि कैसे साहित्य ने संवैधानिक आदर्शों को लोकप्रिय बनाने और उनकी आलोचना करने, दोनों में महत्वपूर्ण भूमिका निभाई।

साहित्यिक प्रतिक्रियाओं का मूल्यांकन विभिन्न ऐतिहासिक चरणों (जैसे आपातकाल, मंडल आयोग, वैश्वीकरण) के दौरान साहित्य में आए बदलावों और संविधान से संबंधित विमर्श पर उनकी प्रतिक्रियाओं का मूल्यांकन करना।

3.भविष्य की दिशा का निर्धारण यह देखना कि संविधान के भविष्य के विमर्श में साहित्य की क्या भूमिका हो सकती है, खासकर जब नए सामाजिक और राजनीतिक मुद्दे सामने आ रहे हों।

प्रस्तावना

26 जनवरी 1950 को जब भारतीय संविधान लागू हुआ, तो यह सिर्फ एक कानूनी दस्तावेज नहीं था, बल्कि एक नव-भारत के निर्माण का स्वप्न था।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
